भाग दुसरा

ऐतिहासिक-लेख-संग्रह.

मासिक पुस्तक.

माधवराव बल्लाळ उर्फ रावसाहेब पेशवे

यांची कारकीर्द.

भाग दुसरा.

(अर्थ निर्णायक व अवांतर माहितीच्या विपुल टीपांसह)

वासुदेव वामन शास्त्री खरे

मिरज हायस्कुलांतील संस्कृत शिक्षक

यानीं

तयार करून

कुरुंदवाड येथें

" भाऊ नाना " छापखान्यांत छापविला.

किंमत तीन रुपये.

ऐतिहासिक-लेख-संग्रह.

मासिक पुस्तक.

जून. १८९८ इ०.

अंक १३

वासुदेव वामन शास्त्री खरे
मिरज हायस्कुलांतील संस्कृत शिक्षक.

यांनीं

कुरुंदवाड येथें

" भाऊनाना " छापखान्यांत छापविलें.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हाशीलसह तीन रुपये.

फुटकळ अंकास पांच आणे.

ऐतिहासिक-लेख-संग्रह.

अंक तेरावा

विषयांचा अनुक्रम. पृष्ठ

(मागील अंकावरून पुढें चालू)

अगत्याची सूचना.

ऐ०ले०संग्रहाच्या दुसऱ्या वर्षास सुरुवात झाली. वर्गणी पाठविण्या विषयीं आश्रयदात्यानीं त्वरा करावी. आमच्या पुस्तकाची वर्गणी आगाऊ आहे हें त्यांस माहीत आहे.

ऐ०ले०संग्रह कर्ते.

द्वितीय वर्षारंभ.

जगदीशकृपेनें ' ऐतिहासिक-लेख-संग्रहाचें ' पहिल्या वर्षाचें काम निर्विघ्नपणें पार पडलें. आतां दुसऱ्या वर्षाच्या उद्योगास आह्मीं लागणार.

गेल्या जून महिन्यांत पुस्तकाचा पहिला अंक प्रसिद्ध झाला तेव्हां दुष्काळाची ऐन अमदानी व प्लेगची भयंकर धामधूम जारीनें सुरू होती. लोकांचीं मनें भीतीनें गांगरून गेलीं होतीं. दुसरें अरिष्ट अद्यापि महाराष्ट्रांतील शहरें व गांव उद्वस्त करीतच आहे. कधीं परमेश्वरास करुणा येईल ती येवो !

अशा प्रकारें पुस्तकाच्या सुरुवातीस प्रतिकूल काल असतां ही सर्व अडचणी क्रमाक्रमानें दूर होत गेल्या व आह्मांस थोडथोडा लोकाश्रय मिळत गेल्यामुळें स्वकर्तव्य बजावितां आलें.

गेल्या सालीं सुरू असलेलें प्रकरण " मोंगलाशीं लढाई " हें या सालीं ही चालू राहून सोळाव्या अंकांत संपेल. त्या नंतर " हैदरअल्लीवर पहिली स्वारी " हें प्रकरण सुरू होऊन साल अखेरीस संपेल.

आश्रयदात्यानीं वर्गणी लवकर पाठवावी. आम्हीं किती झटून व नियमितपणानें त्यांची सेवा करीत आहों हें त्यानीं ध्यानांत आणावें. याविषयीं ' अगत्याची सूचना ' हीं निराळी दिली आहेच.

मागील सालाचें मुखपृष्ठ या अंका सोबत सुटें पाठविलें आहे. आतां मागील अंकांचें पुस्तक बांधण्यास हरकत नाहीं.

ऐ० ले० संग्रह कर्ते

नं० २७७

[१७ मे.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत अधिक शुद्ध चतुर्थी बुधवार तृतीय प्रहर. यथास्थित असे विशेष. सोमवारचें पत्र जासुदाबरोबर पाठविलें तें शुक्रवारीं प्रहर दिवसास प्रातःकाळीं पावलें. त्या पत्रावरून चित्ताची स्वस्थता नाहीं. परंतु मंगळवारचीं पत्रें बाळाजी नरसिंह याजबरोबर पाठविलीं तीं गुरुवारीं सायंकाळीं पावलीं होतीं त्या पत्रांत फारसा पहिल्या पत्रा प्रमाणें मजकूर नव्हता, त्या मुळें चित्त स्वस्थ राहिलें. मुख्य साऱ्या गोष्टी ऋणानुबंधावरी आहेत. जी स्वप्नीं कल्पना[2] होईना ऐसा प्रसंग प्रत्यक्ष घडोन आला ! बहुत दिवस सेवा केली. लेंकरा प्रमाणें ज्याणीं प्रतिपाळ केला त्याच धण्यांनीं बाहेर घातलें ! तिलमात्र चित्तांत विचार न आणिला ! आम्ही विचार करावा तो चालेना. प्रवाहीं पडले ते वाहत गेले तद्वत् वाहत नबाबाच्या आश्रयास लागलों. पुढें आपला होणार काल उत्तम आहे तरी नबाब ही कृपा करील. तुम्हीं ही सेवा कराल. नाहीं तेव्हां बहुता दिवसांचें पलार्ध व्यर्थ झालें तेथें याची कथा काय ? श्रीभगवान् समर्थ असतां चिंता कोठवरी करावी ! नळदुर्गीच्यानीं[3] पूर्वीं येथें यावें ह्मणून लिहिलें होतें, त्या उपरी ' तूर्त न आणावे, नाईक[4] यांची फौज दरम्यान आली आहे. हे एकीकडे झालियावरी मग आणावयाचा विचार, ' ह्मणून लिहिलें, त्यास उभयतां वडिलांनीं याच प्रकारें प्रत्योत्तर लिहिलें आहे. ' नाईक जातात, श्रीमंत ही एखाद्या ठिकाणास पोंहचतील, पुढें तुमच्या विचारें यावेसें झालें तरी येऊं; ' (असें त्यानीं लिहिलें आहे.) रामचंद्र

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ पेशव्यांचा आमचा द्वेष पडून लढाई होईल ही कल्पना. ३ नळदुर्गास वडील बंधु कृष्णंभट व त्रिंबक हरि आहेत त्याणीं. ४ मंगळवेढें व नळदुर्ग यांच्या मध्यें बाबूजी नाईक बारामतीकर यांची फौज आली आहे.

गणेश मोहळेंत आला होता. शुक्रवारीं शनिवारीं माघारा गेला. तो सीनातीरीं तीरेसिगोली (?) वरी चार पांच मुक्काम करून आहे. घासदाणियाचा तह झाला असतां [त्यानें] एक- दोन खेडीं मारिलीं. बाबूजी नाईकाशीं[1] करार तहाचा करीत असतां आग्रह करोन चालोन आले. निंबाळकराकडील लोकांनीं दहा पांच तट्टें कहीचीं पाडून घेतलीं. खेड्याखेडियानीं जमा आहेत. सीनेस पाणी, यास्तव ते ही दम धरून राहिले आहेत. मागती त्यांजकडूनच सूत्र लागलें कीं, ' तहा प्रमाणें निर्वाह[2] करा. ' हे[3] ह्मणतात, खेडीं मारिलीं. मागती कसें होईल पहावें ! करकंबेंत बहिरोपंतीं[4] हिम्मत बरीच धरिली. फार करून गडबड झाली होती, परंतु मोहळेहून चार कोस माघारे सरले यामुळें अवसान बसलें आहे. श्रीमंतांचें लष्कर काडलूर संगमाकडे[5] गेलें. परंतु फलाणे ठिकाणीं आलें असें ठीक[6] नाहीं. आम्हीं बातमीचे खबरदारीस चुकलों नाहीं. दोन तीन जोड्या पाठविल्या आहेत. तुम्हीं चिरंजीव दाजीस लिहिलें होतें त्या अन्वयें चिरंजीवानीं उभयतांस सूचना लिहिली आहे. जवळील प्रकार नव्हे. दूर आहेत. समीप पसंत पडलिया जाबसाल पुढील भवितव्यानुसार होईल. मर्दनगडास[7] फिरंग्यांनीं वेढा घातला होता. परवां आजऱ्यांकडून माणूस आला त्यानें खबर सांगितली कीं, फिरंग्यांनीं मर्दनगड घेतला. परंतु कोणाचें लिहिलें नाहीं. खडकताहून कूच होऊन तुमचें पत्र गुरुवारचें बहिरोपंताच्या जासुदा बरोबर आलें त्यांत लिहिलें कीं, ' उदईक (नबाबाची) आज्ञा घेऊन चिरंजीव नीलकंठरायाची रवानगी हत्ती, घोडियांनिशीं करितों ' ह्मणून

---

१ बाबूजी नाईकाकडून. २ शर्ती अमलांत आणा. ३ निंबाळकर ह्मणतात कीं, तुह्मीं आमची खेडीं मारिलींत. आतां कसचा तह ? ४ पेशव्यांचे लोक. रामचंद्र गणेश याच्या हाता खालचे. ५ काडलूर संगम कृष्णा व भीमा यांचा, रायचूरचे उत्तरेस आठ कोसांवर. ६ पक्कें वर्तमान. ७ मर्दनगड किंवा मदनगड (फोंडा) हा किल्ला गोंव्याच्या सरहद्दीवर सोंधें संस्थाना पैकीं असून तो यावेळीं पेशव्यांच्या ताब्यांत होता. तो घेण्याचा हा फिरंग्याचा दुसरा प्रयत्न. पहिल्या प्रयत्नाविषयीं पहिल्या अंकांतील आठवे पृष्ठावरील सहावी टीप पहा.

लिहिलें; त्यावरून करमाळ्याकडे आले असतील ह्मणोन आम्हीं माणसें त्याच्या नांवें पत्र लिहून पाठविलीं आहेत. आज्ञेचा मातबर गुंता असतां त्वरेनें येणें घडणार नाहीं. गोटखिंडीकर एक मुसलमान बारगीर जमखिंडीच्या झुंजांतून गेला तो काल अबलख घोडी घेऊन येथें आला. इतके दिवस आपणास बरें वाटत नव्हतें ह्मणतो. लोकांच्या चिठ्या येऊं लागल्या. 'चिठ्या घ्या, आमच्या पदरीं पैका घाला,' म्हणतात. आम्हीं "महिन्या दोन महिन्यांची मुदत द्यावी. विचारें विचारें करून वारून देऊं. आम्हांपाशीं चिरंजीवानीं ऐवज कांहीं दिला नाहीं. परंतु लिहिलें आहे जे 'चिठ्या न फिरविणें. आम्हीं आलियावरी ऐवज देऊं.' त्यास आजीच मागाल तर नाहीं. फुरसतीनें देऊं," (असें सांगतों) कोणी बरें म्हणतो. कोणी नाहीं म्हणतो. चिठी आम्हीं यादीवर बार करून त्यांच्या समाधानास त्यां जवळी देतों. "फलाणे मुदतीची चिठी घेऊन येणें. रुपये घेणें." [अशी मुदत सांगतों] एकच मुदत सांगत नाहीं. माणूस पाहून सांगतों. वरकड कुरुंदवाडाकडील यथास्थित आहे. पुण्याकडे घर होतें ह्मणोन मागें आठ पंधरा दिसां माणूस पाठवीत होतों. आतां तो प्रकार नाहीं. रामोजीपंत ही [तेथें] नाहीं या मुळें पत्र पाठविलें नाहीं. नरगुंदाकडून नरसिंगराऊ पागे आले कृष्णातीरास. पुढें श्रीसत्ता प्रमाण! कोणे विशीं चिंता न करणें. होणार प्रारब्धगतीनें होईल. मार्ग पाहून चालत असतों. ठेंच लागली तरी ईश्वर इच्छा प्रमाण ह्मणावें! वरकड भयकृत् भयनाशन श्रीपंढरीनाथ समर्थ आहे. सुखाअंतीं दुःख, दुःखाअंतीं सुख लागलेंच आहे. श्री कल्याणच करील. कांहीं चिंता नाहीं. ते [3]महापुरुष [परलोकास] गेल्या उपरी एका आम्हांसच संकट प्राप्त झालें असें नाहीं. त्यांचे पदरीं बहुत होते ते व प्रजा सर्व दुःख पावली. त्यांच्या

---

१ तर मग पुणें मोंगलानें जाळिलें तेव्हां तेथें पटवर्धनांचा वाडा होता तो ही जाळिला गेला कीं काय? असें तर होऊं नये! २ हा रामाजी नारायण गोखले गोविंद हरीचा पुण्यांतील कारकून. ३ नानासाहेब व भाऊसाहेब पेशवे.

घरचीं माणसें[1] देखील पावलीं. सरकारची नुकसानी ही फार झाली. श्रीमंतांस[2] हें कांहीं श्रुत नाहीं तेथें उपाय काय! बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० २७८

[१६ मे.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[3] उपरी येथील कुशल तागायत (अधिक) ज्येष्ठ शुद्ध तृतीया रविवार तीन प्रहर. यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें विशेष. तुम्हीं वद्य त्रयोदशी भौमवारचीं पत्रें पाठविलीं तीं काली मंदवारीं पावलीं. लिहिलें वर्तमान विस्तारें कळलें. 'राजे बहादर सासवडास आले. आपण समागमें आलों. पुढें पुरंदराहून[1] कारकून आला. बोली चाली ठराव करून दिला.' ह्मणोन लिहिलें तें विस्तारें कळलें. उत्तम गोष्ट केली. आपण कोणाचें तरी साहित्य करावें. दुसरियाचें अनिष्ट सांगोन सहसा करूं नये. केलें (हें) उत्तम केलें. मीर आबस यास पत्र व ढालाईत पाठविले ते येथून बरोबर माणसें देऊन रवाना केले. पुढें फलदाता ईश्वर. मीरआबस याणें जाऊन तिकोटें[4] लुटलें ह्मणोन वर्तमान आहे. पुण्याचा मजकूर लिहिला तो कळला. हर कसे दहा वीस[5] अलीकडे पलीकडे करून तेथील वेध तुटे तें करावें. नवाबाचें कूच होऊन जात तें करावें. [हें] परम श्रेयस्कर. यांतच कल्याण समजावें. श्रीमोरेश्वर जेजुरीचें वर्तमान लिहिलें तें कळलें. अशा स्थलांचींच रक्षणें व्हावीं त्या प्रमाणें त्यांणीं[6] केलें. गमाजी बावानीं जाते समयीं शिवापुर आदिकरून शिरवळ रोहिड्यापावेतों मुलूख लुटिला. खांबटकीचा घांट चढोन गेले, उत्तम गोष्ट केली!

---

१ गोपिकाबाई, पार्वतीबाई वगैरे. २ माधवराव पेशव्यांस. ३ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ४ तिकोटें जिल्हा विजापुर हें कुरुंदवाडकरांच्या जहागिरींत आहे. ५ खंडणीच्या रकमेंत दहा वीस हजार कमी जास्ती करून. ६ राजे विठ्ठल सुंदर याणें.

दोषांची [त्यांस] काळजी नाहीं. ख्यातीची मात्र आस्था कीं, फलाणे याणीं जाऊन महत्कार्य सिद्धीस नेलें ! ज्याची जशी रीत तशी ते करितात. सातारियाकडे जाऊन कर्तव्य काय? किल्ला श्रीमंतांकडे. यांच्या हातीं कांहीं नाहीं. वांई देशांतून नबाब गेले तरी जातां जातां दोन रुपये मातबर गांवानीं खंडण्या होतील. पुढें आपणास मार्गानें जाणेंच आहे. कृष्णेपलीकडे दैबा दिला तरी करवीरवासी दोन तीन चार (लाख) कांहीं तरी देतील. स्वारी व्यर्थ होणार नाहीं. श्रीमंतांचा संदर्भ तहाचा तूर्त दिसत नाहीं. पुणें व सारा प्रांत विल्हेस लागलियावरी तह करतील तर न कळे ! चिरंजीव दाजी चतुर्दशीस श्रीक्षेत्रास आले. काली द्वितीया मंदवारीं अस्तमानीं येथें सुखरूप आले. अमावास्या व भावैईची कर ह्मणोन दोन तीन रोज तेथें होते. प्रस्तुत त्यांचे शरीरीं व्यथा निःशेष जाहली असा प्रकार नाहीं. खंदकाचें काम चालत आहे. उत्तरेकडील दोन दिवसांत तयार होईल. पश्चिम दक्षिण दोहींकडील खंदक करावा कीं काय तें लिहिणें. सखारामाचे मतें सर्व श्रीमंतांचें राज्य लयास न्यावें, दौलत बुडवावी, तदनुसार तो मनसबा करितो. परंतु धणी सावधच होईनात यास उपाय काय ! तस्मात् श्रीमंत दादासाहेब यांच्या योगेंकडून राज्य बुडावें त्या सारखी त्यांस बुद्धि निर्माण ! बाबूजी नाईक त्याशीं खट्ट किंवा स्नेही हें कांहींच त्यांचें लक्षण कळत नाहीं. एकाशीं एक स्नेही स्वल्पांतच होतात, बिघडतात, मागती एक होतात, हेंच अपूर्व ! विश्वास धरितात ! त्यांची लीला ते जाणोत ! लोकांच्या कपाळास प्रांताच्या साऱ्या लागलें तेव्हां सखारामानें बुडविलें असें ध्यानास आलें. पुढें होणार तें श्री सत्ता प्रमाण ! बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

---

१ लोक आपणास काय ह्मणतील याची गमाजीस फिकीर नाहीं. २ प्रख्यातीची. ३ धमकी. ४ वैशाखी अमावास्या भावुका. ५ सखारामबापूशीं. ६ रुसलेले, वांकडे.

नं० २७९

(१७ मे.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[1] उपरि. येथील कुशल तागायत (अधिक) ज्येष्ठ शुद्ध पंचमी भौमवासर तृतीय प्रहर यथास्थित असे. विशेष. काली आपाजी कांडेकर याज बरोबर पत्रें पाठविलीं आहेत त्यावरून कळेल. लग्नाचे दोन मुहूर्त वद्य अष्टमी मंदवार एक. व दशमी सोमवार एक. दोन मुहूर्त आहेत. त्यांत एक साधेल तो करावा. तुम्हांस निघावया मुहूर्त शुद्ध एकादशीस एक किंवा वद्य प्रतिपदेस एक. दोन मुहूर्त आहेत. त्यांत फावेल त्या मुहूर्तें निघावें. अगोदर फलाण्या मुहूर्तें निघोन येतों ह्मणोन लिहावें. नलदुर्गाकडील सुखें आहेत. श्रीमंत कोणे ठिकाणीं आहेत हें वर्तमान कांहीं [कळलें] नाहीं. भागानगरानजीक गेले. फिरते समयीं कोणत्या मार्गें होतील पहावें. लक्ष्मेश्वराकडील वर्तमान परवां चिरंजीवांचें पत्र आलें तेंच काली पाठविलें आहे. त्यांत फारच अवसान सोडून लिहिलें आहे. कालपरत्वें सर्व ही गोष्टींचा योग घडोन आला. सखारामानें कोठें ही स्वस्थ आमच्यानीं रहावें असा प्रकार केला नाहीं. बर्वे[2] कांहीं परकी नव्हेत, तसेच लक्ष्मण कोन्हेर ही नव्हेत; परंतु तेच आम्हांस शत्रु झाले ! वांईकडील[3] वर्तमान न कळे. गाडगीळांची गति काय झाली ? तुम्हीं समाचारास माणूस पाठविलें कीं नाहीं ? निष्ठुरत्व धरिलें ह्मणतील. त्यांचा परामर्ष करावा. प्रस्तुत नबाब कोणे ठिकाणीं, राजे बहादर कोणे ठिकाणीं, तुम्हीं कोठें, कांहींच कळेना ! सातारियाकडून नबाब गेले तरी दहा लक्ष रुपये कनिष्ट पक्षीं प्राप्त होतील ते कोठें वीस, कोठें तीस, चाळीस, पन्नास, च्यार, पांच, पन्हाळा प्रांत, कऱ्हाड, शिरोळ, चिकोडी प्रांत, जमखंडी, तेरदाळ, गोकाक, व कृष्णेपलीकडील संस्थानें, कोठें कांहीं, या

---

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ मेघश्यामरावबापूचें. ३ वांईवर गमाजी बावानें स्वारी केली होती. तेथें राहणाऱ्या गाडगिळांविषयीं ही गोविंद हरीची विचारपूस.

प्रमाणें मिळेल. तुम्हांस स्थल प्राप्त झालें तरी रहावयास स्थल होईल एवढी मात्र आस्था. तो[1] आंतील जकेरीयाचें सामान क्रय करूं लागला ह्मणोन वर्तमान आहे. नबाबाची छावणी कोठें होणार हें ही तुम्हांस ठाऊक नाहीं. कोणीकडे जाणार हें ही ठाऊक नाहीं! मसलत कळोंच देऊं नये, हा त्यांचा[2] दंडक. त्यां[3] मार्गे गेले तरी प्रांताचा सत्यानाश होईल पण आपलें कार्य[4]. वांई देशीं देखील थांई (मुक्कामीं) दोन तीनें[5] मिळतील. परंतु अद्याप [नबाब] पुणें प्रांतींच राहिले हें अपूर्व! त्यां[6] प्रांतीं फिरोन वस्ती होणें दुर्घट आहे. सखारामाचा मतलब पुणें यांणीं[7] जाळून भस्म करावें. ज्ञातीचे[8] लोक एकत्र बहुत मिळाले आहेत याणीं देशधडी व्हावें; ह्मणजे आपला संकल्प सिद्धीस गेला! त्यास पुण्याचे रखवालीचा यत्न तुम्हीं केला त्याचा प्रकार कसा झाला हें लिहिणें. सुपे देशाकडून नबाब जळगांवावरी कऱ्हातीरीं येणार ह्मणोन लिहिलें त्यावरून सालप्याचा रोंख चुकला नाहीं. तो एक किंवा बारामती वरून नीरेचा, तेथून भिवरेचा रोंख झाला. कोणीकडे होतील नकळे! अद्याप लोक सचिंत आहेत. दोन्ही लष्करें फिरते समयीं काय करितील न कळे! फलटण ही मध्यें आहे. लाख पन्नास तेथें प्राप्त होतील. कळलें पाहिजे. चिरंजीव दाजीस कांहीं उतार आहे. येऊन आजी चौथा रोज. खंदकाचें काम चालत आहे. पूर्व उत्तर दोन बाजू करितों. पश्चिम दक्षिण करीत नाहीं. कळलें पाहिजे. कुरुंदवाडाकडून आलें पत्र तें पाठविलें आहे. मोंगल त्या प्रांतीं येतो हे आवई तिकडे ही आहे. ढालाईत मीर आबस याजकडे रवाना केला. तो मातागमनी ऐकेलसा भरंवसा नाहीं. होनवाड वागमोऱ्यानें (?) घेतलें होतें, (तें त्यानें) त्याचे धास्तीनेंच दिलें.

---

१ मिरजेचा किल्लेदार लक्ष्मण कोन्हेर हा किल्ल्याचें जकिऱ्याचें ह्मणजे दारू गोळी, धान्य व इतर सामान विकीत होता त्या विषयीं हें लिहिलें. २ 'हा त्याचा दंडक' = हा नबाबाचा शिरस्ता. ३ साताऱ्याच्या वाटेनें. ४ मिरज पुनः आपल्या ताब्यांत करून घेण्याचें. ५ दोन तीन लाख. ६ पुणें प्रांतीं. ७ नबाबानें. ८ कोकणस्थ जातीचे.

त्याचें ठाणें बसलें. तिकोटें यांत बसलें. तेलसंगकर पांच हजार रुपये देत होते, [पण] ' ठाणें घेणार, रुपये घेत नाहीं. ' ह्मणून बोलिला. त्याची धास्त बरीच बसली आहे. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० ११ जिल्काद.

नं० २८०

[१९ मे.]

श्रीगणराज.

श्रियासह चिरंजीव राजश्री भास्करपंत व समस्त चिरंजीव मंडळी यांसीं प्रती सौभाग्यवती सत्यभामाबाई आशीर्वाद उपरि येथील क्षेम तागायत

---

१ गोविंद हरीची स्त्री व गोपाळरावाची आई. हिला कुटुंबांत ' ताई ' ह्मणत असत. तिनें हें गोपाळरावास पत्र लिहिलेलें आहे पण तें त्याच्या नांवें न लिहितां धाकटा दीर व समस्त चिरंजीव मंडळीच्या नांवें लिहिलें आहे ! गोपाळरावानें नवरी नापसंत केली याबद्दल त्याची फजिती करण्यांत त्याच्या आईनें या पत्रांत कांहीं बाकी ठेविली नाहीं ! गोपाळरावाच्या या दुसऱ्या लग्ना संबंधानें आजपर्यंत जे उल्लेख आले आहेत ते पहातां त्याची वागणूक या कामीं निर्दोष होती असें ह्मणवत नाहीं. पहिली बायको वारल्याचें वर्तमान त्यास फाल्गुनमासीं कळलें. त्या नंतर त्यानें गोविंद हरीस सांगितलें कीं, कोंकणांत राजापुर प्रांतीं आमचे मामा पाटणकर आहेत. त्यांस नवरी मुलीचा शोध करून तिला इकडे घेऊन येण्याविषयीं पत्र ल्याहावें. त्या प्रमाणें गोविंद हरीनें पत्र लिहिलें व पाटणकरानें सदाशिवभट भिडे ह्मणून कोणी मनुष्य होता त्याची मुलगी आठ नऊ वर्षांची चांगली होती ती पसंत केली व गोविंद हरीस पत्र लिहिलें. त्यावरून गोविंद हरीनें कोकणांतून नवरी व तिचा बाप वगैरे माणसें आणण्या करितां पालख्या घोडीं वगैरे लवाजमा पाठविला व गोपाळरावास लिहून पाठविलें कीं, वैशाख शुद्ध पक्षीं लग्नाचे मुहूर्त आहेत या करितां तुह्मीं चार दिवसांची सवडींत सवड करून लष्करांतून घरीं निघून या व लग्न उरकून घेऊन परत जा. कोंकणांतून पाटणकर मामा वऱ्हाड घेऊन आले. पण गोपाळरावास नवरी न आवडल्यामुळें त्यानें लग्नास घरीं येण्याची चुकवाचुकव चालविली. नवरी मुलीचा बाप प्रतिष्ठित मनुष्य होता. त्याची एक पुतणी पुण्यांतील खासगीवाल्यांकडे व दुसरी बाबूजी नाइकास दिलेली होती. तो गृहस्थ व लग्न जुळविणारा पाटणकर मामा व गोविंद हरि व त्याची बायको ताई हीं

(अधिक) ज्येष्ट शुद्ध सप्तमी गुरुवार मुक्काम मंगळवेढें येथें सुखरूप असों. विशेष. आतां चिरंजीवांचें पत्र चिरंजीव पांडूस आलें कीं 'नवरी वाईट आम्हांस परिछिन्न करणें नाहीं.' ह्मणून पत्र आलें, त्यावरून अपूर्व वाटलें! महिना एक जाहला. आतां जर त्या ब्राह्मणास 'जा' ह्मणून सांगितलें तर तूर्त आम्हांवर ब्रह्मद्वेष येणार. तशांत ही 'पाटणकर मामानीं नवरी वाईट आणिली' ह्मणोन लिहिलें, (तर तशी) त्यांस आणावयास गरज काय? कांहीं पैसा तुमचे लग्नांत पाटणकर मिळवीत नाहींत! इतकें ही असून वाईट असती तर आह्मीं काय सर्व वेडीं होतों कीं काय? आणि तुम्हीं मात्र शहाणपणें लिहितां! दहा पांच मुलींत नवरी चांगली आहे. दहा पांच हजारांत चांगली ती तुम्हीं करणार, तशी कोण मिळणार? एक पुण्यांत मिळणार, तें पुंणें दारोदार (भटकावयास) लागलें आणि तुम्हीं ही तसेच! तर अतःपर ऐशा गोष्टी लिहिलियानें परिणाम नाहीं. नाहक आम्हांवर ब्रह्मद्वेष पाडाल. आम्हीं पाहिलीं माणसें. दहा पांच हजारांत चांगली (नवरी निवडून) आणावी इतकी परिक्षा आम्हांस नाहीं! तुम्हांपाशीं कोण परिक्षवंत असेल त्यास सत्वर पाठवून देणें. अधिकोत्तर काय लिहावें? बहुत काय लिहिणें लोभ कीजे. हे आशीर्वाद.

सारींच आतां तोंडघशीं पडल्या सारखीं झालीं. गोपाळराव जों जों नवरी नको ह्मणे तों तों ती त्याच्या गळ्यांत बांधण्या विषयीं त्याच्या आईबापांचा अधिक अधिकच आग्रह सुरू झाला. नवरी जर त्यास प्रथमच नापसंत होती तर अलीकडे मंगळवेढ्यांस आल्यावर तिला देवी आल्यामुळें ती अधिकच नापसंत झाली असावी! शेवटीं या प्रकरणीं आईबापांचा हट्ट तडीस गेला, व या नाहीं तरी पुढल्या वर्षीं त्यानीं त्याच मुलीशीं लग्न करावयास गोपाळरावास लाविलें ही गोष्ट त्यास भूषणावह आहे! आतांच्या काळांत गोपाळरावासारख्या योग्यतेच्या पुत्रावर ह्मातार्‍या आईबापांचा असल्या कामांत इतका अंमल चाललेसें वाटत नाहीं!

१ गोपाळरावाचें. २ कोकणांतून वर्‍हाड येऊन एक महिना झाला. ३ पत्र लिहिणारी 'आह्मीं' या शब्दांत आपला व नवर्‍याचा समावेश करीत आहे. ४ पुण्याचे लोक.

नं० २८१ (१९ मे.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत [अधिक] ज्येष्ठ शुद्ध सप्तमी गुरुवार यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुम्हीं तृतीया रविवारचीं पत्रें पाठविलीं, पांच सात वेंद पाहून विस्तारें कळलें. मुख्य गोष्टी नबाब छावणी कोठें करणार हें कळत नाहीं. रहावयाच्या स्थलाची तरतूद नाहीं एवढी मात्र चिंता होती तें कळलें. मोंगल परिछिन्न औरंगाबादेस छावणीस जातो. भलते जागां छावणी करून खर्चा खालीं यावया कारण काय? खजानपुर (?) नाहीं. [नबाब] शहरास गेले ह्मणजे शिबंदी कार्या कारण ठेऊन वरकड दूर करतील. पुढें प्रसंग पडेल तेव्हां ठेवितील. आमची काळजी आम्हांस ! एवढा देश खराब होऊन दौलत बुडाली, नक्ष गेला, ते काळजी सखारामास नाहीं ! परंतु आम्हांस सर्वस्व बुडवावें हें त्यांचें मानस नाभिकमळा पासून आहे. तो प्रयत्नांत आहे. नबाब शहरास गेले तरी तो इकडे येऊन आमचा घोंटाळा करील. हें स्थल कांहीं आठ चार दिवस दम धरील असा अर्थ नाहीं. आठ दिवस झुंजोन तरी परिणाम काय? जें होणार प्रारब्धगतीनें तें होईल. एक श्री पंढरीनाथावरी आम्हीं सारें सोंपून देतों. दिलेंच आहे. ऋणानुबंधें घडेल. तें प्रमाण ! बहुत दिवस त्यांचें अन्न भक्षिलें, त्यांचेच हातें सार्थक झालें ह्मणजे बहुत उत्तम. परंतु असें जन्मांतर शुद्ध कैचें जे अशी गोष्ट होईल ! असें झाल्यानें इह पर दोन्ही साधलीं. बरें ! इतक्याची ही चिंता करीत नाहीं. तुम्हांस बराबरी जावें लागेल. खर्चाची गत काय होईल हे काळजी मातबर पडली. श्रीपंढरीनाथें नेमिलें असेल तसें होईल ! श्रीमंत मिरजेकडे येणार, नबाब शहरास जाणार ! एकाचा मार्ग एक पाहतो. घडेल तें खरें. नारो आपाजी प्रामाणिक मनुष्य आहे. जामिनगत अंगावर पाडणार

---

१ त्या विषयीं. २ औरंगाबादेस. ३ लौकिक. ४ मंगळवेढ्याकडे. ५ पुणें

नाहीं. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० ११ जिल्काद.

नं० २८२

[अधिकज्येष्ठ शुद्ध नवमी
२१ मे.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादै उपरी. तुम्हीं पंचमी भौमवारचीं पत्रें पाठविलीं तीं काली अष्टमी भृगुवारीं चतुर्थ प्रहरीं प्रविष्ट होऊन विस्तारें वर्तमान कळलें. पुण्यांचा करार झाला असतां हे गति झाली, तस्मात् राजेबहादर यांस हे मसलैत कळली होती; यास्तव (त्यानीं) तुम्हांस आपणाकडे आणविलें ! होणार भावी तें घडलें. त्याची क्षिती मानून होणार काय ! होणारच तसें ! आभाळास ठिगळ कोठवर लावणार ! एवढें राज्य श्रीमंतांचें—त्या पैकीं जुन्नर, पुणें, लोहगड, सिंहगड, पुरंदर, राजमाची, इतक्यावरी सेना समुद्र लोटला ! महिना अवैग्र लुटितात, जाळितात. त्याणीं दक्षिण समुद्रापासून दिल्ली अटकेपर्यंत कीर्ति जाय ऐसी केली ! मागें तमाशैकूली आला होता त्याणें दिल्लीची गति काय केली हें ठाऊक आहे कीं नाहीं ? आपणावरी ओढून घेऊन आपण नाहक श्रमांत पडोन—सारे समागैमीं

वांचविल्या बद्दल नारो आपाजी तुळशीबागवाले यानें मोंगलास खंडणी देण्याचा करार केला होता त्यांत गोपाळरावानें मोंगलाजवळ जामिनगत पतकरिली होती त्या संबंधें हें लिहिणें.

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ खंडणी घेऊन पुण्यास उपसर्ग न देण्याचा करार मोंगलानें केला असतां. ३ पुणें जाळण्याची मोंगलाची मसलत विठ्ठल सुंदर राजे बहादर यास कळली होती. तुह्मीं मोंगलास अडथळा कराल ह्मणून त्यानें तुम्हांस पुण्याहून जेजुरीस आपणाजवळ बोलावून नेलें. ४ एकंदर. ५ निजामअल्लीनें. ६ नादिरशहा. ७ भोंसले, प्रतिनिधी वगैरे मराठे सरदार मोंगला बरोबर आहेतच. तुह्मीं एकटेच आहां असें नाहीं. मग पुण्याचा नाश होण्याविषयीं आपण निमित्त झालों असा तुह्मीं एकट्यानेंच कां खेद करावा ?

असतां—आपण श्रम मानावयास कारण काय ? यजमानानीं [तुम्हांस] राज्यांतून बाहेर घालविलें, उभें रहावया स्थल नाहीं, फौजेवर छापा घालून सत्यानाश केला, निदान झालें तेव्हां जीव यांचवावे या अर्थें (नबाबाकडे गेलां) नबाब थोर होते. त्यानीं आपले स्वरूपानुसार बहुमान केला. पुढें आपले प्राक्तनीं असेल तसें घडेल ! चिंता कोठवरी करणार ! नबाब या उपरी माघारे जातीलसें दिसतें. त्याणीं संतोषें आज्ञा दिली तरी यावें. परंतु रहावें कोठें ? येथें श्रीमंत माघारे फिरतील तेव्हां भय आहे. तें भय आम्हीं जाणून येथील वस्ती कबूल केली आहे. परिणाम येथेंच लागला तरी उत्तमच झालें. चिरंजीव दाजी अद्याप खोलींतच आहेत. बाहेर फि- रावयाची शक्ति नाहीं. चिरंजीव मेघश्यामेरायाकडील मजकूर लिहिला तो कळला. त्याणें आमचे कोठें न रहावे असेंच जाणून अश्वत्थाम्यासारखें शस्त्र सोडिलें आहे ! त्यांत चिंता कोठवरी करावी ? मुख्य सर्वांचें रक्षण करणार ईश्वर तो आह्मांकडे. जीव वांचलियावरी सर्व ही मिळेल. (न- बाबानें) पुणें शहर जाळिलें, लुटिलें. मागती करारा प्रमाणें रुपये मा- गतील, यास्तव, (तुम्हीं नबाबाजवळ) चिठी मागितली, बरें केलें. परंतु ते " राहिल्या हवेल्या साऱ्या जाळून मग चिठी देऊं ह्मणूं लागले, " तरी काय करावें ? राजे विनायकदास सिंहगडाहून माघारे आले नाहींत. ते तेथें काय काय करितात न कळे. श्रीमंतांच्या दौलतीचा विनाशकाल आला, त्यास तुम्हीं चिंता करून काय होणें ? ज्याची त्याणीं आ- स्था सोडून गोरगरीबें लुटीत देश जाळीत भागानगर प्रांतें फिरतात. [४]हे त्यांचा देश जाळितात. दे वाण घे वाण आहे. सारांश हे[४] छावणीस रा- हून नाहक खर्चा खालें येत नाहींत हा पक्का मनसबा आहे. वरकडांस ज्यांची त्यांस स्थलें आहेत. एक तुम्हीं निराश्रयी व सदाशिव रामचंद्र.

१ पेशव्यानीं. २ पटवर्धनांची जहागरि कर्नाटकांत होती तिचें संरक्षण क रण्यांत मेघश्यामराव गुंतला असतां सखारामबापूनें तिकडे त्याजवर काय काय अरिष्टें आणिलीं हें गोपाळरावानें गोविंद हरीस लिहून पाठविलें होतें त्या संबंधें उद्गार पुढील वाक्यांत आहे. ३ सखारामबापूनें. ४ मोंगल. मागील वाक्य पेशव्यांस उद्देशून आहे.

तुम्हीं औरंगाबादेसच जाऊन रहावें परंतु शहरची वस्ती, खर्च भारी पडेल, पैशास संबंध नाहीं, परंतु उपाय काय ! जालनापुराकडे पागा लाऊन देऊन जातीनिशीं एखादे हवेलींत रहावें. श्रीमंत इकडे आम्हांवरी येतील. लक्ष प्रकारें आह्मां साठींच आवर्जून[३] येतीलसा भरंवसा नाहीं. स्वभाविकपणें येतील तर येऊत ! आल्या[३] उपरी तो[४] प्रयत्न करील. आमच्या भविष्यानुसार जें घडणार तें घडेल. वरकड पुढें श्रीमंत माघारे फिरल्यानंतर कोणीकडे जातात त्या सुमारा सारिखें मुलांबाळांची सोय धरून[५] येणारांनीं यावें. बुद्धिदुर्गी[६] चौं कुटुंबांचा वास आहे. जसा प्रसंग पडेल तसें करावया येईल. गमाजी बावाचे किल्ले प्रांत आहे. त्यांस तूर्त चिंता नाहीं. सारा मनसबा खर्चाचा भारी. या उपरी कर्ज मिळावयाचें संकट. निस्तेज लोक झाले. कोणी कर्ज देणार नाहीं. तुम्हीं निघोन येथें आलां तरी ते[७] ही या मार्गें आले तरी येतील. तुमची मंडळी सारी आल्यावरी खामखां झुजोन थंडे करूं. परंतु बुद्धीशीं वैर करूं नये. नबाब व राजे बहादर यांस माघारे फिरल्यावरी अर्जी इलतमास (?) लिहावी कीं, "आजी सा महिने तुमचे सोबतीस राहिलों. आम्हीं आपल्या संतोषें आलों. आम्हीं कांहीं चाकरी केली नाहीं. पुढें घडणार तेव्हां घडेल. परंतु पुढें आम्हीं कोणे रीतीनें वर्तणूक करावी ? खर्चास नाहीं. गांठचें पुरे [सें] नाहीं. यास आम्हांस हुकूम काय ? जैसें फर्मावाल तदनुसार वर्तणूक करूं," ह्मणावें. तिलमात्र व्यंग खट्टपेंण दाखवूं नये. आपले प्राक्तनीं असेल तर देतील. हे[१०] लोक कोणाचा बेर्दुवा[११] ध्यावयाचे नव्हेत. आपले सोबतीस आले त्यांचें कल्याणच व्हावें हे त्यांची इच्छा. कितेक नाना प्रकारचीं खेंकटीं कुचेष्टा करितात परंतु ते[१२] चालवून नेतात. आपण त्याणीं कोणाचें वाईट केलें नाहीं. (तुम्हीं) तलखी सोडून शांतता धरून वर्तावें. बहुत

---

१ तुम्हांस पैका मिळण्याचा संभव नाहीं. २ स्वतः ३ मुद्दाम. ४ सखारामबापू आमचा नाश करण्याचा प्रयत्न करील. ५ लक्ष्यांत धरून. ६ अक्कलकोटास. ७ पेशवे. ८ जवळ द्रव्य आहे तें पुरणार नाहीं. ९ रुसवा. १० नबाबासारखे थोर लोक. ११ शाप. १२ नबाब.

काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० २८३

(अधिकज्येष्ठ शुद्ध दशमी
२२ मे.)

श्री.

राजश्री नाना व राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेशीं.[1]

विनंती उपरी येथील कुशल तागायत चंद्र ८ जिल्काद मंदवार तृतीय प्रहर मुक्काम लोणी[2] यथास्थित जाणून स्वकीय कुशल लेखन करावें. विशेष. आपण पत्रें पाठविलीं तीं आतांच येथील मुक्कामीं पावलीं. सविस्तर वृत्त कळलें. "पुण्याचा नाश फारच झाला. सरकार वाडा व कांहीं वाडे राहिले त्यांचे रक्षणानिमित्य कांहीं बोलोन[3] विल्हे लावावें, त्यास आपण लांब पडलां. राजश्री विनायकदास यांजकडून राजश्री रामचंद्र कृष्ण[4] आले त्यांचे विद्यमानें पंचाण्णव हजार रुपये दरबार खर्च सुद्धां कबूल करून विल्हे लाविलें. इकडून विल्हे लागलें ह्मणोन विषाद येऊं न द्यावा," ह्मणोन लिहिलें, त्यास आम्हीं लांब पडलों होतों ह्मणोन चिरंजीव उभयतांस[5] पाठविलें होतें. त्यास ते पोंचत तों अगोदर विल्हे लागलें. उत्तमच झालें. आमचे चित्तीं कोणीकडून तरी रक्षण व्हावें हेंच मानस होतें. त्यास तिकडून उरकलें, फार संतोष झाला. आमचेच हातें व्हावें, दुसरीकडून न व्हावें, हें चित्तांत नाहीं. पुण्यास अगदीं हात न लागावा, आब राहोन रक्षण व्हावें, यास्तव खटपट फारच केली; त्यास होणार त्या सारखें झालें ! आम्हीं तिकडे[6] गेलों. निरुपाय झाला. सारेंच रक्षण होतें ह्मणजे फारच संतोष होता. परंतु भवितव्यास उपाय नाहीं. आज प्रा-

---

१ नाना फडणीस व नारो आपाजी तुळशीबागवाले यांस लिहिलेल्या पत्राचा हा मसुदा गोपाळरावाचेच हातचा आहे. २ पुण्याजवळचें लोणीहडपसर. ३ खंडणी देण्याची बोली करून. ४ मोंगलाकडे पटवर्धनां प्रमाणेंच जे मराठे सरदार रुसून गेले होते त्यां पैकीं हा एक. ५ बहुधा नारायणराव व नीलकंठराव यांस. ६ जेजुरीस.

त:काळींच राजश्री नरसिंगराव धायगुडे यांस व गंगाधरपंतास प्रात:काळीं पत्र सांडणीस्वारांबरोबर पाठविलें कीं, आज मंदवारचा दिवस रखवाली राहिल्या वाड्यांची खामखा करावी. त्याजवरून ते राहिले. वाड्यांचें रक्षण केलें. वाड्यांतील प्यादे आहेत तसे असों द्यावे ह्मणोन लिहिलें होतें. रविवारीं नबाबाचें कूच करवितों. ह्मणून ही त्यांस लिहिलें होतें. तों आपलें ही पत्र करार. झाल्याचें आलें. उत्तमच झालें. आतां ही त्यांजकडे[2] करार मदार झाल्याचीं पत्रें पाठविलींच आहेत. रखवालीस अंतराय[3] करणार नाहींत. नबाबाचें रविवारीं कूच करवावेंसा राजेबहादर यांजजवळ करार केला आहे. राजश्री विनायकदास यांचें आज मंदवारीं कूच तथून झालेंच असेल. लिहावें.

नं० २८४

(अजमासें अधिकज्येष्ठ शुद्ध
मेचा दु०पंधरवडा.)

गोपाळरावाचें गोविंद हरीस पैत्र—

" कारभारी यानीं तमाम सरदार जमा केले आणि थोरल्या यजमानाजवळ बोलों लागले. तेव्हां ते परिछिन्न मान्य करीतना. " सर्वांचीं ज्ञानें हिम्मतमर्दानपणा मजला ठाऊक आहे. पानपतावर भाऊस टाकून आलेत ! " या प्रमाणें दमाजी गायकवाड यांची रूबरू निर्भत्सना केली. अजापालकास कनातिच्या आडून ऐसेंच भाषण केलें. तेव्हां तमाम सरदार उठोन गेले. बसालतजंग यजमानानीं आपल्या डेऱ्यास आणिले होते,

१ खचित, हटकून. २ धायगुडे यांजकडे. ३ विघ्न. ४ या पत्राचा मधला एकच बंद मिळाला. बाकीचे बंद सांपडले नाहींत. ५ सखारामबापू. ६ दमाजी गायकवाड, मल्हारराव होळकर वगैरे. ७ समक्ष. ८ होळकरास. ९ निजामअल्लीचा भाऊ व अदवानीचा नबाब बसालतजंग याचीं व दादासाहेबांची भेट पंचमहालांत झाली. बसालतजंगानें आपल्या भावाचा पक्ष सोडून देऊन पेशव्यांस येऊन मिळावें या साठीं होळकरानें आपला दिवाण त्याजकडे पाठवून त्यास दादासाहेब व पेशवे यांच्या भेटी

त्यास मुदबखांची राहुटी होती तेथें खलबत केलें कीं, ' कारभारी द्रव्य-वान् याज करितां पळावयाची मसलत देतात. सरदार ही (त्यानीं) अनुकूल करून घेतले. त्यास माझा निश्चय परिछिन्न झुजावें, व मरावें अथवा जय मिळवावा. अपेश घेऊन वांचणें नाहीं. तुम्हीं आम्हीं एक हत्तीवर बसून झुझावें. ' हा ठराव केला. त्यास भोजनास घालून निरोप दिला. मागती आपण व देव्यानें बसोन खलबत केलें तेव्हां देव्यानें सांगितलें जे, ' परिछिन्न झुजावें. ' हेच हिम्मत देऊन (त्यानें) कारभारी यांस मुरदाड केलें ! सरदार खट्ट झाले. कारभारी यांशीं यजमानानीं बहुत गालिप्रदानें केलीं. कांहीं यजमाना पुढें उपाय न चाले. तेव्हां शेवटीं कारभारी यानीं शागिर्दाचें आर्जव करून ' हा मनसबा या समयीं करूं नये असें यजमानांस सांगोन हा मनसबा फिरवणें. ' या प्रमाणें त्याचें आर्जव केलें. तेव्हां त्यानें मागती यजमानांस ताळ्यावर आणिलें. काल नववा दिवस याज करितां त्या तळावर मुक्काम केला. आज कूच करून निघून जावेंसा सिद्धांत जाहला. निंबाळकरांच्या मुलखांतून जावेंसा सिद्धांत जाहला.

नं० २८९

[१६ मे.

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत अधिक ज्येष्ठ शुद्ध एकादशी

करितां आणविलें होतें. त्या प्रसंगाची हकिगत पटवर्धनांचा कारकून पेशव्यांच्या लष्करांत होता त्यानें मोंगलाच्या लष्करांत गोपाळरावाकडे, लिहून पाठविली तीच त्यानें गोविंद हरीस लिहून कळविली आहे.

१ पेशव्यांच्या स्वयंपाकाच्या राहुटींत मुसलमान येऊन बसतो इतकेंच नाहीं, तर तेथें त्याचें जेवण ही होतें; हें चमत्कारिक नव्हे काय ? २ सखारामबापू. ३ हा दादासाहेबांचा एक आवडता शागिर्द. ४ रुसले. ५ नवव्या दिवशीं तळ हालविणें हें अशुभ समजण्याची चाल होती. ६ चिंतापुर येथील मुक्कामींच्या. ७ करमाळें, माढें, मोहोळ हा सोलापुर जिल्ह्यापैकीं भाग मोंगलाकडील सरदार निंबाळकर यांस जहागीर दिलेला होता.

सोमवार पावेतों यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. अक्कलकोटाहून पत्र आलें. चिरंजीव सौभाग्यवती राधाबाई[1] प्रसूत झाली. पुत्र झाला. आजी आठ रोज झाले. संतोषाचें वर्तमान कळावें. श्रीमंत भागानगर प्रांतें आहेत. फिरल्याचें वर्तमान आहे. कळल्या उपरी लिहून पाठऊं. येथील देशपांडियांचें वतन अमानत करावें ह्मणोन तुम्हीं पत्र कलढोणकरांस दिल्हें व राजे बहादर यांचें पत्र त्याणीं पाठविलें; ऐशास मागें श्रीमंत राऊप्रतिनिधि[2] व यमाजीपंत अण्णा यां पाशीं कलढोणकरांनीं फार रदबदली केली होती. परंतु त्याणीं मिथ्या दुसऱ्याच्या वतनास कलंक लाऊं नये ह्मणोन मान्य केलें नाहीं. हल्लींच्या प्रसंगीं यांणीं[3] मागती उपद्व्याप केला आहे, त्यास त्यांजबरोबर हे[4] कांहीं वेव्हारास[5] जात नाहींत. गांव

---

१ परशुरामभाऊची बायको. हिला पहिला पुत्र रामचंद्रपंत आपा झाला त्या विषयीं हा उल्लेख. २ प्रसीद्ध योद्धा व मुत्सद्दी श्रीपतराव परशुराम प्रतिनिधि. [पहिले बाजीरावाचा प्रतिस्पर्धी.] त्याचा मुतालीक यमाजी शिवदेव उर्फ यमाजीपंत अण्णा हा ही मोठा शूर व कर्ता पुरुष होता. शिवाय तो विद्वान् व कर्मठ शास्त्री होता असें ही आह्मीं एकें ठिकाणीं वाचिलें आहे. पत्रांतील मजकुरावरून हें उघड होत आहे कीं, मंगळवेढें पेशव्यांच्या [व त्यांच्या द्वारें पटवर्धनांच्या] हातीं येण्या पूर्वीं तें प्रतिनिधीकडे होतें. वरील पत्रांत देशपांडेपणाच्या वतनाच्या तंट्या विषयीं उल्लेख आला आहे त्याचा मजकूर असा दिसतो—मंगळवेढ्यांच्या देशपांडेगिरीचें वतन तेथील देशपांडे उपभोगीत असतां त्या वतना विषयीं त्यांचा व कलढोणकरांचा तंटा सुरू झाला त्या काळांत जो अधिक उणा दरबार खर्च करील त्याचें सारखें काम होण्याचा संभव अधिक. कलढोणकरानीं या रीतीची खटपट श्रीपतराव प्रतिनिधी व यमाजी शिवदेव यां जवळ करून देशपांडेपणाचें वतन आपणास देण्या विषयीं त्यांस भीड घातली. पण ती त्यानीं ऐकिली नाहीं. हल्लीं कलढोणकरानीं गोपाळराव पटवर्धनाकडे वशिला बांधून त्याजकडून आपलें इतकें काम करून घेतलें कीं, तंट्याचा निकाल होई तों वतन सरकारांत अमानत रहावें! ३ कलढोणकरानीं. ४ मंगळवेढेंकर देशपांडे. ५ सरकारांत न्याय मागण्यास.

सोडून जातील. ढालाईत अगर तलेब मसाला कलढोणकर आणितील त्यास तुम्हांस कळोन आणिला तरी आधीं सूचना करणें. यांस लाऊन देऊं. तुम्हांस न कळत आणिला तरी कजिया पडेल, यास्तव सूचना लिहिली आहे. तूर्त पर्जन्य कालचे दिवस ह्मणोन गांवांत आहेत. वतन अमानत केलें तरी ते इनसाफास कोठें येत नाहींत ! कळलें पाहिजे. पुढें तुमचें वर्तमान काय, कोणीकडे जातां, किंवा पुण्या जवळीच राहणार, हें लिहिणें. श्रीमंत कोणत्या मार्गें होतात हें न कळे. नवाब लक्ष प्रकारें शहरास जातीलसें दिसतें. नलदुर्गीचें पत्र आहे त्यावरून कळेल. कुरुंदवाडाकडील पत्र आजी चार पांच सा रोज आलें नाहीं. आम्हीं समाचारास पाठविलें आहे बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. काली आदितवारीं सायंकाळीं दोन घटका पर्जन्य वृष्टि झाली. हेच पत्रीं चिरंजीव समस्त मंडळीस आशीर्वाद. चिरंजीव भाऊस पुत्र झाला संतोषाचें वर्तमान कळावें बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. खंदकाचें काम उत्तरेकडील झालें धोंडे यांनीं बांधावें ह्मणून लिहिलें त्यास धोंडे पुष्कळ खणीतांतच सांपडले आहेत. कसे बांधावें हें कांहीं योजत नाहीं. चिरंजीव नारायणराऊ श्रीकृपेनें

---

१ ढालाईत ह्मणजे ढाल तरवार बाळगणारे शिपाई. असले हे ढालाईत सरकारांत व प्रत्येक सरदाराजवळ नेहमी नोकरीस ठेविलेले शेंकडों असत. यांचें काम लढाईस जाण्याचें नसे. यानीं नेहमीं हुजूर रहावयाचें. कांहीं एखादा सक्तीचा किंवा धोक्याचा हुकूम एखाद्या मोठ्या मनुष्यावर बजावावयाचा असला ह्मणजे सरकारांतून त्या कामावर ढालाइतांची नेमणूक होई. हे जातीचे रोहिले, पठाण वगैरे अन्यदेशीय मुसलमान असत. मनुष्य केवढा मोठा असला तरी सरकारचे ढालाईत आले ह्मणजे त्याचें कांहीं चालत नसे. कारण वेळ पडली तर हे मुसक्या बांधून त्यास सरकारांत नेऊन गुदरण्यास कमी करावयाचे नव्हत. २ तलब किंवा तलबाना ह्मणजे रोजिना वेतनाचा नक्त पैसा. ३ मसाला=ढालईत वगैरे ताकीददारांस लागणारी रोजची अन्न सामग्री गहूं, तांदूळ, तूप, साखर, तंबाकू, गांजा व हर कांहीं लागेल ती वस्तु ताकीददार सांगतील तसली व तितकी पुरविणें. या आडदांड लोकांच्या मागण्या नेहमीं अद्वातद्वा असावयाच्या हें सांगवयास नकोच ! बरें, त्या न पुरवाव्या तर साऱ्या कुटुंबानें उपाशीं राहण्याचा किंबहुना डोक्यावर धोंडा घेऊन उन्हांत उभें राहण्याचा प्रसंग यावयाचा !

येतील तेव्हां त्यांच्या विचारें कर्तव्य तें करावें लागेल हे आशीर्वाद.

पै॥ छ० १३ जिल्काद.

नं० २८६

(२३ मे.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[1] उपरी. येथील कुशल तागायत अधिक शुद्ध एकादशी भौमवासर यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुमचें पत्र लिंगनुरानजीक मुक्कामचें भौमवारचें आलें तें गुरुवारीं तिसरे दिवशीं पावलें. वर्तमान कळलें. त्या अलीकडे पत्र येत नाहीं. रामचंद्र गणेश निघोन गेले. नाईक[2] ही गेले. प्रस्तुत माशाळ[3] नजीक आहेत. रास्ते, विठ्ठल शिवदेव, एकांडे बाबूराऊ, तात्या घोरपडे, विसाजी नारायण, हे अवजलपुरा नजीक आहेत. हे[4] पंचमहालांत होते. बसालतजंगाची फौज घेऊन श्रीमंत माघारे कलबुर्गे याच्या सुमारें आले आहेत. पुढें कोणत्या सुमारें येतात न कळे. लष्कर[5] फार खराब झालें. मुख्य[6] श्रीमंत बसालतजंगाच्या भेटीस गेले. तेथें फारच महागाई होती ह्मणोन ऐकतों. तुम्हांस ही खबर कळतच असेल. ' चिरंजीव नीलकंठराऊ येणार होते, परंतु राहिले; ' ह्मणोन लिहिलें, उत्तम. हत्ती करमाळ्यांत आहेत. एक खानगौडा[7] हत्ती मेला ह्मणोन ऐकिलें. ' धारुरास गेल्या उपरी निरोप द्यावासा[8] करार आहे' ह्मणोन लिहिलें, बहुत उत्तम. त्यांची मर्जी रक्षून यावें. श्रीमंतांचें लष्कर ही इतक्यांत कोणीकडे जातें हें ही कळतें. तदनुसार विचार करावयास येईल. राजश्री विसाजीपंत[9] यांचें पत्र मंदवारचें कालीं तिसरे तिवशीं आलें. राजश्री बाबूजी नाइकाच्या मतें मनूर माशाळानजीक भीमा पार व्हावें

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ बाबूजी नाईक बारामतीकर. ३ मनूर व माशाळ हीं स्थळें मोंगलाईच्या व अक्कलकोटकरांच्या सरहद्दीवर असावींसें वाटतें. ४ हे कोण ? श्रीमंत ? ५ लष्कर श्रीमंतांचें. ६ दादासाहेब. ७ हें हत्तीचें नांव. ८ मोंगल धारुरास गेल्यावर तुह्मांस घरीं यावया साठीं निरोप होणार इ. इ. धारूर शहर मोंगलाईंत आहे. ९ हे तात्या घोरपडे इचलकरंजीकर यांचे कारभारी.

असें आहे. करकंबेकडील अरिष्ट टळलेंसें झालें. प्रस्तुत थोरलें[1] अरिष्ट आलें हें करकंबेकडे येणार नाहीं. कोणत्या सुमारें होईल पहावें. भोंसले यांच्या मनसब्याचा[2] मनोदय लिहिला तो कळला. मातबर मनसबा आहे. उभयतां[3] संतोषें राहिले ह्मणजे पुढें कार्याची गोष्ट आहे. वरकड सदैव काळजी तुम्हांकडील. भेटी होईल तो सुदिन. ' मर्जी रक्षोन त्याच्या[4] संतोषें निरोप घेऊन येतों ' ह्मणोन लिहिलें, हे लक्ष गोष्टींची गोष्ट. या प्रमाणें करावें. मर्दनगड[5] फिरंग्यानीं घेतला, लोक कौल घेऊन उतरले, या प्रमाणें लिहिलें आलें. हैदरनाइकाकडील मीरफैजुल्ला पांच हजार गाडदी व पांच हजार फौज घेऊन सावनूरवालियाच्या तालुक्यांत आला. रटेहळ्ळी व मासनूर दोन्हीं ठाणीं घेतलीं. सावनूरकर ही दोन अडीच हजार जमा झाले आहेत. पुढें काय होईल पहावें. हरीपंत[6] धारवाडीं आहेत. त्यांच्या मतें शिंदे, नरगुंदकर व दौलतराऊ घोरपडे हे जमा करून सावनूरवाल्याची मदत करून त्यास नतिजा द्यावासें आहे. बर्वे[8] ही माघारे घेऊन जावे अशी मसलत आहे. घडेल तें खरें. राजश्री गमाजीबावा सातारियाहून निघाले. भीमातीरास आले असतील. मीरआबस याजकडे पत्रें पाठविलीं होतीं. त्याणीं टाळाटाळ करून जाब दिले आहेत. बजिन्नस पत्र पाठविलें आहे त्यावरून कळेल. नारोपंत राजवाडे कारागृहीं गुंतले आहेत. श्रीमंतांचो[9] तहाची बोली लागली हे विसाजीपंतास ठाऊक नाहीं. आम्हीं

१ थोरले अरिष्ट श्रीमंतांच्या लष्कराचें. २ हा गोविंद हरीच्या पसंतीस आलेला असा जानोजी भोंसल्याचा कोणचा मनसबा ? या वेळीं जानोजी व त्याचा भाऊ मुधोजी भोंसले सेनाधुरंधर यां मध्यें पेशव्यानीं कलह लावून दिला होता व जानोजीचें पद तुला मिळवून देतों असें मुधोजीस त्यानीं आमिष ही दाखविलें होतें. हा तंटा आपआपसांत मिटविण्या विषयीं जानोजीनें केलेल्या निश्चयास अनुलक्षून हें गोविंद हरीचें लिहिणें असावें. ३ जानोजी व मुधोजी भोंसले. ४. नवाबाच्या. ५ मर्दनगड उर्फ फोंडा किल्ला गोव्यांच्या हद्दीवर. ६ हरीपंत पोंभुर्लेकर हा इचलकरंजीकरांचा कारभारी. ७ नीलकंठराव शिंदे मनोळीकर, भास्करराव नरगुंदकर व दौलतराव घोरपडे गजेंद्रगडकर. ८ लक्ष्मणपंत व कृष्णराव बर्वे कर्नाटक सोडून मिरजेकडे आले होते ते. ९ पेशवे व मोंगल यांचें तहाचें बोलणें सुरू झाल्याचें गोविंद हरि लिहितो.

परस्परें ऐकतों. मीरआवस याच्या लष्करांत बोलत होते (असें) ऐकिलें (तें) लिहिलें आहे. तेथें[1] असेल तें खरें! तीर्थरूप नळदुर्गी सुखी आहेत. कुरुंदवाडाकडील यथास्थित आहे. अलीकडे आठ दिवस पत्र नाहीं. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. श्रीमंत कोणत्या सुमारें येतील पहावें. आम्हीं येथें[3] आहों. लज्जारक्षक श्रीभगवान् समर्थ आहे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

समस्त चिरंजीव मंडळीस आशीर्वाद. लिहिलें परिसिजे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० १९ जिल्हेज सोमवार चतुर्थ प्रहरीं शिदोजी सन्नागमें पत्रें आलीं.

नं० २८७

[२९ मे.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत अधिक शुद्ध त्रयोदशी गुरुवार यथास्थित असे. विशेष. तुम्हीं पोरनादूर [?] च्या मुक्कामींहून मंदवारीं पत्रें रवाना केलीं तीं मंगळवारीं अस्तमानीं पावलीं. लिहिलें वर्तमान विस्तारें कळलें. राजे बहादर यांचें वर्तमान लिहिलें, त्यास मोठें आदान चुकाविलें. श्रीनें खैर केली. पुढें उपेक्षा न करावी. औषधी उपाय करावे. श्रीमंत आहेत, त्यास काय चिंता! हजार वोखदें मिळतील. वरकड कितेक वर्तमान कळलें तितकें प्रमाण. फारच लष्कर श्रीमंतांचें हैराण जरी करून तहाचा प्रकार असेल तरीच ठरतील. नाहीं तरी भीमा दक्षिणतीरें

पण शर्ती काय होत्या हें कळत नाहीं. मागें ही असाच एक समेटाचा प्रयत्न झाल्याचा उल्लेख आला आहे. (पहा अंक ११ पृष्ट ३९४)

१ तुह्मीं नबाबाच्या लष्करांत आहां तेथें. २ पत्र लिहिणाराचे दोघे वडील बंधु. ३ मंगळवेढ्यांस. ४ पत्र गोविंद हरींचें गोपाळरावास. ५ संकट. यावरून या वेळीं विठ्ठल सुंदरावर कांहीं मोठेंच जिवावरचें दुखणें येऊन गेलें होतेंसें दिसतें.

होतील. नदीस पाणी ही नाहीं. असा प्रकार दिसतो. परवां शिदोजीवरोबर लिहिलेंच आहे. वारंवार कोणता मजकूर लिहावा ! आम्हीं येथें पंगुवत् आहों. दुसरे कोठें जावयास स्थल नाहीं. झुंजावयाची कुवत ह्मणावी तर स्थल[1] मजबूत नाहीं. एक साहाकारी श्रीपंढरीनाथ समर्थ. त्याचे इच्छेनें होणें तें होईल ! दुसरा आधार नाहीं. तुम्हीं ' मर्जी माफक राहोन संतोषें निरोप घेऊन येतों ' ह्मणोन लिहिलें, (?) लक्ष गोष्टींची गोष्ट. तीर्थरूप आपांस हिंवज्वर येत असतो ह्मणोन अंताजी सखदेव याणीं अक्कलकोटाहून लिहिलें होतें. उभयतां तीर्थरूप व कुटुंबें फारच श्रमी झालीं. ना इलाज ! काय करावें ! हे[3] दिवस आले तरी कोठें थांग नाहीं. अरिष्ट[4] एखादीकडे जातें ह्मणजे तें स्थल[5] सोडून यावयास येतें. आम्हांवरी चिठ्या केल्या त्याचा मजकूर---आम्हीं समाधानेंच वरातदार लाविले[6]. बोभाटा एकाएकीं तुम्हांकडे येणार नाहीं. खंदकाचा मजकूर लिहिला, त्यास दोनीकडील [खंदक] झाले. दुसरे खणवावे तरी द्यावें काय ! वड्ड [र] आर्धा पैका मागतात. येथें पैशास संबंध नाहीं ! मोरोबापूजीनें[7]---आजी आठ दहा रोज झाले---त्या मध्यें तीन स्वाऱ्या केल्या. तमाम पांच सात गांवचीं गुरें वळून नेलीं. खेडीं ओस पडत चाललीं. त्याजवरी चालोन जावें तरी समय नव्हे. चौ जागांचे चार राऊत मिळवितो, गुरें घेऊन जातो, चौघे चहूंकडे जातात ! त्याणें नाकांत काड्या घालावया प्रारंभ केला आहे ! चिरंजीवानें परवां विसाजीपंतास पत्र लिहिलें आहे याचें उत्तर आल्यानंतर तदनुसार विचार करणें तो करूं. हत्ती करमाळियास आहेत. आठ दिवसां आणवूं. वरकड ' आपणावरी दौलत बुडाल्याचें अपेश आलें ह्मणोन श्रीमंतानीं आक्रोश केला ' ह्मणोन लिहिलें, त्यास इतकें ज्ञान असतें तरी या थरास कां येतें ? तुम्हीं कशावरून लिहिलें न कळे. असो. कालच विषम ! ब्राह्मणी राज्य बुडवावें असें बहुतांचें मत होतें. परंतु सत्यसंकल्प

---

१ मंगळवेढ्यांचें ठाणें. २ त्रिंबक हरीस. ३ पावसाळा समीप आला तरी. ४ पेशव्यांच्या लष्कराचें अरिष्ट. ५ नळदुर्ग. ६ पाठवून दिले. ७ हा पेशव्यांचा एक लहानसा सरदार मंगळवेढ्याजवळच एका ठाण्यांत होता. ८ बहुधा पुरषोत्तमरावानें.

सखाराम [बापू] झाला! त्याचे मनोरथ सर्व सिद्धीस गेले! पुणें जाळिलें. (राज्या) बाहेर सरदार घालविले. राज्य क्षयास नेलें. फौज समागमें होती तिची गति या प्रकारची केली. आतां देशास जाऊन परशुरामें क्षेत्रांतील घालमेली करून तीं स्थलें गमाविलीं ह्मणजे सुटला! मर्दनगड जनार्दन गणेश काळे यास सनद देऊन गमाविला तसेंच करील. पुढें आपण किल्ल्यावरी जाऊन बसेल. मुख्य त्याचे दारोदार फिरतील. मग हा त्यांचा अनादर करील. त्याचे संग्रहीं द्रव्य आहे. कर्तेपण. सारा राजमंडळचा कार्यभाग स्वाधीन आहे. सर्व आपलेंच करील. त्याची तपश्चर्या भारी. या प्रमाणें कोणाचे ही संकल्प सिद्धीस जाणार नाहींत! त्यानें भाऊसाहेबां सारखे मोहरे एवढ्या सलतनतेनिशीं हिंदुस्थानीं बुडविले! येथलिं प्रकार चित्तानुरूप केला! आमचा कैवारी श्रीपंढरीनाथ समर्थ आहे. आम्हीं त्या पाजीची काळजी वागवीत नाहीं! होणार भावी कदापि चुकणार नाहीं. तदनुसार आम्हीं येथें राहिलोंच आहों. श्री समर्थ. आमची काळजी न करणें. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे. हे आशीर्वाद.

नं० २८८

[२७ मे.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत [अधिक] ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमा गुरुवार दोन प्रहर यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. मंगळवारचीं पत्रें तुमचीं आलीं त्यास आजी दहा रोज झाले. दुसरें मागती पत्र रवाना केलें असतें तरी पावलें असतें. दहा माणूस आमचे तुम्हांजवळी

---

१ कोंकणांतील. २ हा जनार्दन गणेश कोण? ३ माधवराव पेशवे. ४ सातारकर महाराज स्वाधीन असल्यामुळें सखारामबापू आपल्याच पक्षाच्या लोकांस ' पंतप्रधान, ' ' पंतप्रतिनिधि ' वगैरे बनवील. ५ पानपतच्या स्वारीस गेलेल्या फौजेनिशीं. ६ पुण्याच्या दरबारीं. ७ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

आहे. लिहिण्याचा मात्र आळस! असो. तुमची इच्छा प्रमाण! वधू मुलीस फोड्या अतिशय आल्या. पाणियानें भरों लागल्या. परिणाम लागेल तो खरा! लग्न राहिलें. राजश्री त्रिंबकराऊ मामाकडील मजकूर नवरीचा केला असता तरी कार्यावरी पडतें. पूर्व सूचना नव्हती. असो. ईश्वरी सूत्र प्रमाण. राजश्री भास्करराऊ याजकडील पत्र आलें तेंच बजिन्नस पाठविलें आहे त्याजवरून कळेल. रेवतगांवकराचा कजिया—ढालाइतास तो[1] ऐकत नाहीं. सांडणीस्वार अगर नबाबाचा परवाना अगर मोंगलअल्लीचा परवाना आला तरी ऐकेल. श्रीमंतांच्या लष्करास जोडी बातमीस गेली होती त्या पैकीं एक खडेविसादच्या [?] मुक्कामींहून बाबूर्जी नाइकाच्या लष्करांतून आली. श्रीमंतांस व त्यांस दहा गांवचें[2] अंतर आहे. हे अगोदर कोडलवाडीकडे गेले होते. श्रीमंतानीं मेदेकाकडून[3], वलकोंडें, निर्मल उजवी टाकून नांदेड नाखाडाकडून नीट वऱ्हाडचा रोख धरिला आहे. अलीकडे[4] आले ह्मणजे लोक देशाकडे जाऊं लागतील, म्हणून झाडींतून परभारेंच नागपुरच्या रोखें जाणार, ह्मणोन बोली आहे. वऱ्हाडांत जरूर जातील. न कळे कालाची गति. नबाबाचा मुक्काम कोणे ठिकाणीं आहे, पुण्याकडून फिरले कीं नाहीं, राजे विनायकदास आले कीं नाहींत, पुण्याची गति काय, कांहीं राहिलें कीं नाहीं, हें विस्तारें लिहिणें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

चिरंजीव समस्त मंडळीस आशीर्वाद. लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

राजश्री विष्णुपंत स्वामीस नमस्कार हे विनंती.

चिरंजीव भास्करपंत व तात्यास[5] आशीर्वाद.

---

१ रेवतगांवकरांपैकीं कित्येकांस मोंगलअल्लीचा बक्षी मीरआबस यानें कैदेंत ठेविलें होतें त्यांस सोडून देण्या विषयीं खुद्द निजामअल्लीची ताकीद घेऊन आलेल्या ढालाइतांस तो जुमानीत नाहीं. २ गांव ह्मणजे चार कोस. ३ मेदक वगैरे हीं सर्व स्थळें मोंगलाईत आहेत. ४ पेशवाईच्या सरहद्दीकडे. ५ भास्करपंत हा पत्र लिहिणाराचा धाकटा बंधु. तात्या ह्मणजे अंताजी विठ्ठल यादवाडकर पटवर्धन.

नं० २८९

(अजमासें अधिकज्येष्ठ शुद्ध
मेचा दु०पंधरवडा.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. गेकार नामकाच्या पत्राच्या नकला व तुम्हीं उत्तरें पाठविलीं त्यांच्या नकला व उभयतां गृहस्थांच्या पत्राची नक्कल पावली. वर्तमान कळलें. गकार[2] नामकानें तुम्हांस लिहिलें त्याच प्रतीनें आम्हांस लिहिलें. आम्हीं उत्तरें देऊन आजी माणूस रवाना केले. तुम्हीं लिहिल्या प्रमाणेंच लिहिलें आहे. धरसोड दोन्ही नाहींत. त्याचें पत्र तुम्हांस होतें तें बजिन्नस लाखोटाच पाठविला आहे. खंदकाचा मजकूर--पैसा नाहीं. वडरांस काय द्यावें ? पुढें प्रसंगानुसार करावयास येईल. कर्ज पैसा मिळेना. देणारानें द्यावें कोण्या आधारें हें कळतच आहे. गमाजीबावा सातारियाहून विमणगांवास आले. पानगांऊकराची फौज लष्करास दाखल झाली असेल. मिरजेस नरसिंगराऊ उद्धव व बर्वे यांची फौज व नारो शंकराकडील आले होते. ते जमा दोन अडीचें पावेतों होऊन सातारियाकडे जातात. कुंडलेपाशीं उतरले होते. पुढें गेलियाचें वर्तमान नाहीं. झुर्जीवयाच्या दिवशीं श्रीमंतानीं ' गच्छ ' केलें. आतां या दिवशीं झुजावयाची कस्त धरिली आहे ! कसें काय आहे कळत नाहीं. मोरोबापूजीनें दोन तीन स्वांऱ्या करून सात आठ गांवचीं गुरें नेलीं. बैल खेपेस गेले

---

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ हा ' गकार नामक ' गंगाधर यशवंत चंद्रचूड होय व ' उभयतां गृहस्थ ' विंचूरकर व नारो शंकर हे होत. पेशव्यांचा व पटवर्धनांचा समेट करून देण्याच्या कामीं या तिघांचा गोपाळराव व गोविंद हरि यांशीं पत्रव्यवहार सुरू होता. ३ दोन अडीच हजार. ४ ज्यावेळीं मोंगलाशीं युद्ध करण्याची उत्तम संधि होती त्या वेळीं श्रीमंत पळत सुटले व आतां पावसाळा जवळ आल्यामुळें फौजेंतील लोक घरोघर जावयास निघाले असल्यामुळें मोंगलाशीं झुजण्याची ही वेळ नव्हे, हें ठाऊक असतां ही त्यानीं आतां युद्धच करण्याचा निश्चय केला आहे.

ते लुटून माल सुद्धां नेले. प्रस्तुत श्रीमंत जवळी आले आहेत. प्रतिकार करतां नये. त्याचें काय करावें? एक खेडें. तेवढें भारी सामानानें जाऊन घ्यावें तेव्हां गुरें लुटून आणावीं तर तो प्रकार नाहीं. क्षुल्लक करणें. उचित नाहीं. गकारनामकाच्या लिहिण्यांत जीव आहे. परंतु मात्रागमनी काय करतील हा भरंवसा पुरवत नाहीं. तिकडे लिहितील तेव्हां घर बुडेल. बरें. श्रीपंढरीनाथ समर्थ आहे. तुम्हीं मर्जी रक्षोन निरोप घेऊन येणें. आमची काळजी न करणें. प्रवाहीं आहों. आमचा रक्षक[३] समर्थ आहे. अहोरात्र काळजी तुम्हांकडील. (तुम्हाजवळ) खर्चास नाहीं. समागमें आहेत त्यांस दिल्या वांचून राहणार नाहींत. तुम्हांस आजन्मप्रभृति ठाऊक नव्हतें. सर्व यंदाच कळलें! बरें! असेच दिवस राहणार नाहींत. श्रीकृपा करील. कांहीं चिंता न करणें. सावध बहुत राहणें. थोडे आहां, याल तेव्हां वाटेचे सावधगिरीनें येणें. श्रीमंत एकीकडे जातात. तुम्हांस ही निरोप होणार नाहींसें दिसतें. श्रीसत्ता प्रमाण! ते गेल्या उपरीच निरोप घ्यावा. उतावळी न करावी. बहुत काय लिहिणें. त्यों लष्करास राजश्री विसाजीपंताकडे पत्रें लिहून आजी जोडी रवाना केली. कळलें पाहिजे. दोन तीन जोड्या आमाच्या गेल्या आहेत. अक्कलकोटाहून प्रत्यहीं माणूस येतें. तीर्थरूपांस ज्वर येत होता तो उपशम आहे. चिंता न करणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. चिरंजीव दाजींनीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री नारायणरायास आशीर्वाद. घरें रहावयाचीं करावयाचा मजकूर लिहिला त्यास तूर्त श्रीमंतांचें अरिष्ट[६] जातें. मग आहे यांत

---

१ ही शिवी सखारामबापूस व तत्पक्षीय लोकांस. २ गोविंद हरीस मोठें भय होतें तें हें कीं, सखारामबापू आपणाकडे समेटाचें बोलणें लावील व तिकडे मोंगलास ही कळवील कीं, 'पहा, हे पटवर्धन तुह्मांस दगा देऊन आह्मांकडे येणार आहेत. यांचा काय बंदोबस्त करावयाचा असेल तो करा!' ३ ईश्वर. ४ तुह्मांजवळ फौज आहे तीस खर्चास न मिळाल्यास ती तुह्मांस सोडून जाईल. ५ पेशव्यांच्या लष्करास. ६ श्रीमंतांच्या लष्कराचें अरिष्ट मंगळवेढ्याकडे येत आहे तें दूर जाईल.

सारेंच समजोन घेऊं. त्या विशीं चिंता न करावी. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० २९०

[३० मे]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत अधिक वद्य प्रतिपदा रविवार जाणून स्वकीय लिहिणें विशेष. तुम्हीं चंद्र नऊ जिल्हेजचें पत्र पाठविलें तें छ० १२ मिनहूस चौथे रोजीं पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. ' राजे बहादर यांचा वाखा फार आहे, बसवत नाहीं, ' ह्मणोन लिहिलें; (त्यास) श्रीनें मोठी खैर केली. एकाएकीं बरे होणार नाहींत. आठ पंधरा दिसां हलकें वाटेल. तुमची ' बातमी श्रीमंतांस नव्हती. या उपरी बातमी गेल्या वरी भीमापार होतील ' ह्मणून लिहिलें, त्यास त्यांच्या मतें युद्ध करावें, तुम्हांवर चालोन यावें, असा मनसबा दिसतो. कोण्या विचारावरी युद्धाचा प्रसंग करणार न कळे ! बसालतजंग मागून पंधरा विसा कोसांवरी आहेत. त्यांजबरोबर दहा हजार पाईचा माणूस आहे. या शिवाय तोफा वीस व मोंगल पठाण दोन चार हजार काय आहेत न कळे. ' उभयतां मिळोन नबाबावरी जातात ' ह्मणोन खबरी उठल्या आहेत. बाबूजी नाईक व विठ्ठल शिवदेव व रास्ते वगैरे तमाम अब्रजलपुर मनूरमाशाळा नजीक आले होते. तेथून माघारे बोलावून नेले. श्रीमंत कलबुर्ग्यास आले. मोर्चे लाविले. कांहीं लुटिलें. राजे[3] व देशमुखाच्या हवेल्या राखोन लाख रुपये

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. यांत तिथी संबंधानें काय घोंटाळा झाला आहे समजत नाहीं. पत्राची तिथी अधिक (ज्येष्ठ) वद्य प्रतिपदा आहे ती प्रोफेसर वा. प्र. मोडकांच्या जंत्रींत दिलेलीच नाहीं ! मिती पुढेंच या पत्रांत वार रविवार दिला आहे त्या दिवशीं मोडकांच्या जंत्री प्रमाणें तृतीया असून इंग्रजी तारीख ३० मे ही दिलेली आहे. तीच खरी धरून आम्हीं ही पत्राच्या शिरोभागीं मांडिली आहे. २ मोंगलाचें लष्कर परत मोंगलाईकडे आल्याची. ३ कलबुर्ग्यास राजे बहादर विठ्ठल सुंदर याचा वाडा होता तो.

खंडणी केली. ब्राम्हणपुर कांहीं लुटिलें. कांहीं राखिलें. दोघा देशमुखांचे वाडे राखिले. ऐवजाचा वसूल होतो. मानूर माशाळ बाबूजीनाइकानें लुटून फस्त केलें. श्रीमंतांकडील वर्तमान तुम्हीं लिहिलें तें कळलें. ' पुणें जाळिलें या मुळें (श्रीमंत दादासाहेब) श्रमी आहेत, कार्यभागी यांवरी खेट्ट आहेत, ह्मणोन लिहिलें; असतील. त्यांस ते गोष्टीचें सुख दुःख काय! विवेकच नाहीं. आतां या दिवशीं नबाबावरी जावें म्हणतात हे कोण अकल! तस्मात् मनस्वी! पुढें काय होणार न कळे. काली शनवारचेंच पत्र अक्कलकोटचें, आलें तेंच पाठविलें आहे त्यावरून कळेल. बातमीस माणसें आहेत. खबरदारी श्रीपंढरीनाथाची आहे. आम्हीं काय करावी! लोक प्यादे आहेत. वरातांचा मजकूर आम्हीं समाधानेंच बोलून वाटे लाविले आहेत. दिगर जाबसाल केला नाहीं. पुण्याच्या हवेल्यांच्या वेढ्यांचे (?) निमित्य त्या गृहस्थांनें ऐवज न पाठविला हें अपूर्व आहे. वरकड लोकांचा मजकूर विस्तारें कळला. चिंता काय! पुरुषासच सर्व ही घडतें! तुम्हांस ही कळतें. कालगतीचा महिमा या रीतीचा आहे. श्रीमंत कोणीकडे जातात, काय करतात, हें कांहीं कळत नाहीं! अद्याप भिवरेस पाणी नाहीं. आलें होतें तें उतरलें. पाऊस इकडे नाहीं. कडबा महाग झाला. दाणा महाग झाला. भोई दोन तीन पालख्यांचे दूर केले. दोन पालख्या मात्र आहेत. खर्च सुटत नाहीं. खर्चाची ओढ भारी. पैसा नाहीं. आजी पंधरा दिवस झाले, शागीर्दपेशास रोजमरा नाहीं. लोकांस ही रोजमरा नाहीं. अशी अवस्था आहे. कोठवर लिहावी? तुमचें ऐकोनच श्रम होतात. वंधू पावून भोई माणसें तट्टे आलीं. सुखरूप आपल्या ठिकाणास पावली. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

---

१ सखारामबापूवर. २ क्रुद्ध आहेत. ३ आग्रही. ४ या वाक्याचा नीटसा बोध होत नाहीं. ५ जिचें पुढील वर्षी गोपाळरावाशीं लग्न झालें ती मुलगी. ६ कोंकणांत आपल्या गांवीं.

नं० २९१

[अजमासें अधिकज्येष्ठ वद्य
जूनचा प०पंधरवडा.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[1] उपरी. राजश्री गमाजीबावा कऱ्हाडीं आहेत. हजार दीड हजार फौज आहे. नरसिंगराऊ वगैरे कृष्णे अलीकडे तीन हजार पर्यंत जमा आहेत. टेंकडीवरी तोफा ठेऊन पलीकडे मारगिरी[2] करितात, ह्मणोन वर्तमान आहे. श्रीमंतांस पैका प्राप्त नाहीं. परंतु नरसिंगरायास आंधळी (?) हिवरें नक्षत्र ! रुपया पुष्कळ मिळविला. इसलामपुर——नऊ दहा हजार. वाळवें—दहा हजार. किरकोळ खेडीं—पांच, सात, चार, दोन घेतच गेले. कृष्णे पलीकडे अलीकडे घेतले. मोंगलअल्लीकडील मिरआबस ही जेथें जातो तें स्थल घेतो. खंडणी घेतो. त्या पुढें कोणी उभा रहात नाहीं ! रुपये मिळविले व स्थलें ही त्यानें घेतलीं. बुधेहाळास[3] लागला आहे. दोघांस द्रव्य लाभ किंवा हैदरनाइकास बिदनूर घेऊन पुष्कळ द्रव्य व स्थलें हस्तगत झालीं. त्याच्या प्रारब्धास उपाय नाहीं. त्याची फौज मीरफैजुल्ला सावनूर प्रांतीं येऊन चार पांच स्थलें घेतलीं. पुढें घेतच आहे. काली वर्तमान उडतें आलें कीं त्याजवरी सावनूरकर नवाब चालोन गेला होता. युद्ध झालें. त्यास[4] मोडून घातला. कांहीं तोफा व घोडीं घेतलीं. अशी खबर आली आहे. सत्य मिथ्या न कळे. किंवा यश लौकिक कीर्ति नबाब निजामअल्लीस. यास उपमा नाहीं. श्रीमंतांची हानी अपकीर्ति यांस जोडा नाहीं. पुढें होणार भावी असेल तसें घडेल ! बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. ' राजे बहादर बरे झाले, पालखींत बसूं लागले, ' ह्मणोन लिहिलें त्यावरून समाधान झालें मोठें आदानच ईश्वरें त्यांचें चु-

---

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ मारगिरी कोणत्या ठाण्यावर ? ३ बुधेहाळ कोणचें ? गोकाकेजवळ आहे तें ? तिकडे मीरआबस गेला असेलसें वाटत नाहीं. तो या वेळीं विजापूर प्रांतीं असावा. ४ मीरफैजुल्लास.

कविलें. प्रारब्धवान, कर्ता त्या राज्यांत लेवढाच प्राणी आहे. त्याचें श्री कल्याण करू ! हे आशीर्वाद. नरसिंगराऊ श्रीमंतांकडून गेल्या पासून रुपये मिळवीत गेला आणि आला. आतां ही मिळविलि. पुढें ही मिळवील. अपल्यें पुरुषोत्तमानें व पांडूनें व महादेवानें व बाळानें शिर साष्टांग नमस्कार. लोभ करणें हे विज्ञापना.

नं० २९२

(३१ मे.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत आधक वद्य द्वितीया सोमवार. यथास्थित असों. विशेष. परवां पत्र गोविंदे शिवराम यांचें आलें त्याचा मजकूर कालीं लिहिलाच आहे. कालीं विसाजीपंताचें त्याच प्रमाणें लिहिलें आलें. " श्रीमंतांचा मनोदय रक्षावा. ओढ धरूं नये. तुम्हीं त्यांस सां-

---

पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. या ही पत्ताकरच्या मितीचा जंत्रीशी मेळ नाहीं. पुढें ही असेंच होत जाणार. पत्रावरची इंग्रजी तारीख आम्हीं सोमवारचीं घातली आहे. पुढें ही वाराच्याच अनुरोधानें घालीत जाऊं. २ गोविंद शिवराम खासगीवाले व पुढील वाक्यांत आलेला विसाजीपंत या दोघानीं पेशव्यांशीं समेट करून घेण्या विषयीं गोपाळराव व गोविंद हरी यांस पत्रें लिहिलीं होतीं त्याविषयीं या पत्तांत चर्चा केली आहे. विसाजीपंतानें गोविंद हरीस पाठविलेल्या पत्रांतील मजकूर एकंदरींत येणें प्रमाणें असावा. " मोंगलाचा पक्ष सोडून देऊन आम्हांकडे निघून या, या प्रमाणें गोपाळरावास श्रीमंतानीं पत्रें पाठविलीं आहेत व दादासाहेबानीं आपले खिजमतगार हाच निरोप सांगून पाठविले आहेत. आतां तुम्हीं गोपाळरावास नीट समजून सांगून ते ताळ्यावर येतीलसें, करावें. श्रीमंतांच्या मनाचा कल रक्षावा. विठ्ठल सुंदर आजारी पडला आहे. नबावाची फौज फुटून घरोघर जाऊं लागली आहे. त्याचे सरदार ही त्यावर खुष नाहींत. गोपाळरावाच्या हातून कांहीं होणें नाहीं, कारण त्याजवळ सारे चार पांचशें लोक आहेत. इकडे श्रीमंतांची युद्ध करण्याची हिंमत मोठी. त्यांत त्यांस बसालतजंग मिळाला आहे. ही लढाई करण्याची उत्तम संधि आहे असें जाणून नवाब निजामअलीवर श्रीमंत व बसालतजंग चालून जात आहेत. " ३ गोपाळरावास.

गावें आणि उत्तर लिहून पाठवावें, " ह्मणून लिहिलें, व " आपाजीपंताचें पत्र सखारामपंतास[1] गेलें कीं आपणांस आज्ञा झालिया येईन " ह्मणोन हें ही त्याणीं[2] लिहिलें, " खिजमतगार मुख्योनीं[3] पाठविले आहेत " ह्मणोन लिहिलें, " बसालतजंग व श्रीमंत एक होऊन नबाबावरी जाणार, त्यांचे[4] कार्यभागी यांस तूर्त बरें नाहीं, (त्यांची) फौज फुटली, सरदार दिलगीर, गोपाळराऊ चार पांचशें, ह्मणोन बातमी; यास्तव जावयाचा[5] प्रकार केला, " ह्मणोन लिहिलें होतें. आम्हीं उत्तर लिहिलें जे, " नबाब निजामअल्ली कोणाच्या भरंवशावर नाहींत. त्यांची फौज जे आहे ते तयार आहे. नवे किती आले गेले याचा (त्यांस) हिसाब नाहीं. तुम्हीं मनसबा[6] केला हा फजीत पडावयाचा! सलूख करून आपल्या[7] स्थलास जावें. न पुरवे तरी उगेच नदीस[8] पाणी नाहीं तों पार व्हावें. नबाबाशीं गांठ पडलिया किती फौज (लढाईस उभी) राहील तें कळेल!" ह्मणून लिहिलें आहे. तुम्हांस कळावें. वरकड गोष्टी " चिरंजीव युद्ध प्रसंगीं शरीक[9] नबाबाचे. किंती तरी असोत. झुंज झालियावरी (नबाबाचा) निरोप घेऊन येतील. तवपर्यंत येत नाहींत. " असें साफ लिहिलें आहे. गंकार नामकाच्या[10] पत्रीं जें लिहिणें तें लिहिलें आहे. " चिरंजीव येथें[11] येतील, त्यांची आमची भेट होईल, नबाबानीं कोणे प्रकारें [त्यांची] रवानगी केली हें कळेल, तदनुसार पुढें कर्तव्य तें करूं. तूर्त पत्राचें प्रयोजन नाहीं. " ह्मणोन लिहिलें आहे. तुम्हीं अगोदर सूचना राजे बहादर यांस करावी, " श्रीमंतांकडील पत्रें येतात जातात. कोणी तुम्हांस सांगेल अगर लिहील. तुमच्या चित्तांत विकल्प येईल. यास्तव सूचना केली. " सांगोन उतराई व्हावें. ते[12] [तुम्हीं] उभय भ्रष्ट व्हावें ह्मणोन लटकींच

---

१ सखारामबापूस. पण या वाक्यांतील हा आपाजीपंत कोण? २ दादासाहेबानीं. ३ मोगलाचा दिवाण यास. ४ मोंगलावर चालून जावयाचा. ५ लढाई करण्याचा मनसबा. ६ अर्थात् पुण्यास. ७ भीमानदीस. ८ सोबती. ९ गोपाळरावाजवळ किती थोडी फौज असली तरी तो मोंगलाच्या बाजूनेंच लढणार. १० गंगाधर यशवंतांच्या. ११ घरीं मंगळवेढ्यास. १२ सखारामबापू वगैरे तुमचे शत्रू.

दगाबाजीनें पत्रें पाठवितील. अंतर करणार नाहींत. परिच्छिन्न सांगावें. आम्हीं तिकडील पत्रें लटकीं लबाडीचीं येऊं लागलीं यास्तव सूचना केली आहे. आम्हीं चिंतार्णवीं आहों. बहुत सावधपणें असावें. आधीं वर्तमान नबाबास अगर राजे बहादरांस श्रुत करावें. तीर्थरूप आपांस उतार आहे. बसालतजंग यादगिरीवर आले. हलक्या मजली करीत आले. श्रीमंतांनीं कलबुर्ग्याहून कूच केलें. अळंदच्या सुमारें चालिले ह्मणोन लिहिलें होतें. चतुर्दशी भृगुवारचें पत्र कलबर्ग्याच्या मुक्कामचें काली तिसरे दिवशीं आलें. कळलें पाहिजे. हे आशीर्वाद.

नं० २९३ L

(अधिकज्येष्ठ वद्य तृतीया
२९ मे.)

श्री.

सेवेशीं सखाराम भगवंत. कृतानेक साष्टांग नमस्कार. विनंती उपरी. येथील कुशल वर्तमान तागायत चंद्र १९ जिल्काद पावेतों आपले कृपेकरून यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पाहोन बहुत संतोष झाला. सदैव कृपापत्रीं संतोषवीत असावें. इकडील वर्तमान तरी उभयतां श्रीमंत खासा भागानगर प्रांतीं आहेत. कांहीं फौज गंगातीराकडे ही आहे. मोंगलानें आपल्या प्रांताचा विध्वंस केला यास्तव यांनीं ही इकडे त्या प्रमाणेंच अमलांत आणिलें. यंदाचा कलह झाला असा प्रकार याज मागें झाला नव्हता. * ते समयीं झालें होतें तेव्हां लोकांचीं घरेंदारें ही फारशीं नव्हतीं. एवंच घरांसाठीं लोक श्रमी असतील. असो. जें होणार तें कदापि सुटत नाहीं. येथील प्रकार तरी मल्हारबा आदी करून सर्व लहान मोठे एकदिल आहेत. सांप्रत बसालतजंग यास सामील

१ पेशव्यांच्या लष्करचीं. २ हें सखारामबापूचें गोपिकाबाईस पत्र. ३ रावसाहेब पेशवे व दादासाहेब. * पत्रांत कोरी जागा सोडिली आहे तेथें मूळपत्र फाटल्यामुळें अक्षरें नाहींशीं झालीं आहेत.

करावें हा विचार आहे. सर्वांचे मतें दौलत पेंचांत आली तरी सर्वांसच वाईट आहे; यास्तव जीवींदारभ्य श्रम करून एकवेळ मोंगलाचे दंत भग्न करावे असें आहे. त्या ही मध्यें ईश्वरी सत्ता! जाहल्या गोष्टी स्वप्नीं ही नव्हत्या! परंतु त्या ही घडोन ऐसे हे दिवस आले! बरें! जें होणार तें सुटत नाहीं. या उपरी एकनिष्ठेनें सर्वांनीं वर्तावें असेच भाव आहेत. आणि ईश्वर कृपाच करील. आमचे विषयीं बहुतानीं (आपल्या) चित्तांत संशय आणिले होते, ऐशास आम्हीं एकनिष्ठेनें सेवा केली, अलीकडे हा प्रकार झाला! असो. आमचे दैवानुरूप जें होणें तें झालें. या उपरी जे गोष्टींत उचित, दौलतेस उपयोगी, तेच वर्तणूक करीत आहोंत. फलदाता ईश्वर आहे. कांहीं संदेह आपल्यास असेल तो दर्शनांतीं निरसन होईल. सर्वदा पत्रीं सांभाळावें. कृपा केली पाहिजे. हे विज्ञापना.

हेच पत्रीं राजश्री रामचंद्रपंत स्वामींस. तुम्हीं प्रसंगीं आहां ते आमचे आहां. (तुम्हीं) कोणे विषयीं उणें पडूं देणार नाहीं हा भरंवसा आहे. बहुत काय लिहिणें हे विनंती.

पै॥ छ० १० जिल्हेज.

नं० २९४

(३० मे.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादे उपरी. येथील कुशल तागायत (अधिक) ज्येष्ठ वद्य चतुर्थी सोमवार. यथास्थित असे विशेष. तुमचें पत्र आजी आठ दिवस सोमवारचें आलें, त्या अलीकडे पत्र आलें नाहीं. नबाबाचें लष्कर माघारें फिरलें म्हणतात. श्रीमंतांच्या लष्करची बातमी——भागानगर प्रांतीं आहेत. नबाबाचा रोख कळला ह्मणजे आठवे मजलीस भीमातीरास येणार. बाबूजी नाईक व रामचंद्र गणेश व आबा पुरंदरे असे नांदेड व कोंडलवाडीकडे

---

१ जिवापाड. २ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

होते. नाईक पाथरी परभाणी पावेतों गंगापार गेले होते. माघारे येऊन खंदार प्रांतें वण [?] भरवीत[1] आहेत. श्रीमंत माघारे फिरले ह्मणजे ते पांचवे सहावे मजलीस भंडारकवठें[2] या जवळी येणार, ह्मणून त्यांच्या लष्कराची बातमी (घेऊन) कालींच अस्तमानीं जोडी[3] आली. वधू मुलीच्या फोड्या उतारास लागल्या खपल्या पडों लागल्या. चिरंजीव सौभाग्यवती राधाबाई सहमूल सुखरूप आहेत. काली पत्र अक्कलकोटचें आलें. तुम्हांस कळावें. श्रीमंत इकडून[4] परिछिन्न येतात. इतके दिवस दडी मारून बसले होते जे मोंगलाचा रोख पाहून जावें, त्यास (तो पुण्याहून) माघारा फिरला. आतां बातमी पोंचतांच मजल दर मजल येतात. कळावें. आम्हीं तो बसलों आहों. श्रीपंढरीनाथाचे इच्छेनें होणें तें प्रारब्धानुसार होईल. त्याची चिंता कोठवरी करावी ! चिरंजीव दाजीस ही कांहीं उतार आहे. नलदुर्गीं उभयतां वडील कुटुंब समेत सुखी आहेत. सौभाग्यवती आकाबाई[5] देखील बुद्धिदुर्गीं[6] आली ह्मणून वर्तमान आहे. तुम्हांकडील वर्तमान काय, तुम्हांस मोंगल या म्हणतात किंवा निरोप देतात, हें कांहींच कळलें नाहीं? यास्तव चिंतार्णवीं आहों लग्नाची संधि आणि लोकांची रवानगी यांचा अडथळा भारी होता, तो लग्नाचा मजकूर राहिला. तुम्हीं यवन[7] ठेविले आहेत त्यांचेंच भय फार आहे. हर कसें करून त्यांची रवानगी युक्तीनें विचारें रजावंदीनें संतोषें करावी ह्मणजे जीव स्वस्थ होईल. आजी जोडी श्रीमंतांच्या लष्करास रवाना केली. चिरंजीव नारायणराऊ व आबा पर्वतास[8] गेले होते ते आले कीं नाहींत (?) ते गेले ह्मणोन यव-

---

१ येथें ' वण भरवीत ' या ठिकाणीं मूळअक्षरें पहातां ' वणजारबावींत ' असें ही होईल. ' वणजारबावी ' हें गांवाचें नांव असूं शकेल. २ भंडारकवठें सोलापूर जिल्ह्यांत भीमातीरीं. ३ जोडी जासुदांची. ४ मंगळवेढ्याकडून. ५ ही त्रिंबक हरीची स्त्री. हिला ' तीर्थस्वरूप ' हें उपपद कसें जोडिलें नाहीं न कळे. ६ अक्कलकोटास. ७ पगारसचा पैसा वेळेवर पोंचला नाहीं तर मराठे स्वार एकवेळ गय करतील, परंतु तुह्मीं मोंगल व पठाण वगैरे जातीचे स्वार नवीन चाकरीस ठेविले आहेत ते अब्रू घेतल्या शिवाय राहणार नाहींत. ८ पर्वतास कोठें ? पर्वत ह्मणजे किल्ला. तेव्हां यावरून नारायणराव व आबा हे पुरंदरास गोपिकाबाईकडे गेले होते असें घ्यावयाचें कीं काय ?

नाच्या अगर राजे बहादरांच्या चित्तांत विपर्यास होईल कीं काय न कळे! तुमचे लष्करांत श्रीमंतांची बातमी असेल. सावधपणें राहत जाणें. गमाजी बावानें स्वतंत्र जाऊन रुपया मिळविला. त्याचें द्रव्यादृष्टच विपरीत! तदनुसार मिळालें असेल. जे कालीं आपला लाभकाल असेल तदनुसार घडेल. तुम्हीं चित्तांत एकंदर श्रम न मानावे. शुभकाल श्रीकृपेनें दिवसें दिवस होत चालिला. नबाबावरी अगर राजे बहादर यांजवरी खट्टे न रहावें. त्यांचा दरबार खोल. परंतु (जे) आपले पदरीं पडले त्यांचा अभिमान त्या लोकांस फार असतो. तहाचा प्रकार बनता तरी एव्हांच सरंजामाची वाट होती. त्या ही कृतघ्नानें सर्व देशाचा नाश कबूल करून इरे करितां तह न केला. तह केला तरी प्रतिनिधि परत द्यावी लागेल, तुमच्या कर्जाची वाट करावी लागेल, याच करितां त्याणें असें केलें! पुढें उभयपक्षीं तहाविणें चालणें संकटच आहे. ऋषीपर्वत गकारनामकाचे हातास लागला तरी त्याचें पारडें भारी झालें असा ही प्रकार आहे. या उपरी गमाजीबावा आपले प्रांतीं राहतील किंवा [मोंगलाच्या लष्करांत] येतील हें लिहिणें. चिरंजीव नीलकंठरायाचे लखोटे दोन पाठविले आहेत. बहुत काय लिहिणें. कुरुंदवाडाकडील पत्र अलीकडे आलें नाहीं. हे आशीर्वाद.

पै॥ छ० २० जिल्काद.

नं० २९९

[३१ मे.]

त्रिंबक विश्वनाथ पेठे यांचें गोपाळरावास

अधिक ज्येष्ठ व॥ ९ चें पत्र—

" पुणें व किवळें येथील सर्व गुंता उरकला. या उपर एक गंगा-

---

१ रुसलेले. २ सखारामबापूनें. ३ प्रतिनिधीचें पद नारो शंकराकडून काढून पुनः भवानरावास द्यावें लागेल. ४ सातारचा किल्ला गमाजी बावाचे हातीं गेला तर. ५ आमच्या जिनगीची नासधूस झाली.

तीरचे घराची आशा. (आमची) नाशिकीं हवेली व नाशकापासून पश्चिमेस आमचा इनाम गांव जगदीशपुर येथें दरोबस्त जिंदगी राहिली आहे. आम्हीं असें ऐकितों कीं, नबाबाकडून नाशिक प्रांतीं फौज जाणार. कोणी म्हणतात कीं, जानोजी भोंसले यां कडील करांडांच जाणार. तेव्हां अगोदरच (त्यास) संवय सर्व लुटण्याची! या करितां 'त्या स्थलांचे संरक्षण वस्तवानी सुद्धां होय ऐसें अगत्य करावें,' ऐसें लिहिलें होतें; त्याचें उत्तर 'होईल तें करूं' असें उदासपणाचें आलें, त्यास आमचा ओळखी अथवा स्नेही दुसरा कोणी आहे कीं काय? कोणी जाऊ परंतु विठ्ठल सुंदर यांस सांगोन जो जाईल त्यास अगत्य रक्षण करण्या विषयीं निरवणूक असावी."

नं० २९६

[४ जून.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत अधिक वद्य सप्तमी मंदवासर यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुम्हीं बुधवार चतुर्थीचीं पत्रें पाठविलीं तीं काली शुक्रवारीं षष्ठीस अस्तमानीं पावलीं. लिहिलें वर्तमान विदित झालें. गोविंद शिवराम यांचें पत्र आलें त्याचें वर्तमान व विसाजीपंताचें पत्र आलें त्याचें वर्तमान लिहिलेंच आहे. हल्लीं काली विसाजी पंताचें पत्र आलें तेंच पाठविलें आहे. त्याजकडे आजी प्रत्योत्तर रवाना केलें. त्यांत एकच मजकूर जे, " तुम्हां खेरीज नाहीं. अंतःकरणा पासून जें तुमचें मनोगत तेंच प्रमाण. परंतु तूर्त लढाईचा प्रसंग. श्रीमंत मोंगलावरी चालिले, आणि उठोन येणें युक्त नव्हे. निरोप मागून मर्जी रक्षून

१ रघोजी करांडा हा भोंसल्यांचा सरदार. २ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ३ आज पर्यंत आपण मोंगलाच्या आश्रयास राहिलों. त्यानें ही आमच्या संकटकाळीं थोर मनानें आम्हांस पदरीं घेतलें. आतां त्याची व पेशव्यांची लढाई होणार. या वेळीं त्यास सोडून पेशव्यांकडे यावें किंवा घरीं जाऊन बसावें हें वाईट.

येतील. " (असें आम्हीं लिहिलें आहे.) वरकड तुम्हीं कितेक पर्याय लिहिले त्या अन्वयें आम्हीं खोलून लिहिलें. संशय ठेविला नाहीं. " यावया मास पक्ष लागेल तर ये विशीं क्षमा करावी. अतःपर वारंवार यत्रें न पाठवावीं चतुष्टय (?) न करावें " असें लिहिलें. पदरींचे लोक घरास गेले. चार आहेत त्यांस पोटास नाहीं. युद्धप्रसंगीं कर्ज ही मिळणार नाहीं. चार आहेत ते निघोन जातील. तेव्हां एकले न राहून परिणाम काय ? किरकोळ मंडळी सारी लावून द्यावी. राहणें तरी खासे दोवेजण रहावें. अगर सारेंच निरोप झालिया यावें हे लक्ष गोष्टींची गोष्ट. नबाब आजी सर्व प्रकारें बलिष्ट. त्याशीं झुजावयाचा प्रकार [श्रीमंतानीं] योजिला हा अनुचित. त्याणीं काय पाहिलें न कळे ! किंवा होणार बलिवंत न कळे ! आम्हीं ही उमजेसें त्या[1] गृहस्थांस लिहिलें. सांगोत वा[2] न सांगोत. तुम्हीं बहुत सावधपणें राहणें. इकडे पर्जन्य इतके दिवस नव्हता. सोमवारीं द्वितीयेस पर्जन्य प्रहरभर पडला. त्या उपरी बुधवारीं दोन घटका बराच पडला. नदीस पाणी चार दिवस आलें होतें. मागती उतरलें. असा प्रकार आहे. मोरो बापूजीनें आठ दिवसांत पांच सहा स्वाऱ्या केल्या. दहा बारा गांवचीं गुरें नेलीं. बैल मार्गींचे नेले. मोठे [3]थोरले माणूस झाले ! काय करावें ! दीर्घ दृष्टीनें पाहून उगेच आहों. गकार यास लिहिलें आहे. तुम्हीं बहुत सावधपणें असणें. अहोरात्र दुसरी चिंता नाहीं. चिरंजीव दाजीस पाठवीत नाहीं. समीप पंचक्रोशींत होणें तें होऊ. कळलें पाहिजे. आठ रोजां एक पत्र पाठवीत जाणें. ये विशीं आळस न करणें. आम्हीं काय लिहावें ! तेथें कळेल तसें करून वर्तावें. निरोप जाहला तर उत्तमच आहे. नाहीं तर खर्चाचें परम संकट आहे. काय कराल ! यंदांचा प्रसंग तुम्हांवरी भारीच पडला. बरें ! चिंता न करणें. श्री सर्व मनोरथ सिद्धीस नेईल. वारंवार काय लिहावें ! होईल वर्तमान तें लिहिणें. आम्हीं गुंता ठेऊन उत्तर लिहीत नाहीं. कळलें पाहिजे. हे

---

१ गोविंद शिवराम व विसाजीपंत यांस. २ अथवा. ३ ही उपहासोक्ति.

आशीर्वाद. गणवास खर्चास देतों. ठेऊन घेतला आहे. चासेचें पत्र मुजरद माणूस घेऊन आला होता. उत्तर देऊन लाऊन दिला. पत्र पाठविलें आहे. बहुत काय लिहिणें. शिदोजी जासुदानें लबाडी केली. त्याचें पारिपत्य करावयाचें होतें. येथें आला ह्मणजे आम्हीं करितों. धिकारनामकाचें पत्र पाठविलें आहे त्यावरून कळेल. तुम्हीं निखालसता समजोन लिहिलें त्यावरून आम्हीं ही निखालसपणें लिहून पाठविलें. 'त्या उभयतांस ही वर्तमान श्रुत करणें. तेच आमचे दरम्यान. दुसरे नलगेत.' ह्मणोन लिहिलें. कळलें पाहिजे. हे आशीर्वाद. पत्रें जतन ठेवावीं अगर फाडून टाकीत जावीं. गबाळपणें गमावतील. हे आशीर्वाद. लक्ष्मेश्वरचीं पत्रें पाठविलीं आहेत. हे आशीर्वाद.

चिरंजीव मंडळीस आशीर्वाद. पर्जन्य अतिशय ह्मणोन लिहिलें तें कळलें. अद्यापि तुम्हांस निरोप नैव्हे. कसा भोग भोगावयाचा आहे तो न कळे! तीर्थरुपांस ज्वर येत होता. प्रस्तुत येत नाहीं. चिंता न करणें. कुरूंदवाडचें पत्र आलें. तिकडे पर्जन्य नाहीं. गमाजी बावा कऱ्हाडास गेला ह्मणोन वर्तमान आहे. कळलें पाहिजे. हे आशीर्वाद. बहुत सावधपणें राहणें. हे आशीर्वाद.

नं० २९७

[अधिक ज्येष्ठ वद्य नवमी
९ जून.]

श्री.

तीर्थस्वरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें रघुनाथानें कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ० २२ जिल्काद पावेतों यथास्थित असे. विशेष. या नंतर आपलेकडून आशीर्वाद पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं, तरी

१ विसाजीपंताचें. २ विंचूरकर व नारो शंकर यांस. ३ होत नाहीं. ४ त्रिंबक हरीस. ५ पत्र रघुनाथराव दादासाहेबांचें गोपिकाबाईस.

सविस्तर लेहून पाठवावें. इकडील वर्तमान तरी भागानगराहून दरकूच कृष्णातीरीस आलों. या उपरी येथून निजामअल्ली खानावरी चालोन जाऊन गांठ घालितों. वडिलांचे आशीर्वादें यवनाचें परिपत्य यथास्थित होऊन येईल. वरकड वर्तमान नारो आपाजी यांस लिहिलें आहे त्यावरून कळेल. वडिलांचे आशीर्वादें करून व पुण्येंकरून यवनाचें शासन उत्तम करितों. यवनानें पुण्यास उपद्रव केला हें ऐकून बहुत क्रोध वाटला आहे. तो उपद्रव करणार नाहींसें वाटत होतें, यास्तव आम्हीं भागानगर न जाळिलें. आतां त्याणें तालच टाकिला, देउळें जाळिलीं, हें ऐकून बहुत विषाद जाहला. आतां परमेश्वराचें स्मरण करून लढाई उत्तम करितों. वडिलांची दया कृपा मात्र पूर्ण असावी. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

पै॥ छ० जिल्हेज.

नं० २९८

[७ जून]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी येथील वर्तमान तागयत (अधिक) ज्येष्ठ वद्य एकादशी भौमवार यथास्थित असे विशेष. राजापुराहून कूच झालें ते दिवशीं तुम्हीं पत्रें रवाना केलीं तीं काल दोन प्रहरां सोमवारीं चौथे दिवशीं पावलीं. लिहिलें वर्तमान विस्तार कळलें. श्रीमंत भागानगर प्रांतीं होते तिकडून पंचमहालाकडे झाले. घालगनुरापाशीं भीमापार होणार, ह्मणोन वर्तमान आहे. बाबूजी नाईक व रामचंद्र गणेश, हरी गोपाळ असे कोडलवाडीकडे होते ते पांच सात हजार फौजेसह तुळजापुराकडे आले आहेत. त्यांस

---

१ रायचूर दुआबाचे बाजूस. २ ज्यांकडे पुणें शहराचा बंदोबस्त राखण्याचें काम होतें ते नारो आपाजी तुळशीबागवाले. ३ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ४ राजापूर हें पुणें प्रांतीं घोडनदीतीरीं आहे. ५ पंचमहाल मोंगलाईंत गुलबर्गे जिल्ह्यांत.

आम्हीं खातरेस आणीत नाहीं. करकंबचे लोक लष्करांत आहेत त्यांणीं पत्रें पाठवून घाबरें केलें. आधींच रयत हरामजादी. त्यामध्यें निमित्य झालें. चौंकडे चौघे गेले. अगदीं वसुलाचें काम बंद झालें; ऐशास तुम्हीं निरोप घेतलाच असेल, तरी त्यांचे मागें यावें. तुम्हीं दोन हजार आलां तरी दहा पांच हजारांची आवई पडेल. दोन दिवस गुंता असेल तरी एखादा इभ्रतीचा माणूस कांहीं लोक देऊन करकंबेस पाठवणें. बहिरोपंतीं हिम्मत बरी धरिली आहे. [त्याजवळ] प्यादे, लोक, सामान, आहे. बाबूजी नाईक वगैरे यांस तो खातरेस आणीत नाहीं. तथापि सूचना लिहिली आहे. त्वरेस मोल आहे. लष्कर अनिवार. निंबाळकरांच्या मुलुखांत आवडाव केली. ते ही जमा झाले आहेत. पाडापाड करितात. नळदुर्गींहून वडिलांस आणावयाचा मजकूर लिहिला तो आमच्या ध्यानास आला. परंतु तूर्त नाईक समीप आले. त्याणीं कृष्ण केलें ह्मणजे आणवूं: श्रीमंत येतील तेव्हां सारे एक जागां झालों ह्मणजे चिंता नाहीं. जें भवितव्य असेल तदनुसार घडेल. करकंब फुटलियामुळें अवसान खत्ता. बहिरोपंताकडून खर्चास येत होतें तें बंद झालें. संकट प्राप्त झालें. श्रीभगवान् समर्थ. चिंता नाहीं. तुम्हीं काळजी आमची न करणें. रसायेन राखोन निरोप घेऊन करकंबेसच येणें. येथेंच रहावयाचा डौल पाडावा, ह्मणजे लोक जमा होतील. मुख्य पोटास मिळालें पाहिजे. दिवस कठिण दिसतात. पुढें हेच दिवस राहतात असा अर्थ नाहीं. कुरुंदवाडकर लांब. तुम्हीं लिहिल्या प्रमाणें सूचना लिहिली. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद. वधू व पाटणकर (व) त्यांची मंडळी कोकणांत रविवारीं गेली.

---

१ बाबूजी नाइकाच्या लष्करांत करकंबचे लोक चाकरीस आहेत त्यानीं घरीं पत्रें पाठवून धास्ती घातली कीं, हें लष्कर करकंबेकडे येत आहे. २ करकंबेवरून. ३ हा करकंबचा ठाणेदार. ४ निंबाळकरांच्या मुलखांत बाबूजी नाईक वगैरे सरदारानीं आवाडाव मांडिली या करितां त्यानीं ही फौज जमवून त्यांच्या लष्करच्या कहीचीं उंटें, तट्टें वगैरे हिरावून घेतलीं. ५ दोघा वडील बंधूंस. ६ करकंबचे लोक चहूंकडे पळून गेले यामुळें आमचा धीर खचला. ७ मोंगलाशीं प्रेम राखून.

वर्गणीची पोंच.

सन १८९७ । ९८

(ता. २० एप्रिल पासून २२ मे पर्यंत.)

	रु०
रा. रा. माधवराव सदाशिव दिवे. बडोदें.	३
” ” सदाशिव रामचंद्र ओझे. मु० पळस्पें. ता० पनवेल.	३
” ” भगवानदास दामोदर शेट. हुबळी.	३
” ” पुरुषोत्तम नारायण दातार. झांशी.	३

१८९८ । ९९ सालची.

रा. रा. सदाशिव रामचंद्र ओझे. मु० पळस्पें. ता० पनवेल.	३
श्री. रा. अण्णासाहेब कुरुंदवाडकर. कुरुंदवाड.	३
रा. रा. विष्णुपंत पटवर्धन वैद्य. मिरज.	२८१०

ऐ० ले० संग्रह–कर्ते.

सूचना

आम्हीं केलेल्या पुस्तकां पैकीं:—

१ यशवंतराय महाकाव्य (सर्ग २४ श्लोक संख्या १७२९) किंमत १ रुपया.

२ फुटकळ चुटके. (कविता) किंमत ८४.

३ समुद्र काव्य किंमत ८३.

४ गुणोत्कर्ष नाटक. [तिसरी आवृत्ति] किंमत ८८.

ऐ० ले० संग्रहापैकीं निराळीं प्रकरणें *

मिरज प्रकरण–[मिरजेचा वेढा व तत्संबंधीं युद्ध] या हकिगतीचीं पत्रें ऐ० ले० संग्रहाच्या पांच, सहा व सात या अंकांत आलीं आहेत त्यांचें हें निराळें पुस्तक. किंमत ८१२.

मोंगलाशीं लढाई. किंमत ८३.

किंमत रोख. ट० हां० माफ. व्ही. पी. नें मागविल्यास ही पाठविण्यांत येतील.

ऐ० ले० संग्रह–कर्ते.

---

* ऐ० ले० संग्रहाच्या वर्गणीदारांस हीं पुस्तकें निम्मे किंमतीस मिळतील.

ऐतिहासिक-लेख-संग्रह.

मासिक पुस्तक.

जुलई. १८९८ इ०.

अंक १४

वासुदेव वामन शास्त्री खरे

मिरज हायस्कुलांतील संस्कृत शिक्षक.

यांनीं

कुरुंदवाड येथें

" भाऊनाना " छापखान्यांत छापविलें.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हांशीलसह तीन रुपये.

फुटकळ अंकास पांच आणे.

ऐतिहासिक-लेख-संग्रह.

अंक चवदावा

नं० २९९

[८ जून.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत [अधिक] ज्येष्ठ कृष्ण द्वादशी सौम्यवासर. यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुम्हीं मंदवारचें पत्र पिशाच्या पिंपळगांवींहून कूच जालें ते दिवशीं रवाना केलें तें काली भौमवासरीं प्रविष्ट झालें. लोकांची रवानगी फार करून झाली. उत्तम जहालें. श्रीमंत पंचमहालाकडे गेले ह्मणोन इकडे आवई फार आहे. ‘ बाबूजी नाईक तुळजापुरा अलीकडे आले. कबूच्या डोहावरी मुकाम ’ ह्मणून बोली आहे. ‘ करकंबेकडे येतों ’ ह्मणून बोली लष्करचे लोक आपलाल्या घरास लिहितात, त्यावरून खेडीं तमाम वोस झालीं. तूर्त पैट्टी बंद झाली. सर्व ही प्रकार अशा प्रसंगींच अनकूल होतात ! काय करावें ! ‘ लोकांस निरोप कार्याकारण द्यावा ’ ह्मणोन लिहिलें, त्यास श्रीमंत येथें येणार हे बोली असतां लोकांस निरोप दिल्यानें एक प्रकार दिसेल. श्रीमंत आम्हांवरच येतात असा अर्थ नाहीं. या प्रांतांत येतात. यास्तव आहे जैंथ तो मोडतां नये. सर्व प्रकारें लज्जारक्षक श्रीभगवान् समर्थ आहे. तूर्त माध्यानकालाचें संकट. आजीं पंधरा दिवस रोजमरा देऊन अद्याप दुसरे रोजमऱ्यास ठिकाण नाहीं, हे अवस्था आहे. नलदुर्गास पत्र लिहिलें आहे कीं, ‘ नाईक उजवे डावे झाले ह्मणजे आपण निघावयाचें करावें. राऊत पाठवितों. ’ ह्मणून लिहिलें आहे. उत्तर आलें ह्मणजे स्वार पाठवूं. तुम्हीं नबाबाचा निरोप घेऊन निघालां असाल अगर निघाल तेव्हां पुढें पत्र पाठवणें. आधीं करकंबेस यावें. सर्व प्रकारें श्री कल्याणच करील.

---

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ मोंगलाचें कूच झालें त्या दिवशीं. ३ सरकारी देणें. ४ चमत्कारिक. ५ जमाव.

चिंता कोठवरी करावी! चिरंजीव मेघश्यामरायाकडील पत्रें पाठविलीं आहेत त्यावरून (तिकडील हकिगत) कळेल. बहुत काय लिहिलें. 'नबाबाचें पत्र व राजे बहादर यांचें राजवाडे यां विशीं पाठविलें आहे' ह्मणून तुम्हीं लिहिलें, परंतु (तें) तेथेंच राहिलें. रवाना झालें नाहीं. हे आशीर्वाद.

समस्त चिरंजीव मंडळीस आशीर्वाद. चिरंजीव भास्करपंत यांस आशीर्वाद.

नं० ३००

(९ जून.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[2] उपरी. येथील कुशल तागायत अधिक वद्य द्वादशी, उपासाची एकादशी, गुरुवार, यथास्थित असे विशेष. तुम्हीं छ० २१ तरखेचें पत्र दावलजी जासूद याजबरोबर पाठविलें तें काली बुधवारीं अस्तमानीं पावलें. विस्तारें लिहिलें तें कळलें. नर्‍हो[3] नामक पोंक्षे तुम्हांजवळ पावले असतील. शिऊभट[4] पाठविले ह्मणोन लिहिलें, उत्तम केलें. पाठवावयाचें काम नव्हतें. बोभाट होणार. असो. आम्हीं वरचेवर पत्रें लिहीतच गेलों (तीं तुम्हांस) पावतच गेलीं. आपलीं ही पत्रें पावतच आहेत. श्रीमंतांचे लष्करचे हाल कागदीं लिहावेसे नाहीं. ते केंमळ[5] घोड्यांस चारतात,

---

१ राजवाडे रेवतगांवकर जे मीर आवस यानें धरून नेले होते ते. २ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ३ नारोपंत पोंक्षे (एक कारकून.) ४ हे शिउभट ह्मणजे शिवाजी बावाजी म्हैसकर! ५ वैरण मिळेनाशी झाली ह्मणून श्रीमंतांच्या लष्करच्या घोड्यांस घरांवरील कुजक्या नासक्या पेंढ्यावर व गवतावर गुदरान करावी लागली! म्हैसूरच्या स्वाऱ्यांतून याच रीतीनें घोड्यांची उपजीविका अनेक प्रसंगीं झाल्याचे उल्लेख आमच्या पुस्तकांत पुढें वारंवार येतील व त्या वरून मराठे स्वारांचीं

दाणा महाग, लोकांस रोजमरा नाहीं, ऐसें असोन नाहक खराब होत आहेत! नबाबाशीं झुजावयाचे दिवसच नव्हेत. कोण्या भरंवशावरी राहिले न कळे! बसालतजंग यास लाख [रुपये श्रीमंतानीं] देऊं केले त्याची गति कोणे प्रकारची आहे ती ऐकिलीच असेल! तुम्हीं लिहिलें कीं, 'आपण श्रीमंतांचा यांचा[1] तह अगर मोकाबिला[2] होऊन निकाल होय तो पर्यंत निरोप घेत नाहीं. श्रीमंत एकीकडे जातील. मग निरोप घेऊन येऊं.' खर्चाची अडचण लिहिली ती कळली. काय करावें! आधींच [आम्हीं] कर्जदार. त्यामध्यें हा कसाला[3]! नबाबाची सोबत. पैसा प्राप्त नाहीं. तरी तुम्हीं फारच केली. तैवाई[4] सोसून राहिलां. आजन्मांत लोकांचे दंगे[5] तुम्हांस ठाऊक नाहींत ते पुर्ते अनुभवास आले! इतकें असोन पुढें ठावठिकाणी नाहीं. बरें! ते गोष्टीची फिकीर काय! धन्याची एकनिष्ठेनें सेवा केली आहे तरी श्रीभगवान् हर कोठें देईल. स्थल तिसरें (?) नाहीं. श्रीमंत तह करिते तरी बरें होतें. न करीत तह तरी निघोन जावें (ते ही जात नाहींत!) सखारामपंताचा मनोरथ पुणें दग्ध होऊन तेथील गृहस्थ देशधडी व्हावे तो संकल्प सिद्धीस गेला. आतां तह करील! श्रीमंतांची दौलत लयास जावी तितका उपाय त्या गृहस्थानें केला. आम्हांस असें वाटत नव्हतें कीं श्रीमंतांचे चरणाचा वियोग होईल. तो ही त्याणें घडविला. त्याजवरी काय बोल! आपलेंच प्रारब्ध फिरलें! राजे बहादर यांस याच समयीं जीवावरील अपमृत्यु चुकला. शाबूत असते

हीं माणदेश, नीरथडी, भिंवरथडी, वऱ्हाड या महाराष्ट्राच्या भागांत उत्पन्न झालेलीं घोडीं आपल्या मालकां प्रमाणेंच कशीं बळकट व हालकष्टांस न जुमानणारीं होतीं हें कळेल.

१ नबाबाचा. २ गांठ, लढाई. ३ कष्ट, संकट. ४ विपत्ति. ५ पगार न मिळाल्यामुळें फौजेंतील लोकानीं केलेले दंगे.

तरी मागेंच विल्हे लागलें असतें. चिरंजीवास पाठवावयाचा मजकूर तसाच जाहला तरी पाठवूं, नाहीं तर प्रयोजन नाहीं. तीर्थरूप व कुटुंबें नलदुर्गी श्रमी होतात. नबाब स्थल देतील ह्मणोन आस्था होती, त्यास तें ही प्राप्त नाहीं. त्याणीं तरी कोठून द्यावें? चारी स्थलें चौघांकडे गुंतलीं. श्रीपंढरीनाथ समर्थ ह्मणोन हे दिवस पाहिले. नाहीं तर उभें रहावया स्थल नव्हतें. पुढें ही तोच सर्व प्रकारें निभावणी करील. त्याच्या चरणारविंदीं निष्ठा असावी. गोवर्धनदास[2] व विश्वंभर दीक्षित यांचा मजकूर कळलाच आहे. मुख्य ते शुभचिंतक आहेत, जे गोष्टीनें (आमचें) कल्याण तितका उपाय कारितील. अंतर करणार नाहींत. ' गनीम[3] एकीकडे गेले ह्मणजे नबाब आपल्या ठिकाणास[4] जातील. भोसले ही जातील. वरकड सरदारांस ही निरोप देतील. ' ह्मणोन लिहिलें, तें प्रमाणच आहे. कधीं चांडाळ जातील न कळे! जवळी श्रीक्षेत्रें[5], परंतु श्रीचें दर्शन नाहीं! यात्रा[6] ही समीप आली त्यांत ही जाणें होत नाहीं. यात्रा उलगडलियावरी मग जाऊन दर्शन घेऊं. येथील खर्चाची ओढी लिहावी तर तुमची ऐकोनच श्रम. ' बारगिरांनीं[7] तकुबासाठीं अडविलें ' ह्मणोन लिहिलें, तरी त्याणींच कां चुकावें! बाबूराव सलगर याणीं बापास लि-

---

१ लढाई किंवा तह याचा निकाल झाला असता. २ हे कोण? पेशव्यांच्या दरबारीं पटवर्धनांविषयीं रदबदली करणारे कोणी असावेसें वाटतें. ३ मराठ्यांस मोंगल ' गनीम ' ह्मणत असत तें ठीकच, परंतु गोविंद हरि ही तसेंच ह्मणतो हें कास? ४ भागानगरास. ५ पंढरपुर. ६ यात्रा आषाढीची. ७ बारगीर काय शिलेदार काय, त्यांचें वेतन वार्षिक जें ठरलें असेल त्याचा तिसरा हिस्सा व पुष्कळ वेळां निम्मे रक्कम त्यांस आगाऊ देण्यांत येत असे. तिला नालबंदी ह्मणत. बाकीची रक्कम पावसाळा सुरू होण्याच्या सुमारास लष्करें आपल्या मुलखांत परत आलीं ह्मणजे ज्याची त्यास मिळत असे. हिलाच ' तकुबाचा ऐवज ' असें नांव असे. ' तकुबाचा ' ह्मजजे तहकूब केलेला, अडकवून ठेविलेला, असा अर्थ होय.

हिलें होतें कीं, " आपण कांहीं सेडगियाच्या कजियांत नव्हतों. त्याणीं बलाविलें तेव्हां गेलों. हत्तीस जमा न जाहला [?] तिघा गृहस्थांनीं रायापाशीं सांगितलें कीं, ' या खेळांत बाबूराव होता. ' त्यांचीं नांवें लिहीत नाहीं. पुढें परिणामीं कळेल. आपण दरबारास जात नाहीं. प्रस्तुत मर्जी एक प्रकारची आहे. वडील आज्ञा करतील त्या प्रमाणें वर्तू. " ह्मणोन लिहिलें होतें. नरसिंगरायानीं ही लिहिलें होतें कीं, " आपण येथें आहों. रायाची मर्जी एक प्रकारची. आपणावरी खट्टे आहेत. परंतु तुम्हीं वडील बोल लावाल या करितां राहिलों. हे ठिकाणास आलिया उपरी मग जें सांगाल त्या प्रमाणें वर्तों. " अशीं पत्रें देहुरास (?) आलीं तीं माणूस घेऊन येथें आला. तीं अकस्मात् हातास आलीं तीं वाचलीं त्यावरून कळलें तें लिहिलें आहे. राजे बहादर (आम्हांवर) फारशी माया करितात ' ह्मणोन लिहिलें, तरी ते थोरच आहेत. त्यांची आस्थाच फार तुमचे ठायीं आहे. ' जाहगीर लाऊन देतों' म्हणतात, त्यांस कोणे गोष्टेचें अशक्य आहे ? आपल्या ठिकाणास जातील, आपला बंदोवस्त पाहतील, बाजदबरसाद सर्व ही युक्तीनें करून देतील. तुम्हीं दम धरणें. त्या दरबारीं (कोणची ही गोष्ट) होणेंचें कठीण. (एकदां) जाहलिया वरी मग कांहीं गुंता नाहीं. " श्रीमंत ईश्वतीनेंच निघोन जातात. आवशास पोंहचलियावर भारी सामान टाकून [आम्हीं] सडे होणार " ह्मणोन लिहिलें तें यथार्थच आहे. (श्रीमंतांस) बसालतजंगाचा भर फार आहे. अखेर त्यास ही तळावर टाकून जातात कीं काय न कळे ! समीप नवाब गेलियावरी त्यांच्यानें दम धरवत नाहीं. लक्ष्मेश्वराहून चिरंजीव बापू कुरुंदवाडास पावले. त्यांचें पत्र आलें तेंच बजिन्नस पाठविलें आहे.

१ सेडगे हें कोणा शिलेदाराचें आडनांव. २ गोपाळरावापाशीं. ३ चमत्कारिक. ४ हा कोण हें कळत नाहीं. ५ रुसलेले. ६ अतिशय. ७ पावसाळ्या नंतर, पुढील वर्षीं. ८ आपला आब राखून, लढाईच्या भरीस न पडतां. ९ आवसें हें शहर व किल्ला मोंगलाईंत आहे. १० मेघश्यामराव कृष्ण मंगळवेढेकर.

स्थलें ठेऊन खर्चा खालीं यावें लागलें. सोंपून द्यावीं, श्रीमंत आपल्या ठिकाणास जातील मग द्यावीं, असें ह्मणत होतों; परंतु ते जात नाहींत. या उपरी स्थलें जतन होणें कठीण. धण्यास ना कोणास असें होतें. काय करावें ? ये विशींचा बुद्धिवाद आज्ञा काय लिहिणें ती त्यांस लिहावी. त्या प्रमाणें वर्ततील. पाऊस फारसा नाहीं. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. आज्ञा घेऊन याल ते अक्कलकोटाकडून भेटी घेऊन घेऊन यावें. नलदुर्गींचीं आणावीं. सारीं एक जागां राहूं. चिरंजीव समस्त मंडळीस आशीर्वाद. लिहिलें परिसिजे. लोभ कीजे. हे आशीर्वाद. मग पुढें श्रीसत्ता प्रमाण. हे आशीर्वाद. जेव्हां नबाब निरोप देतील तेव्हां अक्कलकोटाकडून यावें. अगर सोय पडेल तिकडून यावें. तो मार्ग समीपच आहे. तुम्हीं न या तर चिरंजीव नीलकंठराऊ, कोन्हेरराऊ, आबा व भाऊ असे पाठवणें.

अपत्यें पुरुषोत्तमानें शिरसाष्टांग नमस्कार विनंती. आपण पत्रें पाठविलीं तीं पावलीं. वर्तमान सविस्तर तीर्थरूपांचे पत्रावरून कळेल. अलीकडे नकारनामक आलेला मजकूर कसा घडला तो लिहिला पाहिजे. वडिलीं पत्रें लिहिलीं आहेत त्यावरून कळेल. चिरंजीव बापूचीं पत्रें आपणाकडे रवाना केलीं आहेत त्यावरून कळेल. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना.

नं० ३०१

(११ जून.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत अधिक वद्य चतुर्दशी मंदवार.

१ लक्ष्मेश्वर, शिरहट्टी वगैरे कर्नाटकांतील ठाणीं. २ अक्कलकोटास गोविंद हरीची बायको (सत्यभामाबाई) होती. तिला येतां येतां बरोबर घेऊन येण्याविषयीं हें लिहिणें.

यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुम्हीं रविवारचें पत्र पाठविलें तें पावलें. त्या अलीकडे पत्र नाहीं. दुसरें रवाना केलें असलें तर पावेल. श्रीमंतांच्या लष्करचीं पत्रें वरचेवर येतात. त्यांचा निश्चय अद्याप लढाईचा लिहिला येतो. बसालतजंग यास लाख रुपयांची भरती करून दिली पुढें पंधरा दिसां दीड लाख द्यावे. (असा करार झाला आहे.) त्यास तोफांस बैल नाहींत हें ही कोडेंचें[1] आहे. धारण महाग. वैरण नाहीं. व्याजें रुपया न मिळे. असा प्रकार आहे. कोणत्या भरावरी दम धरून [श्रीमंत] राहिले न कळे! निघोन जाते तरी बरें होतें! कदाचित् नबाबानीं चेळ[2] दिल्हा, कचकरले, तर पुनः सांवर बसावयाचें कठिण! तेथील गृहस्थांनीं[3] लिहिलें होतें कीं, " पुढें भवितव्य कसें आहे न कळे. यांचा[4] भर तरी झुजावयाचा दिसतो. वांचलों तरी पुढें भेट. ईश्वराचें कर्तृत्व न कळे! प्रारब्धगतीनें यश आलें तरी येऊ!" आम्हीं लिहिलें होतें कीं, सावकाशीनें सर्व गोष्टी घडतील. तें अर्भकास[5] श्रुत केलें. तो ' बहुत उत्तम ' ह्मणोन बोलिला. सांवशीहून[6] बाबुराव जगजीवन याचें पत्र आलें तोच माणूस तुम्हांकडे पाठविला आहे. त्याजवळी पत्रें आहेत त्याजवरून कळेल. त्यास काय उत्तर देणें तें लिहून देऊन रवाना करावें. चिरंजीव बापूचें ही पत्र त्या जवळी आहे. कुरुंदवाडाकडून हा गृहस्थ आला आहे. इकडे परवां बुधवारीं पर्जन्य चार घटका बराच पडला. गुरुवारीं किंचित् पडला. काली नाहीं. नदीस[7] पाणी पुष्कळ आहे. तुम्हीं बहुत सावधपणें यावें. समागमें फौज नाहीं या करितां चिंता आहे. मुख्य गोष्ट श्रीमंत नबाबावरी चालोन येतात, आपण निरोप न मागितला, हें

---

१ मोठीच अडचण. २ हुसकून लाविलें. ३ पेशव्यांच्या लष्करांत आमचे स्नेही गोविंद शिवराम, विसाजी नारायण वगैरे आहेत त्यानीं. ४ श्रीमंतांचा. ५ अर्भक कोण? ही बळवंतराव या नांवाची संज्ञा दिसते. ६ सांवशी धारवाड जिल्ह्यांत ७ माणनदीस.

उत्तम केलें. (तुमची) खर्चाची ओढ आहे. त्याणीं कांहीं परामर्ष केला तरी उत्तम. नाहीं तरी उत्तम. वेध वारल्यावरी मग निरोप ध्यावा. रहावया स्थल पाहिजे इतका आग्रह. बरें ! श्रीपंढरीनाथाची इच्छा ! आमचा रखणवाला तो आहे. त्याचे इच्छेनें होणें तें होईल. कागलकरांत व करवीरवासी यांत कलह लागला आहे. सेनापती गुरें वळितात. आजरेंगांवचीं आणिलीं. शिऊभेट म्हैसकर आलियाचें वर्तमान लिहिणें. अहोरात्र निजध्यास लागला आहे. एक तें अरिष्ट जातें ह्मणजे प्रांत सारा सुख पावता. परंतु सबल भोग ! अद्याप कावणीचा प्रकार नाहीं. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे. हे आशीर्वाद.

नं० ३०२

(१० जून.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादे उपरी. येथील कुशल तागायत [अधिक] ज्येष्ठ वद्य चतुर्दशी भृगुवार. यथास्थित असे. विशेष. तुम्हीं राजश्री बाळाजी नरसिंह याज बरोबर भौमवारचीं पत्रें पाठविलीं तीं काली गुरुवारीं अस्तमानीं पावलीं. सविस्तर वर्तमान कळलें. श्रीमंतांचे लष्करचीं पत्रें वद्य तृतीया रविवारचीं—मोंगलगिरा भागानगरा अलीकडे दहा कोसावरी मुक्काम होता—तेथील पत्रें अकरावे दिवशीं आलीं त्यांत लिहिलें आहे जे, कोंडलूर संगमाकडे श्रीमंत चालिले. बसालतजंगाचें राजकारण करावें असें मानस आहे. मल्हारजी होळकर दोन मजली पुढें गेले होते. मागून श्रीमंत चा-

१ कापशीकर घोरपडे. या वाक्यांत गुरें वळण्याच्या उद्योगास लागलेल्या 'सेनापती' चा उपहास केला आहेसें दिसतें. २ शिवाजी बावाजी म्हैसकर. ३ श्रीमंतांच्या लष्कराचें. ४ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ५ कृष्णा व भीमा यांचा संगम रायचुरापासून आठ कोसांवर होतो त्यास हें नांव.

लिले. पुढें विजापुराकडून देशास मिरजेकडून यावें असा मनसबा आहे. बाबूजी नाईक व रामचंद्र गणेश नांदेड वसमत प्रांतें गेले होते. तिकडून इकडे आले. यांस ही तिकडे यावयाचीं पत्रें आलीं आहेत. जातील कीं नाहीं पहावें. नाईकाचे धास्तीमुळें करकंब, भोसें तमाम वोस झाले. पैका बंद झाला. तूर्त मध्यानकाळचें संकट झालें. आम्हीं मागती आजी श्रीमंतांच्या लष्करास जोडी रवाना केली. पहिली एक जोडी गेलीच आहे. तुम्हीं आपणाकडील मजकूर विस्तारें लिहिला तो कळला. ऐशास हा कालच असा आला आहे. याचा महिमा विचित्र आहे. तुम्हीं कांहीं चिंता न करणें. कोठें गेलें तरी प्रारब्ध प्रमाण. अनुकूल काल येईल तेव्हां सर्व चित्तानुसार घडेल. ये समयीं कोणावरी बोल ठेवावासा नाहीं. नबाब साहेब थोर वृक्ष. संकटकाल प्राप्त झाला ह्मणोन त्यांच्या छायेस गेलां, पुढें तुमचा अनुकूल काल येईल तेव्हां तेच मेहेरबानी करतील. कांहीं त्या गृहस्थांचें सूत्र असेल कीं, 'यांचा पाव भुईस न लागे तें करावें. वरकड तुमच्या चित्तास येईल तें करणें.' असें राजे बहादरास सुचविलें असेल तर न कळे! परंतु इतकें खरें--आपला प्रतिकूल काल या मुळें त्यांस तैशी बुद्धि होत नाहीं. लोकांस चिठ्या दिल्या त्याचा मजकूर कळला. नबाब धारूराकडे आले हे खबर आलियावरी नाईक टिकोन राहत नाहीं हें ही प्रमाणच आहे. चित्रगुप्ताकडील मजकूर कळला. उत्तम केलें त्यास देखील दुग्धा. 'नलदुर्गचीं (माणसें) तूर्त आणावयाचें न करावें' ह्मणोन लिहिलें, त्यास आम्हीं ही तसेंच लिहिलें आहे. नाईक एकीकडे गेलियावरी आणावयाची तरतूद करूं. 'चांगल्या असाम्या ठेऊन रोजमऱ्यास आट असेल त्यांस निरोप द्यावा' ह्मणोन लिहिलें, त्यास तो प्रकार केला तर कोणी राहत नाहीं. श्रीमंत कोणे रोखे

१ सखारामबापूचें विठ्ठल सुंदराकडे आंतून सूत्र असेल कीं, गोपाळराव तुह्मांकडे गेला आहे याचे पाय भुईस न लागत तें करा! २ तुह्मांस जहागीर देण्याची.

उत्तम केलें. (तुमची) खर्चाची ओढ आहे. त्याणीं कांहीं परामर्ष केला तरी उत्तम. नाहीं तरी उत्तम. वेध वारल्यावरी मग निरोप घ्यावा. रहावया स्थल पाहिजे इतका आग्रह. बरें ! श्रीपंढरीनाथाची इच्छा ! आमचा रखणवाला तो आहे. त्याचे इच्छेनें होणें तें होईल. कागलकरांत व करवीरवासी यांत कलह लागला आहे. सेनापती गुरें वळितात. आजरेंगांवचीं आणिलीं. शिऊभेट म्हैसकर आलियाचें वर्तमान लिहिणें. अहोरात्र निजध्यास लागला आहे. एक तें अरिष्ट जातें ह्मणजे प्रांत सारा सुख पावता. परंतु सबल भोग ! अद्याप लावणीचा प्रकार नाहीं. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे. हे आशीर्वाद.

नं० ३०२

(१० जून.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादे उपरी. येथील कुशल तागायत [अधिक] ज्येष्ठ वद्य चतुर्दशी भृगुवार. यथास्थित असे. विशेष. तुम्हीं राजश्री बाळाजी नरसिंह याज बरोबर भौमवारचीं पत्रें पाठविलीं तीं काली गुरुवारीं अस्तमानीं पावलीं. सविस्तर वर्तमान कळलें. श्रीमंतांचे लष्करचीं पत्रें वद्य तृतीया रविवारचीं—मोंगलगिरा भागानगरा अलीकडे दहा कोसावरी मुक्काम होता—तेथील पत्रें अकरावे दिवशीं आलीं त्यांत लिहिलें आहे जे, कोंडलूर संगमाकडे श्रीमंत चालिले. बसालतजंगाचें राजकारण करावें असें मानस आहे. मल्हारजी होळकर दोन मजली पुढें गेले होते. मागून श्रीमंत चा-

१ कापशीकर घोरपडे. या वाक्यांत गुरें वळण्याच्या उद्योगास लागलेल्या 'सेनापती' चा उपहास केला आहेसें दिसतें. २ शिवाजी बावाजी म्हैसकर. ३ श्रीमंतांच्या लष्कराचें. ४ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ५ कृष्णा व भीमा यांचा संगम रायचुरापासून आठ कोसांवर होतो त्यास हें नांव.

लिले. पुढें विजापुराकडून देशास मिरजेकडून यावें असा मनसबा आहे. बाबूजी नाईक व रामचंद्र गणेश नांदेड वसमत प्रांतें गेले होते. तिकडून इकडे आले. यांस ही तिकडे यावयाचीं पत्रें आलीं आहेत. जातील कीं नाहीं पहावें. नाईकाचे धास्तीमुळें करकंब, भोसें तमाम वोस झाले. पैका बंद झाला. तूर्त मध्यानकाळचें संकट झालें. आम्हीं मागती आजी श्रीमंतांच्या लष्करास जोडी रवाना केली. पहिली एक जोडी गेलीच आहे. तुम्हीं आपणाकडील मजकूर विस्तारें लिहिला तो कळला. ऐशास हा कालच असा आला आहे. याचा महिमा विचित्र आहे. तुम्हीं कांहीं चिंता न करणें. कोठें गेलें तरी प्रारब्ध प्रमाण. अनुकूल काल येईल तेव्हां सर्व चित्तानुसार घडेल. ये समयीं कोणावरी बोल ठेवावासा नाहीं. नबाब साहेब थोर वृक्ष. संकटकाल प्राप्त झाला ह्मणोन त्यांच्या छायेस गेलां, पुढें तुमचा अनुकूल काल येईल तेव्हां तेच मेहेरबानी करतील. कांहीं त्या गृहस्थांचें सूत्र असेल कीं, 'यांचा पाव भुईस न लागे तें करावें. वरकड तुमच्या चित्तास येईल तें करणें.' असें राजे बहादरास सुचविलें असेल तर न कळे! परंतु इतकें खरें—आपला प्रतिकूल काल या मुळें त्यांस तेशी बुद्धि होत नाहीं. लोकांस चिठ्या दिल्या त्याचा मजकूर कळला. नबाब धारूराकडे आले हे खबर आलियावरी नाईक टिकोन राहत नाहीं हें ही प्रमाणच आहे. चित्रगुप्ताकडील मजकूर कळला. उत्तम केलें त्यास देखील दुग्धा. 'नलदुर्गचीं (माणसें) तूर्त आणावयाचें न करावें' ह्मणोन लिहिलें, त्यास आम्हीं ही तसेंच लिहिलें आहे. नाईक एकीकडे गेलियावरी आणावयाची तरतूद करूं. 'चांगल्या असाम्या ठेऊन रोजमऱ्यास आट असेल त्यांस निरोप द्यावा' ह्मणोन लिहिलें, त्यास तो प्रकार केला तर कोणी राहत नाहीं. श्रीमंत कोणे रोखे

१ सखारामबापूचें विठ्ठल सुंदराकडे आंतून सूत्र असेल कीं, गोपाळराव तुझांकडे गेला आहे याचे पाय भुईस न लागत तें करा! २ तुझांस जहागीर देण्याची.

जातात हें कळतें, तदनुसार करावयास येईल. तुम्हीं चिरंजीव दाजीस पत्र लिहिलें तें पाहिलें. ऐशास समयाचा गुण. तुम्हांस कधीं असें ठावकें नाहीं. घाबरे व्हाल तर न होणें. पुराणें ऐकतां, पांडवादिकांच्या गति काय झाल्या ? अलीकडे मोठे मोठे सरदार सरकारकून यांजवरी कसे कसे प्रसंग गुदरले ? तरी धैर्यें करून तितके ही सोसून त्याणीं काल घालविला. तसा प्रसंग तुम्हांवरी नाहीं. तथापि संतोष मानून असावें. जे समयीं जें होणार तें होतच आहे. एक गोष्टी खरी. सखारामाचा मनोरथ जसा होता तसा सिद्धीस गेला. पुणें शहर जाळावें, ज्ञाती देशांतरास जावी, (हा त्याचा मनोदय.) त्रिवर्गांस देशांतून बाहेर घातलें, नवे फडणीस मुजुमदार केले, जें जें कर्म करणें तें त्याचें मात्र सिद्धीस गेलें ! तस्मात् त्याची तपश्चर्या विशेष ! श्रीमंतांची दौलत लयास नेऊन इतकें केलें तरी त्यासीं आजन्मांत दैव अनुकूल तदनुसार जालें. बहुत करून तुम्हीं निरोप घेतला असेल. नसला तर कार्याकारण जात्रें. सारी मंडळी समागमें न्यावयास कारण काय ? आमचे मतें तुम्हीं व चिरंजीव नारायणरायानीं जावें. वरकडांस लाऊन द्यावें. बरें. जें तुमचे युक्तीस आलें तें उत्तम. सोमवारचें पत्र वळुज देगांवचे मुक्कामचें आजी भृगुवारीं दोन तास दिवसास पावलें. त्यांतील अर्थ कळला. त्याणें फारच चिंतार्णवीं पडलों. त्या मागून मंगळवारचें पत्र अवसानाचें आहे. नाना प्रकारचीं भाषणें करून भय प्रदर्शन करून——अनायासें गेले तरी त्याचें निमित्य त्यावरी——अशी काल्हेबुद्धीची गोष्ट करीत असतील ! असो. आपला काल प्रतिकूल, तेव्हां सर्व ही वाईट दिसतें हें प्रमाणच. वर्तणूक ही त्याच

१ हें वाक्य लिहितानां गोविंद हरीच्या ध्यानांत बाळाजी विश्वनाथ, खंडेराव दाभाडे, पहिले बाजीराव, चिमाजीआपा इत्यादि योद्धयांचीं नांवें आलीं असतील! २ कोंकणस्थांची जात. ३ मोंगलाच्या लष्करा बरोबर जावें. ४ यावरून या सुमारास गोपाळरावाचें व विठ्ठल सुंदराचें खूब कडाक्याचें भांडण झालें असावें असें वाटतें.

प्रकारची. तेव्हां कालमहिमा खरा किंवा लटका ? चिरंजीव मंडळी रवाना केली आणि येथें आल्यास चिंता नाहीं. त्यांस पुसोन रवाना करावे अगर युक्तीस दिसेल तसें करावें. तुमचे हर एक विशीं [साह्य करण्यास] राजे खंदारकर होते ते समयीं नाहींत. सेडबास गेले कीं काय न कळे. दम धरणें. श्रीभगवान् समर्थ. नळदुर्गींहून तूर्त न आणवावे हा प्रकार, मंगळवारच्या पत्रीं लिहिला त्या प्रमाणेंच करितों. बहुत काय लिहिणें. मीर आबस याचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. त्याजकडे रवाना करितों. राजवाडे यांचें कुटुंब काली येथून अकलुजेस गेलें. वधू कोंकणांत रवाना होऊन आजी सहा रोज झाले. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

पै॥ छ० ३ जिल्हेज.

समस्त चिरंजीव मंडळीस आशीर्वाद. लिहिलें परिसिजे. तुह्मीं लिहिलें तें प्रमाण. तुम्हीं जें कर्तव्य तें युक्तीनें करावें. फलदाता ईश्वर. बुद्धीस वैर न करावें. विचारें करून संतोषें निघोन यावें. राहिल्यानें खर्च भारी. रुपयास ठिकाण नाहीं. वरकड कितेक गोष्टी होणें नाहीं. या मध्यें प्रारब्ध प्रमाण. हे आशीर्वाद.

नं० ३०३

[अजमासें अधिकज्येष्ठ वद्य
जूनचा प० पंधरवडा.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. आजी तिसरे प्रहरीं पत्रें तुह्मांकडे रवाना केलीं.

---

१ खंदारकर राजे गोपाळसिंग. २ सेडब [सेडम] हें मोंगलाईत गुलबर्गो जिल्ह्यांत.

तों श्रीमंत दादासाहेबांचें पत्र मुजरद जासूद जोडी घेऊन आली. त्या पत्रांतील अर्थ लिहावासा नाहीं. ' हरकसें करून तुम्हीं आगमन करावें ' हा मुख्य भाव. दीर्घ दृष्टीनें पाहतां परस्पर फजित पावले तरी बरें असा मजकूर! पांडु गोडबोल्याचे ही पत्रीं मुख्यांची आस्था अतिशय आहे. त्वरा करावी असा भाव. हें वर्तमान नबाबास कळल्या उपरी त्याणें ह्मणावें कीं, ' यांचें सूत्र ! ' तुम्हांवरी इतराजी केली अगर शब्द ठेविला तरी तें ही कामेंच झालें. त्या पत्राचा जाब कळेल तसा आम्हीं लेहून देऊन जोडी रवाना करितों. मुख्यांची आस्था, परंतु वरकड जे पूर्व [४]मित्र त्यांचे मतें भलतसे फजित पावले तरी कामाचे. तुम्हांस परवांच लिहिलें होतें कीं, ' तुम्हीं राजे बहादर यांस जाऊन सांगणें कीं, श्रीमंत आम्हांकडे पत्रें पाठवितात. चौंकडून राजकारण करून लोकांचीं पत्रें पाठवितात. जीवनरायाच्या पत्राची गत. यास्तव अगोदर सांगून ठेवावें. काल एक प्रकारचा आला आहे. मर्जी रक्षून निरोप घ्यावा. नव्हे तरी खर्चास परिछिन्न द्या ह्मणावें. वरचेवरी तिकडील पत्रें मनास मानेल तशीं लिहितात, तेंच पत्र एक दुसरें दाखवावें. आपल्या वरील दोष वारावा. ' हें परम संकटच तिसरें दिसतें. एक पत्र आलें, दोन आलीं, चार आलीं, नाहक नादीं लाऊन घर बुडवावयाची गोष्ट आहे ! तुम्हांस समज नसेल तरी पुतें समजणें. मनांत एक, लौकिकांत एक, श्रीमंतांच्या मतें तुम्हांस आणावें,--तेव्हां त्यास हरकसा अपाय व्हावयाचा मजकूर सांगोन परस्पर फजित पावावे असें करितात! न केलें ह्मणजे त्यांस ह्मणतील कीं,

१ सखारामबापूचा मनोदय. २ ' पटवर्धनानीं' आपणाकडे निघून यावें ही दादासाहेब व रावसाहेब पेशवे यांची फार इच्छा आहे, ' असा अभिप्राय. ३ सखारामबापूच्या मंना प्रमाणेंच झालें. ४ मित्र ह्मणजे शत्रू सखारामबापू इत्यादि ! ५ अमुक अमुक. अर्थात् गोपाळराव. ६ हें वर्णन सखारामबापूचें. ७ तुह्मीं श्रीमंतांच्या मर्जी प्रमाणें न वागलां ह्मणजे सखारामबापू पेशव्यांस सांगेल कीं, इ. इ.

' तुम्हीं माया धरितां, परंतु त्यांची[1] निष्ठा (तुमच्या ठायीं) अशी कोठें आहे ? ' असें समजावितील ! श्रीमंत सर्व प्रकारें सावध हें कळलेंच आहे. सर्व खेळ आहेत. अद्याप तरी सावध होणें. फिरोन पत्र आलें तरी जबानी सांगणें तें सांगावें, प्रत्योत्तर देखील देऊं नये, ह्मणजे त्यांस (हे) निष्ठुर [असें] कळेल. पत्रावीण प्रयोजन नाहीं. एक तरी, राज्य सोडून गेले तेथें ही पत्रें पाठवून उभयभ्रष्ट करावयाचा मजकूर आहे ! कळलें पाहिजे. आम्हीं उत्तर लेहून देतों. मग रागें भरले[3] तरी चिंता नाहीं. पहिल्यापासून रागेंच आहेत. चिंता कोठवरी करावी ! आम्हीं आजी लिहिणें तीं यथास्थित लिहिलीं आहेत. या उपरी लिहितों कीं ' जें लिहिणें तें गोविंद शिवराम यास लिहिलें आहे. चिरंजीवाचें येणें घडत नाहीं. ' ऐसें लिहितों. केवळ निष्ठुर लिहित नाहीं. परंतु विषाद आला तरी पुरवला. फिरोन पत्रें तरी लिहिणार नाहींत! तुम्हीं लिहून उत्तर द्यावयाचें न करणें. जबानी सांगणें कीं, ' आम्हीं तुमची सेवा सोडून येथें आलों. येथें आमची पाठी कां घेतली ' ऐसें सांगणें, ह्मणजे उगेच राहतील. हे आशीर्वाद. चिरंजीव मेघश्यामराऊ यांचें पत्र आजी येच समयीं आलें तें पाठविलें आहे. ते कुरुंदवाडास गेले असतील. ' गरजवंतको अक्कल नहीं ' असा प्रकार श्रीमंतांनीं, केला आहे. हे आशीर्वाद.

अपत्यें पुरुषोत्तमानें व पांडूनें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. वडिलीं श्रीमंतांकडून कोणी येईल त्यास उत्तर स्पष्ट ल्याहावें जे, आम्हांस या समयीं यावयास गांठ पडत नाहीं. या प्रमाणें साफ लिहून अथवा जबानीनें सांगून पाठवावें. घांत[4] करावयास चुकणार नाहींत. यास्तव सावध असावें. हे विज्ञापना.

---

१ पटवर्धनांची. २ हें उपरोधिक लिहिणें. ३ दादासाहेब रागें भरले तरी. ४ घात करणारे सखारामबापू वगैरे.

नं० ३०४

(अजमासें अधिक ज्येष्ठ वद्य
जूनचा प८पंधरवडा)

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीव राजश्री आबास आशीर्वाद. उपरी. तुमचें पत्र पावलें. गंगाधरराव याजकडे तूर्त कोणी जात नाहीं. माणूसच हाताखालीं नाहीं. आम्हीं श्रीमंतांच्या आगमनामुळें प्यादे ठेवावे, झुजावें, ही लटकीच तरतूद. ठिकाण चांगलें नाहीं. कोणीकडे जावें या चिंतेंत आहों. अक्कलकोटीं सारीं[2] सुखी आहेत. राजश्री अंताजी सखदेव तेथें आहेत. त्यांचें रोज पत्र येतें चिंता न करणें. आम्हीं कोण्या न्यायें वर्तावें तें लिहिणें. विचारीं पडलों आहों. हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री भाऊ यास आशीर्वाद. तुम्हांपाशीं श्रीकृपेनें जासूद आहेत. आठ दिसां एक पत्र पाठविलें तर कोणी दूषण ठेवणार नाहीं ! परंतु पत्र पाठवावयाचा दंडैक नाहीं ! तुम्हांस काय लिहावें ! नल्दुर्गास तरी पत्र पाठवीत जाणें. हे आशीर्वाद.

नं० ३०५

(अजमासें अधिक ज्येष्ठ वद्य
जूनचा प०पंधरवडा.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. आमचा संकल्प जे, या स्थलींहून न जावें. श्रीमंत

१ पत्र गोविंद हरीचें मोरो बल्लाळ यास. २ ज्यास हें पत्र लिहिलें आहे त्याची आई व बायको व मुलें यावेळीं अक्कलकोटास होतीं. ३ परशुरामभाऊ. ४ दंडक ह्मणजे वहिवाट. हाच शब्द मागें अंक ५ पृष्ठ १२९ व अंक १० पृष्ठ ३८६ येथें आला आहे तो पहा. ५ परशुरामभाऊची आई, बायको व दोघे चुलते नळ्दुर्गास होते त्यांकडे. ६ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

आले तर ह्मणावें कीं, " आम्हीं मोहळेस गेलों होतों. तुम्हीं मंगळवे-ढ्याची सनद पाठविली ह्मणून येथें आलों. आतां तुम्हीं बेइमानीस आलां तरी तुमची इच्छा! मारत्या हातें होईल तें हो! " पायगोंवा[1] आहे तो मात्र लाऊन द्यावा. त्यास कोठें लावावा हें ठीक[2] नाहीं. मोहळेकडे आपल्या विचारास त्यांच्या[3] तालुकियांत नये, यास्तव आज पावेतों तिकडे कोणी पाठविलें नाहीं. (जितका) प्यादा येतो तो ही ठेवितों. मग ईश्वर इच्छा! पहिला मनसबा होता जे तुम्हीं पाठीवर दोन मजलींचे त-फावतीनें असल्यावरी यांच्यानें[4] येऊन बसवत नाहीं. पाणी मुख्य येथें समीप लष्करास नाहीं. मुक्काम माणेवरी अगर भीमेंवरी करून येतील (तर) दोन प्रहर झुज पडलें तरी सोसावें. सहजच उठोन जातील. मागील पायबंद[5] असला तरी मुक्काम पडणार नाहीं. हा मजकूर आमचा होता. बल्के चौ मजली पाठीवरी फौज असती तरी कांहीं फिकीर नव्ह-ती. जागा केवळ नाजुक. भिंताड फार उंच नाहीं. गांवा भोंवतीं गांव-कुसूं नाहीं. गांव पाहिजे तसा भरला आहे. आवांतर खेडीं हीं कासेगांव सांगोलें येथील आलीं आहेत. बेगमपुर[6] येथें लिंगप्पा भोगोजी नाईक होता. त्याची पाळत कोणी श्रीमंतांस सांगितली कीं,— राजश्री गमाजीबावा-कडील कांहीं ऐवज सांगोल्याहून त्यांजकडे स्वारांनीं पाविला— एवंच कोणी दुष्टानीं खबर पाविली, त्यावरून तेथून दोन हजार फौज अंताजी माणकेश्वर व धोंडो दत्तात्रय वगैरे श्रीमंतांनीं धरून न्यावया पाठविले ते पांच सातशें स्वार आले शुक्रवारीं अस्तमानीं. ते दिवशीं बेगमपुरांत

---

१ पायगुंतविणारी, पळून जाण्यास अडथळा करणारी कोणची ही गोष्ट. (या स्थळीं कुटुंबाचीं मुलें माणसें.) हाच शब्द अंक ५ पृष्ठ १८१ येथें आला आहे तो पहा. २ निश्चयात्मक. ३ निंबाळकरांच्या. ४ पेशव्यांच्यानें. ५ पाठीमागें मोंग-लाचा शह असला तर. ६ बेगमपुर व माचनूर या गांवासंबंधें अंक ९ पृष्ठ ३१४। ३१५ यांतील टीपा पहा.

पंचवीस चाळीस प्यादे होते. परंतु त्यानीं यांस पेठेंत घेतलें नाहीं. बाहेरच राहविले. वाणी वणुज प्यादे मिळोन चौकी- पहारा केला. रात्रीं मध्यें दोनशें प्यादे मेळविले. गांवची बंदोबस्ती करून लिंगप्पा नाईक मंदवारीं पहांटेस बाहेर निघोन एक खेडियांत राहिला. त्यांचे मतें लिंगपा नाईकास हातीं द्यावें, नंतर आपण जावें. याणें तो असा प्रकार केला. ' गांवांत नाहीं. तुम्हीं घरोघर झाडा घ्या. ' म्हणतां ऐकेनांत. जो बोलावयास गेला त्यासच धरून मारूं लागले. माचनूरचें खेडें तामिदरडी (?) जवळी होती ते लुटून फस्त केली. शनिवारीं सारा दिवस, आदितवार तिसरा प्रहर पर्यंत पेठेजवळीच मुक्काम करून होते. गांवांतील गृहस्थ बोलीस गेला त्यासच मारूं लागले. आदितवारीं तिसरे प्रहरीं तेव्हां गांवांतील लोक सोडवावया गेले. कळ माजली. गांवकरी यानीं गोळ्या चालविल्या. दहा पांच माणूस जखमी झालें. दहा वीस जीन राहिलें. ते उठोन दोन कोसांवरी राहिले. दुसरे दिवशीं श्रीमंतांकडे गेले. त्यांचे उपरोळीयास आणखी फौज येईल, आम्हां सन्निध नाहक कजिया वाढेल, ह्मणोन चिंतार्णवीं आहों. आम्हीं माचनुराकडून देखील कांहीं उपसर्ग केला नाहीं. तूर्त अरिष्ट टळलें आहे. येईल तेव्हां खरें. मावारे फिरले अशी खबर आली ह्मणजे लाऊन देणारास देऊं. आम्हीं राहूं ह्मणतों. आम्हीं येथें दम धरून राहिलों ह्मणून या प्रांतास अगर करकंब भोसें येथें दम आहे. आम्हीं निघालियावरी स्थळें जातील. असा प्रकार आहे. लोकांस निदानीं सांगणार कीं, श्रीमंत आले. आम्हीं तो निदान पतकरून राहिलों. समाधानें राहवेल त्याणें रहावें. न पुरवे त्याणें जावें. या प्रकारें बोलणार. तूर्त बरेच आहेत. कुरुंदवाडाकडील माणूस येत जात असतें. पत्रें आलीं तीं पाठविलीं आहेत. नरसिंगराऊ व बर्वे कित्तूर

१ पेशव्यांचे लोकांच्या मतें. २ माचनूर तालुक्या पैकीं. माचनूर या वेळीं पटवर्धनांकडे होतें. ३ याचा अर्थ दहावीस स्वार मेले ! ४ मदतीस.

प्रांतीं गेले. खंडणी तेथील झाली. पुढें जावें, त्यास हैदरनाईकाचा शह भारी आहे. मनोळीस करार दोन[1] जाले. त्याचा ऐवज वसूल त्यांस[2] करावया सांगितला आहे. मोरशास्त्री[3] मनोळीस आले आहेत. आम्हीं जासूद पाठविले होते. त्याणीं आपलें तापत्रय लिहिलें. पैसा द्यावयाची चर्चा नाहीं. त्याणीं आपली अवस्था कठिण निकडीची लिहिली आहे. कळलें पाहिजे. हे आशीर्वाद.

नं० ३०६

(ज्येष्ठ शुद्ध २
१२ जून.)

श्री.

विनंती* उपरी येथील कुशल तागायत छ० १ जिल्हेज मुक्काम नजीक काडलूरसंगमें[4] जाणून स्वकीय कुशल लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. निजामअल्लीखान फौज सुद्धां देशीं[5] गेले, पुणें जाळिलें, देव फोडिले, सिंहगडचें गुंढें[6] लुटिलें. जामदारखाना, शिलेदारखाना वगैरे कारखाने खालीं ठेविले होते ते लुटिले गेले. किल्ल्याखालीं कारखाने ठेवावयासीं कारण हेंच कीं, तुम्हीं मध्यस्तीस पडोन खंडणी द्यावयाची बोली लाविली. घरें[7] राखावीं, गडाखालीं उपद्रव न लागावा, ऐसी बोली लागली सबब राहिले होते. त्यासीं तुम्हांकडे बोली लागली म्हणून आळस

१ दोन लक्ष ? रक्कम मनोळीकरांच्या सामर्थ्याच्या मानानें जबर दिसते. २ त्यास म्हणजे कोणास ? ३ हे मोरशास्त्री कोण ? यानीं गोविंद हरीचें कांहीं देणें होतेंसें दिसतें. ४ भीमा व कृष्णा या नद्यांचा संगम रायचुराजवळ होतो त्यास काडलूर संगम किंवा कपाट संगम म्हणतात. ५ महाराष्ट्रांत. ६ आसपासचे गांवचे लोक किल्ल्याच्या आश्रयास आलेले. ७ पुण्यांतील वाडे. * हें पत्र गोपाळरावास पेशव्यांच्या लष्करांतून गोविंद शिवराम खासगीवाले याणीं लिहिलेलें आहे.

करून असा नाश झाला हें वर्तमान तुम्हांस ठाऊकच आहे. असो. पहिले मिरजेचे मुक्कामीं श्रीमंतीं आपल्यावर कृपा करून बोली चालीचा प्रसंग करून राजश्री पुरुषोत्तमराव यांशीं करारमदार करून यादी पाठविल्या, परंतु दिवस एक तऱ्हेचे होते; याजमुळें गोष्टी घडून न आली. येथून ही [तुम्हीं] जावयाचें कारण हेंच कीं, तुमचा कारभार एक सोईचा जिकडे असावें तिकडेच असावें. त्यासीं दोन्ही धणी एकत्र झाले, आपलें बनेना, यास्तव (तुमचें) तिकडे जाणें झालें. तिकडे गेलां, मागती येणें कसें घडतें. तरी अखेर साल होऊं द्यावें, मग जें करणें तें करावें, असा भाव तुमचा असेल, याज कारितां आपण राहिले (असाल.) आतां देशची गत अशी झाली. अखेर साल झालें. येथून तरी तुम्हांस आणावें ऐसें उभयतां यजमानांचें मानस आहे. तरी उभयतां श्रीमंत तुम्हांस जशी पाहिजे तशी निशा करून देतील. उभयतां यजमानांची निशाच आहे. कारभारी यांज पासून अंतर पडेल त्यास मातबर सरदार मल्हारबा आदी करून आहेत. पाहिजे तशी निशा करून घ्यावी, आणि हर तजवीजीनें यावें, यांत उत्तम आहे. जर कारितां मोंगलाचे घरीं असावें असें [तुमचे मनांत] असेल तरी उत्तम. परंतु मोंगलाचे जवळ तुमचें कसें बनेल ? तूर्त मोंगल जों पावेतों मोंगलाई बळकट होय तों पावेतों सर्वांचें अगत्य धरतील. परंतु परिणाम कळलाच आहे ! पुण्याचे विषयीं त्याणें कसें केलें हें पहावें. तेव्हां पुढें काय गत ही कळलीच आहे.

---

१ मिरज पेशव्यानीं घेतल्या नंतर गोविंद हरीनें विंचूरकरांच्या मध्यस्थीनें समेटाचें बोलणें करण्या कारितां पेशव्यांच्या लष्करांत आपला पुतण्या पुरुषोत्तमराव दाजी यास ठेविलें होतें हें वाचक विसरले नसतील. २ चमत्कारिक. ३ समेट. ४ एकत्र. ५ दादासाहेब व रावसाहेब पेशवे यांचें. ६ तुमची जहागीर वगैरे परत देण्या विषयींची खात्री.

हे[1] ही सोडतात असा अर्थ नाहीं. मातबर सरदार मिळाले आहेत. पुण्यामुळें[2] यांचें व यवनाचें हाडवैर पडलें, तेव्हां सुलुख[3] होणें कळलेंच आहे. तेव्हां दोघांतून एक जण बुडेल. जर मोंगल बुडाला तरी त्याजकडे तुम्हीं असून पुढें गत काय? हे बुडाले तरी मोंगलाकडे होऊन श्रीमंतांचे बहुता दिवसांचे तुम्हीं चाकर असल्याचें सार्थक ही केलेंसें होतें[4]! व मोंगलाई झाली ह्मणजे. गत ही समजलीच आहे. तरी श्रीमंत कृपा करून निशा करीत असतां इकडे यावें हेंच उत्तम. यामध्यें लौकिक ही उत्तम आहे. जर आपले चित्तास उत्तम वाटलें तरी आम्हांस लिहून पाठवावें. आम्हीं श्रीमंतांशीं बोलून श्रीमंतांचें ही पत्र आपल्यास पाठवून देऊं. इतकें पर्यायें लिहिलें हें पुरतें मनन करून पहावें. उत्तम असेल तरी तसेंच ल्याहावें. वरकड ईश्वरें जें योजिलें असेल तें होईल. परंतु निमित्यास मात्र धणी होऊं नये. बहुत काय लिहिणें. आपल्याकडील खुलासा मजकूर असेल तो लिहावा, त्या सारखें बोलून नीट होईल. लोभ असों दीजे हे विनंती. सर्व मंडळीस[5] नमस्कार. विनंती. सर्व ही शहाणे आहां. उत्तम सल्ला दिसेल तें करणें. हे विनंती.

नं० ३०७

[अजमासें आधिक ज्येष्ठ वद्य
जूनचा प० पंधरवडा]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[6] उपरी. तुम्हीं लिहिलें कीं, ' ज्येष्ठ वद्य पक्षीं लग्न तिथी

---

१ पेशवे ही मोंगलाचें पारिपत्य करावयास सोडतात असा अर्थ नाहीं. २ पुणें जाळल्यामुळें नवाबाचें व पेशव्यांचें हाडवैर पडलें. ३ तह. ४ तुम्हीं श्रीमंतांचें पुष्कळ दिवस अन्न भक्षिलें असतां आतां मोंगलाकडे जाऊन पेशवाई बुडविलीत ह्मणजे सार्थक झालें! ५ सर्व पटवर्धन भाऊबंद मंडळीस. ६ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

निश्चय करून ठेवणें. पत्र येतांच येऊं' ह्मणोन लिहिलें, ऐशास ज्येष्ठ वद्य पक्षीं तिथीचा शोध पाहतां वद्य अष्टमी मंदवार एक व दशमी सोमवार एक, दोन मुहूर्त आहेत. यांत घडेल तो प्रमाण. तुम्हीं पूर्णिमा करून तेथून निघावें आणि यावें. इतके दिवस मंगळवेढ्याचा ऐवज आला तो[1] पोटास झाला. कांहीं प्यादे यांस झाला. ज्येष्ठमास लागला, परिछिन्न खर्चास नाहीं. तुम्हीं बेखर्ची. तुम्हांस काय लिहावें! तथापि न लिहितां गत्यंतर नाहीं यास्तव लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. पूर्णिमा झालियावरी निघावया दिनशुद्धि नसेल तरी अगोदर निघावें. चिरंजीव राजश्री भास्करपंत यास आशीर्वाद. लिहिलें पारीसिजे. हे आशीर्वाद.

नं० ३०८L

(ज्येष्ठ शुद्ध पंचमी
१६ जून.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें[2] चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० ४ जिल्हेज मुक्काम नजीक चिंतापुर[3] येथें सुखरूप असों. विशेष. वडिलांकडील पत्र बहुत दिवस येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सदैव पत्र पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर पूर्वीं पत्र लिहिलें आहे. बसालतजंगाचा मजकूर तर गंगाधर यशवंत चंद्रचूड त्यास आणावयास पूर्वीं पाठविले आहेत. त्याचा जाबसाल अद्यापि आला नाहीं. त्यांस ही जाऊन आज सात दिवस झाले. त्यांचें

१ निर्धन. २ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. ३ चिंतापुर हें स्थान मोंगलाईंत पंचमहालांत आहे.

ही पत्र लौकरच येईल. बसालतजंगाची आमची तफावत पन्नास कोसांची आहे. ते येत नाहींत, परंतु वर्तमान कळावें. प्रस्तुत आमचा मुक्काम येथें एक दोन दिवस आहे. पुढें बाबूजी नाईक व रामचंद्र गणेश आहेत त्यांस ही बोलाविलें आहे. ते ही सत्वरच येतील. पुढें कर्तव्याचा मजकूर तरी [आम्हीं मोंगलाशीं] सख्य तो करीतच नाहीं. पुढें युद्धाचा अगर छावणीचा प्रकार तर मोगल गंगेच्या[2] अलीकडे असला तर झुंजच होईल. शहरांस[3] गेला तर छावणीचा डौल पडेल. प्रस्तुत तर नाहीं. महिन्या पंधरा दिवसां विचार ठरेल तो खरा. मोंगल ही धारूरास आला ह्मणून वर्तमान आहे. राजश्री गोपाळराव गोविंद यांशीं ही गोविंद शिवरामाच्या मार्फतीनें राजकारण केलें आहे कीं, जो पहिला सरंजाम आहे तो कर्रार करावा. इकडे येऊन आम्हांबराबर मोंगलाशीं झुजूं लागले ह्मणजे मिरज ही देऊं. या प्रमाणें त्यांस सांगितलें आहे. गोपाळरायाच्या तीर्थरूपांस ही पत्र गोविंदपंतीं[5] लिहिलें आहे, त्याचा ही काय आशय येतो तो पहावा. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० १८ जिल्हेज.

नं० ३०९

(अजमासें ज्येष्ठ वद्य
जूनचा प०पंधरवडा.)

श्री.

आशीर्वाद[6] उपरी. तुम्हीं पत्रीं लिहिलें कीं, " यवनानें पुणें जाळिलें.

---

१ अघाडीस. २ गोदावरीच्या. ३ औरंगाबादेस. ४ पटवर्धन मोंगलास सोडून आह्मांकडे आले ह्मणजे त्यांजकडे पूर्वीं सरंजामाचा जो मुलूख होता तोच त्यांजकडे कायम करावा. ५ गोविंद शिवराम यानीं. ६ हें गोविंद हरीचें गोविंद शिवराम खासगीवाले यास पत्र. गोविंद शिवराम हा पेशव्यांच्या लष्करांत असून त्यांचा

सत्यानाश केला. आतां त्याचें (श्रीमंतांशीं) हाडवैर पडलें. तेव्हां सलुख होणें कळतच आहे. उभयतांतून एकजण बुडेल तेव्हां कार्यास येईल. श्रीमंतांचा नाश झाला तरी तेथें तुमचें कल्याण कसें होईल ? " त्यास श्रीमंतांचा श्रीकृपेनें जय व्हावा, कल्याण व्हावें, हेंच अहोरात्र श्रीपाशीं इच्छितों. मागें झाल्या त्या गोष्टी काढूं नयेत, 'गतं न शोचामि' हें खरें; तथापि स्मरण होतें. मोंगलाशीं श्रीमंतानीं विघाड करावयाचा न-व्हता. परंतु इतका नाश व्हावा, रामेश्वरापासून अटकेपर्यंत — ' मोंगल पुण्यास जाऊन [पुणें] जाळिलें ' हे कीर्ति त्याची व्हावी, ह्मणोन असें झालें ! आतां सलुख न करितां पुढें मनांतील मुद्दे हंशील कसे [सिद्ध] होतील ? सलुख होईल तेव्हां देश लागेल[1]. द्रव्य प्राप्त होईल. द्रव्यामुळें (आबादानीची) गांठी पडेल. नालबंदी द्यावयाचा पथ पडल्या मुळें जो इच्छावा तो सरदार तयार होतो. द्रव्य नाहीं तेव्हां सरदारी, —— कर्ते-पणावरी आंगेजणी करावी, समशेर धरावी, मरतां मारतां मिळवून लोकांस द्यावें, एक दोन वर्षें असेंच करीत जावें, तेव्हां बंदे[3] बसतो. तो प्रैकार[4] कळोन गेलाच आहे. पूर्वीं[5] दरसाल मोंगलाशीं सल्ला करीत. मागती कांहीं अंतर आलें ह्मणजे विघाड होत असे. या प्रमाणेंच चालत आलें. आतां ही त्याणें श्रीमंतांचें घर राखोन आसमंतात् भागें राहणार त्यांचीं घरें भस्म केलीं. निंबाळकैर[6] नाईक याची गति केली. परंतु आपण पुढील

व पटवर्धनांचा समेट करून देण्याच्या खटपटींत होता.

१ देशाची लावणी होईल. ' लावणी ' संबंधें अंक १२ पृष्ठ ४५९ येथील टीप पहा. २ मर्दुमी. ३ शिस्त. ४ तसें होईल न होईल हें कळून चुकलेंच आहे. ५ नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दींत. ६ निंबाळकर कोण ? पुणें शहर बाळाजी विश्वनाथ पेशवे यांच्या ताब्यांत येण्या पूर्वीं रंभाजी निंबाळकर याजकडे मोंगलाकडून जहागीर होतें. तोच हा निंबाळकर कीं काय ? त्यानें मोंगला प्रमाणें कधीं पुण्यांत जाळपोळ केल्याचें ठाऊक नाहीं.

कर्तव्यावर दृष्टि देऊन तह करावा. बंद पहिला आहे त्या प्रमाणेंच चालेल. ओढ धरलियानें बिगर सल्ला चालणार नाहीं. उभय पक्षीं युक्त नव्हे. भलताच मोंगलाच्या तर्फेचा होऊन मुलूख मारील, लुटील, अगर श्रीमंतांकडील अगर भलताच एखादा येऊन लोक मिळवून मुलूख लुटूं लागेल, तेव्हां कैद तुटेल, बंद सुटेल. यास्तव सलुख कबूल करावा. बल्के दौलताबादेचा आग्रह असेल तरी सोडून द्यावा आणि सलुख करून पुन्हां बाजी मारून घ्यावी. दौलताबाद ज्याकडे असेल त्याचें कल्याण हेच रीतीचें ! नैबाबानें पाच्छाई किल्लेदार काढून आपलीशी केली त्याचा परिणाम कळलाच. त्या उपरी निजामअल्ली याणीं त्यांस मारून आपलीशी केली, तेव्हां निजामअल्लीची गति बालेघाटीं कोणे रीतीची झाली ते कळलीच आहे. त्या पासून श्रीमंतांनीं घेतली. सहा महिने नाहीं गेले तों

---

१ तहाशिवाय. २ निदान. ' केवळ दौलताबादे साठींच जर श्रीमंतांचा व मोंगलाचा तह होण्यांत प्रत्यवाय येत असेल तर श्रीमंतानीं मोंगलास दौलताबाद देऊन ही तह करून घ्यावा. दौलताबाद अपेशी आहे. ती ज्याच्या ताब्यांत असेल त्याचें कल्याण व्हावयाचें नाहीं. या करितां श्रीमंतानीं ती मोंगलास देऊन टाकावी. ' असा गोविंद हरीच्या लिहिण्याचा अभिप्राय आहे. यावरून अद्यापि दौलताबाद पेशव्यांच्या ताब्यांत होती हें उघडच होतें. यास आणखी पुरावा पाहिजे तर अंक ४ पृष्ठ १५७ व अंक ९ पृष्ठ ३२५ व ३४५ येथें पहावा. ग्रांटडफ् लिहितो कीं, माधवराव पेशव्यांस ताब्यांत आणण्या करितां दादासाहेबानीं इ.स. १७६२ त मोंगलाजवळ कुमक मागितली होती ती त्यानें त्यांस दिल्याबद्दल त्यानीं त्यास एकावन लक्षांचा मुलूख देऊं मात्र केला पण दौलताबादे शिवाय त्यास कांहीं दिलें नाहीं. ही डफ्साहेबांची चूक आहे. त्यावेळीं दादासाहेबानीं मोंगलास दौलताबाद देखील दिली नाहीं. ३ सलाबतजंगानें. त्याचा वाईट परिणाम असा झाला कीं, निजामअल्लीनें त्यास कैदेंत ठेविलें व पुढें ठार ही मारविलें. ४ सलाबतजंगास नव्हे, तर त्यानें नेमिलेल्या दौलताबादेच्या किल्लेदारास. (दौलताबाद शहानवाजखानाकडे होती हा उल्लेख अंक १ पृष्ठ १७ येथें आला आहे.) त्याजकडून ती काढून सलाबतजंगानें फ्रेंचांचा दिवाण हैबतजंग यास दिली होतीसें दिसतें. या हैबतजंगास १७५८ च्या मे महिन्यांत निजामअल्लीनें विश्वास दाखवून आपल्या डेऱ्यांत बोलावून नेऊन ठार मारिलें. ५ उदगीरच्या लढाईंत.

श्रीमंत भाऊसाहेब बुडाले. वर्ष नाहीं भरलें तों श्रीमंत नानासाहेब कैलासवासी झाले. अलीकडे या थरास गोष्टी आली. यास्तव ते[1] देऊन सलुख करावा हे उत्तम गोष्टी. नच करणें सलुख तेव्हां [राज्य] राहील याचा भरंवसा नाहीं. स्वतः सावध असलें पाहिजे. आम्हांस या कार्यभागाविणें गरज नाहीं हें प्रमाणच, तथापि बहुत दिवस श्रीमंतांचें अन्न भक्षीत आलों, पुढें ही दुसरियाची आशा नाहीं, यास्तव श्रीमंतांचे शुभचिंतक आहों. त्यांच्या कल्याणानें बहुतांचें कल्याण. यंदा गति काय! नाहक पृथ्वी प्रळय जाहला !! तुम्हीं देशास याल तेव्हां कळेल. मोंगलानें पुणें जाळिलेंसें नाहीं. सर्व प्रांताची गति एक झाली. अद्याप तरी सावध व्हावें. जें कर्तव्य तें पोक्तपणें साऱ्यांचे मतें करावें. राजश्री मल्हारजी होळकर भेटल्या उपरी त्यांच्या मतें (श्रीमंत) सल्ला करतील हा भरंवसा होता. परंतु त्याणीं सलुखाची चर्चाच न केली किंवा श्रीमंतांनीं त्यांचें न ऐकिलें हें न कळे. हे आशीर्वाद.

नं० ३१०

(अजमासें अधिक ज्येष्ठ वद्य
जूनचा दु० पंधरवडा)

श्री.

आशीर्वादें[2] उपरी. तुम्हीं लिहिलें कीं, "मिरजेच्या मुक्कामींहून पुरुषोत्तमरायाबरोबर कित्येक प्रकारें सांगोन पाठविलें परंतु तो काळच तसा होता. गोष्ट न घडली. आतां साल ही जाहलें. पुढें श्रीमंत उभयतांच्या[3] चित्ता पासून रायांस[4] आणावें, पूर्ववत् प्रमाणेंच चालवावें,

१ ती [दौलताबाद.] २ हें पत्र गोविंद हरीचें गोविंद शिवराम खासगीवाले यास आहे. ३ दादासाहेब व रावसाहेब पेशवे यांच्या. ४ गोपाळराव मोंगलाकडे गेला आहे त्यास.

[असें आहे.] ये विशीं कार्यभागी यां विशीं मनांत संशय असेल तर मातबर मर्कोरनामका सारिखे आहेत त्यांची निशा करून देऊं. ते तुमची निशा करतील. गोपाळरावाचा कारभार निकर्षी, एककल्ली, जिकडे झाले तिकडेच असावें, धणी धणी एक झाले, आपलें बनेना, यास्तव गेले. आतां धणी कृपा करून यावें असें म्हणतात. तुमच्या विचारास येईल तर त्यांस सांगोन ताळ्यावर आणावें. उत्तर समर्पक पाठवावें. " ह्मणून कित्येक प्रकारें लिहिलें, ऐशास ये विशींचें उत्तर विस्तारें न लिहिलें तरी तुम्हीं दुटप्पी गोष्ट लिहिली [तीच खरी असें होईल.] ' बनेना ' ह्मणून गेले ह्मणून लिहिलें, त्यास उभयतां श्रीमंतांत विकल्प आला. दोन बंडें झालीं त्या मध्यें एक पक्षीं चिरंजीव झालें. मागती श्रीमंत एक झाले (तेव्हां) चित्तांत भय आणून दोन मजली लांबले. धण्यानीं गौरसीचें पत्र पाठवून समजावून न्यावें, दहा हजार फौजेनिशीं चाकरी घ्यावी, मनांत राग होता तरी साहेब कामावर घालावें, तें न करितां पत्र पाठविलें जे, ' बखेडा करून पळून गेले. त्यांजकडे पागा, गड, कोट, किल्ले, हत्ती, हिशेबकितेब, येणें त्यास ज्यास देववूं त्यास द्यावें. शिवाय मर्जी वर्तल्यास कार्यास येणार नाहीं. ' ह्मणोन पत्र लिहिलें ! तथापि आम्हीं उत्तर पाठविलें त्यांत काय काय लिहिलें तें पत्र तरी वाचून पाहावें होतें ! त्यांत गैर काय लिहिलें ? ' महाराजानीं कृपा करून सेवा घ्यावी, निदान

---

१ सखारामबापू विषयीं. २ मल्हारराव होळकरा सारखे. ३ आग्रही. ४ दादासाहेबांच्या दंग्यास गोविंद हरि ' बंड ' ह्मणतो हें ठीकच, पण तो दंगा मोडण्यासाठीं राज्याचे मालक माधवराव पेशवे यानीं युद्धाची तयारी केली त्यास ही गोविंद हरि ' बंड ' ह्मणतो हें काय ! ५ गोपाळराव. ६ गौरवाचें. ७ जोखमीच्या व श्रमाच्या सरकारी कामावर. ८ दादासाहेबानीं. येथ पासून पुढें लिहिलेला मजकूर गोविंद शिवराम याणीं दादासाहेबांस वाचून दाखवावा किंवा त्यानीं तो स्वतः वाचावा ह्मणून गोविंद हरीनें लिहिलेला आहे.

[राज्या] बाहेर घालविणें असलें तरी कर्जाची वाट करावी, ' ह्मणून बहुत प्रकारें लिहिलें; तरी ध्यानास न आलें ! आमचें प्राक्तनच फिरलें ! धण्यास बोल कोण लावावे ? तत्रापि श्रीमंत मिरजेस आले तेव्हां चिरंजीव फौजेसमेत कृष्णातीरीं व आम्हीं सहकुटुंब मिरजेंत (असतां) चिरंजीवानें एक पत्र फारच करुणा दाखवून लिहिलें, तेव्हां आज्ञा झाली जे, ' तुम्हीं कृष्णातीरीं रहावें. रामचंद्र गणेश यास आज्ञा करितों, तें पत्र पाठवितील. ' तें पत्र येतें ह्मणोन मार्ग पाहतात तों त्यांजवर फौज रवाना झाली ! आम्हांकडे मध्यस्तीस गृहस्त पाठविले, त्यास आम्हांस रुबरू[1] बलावून नेऊन आमच्या दोन गोष्टी विनंतीच्या ऐकाव्या तें न केलें ! चिरंजीवावर छापा घातला तेच दिवशीं मोर्चेबंदी झाली. जन्मवरी अन्न भक्षिलें, काय करावें, कोणाकडे जावें, जीव कसा वांचेल ह्मणून चिंता करीत होते तों घाला पडला ! सर्वस्वापहार जाहला. एक धोतर नेसावयास. मनुष्य देखील समागमें नाहीं. प्राणाशीं संकट. एकनिष्ठ सेवा केली तेंच पुण्य, तेणें करून पार होऊन पांच सात राऊतांनिशीं रामदुर्गास गेले. कोणाच्या आश्रयास राहून भयास टाकून स्वामिकार्य करून घ्यावें ? कोणत्या चाकरीस अंतर पडलें हें ध्यानांत आणावें. केवळ अतिशेयावरी[2] येऊन सेवकाचे अवरूस खेत्ता[3] करावयाचा प्रकार न करावा. हा ही नाश झाला तरी ते ही कीर्ति महाराजांची आहे. सेवकानें न्यूनपूर्ण लिहिलें ह्मणून विषाद न मानावा. स्वामीच्या चरणा वेगळा दुसरा अवलंब पूर्वी पासून नाहीं. हा ही महाराजांनीं शोध घ्यावा. संग्रह कांहीं आहे नाहीं हें ही मनास आणावें. निमकहरामी केली नाहीं. दिग्मंडळीं उत्तम कीर्ति महाराजांची व सेवकाची होय तें करावें. यावरी महाराज सर्वज्ञ आणि समर्थ आहेत. एक स्वामी कीं एक भगवान ! तिसरें जाणत ना

१ समक्ष. २ आग्रहावर. ३ हानि.

हीं. कृपा करावी. कोटि अपराध परंतु स्वामींचे एकनिष्ठ सेवक आहों. सेवे शीं श्रुत होय कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

नं० ३११

" युद्धीं घातल्यानें (?) जीव वांचेल असे मनसबा कारितां कोठें आश्रय दिसेना. यवनाकडे जावें, तूर्त जीव वांचवावे, ह्मणोन मनसबा करून गेले. स्वामींचे नांवावरी त्याणें अभय वचन दिलें. त्या पाशीं राहिले. परंतु स्वामींचें अनिष्ट करावें हा अर्थ नाहीं. कर्ज स्वामींनीं वारावें, मिरज घ्यावी; ये विशीं नबाबानीं स्वामीस लिहिलें, परंतु आमचा काल विपरीत — ते गोष्ट घडोन न आली. नबाबाचें येणें (आमच्या) मदतीस ही न जाहलें. तेव्हां त्या पाशीं सामान ही नव्हतें. राजश्री गमाजी बावा नबाबाकडे गेले. त्याणीं जाऊन भोंसले आणिले. तों श्रीमंतांनीं मिरज घेतली. पुढें नबाबानीं आपला भारीपणा जाणोन विघाडाचा प्रकार केला तेव्हां श्रीमंतांनीं बुनगें लाऊन देऊन चार कोस पुढें होते तरी सलाबेत भारी बसती. ते[3] देशांत जावयाचीं या मध्यें लढाईची ही ली तरी कोणत्या कार्यावरी पडणार ! गनिमी कावा करून शत्रू हारीस आणावा, तें न कारितां या दिवशीं झुजावयाची मसलत कार्यावरी पडणार नाहीं. घोडियांत तकवा राहिला नाहीं. यास्तव आर्पण विनंती करून या समयीं लढाईचा प्रकार न करावा. अद्यापि लोक सरदार शिलेकी आज्ञे प्रमाणें उभे राहतील. परंतु शिपाई यांचा विश्वास न धरावा. हें ही

१ हें ही पत्र गोविंद हरीचें गोविंद शिवराम यास. आंतील मजकूर दादा साहेबांच्या कानावर जावा या रोखाचा लिहिलेला आहे. पत्राचा मधलाच एक वंद मिळाला. २ दरारा. ३ येथील अक्षरें फाटलेलीं असल्यामुळें संदर्भ नीट लागत नाहीं. ४ हें गोविंद शिवरामास उद्देशून लिहिणें. ५ फार दिवसांचे.

सेवकास सुचलें तें लिहिलें आहे. आपण चित्तास आलिया श्रुत करावें. नव्हे तरी राहों द्यावें. चिरंजीवाच्या येण्याची गोष्टी -- धण्याच्या आज्ञे बाहेर नाहीं. सा महिने सबुरी केली तैशी मास दोन मास क्षमा करावी. चिरंजीव (नबाबाची) आज्ञा घेऊन घरास--"

नं० ३१२

(ज्येष्ठ शुद्ध एकादशी
२१ जून.)

श्रीगणराज.

राजश्री याविराजीत राजमान्य राजश्री दादा स्वामीचे सेवेशीं.

पोष्य गोपाळ महादेव कोल्टकर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० ९ जिल्हेज मुक्काम कसबे कलबुर्गें स्वामीचे कृपाकटाक्षें करून वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपणाकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तरी सदैव पत्रीं परामर्ष करीत जावा हें उचित आहे. इकडील वर्तमान तरी सर्व परस्परें आपणांस विदित होतच आहे. मुख्य गोष्ट जो मनसबा होतो तितका ठीकच होत आहे. पुढें मनसबा अविंधाशीं लढाई करावयाचा आहे. फौजेचा प्रकार म्हणावा तरी सारी फौज एकदिल आहे. व साळी भागनगर प्रांतींच्या खाऊन घोडें माणूस ताजें आहे. ईश्वर इच्छेनें घडेल तें खरें. स्वामींच्या[3] दर्शनाचा योग बहुत दिवसांत झाला नाहीं तेणें करून चित्त उदास आहे. बरें. ईश्वरकृपेनें भेटी ही सत्वरच होईल. सर्व चित्तानुरूप गोष्टी घडून येतील. वरकड वियोगाचा प्रकार तर कालानुरूप होतच आहे.

---

१ हा कोण हें ठाऊक नाहीं. यानें हें पेशव्यांच्या लष्करांतून पत्र लिहिलें आहे. २ मोंगलाशीं. ३ तुमचा (गोपाळरावाचा.)

चारी दिवस सारखेंच आहेत असा प्रकार नाहीं. मुख्य गोष्ट जनीं जनार्दन आहे. तोच अर्थ ईश्वर घडवितो. वरकड सर्व भेटीनंतर कळोन येईल. बहुत काय लिहिणें कृपा लोभाची वृद्धि होत जावी हे विनंती.

अपत्यें धोंडो[1] केशव यानें दोन्ही कर जोडून सांष्टांग नमस्कार विनंती. इकडील सर्व मजकूर राजश्री भिकाजी[2] नाइकानीं लिहिला आहे त्यावरून विदित होईल. मुख्य गोष्ट॰ दादा! आपल्या चरणाचा वियोग झाला तेणें करून आम्हांस येथें कोणीच नाहीं ऐसें भासतें. काळाचे दिवस मात्र घालवितों. ईश्वर दर्शनाचा लाभ घडवील तो सुदिन असे. आम्हीं तो आपल्या खेरीज केवळ परदेशी जाहलों. ईश्वर श्रम कधीं परिहार करील ते करो! हे विज्ञापना.

नं० ३१३L

(ज्येष्ठ शुद्ध द्वादशी
२२ जून.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें[3] चरणावर मस्तक ठेऊन शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत छ० १० जिल्हेज मुक्काम कलबुर्गे येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. ऐवजाचे तरतुदी विषयीं राजश्री नारो आपाजी यांस आलाहिदा पत्र पाठविलें आहे त्या प्रमाणें ते तरतूद करितील. आपण ही त्यांस आज्ञा करावी. वरकड

---

१ धोंडो केशव नेने हा पटवर्धनांचा कारकून पुढें पुष्कळ वर्षे रहिमतपुरास कमाविसदार होता. २ भिकाजी नाईक कोण ? पत्र तर गोपाळ महादेव कोलटकर याणें लिहिलेलें आहे. ३ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र.

मोंगल धारूरानजीक आले आहेत. त्यांजकडील मेराठ्यांची फौज फार[1] करून गेली. खासा मोंगल व भोंसल्याची फौज अद्याप गेली नाहीं. कुचाचा (?) प्रकार ह्मटला तरी नव्हे. त्याजेकडे गेले त्यांचाच संदर्भ लागला आहे. बहुत करून सिद्धीस ही जाईलसें आहे. बसालतजंग यांची भेट जाहली. त्या[3] ठिकाणाहून (ते) कूच करून गेले होते. गंगोबा[4] गेल्यानंतर ते मागतीं आठ नऊ कोस माघारे आले, ह्मणोन वर्तमान आलें. बहुत करून येतीलसेंच आहे. व गंगोबा ही अद्याप आले नाहींत. बसालतजंग यादगिरीस आले ह्मणून वर्तमान उडतें आलें आहे. मागाहून सविस्तर लिहून पाठवूं. सारांश बसालतजंग आले तर उत्तमच झालें. न आले तरी आमच्या फौजा रामचंद्र गणेश व बाबूजी नाईक समीप आलेच आहेत. येथें येऊन दाखल जाहलियावर मोंगलावर लढाईस जाऊं. ते ही दो चौ रोजांत येतील. वडिलांस कळावें ह्मणून लिहिलें आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पौ॥ छ० १७ जिल्हेज.

नं० ३१४

(११ जुलई.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[5] उपरी. येथील कुशल तागायत आषाढ शुद्ध प्रतिपदा सोमवार. यथास्थित असे. विशेष. तुम्हीं गुरुवारचें पत्र पाठविलें तें काली रविवारीं सव्वादोन प्रहर दिवसास पावलें. नारायणभट आले त्यां जवळी अनुष्ठा-

---

१ प्रतिनिधि, पटवर्धन, धायगुडे, निंबाळकर, रायाजी पंवार इत्यादिकांची बहुतेक फौज घरोघर निघून गेली. २ नबाबाकडे गेलेल्या मराठे सरदारांचें समेटाचें राजकारण आह्मांकडे लागलें आहे. ३ चितापुर येथून. ४ गंगोबा तात्या उर्फ गंगाधर यशवंत हे होळकराचे दिवाण. ५ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

नाची पोथी पाहिली. अनुष्ठानसिद्धतेचा मजकूर लिहिला तो कळला. उत्तम केलें. अनुष्ठान करवावें. तेणें करून श्रेयस्करच आहे. फलदाता ईश्वर आहे. मुख्य ज्या स्थलीं अनुष्ठान करविलें तेथें साहित्यकर्ते अनुकूल, आचार्य सावध, व उपाध्या प्रतिकूळ नसावा; ह्मणजे सिद्धीस जाईल. थोड्याच दिवसांचें करवावें. खर्च भारी पडेल. यंदाचा प्रकार कळलाच आहे. दुसरें पत्र बाळाजी नरसिंह याज बरोबर शुक्रवार अडीच प्रहरचे रवानगीचें पाठविलें त्यावरून कळलें. बाळाजीपंतीं सांगितलें कीं शुक्रवारीं पाऊस पडला या कारितां तेथेंच कोठे राहिलों. रविवारीं प्रातःकाळीं नगारा कुचाचा जाहला तेव्हां निघालों ते पोफली पांडवांची येथें राहिलों होतों, ह्मणून सांगितलें. तो ही काली रविवारीं तृतीय प्रहरीं येऊन दाखल झाला. दोन नद्यांस पाणी यामुळें मार्गीं गुंता झाला. नाहीं तर दोन प्रहरां येता. चिरंजीव मेघश्यामरायाचें पत्र व महादाजीपंतास तुम्हीं पत्र लिहिलें तें व आम्हीं आपलें पत्र देऊन आजी प्रातःकाळींच माणूस रवाना केलें. कापड तेथें कांहीं आंख नाहींत. खासगत सनगें आहेत, तीं जागां जागां त्यानीं पळविलीं आहेत. एक नगारखाना किंवा राहुट्या कनाता इतका मात्र आहे. त्यांस लिहिलें कीं तुम्हीं कार्याकारण आंखाच्या सुमारें कापड विकत घेऊन तीन रुपयांचें मुद्दल सनंग त्याजवरी पंधराचा आंख घालून घेतील त्यांस देणें. न घेत त्यांस न देणें. तीन रुपयांच्या सनगावरी दहाचा आंख पडतो. दोन सवाया घालून अगर एक सवई घातली तरी साडे सातांचा तो पंधरांचा. या प्रमाणें लिहून पाठविलें. हर कोणाचे रुपये उसने कर्ज घेऊन देणें. चोविसशें चोपन रुपयांस दर तीन आणे बट्टा वजा करून अर्काट, गंजीकोट, परकी स्थलींच्यांस देणें. त्या प्रांतीच्यांस हुकेरी देणें. नाइकत तरी पावला पांच आणे बट्टा पडत असें करून देणें. पाहिजे तरी घेतील. तुम्हीं कागदीं

मकारनामकास लिहून देणें ह्मणोन संज्ञा लिहिली आणि फलाण्याच्या ऐवजीं ह्मणोन नांव कसें लिहिलें ? ये विशीं नारायणराव लिहितां चुकले. तें नांव अगदींच आम्हीं खोडून टाकलें. हर कोणाचे फेरमोबदला उसने घेऊन देणें, व्याजें घेऊन देणें, ह्मणोन लिहिलें आहे. जाधवाचे तीनशें अगोदरच हुकेरी त्याच्या समाधानेंच देविले आहेत. घेतील. आजी ही लिहिलें आहे. दोन पत्रांच्या[1] नकला व अमृतवेचनी[2] आला तें वर्तमान कळलें. या पत्रांवरून ते केवळ मुर्ख असें वाटलें ! सैफेजंगी[3] करून आपण ऐकव्यानें[4] मरावें [असें त्यांच्या] प्रारब्धींच असल्या उपाय नाहीं ! होणार भावी काय तें आठ दिवसांत निवडेल[5]. त्यांत गृहस्थ गेला त्याणें सांगितल्यावरी देहावरी आले तर उत्तम. नाहीं तर परिणाम शुद्ध नाहीं. आम्हीं चिंता करून काय होणें ! तुम्हीं आपला मजकूर लिहिला तेणें करून समाधान जालें. उत्तम गोष्ट. त्यांशीं या प्रसंगीं षरीक[6] होऊन चाकरी करावी. पेस्तर ते[7] आज्ञा देतील तेव्हां यावें. आमचा आग्रह स्थलाचा [तें त्यांस] अनुकूल असले तरी देतील. नेदीर्त[8] तरी त्यांजवरी शब्द काय ? आमचा ऋणानबंध ! वरकड जागिरीचा मजकूर —— त्यांची फत्ते झालियावरी देऊत. जेव्हां देतील तेव्हां घ्यावयास उशीर नाहीं. सबुरीनें सर्व ही होईल. आपण होऊन त्वरा न करावी. त्यांच्याच संतोषें मर्जी माफक वर्तावें. लागलेंच स्थल त्याणीं द्यावें, परंतु आमचा प्रतिकूल काल या मुळें अंतर झालें. आमचा रखणवाला श्रीपंढरीचा नाथ समर्थ आहे. त्याणें अभिमान धरिला असतां फिकीर वागवीत नाहीं. पर्जन्य फार, (तुमच्या लष्करच्या) घोडियांस वैरण नाहीं,

---

१ श्रीमंतांकडून तुम्हाकडे आलेल्या पत्रांच्या. २ गोडबोले. (पांडुरंगपंत.) ३ पराक्रम. ४ एकव्या दादा साहेबानीं. ५ निकालास लागेल. ६ सोबती ७ नबाब निजामअली. ८ न देईत. ९ चुकलें.

ह्मणोन ऐकिलें; पण त्याच्या लष्करचे हाल ऐकवत नाहींत! काय गति होईल न कळे. सोबती आणिला तो पाषाण गळां बांधून पाण्यांत उडी टाकावी या प्रकारचा. तारक नव्हे. श्री इच्छा प्रमाण! या उपरी दोन दिवसां एक पत्र या प्रमाणें रवाना करणें. ये विशीं आळस न करणें. दुर्गास[3] ही वडिलांस लिहीत जाणें. कुरुंदवाडचे लखोटे चिरंजीव भास्करपंताकडील व नीलकंरायाचे रवाना केले. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

नं० ३१५

[१५ जुलई.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[4] उपरी. येथील कुशल तागायत आषाढ शु० ५ भृगुवार यथास्थित असे. विशेष. तुम्हीं शु० १ सोमवासर छ० २९ तेरखेचें पत्र पाठविलें तें काली गुरुवारीं अस्तमानीं प्रविष्ट जालें. अनुष्ठानाचा मजकूर लिहिला तो कळला. तो ही एक प्रयत्न. दैवी मानवी उपाय करून पहावें; होणें जाणें श्रीसत्ता! श्रीमंत सफेजंगी करणार होते त्यांचें व कार्यभागी यांचें व सरदारांचें रहस्य[5] प्रकरण लिहिलें तें कळलें. प्राक्तनें करून चालतें. एरव्हीं त्यांचे बुद्धींत कांहीं नाहीं. तसे ही यजमान कार्यभागी[6] यांचे उपयोगी! ऋणानुबंधास उपाय नाहीं. सारा प्रांत वि-

---

१ पेशव्यांच्या. २ बसालतजंग. ३ नळदुर्गास. ४ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ५ श्रीमंत दादासाहेब व त्यांचे कारभारी व सरदार यांचें हें ' रहस्य प्रकरण ' मागें नं० २८४ चे पत्रांत गोपाळरावानें लिहून पाठविलें आहे तें तर नव्हे-ना! त्यांत दादासाहेबांचा ' सफेजंगी ' करण्याचा निश्चय सांगितलेला आहे खरा! पण तसें असेल तर त्या पत्रावर मिती घालण्यांत आमचे हातून दोन महिन्यांची चूक झाली असें होत आहे! ६ सखारामबापूचें.

ध्वंस केला. कोठे ही बाकी नाहीं. जाते तरी बरें होतें. नाहीं तर दुकाळ पडावयाचा प्रकार ! श्रीमंत निघोन जाणार ह्मणून ऐकिलें, तेव्हां गेलेच असतील. पुढें नबाब साहेब बेदरास जातील किंवा शहराकडे जातील न कळे. रहावयास कुटुंबास स्थल मिळतें तरी बरें होतें. त्यांजकडे शब्द ठेवावयास जागा नाहीं. (त्यानीं) कोठून द्यावें ! चारी स्थलें चौ जागां गुंतलीं. बरें. ऋणानुबंध म्हणावा ! एव्हां नाहीं, पुढें देतील. तुम्हीं आज्ञा त्यांची मर्जी रक्षून घेणें. दुर्गीं सारीं माणसें आहेत तीं एखादे सुस्थलीं ठेवावीं (असा हेतु आहे.) श्रीमंतांचा शह वारल्यावरी अक्कलकोटीं ठेवल्यास कार्यास येईल. अगर येथें आणिल्यास कार्यास येईल. कुरुंदवाडाकडे पर्जन्य नाहीं. तुम्हीं लिहिलें कीं फावलें तर येते समयीं वडिलांची भेट घेऊं. ऐशास मार्गच तो. भेट घ्यावया गुंता नाहीं. हत्ती करमाळयास ठेविले त्यांची चंदी, मन माने ऐशी खरीदी, पण पैसा कोठें दृष्टीस पडेना ! रोजिना चार हत्तींस पंचवीस रुपये खर्च. करकंबेस आणावे तरी श्रीमंत कोण्या मार्गें जातील न कळे. या कारितां तेथेंच ब्रहिरोपंतीं पाठविले. आम्हांस काली पत्रें आलें त्यांस लिहिलें कीं, करकंबेस येणें. पहावें येतात कीं नाहीं ते. सर्व गोष्टींची गोष्ट जे, श्रीमंतांचे लष्करची पीडा एकीकडे गेली ह्मणजे विश्व सुखी होईल ! चिरंजीव भवश्यामरायाकडे पत्रें रवाना केलीं. आजीच माणूस गेला. ' आषाढ श्रावण मास दोन माहिने हर कसें करून स्थलें जतन करणें. पुढें ठेवावींशीं झालीं तरी ठेऊं. नाहीं तरी ज्यांचीं त्यांस देऊं. नाहक ठेऊन खर्चा खालीं यावें यांत जीव नाहीं. ' असें लिहिलें. विश्वंभट दीक्षिताचें पत्र

---

१ औरंगाबादेकडे. २ नबाबाकडे. ३ घरीं निघून येण्यास आज्ञा. ४ नळदुर्गास. ५ हत्तींच्या बरदास्तीवर ठेविलेल्या कारकुनाकडून. ६ कर्नाटकांतील आमच्या जहागिरीचीं स्थळें लक्ष्मेश्वर, बंकापुर, शिरहट्टी वगैरे. ७ पेशव्यांस.

आलें होतें. शिउभट म्हैसकर रवाना केले, समीप होते; येऊन गेले असतील. लष्करचे[1] हाल फार. धान्य महाग. वैरण नाहीं. पाऊस अतिशय. लोक फार श्रमी होतात. बरें झालें जे श्रीमंत चालिले. तुम्हीं आपलेकडील वर्तमान लिहितां याच प्रकारें आव. चौं दिवशीं पत्र पाठवीत जाणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

समस्त चिरंजीव मंडळीस आशीर्वाद. लिखितार्थ परिसिजे. हे आशीर्वाद.

अपत्यें पुरुषोत्तमानें शिरसाष्टांग नमस्कार. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. वडिलांचे पत्रावरून सविस्तर कळलें. चिरंजीवास[2] ही कुरुंदवाडास लिहिलें आहे जे, ' हर कसें करून चार दिवस [ठाणीं] रहात असें करणें. ' या प्रमाणें लिहिलें आहे. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. लोभ करणें हे विज्ञापना.

नं० ३१६

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[3] उपरी. येथील कुशल तागायत आषाढ शु० ६ मंदवासर यथास्थित असे. विशेष. काली पत्र रवाना केल्या उपरी लक्ष्मेश्वराहून पत्रें आलीं त्यांत मजकूर — मीरफैजुल्ला[4] हैदर नाईकाकडील पुढें आला होतो. त्याणें ठाणीं सावनूरचीं दोन चार घेतलीं. त्यां पैकीं एकांत राहिला होता. सावनूरचे लोक (त्या ठाण्या समीप) गेले. प्रत्यह गांवावरी जाऊन मारगीर करूं लागले. त्याणें आंतून झुजावें आणि केवळ गरिबी

---

१ हें वर्णन पेशवे व मोंगल या दोघांच्याही लष्करास लागू. २ धाकटा बंधु मेघश्यामराव यास. ३ पत्र गोविंदहरीचें गोपाळरावास. ४ सावनूरच्या नबाबाच्या मुलखावर चालून आला होता.

धरावी. 'बाहेर न निवें' ऐसें दाखवून दुसरी फौज[1] आणविली. ती न कळत डोंगराच्या आड अस्तमानीं उतरविली. सावनूरवाले यांस कांहीं (हें) ठाऊक नाहीं. आणि प्रत्यह प्रमाणें हे चालोन गेले. तोफांची मारागिरी करूं लागले. तेव्हां तो आंतून बाहेर आपले फौजेनिशीं निघाला. तों मदतीची फौज तयार होऊन आली. मध्यें हे! दोन्हींकडून तोफांचा बाणांचा मार दिला. फार खराबी सावनूरवालियांची झाली. पांच सातशांनिशीं सांभाळून[2] निघोन सावनुरास दाखल झाला." ह्मणोन लिहिलें आहे. अगोदर हरीपंत[3] व भास्करराऊ नरगुंदकर व शिंदे[4] हे पांच सातशें प्यादे व स्वार तितकेच, इतकेनिशीं सामील झाले होते. ते ही युद्ध प्रसंगीं होते. त्यांची काय गति झाली न कळे. सावनुरांत आलिया उपरी त्याणींच[6] दरवाजे बंद केले. आंतील माणूस बाहेर जाऊं देत नाहीं असा मजकूर केला. खासा हैदरनाईक ही मागून येत आहे. सावनूर परिछिन्न घ्यावेंसा त्याचा मजकूर[8] आहे. लक्ष्मेश्वराहून कागद परभारेंच आले त्यांच्या नकला पाठविल्या आहेत. बंकापुर आदी करून स्थलें राहत नाहींत. दक्षिण प्रांतींचीं ठाणीं मामलेदार तमाम बुडालेसे झाले. चौंकडून कार्यभागी यानीं श्रीमंतांच्या कल्याणाचा प्रकार केला! हैदर

---

१ तुंगभद्रेअलीकडे हैदरअल्ली राहिला होता त्याजकडून मीरफैजुल्लानें कुमकेस फौज आणविली. या लढाईचें वर्णन कर्नल विल्क यानें आपल्या म्हैसूरच्या इतिहासांत केलें आहे तें वाचकानीं पहावें. त्यांत व प्रस्तुत पत्रांतील हकिगतींत त्यांस पुष्कळच तफावत दिसून येईल. २ अशा रीतीनें सावनूरकर नबाब 'सांभाळून' आला ह्मणजे जीव सांभाळून पळून आला! ३ हरीराम उर्फ हरिपंत पोंभुर्लेकर हा इचलकर्जीकरांचा कारभारी. याजकडे कर्नाटकांत मुळगुंद तालुक्याची मामलत होती' ४ नीलकंठराव शिंदे मनोळीकर. ५ या तिघांस ही या लढाईंत कांहीं अपाय झाला नाहीं. ते सावनूरकरा प्रमाणेंच 'सांभाळून' आले! ६ सावनूरच्या नबाबानें. ७ मनोदय. ८ सखारामबापूंचे

अल्ली फौज न गेली ह्मणोन बैळावला. आतां कोठपर्यंत येतो न कळे! श्री सत्ता प्रमाण! जहालें वर्तमान कळावें. प्रस्तुत तुम्हीं कोठें आहां? 'श्रीमंत दोन मजली अलीकडे आले' ह्मणतात. 'वुनगें किरकोळ किरकोळ चौंकडून चालिलें' ह्मणतात. कोणत्या मार्गें जातात न कळे! प्रांताचें विघ्न श्रीकृपेनें चालिलें! पुढें कोणकोणाचा भोग आहे न कळे! नबाब बेदरास जातात किंवा शहरास जातात न कळे. तुह्मीं आज्ञा घेऊन निघाल तेव्हां खबरदारीनें मार्गाचे येणें. समागमें फौज नाहीं. थोडे आहांत. ते दुष्ट बाजूस आहेत. यास्तव सूचना लिहिली आहे. हा चांडाळ कोठ पावेतों येतो न कळे! पर्जन्यकालीं निर्भय जाणून त्याणें चाल कली. मोठी दहशत पडली. सावनूर घेतलें ह्मणजे बाकी कृष्णे पावेतों रहात नाहीं. पुढें मिरज मात्र आहे. तेथील बंदोबस्ती श्रीमंतांची बरीच असेल. चार महिने पर्जन्यकाल मिरजे पावेतों येत नाहीं. पलीकडे प्रांत थोडा नाहीं! पुष्कळ पैका मिळवील. दिग्विजयास निघाला आहे! बहुत काय लिहिणें हे. आशीर्वाद.

---

१ 'दर वर्षी मराठ्यांची फौज कर्नाटकांत स्वारीस जात असे त्यामुळें तिकडील पुंड पाळेगार डोकें वर काढीत नसत. यंदां तशी दर वर्षा प्रमाणें फौज पाठविण्याची सखारामबापूनें तरतूद केली नाहीं ह्मणून हैदरअल्लीस हा दंगा करण्याची संधि सांपडली.' असा अभिप्राय. २ ह्मणजे अर्थात् मोंगलाचें लष्कर. ३ प्रांत सोडून दूर जाऊं लागलें. ४ पेशव्यांचे सरदार बाबूजी नाईक वगैरे. ५ हैदरअल्ली. ६ पावसाळ्यांत कांहीं पेशव्यांची फौज आपणावर येत नाहीं हें समजून निर्भय झालेला.

नं० ३१७

[अजमासें आषाढ शुद्ध
जुलईचा प०पंधरवडा]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[1] उपरी. मोठें संकट हेंच कीं, युद्धाचा[2] प्रसंग, निरोप मागतां नये. राहिल्यानें किती दिवस लागतील न कळे. खर्चास पैसा नाहीं. सोबती ही राहणार नाहींत. जातीनिशीं राहिल्यानें लौकिक नाहीं. ते[3] गर्भश्रीमंत. कार्यभागी[4] मतलबी. त्यांस परदुःख ठाऊक नाहीं. परंतु 'हे गृहस्थ[5] आठ महिने सोबतीस खराब होतात. पैसा सरकारांतून न दिल्हा. यांजपाशीं आहे नाहीं कळतच आहे. कर्जदार यांची गति कैसी होईल न कळे, (हें त्यांच्या) ध्यानांत नाहीं. यास्तव युक्तीनें ह्मणावें कीं, आम्हीं युद्धप्रसंगास रहावें तरी (आम्हां जवळ) फौज नाहीं. जातीनें[6] राहिल्या काम होणें नाहीं. बेखर्च[7] आहों. निरोप देणें. पुढें जेव्हां आज्ञा कराल तेव्हां सेवेशीं हजीर आहों. ह्मणून पुसावें. खंदारकर[8] राजे प्रस्तुत कोठें आहेत? ते तुमचे स्नेही. त्यांस सांगावें. ते जाऊन रदबदली कार्यभागी[9] व मुख्यांजवळी करून निरोप देवितील. निरोप घेऊन यावें. जरी खर्चास दिलें तरी लोकांस देऊन चार दिवस सोबत देऊन[10] मग यावें. किरकोळ मंडळी सारी लाऊन द्यावी. सर्वांच्या युक्तीस येईल तें करणें हे आशीर्वाद.

---

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ मोंगल व पेशवे यांमध्यें लढाई होण्याची वेळ. ३ नबाब निजामअल्ली. ४ दिवाण विठ्ठल सुंदर. ५ अर्थात् गोपाळराव. ६ नुसते स्वतः ७ निर्धन. ८ खंदार शहर व किल्ला मोंगलाईंत नांदेडच्या नैऋत्येस २५ मैलांवर आहे. तेथील राजे गोपाळसिंग. ९ दिवाण विठ्ठल सुंदर व मुख्य निजामअल्ली यां पाशीं. १० त्याच्या लष्करांत राहून.

श.१६८९ मोंगल व पेशवे यांमध्यें युद्ध होण्याचा रंग इ.स.१७६३
रुसलेल्या सरदारांची समजूत

नं० ३१८L

(आषाढ शुद्ध षष्ठी
१६ जुलई.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० ४ मोहरम मुक्काम नजीक नळदुर्ग येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलांकडील आशीर्वाद पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सदैव पत्र पाठवावयासीं आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान पूर्वीं सेवेशीं लिहून पाठविलेंच आहे. भोंसल्यांकडील कागद परवां आला. त्यांत भाव हाच कीं, " तुम्हीं [मोगलावर] चालून यावें ह्मणजे आम्हीं येऊं. व आमची यादी ठराऊन द्यावी कीं, तिसा लक्षांचा मुलूख द्यावा व अशेरीचा किल्ला द्यावा. सर्व

१ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. २ विजापुरच्या बादशहाच्या वेळीं हा किल्ला वळकटी विषयीं फार प्रख्यात होता. शेजारीं असलेल्या बोरी नदीस येथें त्याच बादशहांच्या कारकीर्दींत धरण बांधलें गेलें. इ. स. १८५३ च्या तहांत इंग्रज सरकारनें निजामा पासून नळदुर्ग जिल्हा घेतला. पण पुढें सात वर्षांनीं ह्मणजे ५७ च्या बंडाची शांतता झाल्यावर सदरहू सरकारानें मेहरवानी करून तो जिल्हा व सारा रायचूरदुआब निजामास परत दिल्हा. ३ जानोजी भोंसल्याकडील कागद पेशव्यांशीं सख्य करण्याविषयींचा. ४ अशीरगडकिल्ला व तीस लक्षांचा मुलूख द्याल तर मोंगलास सोडून मी तुह्मांकडे येऊन मिळतों, असें जानोजी भोंसल्याचें ह्मणणें पेशव्यांनीं मान्य केलें हें वर आलेल्या खुद्द पेशव्यांच्या पत्रावरून स्पष्ट होत आहे. ग्रांटडफ्च्या लिहिण्यांत अशीरगडाचें नांव नाहीं व मुलखाची बेरीज तो तिसांच्या ठिकाणीं बत्तिसांची लिहितो. नागपुरकर भोंसल्यांच्या बखरींत ही संख्या बत्तीस लक्षांचीच आहे. शिवाय तीस लक्षां पैकीं निम्मे मुलूख नर्मदातीरीं रेवा व मुकुंदपुर हे परगणे व बा-

मंडळीस समजाऊन आणावें. " या प्रमाणें त्याच्या मतलबांची याद. त्यास त्याच्या यादीवर करार झाला कीं, " तीस लक्षांचा मुलुख द्यावा. त्यामध्यें पंधरापर्यंत रेवा व मुकुंदपुर. वरकड (जहागीर) वऱ्हाडास लगती द्यावी. किल्ला अस्नेरी द्यावा. " असा करार करून रामा-जीपंताजवळ यादी दिल्ही. त्यामध्यें मसलत हीच कीं, मोंगल बुड-वावा! या प्रमाणें करार झाला. ते ही उदईक जातील. गोपाळरायाची याद एका दो दिवसां जाबसाल होऊन जाईल. वरकड वर्तमान जें होईल तें सेवेशीं लिहीन. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना. वरकडांचे ही थोडे थोडे मतलब करार केले आहेत. वडिलांस कळावें. हे विज्ञापना.

पै॥ छ० १२ मोहरम.

नं० ३१९

(१९ जुलई)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[३] उपरी येथील कुशल तागायत आषाढ शुद्ध सप्तमी रविवासर यथास्थित असे. विशेष. (तुम्हीं) गंगाराम जासूद याज बराबरी बुध-वारचें पत्र पाठविलें तें काली मंदवारीं पावोन वर्तमान कळों आलें. " श्रीमंतावरी (चालून) जावें ऐसें राजे बहादर यांच्या चित्तांत होतें, परंतु पर्जन्य अतिशय, यामुळें राहिले. " ह्मणून लिहिलें तें कळलें. नरी

कीचा निम्मे वऱ्हाडच्या आसपास असावा असें भोंसल्याचें ह्मणणें कबूल केल्याचें व-रील पत्रांत पेशव्यानीं लिहिलेलें आहे त्या विषयीं वरील दोन ग्रंथांत अथवा इतरत्र कोठें उल्लेख नाहीं.

१ भवानराव प्रतिनिधि, गमाजीबावा, पिराजी नाईक, बाबूराव फडणीस, सदाशिव रामचंद्र, नरसिंगराव धायगुडे व गोपाळराव पटवर्धन. २ रामाजी बल्लाळ हा पेशव्यांकडून जानोजी भोंसल्या जवळ वकील होता. ३ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

वर्गणीची पोंच.

सन १८९७ । ९८

(ता. २२ मे पासून २२ जूनपर्यंत.)

मागील वर्षाची.

	रु०
रा. रा. काशिनाथ सखाराम भाटवडेकर. मु० दुरवेस तालुके माहीम.	३
". " सेक्रटरी. ने. ज. लायब्ररी. शिगली.	३

मागील व चालू वर्षाची.

रा. रा. नरसो रामचंद्र शेवडे. हुजूरट्रेझरर धारवाड.	६
रा. सा. कृष्णाजी बळवंत मोघे. चिटणीस. कलेक्टर आफिस "	६
रा. सा. श्रीनिवास व्यंकटेस यादगिरि. मामलेदार ता० इंडी	६
रा. रा. रामचंद्र विठ्ठल जोशी स्कूलमास्तर मु० साखरी आगर पोष्ट पालशेत.	४

चालू वर्षाची.

श्री. रा. भास्कर हरि उर्फ आपासाहेब पटवर्धन.	मिरज.	२८१०
रा. रा. गणेश विठ्ठल उर्फ बन्याबापू पटवर्धन	"	२८१०
" " रामचंद्र भिकाजी गोखले.	"	२८१०
रा. सा नीलकंठ गोविंद गोखले.	"	२८१०
रा. रा. सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. डिग्रज.		३
रा. सा. त्रिंबक गंगाधर खांडेकर. जमखिंडी.		३
श्री. रा. माधवराव विनायक किबे. इंदूर.		३
रा. रा. हरि महादेव पंडित. नागपुर.		३
रा. सा. सदाशिव अनंत छत्रे. मुरगोड.		३
रा. रा. बाळाजी नारायण जोशी. राजकोट.		३
श्री. रा. बाळासाहेब सरदेसाई. जांबोटीकर. बेळगांव.		३
रा. रा. सखाराम त्रिंबक शिरवळकर. मुंबई.		३
" " रामचंद्र गोविंद तळवलकर. "		३
" " सखाराम गणेश देउसकर. कलकत्ता.		३
" " श्रीधर कृष्ण साठे.	पुणें.	३

„ „ सेक्रेटरी. ने ज लायब्ररी. पुणें ३
„ „ प्रिन्सिपाल. फर्ग्युसन कालेज „ ३
डा० रामकृष्ण गोपाळ भांडारकर. एम्. ए. पी एच्. डी. „ ३
रा. रा. गणपतराव कृष्ण उर्फ बाबासाहेब बावडेकर. „ ३
प्रो० आबाजी विष्णु काथवटे. बी. ए. „ ३
श्री. रा. खंडेराव चिंतामण उर्फ तात्यासाहेब मेहंदळे. बी. ए. „ ३

ऐ०ले०संग्रह–कर्ते.

आमचे पुणें व मुंबई येथील एजंट

रा.रा. मुरलीधर मल्हार अत्रे, महाराष्ट्र बुकडेपोचे म्यानेजर, बुधवार पेठ पुणें. रा.रा. विष्णु दासो बनहट्टी. कमिशन एजन्ट आणि जनरल मर्चंट. गिरगांव ट्रामवे टरमिनस्. पेंडसे यांची नवी चाळ मुंबई.

सदरहू दोन असामींस आह्मीं ऐ०ले०संग्रहाचे एजंट नेमिलें आहे. त्यांजकडे तेथील वर्गणीदारानीं वर्गणी द्यावी. आमचीं सर्व पुस्तकें एजंटांकडे विकत मिळतात.

ऐ०ले०संग्रह कर्ते.

ऐतिहासिक-लेख-संग्रह.

मासिक पुस्तक.

आगस्ट. १८९८ इ०.

अंक १५

वासुदेव वामन शास्त्री खरे
मिरज हायस्कुलांतील संस्कृत शिक्षक.

यांनीं

कुरुंदवाड येथें
" भाऊनाना " छापखान्यांत छापविलें.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हांशीलसह तीन रुपये.

फुटकळ अंकास पांच आणे.

ऐतिहासिक–लेख–संग्रह.

हें डेमी अष्टपत्री सांचाच्या चाळीस पृष्ठांचें मासिक पुस्तक दर महिन्यास मिरज येथें नियमानें प्रसिद्ध होत असतें. यांत पटवर्धन जहागीरदारांच्या जुन्या चिटणिशी दप्तरांतील ऐतिहासिक महत्वाचीं व प्रत्येक स्वारीतील भरपूर माहितीचीं पत्रें सालवारीच्या क्रमानें छापून प्रसिद्ध होत असतात. शिवाय अन्यत्र उपलब्ध झालेले कागदपत्र व बखरी वगैरेचा ही यांत समावेश होत असतो. या मासिक पुस्तकाची आगाऊ किंमत सालिना ट० हा० सुद्धां तीन रुपये आहे. ग्राहकांनीं सालिना वर्गणीच्या किंमतीचें व्हा० पे० मागवावें अथवा तितक्या रकमेची मनीआर्डर पाठवावी. त्या शिवाय पुस्तक सुरू केलें जाणार नाहीं.

ऐ०ले०संग्रह कर्ते.

अगत्याची सूचना.

चालू सालची वर्गणी अद्यापि पुष्कळ आश्रयदात्यांकडून यावयाची आहे. दर महिन्यास त्यांस जागें करणें भाग पडतें ! बहुतेकांकडे गेल्या महिन्यांत आम्हीं वर्गणी पाठविण्याविषयीं कार्डें पाठविलीं आहेत. ज्यांकडून वर्गणी यावयाची आहे त्यानीं आतां बिलकुल विलंब न करितां ती पाठविण्याची मेहेरबानी करावी.

ऐ०ले०संग्रह कर्ते.

आमचे पुणें व मुंबई येथील एजंट

रा.रा. मुरलीधर मल्हार अत्रे, महाराष्ट्र बुकडेपोचे म्यानेजर, बुधवार पेठ पुणें. रा.रा. विष्णु दासो वनहट्टी. कमिशन एजन्ट आणि जनरल मर्चंट. गिरगांव ट्रामवे टरमिनस्. पेंडसे यांची नवी चाळ मुंबई.

सदरहू दोन असामींस आम्हीं ऐ०ले०संग्रहाचे एजंट नेमिलें आहे. त्यांजकडे तेथील वर्गणीदारांनीं वर्गणी द्यावी. आमचीं सर्व पुस्तकें एजंटांकडे विकत मिळतात.

ऐ०ले०संग्रह कर्ते.

श. १६८५ मोंगल व पेशवे यांमध्यें युद्ध होण्याचा रंग इ.स. १७६३
रुसलेल्या सरदारांची समजूत

एक दोन मजली फौज पाठीवरी येती तरी (श्रीमंतांची) फजिती होती. परंतु दोन्हीं लष्करें पर्जन्यामुळें घाबरीं केलीं. प्रस्तुत श्रीमंत नलदुर्गा अलीकडे आले. तेथून विश्वंभर दीक्षिताचें पत्र आलें. शिऊभट पावले. त्या गृहस्थाचें पत्र पावलें. "एक गोष्टी होईल. एके गोष्टी साठीं फारच श्रमी कीं आपल्यास अनुकूळ नाहीं; यास्तव आग्रह करूं नये, पुढें सर्व ही होईल, असें विश्वंभर दीक्षितांनें लिहिलें होतें. मुख्य गोष्ट, उभय सैन्यें समीप होतीं तरी श्रीमंतांच्या सैन्यांत बाकी नव्हती. महागाई मोठी. गवताचें नांव नाहीं. नबाबाचें लष्कर ताजें. हें गलबटलेलें. माघारे फिरते वेळेस आम्हांशीं घासाघीस करतील कीं काय न कळे. एक स्थल मिळतें तरी खातरेस न आणितों. कांहीं दुर्गांत, कांहीं येथें[3], कांहीं दुखणेकरी अक्कलकोटीं होतीं. परंतु बोभाट तेथील गृहस्थांनीं होऊं दिल्हा नाहीं. बरें ! नबाब साहेब मेहेरबान होतील तेव्हां स्थल देतील. ईश्वरें त्यांचा बोलें केला हेच गोष्ट थोर. हैदरअल्ली याचें व सावनूरकराचें झुजाचें वर्तमान तरी —— कुरुंदवाडास लिहिलें आलें त्याची नक्कल आली तीच पाठविली आहे. व चिरंजीव मेघश्यामाचें पत्र आहे त्यावरून कळेल. ठाणीं श्रीमंतांस ही दिल्हीं नाहींत. कर्जभरी होऊन इतके दिवस रक्षण केलें. परंतु यांचे धास्तीनें टिकाव धरतीलसें दिसत नाहीं. श्रसित्ता प्र-

---

१ हा विश्वंभर दीक्षित कोण ? हा पटवर्धनांबद्दल पेशव्यांजवळ रदबदली करणारां पैकीं एकजण होता. यानें गोविंद हरीस पत्र लिहिलें त्याचा भाव असा दिसतो. ' आपली जहागीर व मिरज परत मिळावी असें तुमचें मागणें, तर त्यापैकीं जहागीर परत मिळेल. मिरज आजच मिळणार नाहीं. ' २ नळदुर्गांत. ३ मंगळवे-ढ्यास. ४ बोलबाला, चढती कमान. ५ ' आमच्या जहागिरी पैकीं ठाणीं आम्हीं श्रीमंतांस परत दिलीं नाहींत. लोकांचें कर्ज काढून आजपर्यंत तीं रक्षण केलीं. आत तीं हैदरअल्ली घेणार. ' ६ हैदराच्या

माण ! तुम्हीं निरोप घेऊन याल तेव्हां बहुत सावधपणें वाटेचे येणें. थोर शत्रु आहेत. सोलापुरकर मार्गीं धांवतात. फारच सावधगिरीनें येणें. काली नीलकंठ महादेव याचे पांचशें स्वार बाबूसखाजी श्रीक्षेत्रीं उतरावया आले. रात्री पत्र आलें. आजी उतरतील. कैवड्या येतो. गुरसाळे यांशीं कांजिया करणार, ह्मणोन आवई. परंतु थोडा आहे. बातमीच्या जासुदानें सांगितलें कीं, अक्कलकोटा अलीकडे राहिला होता. बसालतजंग निरोप घेऊन मनुराजवळी भीमा पार होऊन जाणार. नाईक पावावया जाणार. ह्मणोन [6]बोली आहे. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद. मर्जी रक्षून येणें. पुढें मुद्देहंशील होतील. (तो) दरबार थोर आहे. एकाएकीं सारें होणार नाहीं. हे आशीर्वाद. चिरंजीव नीलकंठरायाचा लाखोटा व विष्णुपंताचा व चिंतामणीचा व कुरुंदवाडचे पाठविले आहेत. समस्त चिरंजीव मंडळीस आशीर्वाद. लिहिलें पारिसिजे. याल तेव्हां मार्गाचे सुरक्षित सावधपणें यावें. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

अपत्यें पुरुषोत्तमानें व पांडूनें शिरसाष्टांग नमस्कार. सविस्तर वडिलांचे पत्रावरून कळेल. नबाबाची व राजे बहादर यांची मर्जी संपादून यावें. रहावया चांगलें स्थल तेच देतील. सर्व चिंता श्रीस आहे. दोन तीन दिवसा आड पत्रें पाठवीत गेलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. लोभ करावा. हे विज्ञापना.

पै॥ छ० ८ मोहरम.

---

१ हे बाबूजी नाइकाकडील लोक. २ हा नीलकंठ महादेव उर्फ आबा पुरंदरे याजकडील सरदार. ३ भीमा उतरण्या करितां. ४ महिपतराव. ५ कवड्याजवळ लोक थोडे आहेत. ६ बातमी श्रीमंतांच्या लष्करची.

श. १६८५ मोंगल व पेशवे यांमध्यें युद्ध होण्याचा रंग इ.स. १७६३

रुसलेल्या सरदारांची समजूत

नं० ३२०

(आषाढ शुद्ध सप्तमी
१७ जुलई.)

श्रीगणराज.

विनंती[१] उपरी. येथील वर्तमान जकारनामकाच्या पुरोहितानें प्रथम आ-

---

१ हें पत्र गोपाळरावानें लिहिलें आहे. यांतील विषय व व्यक्ति यांचा सांकेतिक रीतीनें निर्देश केला असल्यामुळें हें दुर्बोध झालें आहे. याचा अर्थ उकलण्याची बरीच खटपट करून ही मनास पूर्ण समाधान होईल अशा प्रकारचा आह्मांस अर्थ काढितां आला नाहीं. तथापि जो समजला आहे तो येथें देतों. प्रथम व्यक्तींचीं नांवें सांकेतिक दिलीं आहेत त्यांचा अर्थ — १ जकारनामक=जानोजी भोंसले. २ रकारनामक=रामाजी वल्लाळ. हा पेशव्यांकडून भोंसल्याच्या दरबारीं नेहमीं राहणारा वकील होता. ३ पिकारनामक=पिराजी नाईक निंबाळकर. ४ दकारनामक=दिवाकरपंत चोरघोडे. हे भोंसले यांचे दिवाण व पेशवाईंतील साडेतीन शहाण्यापैकीं एकजण होते. ५ सकारनामक=सखारामबापू. पेशव्यांचे दिवाण. ६ उभयतां मध्यस्थ = विठ्ठल शिवदेव विंचूरकर व नारो शंकर राजे बहादर. हे दोघे ही सांप्रत पटवर्धन व पेशवे यां मध्यें सलोखा करण्या करितां झटत असून पेशव्यांकडून ठरलेल्या शर्ती अमलांत येतील याबद्दल पटवर्धनांची खात्री करण्या करितां हमीदार झाले होते. आतां पत्रांतील मचकूर आह्मांस जो समजला आहे तो असा. मोंगलाकडे रुसून गेलेले मराठे सरदार आतां पुन: पेशव्यांशीं समेट करून घेण्याची इच्छा करीत होते. पेशव्यांची ही तीच इच्छा असल्यामुळें हें राजकारण जुळून येण्याच्या रंगास आलें होतें. या विषयीं खुद्द दादासाहेबांकडून पत्रें घेऊन त्यांचे खिजमतगार गोविंद हरीकडे आले होते. गोविंद शिवराम खासगीवाले व विसाजी नारायण यांजकडून ही इशारा आला होता व विंचूरकर आणि नारो शंकर यांणीं पूर्वी प्रमाणें मध्यस्थी करण्याचें कबूल केलें होतें. या बद्दल मागें उल्लेख आले आहेतच. त्यावरून गोपाळरावानें समेटाच्या शर्ती ठरविण्या करितां मोंगलाच्या लष्करांत आपण असतां तेथून दोन असामी पेशव्यांकडे पाठविले. त्या दोघांत एकजण कारकून होता व दुसरा त्याच्या भाऊबंदां पैकीं एक-

पणच हा प्रकार करावा ह्मणोन रकार नामकास रवाना केलें. तेव्हां आम्हीं मागें पुढें घेत होतों. त्या समयीं कित्येक (त्यानें आह्मांस) स्व-

जण असावा. प्रस्तुतचें पत्र गोपाळरावानें त्या दोघां पैकीं जो कारकून होता त्यास लिहिलें आहे. याच विषयावर नं० ३२२ चें पत्र आहे तें त्यानें त्या दोघां पैकीं जो भाऊबंद होता त्यास लिहिलें आहे. आमच्या मतें हे दोघे गोपाळरावानें पाठविलेले मनुष्य शिवाजी बावाजी म्हैसकर व नारायणराव कृष्ण पटवर्धन हे असावे. हेच ते दोघे होते या विषयीं आम्हांस शंका नाहीं. भोंसल्याच्या मनांत फार दिवसांपासून होतें कीं, पेशवाई नष्ट करून तो अधिकार आपण मिळवावा. ह्याच हेतु सिद्ध करण्या करितां तो मोंगलास येऊन मिळाला होता. परंतु अलीकडे त्यास असें वाटूं लागलें होतें कीं, मोंगलाशीं सख्य केल्या पासून त्याचा मात्र फायदा झाला. आपला फायदा झाला नाहीं व आपला हेतु कधीं तडीस जावयाचें चिन्ह दिसत नाहीं. तर आतां पेशव्यांशींच समेट करून त्यांजकडून आपलें कल्याण करून घ्यावें. जानोजी भोंसल्यास पेशव्यांशीं समेट करण्या विषयीं सल्ला देणाऱ्या त्याच्या दरबारी लोकांत त्याचा ‘ पुरोहित ’ प्रमुख होता. पण हा पुरोहित कोण हें कांहीं आम्हांस उमगत नाहीं. व नागपुरकर भोंसल्याच्या बखरी वरून ही त्याचा खुलासा होत नाहीं. असो. या पुरोहितानें पेशव्यांकडून मोंगलाकडे रुसून गेलेल्या पटवर्धन, प्रतिनिधि, धायगुडे, निंबाळकर वगैरे सरदारांस सांगितलें कीं, श्रीमंतांशीं सख्य करावयाचें तें तुह्मीं आह्मीं मिळून सर्वांनीं एकदम केलें असतां अधिक फायदेशीर होईल. ते सरदार मोंगलाची बाजू सोडण्यास कबूल होईनात; तेव्हां त्यानें त्यांस बोध केला कीं, हिंदुधर्माचा उत्कर्ष करणाऱ्या पेशव्यांस आपण जाऊन मिळावें हेंच योग्य. यवनाकडे राहणें श्रेयस्कर नाहीं. या बोधावरून ते त्याच्या ह्मणण्यास कबूल झाले. मग पुरोहितानें ‘ रकारनामका ’ स ह्मणजे रामाजी बल्लाळ यास सलोख्याच्या शर्ती ठरविण्या करितां पेशव्यांकडे पाठविलें. पण ही मसलत भोंसल्याचा दिवाण दिवाकरपंत यास रुचली नाहीं. त्यानें पेशव्यांच्या लष्करांत नेहमीं राहणारा भोंसल्याचा वकील दुसरा एकजण होता त्यास गुप्तपणें सूचना पाठवून त्याजकडून आपल्या मतलबास उपयोगी असें जानोजी भोंसल्यास पत्र पाठवविलें. त्या पत्रांत भोंसल्यास उपदेश केला होता कीं, तुह्मीं पेशव्यांकडे येऊं नये. आलांत तर जाधवरावा प्रमाणें तुमची दशा होईल. पेशव्यांचें राज्य आतां लयास जावयाच्या बेतांत आलें आहे. या करितां तुह्मीं मोंगलाचें सख्य करावें व त्याच्या मदतीनें पेशव्यांस बुडवून त्यांचा अधिकार आपणच संपादा-

श. १६८५ मोंगल व पेशवे यांमध्यें युद्ध होण्याचा रंग इ.स. १७६३

रुसलेल्या सरदारांची समजूत

धर्माचे बोध केले आणि सर्वांनीं जावें असा सिद्धांत केला. तेथील करार मदार त्यांचे मनोदयानुरूप होऊन यादी जाहल्या. लढा आमचे विषयीं थोडासा मात्र तेथें. त्यांच्या कामास तिलमात्र गुंता नाहीं असें जाहलें. परवां येथें पुरोहितानें आपल्या यजमानास काय समजाविलें न कळे. तेथून प्रथम जकार नामकाकडील वकिलानें पत्र लिहिलें होतें तें कांहीं स्वबुद्धीनें लिहिलें नाहीं. परबुद्धीनेंच लिहिलें. त्यांत नाना प्रकारे दंश लिहिले होते. तें पत्र [आल्यावर भोंसल्यांनीं] आह्मांसही दाखविलें. आम्हीं तें पाहिलें. कळेल तेणें प्रमाणें निराकरण ही केलें. " या प्रमाणें करार करून घेऊन जाऊन मागती दगाबाजी (श्रीमंत व त्यांचे कारभारी) करितील तर या गोष्टी कदापि घडणार नाहींत. पहिल्या पासून त्याचे हस्तानें तुमचें कामकाज होत होतें. या समयीं तुम्हीं त्यास कळू न देतां परस्परें रकारनामकास पाठवून कार्य करून घेतलेंत. यास्तव तुमचा

वा ! हें पत्र भोंसल्यानें किंवा त्याच्या ' पुरोहितानें ' गोपाळरायास दाखविलें तेव्हां त्यानें सांगितलें कीं, तुह्मा आह्मांस श्रीमंत आपणाकडे यावयास सांगत आहेत ते ज्या प्रमाणें कबूल करितील त्या प्रमाणें तडीस नेतील. त्यांचा विश्वास आह्मांस आहे. दगाबाजी त्यांच्या हातून घडणार नाहीं. पण हें बोलणें भोंसल्यास खरें वाटेना व पुनः पुनः त्याच्या मनांत महत्वाकांक्षेनें उचंबळ खाल्लयामुळें तो ह्मणूं लागला कीं, सातारकर छत्रपतींच्या राज्याचा उपभोग पेशवे घेत आहेत तो त्यांनींच कां घ्यावा ? आम्हीं कां घेऊं नये ? मोंगलाची मदत घेऊन आपण पेशवाई बुडविणार ! गोपाळरावास पेशव्यांचा उच्छेद व्हावा अशी इच्छा नव्हती. त्यानें आपण स्वतः पेशव्यांकडे पाठविलेल्या दोघां वकीलां पैकीं एकास [कारकुनास] हें पत्र लिहून कळविलें कीं, विंचूरकर व नारो शंकर यांच्या मध्यस्थीनें आपल्या मागण्या श्रीमंतांकडून कबूल करवाव्या ह्मणजे आम्हीं फौजेसह तावडतोब निघून येतों. भोंसले कांहीं लालूच दाखवून आपणास बरोबर घेऊन जाऊं लागतील तर आपण त्यां बरोबर जात नाहीं. इ. इ.

योग न घडावा ह्मणून हा विचार त्यांनीं लिहविला. यजमानापासून करार झाला असतां आणि त्यांचे कार्याकरितां तुह्मीं गमन करून तेथें जाल तेव्हां त्या उभयतांकडून अशा गोष्टी कदापि घडणार नाहींत'' अशी त्यांची निशा आह्मीं बहुता प्रकारें केली. परंतु त्यांस सत्य न भासे. शेवट त्यांणीं रुकारनामकास पत्र लिहिलें जे, 'तुह्मीं सत्वर निघून यावें.' हा भाव तेथें कळोंच देऊं नये, मशारनिल्हे येथें आल्यावर स्पष्ट लिहोन पाठवावें, या प्रमाणें करार करून पत्रें पाठविलीं. येथें आपले मुद्दे करार करून घेऊन पुरोहित इमान प्रमाणास गुंतले. पिकारनामक काल निघोन जात होते, त्यांस आपण मध्यस्ती करून आपणा समागमें गुंताविलें. "आम्हांस ही त्या प्रमाणें गुंतवावें. कोणास जाऊं देऊं नये. एक मुठीनें सारें असावें. अविंधासीं[1] घेऊन एक दोन मजली यजमानांच्या[2] पाठीमागें जावें. तदोत्तर त्याच मार्गें धारुरास जाऊन शहरांस[3] जावें. आणि खानदेशांत छावणी करावी. आपले मतलब यवना जवळेन करून घेतले. तिकडे[4] न यावें. आजपर्यंत श्रीमंतांनीं राज्यभार केला. आतां त्यांस निर्दाळून आपणच पेशवाई दौलत करावी. यांचें काम त्यांणीं[5] व त्यांचें काम यानीं करून द्यावें." हा प्रकार झाला. यजमानांचें[6] (ज्यांत) कल्याण तो मनसबा करीत होते ह्मणून आम्हीं त्यांत होतों. आता हा नवीन प्रकार करितात, तर त्यांत कांहीं आम्हीं गुंतत नाहीं. आम्हांस विश्वास त्यांचा[7] आहे. करार करितील तेणें प्रमाणें निभावणी होईल हे आमची खातरजमा. त्यांत उभयतां दरम्यान, अशा गोष्टी असतां लटक्या कल्पना ध्यावयासीं कारण काय? आजपर्यंत तिकडे[8] येणार ह्मणोन एक मुठीनें सारे[9] होते. आतां

१ नवाबास. २ पेशव्यांच्या. ३ औरंगाबादेस. ४ पेशव्यांकडे. ५ भोंसल्याचें. ६ नवाबानें. ७ पेशव्यांचा. ८ पेशव्यांकडे. ९ पटवर्धन, प्रतिनिधि वगैरे मोंगलाकडे गेलेले सर्व सरदार.

श.१६९५ मोंगल व पेशवे यांमध्यें युद्ध होण्याचा रंग इ.स.१७६३
रुसलेल्या सरदारांची समजूत

[१]त्यांचें मानस यांतून कोणास जाऊं देऊं नये. लटकें बोलून ठेऊन घेऊन यजमान नाहींतच असें करावें आणि आपण राज्यभार करावा ! " त्यांनींच करावा, आम्हीं कां न करावा ? त्यांत आतां त्यांचे घरचा सर्व प्रकारें बखेडा. द्रव्य नाहीं. लोकांचे दंगे. पुढें जथही नाहीं. यवनाची काबू आपण साधून द्यावी. आपलें काम करून घ्यावें. " हा प्रकार केला ! राजकारणें सर्वांचीं या प्रमाणें लागलीं हें ही कार[३]भारीयांजवळ सांगितलें ! आपल्या गुणास दकारनामक चुकले नाहींत. यास्तव तुम्हीं आपला प्रकार सकारनामक व उभयतां मध्यस्त यांजखेरीज फुटूं नये. या प्रमाणें धरबंद करून आपली निशा आपल्या उभयतांच्या विचारें करून घेणें आणि उत्तर पाठवून देणें. आम्हीं येथें यांजवळ गुंतत नाहीं. [४]त्यांचें राज्य लयास जावें असा आमचा द्वेष नाहीं. हें वर्तमान या प्रकारें झालें याज करितां लिहिलें आहे. जकारनामकाच्या वकिलानें स्पष्ट लिहिलें जे, " तुम्हीं ज्या पक्षाचा अंगीकार केला तो पक्ष शेवटास नेऊन आपली काबू साधणें. या उपरी हे[५] लयास जावया कांहीं फार दिवस लागत नाहींत. ईश्वर तुम्हांस श्रम न करितांच अल्पश्रमें करून कार्य करून देतो. येथें कांहींच जीव राहिला नाहीं. फौजेचा ही हंगाम या उपर पडत नाहीं. तुम्हीं अग्रेसर जाहलां ह्मणजे विलंब लागत नाहीं. तर प्रस्तुत तुम्हीं [६]यावयाचें न करणें. आणि मातबर ओझें[७] ईश्वर देतो हें घेणें. " या प्रमाणें नाना प्रकारें लेखन केलें होतें. " असें होऊन आलां तर जाधवराया प्रमाणें होतें. " (असें लिहिलें होतें.) एतद्विषयीं शपथ ही लिहिली होती.

---

१ भोंसल्याचें. २ मसलत. ३ दिवाकरपंतानें राजे विठ्ठल सुंदर यास सांगितलें कीं सारे मराठे सरदार पेशव्यांकडे जाऊं पहात आहेत. ४ श्रीमंतांचें. ५ पेशवे. ६ पेशव्यांकडे यावयाचें. ७ सर्व मराठी राज्याची मालकी.

बहुत काय लिहिणें. रवाना छ० ९ रोज रविवार. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं० ३२१L

(आषाढ शुद्ध नवमी
१९ जुलई.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० ७ मोहरम मुक्काम नजीक नेलदुर्ग येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलांकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सदैव पत्र पाठवावयासीं आज्ञा केली पाहिजे. विशेष. इकडील वर्तमान तर लढाई विषयीं तीर्थरूपांचा[2] आग्रह बहुत होता. परंतु मल्हारबा आदीकरून येऊन विनंती केली कीं, ' प्रस्तुत घोड्यांत जीव नाहीं. व महागाईमुळें माणसें ही खराबींत आलीं आहेत. या दिवसांत लढाई करूं नये. ' खर्चाचा मजकूर तर — सर्व ह्मणाले कीं, ' देशच्या[3] लगत्यास चलावें. ह्मणजे खर्चाची तजवीज करूं.' या प्रमाणें गोष्ट ठरून कूच व्हावें, त्यास आज पर्जन्य आला यास्तव मुक्काम होईल. उदईक कूच होऊन तुळजापुरच्या सुमारें येऊं. मोंगलाकडील प्रकार तर, येथून दहा कोस आवशा अलीकडे आहे. त्याची ही पावसानें बहुत खराबी केली. त्यानें एक कूच तीन कोसाचें केलें त्या दिवशीं तोफा राहिल्या. बैल व घोडीं राहिलीं होतीं. मग दुसरे दिवशीं

१ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. २ मोंगलाशीं लढाई करण्याचा दादासाहेबांचा आग्रह होता. ३ पुणें प्रांताच्या.

सर्व एका जागां झाले. या प्रमाणें त्याचा ही प्रकार आहे. लढाई करावी हें पैहिलें होतें तेव्हां न झालें. प्रस्तुत पैशाचा ही पेंच व दाणा ही अगदीं नाहीं. भोंसल्याकडील रामाजी बल्लाळ आज निरोप घेऊन करार मदार होऊन गेले. त्यार्णी शपथ केली कीं तुम्हीं तिसा कोसांचें अंतर पाडावें ह्मणजे शपथपूर्वक जानोजीस घेऊन येतों. या प्रमाणें बोलून आज गेले. वडिलांस कळावें. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

पै॥ छ० १३ मोहरम.

नं० ३२२

[आषाढ वद्य प्रतिपदा
२९ जुलई]

श्रीगणराज.

चिरंजीवैस आशीर्वाद उपरी. काल आम्हीं भोंसल्यानजीक राहिलों. त्याजकडे नैकारनामक धायगुडे गेले होते. त्यास उमज पडला. या उपरी आज कांहीं आम्हांशीं बोलणार. परंतु आपण निघतों ह्मणून (त्यानीं) आम्हांस ठेऊन घेतलें तरी (आम्हांस) राहणें नाहीं. कसा

---

१ लढाई करण्याची संधि पूर्वी होती तेव्हां लढाई केली नाहीं. २ नागपुरकर भोंसल्याच्या बखरींत रामाजी बल्लाळ हा पेशव्यांचा वकील होता असें लिहिलें आहे. वरील लिहिण्यांत तो भोंसल्याचा वकील होता असा ही अर्थ निघूं शकतो. ३ हें गोपाळरावाचें (बहुधा) चुलतबंधु नारायणराव कृष्ण यास पत्र. ४ नरसिंगराव धायगुडे यानीं जानोजी भोंसल्याची गांठ घेऊन त्यास बोध केला कीं, मोंगलाच्या आश्रयानें पेशव्यांचा नाश करून सारें मराठी राज्य आपल्या ताब्यांत घेण्याचा तुह्मीं मनसबा केला आहे हा सिद्धीस न जातां यांत तुमचा नाश होईल. तेव्हां त्यांचें ह्मणणें खरें आहे अशी जानोजीची खात्री होऊन तो पेशव्यांशीं पुनः सख्य करण्याची इच्छा प्रदर्शित करिता झाला. ५ आज आमचें व भोंसल्याचें बोलणें होणार.

ही निकाल तुमचें पत्र आल्या नंतर काढून येतों. तुमच्या पत्राचा मार्ग पहातों. बाकी कांहीं गुंता नाहीं. काल संध्याकाळीं खंदारकर ही आले होते. [त्यांचे] बोलण्यांत कांहीं जीव नाहीं. 'स्थळ मिळेल तेव्हां देऊं. सरंजाम बसालतजंगाचा सोडवून तुम्हींच घ्यावा.' (असें ते बोलले.) सारें वायूवरील मथन हें उमजलें. त्यांचा ही आम्हांशीं कांहीं अंतर विचार नाहीं. ज्या गोष्टीनें तुमचें कल्याण ते गोष्टी तुम्हीं आपली करावी या प्रमाणें मशारनिल्हेनीं घरोब्याचा विचार सांगितला. आम्हीं तुमचें पत्र आल्यानंतर निरोप घेऊन येतों. तुम्हीं सत्वर बुंद्धिकोटास जाऊन तेथें विलंब न लावितां निघोर्न जावें. आणि पत्र त्वरित पाठवावें. दिवाकर व जकारनामक उभयतां समजले. पिकारनामक गेले. चित्रगुप्त

१ पटवर्धनांचा मोंगलाच्या दरबारांत प्रवेश होण्यास कारण खंदारकर राजे गोपाळसिंग. त्याच्या मार्फतच नबाबानें व त्याच्या दिवाणानें गोपाळरावास आश्वासन दिलें होतें कीं, तुह्मांस राहण्या करितां आह्मीं एक किल्ला देऊं. शिवाय अदवानीचा नबाब बसालतजंग याची ही सारी जहागीर तुह्मांस देऊं. महाराष्ट्रांतील ही कित्येक ठाणीं व परगणे यावेळीं मोंगलानें गोपाळरावास देऊं केले असावे. ती देणग्यांची लांबची लांब याद पाहून तिची वास्तविक किंमत काय आहे हें गोविंद हरीनें त्याच वेळीं ताडिलें होतें. या यादींतील देणग्या ह्मणजे केवळ शिवलंगणाचें सोनें होय अशा अर्थाचा त्याचा त्या वेळचा उद्गार होता. (पहा नं० १८० च्या पत्रांतील शेवटचा मजकूर.) तोच खरा होता असें गोपाळरावाच्या प्रत्ययास आतां आलें! कारण कीं मोंगलाचा निरोप त्याच गोपाळसिंगाच्या मार्फत आतां गोपाळरावास आला कीं किल्ला आह्मीं तुम्हांस द्यावयाचा कबूल केला आहे खरा, पण तो आम्हांस मिळेल तेव्हां देऊं. बसालतजंगाची जहागीर तुम्हींच त्याशीं लढाई करून जिंकावी! २ आंतून एक, बाहेरून एक, अशी गोपाळसिंगाची वागणूक आम्हाशीं नाहीं. पेशव्यांकडे जाऊन तुमचें कल्याण होत असेल तर तुह्मीं तसेंच करा असें तो आह्माशीं बोलला. ३ अक्कलकोटास. ४ निघून श्रीमंतांच्या लष्करास जावें. ५ जानोजी भोसले व दिवाकरपंत शुद्धीवर आले. ६ पिराजी नाईक निंबाळकर. ७ बाबूराव फडणीस चाकरीवर गेला असें गोपाळराव लिहितो याचा अर्थ कळत नाहीं. कारण त्याचा मुलगा

चाकरीवर गेला. हे सारे ' गच्छ ' करणार असें पुर्ते उमजोन शुद्धीवर आले असें दिसतें. परंतु भरंवसा धरून त्यांनीं येतों म्हटलें तत्रापि वचनांत सांपडून गंगेपर्यंत[2] समागमें न्यावयाची युक्ति करतील तर त्यांत सांपडत नाहीं. तुम्हीं साऱ्यांस बोलोन घेऊन त्वरित जाणें जातांना सोलापुरास चिरंजीव दाजीस पत्र पाठवावें. तेथून जात तें करणें. तारीख छ० १३ मोहरम हे आशीर्वाद.

नं० ३२३[L]

(आषाढ वद्य पंचमी
३० जुलई.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० १८ मोहरम मुक्काम सोनारी येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलीं छ० १४ मोहरमचें पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. इकडील वर्तमान मजकूर तर पूर्वीं सेवेशीं राजकारणाचा प्रकार लिहिला होता. त्यास प्रस्तुत पिराजी नाईक निंबाळकर मोंगल याची रजा घेऊन आले.

मोरोबा दादा गोपाळरावा बरोबर मंगळवेढ्यांस गेला व तेथून त्या बरोबरच श्रीमंतांच्या लष्करांत गेला. तेथें महिना पंधरा दिवस गोते खातां खातां शेवटीं फडणिशी गोपाळरावाच्या रदबदलीनें त्याचा चुलत भाऊ नाना फडणीस यास मिळाली. तेव्हां सांप्रत ' चित्रगुप्ता ' ची चाकरी त्याजकडे होती कोठें ?

१ शुद्धीवर येणारे अर्थात् भोंसले व दिवाकरपंत. २ गोदावरीपर्यंत. ३ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र.

त्यांची आमची भेट काल सुभेदारा[1] मार्फत झाली. तीर्थस्वरूप दादासाहेब यांची भेट आज झाली. त्यांचा मनोदय आहे कीं, चार दिवस घरास जाऊन सरंजाम सुद्धां येऊं. या प्रमाणें त्यांचें बोलणें आहे. परंतु त्यासीं बोलून ठराव होईल त्या प्रमाणें करितील. राजश्री गोपाळराव व मोरो बाबूराव व नरसिंगराव धायगुडे असे त्रिवर्ग उठून[2] मंगळवेढ्यांस पोंचले. त्यांशीं आणावयासीं गोविंद[3] शिवराम जातील. त्यांचें ही पत्र आजच आलें. मिरजेच्या सनदा व मोरोबाच्या फडणिसीचा प्रकार — आजच त्यांसीं बोलावून आणून सनदा द्याव्या हा निश्चयच आहे. परंतु तीर्थस्वरूपांचे मतें कीं ते आल्यावर सनदा देऊं. व मोरोबास ही फडणिसी देऊं. या प्रमाणें तीर्थस्वरूपांचे मतें आहे. परंतु त्यांस आतांच सनदा गोविंदपंताजवळ; द्याव्या व मोरोबास ही घेऊन यावें या प्रमाणें करार करून मध्यस्थांजवळ सनदा द्याव्या, या प्रमाणें गोपाळरायाचा मनोदय आहे. त्यास तीर्थस्वरूपांजवळ ठीक करून त्यांची[4] रवानगी करूं. सदाशिव रामचंद्र; ह्याचा प्रकार तर यावें असाच आहे. परंतु त्याची माणसें शहरांत[5] गुंतलीं आहेत. भोंसले यांची यादी करार होऊन गेली. परंतु त्याचा यावयाचा अनमान आहे. त्याचा ही दोन्ही डगरींवर हात आहे. व नबाबास ही त्याचा संदेह बहुत झाला आहे. प्रस्तुत मोंगलाचा मुक्काम धारूरानजीक आहे. मोंगलाच्या मतें धारूरचा घांट उतरून शहरास जावें. या प्रमाणें त्याचा मजकूर आहे. आवशा अलीकडे मुक्काम त्याचा होता. त्या मुक्कामीं चार दिवस झड बहुत बसली यामुळें तोफा साऱ्या राहिल्या,

---

१ मल्हारराव होळकरामार्फत. २ मोंगलाच्या लष्करांतून निघून. ३ पण पुढें गोपाळराव वगैरे पटवर्धन मंडळीस आणण्या करितां गोविंद शिवराम खासगीवाले गेले नाहींत. तें काम नारो शंकर याजकडे सोंपविण्यांत आलें होतें. नारो शंकर व विठ्ठलराव विंचूरकर हे पटवर्धनांचे मध्यस्थ होते हें पूर्वीं कित्येकदां लिहिलेंच आहे. ४ खासगीवाल्यांची. ५ औरंगाबादेंत.

व बैल, घोडीं, व उंटें चार हजार पर्यंत राहिलीं. ही अवस्था पांडू[1] पाडून आला. प्रस्तुत ते[2] निम्मे तोफा बरावर घेणार. त्या ही न चालाव्या अशा आहेत. आमचे छावणीचा मजकूर तर अद्यापि निश्चय नाहीं. निश्चय झाल्यावर लिहीन. वडिलांस कळावें. सुभेदारांच्या[3] मतें चार दिवस एके जागीं चारा दाण्याची सोय पाहून महिना पंधरा दिवस राहून मग लोकांची समाधानी करून थोडें बहुत (खर्चास) देऊन मोंगलावर जावें. त्यास प्रस्तुत नगरच्या समीप येऊन मोंगलाच्या कर्तव्या प्रमाणें करावें लागेल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै।। छ० २३ मोहरम.

नं० ३२४

(अजमासें आषाढ वद्य
जुलईचा दु०पंधरवडा)

श्री.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोविंदराव गोपाळ
स्वामीचे सेवेशीं:—

पोष्य विठ्ठलराव शिवदेव. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे. विशेष. श्रीमंतांनीं करार करून पत्रें पाठविलीं आहेत तें प्रमाणच आहे. आम्हीं निभाऊन देऊं. त्यांनीं अंतर केलें तर आम्हीं तुमचे सोबती ऐसें जाणून निःसंदेह सत्वर यावें. पूर्वीं आम्हीं तुम्हां खेरीज नव्हतों. आतां ही नाहीं. कोणी कित्येक वसवसा[4] घालतील (तर) तिलतुल्य न धरावा. विशेष

१ पांडुरंगपंत गोडबोले. २ मोंगल. ३ मल्हारराव होळकराच्या. ४ संशय.

काय लिहिणें. लोभ असों दीजे हे विनंती. श्रीमंतांनीं मुद्यांची याद कलमें करार केलीं आहेत त्या प्रमाणें शपथपूर्वक निभाऊन देऊं. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं० ३२९L

(आषाढ वद्य एकादशी
९ आगस्ट.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई[1] वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० २४ मोहरम मुक्काम नजीक बीड येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. इकडील वर्तमान तर प्रस्तुत नगरच्या सुमारें येत आहों ह्मणून पूर्वी सेवेशीं लिहिलें होतें, त्यास तो प्रकार राहून बीडच्या सुमारें आलों; याचें कारण हेंच कीं, बीडची खंडणी घ्यावी व मोंगल गंगा शहागडाजवळ उतरणार या. स्तव या सुमारें आलों. आह्मीं या सुमारें आल्यावर तो गंगा उतरतो किंवा आम्हांकडे येतो हें पहावें ! प्रस्तुत मोंगलाचा मुक्काम शहागडावर गेला गंगेस पाणी बहुत आहे. असें ही करितां तो नांवावरून उतरत आहे. तर त्या संधी मध्यें गांठावें हा ही प्रकार. व दुसरें बीडची खंडणी एक लक्ष बारा हजार करार केली. त्यामध्यें अठ्ठावन हजार रोख द्यावे असें ठरलें त्यास ते आणावयास महादशेट पाठविले आहेत. वरकड बाकीची मदत केली आहे. तो ही ऐवज सत्वरच येईल. मोंगलाची बातमी आली. त्यामध्यें हाच प्रकार आहे कीं, त्यांची फौज प्रस्तुत पंधरा सतरा हजार आहे. त्यामध्यें दाजीबास[2] बरें वाटत नाहीं, यास्तव ते व त्यांचे धाकटे

१ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. २ दाजीबा हा जानबा निंबाळकर,

बंधु निरोप घेऊन फौज सुद्धां आले. व पूर्वी ही गोपाळराव, पिराजी नाईक, मोरोबा, नरसिंगराव धायगुडे. हे पूर्वींच मंगळवेढ्यास आले. त्या वरून त्याची फौज बहुतच हलकी झाली व भोंसले आहेत त्यांचा ही इतबार त्यास येत नाहीं. व भोंसल्यांचे लोक खाया[1] वांचून उठोन जातात, अशी बातमी आज आली. त्यास आज सर्व सरदारांस बोलावूं पाठविलें आहे. त्यांच्या मतें जो विचार ठरेल त्या प्रमाणें करूं. गोपाळराव वगैरे यांस आणावयास नारो शंकर पाठविले आहेत. ते ही लवकरच येतील. पिराजी नाईक समागमेंच आहेत. महादजी शिंदे उज्जनीवर आले आहेत. त्यांनीं लिहिलें होतें कीं, आज्ञे प्रमाणें येऊन वऱ्हाडचें पुरतें पारिपत्य करितों. या प्रमाणें त्यांचीं ही पत्रें आलीं. वडिलांस कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० ६ सफर.

नं० ३२६

(७ आगस्ट)

श्रीगणराज.

चिरंजीव राजश्री महादाजीपंत[2] यांसीं प्रती गोविंद हरि आशीर्वाद. उपरी येथील वर्तमान तागायत आषाढ वद्य त्रयोदशी इंदुवार मुक्काम मंगळवेढें सुखरूप असों विशेष. इकडील वर्तमान तर चिरंजीव मंडळीसह आम्हीं येथें आलों. त्या उपरी श्रीमंतांकडून राजश्री नारो शंकर आले.

मोंगलाकडील प्रसिद्ध सरदार, याचा गुलगा.

१ खावयास न मिळाल्या मुळें घरोघर निघून जात आहेत. २ महादाजीपंत उर्फ महादाजी बल्लाळ हा हें पत्र लिहिणारा त्रिंवक हरि कुरुंदवाडकर याचा कारभारी. हा प्रस्तुत कुरुंदवाडींच होता.

एकादशीस क्षेत्रास आले. आम्हीं ही तेथें गेलों होतों. त्यांस घेऊन येथें आलों. बोलणें झालें. श्रीमंतांची कृपा पूर्वी पेक्षां विशेष दिसून आली. चिरंजीव मंडळी बुधवारीं श्रीमंतांकडे जातात. आम्हीं ही तेच दिवशीं निघून सहपरिवारें येतों. राजश्री विसाजीपंत ही नारो शंकर यां समागमेंच आले होते. ते व आम्हीं बरोबरच येतों. चिरंजीव राजश्री नीलकंठराव जातात. कळावें बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० ३२७

(८ आगस्ट.)

श्रीगणराज.

अपत्यें धोंडूनें दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत आषाढ वद्य चतुर्दशी इंदुवारीं प्रथम प्रहर. वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. इकडील वर्तमान तरी श्रीमंतांकडून राजश्री नारो शंकर समजाविशी करावयास मंगळवेढ्यास आले. मंदवारीं त्यांचें बोलणें चालणें व्हावयाचें तें झालें. राजश्री निघोन काल गेले. श्रीमंत यजमान मंडळी ही बुधवारीं प्रतिपदेस श्रीमंतांकडे भेटीस जाणार. भेटी झाल्या नंतर मिरजेच्या सनदा देणार. आधींच स्थल द्यावें तर लौकिकांत एक प्रकारचें दिसतें. यास्तव भेटी अंतीं देतील. राजश्री लक्ष्मण कोन्हेर यांस (पेशवे सरकारांतून) पत्रें गेलीं आहेत कीं, ‘ स्थळ रिकामें करून ठेवणें. सनदा येतांच स्थळ देणें, ’ ह्मणोन गेलीं आहेत. श्रीमंत राजश्री

१ या पत्रावर जरी ‘ गणराज ’ आहे तरी पत्र लिहिणारा धोंडू हा पटवर्धनां पैकीं कोणी होता असें समजावयाचें नाहीं. ‘ श्रीमंत यजमान मंडळी बुधवारीं प्रतिपदेस श्रीमंतांकडे [पेशव्यांकडे] भेटीस जाणार ’ असें या पत्रांत पुढें वाक्य आलें आहे त्यावरून हा पटवर्धनांच्या कारकुनां पैकीं एकजण होता असें सिद्ध होतें
२ चमत्कारिक. ३ हा सध्यांचा मिरजेचा किल्लेदार.

आपा कुटुंबा सुद्धां प्रतिपदेस बुधवारीं निघोन कुरुंदवाडास जाणार. राजश्री नीलकंठराव लष्करास जातात. कोन्हेरराव व वरकड सर्व मंडळी कुरुंदवाडास येतात. राजश्री विसाजीपंत आपा ही येथें आले होते. ते व यजमान समागमेंच येतात. हे विज्ञापना.

नं० ३२८

(८ आगस्ट.)

श्रीगणराज.

चिरंजीव राजश्री बापू यास त्रिंबक हरि आशीर्वाद. येथील वर्तमान तागायत आषाढ वद्य चतुर्दशी इंदुवार मुक्काम मंगळवेढें. यथास्थित असे. विशेष. आम्हीं नलदुर्गाहून येथें आलों. चिरंजीव ही आम्हांसवेंच आले. नारो शंकर आले व राजश्री विसाजीपंत ही आले. भेटी जाहल्या. करार मदार ठरला. स्थळ सरंजाम निवडून आला. भेटीस जाण्याचा करार झाला. मिरज देवविले दिवशीं श्रीमंतांची भेटी (व्हावयाची,) तेच दिवशीं (त्यानीं) स्थळाची सनद द्यावी, स्थळ द्यावें, (असा) करार झाला. श्रीमंतांकडे बुधवारीं चिरंजीव मंडळी जातील. किल्ला खालीं होऊन, लोक आंत जाय तों पावेतों चिरंजीव राजश्री गोविंदपंत येथेंच आहेत. आम्हीं सर्व कुटुंबसह बुधवारीं येतों. राजश्री विसाजीपंत ही येतात. हैदरनाइकास श्रीमंतांचीं पत्रें गेलीं. उपराळा बिदनूरचा करावा

१ त्रिंबक हरि. २ हें त्रिंबक हरीचें मेघश्यामराव कृष्ण पटवर्धन मंगळवेढेकर उर्फ मेघश्यामराव बापू यास पत्र. बापू या वेळीं कर्नाटकांत पटवर्धनांची जहागीर होती तिचें रक्षण करण्यांत गुंतला होता व त्या जहागिरीवर हैदरअल्लीचें सैन्य चालून येणार होतें त्याचें निवारण कसें होईल या फिकिरींत पडला होता. ३ मिरज किल्ल्याची. ४ गोपाळराव वगैरे सर्व. ५ रिकामा. ६ हैदरास श्रीमंतांचीं पत्रें गेलीं कीं, तुह्मीं बिदनुरास उपसर्ग देऊं नये. ७ कुमक.

याज करितां तमाम तिकडील संस्थानिकांस पत्रें गेलीं. राजश्री विसाजीपंत ही जमाव सहीत धारवाडाकडे जावयास येतात. ते आम्हीं बरोबरच येतों[1]. तुम्हीं पुढें सर्वांस पत्रें रवाना करून सिद्धता करावी. वरकड कुरुंदवाडच्या[2] द्रव्याचा अद्याप पत्ता लागत नाहीं. काय विचार आहे तरी त्याची तरतूद करणें. बहुत काय लिहिणें. आम्हीं लौकरच येतों. हे आशीर्वाद.

नं० ३२९L[3]

(८ आगस्ट.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें दोन्ही कर जोडून साष्टांग नमस्कार. विनंती. येथील कुशल तागायत आषाढ वद्य चतुर्दशी सोमवार पावेतों वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. इकडील वर्तमान तरी मोंगलाचा मुक्काम राक्षसभुवनावरी आहे. तोफखाना वगैरे गंगापार उतरला. सारी फौज भोंसले सुद्धां गंगे पलीकडेच आहेत. आमचा कूच आजच गणेशाचे निंब्याहून नव कोसांचा झाला आहे. एक दोन रोजांत यवनाची गांठ पडेल. वडिलांस कळावें ह्मणून लिहिलें आहे. भागवताची पोथी पाठविली आहे. येऊन पावेल. जतन (करून) ठेवावयासीं आज्ञा करावी. रवाना छ० २७ मोहरम. बहुत काय लिहिणें. हे विनंती.

पै॥ छ० २ सफर.

---

१ कुरुंदवाड पर्यंत ते व आम्हीं बरोबरच येतों. २ या वाक्याचा बोध होत नाहीं. ३ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र.

श. १६८९ मोंगल व पेशवे यांमध्यें युद्ध होण्याचा रंग इ.स. १७६७ रुसलेल्या सरदारांची समजूत

नं० ३३०L

[९ आगस्ट.]

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें कर जोडून साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत आषाढ वद्य अमावास्या मंगळवार पावेतों मुक्काम मौजे मांदव मोही परगणे बीड येथें सुखरूप असों. विशेष. इकडील वर्तमान मोंगलांचे मुक्काम राक्षसभुवना पासून जवळच आहेत. त्यास आम्हांस आठ कोसांची तफावत आहे. त्यांचें लष्कर तोफा वगैरे बाजार बुनगें गंगापार झालें. सात आठ तोफा व सात आठ हजार फौज अलीकडे आहे. राजश्री जानोजी भोंसले सेना साहेब सुभा मोंगला पासून रुसकत होऊन गेले. गंगेच्या अलीकडील तीरानेंच बारा चौदा कोस खालीं गेले. या प्रमाणें कालची बातमी आली. बसालतजंग ही काली रुसकत होऊन आपले स्थळास जावया करितां गेले. उदईक प्रातःकाळीं येथून कूच होऊन (आम्हीं) मोंगलांचे मोहल्यावर जाणार. कदाचित गांठी पडेलसें दिसतें. येणें प्रमाणें वर्तमान आहे. वडिलांस कळावें ह्मणून लिहिलें आहे. राजश्री महाराव जानोजी निंबाळकर यांसीं आषाढ वद्य द्वादशी शनिवारीं देवाज्ञा झाली. त्यांची स्त्री समागमें (सती) गेली. जानबा निंबाळकर यांचे पुत्र दाजी यांस फार बरें वाटत नव्हतें याज करितां मोंगला पासून निरोप घेऊन ते बिडास आले होते. तेथें ते ही देवाना पावले. भोंसल्यांचा मजकूर व बसालतजंग याचा मजकूर पुरवणी पत्र अलाहिदा लिहिलें

---

१ हें पेशव्याचें गोपिकाबाईस पत्र. २ निरोप. ३ हें पुरवणी पत्र पुढील नंबरचें होय.

याज कारितां तमाम तिकडील संस्थानिकांस पत्रें गेलीं. राजश्री विसाजीपंत ही जमाव सहीत धारवाडाकडे जावयास येतात. ते आम्हीं बरोबरच येतों[1]. तुम्हीं पुढें सर्वांस पत्रें रवाना करून सिद्धता करावी. वरकड कुरूंदवाडच्या द्रव्याचा अद्याप पत्ता लागत नाहीं. काय विचार आहे तरी त्याची तरतूद करणें. बहुत काय लिहिणें. आम्हीं लौकरच येतों. हे आशीर्वाद.

नं० ३२९L

(८ आगस्ट.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें दोन्ही कर जोडून साष्टांग नमस्कार. विनंती. येथील कुशल तागायत आषाढ वद्य चतुर्दशी सोमवार पावेतों वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. इकडील वर्तमान तरी मोंगलाचा मुक्काम राक्षसभुवनावरी आहे. तोफखाना वगैरे गंगापार उतरला. सारी फौज भोंसले सुद्धां गंगे पलीकडेच आहेत. आमचा कूच आजच गणेशाचे निंब्याहून नव कोसांचा झाला आहे. एक दोन रोजांत यवनाची गांठ पडेल. वडिलांस कळावें ह्मणून लिहिलें आहे. भागवताची पोथी पाठविली आहे. येऊन पावेल. जतन (करून) ठेवावयासीं आज्ञा करावी. रवाना छ० २७ मोहरम. बहुत काय लिहिणें. हे विनंती.

पै॥ छ० २ सफर.

---

१ कुरुंदवाड पर्यंत ते व आम्हीं बरोबरच येतों. २ या वाक्याचा बोध होत नाहीं. ३ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र.

श. १६८९ मोंगल व पेशवे यांमध्यें युद्ध होण्याचा रंग इ.स. १७६३
रुसलेल्या सरदारांची समजूत

नं० ३३०L

[९ आगस्ट.]

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें कर जोडून साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत आषाढ वद्य अमावास्या मंगळवार पावेतों मुक्काम मौजे मांदव मोही परगणे बीड येथें सुखरूप असों. विशेष. इकडील वर्तमान मोंगलांचे मुक्काम राक्षसभुवना पासून जवळच आहेत. त्यास आम्हांस आठ कोसांची तफावत आहे. त्यांचें लष्कर तोफा वगैरे बाजार बुनगें गंगापार झालें. सात आठ तोफा व सात आठ हजार फौज अलीकडे आहे. राजश्री जानोजी भोंसले सेना साहेब सुभा मोंगला पासून रुसकत होऊन गेले. गंगेच्या अलीकडील तीरानेंच बारा चौदा कोस खालीं गेले. या प्रमाणें कालची बातमी आली. बसालतजंग ही काली रुसकत होऊन आपले स्थळास जावया करितां गेले. उदईक प्रातःकाळीं येथून कूच होऊन (आम्हीं) मोंगलांचे मोहल्यावर जाणार. कदाचित गांठी पडेलसें दिसतें. येणें प्रमाणें वर्तमान आहे. वडिलांस कळावें ह्मणून, लिहिलें आहे. राजश्री महाराव जानोजी निंबाळकर यांसीं आषाढ वद्य द्वादशी शनिवारीं देवाज्ञा झाली. त्यांची स्त्री समागमें (सती) गेली. जानबा निंबाळकर यांचे पुत्र दाजी यांस फार बरें वाटत नव्हतें याज करितां मोंगला पासून निरोप घेऊन ते बिडास आले होते. तेथें ते ही देवाना पावले. भोंसल्यांचा मजकूर व बसालतजंग याचा मजकूर पुरवणी पत्र अलाहिदा लिहिलें

१ हें पेशव्याचें गोपिकाबाईस पत्र. २ निरोप. ३ हें पुरवणी पत्र पुढील नंबरचें होय.

आहे त्यावरून सविस्तर विदित होईल. वडिलांचें पत्र छ० २३ मोहरमचें आलें तें पावलें. आतांच संध्याकाळीं पावलें. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

पै॥ छ० ४ सफर.

नं० ३३१L

(९ आगस्ट.)

श्री.

पुर० तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं

विनंती उपरी. भोंसले मोंगला पासून. निघोन गेले ते येथील अनुसंधान करूनच गेले. गंगेस पाणी फार आहे. मोंगलाचा कारखाना तोफा वगैरे पलीकडे गेले. सडा मात्र थोड्याशा तोफा व गाडदी व पांच सात हजार फौज इतकीच राहिली आहे. आम्हीं ही त्याच रोखें दोन तीन कूच करून मोंगलाकडेच येतों, तेव्हां मोंगलाची आमची गांठ पडेल हा अर्थ जाणूनच निघून गेले. दोन चार दिवसांत भोंसल्याच्या व आमच्या भेटी होतील. कांहीं गुंता पडणार नाहीं. बसालतजंगाचा मजकूर तर -- त्याचें येणें राहिलें. मल्हारजी होळकर यांचे विद्यमानेंच (त्याचें राजकारण) झालें होतें. त्यास त्याचे करार मदार होते त्या मध्यें अलीकडे अधिक आगळें बोलूं लागला. दौलताबाद किल्ला करारांत द्यावयाचा नव्हता. हल्लीं मागूं लागला. व [त्याची] फौज ही थोडी त्यास दोन लक्ष रुपये दरमहा, निदानीं दीड लक्ष रुपये द्यावे लागतात. प्रस्तुत सरकारांत रुपयाची ओढ फारच आहे. असा प्रकार जाणून मल्हारजी होळकर यांचेच मतें तूर्त निरोप द्यावा असा प्रकार होऊन त्यास सांगितलें कीं, तुम्हीं तूर्त

१ मोंगलास सोडून भोंसले निघून गेले.

भागानगर प्रांतांत जाऊन चार रुपये मिळवावे. फौज ताजी करावी. तूर्त निजामअल्लीखान शहरांस जातात. पुढें बाजत बरसात सराईच्या दिवसांत येऊन पोहोंचावें. अशीं कित्येक राजकारणें बोलून चालून पुढें राजकारण राखून तूर्त मल्हारबाचे विचारें त्यास निरोप दिला आहे. रवाना छ० २८ मोहरम. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं० ३३२L

[१० आगस्ट.] ⁻

श्रीगणराज.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें गोपाळानें कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत श्रावण शुद्ध प्रतिपदा बुधवार पावेतों वडिलांचे आशीर्वादें समस्त मंडळी सुद्धां सुखरूप असों. विशेष. आम्हीं अविंधाचे लष्करांतून श्रीमंतांनीं कृपा करून बोलाविलें ह्मणोन निघून मंगळवेढ्यास आलों, आणि श्रीमंतांच्या सेवेशीं आलों ह्मणोन लिहून पाठविलें; उपरांतिक श्रीमंतांनीं राजश्री नारो शंकर व राजश्री विसाजी नारायण यांस आम्हांकडे पाठविलें. उभयतांनीं कितेक प्रकारें श्रीमंतांचे कृपेचीं उत्तरें सांगितलीं. त्यावरून आम्हीं आजी स्वार होऊन श्रीमंतांकडे गेलों. सेवेशीं विदित व्हावें. कुटुंबें जागां जागां होतीं तीं सारीं मंगळवेढ्यांस आणिलीं. पुढें श्रीमंत रहावया स्थळ देतील ते स्थळीं येऊं. सदैव कृपापत्रीं सांभाळीत असावें हे विज्ञापना.

---

१ औरंगाबादेस. २ हें गोपाळराव पटवर्धनाचें गोपिकाबाईस पत्र.

नं० ३३३L

(१० आगस्ट.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत श्रावण शुद्ध प्रतिपदा[1] बुधवार दोन प्रहर दिवस. वडिलांचे आशीर्वादें करून मुक्काम धोडराई परगणे बीड (येथें) सुखरूप असों. विशेष. आजच प्रातःकाळीं मोंगलाचे मुकाबल्यास फौज तयार करून गेलों. निजामअल्लीखान गंगापार होते. वरकड सरदार कुल अलीकडे होते. त्यांचें आमचें झुंज झालें. फार निकडीचें हत्यार झालें. त्यांचा मोड झाला. आमची फत्ते झाली. त्यांजकडील सरदार ठार झाले व धरून आणिले व आम्हांकडील सरदार ठार झाले व जखमी यांची यादी अलाहिदा पाठविली आहे त्याजवरून कळेल. वरकड मागाहून तपशीलवार लिहून पाठवूं. रवाना छ० २९ मोहरम. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

पै॥ छ० ४ सफर. श्रावण. रविवार. तिसरा प्रहर.

नं० ३३४L

(श्रावण शुद्ध प्रतिपदा
१० आगस्ट.)

श्री.

यादी[2] मोंगलाच्या लढाईत ठार व जखमी झाले व पाडाव आले सरदार—

---

१ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. २ ही यादी लढाई झाल्या बरोबर त्याच दिवशीं लिहिलेली असल्या मुळें ही पूर्ण नाहीं. मोंगलाकडून पाडाव आलेल्या कित्येक सरदारांचीं नांवें पुढील पत्रांतून आलेलीं आहेत तीं येथें दाखल केलेलीं नाहींत.

नि॥ मोंगल.

खुद्द निजामअल्ली गंगेपलीकडे होते ते दोनशें राउतांनिशीं पळोन गेले. बाकी फौज राहिली त्याशीं युद्ध झालें. त्या पैकीं धरून आणिले व ठार झाले—

३ ठार झाले.
- १ विठ्ठल सुंदर याचें डोचकें कापून आणिलें.
- १ विनायकदास ठार झाले.
- १ खंदारचा राजा ठार झाला.

३

३ पाडाव.
- १ मुरादखान.
- १ माधवराव पिंगळे.
- १ बाबूराव जंगी.

३

नि॥ सरकार.

५ ठार झाले.
- १ महादाजीराव निंबाळकर.
- १ खेळोजीराव पाटणकर.
- १ चिंतो कृष्ण चिमणगांवकर.
- १ देवजी नारायण.
- १ मानसिंग रजपूत.

५

३ जखमी.
- १ माधवराव नरसिंग. पागा हुजूर.
- १ हरिपंत भिडे. हात तुटला.
- १ शंकराजी घोरपडे.

३

नं० ३३९L

(श्रावण शुद्ध द्वितीया
११ आगस्ट.)

श्री.

अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री व्यंकोजी माणकेश्वर
गोसावी यास——

१ या सरदाराचा पणतू वीस वर्षां पूर्वी पुण्यांत आचाऱ्याचा धंदा करीत असे अशी माहिती मिळाली ! कालगति विचित्र आहे. २ हरिपंत भिड्याविषयीं अधिक माहिती मागें नं० १९३ च्या पत्रा खालीं एका टिपेंत सविस्तर दिली आहे. ३ हा व्यंकाजी माणकेश्वर कोण हें माहीत नाहीं.

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान. नमस्कार. सुरुसन आर्बासीतैन. मया व अल्लफ. तुम्हीं गेलां ते समयीं आज्ञा करणें ती केली होती. त्या नंतर तुम्हीं जाऊन बहुत एकनिष्ठेनें चाकरी चुकरी केली, हें सर्व ध्यानांत आहे. तुम्हीं पुरातन. एक निष्ठ. तुम्हांपासून कोणे ही गोष्टीची खत्ता[1] होणार नाहीं हे निशा[2] आहे. पुढें ही येथील लक्ष राखून एक निष्ठेनें सेवा करीत जावी. काल छ० ३० मोहरमीं विठ्ठल सुंदर वगैरे सात आठ हजार फौज व चार पांच हजार गाडदी गंगे अलीकडे राक्षसभुवनावर होते. निजामअल्लीखान बाजार बुनगें घेऊन गंगेपार उतरून गेले तों यांची आमची गांठ पडली. मोठी लढाई झाली. श्रीकृपेनें विठ्ठल सुंदर, विनायकदास, खंदारकर गोपाळसिंग, अगदीं ठार झाले. या खेरीज मुरादखान, पिंगळे, पाटणकर, बाबूराव जंगी वगैरे सरदार पाडाव आले. यश मोठें आलें. पुढें गंगा उतरून निजामअल्लीखान पळून औरंगाबादेस गेला. त्याचे पारिपत्यास जाणेंचा विचार होत आहे. भोंसले आदिकरून इकडील सरदार गेलेले आले. लौकरच येऊन भेटतील. जाणिजे. छ० १ सफर. बहुत काय लिहिणें.

नं० ३३६[3]

[श्रावण शुद्ध द्वितीया
११ आगस्ट.]

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें रघुनाथानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० १ सफर पावेतों यथास्थित असे. विशेष. नबाब राक्षसभुवना जवळ गंगा उतरत होता इतक्यांत गांठ घालून

[1] नुकसानीं. [2] खात्री. [3] हें दादासाहेबांचें गोपिकाबाईस पत्र.

कांहीं काम होईल तरी करावें यास्तव जलद येऊन लढाई केली. वडिलांचे आशीर्वादें यश आलें. विठ्ठल सुंदर व विनायकदास वगैरे कुंल सरदार मारले गेले. (कांहीं) धरिले. थोडे बहुत पळोन गेले. एकटे नबाव मात्र पलीकडे राहिले होते ते ही अर्ध रात्रीं बुनगें व डेरे टाकून पळोन शहरास गेले. गंगेनें (नबाबाची) मोठी कुमक केली ! सविस्तर वर्तमान चिरंजीवांनीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं० ३३७L

[श्रावण शुद्ध द्वितीया
११ आगस्ट.]

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवँरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत छ० १ सफर पावेतों वडिलांचे आशीर्वादें यथास्थित असे विशेष. मोंगल राक्षसभुवनावरी गंगा उतरोन जात होता. बाजार बुनगें व कांहीं फौज उतरली. दहा पंधरा हजार फौज सडी राहिली. त्यांचें पारपत्य करावें याज करितां छ० २९ मोहरमीं जाऊन पोंहचलों. विठ्ठलदास आदिकरून सरदार लढाईस उभे राहिले. चार सहा घटका लढाई मातबर झाली. विठ्ठलदास व विनायकदास व ईंस्मालखान व गोपाळसिंग ठार झाले, व बाबूराव जंगी व उदाजी पवार व मुरादखान व जोत्याजी घाटगे व मालोजी घोरपडे व बाबूराव जाधव, व रघुपतराव

१ सर्व. २ अर्थात् माधवराव पेशव्यानीं. ३ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. ४ हा इलिचपुरचा नवाब. हा मारला गेल्याचें येथें लिहिलें आहे हें खरें नव्हें. तो लढाईच्या गर्दींत गोदावरी उतरून पळून गेला.

पिंगळे पाडाव करून आणिले. तोफा सांपडल्या. श्रीकृपेनें मोठी फत्ते झाली. हें संतोषाचें वर्तमान वडिलांस कळावें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० ७ सफर.

नं० ३३८L

(श्रावण शुद्ध तृतीया
१२ आगस्ट.)

श्री.

रा० रा० रामचंद्र नारायण गोरे गोसावी यांस.

सेवक माधव बल्लाळ प्रधान नमस्कार सुरूसन आर्बा सीतैन मय्या व अल्लुफ. निजामअल्ली धारूरा वरून दर मजल राक्षसभुवनावर गंगा दक्षिण तीरीं दाखल होऊन बाजार बुनगें उत्तरतीरीं उतरलें. आपण ही खासा सडे स्वारीनेंच उतरला. बरकड तमाम सरदार व राजे विठ्ठलदास व विनायकदास सर्व ही दक्षिणतीरीं राहिले. हे बातमी आल्या नंतर बिडा वरून दर मजल मुक्काम मजकुरास आलों. लढाई झाली. विठ्ठल सुंदर व विनायकदास व खंदारकर राजे वगैरे मातबर सरदार ठार झाले. कांहीं मुरादखान, सुपेकर[२] वगैरे पाडाव आले. आपणास कळावें ह्मणून लिहिलें असे. जाणिजे. छ० २ सफर बहुत काय लिहिणें.

पै॥ छ० सफर.

नं० ३३९L

(श्रावण शुद्ध षष्ठी
१४ आगस्ट.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

---

१ हा गोपिकाबाईचा विश्वासू कारकून होता हें पूर्वीं लिहिलेंच आहे. २ शाहाजी सुपेकर हा मोंगलाचा एक सरदार.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० ४ सफर मुक्काम नजीक पैठण गंगा दक्षिणतीर येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. इकडील वर्तमान लढाईचें पूर्वीं सेवेशीं लिहून पाठविलें त्यावरून विदित झालेंच असेल. लढाई झाल्यावर मोंगल पलीकडे होता तो कायम राहून तोफांची व बाणांची मारागिरी करील असें वाटत होतें. परंतु लढाई झाली त्याच रात्रीं कूच करून शेहरास गेला. दहा तोफा व गोळे दारू व डेरे दांडे (तळावर) राहिले. सरदार फार करून विठ्ठल सुंदर याजकडील राहिले होते त्यां पैकीं कांहीं मारले गेले, व कांहीं पाडाव आले, व कांहीं थोडेसे पळाले. तसेच आपणाकडील ठार व जखमी झाले त्यांची याद अलाहिदा नांवनिशीवार लिहून पाठविली आहे त्यावरून विदित होईल. पूर्वीं दोन तीन लढाया झाल्या परंतु मोंगलास या तऱ्हेची जरब कधींच बसली नव्हती. विठ्ठलपंतासारखा कारभारी इतबारी मर्द मोंगलास मिळणें नाहीं. व त्याची गत अशी झाल्यावर ते[४] बहुत घाबरे होऊन पळाले. शहरास गेले. तोफा त्यांजकडील अलीकडच्या व पलीकडील मिळून कमपेश वीस पर्यंत राहिल्या. व त्यांजकडील घोडीं, उंठ, बैल वगैरे लूट लष्करांत बहुत आली. व पंधरा हत्ती लष्करांत पाडाव आले. वडिलांचे पुण्यप्रभावेंकरून या प्रमाणें वर्तमान झालें तें सेवेशीं लिहिलें असे. जानोजी भोंसल्यास आणावयास सखारामपंत गेले होते ते घेऊन आले. चतुर्थीचे दिवशीं भेट झाली. पुढें कर्तव्याचा मजकूर आज ठरेल तो मागाहून लिहून पाठवीन. वडिलांस कळावें. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना. पै।। छ० ९ सफर.

---

१ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. २ औरंगाबादेस. ३ नानासाहेब व थोरले बाजीराव पेशवे यांच्या कारकीर्दींत. ४ नबाब निजामअली.

नं० ३४०L

(श्रावण शुद्ध अष्टमी
१६ आगस्ट)

श्रीगणराज.

राजश्री रामचंद्र नारायण गोरे गोसावी यासीं.

सु॥ आर्बासीतैन मय्या व अलफ. तुम्हांकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तरी सविस्तर वर्तमान लिहून पाठवावें. वरकड इकडील वर्तमान तर छ० २९ मोहरमीं नबाबाची फौज व विठ्ठलपंत, विनायकदास, [वगैरे] सर्व सरदार गंगे अलीकडे राक्षसभुवना नजीक उतरले होते. त्याची बातमी राखून कूच करून त्यांजवर चालून जाऊन लढाई केली. तेव्हां त्यांची लढाई बिघडली. विठलपंताचें डोचकें कापून आणिलें. व विनायकदास कामास[२] आले. तैसेच खंदारचे राजे ही मृत्यु पावले. वरकड- सरदार सर्व पाडाव आले त्यांची यादी व सरकारच्या लोकांची यादी सर्व तीर्थरूप मातुश्री बाईच्या पत्रीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. वरकड वर्तमान सविस्तर हमेषा लिहून पाठवावें. जाणिजे. छ० ६ सफर. बहुत काय लिहिणें.

नं० ३२१

(श्रावण शुद्ध नवमी
१७ आगस्ट.)

श्री.

राजश्री कृष्णाजी गोविंद गोरे गोसावी यांसीं.

सुरुसन[३] आर्बा सीतैन मय्या व अलफ. तुम्हांकडून बहुत दिवस पत्र

१ हें पेशव्यांनीं लिहिलेलें पत्र. २ मरण पावले. ३ हें ही पेशव्यानींच लिहिलेलें पत्र.

येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सदैव तुमच्या शरीर प्रकृतीचें वर्तमान प्रस्तुत तुम्हीं कोठें आहां, व तुम्हांस आम्हीं पूर्वी पत्र पाठविलें तें पावलें किंवा नाहीं, हें सविस्तर लिहिणें. वरकड इकडील वर्तमान तर छ० २९ मोहरमीं नबाब गंगेच्या पार गेले होते. वरकड बुनगें बाजार बहुत करून गेलें होतें. व अलीकडे विठ्ठलपंत वगैरे सर्व सरदार राक्षसभुवनावर उतरले होते. त्यास त्यांची बातमी राखून त्यांजवर जाऊन लढाई केली. त्यांचा मोड झाला. विठ्ठलदास, विनायकदास मृत्यु पावले. तसेच खंदारकर ही कामास आले. वरकड सरदार बहुत करून पाडाव आले त्यांचीं नांवें:—मुरादखान, बाबूराव, जयापा जाधव, बाजीराव पाटणकर, उदाजी पवार, शिवराव पवार, रघुपतराव पिंगळे, हणमंतराव निंबाळकराचे पुत्र, अजमखान पठाण अलजपुरकर, महमद गाजेखान, मीरमुस्साखान, या प्रमाणें पाडाव आले. वरकड सरदार पळाले व कित्येकांचें ठिकाण नाहीं. या प्रमाणें इकडील वर्तमान आहे. पुढें जें वर्तमान होईल तें लिहून पाठवीन. जाणिजे. छ० ७ सफर बहुत काय लिहिणें.

नं० ३४२L

(श्रावण शुद्ध नवमी
१७ आगस्ट.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० ७ सफर मुक्काम पैठण, दक्षिणतीर, येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. इकडील वर्तमान

---

१ पत्र पेशव्यांचें गोपिकाबाईस.

निजामअल्लीखान त्याचे[१] दिवशीं कूच करून शहरास गेले. त्या दिवशीं त्यांच्या तोफा व दारूगोळे वाटेनें राहिले व तळावर राहिल्या होत्या त्या तोफा सरकारांत आणिल्या. वरकड दारूगोळे अलीकडील व पलीकडील सर्व सरकारांत आलें. प्रस्तुत ते शहरास गेले आहेत. पुढें पहावें काय करितात. प्रस्तुत गंगेचें पाणी उतरत आहे. पुढें उंटाचा उतार झाला म्हणजे पार जाऊं. पुढें जें वर्तमान होईल तें सेवेशीं लिहीन. हे विज्ञापना.*

पै।। छ० १२ सफर.

---

१ राक्षसभुवनची लढाई झाली त्याच दिवशीं. * राक्षसभुवनच्या लढाई संबंधें नं० ३३३ पासून एकंदर हीं दहा पत्रें छापिलीं आहेत. नं० ३३३ चें पत्र लढाई झाल्या बरोबर लिहिलें आहे. त्यांत मोंगलाच्या फौजेचा पराजय झाला व आमची फत्ते झाली इतकाच मजकूर आहे व नं० ३३४ ची यादी त्याच वेळीं लिहिलेली आहे तींत तीन सरदार मोंगलाचे मारिले व तीन धरून आणिले एवढाच तपशील आहे. या वरून हें उघड होतें कीं, हें पत्र व यादी पेशव्यानीं लिहिली त्या वेळीं पाठलागास गुंतलेली त्यांची फौज अद्यापि गोटास परत आलेली नव्हती व लढाईचे परिणाम काय काय झाले याची इत्थंभूत हकिगत त्या वेळीं त्यांस कळली नव्हती व तशी ती त्यांस कळण्याचा मार्ग ही नव्हता. नंतरचीं पत्रें कांहीं दुसरे व तिसरे व चवथे दिवशीं व त्या नंतरचीं लिहिलेलीं आहेत त्यांत मुख्य मुख्य गोष्टी जरी त्याच लिहिलेल्या आहेत तरी बारीक सारीक हकिगत प्रत्येक पत्रांत कांहीं तरी नवीन आहेच. सर्व पत्रांतून एकंदर इत्यर्थ निघतो तो हा — बाजार बुनग्यासह निजामअल्ली गोदावरी उतरून गेल्यानंतर मागें दक्षिणतीरीं दहा पंधरा हजार फौज व गारदी व तोफखाना घेऊन विठ्ठल सुंदर राहिला होता त्यावर पेशव्यांचें सैन्य येऊन पडलें. चार सहा घटका निकराचें युद्ध होऊन मोंगलाचा मोड झाला. विठ्ठल सुंदर, विनायकदास व खंदारचा राजा हे मारले गेले व उदाजी पंवार, जोत्याजी घाटगे, मालोजी घोरपडे, बाबूराव जंगी, माधवराव व रघुपतराव पिंगळे, बाबूराव जाधव, शहाजी सुपेकर, जयापा जाधव, बाजीराव पाटणकर, शिवराव पवार, हणमंतराव निंबाळकराचा पुत्र, मुरादखान, अजमखान पठाण अलजपूरकर, महमद गाजेखान, मीरमुस्साखान हे सोळा सरदार पाडाव सांपडले. शिवाय मोंगलाच्या कमींत कमी वीस तोफा व पंधरा हत्ती, घोडे, उंटें, बैल, डेरे राहुट्या वगैरे सर्व सामान मराठ्यांच्या हातीं

नं० ३५३

(अजमासें श्रावण वद्य
आगस्टचा दु०पंधरवडा.)

श्रीगणपति.

अपत्यें साष्टांग नमस्कार. अविंधाच्या लष्करचें वर्तमान लिहिलें तें

---

१ हें अंताजी विठ्ठल पटवर्धन यादवाडकर यांचें गोविंद हरीस पत्र.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

सांपडलें. डफ् साहेबाच्या इतिहासांत मोंगलानीं मराठ्यांशीं दोन दिवस पर्यंत निकरानें टक्कर दिल्याचें लिहिलें आहे तें चूक आहे हें खुद्द पेशव्यांचीं इतक्या वेळ पर्यंत छापलेलीं पत्रें वाचिलीं असतां कळून येईल. या लढाईचा शेवट प्रहर दोन प्रहरांत झाला असला पाहिजे. नं० ३३७ च्या पत्रांत तर चार सहा घटका मातबर लढाई झाल्याचेंच लिहिलें आहे. आमच्या ' संग्रहां ' त या लढाई विषयीं जी माहिती आली आहे तिज पेक्षां इतर ग्रंथांत कांहीं अधिक माहित्ती आली आहे, यास्तव त्या त्या ग्रंथांतून या खालीं उतारे दिले आहेत.

" मोंगलांची फौज औरंगाबादेकडे चालली असतां रघुनाथराव कांहीं मजली त्यांच्या पिछाडीवर आला. गोदावरीवर येतांच कांहीं फौजेनिशीं निजामअल्ली पार उतरून गेला व बाजार बुनगें पार होई तों त्यानें बाकीच्या फौजेसह दिवाण विठ्ठल सुंदर यास दक्षिणतीरीं ठेविलें. इतक्यांत दिवाणानें आपणास फौजेच्या खर्चा करितां पैका द्यावयाचा तो दिला नाहीं असें मिष करून जानोजी भोंसले मोंगलाच्या लष्करांतून निघून कांहीं अंतरावर जाऊन उतरला. ती खूण पोंचतांच रघुनाथराव झपाट्यानें चाल करून मोंगलावर हल्ला करिता झाला. तेथें तुमूल युद्ध होऊन मोंगल बेसुमार मारले गेले व त्यांचा पूर्ण पराजय झाला. मारिले गेलेल्या सरदारांत विठ्ठल सुंदर होता. मोंगलानीं दोन दिवस पर्यंत निकरानें युद्ध चालविलें होतें. प्रत्येक हल्ल्यांत रघुनाथराव पुढारी असे. एकदां तर तो शत्रूच्या फौजेंत एकटाच सांपडला होता. पण पुतण्याकडून कुमक येई पर्यंत तो निकरानें लढत होता व त्याचा सोबती सखाराम हरि हा त्याजवळ होता तो ही शौर्यानें लढत होता, या मुळें त्याचा बचाव झाला. त्या तरुण [माधवराव] पेशव्यानें या युद्धांत स्वतः फार पराक्रम केला. त्यानें आपल्या चुलत्यास व हल्ल्याच्या निरनिराळ्या जागीं योग्य वेळीं जशी पाहिजे तशी कुमक

कळलें. श्रीमंतांस मोठें यश प्राप्त झालें. भोंसले यांचें राजकारण होतें ह्मणूनच (या) गोष्टी घडून आल्या. आणखी कांहीं अलीकडचें वर्तमान

केली या मुळें व त्याच्या शौर्यामुळें त्याची वाहवा विशेषच झाली. या युद्धांत दोहीं पक्षीं फार मोठें नुकसान झालें व असें सांगतात कीं, या प्रसंगीं मोगलांचे दहा हजार लोक मारिले गेले. दमाजी गायकवाडाच्या हाता खालच्या एका टोळी पैकीं कोणी विठ्ठल सुंदर यास वार करून ठार मारिलें. परंतु मरण्या पूर्वी त्यास गोळीची जखम त्याच्याच फौजेपैकीं कोणाच्या हातून चुकून झाली होती. त्याचा प्रतिस्पर्धी मुरादखान यानेंच कोणाकडून तरी त्यास जखमी करविलें असा त्याजवर आरोप आहे तो निर्मूल दिसतो. होळकराच्या फौजेंत गिलच्यांची टोळी होती तिनें विठ्ठल सुंदराचें डोकें कापून तें भाल्यास टोंचून लष्करांतून मिरविलें." ग्रांटडफ्चा इतिहास.

" चार घटका रात्र असतां जलदी करून नवाबाच्या फौजेचें कुच होऊन गंगा उतरून चालिले. रघुनाथराव दादासाहेब यांजकडून फौजेची तयारी जाहली. परंतु दादासाहेबांस नेम अर्घ्यप्रदानाचा, सबब विलंब लागला. इतक्यांत नबाबाकडून फौज तयार होऊन मुकाबल्यास आली. व विठ्ठल सुंदर राजे बहादर पिछाडीस, फौज गंगा आडून उतरून पार पलीकडे जावें तों त्यांचे अडचणीचे संधींत अघाडीस नबाब जातीनें होते त्यांजवर न जातां राजे बहादर याजवर काबूची वेळ पाहून दादासाहेब चाल करून आले. यांशीं त्यांशीं गांठ पडली व लढाई राक्षसभुवनचे मुक्कामीं मातवर जाहली. दादासाहेबांकडील फौजेशीं जंग भारी होऊन शेवटीं राजे बहादर याणीं हत्ती पळवून दादासाहेबांचे हत्तीस टकर दिली. सबब दादासाहेबांचा हत्ती कच्चा पडून माघारी पळाला. राजे बहादरांचे हत्तीनें दादासाहेबांचे हत्तीचें शेंपूट दांतांत धरून टकरा मारित चालला. हें पाहून मल्हारजी होळकर व फौज व महादजी नाईक निंबाळकर जमावानिशीं दरम्यान येऊन आपला हत्ती चालविला जवामर्दी विशेष करून उभयतांचे हत्तीची लगट तोडिली. तेव्हां दादासाहेबांस फुरसत पडून लढाई मातबर झाली. शेवटीं महादाजी नाईक निंबाळकर यांचे कडील वकिलानीं (?) राजे बहादरांस गांठून मारिलें. दोन्हीकडील हौदे एकदम खालीं जाहले. याजवरून नवाबानीं शिकस्त खाऊन पंतप्रधानांस यश आलें." नागपुरकर भोंसल्यांची बखर.

" मोंगल व भोंसले राक्षसभुवनास गंगातीरीं गेले. श्रीमंत आषाढ वद्यपक्षीं मादलमोहीचे घांटावर येऊन पोंचले. दुसरे दिवशीं श्रावण शुद्ध प्रतिपदेस कूच होऊन

आलें असलिया लिहावें. युद्ध झाल्यावरी श्रीमंत कोठे आहेत, नबाब कोठे

मुकावला व्हावा तों भोंसले व प्रतिनिधि मोरो बावूराव [फडणीस] यांचीं राजकारणें येऊन ते निराळे राहिले. मोंगल रात्रीं गंगा पार गेला. दिवाण विठ्ठल सुंदर फौजे सुद्धां ऐलतीरीं असतां सदाशिव रामचंद्र वगैरे त्याजवळ होते. तों सरकार फौज व उभयतां श्रीमंत चालून गेले. अघाडीस नीलकंठ महादेव व महिपतराव चिटणीस व महादजी शितोळे मांजरीकर व माधवराव नरसी हुजूर पागे व नारो कोन्हेर व दादो पोतनीस वडगांवकर गेले. तों नबाबाचे दारूस व बाणांस आग लागून बाण उडाले. त्या संधींत नीलकंठ महादेव यांजकडील हरि गोपाळ व विठ्ठल शिवदेव यांजकडील फौजेनें तोंड लाविलें. तों श्रीमंत येऊन पोंचले. नीलकंठ महादेव वगैरे मोर्चा उधळून आंत गेले. मागाहून श्रीमंत रघुनाथ बाजीराव यांचा हौदा येतांच दरम्यान कमरग्यांत विठ्ठल सुंदर व विनायकदास व इस्मायलखान पठाण: अलजपुरचा सुभा असे पांच हजार फौजेनिशीं हौद्यावर येऊन हौदा माघारा फिरविला. हौदा पुढें, मागें पठाणांची फौज चालली. सरकार फौजेचा मोड जाहला. तों ईश्वरी कौतुक -- त्यांचे लोकांत बार सुटून तो विठ्ठल सुंदरास लागला. ते लोक उभे राहिले. पुढें मल्हारजी होळकर जंबुरे पसरून होता त्याची शिलक झाली. यामुळें विठ्ठल सुंदर सात अंबाऱ्या फौज सुद्धां उभा राहिला. श्रीमंतांचा हौदा निघाला. तों श्रीमंत माधवराव बल्लाळ प्रधान घोड्यावर होते ते एकीकडे उभे राहून विठ्ठल सुंदर याच्या अंबाऱ्या उभ्या राहिल्या होत्या त्यांजवर भले लोकांस पाठवून तंटा झुज घातलें. बाबुजी नाईक व महादजी गाइकवाड श्रीमंतांस पहात आले त्यांस त्यांजवर पाठविलें. तेव्हां श्रीमंतांजवळ भगवंतराव बारवकर व महादजी शितोळे व कृष्णाजीराव पारसनीस व नारो कोन्हेर व रंगो मल्हार व भिकाजी नाईक कोलटकर असतां महादजी शितोळे यानीं ' सात अंबारींतील अंबारी मारितों ' ह्मणोन बोलले. तेव्हां करार — मांजरीगांव व हत्ती व दोनशें राउतांची सरदारी वांचून आल्यास यावी — हा करार श्रीमंतीं केला. तेव्हां महादजी शितोळे व नारो कोन्हेर व रंगो कोन्हेर व भिकाजी नाईक तसेच झुजावर गेले. महादजी शितोळे याणीं अंबारी मारिली. त्रिवर्गांनीं (हौद्याच्या) तटास भोंसकून माघारे आले. माधवराव नरसी पागे बहिरीचे शिंगीवर बसले असतां झिलींत सत्तावीस जखमा लागल्या आणि घोडी मेली. तटाचें झुज पडलें. नबाबानीं गंगे पलीकडून तोफांचा मार केला. तीन प्रहर दिवस आला. अकरा कोस मजल चालून येऊन लढाई होत असतां आभाळ येऊन पर्जन्य पडला. अंधकार जाहला. पठाणानीं

आहेत, श्रीमंत गंगा उतरणार कीं काय, हें सविस्तर लिहावें. चिरंजीव

घोड्यांच्या कुच्चा मारिल्या. भिजत उभे राहिले. तेव्हां माधवराव बल्लाळ प्रधान चालून आले. पठाण लुटून घेतले. विनायकदास ठार पडले. तीन कोस मुर्दे पडून रण जाहलें. तेव्हां विठ्ठल सुंदरास गोळी लागली होती. त्याचा मुर्दा हत्तीवरून लोटून दिला. तें होळकराकडील गिलच्यानीं पाहिलें. धांवून येऊन गळा कापून भाल्यावर घातलें. श्रीमंतांचीं शहाजणें वाजलीं. अस्मानी फत्ते झाली. सदाशिव रामचंद्र व शहाजी सुपेकर वगैरे घोड्यावर बसून गंगा पार गेले. कित्येक बुडाले. सरकारची फत्ते झाली. विठ्ठल सुंदर याचे अंबारींत बसून उभयतां श्रीमंत बसून गवेराई धोंडराईवर मुकामास गेले. पर्जन्य उघडला. उष्ण पडलें. गंगेस पूर होता. बावीस उमराव अंबारीनिशीं धरिले. विठ्ठल सुंदर व पठाण व मराठी फौज तीस हजार बुडविली. ”

पंतप्रधान यांची शकावली—मुंबई प्रत.

“ राक्षसभुवनचे लढाईंत मोंगल याची फौज खासा मोंगल व विठ्ठल सुंदर कारभारी व इकडून सरकारची फौज व श्रीमंत दादासाहेब व श्रीमंत माधवराव साहेब या प्रमाणें जे समयीं लढाईस प्रारंभ झाला ते समयीं तोफखाना इकडील व तिकडील सुरू जाहला. या प्रमाणें लढाई चालली. तिकडील मोंगलाचे कारभारी विठ्ठल सुंदर याणीं साडे तीनशें हौदे तिरंदाजीचे तयार करून तिरंदाजीचा मार केला. खासा निजामअल्ली जनानखान्या सुद्धां लढाई पासोन एक कोसावर होते. अशी लढाई होत असतां विठ्ठल सुंदर याणीं तिरंदाजीच्या हौद्यांचे हत्ती आपल्या तोफखान्याच्या पुढें घातले. तें मोंगल याणीं दुर्बिणींतून पाहिलें आणि बोलिले जे, लढाई बिघडली. आतां मोड होतो. असें ह्मणून जनानखाना सांभाळून मागें सरों लागले. तों विठ्ठल सुंदर यवनी भाषेनें आपल्या लोकांस ह्मणों लागले कीं, ‘ पहातां काय ! पेशवे यांचा (दादासाहेबांचा) हत्ती असाच वळवा ! असें ह्मणतांच त्यांच्या फौजेनें श्रीमंतांच्या अंबारीवरच गर्दी केली. ते समयीं श्रीमंतांचे खवासखान्यांतील चवरीवारदार होता तो गोळी लागून उडाला. हें पहातांच दादासाहेब यांस धीर पुरेनासा होऊन बाबा महात यास बोलले कीं, हत्ती बसीव. त्याणें उत्तर केलें कीं, महाराज, ही हत्ती बसविण्याची वेळ नव्हे. जर हत्ती बसविला तर आतां लढाई बिघडेल. या प्रमाणें बोलतांच श्रीमंत पुढें सरोन त्याच्या गळ्यास धरून बोलले जे, अरे, मला मारितोस कीं काय ! मी घोड्यावर बसणार. या प्रमाणें बोलतांच फौजदार याणीं हत्ती बसविला. तों गनीम याणीं येऊन हत्ती वेढिला. इकडील फौज हत्ती बसवितांच बेदिल जाहली. तों शत्रूनीं

राजश्री रावसाहेब यांचें दर्शन झालेचें पत्र आलें असेल तर लिहावें. म-कारग्रामीं ठाणें पडलेचें वृत्त लिहावें. इकडील वर्तमान तर काल धारवा-डाहून पत्रें आलीं. बंकापुर हैदरनाइकानें घेतलें. गोविंदपंत चांगले झुजले. कुमक न होय तेव्हां अगोदर एक दिवस किल्लयांतून निघोन मग प्याद्यांनीं कौल घेतला. स्थळ हस्तगत झालें. गोविंदपंत कोठे आहेत हें पत्र अद्याप आलें नाहीं, परंतु खुशाल आहेत. बंकापुर घेतल्या मुळें तमाम मुलूख

श्रीमंतांचा हत्ती तसाच वळिला हें श्रीमंत माधवराव साहेब यानीं पाहिलें. ते दादासाहेबांच्या नजर कैदेंत होते. त्यांच्या रखवालीस हुजरातचे मानकरी खासा पांचशें असामी होते ते सारे घोड्यावर बसून तयारच होते. त्यांस श्रीमंत रावसाहेब बोलले कीं, अहो, पहातां काय ! शत्रूनें दादासाहेबांचा हत्ती वळिला आणि तुह्मीं उगीच बसतां ! तेव्हां मानकरी बोलले कीं, आमची चाकरी पहाणारा धनी कोण आहे ? श्रीमंत बोलिले जे, मी धनी नव्हें कीं काय ? तेव्हां मानकरी बोलिले कीं, आपण ज्यास हटकून मारावयास सांगाल त्यास मारूं; परंतु जें मागूं तें स्वामीनीं बक्षीस द्यावें लागेल. ते समयीं श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, विठ्ठल सुंदर याचे हत्तीवरील महात भाल्यानें जाऊन मारावा. तेव्हां महादजी शितोळे बोलले कीं, दहा हजारांचा गांव व बसता हत्ती घेईन. तेव्हां श्रीमंतांनीं कबूल केलें. नंतर महादजी शितोळे याणीं घोड्यास येड केली आणि शत्रूच्या फौजेंत शिरले. जाऊन विठ्ठल सुंदर याचा महात भाल्यानें ठार मारिला आणि येऊन श्रीमंतांस मुजरा केला. नंतर श्रीमंतांनीं अंकली व सांजरी हे दहा हजारांचे गांव इनाम दिले ते अद्यापि शितोळे यांजकडे चालत आहेत.”

हरिवंशाची बखर.

शेवटचा उतारा जींतून घेतला आहे ती हरिवंशाची ह्मणजे हरिभटबावा पटवर्धन यांच्या वंशाची बखर असून ती आंबेकर पटवर्धनां पैकीं कोणी लिहिली आहे. ती सुमारें चाळीस पन्नास वर्षा पूर्वीं लिहिली गेली असल्यामुळें ‘ पेशव्यां ’ च्या बखरीं प्रमाणें हींत सुद्धां चुक्या व विसंगतपणा ओतप्रोत भरला आहे ! या बखरीचे आह्मांस कांहीं कांहीं बंद मधले मधले मात्र मिळाले आहेत. ही सबंध बखर मिळविण्या साठीं आह्मीं पुष्कळ तलास केला पण तो सफळ झाला नाहीं.

१ रावसाहेब ह्मणजे गोपाळराव याची व श्रीमंतांची भेट झाल्याचें. २ मिरजेस. ३ गोविंदपंत सखदेव हा बंकापुरचा किल्लेदार. बंकापुर, हुबळी, मिश्रीकोट, एकोडी हीं या पत्रांत आलेलीं स्थळें धारवाड जिल्ह्यांत पटवर्धनांच्या जहागिरींत.

भयाण झाला. येथें[1] ही डळमळ झालें आहे. हुबळी व मिश्रीकोर वगैरे ठाणीं हैदरखानानें घेतलीं. खासा बंकापुरास आहे. बंदोबस्त करीत आहे. खंदक खणवीत आहे. दाणा वैरण सामान (किल्ल्यांत) घालीत आहे. आंत परशुराम घोरपडे व गाडदी असें पांच हजार माणूस ठेविलें. खासा तेथेंच आहे. धारवाडास मीरफैजुल्ला फौज घेऊन आला आहे असें वर्तमान आलें आहे. येसाजीराम[3] वगैरे तमाम एकोडीस आले. श्रीमंतांनीं मोंगलाची फौज बुडविली हें वर्तमान हैदरअल्ली यास कळतांच पुढें यावयाची (त्याची) कस्त राहिली तरी न कळे! नाहीं तरी श्रीकृष्णेपर्यंत स्वराज्य करावें अशी हैदरअल्लीची कस्त आहे. यांत भगवदिच्छा प्रमाण! अशांत कांहीं फौज व लौकिकाचा सरदार इकडे येता तरी तमाम काटक सामील होतील. हैदरनाईकाचें पारपत्य होतें[4] तें लांबणीवर पडलें. वाडीस[5] ही दंगा माजला आहे. जिवाजी विश्राम पळोन गेले. गोमांतकास गेले. तेथून फिरंगी यास सामील करून उपद्रव करणार. मर्दनगड[6] [फिरंग्यानीं] घेऊन पाडून टाकिला. श्रीमंतांकडील व चिरंजीव रायांकडील वर्तमान लिहून कळवावें. हे विज्ञापना.

नं० ३१४

(अजमासें श्रावण शुद्ध
आगस्टचा दु०पंधरवडा.

गोपाळराव यांचें गोविंद हरीस पत्र—

१ 'येथें' कोठें? कदाचित् 'शिरहट्टी येथें' असें वाटतें. २ परशुराम घोरपडे सांवशीकर हा हैदराकडे या पूर्वीच मिळालेला होता. ३ येसाजी राम हा पेशव्यांचा धारवाड येथील मामलेदार. ४ झालें असतें. ५ सावंताच्या वाडीस. तेथें विठ्ठल विश्राम म्हणून तेथील देसायाचा कारभारी होता त्याचा हा भाऊ जिवाजी विश्राम. ६ मर्दनगड [फोंडा] हा गोमांतकाच्या हद्दीवरचा पेशव्यांचा किल्ला. ७ गोपाळरावाकडील.

" प्रस्तुत श्रमितांचे लोक तमाम फुटून जात आहेत. गंगेस पाणी भारी. नदीस नाव नाहीं असें मोगलानें केलें आहे. त्यानें नावा जमा केल्या होत्या त्या अगदीं फोडून बुडवून टाकिल्या. नाव नाहींशी केली याजमुळें पलीकडे उतरावयाचा सध्या लाग दिसत नाहीं. मोंगलाचें याप्रमाणें काम जाहलें. या उपरी मीर आबेस ही उपसर्ग करणार नाहीं. (त्याचा) दम सुलाख होईल. तथापि बातमी रक्षावी. "

नं० ३४५

(श्रावण शुद्ध द्वादशी
२० आगस्ट)

श्रीगणराज.

अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १० सफर. मुक्काम निंबगांव नजीक पैठण. येथें यथास्थित असे. विशेष. अष्टीहून कूच केलें ते नागतळ्यावर आलों. तेथून मानुरा पुढें कोरडगांवास मुक्काम करून (श्रीमंतांचे) सैन्य नजीक, यामुळें दुसरा ही मुक्काम तेथेंच केला. कां जे, मुहूर्त (श्रीमंतांचे भेटीचा) आज मंदवारीं तिसरे प्रहरीं. नजीक जाऊन राहिल्यानें लोकांस मुहूर्ता साठीं राहिलों हें कळणार नाहीं. यास्तव कोरडगांवींच मुक्काम केला. काल मुक्काम मजकुरास आलों. आज राजश्री नारो शंकर यांच्या गोटा नजीक मुक्काम करविला. श्रीमंत राजश्री पंतप्रधान सामोरे येणार असें [ठरलें] आहे. आले तरी उत्तम. नाहीं तर आम्हीं कांहीं ओढून धरीत नाहीं. डेऱ्यासच जाऊन उभयतां (श्रीमंतांचीं) दर्शनें घेऊन आपल्या डेऱ्यास जाऊं. विदीत होय. भेटी नंतर तेथील व-

---

१ निघून घरोघर जात आहेत. २ निजामअलीचा भाऊ मीरमोंगल याचा बक्षी मीर आबस विजापुर प्रांतीं दंगा करीत होता. ३ हें गोपाळरावाचें गोविंद हरीस पत्र. सदरहू प्रमाणें पुढचेंच नं० ३४६ चें.

र्तमान कळेल तेणें प्रमाणें सेवेशीं लिहितों. नवाब[1] शहरीं काळ्या चौथऱ्यावरी मुक्काम करून दहा हजार फौजेनिशीं आहेत. त्यांची फौज शहरीं होती तेही जमा झाली आहे. सदाशिव रामचंद्र, शहाजी सुपेकर, ईस्मायलखान असे (युद्धांतून) वांचोन गेले. मुरादखान इकडे सांपडला त्याचे हस्तें संधान लागलें आहे. काल मकार[2] नामक बोलोन शहरास गेले. तह कोणे प्रकारचा होतो हें मागून सविस्तर लिहितों. राजश्री बाबूजी नाईक रूसून टोंक्यास गेले. सरंजाम देशीं मागतात. विदित होय. आम्हीं जाऊन पैठणावर आज श्रीमंतांचें दर्शन घेतों. पुढें तेथील रागरंग कळेल तेणें प्रमाणें जो विचार करणें तो करूं. हेंकडपण करीत नाहीं. विदित होय हे विज्ञापना.

नं० ३४६

(श्रावण शुद्ध चतुर्दशी
२२ आगस्ट.)

श्रीगणराज.

अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० १२ सफर. मुक्काम पैठण येथें वडिलांचे आशीर्वादें करून समस्त क्षेम असों. विशेष. आम्हीं निंबगांवाहून मंदवारीं प्रातःकाळीं बुनगें लावून दिलें. राजश्री नारो शंकर यांच्या गोटानजीक रहावयासीं आम्हीं सडे अडीच प्रहर दिवसास आलों ते तेथेंच राहिलों. तदनंतर स्वार जाहलों ते पंचविसावे घटकेस लष्करानजीक आलों. तों उभयतां यजमान व आबा पुरंदरे व कांहीं भले लोक व लक्ष्मणराव रास्ते असे पुढें आले. भेटी जाहल्या. आम्हीं व चिरंजीव राजश्री नीलकंठराव व भाऊ यानीं श्रीमंतांस नजरा करून तदुत्तर भेट घेतली. सर्व मंडळी आम्हांकडील व त्यांजकडील परस्परें भेटली. समागमें

१ इलिचपुरचा नवाब. २ मुरादखान.

राजश्री नारो शंकर होते. तिकडून (आम्हांस नेण्यास) राजश्री गोविंद शिवराम आले होते. भेट जाहल्यावर आम्हांस बरोबर घेऊन श्रीमंत डेऱ्यास गेले. आम्हीं बरोबरचा जमाव गोटास पाठवून दिला व घरच्या समुदायानिशीं तेथें गेलों. श्रीमंत दादासाहेबीं बहुतच संतोषी होऊन हास्यवदनें करून इष्टालाभाच्या व काल[1]च्या युद्धाच्या गोष्टी सांगितल्या. धाकटे श्रीमंत मागती आपल्या राहुटीहून तेथें आले. तदुत्तर आम्हांस विडे देऊन डेऱ्यास जावया आज्ञा दिली. आम्हीं निघोन मुदे[2]बखांत गेलों. मागून धाकटे श्रीमंत तेथें आले. आगत स्वागत जाहलें. आनंदें करून भाषण करीत बसलों. मग त्यांसच सांगून सकार[3] नामकास बोलावूं पाठविलें. ते ही तेथें आले. भेटी जाहली. दोन घटका बसून मग निरोप घेऊन अस्तमानीं आपल्या डेऱ्यास आलों. सकारनामक युद्धांत न[4]व्हते. याजमुळें युद्धाचा पराक्रम फारसा स्तुतींत आणीत नाहींत. " अस्मानी यश आलें. त्यां[5]नीं बेतरतुदीनें लढाई केली ह्मणोन यश प्राप्त जाहलें " अशा भावें बोलले. आम्हाशीं चार गोष्टी युद्धांत नव्हते हा पराक्रम [?] वेढून न आणितां बोलले. उभयतां श्रीमंत व आपली बहुत करून सर्व मंडळी परम हर्ष पावली. विदित होय. काल राजश्री नारो शंकर यानीं आमच्या सर्व मंडळीस भोजनास सांगोन वस्त्रें दिलीं. संध्याकाळीं त्यांस घेऊन होळकराचे [6]घरीं जाऊन दर्शन घेतलें. त्यानीं इष्टालाभाचीं भाषणें केलीं, वस्त्रें दिलीं, ते समयीं आम्हीं बोलिलों जे, वस्त्रें देतां; (आपण) मला येथें आणिलें, (यास्तव) सर्व प्रकारें आमचा अभिमान धरावा. ' बहुत उत्तम ' ह्मणून

---

१ नुकत्याच झालेल्या राक्षसभुवनच्या युद्धांत. २ स्वयंपाकगृहांत. ही बसण्या उठण्याची व खलबत करण्याची ही जागा होतीसें दिसतें. निजामअल्लीचा भाऊ बसालतजंग भेटी करितां आला तेव्हां त्याचें व दादासाहेबांचें खलबत याच ठिकाणीं झालें. (पहा नं० २८४ वें पत्र.) ३ सखारामबापू. ४ सखारामबापू राक्षसभुवनच्या लढाईच्या वेळीं श्रीमंतांच्या आज्ञेवरून जानोजी भोंसल्यास आणावयास गेला होता. ५ निजामअल्लीनें. ६ डेऱ्यास.

बोलिले. वस्त्रें घेऊन घरास आलों. भोंसल्यास रामराम सांगून पाठविलें. त्याचे कारभारी पिराजी नाईक व दिवाकरपंत यांची उभाउभी भेट सुभेदारांच्याच राहुटीस जाहली. एकवेळ त्यांचे डेऱ्यास जाऊन शेडी सलाम (?) करून यावें लागतें. जाणार. विदित होय. हे विज्ञापना.

नं० ३४७L

(१४ आगस्ट.)

श्रीशंकर.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें रघुनाथाचा साष्टांग नमस्कार विनंती. वडिलीं लिहिलें कीं, ' यश ईश्वरें मोठें दिलें असतां वर्तमान (तुम्हीं) लिहिलें नाहीं; ' त्यास वर्तमान वडिलांस न लिहावें तरी कोणास लिहावें ? सविस्तर वर्तमान लिहून पत्र पाठविलें आहे. पावलें असेल. जासुदास पावावयास उशीर लागला असेल. सारांश ईश्वरी दयेनें व वडिलांचे आशीर्वादानें यवनाचे फौजेचें उत्तम पारिपत्य झालें. एकटा यवन थोडे फौजेनिशीं पळोन शहरास गेला आहे त्याचें ही पारिपत्य होईल. इतके दिवस गंगों पूर चालली होती. सांप्रत उतार होत चालला. दोन तीन दिवसांत उतार होईल. लष्कर उतरत आहे. गोपाळराव गोविंद लष्करांत दाखल झाले. सर्व ही सांप्रत आले आहेत. लवकरच [गंगा] उतरणार आहों. चिरंजीव रायांनीं यंदां मेहनतींत व शिपायगिरींत कमी केली नाहीं. आम्हां पेक्षां अधिक जाहले. इतके दिवस त्यांनीं लढाई देखिली नव्हती. (ही) पहिली लढाई पाहिली.

१ जानोजी भोंसल्यांचा कारभारी पिराजी नाईक निंबाळकर कसा ? २ होळकराच्या. ३ हें दादासाहेबांचें गोपिकाबाई पत्र. ४ गोदावरीस पूर चालला होता. ५ बाकीचे रुसलेले सरदार भोंसले, प्रतिनिधि वगैरे. ६ अर्थात् माधवराव पेशव्यानीं. ७ इ. स. १७६१ च्या अखेरीस मोंगल पुण्यावर चालून आला तेव्हां त्याशीं ज्या लढाया झाल्या त्या पेशव्यानीं जरी सर्व पाहिल्या होत्या तरी त्यांत त्यानीं पुढाकार घे-

वर्गणीची पोंच.

सन १८९८ । ९९

(ता. २२ जून पासून २२ जुलई पर्यंत.)

	रु०
रा. रा. दत्तात्रय दिवाकर भट. मुंबई [मागील वर्षाची]	३

मागील व चालू वर्षाची.

रा. रा. एम्. एस्. नारायणराव. चित्रगुर्ग. इलाखा म्हैसूर.	६
" " सेक्रेटरी. अथणी ने. ज. लायब्ररी.	४
रावसाहेब बी. ए. गुप्ते. डेप्युटी मिनिस्टर. इंदूर.	६
रा. रा. यशवंत जयराम माहीमकर. दादर. मुंबई	६
" " सेक्रेटरी ने. ज. लायब्ररी. विटें. जि० सातारा.	६
" " सेक्रेटरी ने. ज. लायब्ररी. रायबाग.	४
" " वासुदेव त्रिंबक दांडेकर. सुरत.	६
" " गंगाधर शंकर खेर. वकील. कुंदगोळ.	६
रा.रा. दामोदर सीताराम पाटे. राई. जि० ठाणें.	६
T. H. French. Esqr. Tutor. Prince's School Baroda.	6

चालू वर्षाची.

रा.रा. विठ्ठल गणेश खरे. मिरज.	२८१०
" " धोंडो नारायण शिराळकर. "	२८१०
" " नरसो गणेश भानु. "	२८१०
" " त्रिंबक नारायण साठे. "	२८१०
" " गोविंद शिवराम रानडे. "	२८१०
" " गंगाधर अमृत जोशी. "	२८१०
" " सेक्रेटरी. काकरतळें वाचनालय. महाड.	२
" " काशिनाथ सखाराम भाटवडेकर मु० दुरवेस ता० माहीम.	३
" " नारायण विश्वनाथ मंडलिक. बी. ए. जे. पी. मुंबई.	३
रावसाहेब रामचंद्र मोरेश्वर जोग. जव्हार.	३
रा. रा. सेक्रेटरी. सिटीलायब्ररी. नाशीक.	३
रावसाहेब केशव आबाजी कुळकर्णी. कारभारी सं० वंटमुरी.	३
" काशिनाथ कृष्ण लेले. शाळा सुपरिंटेंडंट. देवास.	३
रा.रा. वासुदेव नारायण गोळे. मु० हर्णई.	३

रा.रा. गोविंद नरसिंह पटवर्धन. सांगली. ३
श्री.रा. आपासाहेब सरदेसाई. हनगंडी. ३
रा.रा. सेक्रेटरी. रीडिंगरूम. जमखिंडी. ३
डा. गोपाळ गोविंद वाटवे. एम्. डी. कोल्हापुर. ३
रा.रा. सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. लक्ष्मेश्वर. ३
" " सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. गडहिंग्लज. ३
डा. शंकर श्रीकृष्ण देव. पोरबंदर. ३
रा.रा. पुरुषोत्तम जनार्दन चांफेकर. मु० चिखलें ता० पनवेल. ३
" " कृष्णाजी लक्ष्मण सोमण. पुणें. ३
श्री.रा. मार्तंड सदाशिव दीक्षित. जहागीरदार सं० कायगांव टोकें. ३
रा.रा. बाळकृष्ण काशिनाथ पाळंदे. इगतपुरी. ३

ऐ० ले० संग्रह–कर्ते.

पोंच व अभिप्राय.

न्यायमूर्ति रावबहादुर महादेव गोविंद रानडे यानीं महाराष्ट्र भाषेंत ग्रंथसमूह आजपर्यंत कसा वाढत आला आहे, या विषयावर एक निबंध लिहून तो टाइम्स् आफ् इंडियांत छापविला आहे तो बऱ्याच लोकांच्या वाचण्यांत आला असेल. सदरहू निबंधाची एक प्रत न्यायमूर्तिंकडून आम्हांकडे अभिप्रायार्थ आली आहे तिचा आम्हीं आदरपूर्वक स्वीकार करितों. प्रत्येक विषयावर आपल्या भाषेंत प्राचीन काळा पासून आजपर्यंत किती व कोणच्या योग्यतेचे ग्रंथ निर्माण झाले आहेत, या विषयीं या निबंधांत न्यायमूर्तीनीं आपल्या नेहमींच्या पद्धती प्रमाणें अत्युत्कृष्ट रीतीनें विवेचन केलें आहे तें वाचून फार समाधान होतें. राजाश्रय नसतां ही स्वभाषेच्या उत्कर्षार्थ आमच्या लोकांच्या हातून कांहीं थोडे बहुत तरी प्रयत्न चालू आहेत हें या निबंधावरून निदर्शनास येतच आहे. या प्रयत्नांचा ओघ अधिक आस्था पूर्वक व योग्य दिशेनें चालू राहिल्यास व राजाश्रय मिळाल्यास कांहीं काळानें आमची भाषा जगांतील कोणच्या ही भाषेची बरोबरी करूं शकेल यांत शंका नाहीं. विश्वविद्यालयांत मराठीचा पुनः प्रवेश व्हावा म्हणून न्यायमूर्तींची जी प्रस्तुत खटपट सुरू आहे तीस यश यावें असें आम्हीं मनापासन इच्छितों.

ऐतिहासिक-लेख-संग्रह.

मासिक पुस्तक.

सप्तेंबर. १८९८ इ०.

अंक १६

वासुदेव वामन शास्त्री खरे
मिरज हायस्कुलांतील संस्कृत शिक्षक.

यांनी

कुरुंदवाड येथें

"भाऊनाना" छापखान्यांत छापविलें.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हांशीलसह तीन रुपये.

फुटकळ अंकास पांच आणे.

वर्गणीची पोंच.

सन १८९८ । ९९

(ता. २२ जुलई पासून २२ आगस्ट पर्यंत.)

मागील वर्षाची

	रु०
रा. रा. गोविंद बळवंत भावनगर.	२
" " सदाशिव मणि नारायण दीक्षित. बी. ए. मुंबई.	२
" " आपाजी काशिनाथ खेर. पुणें.	२
रावसाहेब काशिनाथ नारायण साने. बी. ए. "	२
मि० मोझेस् स्यामूसन. "	२

मागील व चालू वर्षाची.

श्री. रा. मालोजीराव नानासाहेब घोरपडे. सं० मुधोळ.	६
रा. रा. जनार्दन सखाराम करंदीकर. बी. ए. "	६
" " अनंत बाबाजी देवधर. बडोदे.	६
" " रघुनाथ नारायण अभ्यंकर. धनोरी.	६
" " दत्तात्रय यशवंतरावजी देशपांडे. हलियाळ.	६
" " विष्णु वामन केळकर. पुणें.	६
" " दामोदर नीलकंठ खरे. बी. ए. एल्. एल्. बी. वर्धा	६
" " महादेव विनायक टिळक. मुंबई.	६
" " सेक्रेटरी. नेटिव जनरल लायब्ररी. श्रीवर्धन.	६
" " श्रीधर नारायण जोगळेकर. बुलढाणा.	६

चालू वर्षाची.

रावबहादूर बाबासाहेब परांजपे. मिरज.	२८१०
रा. रा. बळवंत रामकृष्ण गोगटे. बी. ए. "	२८१९
रा. रा. रामचंद्र आत्माराम नाडकर्णी. वकील. "	२८१०
रा. रा. जनार्दन महादेव गोखले वकील. "	२८१९
रा. रा. गणेश जनार्दन कोडोलीकर वकील. "	२८१ल
रा. रा. सेक्रेटरी. मिरजमळा लायब्ररी. "	२८१
श्री. रा. बापूसाहेब कुरुंदवाडकर. कुरुंदवाड.	३
" " दाजीसाहेब कुरुंदवाडकर. "	३

त्यांत सर्व प्रकारें तरतूद अधिक केली. यांचा पुढें कर्तेपणाचा भरंवसा आम्हांस आला. सांप्रत कारभार चिरंजीवच करितात. आमचे मर्जी प्रमाणें वर्ततात. तिलमात्र वांकडे चालत नाहींत. आम्ही ही यथाज्ञानें सुचतें तें त्यांस सांगतों. तेंच कारभार करितात. माझें शरीर बहुत अशक्त झालें. मेहनतीस कामाचें नाहीं. निजामअल्लीचा मनसबा शेवटास गेल्यावरी कोठे तीर्थीं बसून कांहीं ईश्वरभजन करावें इतकेंच मानस आहे. परमेश्वर इच्छा पूर्ण करणार समर्थ आहे. आतां निजामअल्लीस मारणें सहज आहे. परंतु लोकांस ऐवज पावला नाहीं यामुळें लोक मन घालीत नाहींत. तथापि धीर करून ईश्वरस्मरण करून काम हरकसें शेवटास नेतच आहों. रा॥ श्रावण शु० त्रयोदशी. रविवार. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

पै॥ छ० १६ सफर.

नं० ३४८L

[श्रावण शुद्ध त्रयोदशी
२१ आगस्ट.]

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

तलेला नव्हता. स्वतःशीं घोडनदी व आळेगांव येथें पेशव्यांच्या ज्या लढाया झाल्या त्या दादासाहेबांच्या मतें मुळीं लढायाच नव्हत ! लढाईच्या ऐन आणिबाणीच्या वेळीं कसें वागावें लागतें व कशा तरतुदी कराव्या लागतात हें पेशव्यांस राक्षसभुवनचे लढाईंत प्रथमच कळलें असें दादासाहेबांचें मत.

१ या वेळीं दादासाहेबांचें वय चाळीस वर्षां पेक्षां कमी असावें. फार झालें तर तितकें असेल. असें असतां त्यांची प्रकृति इतक्यांतच डबघाईस आली यांत नवल नाहीं. थोरले बाजीराव व थोरले चिमाजी आप्पा व नानासाहेब पेशवे यांचीं शरीरें क्षीण होऊन इतक्या वयास ते मरण देखील पावले. माधवराव पेशव्यांस तर मरणसमयीं पुरतीं एकूणतीस ही वर्षें नव्हतीं. त्या मानानें पहातां दादासाहेब दैवान् समजावयाचे. कारण ते साठ वर्षें पर्यंत तरी वांचले होते ! २ हा ईश्वरभजनाचा संकल्प जर दादासाहेबांच्या हातून सिद्धीस जाता तर तो महाराष्ट्रास फार फायदेशीर झाला असता !

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० ११ सफर मुक्काम पैठण दक्षिणतीर येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष.-वडिलांकडून पत्र छ० ४ सफरचें आलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. पत्रीं आज्ञा कीं, 'राजश्री मल्हारराव रास्ते यांस भेटून त्यांचें समाधान करणें,' त्यास त्यांचे घरीं जाऊन आज्ञेप्रमाणें समाधान करविलें. बाबा वैद्य यांस ही सांगून त्यांजकडे पाठवितों. ते ही त्यांस सांगतील. वडिलांस कळावें. इकडील मजकूर तर, येथें येऊन चार दिवस झाले. गंगेचें पाणी परवां पासून उतरूं लागलें. हत्तीचा उतार झाला आहे. काल पासून मल्हारबा उतरूं लागले. वरकड सरदार व हुजुरात ही उतरेल. वडिलांस कळावें. प्रस्तुत मोंगलाची फौज पांच हजार व गाडदी चार हजार या प्रमाणें सरंजाम सुद्धां शहरीं आहेत. पुढें काय मनसबा करितात पहावें! मुरादखान येथून कित्येक प्रकार बोलून गेला आहे. पहावें काय विचार ठरतो! राजश्री गोपाळराव गोविंद व नरसिंगराव धायगुडे व मेरो बाबूराव असे काल येऊन भेटले. वडिलांस कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० १६ सफर.

नं० ३४९L

[श्रावण शुद्ध पौर्णिमा
२३ आगस्ट.]

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार

१ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. २ हा पेशव्यांच्या मामां पैकीं थोरला. आपल्या मामांविषयीं पेशव्यांस उल्लेख करावयाचा असतो तेव्हां मामांच्या नांवा मागें 'राजश्री' खेरीज दुसरें उपपद ते लावीत नाहींत! (पहा पृष्ठ १४४,१४५,३५८.) ३ 'घरीं' याचा अर्थ येथें अर्थात् 'डेऱ्यास' असा घ्यावयाचा. ४ औरंगाबादेस. ५ हें ही पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र.

विज्ञापना येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहावें. विशेष. इकडील वर्तमान तर नबाब शहरांत आहेत. त्यांजवळ फौज चार पांच हजार व गाडदी चार हजार पर्यंत आहेत. प्रस्तुत कारभार नबाबच करीत आहेत. दिवाणगिरिचीं वस्त्रें अद्यापि कोणास दिलीं नाहींत. सलुखाचा प्रकार बोलावयासीं धोंडोपंतास[1] पाठविणार, ह्मणून धोंडोपंतीं बातमी पाठविली आहे. वडिलांस कळावें. रवाना छ० १३ सफर मुक्काम पैठण. गंगा उत्तरतीर. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० १९ सफर.

नं० ३५०

(२३ आगस्ट.)

श्रीगणराज.

अपत्यें नीलकंठानें[2] साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागायत श्रावण शु० पौर्णिमा. भौमवार. मुक्काम पैठण. वडिलांचे आशीर्वादें यथास्थित असे. विशेष. काल सविस्तर लिहिलेंच आहे. त्यानंतर काल श्रावणी करून दोन प्रहरांनंतर तीर्थरूप राजश्री रावे[3] व सर्व मंडळी दरबारास गेलों होतों. उभयतां श्रीमंतांनीं तीर्थरूपांशीं बहुता प्रकारें ममतेचें भाषण केलें. सोमवार होता. भोजनास राहविलें. वरकड सर्व मंडळी माघारे आलों. तदनंतर रात्रौ थोरले श्रीमंतांनीं एकांतीं गंगातीरीं बसोन बहुतां प्रकारें वडिलांची खातर जमा केली. “ निरपराधी तुह्मांस गांजिलें. तुह्मीं गेलां हें अंतर तुह्मांकडे नाहीं. आणि गेलां आलां हें आपले चित्तांत किमपि नाहीं. तुह्मीं एकनिष्ठ आहां. पूर्वींपेक्षां विशेष कृपा तुह्मांवर आहे. यांत अंतर असेल तर गंगेची शपथ ! ” असें बहुत ममतेनें बोलिले. उ-

---

१ हा धोंडोराम उर्फ धोंडोपंत निजामअल्लीच्या दरबारीं नेहमीं राहणारा पेशव्यांचा वकील. २ हें नीलकंठराव त्रिंबक यांचें त्रिंबक हरीस पत्र. ३ वडील चुलत बंधु गोपाळराव.

पर यानीं विनंती केली कीं, मजला स्वामीनीं [1]त्याचे हातीं दिलें होतें, त्या मुळें त्या पक्षानें वर्तलों. आतां स्वामीखेरीज दुसरा अवलंब नाहीं. ऐसें बहुतच नम्रतेनें बोलिले. उपर श्रीमंत बोलिले जे, " आतां आमचे घरीं ही द्वैतभाव नाहीं. आमचें शरीर अशक्त जाहलें. प्रवास होत नाहीं. यास्तव अ[2]विंधाचा तह जाहल्या उपरी पुण्यास जाऊं. तेथून त्रिंबकास जात्रेस सर्वांनीं निरोप द्यावा. तेथें महिना दोन महिने, पुण्यास महिना दोन महिने, या प्रमाणें राहून जड[3]भारी पडलेस बोलावाल ते वेळीं येऊं." ऐसें बहुत निखालसपणें बोलिले. मिरजेची सनद देविली. काल कल्याणी संध्याकाळीं होत्या याजमुळें न घेतली. आज पंधरा घटिकांत सनद घेणार. तदनंतर एक कारकून [4]कार्य होईल ऐसा घेऊन सत्वरच रवाना करितों. काल प्रातःकाळीं गंगेस उतार झाला. कमरे बरोबरी पाणी झालें. श्रीमंतांचे डेरे ढाला पलीकडे गेल्या. लष्कर तमाम उतरूं लागलें. खासे आज जाणार. आम्हीं ही आज कूच करून जातों. मुरादखां[5]नाचा जाब अद्याप आला नाहीं. लष्कर आज सारें पलीकडे जातें. फौज दे[6]खील भोंसले बारा हजार चौदा हजार आहे. गंगेच्या उत्तरतीरीं दहा पांच मुक्काम पडतील. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० ३९१ L

(श्रावण वद्य चतुर्थी
२७ आगस्ट.)

श्री.

राजश्री रामचंद्र नारायण गोरे गोसावी यासीं.

---

१ मोंगलाचें. २ मोंगलाचा. ३ फार महत्वाचें काम. संकटाचा समय. ४ मिरजेचा किल्ला लक्ष्मण कोन्हेर याजकडे होता तो त्याजकडून पटवर्धनांच्या हवालीं सुरळीतपणें करविण्याचें काम ज्याच्या हातून निभेल असा पेशव्यांचा कारकून. ५ मुरादखान शत्रूकडून जे सरदार पाडाव आले त्यांत होता. त्यास तहाच्या शर्ती मोंगलास कळविण्या करितां मराठ्यांनीं औरंगाबादेस पाठविलें होतें. ६ भोंसल्या सुद्धां.

सु॥ आर्बासीतैन मय्या व अलफ. तुम्हीं पत्र छ० ११ सफरचें पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. तुम्हीं लिहिलें कीं, ' देशीं यावयाचा प्रकार कधीं होईल ? ' त्यास प्रस्तुतचा प्रकार कसकसा होतो त्या सारखा येण्याचा प्रकार [घडेल.] प्रस्तुत तर नाहीं. तुम्हांस कळावें. असेंच सविस्तर वर्तमान हमेशा लिहून पाठवावें. तीर्थस्वरूप सौभाग्यवती काकूबाईस साष्टांग नमस्कार सांगणें. जाणिजे. छ० १७ सफर बहुत काय लिहिणें. मोंगलाच्या तोफां पैकीं पंचवीस तोफा व एक गरनाळ या प्रमाणें आली. छ० मजकूर.

नं० ३९२

(अजमासें श्रावण वद्य
आगस्टचा दु०पंधरवडा.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. बंकापूर हैदर नाइकानें घेतलें ह्मणोन धारवाडाहून पत्रें आलीं तींच पाठविलीं आहेत. काल गजेंद्रगडाहून दौलत राऊ घोरपडे यांचीं पत्रें आलीं तीं ही माणसें सांगतात कीं, आपण मनोळींत ऐकिलें कीं, बंकापूर गेलें. वर्तमान लटकें कोणी लिहिणार नाहीं. त्यांणीं युद्धाची शर्थ केली. शेवट उपराळा नाहीं, केवळ जेर झाल्यावरी अब्रूनें निघणें कठिण. यास्तव सव्वा महिना झुजोन अब्रूने निघाले. परंतु कोणीकडे गेले ! पुढें हैदर नाइकानें मनसबा काय केला; बंकापूर सावनूरवाले यांस दिलें किंवा आपलेंच ठाणें बसविलें; पुढें येणार किंवा मावारा जाणार; हें कळलियावर लिहून पाठवूं. " नबाब नवे लोक चाकरीस ठेवितो; सामानाची

---

१ पत्र पेशव्यांनीं लिहिलेलें. २ पुण्यास. ३ पानपतांत पडलेल्या भाऊसाहेबांची स्त्री पार्वतीबाई. ४ लुटींत व लढाईंत प्राप्त झाली. ५ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ६ बंकापुरचा किल्लेदार गोविंदपंत सखदेव याणें.

वगैरे तरतूद करितो; " ह्मणून लिहिलें, तरी तो बे हिम्मती होऊन बसेल कीं काय! त्यांत अभिमानी जो आहे तो प्राण जात पर्यंत इरे सोडणार नाहीं. विठ्ठल सुंदर व विनायकदास याणीं मरून बरें ह्मणाविलें! परंतु मरणार यामुळें त्यांच्या बुद्धीस विपर्यास होऊन धण्याच्या दौलतीस धक्का दिला. त्यानें आपला भाऊ आणविला, तेव्हां त्याचें कर्तेपण कळलेंच आहे. परंतु (त्याजवळ) द्रव्य आहे. त्यास कामकाजांत घालून त्याज पासून द्रव्याचा व्यय करवावा असा मनसबा करील. मुरादखान गेला तेव्हां कार्यभागी यांच्या अनुमतानेंच गेला असेल. हर एक प्रकारें संधानच करितील. श्रीमंतानीं आधीं बीड, खर्डे येथील खंडणींत साधेल तें द्रव्य घ्यावयाचें होतें. तह झालियावरी त्यास सोडावें लागेल. याची पैरवी कशी केली आहे न कळे! मुख्य गोष्ट — यश प्राक्तनानुसार आलें, पण पुढील कर्तव्यार्थाची काळजी कोणासच नाहीं! असो. तुम्हीं लिहिले प्रमाणें सबुरीनेंच वर्तावें. क्षुल्लक लोक मध्यें नाना प्रकारचे अपाय कल्पितील; त्यास बहुत सावधपणें सनद तेवढी युक्तीनें हाताखालीं घालून रवाना करावी. जमखिंडी, अष्टें, यादवाड, शहापुर, पुणतांबें, वगैरे या सनदा घ्याव्या. सावनूर तालुका सांप्रत हैदरनाइकाच्या वेधांतच आहे. पुढें त्रि-

१ युद्धांत पराजित होऊन औरंगाबादेस गेल्या नंतर निजामअल्लीनें कुमके करितां आपला भाऊ बसालतजंग यास आणविलें. २ कारभारी सखारामबापू व मोंगलाच्या सैन्यांतून पाडाव सांपडलेला सरदार मुरादखान हे दोघे फार दिवसांचे स्नेही. आतां मोंगलाशीं तहा बद्दल बोलण्या करितां मुरादखान गेला आहे तो सखारामबापूच्या सांगण्यावरूनच गेला असेल. ३ तह मोंगलाशीं होण्यापूर्वीं त्याचे तालुके बीड व खर्डे यांतून काय खंडणी मिळेल ती श्रीमंतानीं घ्यावयाची होती. तह झाल्यावर घेतली तर ती मोंगलास परत द्यावी लागेल; असा गोविंद हरीचा अभिप्राय आहे. बीड परगण्यांतून पेशव्यानीं एक लक्ष बारा हजार रुपये खंडणी या पूर्वींच घेतली होती हें गोविंद हरीस कळलें नव्हतेंसें दिसतें. ४ राक्षसभुवनच्या लढाईत जय. ५ हैदराचें पारिपत्य करणें वगैरे कामांची. ६ मिरज देण्याविषयींची सनद.

लंब लागला ह्मणोन चिंता नाहीं. तूर्त जवळील पैत्रें बागेवाडी, संपगांव वगैरे स्थळांचीं ध्यावीं. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं० ३९३L

(श्रावण वद्य चतुर्थी
२७ आगस्ट.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० १७ सफर. मुक्काम पैठण, गंगातीर येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलीं पत्र छ० ११ सफरचें पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. पूर्वीं पत्र पाठविलें होतें त्यावरून कळलेंच असेल. " शत्रु शेष न ठेवावे, बाबा वैद्याचा समाचार घेत जावा, सखारामपंत पहिल्या प्रमाणें निखालसें पत्र पाठवीत नाहींत त्यांस ताकीद करावी, " ह्मणून आज्ञा; त्यास शत्रूचा प्रकार तर पूर्वीं महंमद मुरादखान बोलून गेले होते त्यास बोलून आले आहेत. त्यास काल दिवस वाईट होता, यास्तव बोलणें झालें नाहीं. आज त्यांशीं बोलून ते आपल्याँ मतलबा प्रमाणें करीत असल्यास उत्तमच आहे. नाहीं तर बिघाड तर आहेच. आम्हीं मतलब न घालावे व शत्रु अशा पेंचांत आहे

---

१ सावनुरची सनद हातीं येण्यास विलंब लागला तरी चिंता नाहीं. २ पेशव्यांचीं ताकीदपत्रें तीं ठाणीं पटवर्धनांच्या हवालीं करण्याविषयीं तेथील ठाणेंदारांस. ३ पत्र पेशव्यांचें गोपिकाबाईस. ४ सरळपणाचें. ५ मोंगलाकडे जाऊन तहाच्या शर्ती ठरवून आले. ६ आमच्या. ७ आमची अमुक मागणी कबूल कराल तर तह करूं वगैरे कांहीं एक न बोलतां त्याचें सबंध राज्यच आम्हीं घ्यावें हें खरें, पण आमच्या लोकांस वेतन न मिळाल्यामुळें व देशीं त्यांचीं घरेंदारें लुटलीं व जाळिलीं गेलीं आहेत

तों बुडवावा, परंतु आमच्या फौजेस पैका (आम्हांकडून मिळाला) नाहीं. व लोक हुजुरातचे व पतक्यांचे बहुत करून घरदारें लुटलीं जळालीं याज मुळें देशीं गेले व पैका ही द्यावयास नाहीं. वरकड मसलती बुडतात, यास्तव मतलब घालावे लागतात. व मल्हारबाचे ही मतें हेंच करावेंसें आहे. बाबा वैद्याचा समाचार आज्ञे प्रमाणें घेत असतों. त्याचे मतें घरास जावयास निरोप मागावा असें आहे. तर वडिलीं त्यास लिहावें कीं, ' निरोप न मागणें. ' या प्रमाणें त्यास लिहून पाठविण्यास आज्ञा करावी. सखारामपंताचा प्रकार तर त्याचे मतें असें कृपेचें पत्र वडिलांचें यावें हे तर त्याची मर्जी बहुत आहे. त्यानें ही पत्र सेवेशीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. कृष्णरायानीं[२] पत्र लिहिलें आहे त्यावरून सेवेशीं विदित होईल. वरकड वर्तमान जें होईल व निश्चय ठरेल तें सेवेशीं लिहून पाठवीन. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं० ३९४L

(श्रावण वद्य अष्टमी
३१ आगस्ट.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें[३] चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहिणें. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. असेंच सदैव आशीर्वाद पत्र

म्हणून सैन्यांतील पुष्कळ लोक घरोघर गेले. काय राहिले आहेत त्यांस ही द्यावयास पैका नाहीं. सबब शत्रूशीं तह करणें भाग पडत आहे.

१ हैदरअल्लीचें पारिपत्य करणें वगैरे. २ कृष्णरावबल्लाळ काळे याणीं. ३ पत्र पेशव्यांचें गोपिकाबाईस.

पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर काल मुरादखान येथें बनाव न बसे[1] यास्तव निरोप घेऊन गेले. आम्हीं ही कूच करून पैठणानजीक राहिलों. उदईक कूच करावयासीं मुहूर्त नव्हता यास्तव कूच झालें. उदईक कूच करून मोंगलावर जाऊं. वडिलास कळावें. मोंगलाची फौज व गाडदी मिळून दहा हजार आहेत. ते[2] ही शहरा बाहेर निघणार. त्यांसीं बोलिलों[3] त्याचे तपशील—१करोड दहा लक्षांची द्यावी, ग्वंदार, आवसें, अंतूर हे तिन्ही किल्ले द्यावे, औरंगाबाद शहर द्यावें, या प्रमाणें त्यास सांगितलें आहे. रवाना छ० २१ सफर बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

पै॥ छ० २५ सफर.

नं० ३९९[4]

(श्रावण वद्य दशमी
२ सप्टेंबर.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० २३ सफर मुक्काम कारकिण गांव ढोरकिणगांव परगणे पैठण येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. सदैव आशीर्वाद पत्र पाठविण्यास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर काल भोंसले यांचा खर्चाचों[5] गुंता होता यास्तव काल येथें मुक्काम झाला.

---

१ तहाचें बोलणें मान्य न होई यास्तव. २ नबाव निजामअल्ली. ३ तहाचीं कलमें बोललों. ४ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. ५ भोंसल्यास कांहीं द्रव्य द्यावयाचें ठरलें होतें तें द्यावयास नव्हतें म्हणून अडचण पडली.

आज ही पर्जन्यामुळें मुक्काम ठरला. उदईक कूच करून शहरावर जाऊं. भोंसले ही कालच कूच करून अवाडीवर तीन कोसांवर उतरले. नबाबाचा प्रकार बातमीचा तर, त्याची थोडकीशी फौज व पेशखाना काळ्या[1] चवुत्र्यावर उतरला. व नवाबही आज उद्यां बाहेर निघतील. त्यांजवळ सरंजाम तर चार पांच हजार फौज व गाडदी पांच सहा हजार व तोफा वीस पर्यंत आहेत. परंतु आव गेला आहे. व सलूखही करावयासी चाहतात. परंतु आह्मीं ह्मणतों त्या करारावर अद्यापि आले नाहींत. हिंमतीच्या गोष्टी तोंडीं बोलतात. परंतु असें ही ह्मणतात कीं, " या कालीं आह्मांवर रयांत[2] केली तर आह्मीं ही बहुत कामास येऊं. विठ्ठलपंतानीं इतका उपद्व्याप केला. असा प्रकार आमचे चित्तांत नाहीं व पुढें ही स्नेह बळकट व्हावा हीच आमची इच्छा आहे; ". ह्मणून आमच्या वकिलाजवळ बोलत असतात. पुढें सत्वरच त्यांशीं गांठ घालून जें होईल तें सेवेशीं लिहूं. वडिलांस कळवें. शहरांत महागाई झाली आहे. बहुतकरून सलूख त्यांस जेर केल्यावर होईल. राजश्री मोरो[3] बाबूराव यांसी व बाळाजी जनार्दन यांसी बरोबरच फडणीसीचीं वस्त्रें होतील. नानास ही कल्याणींस[4] बोलावूं पाठविलें आहे. ते आल्यावर वस्त्रें होतील. गोपाळराव यास मिरजेची सनद दिली. परंतु कांहीं त्याच्या कारभाराचें बोलणें आहे यास्तव तें झाल्यावर सनद रवाना करितील. वडिलांस कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै।। छ० २ रबिलावल

---

१ काळा चवुत्रा औरंगाबाद शहरा बाहेर आहे. २ कृपा. ३ मोरोबा व नाना फडणीस हे चुलत चुलत भाऊ. ४ हें कल्याण सिंहगडच्या पायथ्याशीं आहे. येथें या वेळीं नाना फडणीस होता.

नं० ३५६L

[भाद्रपद शुद्ध प्रतिपदा
८ सप्तंबर.]

श्री.

राजश्री रामचंद्र नारायण गोरे यांसी

सु ॥ आर्बा सीतैन मय्या व अल्लफ. तुह्मीं छ० २३ सफरचें पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. इकडील वर्तमान तर नबाब शहरांत आहेत. तहाचा प्रकार बोलतच आहेत. ठरला नाहीं. ठरल्यानंतर लिहून पाठवूं. जहागीर व किल्ले मोंगलापासून घ्यावयाचा प्रकार तपशीलवार तीर्थरूप मातुश्री बाईच्या पत्रीं लिहिला आहे त्यावरून कळेल. तुह्मीं लिहिलें कीं, ' घरास यावयाचें कधी होईल तें लिहावें ' ह्मणून त्यास मोंगलाचा प्रकार शेवटास न्यावा असा आमचा हेतु आहे. मग पुढें ठरेल तें खरें ! प्रस्तुत तर हाच विचार आहे. तपशीलवार हमेशा पत्र पाठविणें जाणिजे. छ० २९ सफर बहुत काय लिहिणें.

पै॥ छ० १९ रबिलावल

नं० ३५७

(अजमासें भाद्रपद शुद्ध
सप्तंबरचा प०पंधरवडा.)

नारो आपाजी तुळसीबागवाले यांचें गोपाळरावास पत्र

श्रीमंतांनीं राजश्री नारो शंकर यांस मंगळवेढ्यास पाठवून मिरज वगैरे तालुका देऊन पूर्ववत प्रमाणें चालवावयाचा करार करून तुह्मांस बोलावून आणिलें, श्रावण शुद्ध त्रयोदशीचे दिवशीं श्रीमंतांच्या भेटी जाल्या, करारा

---

१ पत्र पेशव्यानीं लिहिलेलें.

प्रमाणें सनदा तयार होत आहेत, ह्मणून लिहिलें, तें कळोन बहुत संतोष जाला. जे गोष्ट व्हावीसें चिंतन करीत होतों तें ईश्वरें घडविलें. अवघे एक झालीं, फार उत्तम झालें.

नं० ३५८

(अजमासें भाद्रपद वद्य
सप्तंबरचा दु० पंधरवडा.)

गोपाळरावाचें गोविंद हरीस पत्र:—

" किल्ला नलदुर्ग पहिला पंचायशीं लक्षांच्या जहागिरींत होता तो मात्र द्यावा. दुसरा अंतूर आदिकरून मागत होते परंतु मोंगलानें दिला नाहीं. नलदुर्ग झालें तरीं खालीं करून देत नाहींत. ' कळेल तेणें प्रमाणें ध्या, असें नबाबानीं सांगितलें. सारांश अविंधाकरवीं ओढ धरवून शेवट आपण होऊनच निकाल काढून घेतला! पंचायशीं लक्ष जहागिरीचीं सनदापत्रें दिलीं. गंगोबा तात्या होळकराचे दिवाण मोंगलाकडून आल्यानंतर परगण्याची नांवनिशी कळेल. ते यावयाचा मात्र अवकाश. आले ह्मणजे श्रीमंत लागलेच कूच करून माघारे गंगेवर जाणार. तेथून भोंसल्यास निरोप देणार. आपण आपली सारी मंडळी घेऊन पुण्यास श्रीमंत मातुश्रीचे दर्शनास जावें असा ठराव झाला आहे. सौभाग्यवती आनंदीबाईस ही आणावयास शिष्य पाठविला आहे. तेथें जाऊन मास पक्ष राहून मग आपण निरोप घेऊन जावें हा बेत श्रीमंत दादांचा आहे. "

---

१ कुटुंबाचीं माणसें एकत्र झालीं. (आजपर्यंत तीं नलदुर्ग, अक्कलकोट, मंगळवेढें, वगैरे ठिकाणीं होतीं.) २ मोंगलाकडून. ३ हा ठराव दादासाहेबांचा. ४ त्र्यंबकेश्वरास जावें.

नं० ३५९

[अनमासें भाद्रपद वद्य
सप्तेंबरचा दु० पंधरवडा.]

पांडुरंगराव यांचें गोविंद हरीस पत्र: —

सलुयाचा मजकूर तरी राजश्री गंगोबा निसबत होळकर शहरास गेले आहेत. सलुयाचा ठराव होत आहे. अंतूरचा किल्ला सरकारांत द्यावयाचा करार झाला होता तो ही मोडला. आतां किल्ला देखील नाहींसें झालें आहे! ठरतां ठरतां काय ठरेल तें पहावें! एका दो रोजांत काय तें उलगडेल. श्रीमंत राजश्री भवानराव प्रतिनिधि यांस सोमवारीं वस्त्रें दिलीं. पूर्ववत प्रमणें किल्ले आदिकरून दिले. पन्नास हजारांचा सरंजाम पहिले सरकारांत देत होते ते आतां पाऊण लक्षावर ठराव केला. लागलाच सरंजाम देखील सरकारांतून (प्रतिनिधीनीं) तोडून घेतला.

नं० ३६०

(१० सप्तंबर.)

श्रीगणराज.

अपत्यें नीलकंठानें साष्टांग नमस्कार येथील वर्तमान तागायत भाद्रपद शु० तृतीया मंदवार. मुक्काम पिंपळगांव नजिक औरंगाबाद, पश्चिमेस, येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून यथास्थित असे. विशेष. मिरजेच्या सनदा मागेंच तयार झाल्या होत्या परंतु कारभारी कांहीं दिक्कत निर्माण करून बसले होते; याजमुळें न पाठविल्या. त्यास काल श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, कराराप्रमाणें तुमचें काम विल्हेस लाऊन देतों. मिरजेची सनद पाठ-

१ पत्र नीलकंठराव त्रिंबक यांचें त्रिंबक हरीस. २ श्रीमंत माधवराव पेशवे यानीं गोपाळराव पटवर्धनास आज्ञा केली.

ऊन देणें. सनद पावतांच स्थळ ही देतील या प्रमाणें सांगितलें. मग आज प्रातःकाळीं सनद रवाना केली आहे ते येऊन पावलीच असेल. श्रीमंत काल शहरचे पूर्वेस चार कोसांवर येऊन राहिले आहेत. नबाबाचे मतें श्रीमंत माधवराव पेशवे यांजकडे साडेबावीस लक्षांची जहागीर व साठलक्षांची जहागीर व एक किल्ला अंतूरचा देऊन विवेक करावा. श्रीमंतांचे मतें एक कोटी दहा लक्षांची जहागीर दिली तरी घ्यावी. परंतु इकडील व तिकडील कारभारी रंग भरून विवेक करूं देत नाहींत ! यांचें तेज चढलें आहे तें उतरून मग जैसा बनेल तैसा तह करावयाच्या प्रकारांत आहेत ! बहुतां प्रकारें दो चौं दिवसांत तहाचें होईलसें दिसतें. [आह्मांस श्रीमंतानीं] मिरज देविली. सरंजामाचे लढे आहेत ते ही उरकून देतील. परंतु आठ चार दिवस लागतील. तहाचें व कामकाजाचें विल्हे लागल्यावर निरोप घेऊन यावें असें (मनांत) आहे. यांत श्रींची इच्छा ! बंकापुरें गेलें. वरकड बारी पलीकडील कोणतें ही स्थळ राहत नाहीं. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

नं० ३६१L

(भाद्रपद शुद्ध चतुर्थी
११ सप्तंबर.)

श्री.

अपत्यें माधवरायानें चरणावर मस्तक ठेऊन शिर साष्टांग नमस्कार

---

१ मिरजेचा किल्लेदार लक्ष्मण कोन्हेर हा किल्ला तुमच्या हवालीं करील. २ साडे बावीस व साठ मिळून साडे ब्यायशीं लक्षांची जहागीर मोंगल द्यावयास कबूल झाला होता. ३ लढाईत जय मिळाल्यामुळें पेशव्यांची सरशी झाली आहे. ४ बंकापुर हैदराच्या हातीं गेलें. ५ मनोळीच्या बारी पलीकडील. (अर्थात् धारवाड जिल्ह्यांतील) ६ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र.

विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० ३ रबिलावल मुक्काम नजीक औरंगाबाद येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. इकडील वर्तमान तर नबाब शहरांत आहे. त्याजकडून हिम्मतखान मुरादखानाचा भाऊ आला आहे. तो[1] ही येणार. हिम्मतखान मल्हारबाचे मार्फतीनें बोलत आहेत. त्यांचा मुद्दा हा कीं, साठांवर तह करावा अथवा अधिक चार पांच पर्यंत म्हटलें तरी ऐकेतील. असें त्यांच्या मतें. इकडील मुद्दा—जरूर ह्मटल्यास नव्वदांची जहागीर व तीन किल्ले धारूर, खंदार, अंतुर या प्रमाणें द्यावें. निदान वरचा विचार पहाणें तर ब्यायशींची जहागीर व दोन किल्ले द्यावे असें आहे. नबाबानीं कृष्णराव बल्लाळ व गंगोबा यांस बोलाविलें आहे. जावयाचा निश्चय ठरला नाहीं. ठरल्यावर लिहीन. काल भोंसल्यानीं (आम्हांस) मेजवानी केली. पुण्याच्या तोफा नजर केल्या. अशेरीचा किल्ला ठेवावा असें आज उद्यां ह्मणणार. वडिलांस कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० ८ रबिलावल.

नं० ३६२L

(भाद्रपद शुद्ध द्वादशी
१८ सप्तंबर.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार.

---

१ मुरादखान ही तहा प्रकरणीं बोलावयास येणार. २ नबाब मान्य करितील. ३ पुण्याहून लुटून नेलेल्या. ४ पूर्वी ठरल्या प्रमाणें अशीरगड आह्मांस देऊं नये. तो सरकारांतच ठेवावा. ५ पत्र पेशव्यांचें गोपिकाबाईस.

विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० १० रबिलावल मुक्काम नजीक शहर येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलांकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तर वर्तमान लिहिण्याची आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर नबाबाकडून हिम्मतखान आले होते त्यानीं बोलून ठराव करून कृष्णरायास व गंगोबास घेऊन गेले. जहागिरीचा ठराव पहिली साठीची व आणखी बाविसांची घ्यावी, असा जहागिरीचा ठराव झाला आहे. व किल्ल्याचा प्रकार ठरला नाहीं. ठरल्यावर लिहीन. किल्ल्याचा प्रकार बोलावयास गेले आहेत. अद्याप जाब आला नाहीं. ठरल्यावर लिहीन. वडिलांस कळावें. श्रुत होय हे विज्ञापना. हा प्रकार लवकरच होईल. त्या नंतर घरास यावयास होईल. वडिलांस कळावें. हे विज्ञापना.

नं० ३६३L

[भाद्रपद शुद्ध द्वादशी
१८ सप्तंबर.]

श्री.

राजश्री रामचंद्र नारायण गोरे गोसावी यांसीं.

सु॥ आर्बा सीतैन मय्या व अल्लफ. तुम्हांकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान श्रवण होत नाहीं. तरी त्या प्रांतीं थोडी बहुत लावणी जाहली किंवा नाहीं, पुण्याचे गांव लागले न लागले, हें कळलें नाहीं. पुण्यांतील घरें जळालीं आहेत, त्यास कोणकोणत्या घरांचें काम चालीस लागलें आहे, कोण कोण आले आहेत, मातबर माणूस कोण आले, व नाहीं कोण, हें लिहावें. त्र्यंबकराव मामा हे प्रस्तुत कोठें आहेत ? त्यांस बोलाऊं

१ पत्र पेशव्यानीं लिहिलेलें.

पाठविलें होतें. ते अद्यापि आले नाहींत. तर त्यांचा शोध करून लिहावें. नाना फडणिसांस दोन तीन कागद यावयास पाठविले आहेत. ते ही अद्यापि न आले. ते आल्या नंतर त्यांचें काम त्यांजकडे होईल. दिनकर महादेव यांचे चिरंजीव यांस देवाज्ञा झाली सबब ते बहुतच श्रमी आहेत. त्यास तुम्हीं त्यांचें बहुत प्रकारें समाधान आमचे तर्फेनें करणें. मोंगलाकडील प्रकार तर नबाबाकडून मुरादखानाचे बंधु हिम्मतखान आले होते. ते सुभेदारांचे मार्फतीनें बोलत आहेत. जहागिरीचा प्रकार बोलून गंगोबास व कृष्णराव बल्लाळास बरोबर घेऊन काल गेले. त्यामध्यें किल्लयाचा प्रकार अद्यापि ठरला नाहीं. व त्याचा ही जबाब अद्याप आला नाहीं. मामानीं पूर्वीं राजमाचीहून पत्र लिहिलें होतें तें पावलें. अलीकडील वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तर लिहिणें. कृष्णाजीपंत[1] कोठें आहेत? त्यांचें शरीर प्रकृतीचें वर्तमान कसें आहे? आम्हीं त्यांस पत्र पाठविलें होतें तें पावून उत्तर अद्यापि आलें नाहीं. तरी त्यांचा समाचार घेणें. वेदमूर्ति मोरो जोशी प्रस्तुत कोठें आहेत, त्यांचें वर्तमान काय, तें त्यांस पुसून लिहावें. त्यांच्या हिशोबा पैकीं कांहीं वरात दिली आहे, तरी वराते प्रमाणें ऐवज पावता करून जाब पत्र देणें. जाणिजे. छ० १० रबिलावल.

पै।। छ० १९ रबिलावल.

नं० ३६४

[१९ सप्तंबर.]

श्रीगणराज.

तीर्थरूप राजश्री आपा वडिलांचे सेवेशीं—

---

१ कृष्णाजीपंत कोण? बहुधा कृष्णाजीपंत गोरे. या रामभाऊ गोऱ्याचाच कोणी भाऊबंद. [यास पेशव्यानीं लिहिलेलें मागें नं० ३४१ चें पत्र छापिलें आहे.]

अपत्यें गोपाळानें साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत भाद्रपद शु० त्रयोदशी मंदवासर मुक्काम पिंपळगांव नजीक चिखलठाण. यथास्थित असे. विशेष. मिरजेच्या सनदा पेशजी घेतल्या होत्या त्यांत कांहीं अडथळा पडला होता, त्याजमुळें न पाठविल्या. काल श्रीमंतांनीं आणखी ताकीद दिली आणि (सनदा) रवाना करावयाची आज्ञा ही केली. जाबसाल[1] ही निर्गमांत आणिले आहेत. सनदा पेशजी घेतल्या त्या, व हल्लीं ताकिदी दिल्या त्या ऐशा पाठविल्या आहेत. पावतांच पुढें वडिलीं रवाना कराव्या. एक शहाणा कारकून पाठवावा. सरकारी खिजमतगार ही पाठविला आहे. या समागमें कारकून देऊन सत्वर रवाना करावा. उदईक आणखी खिजमतगार व पत्र देऊन परस्पर मिरजेस पाठवितों. श्रीमंत काल कूच करून येथें आले. अद्यापि तहाचें बोलणें नाहीं. कितेकांचे मतें अविंधाचें स्वरूप वाढवून मग तह करावा असें आहे. कोणें प्रकारें घडतें पहावें. अविंध शहरांतच आहे. पहिलीं पत्रें आहेत तीं आधीं द्यावीं, मागून घेतलीं हीं मग द्यावीं, या प्रमाणें जाणार कारकुनास ताकीद करावी. मोंगलअह्लीकडील मीरआबस ते प्रांतीं आला आहे. वडिलीं ही लोक जमा करण्याची तरतूद केली असेल. नरसिंगराव उद्धव यास ही उदईक पत्र सरकारचें देऊन रवाना करितों. ते ही सांगोल्याचे रोंखें येतील. बहुधा बरडोलचे रोंखें येणार नाहींत. दुरूनच खंडणी मात्र घेऊन माघारे जातील

---

१ पत्र गोपाळरावाचें चुलता त्रिंबक हरि यास. २ माधवराव पेशव्यानीं. ३ लढयाच्या बाबींचा निकाल लाविला आहे. ४ सखारामबापू, गंगोबा तात्या, कृष्णराव बल्लाळ व मोंगलाकडील मुरादखान यांच्या मतें. ५ मोंगलाचें तेज पराजयामुळें कमी झालें आहे तें वाढवून. आतां हें तेज कसें वाढवावयाचें, तर पेशवे जें जहागीर व किल्ले वगैरे मागत आहेत तितकें त्यांस मिळूं दिलें नाहीं ह्मणजे चढलें मोंगलास तेज ! वाहवारे घरबुडवे मुत्सद्दी ! ६ पटवर्धनांची कुमक करण्या विषयीं पेशव्यांचें नरसिंगरावास पत्र.

असें दिसतें. सनदा तावडतोब रवाना कराव्या. बहुत काय लिहिणें. हे विज्ञापना.

नं० ३६९L

(भाद्रपद वद्य तृतीया
२९ सप्तंबर.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० १७ रबिलावल मुक्काम नजीक शहर औरंगाबाद येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलांकडून बहुत दिवस आशीर्वाद पत्र आलें नाहीं. पत्र पाठवावयासीं आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर नबाब शहरांतच आहेत. गंगोबास व कृष्णरायास हिम्मतखान बराबर घेऊन गेले, हें पूर्वीं सेवेशीं लिहिलेंच आहे. प्रस्तुत गंगोबा तेथेंच आहेत. अद्यापि कारभार उरकला नाहीं. किल्ल्याचा प्रकार प्रस्तुत राहिला. जहागीर मात्र पावणेब्यायशींची ध्यावी (असें ठरलें.) किल्ल्याचा प्रकार प्रस्तुत राहिला. नलदुर्ग मात्र द्यावा. असें बोलण्यांत असावें या प्रमाणें करार ठरला आहे. कागद पत्र तयार नाहींत. यास्तव एका दो दिवसां येतील.[2] हा कारभार उरकल्यावर सत्वरच येऊं. वडिलांस कळावें. हैदरनाईक यानें बंकापुर घेतलें. पुढें धारवाड प्रांतीं येऊन धारवाड घेणार असें वर्तमान आलें आहे. परंतु दुसरें पत्र आलें कीं लढाईचें[3] वर्तमान ऐकून माघारे जाणार. असें वर्तमान आलें आहे. पुढें जें वर्तमान होईल तें सेवेशीं लिहीन. हे विज्ञापना.

१ पत्र पेशव्यांचें गोपिकाबाईस. २ गंगोबा परत येतील. ३ राक्षसभुवनच्या लढाईचें.

नं० ३६६

(२५ सप्तंबर.)

श्रीगणराज.

तीर्थरूप राजश्री नाना वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें पांडुरंगानें[1] दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार. विज्ञापना. येथील क्षेम तागायत भाद्रपद वद्य तृतीयायुक्त चतुर्थी रविवार. मुक्काम नजीक चिखलठाण, येथें वडिलांचे आशीर्वादें करून समस्त मंडळी सुद्धां सुखरूप असों. विशेष. वडिलीं श्रीक्षेत्रें[2]चे मुक्कामचें पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री मोरोबादादांस[3] नमस्कार प्रविष्ट केला. त्यांणीं आपणास पत्र लिहिलें तें पाठविलें आहे. मिरजेची सनद राजश्री चिंतामणपंत शेखदार पुढें गेले त्यांजकडे पाठविली आहे ह्मणून लिहिलें, त्यास तेथील प्रकार त्यानीं काय लिहिला तो लिहावा. राजश्री लक्ष्मण कोन्हेर पांडवगडाकडे[4] आला आहे. त्याजकडे राजश्री बाळाजीपंत पाठविले आहेत हें पेशजीच्या पत्रीं लिहिलेंच आहे त्याजवरून कळलेंच असेल. इकडील सल्ल्याचा मजकूर तरी—राजश्री गंगोबा व कृष्णराव शहरास गेले ते आजच येणार. पहिले सांठीमध्यें[5] नलदुर्ग किल्ला सरकारांत आलाच. नवा किल्ला सरकारांत (मोंगल) देत नाहीं. जहागीर पंचायशीं (लक्षां) पावेतों (देण्याचा) ठराव झाला आहे. उदईक अथवा परवां कूच येथून होणार. श्रीमंत पक्षा कारितां गंगेवर जाणार आहेत. सल्ला झाला. गंगोबा आले ह्मणजे मजल दर मजल श्रीमंत पुण्यास जाणार. सारे सरदार देखील घेऊन जाणार ऐसें वर्तमान आहे. श्रीमंत दादासाहेब नऊ लक्षांची जहागीर व पांच किल्ले

१ हें पांडुरंगराव गोविंद यांचें गोविंद हरीस पत्र. २ पंढरपुरच्या. यावरून मंगळवेढें सोडून मिरजेकडे येण्याकारितां गोविंद हरि निघाला होता असें सिद्ध होतें. ३ मोरोबा दादा फडणीस यांस. ४ पांडवगड वांईजवळ आहे. ५ साठ लक्षांच्या जहागिरींत.

घेऊन त्रिंबकेश्वरीं राहणार. तेथें अग्निहोत्र घेऊन रहावें असें मानस आहे. तूर्त तो पुण्यास जावें, तेथें मास पक्ष राहून मातुश्री बाईची आज्ञा घेऊन मग जावें, हा बेत आहे. कारभारी यांचे मतें जहागीर [1]आली थोडकी, आणि सरकारास देणें फार, तेव्हां जहागीर इतकीच पुण्यास गेलेवर वांटावी; सारे [सरदार] समजून हीच वांटून घेतली तर बरें. नाहीं तरी आपण अंगा निराळे होऊन कारभाराचा बखेडा करावा असें आहे. कारभारी यांजवर मातुश्रीचा रोष आहे. याज करितां बाबा वैद्य पाठविले आहेत कीं मनःपूर्वक निखालसता असलिया आपणांस बोलाविणें. नाहीं तरी निखालसता तुम्हींच तेथें राहून करणें. याज करितां पुण्यास पाठविले आहेत. राजश्री नीलकंठ महादेव यांस बरें वाटत नव्हतें ह्मणून निरोप दिला. ते कालच पैठणाजवळ गंगा उतरून गेले. घरास जाणार. राजश्री नाना फडणीस पैठणास आले ह्मणोन वर्तमान आलें आहे. पंचमीचा पक्ष करून येतील. राजश्री बळवंतरायाचे चिरंजीव कालच आले. राजश्री शेषो नारायण करवीरकर हीं आले. कळावें. राजश्री आनंदराव रास्ते यांस कारभारी याणीं बलावणें पाठविलें आहे. त्यास कारभारी यांचे मतें हुजुरात फार झाली आहे ती मोडावी. परंतु श्रीमंत रांव ऐकत नाहींत. याज करितां [3]त्यांजकडून सांगून पहावें. आणि पुण्यास गेले उपरी बाईसाहेबांची

---

१ मोंगलाकडून जहागीर थोडकी मिळाली. तेव्हां हिच्याच वांटण्या सरदारांस करून द्याव्या. त्यांस पूर्वी कबूल केल्या प्रमाणें जहागीर द्यावी तर सरकारच्या खास अमलाखालीं मुलूख थोडा राहतो. या करितां अशी व्यवस्था करावी. सरदारानीं कबूल केलें तर बरेंच; नाहीं तर आपण कारभार सोडून घरीं बसावें व दौलतींत पुनः घोंटाळा करावा असा सखारामबापूचा बेत आहे. २ ' सखारामबापूच्या मतें हुजरात फौज फार झाली आहे ती कमी करून खर्च तोडावा, परंतु ही मसलत रावसाहेब पेशव्यांस पसंत पडत नाहीं. या करितां त्यांचे मामा आनंदराव रास्ते यांजकडून तरी त्यांस सांगून पहावें, ह्मणून रास्त्यांस सखारामबापूनें बोलावणें पाठविलें आहे, ' असा अभिप्राय. ३ रास्त्यांकडून.

ही कृपा त्यांचे द्वारें करून घ्यावी, याज करितां आणिले आहेत. राजश्री मल्हारराव रास्ते यागी आहेत. दररोज प्रातःकाळीं घोड्यावर बसून रानांत जातात आणि तेथें रुदंती करितात. सायंकाळीं; डेऱ्यास येतात. ऐसें वर्तमान आहे. कळावें. वरकड सविस्तर वर्तमान तीर्थरूपांनीं लिहिले वरून कळेल. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ निरंतर कीजे. हे विज्ञापना.

नं० ३६७

(अजमासें भाद्रपद वद्य
सप्तंबरचा दु०पंधरवडा.)

श्रीगणराज.

अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. राजश्री आबा पुरंदरे येथून पैठणास गेले. तेथें पक्ष ही करतील. बाबा वैद्य निरोप घेऊन पुण्यास नवरात्राकरितां गेले. अंतर्यामींची मसलत — कारभारी यांजवर मातुश्रीची वक्रता, याज करितां नीट करावया बद्दल गेले आहेत. श्रीमंत दादांचें मानस नवा लक्षांची जहागीर व चार किल्ले घेऊन आपला बेखिलाफ मातुश्रीच्या विद्यमानें करून निरोप घेऊन स्नानसंध्या करावयास त्रिंबकास जावें, पुढें अग्निहोत्र घ्यावें, हा मनोदय आहे. दक्षिण प्रांतीं हैदरनाईक प्रबल झाला. त्याचे पारपत्या विषयीं काडीमात्र काळजी कारभारी करीत असतील तर शपथ! कारभारी यांचें मानस असें कीं, जहागीर हल्लीं थोडी मिळाली, यास्तव आपल्या मनोदयानुरूप निकाल (सरदारानीं) करून घेतला तर उत्तम. नच ऐकत तर 'आपण कारभार टाकितों'

१ वैतागलेले. हे रानांत जाऊन रडत बसत होते असें येथें लिहिलें आहे! असें यांस काय दुःख झालें होतें न कळे! [या संबंधें आणखी उल्लेख मागें नं० ३४८ च्या पत्रांत आला आहे तो पहा.] २ गोपाळरावानें. ३ पत्र गोपाळरावाचें गोविंद हरीस. ४ सख्य.

ह्मणोन बखेड्यांत पुण्यांत गेले नंतर घालून बसावें, असे मनोदय आहेत. राजश्री नाना फडणीस आले ह्मणजे राजश्री मोरोबा दादांस वस्त्रें द्यावीं, तों पर्यंत देणें नाहींत, (असें थोरले श्रीमंत म्हणतात.) काल उडत वर्तमान आलें जे, राजश्री नाना निघून येत आहेत. सत्वर आले तर उत्तम. नाहीं तर मशारनिल्हेस बराबर असावें लागेल. दोढ केल्यानें लौकिकांत विरुद्ध दिसेल, यास्तव उतावळी करीं देत नाहीं. कालदेशवर्तमानानुरूप वर्तणूक करितों. विदित होय. हे विज्ञापना.

नं० ३६८

(अजमासें भाद्रपद वद्य
सप्तंबरचा दु०पंधरवडा)

श्रीगणराज.

अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. यादवाड, जमखिंडी येथील प्रकार विस्तारें करून लिहिला तो कळला. गणोबाचे पत्रावरून येसाजी राम याचें पत्र याच मजकुराचें आलेलें यजमानांस व कारभारी यांस दाखविलें. त्याजवरून श्रीमंत राजश्री दादासाहेबांचे नांवचीं पत्रें बर्व्यास व विठ्ठल विश्राम यांस घेतलीं. धाकट्या यजमानांचीं आणखी ताकीद पत्रें घेतलीं तीं पाठविलीं आहेत. प्रयत्न करून काम करावें. सारांश, मिरजेंत ठाणें बसले उपरी मग त्या प्रांतीं लढा पडणार नाहीं. बर्वे अष्टयांस आले ते तेथेंच आहेत तोंच गांठ घालून [3]स्थळाचे कागद पत्र करून घ्यावे. लांबणीवर पडूं देऊं नये. सरकारच्या पत्रांत लढा किमपि नाहीं अशीं

---

१ मोरोबा दादास स्वांरी बरोबर हिंडावें लागेल. नाना फडणीस आले तर तत्काळ फडणिशीचीं वस्त्रें मिळून घरीं जावयास मोकळीक होईल. २ पत्र गोपाळरावाचें गोविंद हरीस. ३ कर्नाटकांतील जहागिरी पैकीं ठाणीं बर्व्यांनीं घेतलीं होतीं तीं सोडून दिल्याच्या चिठ्ठ्या.

लिहून दिलीं आहेत. यादवाड, जमखिंडी, मिरजप्रांत, यांत पाहिल्या मामलेदारानीं कांहीं बाकी ठेविली नाहीं! बरें! काय करावें! बोभाट ही सांगून परिणाम नाहीं! यजमान हीनवर, वरकड त्रिजवर, असा प्रकार झाला; त्यामुळें कैद ही चालत नाहीं. तूर्त बोभाट कोणे गोष्टीचा करितां येत नाहीं. मोंगलाचा तह झाला; त्यास मुरादखान ह्मणतो जे आमचें समाधान नाहीं. थोरले यजमान समाधानार्थ दहा पांच लक्षांची जहागीर माघारी द्यावी असें ह्मणतात. त्याचा अभिप्राय--पंचविसांची द्यावी तर समाधान—असें बोलतो! अद्यापि ठराव नाहीं. याच तळावर ठराव करून निरोप त्यास देणार. एवंच घरांतून कारभारी यांचा व मुत्सद्दी व यजमानांचाच अंतर्यामीं लग त्याजकडे; त्याज करितां हा असा प्रकार बोलतात! ऐकून आश्चर्य वाटतें. निजामअल्लीनें सलाबतजंगास[1] गळीं देऊन मारून टाकिलें. या प्रमाणें निजामअल्लीनें काम केलें. विदित होय. सलाबतजंगाचे दोघे पुत्र होते ते ही मारिले. हें विनंती.

नं० ३६९

(भाद्रपद शुद्ध चतुर्दशी
२१ सप्तंबर.)

श्रीगणराज.

अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तूर्त मिरजेच्या फडणिशीचें पत्र बाळू दामल्यास आम्हीं लिहून दिलें आहे. ऐशियास तें पत्र ठेऊन

---

१ सलाबतजंग हा निजामअल्लीचा थोरला भाऊ व हैदराबादेचा नामधारी नबाब. या पूर्वींच त्यास निजामअल्लीनें बेदर मुक्कामीं कैदेंत ठेविलें होतें. बिचारा निरुपद्रवी होता. पण तो जिवंत तों पर्यंत राज्याचा मुख्य अधिकार आपल्या हातीं राहणार नाहीं अशी निजामअल्लीस भीती होती. त्यास गळफांस लावून मारून व त्याच्या मुलांस ही मारून निजामअल्ली आतां निर्भय झाला!

चार दिवस त्यासीं ममता दाखवूनच काज काम घ्यावें. आधींच तुटक गोष्ट सांगों नये. दरबारीं थोरल्या श्रीमंतांजवळी होता, याज करितां (त्यास फडणिशीची) सनद दिली आहे. रोष तूर्त करूं नये. प्रतिनिधि आज छ० १३ रोजीं येथून निघोन गेले. नवरात्र तर समीप आलें. घरीं वार्षिक (उत्सव) करून मग सप्तऋषीस जातील. राजश्री गंगोबा व कृष्णराव बल्लाळ नबाबाकडे गेले, त्यास पंचायशी लक्ष रुपयांची जहागीर [मोंगलानीं] द्यावी या प्रमाणें ठरावांत आलें. अंतुर किल्लयाचा परम आग्रह श्रीमंतांचा होता, परंतु तो किल्ला ते देत नाहींत. एक किल्ला चव्हाणाचा मात्र द्यावा असें बोलणें झालें आहे. निदानीं तो ही न दिला तत्रापि ओढूं नये, निकाल काढावा, असेंच ठरलें आहे. आज तो येतें नाहींत, उद्यां सनदा पत्रें घेऊन येणार. आल्या नंतर एका दों दिवसां येथून कूच करावें अशी मसलत आहे. एक वेळ मोंगलाचा विवेक झाल्या नंतर सर्व सरदारांस निरोप होऊन (ते) आपापल्या घरास जात आहेत. कामें काजें करारा प्रमाणें (यांची) निभावणी कारभारी करीत नाहींत, मग आपण उगेच राहोन कजिया कां करावा ? या करितां निकाल काढून घरास जावें;' अशा तजविजेंत [सर्व सरदार] आहेत. आमचें मानस [असें आहे कीं,] मिरज हातास येई तों पर्यंत काडीमात्र उदासीनता दाखवूं नये. साधक दिशा धरून उगेंच असावें. राजश्री नाइकांचें मानस व नारो शंकर याचें (मानस) जे, तह जाहल्या नंतर आपण यांगी होऊन घरास जावें असें आहे. परंतु त्यांचे स्वाधीन स्थलें आहेत. थोडा वहुत सरंजाम ही आहे. आम्हीं त्यां समागमें उदासीनता केल्यानें

१ कऱ्हाडास. २ साताऱ्यास. ३ चव्हाणाच्या जहागिरी पैकीं नळदुर्गा सारखा. ४ गंगाधर यशवंत व कृष्णराव बल्लाळ हे मोगलाकडून निरोप घेऊन व तहाचीं कलमें पक्कीं ठरवून आज परत येत नाहींत. ५ तह. ६ बाबूजी नाईक बारामतकिर याचें. ७ वैतागलेले. ८ बाबूजीनाईक व नारो शंकर यांच्या. ९ किल्ले व ठाणीं.

परिणाम आमचा काय ! याज करितां केवळ तुटे असें ही भाषण करीत नाहीं. उठोन जावें असा ही भर देत नाहीं. उभयतांचें भाषण यागी होऊन गेल्यानें (कारभारी) निकाल काढून देतील, यास्तव जावें; असें त्यांच्या विचारें. तूर्त आम्हीं एक ही पक्ष सिद्ध असें बोलोन दाखवीत नाहीं. जसें जसें पुढें दिसेल तसें करूं. विदित होय हे विज्ञापना.

नं० ३७०

(अजमासें भाद्रपद वद्य
सतंबरचा दु० पंधरवडा.)

गोपाळरावाचें गोविंद हरीस पत्रः—

" नाना फडणीस यांचें पत्र आलें जे, आठ चार दिवसांत मुहूर्त पाहून येतों. असें मोघम सरकारचे पत्रीं लिहिलें होतें. अंतस्थ गुरुजीचे[1] पत्रीं स्पष्ट लिहिलें होतें कीं, ' मोरोबा दादास वस्त्रें झालीं असलीं तर सावकाशीनें येऊं. नाहीं तर सत्वर येऊं. ' असें लिहिलें होतें. ते विजयादशमीच्या मुहूर्तें येतीलसें दिसतें. थोरल्या यजमानांस केवळ निकड करितां येत नाहीं. धाकट्यांस आपण होऊन हें[2] काम चालतें करावें असें करितां नये. ते[3] गृहस्थ व आम्हीं एकत्र आहों. थोरल्या श्रीमंतांचें शरीर फार कृश झालें आहे. त्यांचें मानस—तह झाल्यावर निकाल काढून त्र्यंबकास जावें—या तरतुदेंत आहेत. (त्यानीं) छपरबंदी करावयास नाशिकास शिष्य पाठविला आहे. राजश्री महादजी शिंदे उज्जनीहून निघून

१ महादाजीपंत गुरुजी. हे पेशव्यांच्या दरबारांत त्यावेळीं एक प्रसिद्ध मुत्सद्दी होते. २ रायरीकरांकडे दादासाहेबांनीं फडणिशी दिली होती ती त्यांजकडून काढून पुनः नाना व मोरोबा दादा फडणीस यांजकडे देण्याचें. ३ मोरोबा दादा फडणीस. ४ गोपिकाबाई व पेशवे यांजकडून आपल्या खर्चा करितां जहागीर तोडून घेऊन. ५ या शिष्यांचा किंवा शागिर्दांचा दादासाहेबांच्या अमदानींत फार सुळसुळाट

फडणिसांची पुनः स्थापना

नर्मदातीरास आले अशीं पत्रें आलीं. सारांश मोंगलाचा तह झाल्यास बखेडा कारभारी पाडितील असा रोंख दिसतो."

नं० ३७१

(भाद्रपद वद्य द्वादशी
४ आक्टोबर.)

श्रीगणराज.

अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. राजश्री नाना फडणीस आले. भेटी झाल्या. दुसऱ्या दिवशीं आम्हीं जाऊन श्रीमंतांसें विनंती केली जे, नानाचा उजूर होता ते ही आले. या उपर स्वामिनीं [त्यांस फडणिशीचीं वस्त्रें देण्याची] आज्ञा करावी. त्याजवर 'उत्तम' ह्मणोन आम्हांसीं करार केला. 'मुहूर्त कधीं?' ह्मणून पुसिलें. आम्हीं सांगितलें जे, 'उदईक त्रयोदशी बुधवारीं मुहूर्त उत्तम आहे.' 'बहुत सरस' म्हणाले. तदोत्तर धाकट्या यजमानांजवळ आलों. त्यानीं रामचंद्र गणेश यासीं आज्ञा केली जे, 'तुम्हीं जाऊन विनंती फडणीसांविशीं करावी.' तों तेच 'यजमानांजवळ जातों. आपण रदबदल करितों. विजयादशमीस (वस्त्रें) द्यावीं असें श्रीमंत ह्मणतील.' ह्मणून आपणच उत्तर प्रति उत्तर केलें. मग गेले. तेथें हाच डौल सांगितला. आम्हीं करार करून आलों. यांनीं

झाला होता. त्यांचा बंदोबस्त करून त्यांस जरबेंत ठेवण्यास माधवराव पेशव्यांस सुद्धा फार प्रयास पडले. या शिष्यां पैकीं एका शिष्याची लीला मागें नं० २८४ च्या पत्रांत वर्णिलेली आहे ती पहा.

१ पत्र गोपाळरावाचें गोविंद हरीस. २ श्रीमंत दादासाहेबांस. ३ सबब ४ दादासाहेबांजवळ. ५ दादासाहेबानीं भाद्रपद वद्य त्रयोदशीस फडणिशीचीं वस्त्रें नाना फडणिसांस देण्याचें गोपाळरावाजवळ कबूल केलें होतें त्या प्रमाणेंच करण्या विषयीं पेशव्यांचा निरोप घेऊन दादासाहेबांकडे रामचंद्र गणेश गेला आणि परत सांगत आला

जाऊन हा प्रकार करविला ! तेव्हां कारभारी यांसच आम्हीं घेऊन जाऊन उद्यांच द्यावीं असा सिद्धांत करून उभयतांस घेऊन येतों असें बोलोन घरास आलों. प्रातःकाळीं आम्हीं जावयास सिद्ध झालों. तों यजमानांची चिट्टी आली जे, ' आधीं उभयतांस न आणणें. तुम्हींच येणें. कांहीं सरकारी सवालजाब बोलावयाचा आहे. ' या प्रमाणें चिठी लिहून पाठविली. आम्हीं निघोन गेलों. तों सांगूं लागले जे, फडणिसानीं लाख रुपये घ्यावे. बाकी जास्ती आकार सरकारांत द्यावा. अशी अप्रसी का काढली. आम्हीं उत्तर केलें कीं, " त्यांचा हेकड कारभार. त्यानीं अशी कानू कधीं आपणावर चढवून घेतली नाहीं. ते आतां कसे कबूल करितील ? एवंच (आपणास फडणिशीचीं वस्त्रें त्यांस) देणें नाहीं, तेव्हां ते कांहीं नमस्कारास येत नाहींत ! ते जातात. तेव्हां आम्हीं त्यांस टाकोन रहावें यांत कांहीं उत्तम नाहीं. मी बारगीर. आधींच; एतद्विषयीं सूचना मजला

कीं, फडणिसांस वस्त्रें ठरल्या प्रमाणें त्रयोदशीच्या दिवशीं न मिळतां तीं पुढें बारा दिवसानीं मिळणार !

१ ' दसऱ्याच्या दिवशीं फडणिसांस वस्त्रें द्यावयाचें श्रीमंत बोलतात, परंतु उद्यां आह्मीं खुद्द सखारामबापूस व नाना व मोरोबा यांस; घेऊन श्रीमंतांकडे जातों व त्यांची समजूत सखारामबापूच्या हातें करवून उभयतां फडणिसांस वस्त्रें देववितों ' असें बोलून. २ दादासाहेबांची. ३ नाना व मोरोबा फडणीस यांस. ४ 'अ प्र सि का' हीं चार अक्षरें एका श्लोकाच्या चार चरणाच्या प्रारंभींचीं आहेत. हा श्लोक ' कालिदासाच्या चातुर्या ' च्या गोष्टींत किंवा तसल्याच एखाद्या अतिशय जुनाट पुस्तकांत अगदीं लहानपणीं वाचल्याचें स्मरतें. ' अप्रसिका ' याचा येथें अर्थ ' शंका ' असा आहे. ५ फडणिसांचा. ६ लष्करांतून निघून जातात. त्यां बरोबर आह्मीं ही जातों. ७ गोपाळराव जरी सरदार होता तरी दादासाहेबां पुढें आपला कमीपणा दाखविण्यासाठीं आपणास ' शिलेदार ' देखील ह्मणवीत नाहीं. सात आठ रुपये दरमहा मिळविणाऱ्या बारगिरांत आपणास गणीत आहे ! मागें नं० २४ च्या पत्रांत सुद्धां त्यानें नानासाहेब पेशव्यांस आपला ' बारगीर पेशा ' असल्याचें कळविलें आहे.

फडणिसांची पुनः स्थापना

कळवावयाची होती, ह्मणजे समागमें घेऊन न येतों. प्रथम कबूल करून 'घेऊन येणें' ह्मणोन आज्ञा केली. तदोत्तर मोरोबा आल्यानंतर राजश्री नाना फडणीस याचा उजूर केला. तेव्हां ही हा स्वालजाब (आपण) न केला. आतां लटकी दिक्कत काढितां. त्यांत काल करार केला ते समयीं हा कांहींच प्रकार न बोललां. आतां या समयीं असा प्रकार दर्शविला. तेव्हां (आम्हांस) निरोप द्यावा." हेंच भाषण केलें. मग कारभारी यानीं सावळागोंधळ करून मागती नीट समजाऊन 'एक लक्ष दहा हजार निदानीं घ्यावे, उरले द्यावे,' या प्रकारें (देखील) कांहीं बोलों नये. वस्त्रें द्यावीं, असें ठरावून अकरा घटिकांत उभयतांस वस्त्रें दिलीं. खासें कलमदान दिलें. कीर्दीचा रुमाल स्वाधीन केला. लागलेच विल्हेस राहुट्या आणून देविल्या. या प्रमाणें हें काम एक वेळ ईश्वरें निभाविलें. ईश्वरें आम्हांस यश दिलें. हिसकेच भारी बसले! त्यांत धाकटे यजमान मनःपूर्वक [आम्हांकडे व फडणिसांकडे] ह्मणून हें कार्य सिद्धीस गेलें. नाहीं तर कांहीं जात नव्हतें! लढा कारभारी यानीं घातला तेव्हां धाकट्या यजमानानीं कारभारी यांस चिठ्ठी लिहिली जे, 'नवीन दिक्कती काढितां हा प्रकार कामाचा नाहीं.' असें लिहून चिठ्ठी पाठविली (तेव्हां) त्यांस ही कळलें (कीं,) या उपर दिरंग लावूं नये! ह्मणोन मग यजमा-

---

१ मोंगलाच्या लष्करांतून मी इकडे आलों तेव्हां मोरोबा दादास बरोबर घेऊन आलों नसतों. २ पेशव्यांच्या लष्करांत येऊन हजर झाल्या नंतर. ३ नाना फडणीस अजून आला नाहीं, तो आल्या शिवाय वस्त्रें देत नाहीं; अशी सबब सांगितलीत. ४ 'फडणिसानीं आपल्या उत्पन्ना पैकीं एक लक्ष रुपये घेऊन फडणिशीचें काम करावें, अधिक रकम होईल ती सरकारांत जमा करावी' असा सवाल जबाब. ५ वस्त्रें देण्याचा करार. ६ देवाविलीं. ७ पेशव्यांच्या डेऱ्याच्या ज्या बाजूस फडणिसांची राहुटी नेहमीं असावयाची तेथें. ८ दादासाहेबांस.

नांस समजाऊन वस्त्रें देविलीं. तदोत्तर कारभारी आम्हाशीं बोलों लागले जे, ' जसें हें तुम्हीं नेट धरून कार्य केलें, त्या प्रमाणें मुजुंमदारांचें काम काज करावें. ' तेव्हां आम्हीं उत्तर केलें जे, ' यांचा ऐवज सरकारांत गुंतला आहे त्याचा मार्ग करून द्यावा. नंतर तुम्हीं रुसा. आम्हीं तुम्हां बरोबर येऊं. आमचा गुंता नाहीं. ' असें मिष्ट' भाषण करून निरोप घेऊन डेऱ्यास आलों. ईश्वरें मोठें काम सिद्धीस नेलें. विदित होय हे विज्ञापना.

नं० ३७२L

[आश्विन शुद्ध एकादशी
१७ आक्टोबर.]

श्री.

विनंती[2] उपरी. तुम्हीं गेल्या तागायत पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर प्रस्तुतैंचा[3] प्रकार कसकसा आहे, तुमची गांठ पडोन बोलणें झालें किंवा नाहीं, हें तुम्हीं कांहींच न लिहिलें. तरी सत्वर हा प्रकार लिहिणें. इकडील मजकूर तर नबाबाचा सलुख ब्यायशींवैर[4] झाला. प्रस्तुतचा

१ फडणिसां प्रमाणेंच मुजुमदारांस ही दादासाहेबानीं पदभ्रष्ट केलें होतें. त्यांची पुनः स्थापना करण्या विषयीं सखारामबापूचा दादा साहेबांपुढें आग्रह चालेना. सध्यांच्या प्रसंगीं सखारामबापू गोपाळरावास ह्मणाला कीं, जसें तुह्मीं फडणिसांचें काम नेट धरून तडीस लाविलेंत, तसेंच मुजुमदारांचें ही तडीस लावा. त्यावर गोपाळरावानें उत्तर केलें कीं, फडणिसांचा ऐवज सरकारांत कांहीं गुंतला आहे तो मोकळा करून द्या; ह्मणजे आमचें काम पूर्णपणें तडीस गेलें. नंतर मुजुमदारां साठीं तुह्मीं श्रीमंतांजवळ भांडण काढा. आह्मीं तुमचे सोबती होऊं! २ हें पेशव्यांचें पत्र बहुधा रामचंद्र नारायण यास लिहिलेलें असावें. ३ आपली आई गोपिकाबाई हिच्या प्रकृतीविषयीं ही पेशव्यांची चौकशी. ४ ब्यायशीं लक्षांची जहागीर मोंगला पासून घ्यावयाचा करार करून त्याशीं तह झाला.

गुंता चौथाई जहागीर (सरदारांपासून परत) घ्यावी हा होता. परंतु काल सुभेदाराच्या[1] येथें वडिलानीं जावें, नंतर चौथाईचा प्रकार त्यानें कबूल करावा (असें ठरलें होतें.) त्यास वडिलीं रात्रीं [त्याकडे] जाऊन ठीक केलें. तुम्हांस कळावें. तीर्थस्वरूपांस विनंती करून त्र्यंबकचे देव व आनंदीबाई यांचें येणें पुण्यास करावेंसें करून बोलावूं पाठविलें आहे. प्रस्तुत वडिलांची शरीरप्रकृति क्षीण झाली आहे. तुम्हांस कळावें. (आम्हीं तुम्हांस) दोन पत्रें पाठविलीं परंतु एका ही पत्राचा जाब कां न आला हें कांहीं कळत नाहीं. सत्वरच पुण्यास आमचें येणें होईल. रवाना छ० ९ रबिलाखर बहुत काय लिहिणें हे विनंती.

पै॥ छ० १२ रबिलाखर.

नं० ३७३L

[आश्विन शुद्ध त्रयोदशी
१९ आक्टोबर.]

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० ११ रबिलाखर मुक्काम टोकें येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलांकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी आशीर्वाद पत्र पाठवावें. इकडील वर्तमान तर नबाब शैहरांतच[2] आहे. प्रस्तुत त्याचा कारभारी कोणी मुकरर झाला नाहीं. त्यापासून[3] रुपये मात्र दहा पंधरा लक्ष घेतले. लो-

१ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. २ औरंगाबादेंत. ३ त्यापासून ह्मणजे कोणापासून ? ज्यास नबाबानें दिवाणगिरी देऊं केली होती त्या पासून दहा पंधरा लाख रुपये आधीं नजराणा ह्मणून उकळले असें होतें.

कांची थोडी बहुत शिबंदी वारली. प्रस्तुतचें वर्तमान तर मीर मोंगल पळाले. त्यास पळावयास कारण हेंच कीं, नबाबानें सलाबतजंगास मारिलें व पुढें ही माझी अवस्था हीच; असें समजून गेले. सदाशिव रामचंद्र ही गेले असें वर्तमान उडतें आलें आहे. शिवाजी केशव यास लोकानीं अडवून कैद केलें. कीं, 'आमची तलैब देणें.' ह्मणून लोकानीं कैद केलें आहे. असें वर्तमान प्रस्तुतचें आहे. महादजी शिंदे यांची (व आमची) भेट झाली. त्यांज बरोबर ही फौज पांच सहा हजार आहे. प्रस्तुत कामावर पडेशी आहे. तलब ही पोंहचून ठीक आहे. वडिलांस कळावें. लोकां पासून चौथाई जहागीर ध्यावयाचा गुंता होता तो ही उरकला. महाल मात्र निवडावयाचे आहेत. सत्वरच गुंता उरकेल. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

नं० ३७४

(आश्विन शुद्ध त्रयोदशी
१९ आक्टोबर.)

श्रीगणराज.

अर्पत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० ११ रबिलावल मुक्काम टोकें जाणून यथास्थित असे. विशेष. श्रीमंत उभयतांचीं पत्रें राजश्री गोपाळराव बर्वे वगैरे यांस घेऊन पाठविलीं आहेत तीं प्रविष्ट करोन स्थळें स्वाधीन करून ध्यावीं. राजश्री गोपाळराव बर्वे यांचे पत्रांत कांहीं

१ फौजेंतील लोकांस. २ हा निजामअल्लीचा धाकटा बंधु. ३ हा मोंगलाचा एक सरदार. ४ पगार. ५ मोहिमेच्या कामावर. ६ हें गोपाळरावाचें गोविंद हरीस पत्र. ७ गोपाळराव बर्व्यांस दादा साहेबानीं पटवर्धनांची जहागीर दिली होती ती पटवर्धनांस परत देण्या विषयीं त्यास पेशव्यांचीं आज्ञा पत्रें. ८ बर्व्यानें आह्मांस पत्र लिहिलें होतें त्यांत.

लक्ष्मण कोन्हेरा प्रमाणें उद्दाम प्रकार नाहीं. पत्र पाहिल्या नंतर विलंबे[3] लावणार नाहींत असें दिसतें. नवीन वर्तमान राजश्री महादजी सिंद्याच्या आज दहा घटकेंत भेटी होणार. प्रथम त्याचा भाव ' जर माझ्या सरदारीची घालमेल असली तर मला भेटीसच येणें नाहीं; ' असा प्रकार होता. त्यास या गोष्टीचा धरबंद पुरता ठराधून काल कृष्णराव बल्लाळ त्याजकडे बेलभंडार देऊन (श्रीमंतांनीं) पाठविले जे, ' तुमची सरदारी कायम राखितों. काळजी न करावी. ' असें इमान प्रमाण पाठवून दिलें. दुसरें वर्तमान — येथें आज सहा मुक्काम झाले. होळकर व नारो शंकर व विट्ठल शिवदेव यांचा निर्गम करून निरोप द्यावा, त्याज नंतर आपण कूच करावें, (असा श्रीमंतांचा बेत ठरला होता; ऐशीयासीं होळकराचेच घरीं श्रीमंत जाऊन असा निकाल काढिला जे, सालमजकुरीं नवीन सरंजाम सरकारांतून घेतला त्याच प्रमाणें चौथाई सरंजाम सरकारांत द्यावा. या प्रमाणें दार मदार झाला. प्रथम त्याणें कबूल केलें ह्मणजे (बाकीचे) सर्व ही या प्रमाणें ऐकतील,; मग लढा पडणार नाहीं [असें जाणून] त्यास ' तुम्हीं सरकारांत कांहीं बाकी राहिली नसतां ओढूं नये ' अशा गोष्टी सांगितल्या. तेव्हां मान्य होऊन होळकरानें कबूल केलें. त्यास चांदवडाहून गेले, तेव्हां दहा लक्षांचा सरंजाम द्यावा, या प्रमाणें करार केला होता. मग त्यानें सैन्यांत अडअडून पंचवीस तीस लक्षांचा आणखी घेतला. त्यांतील चौथाई देणें ही त्यास अगाध नाहीं! आज देऊन पुढें मागती—दिल्या पेक्षां जास्ती घेईन—म्हणावयासी बळकट ही आहे! तूर्त वरकड सरदारांवर गेंडदु चढविला. कारभारी याणीं आपण येणें प्र-

---

१ हा मिरजेचा किल्लेदार. २ आमचीं ठाणीं आमच्या हवालीं करण्यास वर्वे विलंब लावणार नाहीं. ३ सरकारच्या दौलतीस उतरती कळा आली असतां. ४ चौथाई जहागीर परत देण्याचें. ५ न सहन होण्या जोगें ओझें.

माणें प्रथम देऊन मागती ' या प्रमाणें सरकार किफायत केली ' हे ममता दाखवून लोभ विशिष्ट करून घ्यावा, ' आपण असे सरकार काम करणार' हा ही रुढि प्रकार करावा, या अन्वयें हा विचार मांडिला! त्यांत प्रथम जेव्हां सरंजाम घेतले तेव्हां मन मानेल तशी वांटणी केली. जणो द्वारकाच लुटिली!! ज्या प्रकारें सीमोल्लंघनाच्या सोन्याची गत तसा प्रकार करून घेतली जहागीर. मग आतां ' चौथाई देणें हें ही मोठें संकटें करून कबूल केलें सरदारानीं ' असें दाखवावें हे प्रकार कारभारी यानीं केले. तूर्त होळकरानीं कबूल केलें. आतां नारो शंकर व विठ्ठल शिवदेव यांचा निकाल पडावयाचा आहे. तो मार्ग या पैकीं निघाला ह्मणजे कूच करून मजल दर मजल (श्रीमंत उभयतां) पुण्यास येणार. तमाम शिलेदार एकांडे आदिकरून निरोप घेत आहेत. आम्हीं काल जाऊन पुसिलें जे, " आम्हांस येऊन अडीच महिने होत आले. आमचा निर्गम करून देऊन निरोप द्यावा. आणखी असें करितां आठ पंधरा दिवस लागते तरी आम्हीं गडबड न करितों. (परंतु) आतां चिरंजीव पाडाव होऊन त्यास सांपडले यास्तव आम्हांस सत्वर निरोप द्यावा. तिकडे जाऊन साम, दाम, दंड, भेद, हा प्रकार करून सोडून आणूं. ते तरतुदीस हा पल्ला लांब पडतो. यास्तव निरोप द्यावा. " या प्रमाणें बोलल्या नंतर " आज उद्यांत मार्ग काढून निरोप देतों, ". असें बोलले. त्यास कोणे विचारें मार्ग काढून निरोप देतात हें ही कळतें. केवळ उतावळी करून निभाव नाहीं. मिरजेच्या पत्राची मार्गप्रतीक्षा करितों. इतक्यांत हा ही जाबसाल निर्गमांत येतो. आपणाकडून तुटे असें करीत नाहीं. विदित होय हे विज्ञापना.

१ पुतण्या विरुद्ध बंड दादासाहेबांनीं केलें तेव्हां नारो शंकर व विठ्ठल शिवदेव यांस सखारामबापूनें जहागिर देऊन. २ सरदारानीं दादासाहेबांस नडवून जहागिरी घेतल्या तेव्हां. ३ धाकटा चुलत बंधु मेघश्यामराव बापू. ४ हैदरअल्लिस. ५ कर्नाटकांत. ६ मिरजेंत आमचें ठाणें बसलें या मजकुराच्या पत्राची.

पटवर्धनांची पुनः मिरजेंत स्थापना

नं० ३७५

[१९ आक्टोबर.]

श्रीगणराज.

श्रियासह चिरंजीव राजश्री गोविंदपंत यांसी त्रिंबक हरि. आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत आश्विन शु० त्रयोदशी, बुधवार, जाणोन स्वकीय लिहिणें लिहीत जावें. विशेष. राजश्री माणको जिवाजी मिरजेस आले उपर राजश्री लक्ष्मण कोन्हेर यांची चिट्ठी राजश्री आनंदराव किल्लेदार यांस आली कीं, " राजश्री महादाजी बल्लाळ याचे गुजारतीनें जकिरा[1] मोजदाद करून देऊन ठाणें स्वाधीन करून पावतीचें कबज घेणें. " ह्मणून आली. त्याजवरून राजश्री आनंदरायानीं ' मशीरनिल्हे[2] यांस पाठवून देणें ' ह्मणोन आम्हांस पत्र लिहिलें. त्याजवरून चिरंजीव राजश्री महादाजीपंत यांस परवां विजयादशमीच्या मुहूर्तें भोजनोत्तर पाठवून[3] दिलें. ते दोन तास दिवसास तेथें गेले. राजश्री चिंतामणपंत ही कागवाडचे लोक वगैरे चारशें जमा करून काल गेले. पेठेंत जाऊन उतरले आहेत. कुरुंदवाडचे लोक ही सव्वाशें खेरीज पाठविले आहेत. चिरंजीव गेल्या नंतर विजयादशमीचे मुहूर्तें दहा लोक व निशाण व राजश्री माणकोजीपंत ऐसे आंत घेतले. जकिरा मोजदाद करावयास कारकून परवां पासून लाविले आहेत. चिरंजीव राजश्री महादाजीपंत ही आंत जाऊन आले. जकिरा मोजदाद जाहल्या नंतर एक दोन रोजांत ठाणें स्वाधीन करितील. सविस्तर चिरंजीव राजश्री महादाजीपंत लिहितील त्यावरून कळेल. ठाणें हस्तगत होतांच टाकोटाक आपणांकडे परभारें मिरजेहून लिहून पाठवितील.

---

१ दारूगोळी, धान्य व इतर सामान. २ महादाजीपंत यास. महादाजीपंत हा त्रिंबक हरीचा कारभारी. ३ कुरुंदवाडाहून मिरजेस.

अतःपर गुंता कांहीं पडणार नाहीं. 'धारवाड छ० २ इंदुवारीं लोकांनीं कौल घेऊन उतरून ठाणें स्वाधीन केलें[1]. तेथील बंदोबस्ती करून कूच करून हुलीस गेले[2], हुली घेतली आणि सिरहट्टीस गेले.' म्हणून वर्तमान आहे. चिरंजीव राजश्री बापू (त्यानीं आपणा) समागमें नेले आहेत. दोन्ही स्थलांच्या चिठ्या त्यां पासून लिहून घेतल्या आहेत. जातांच स्थलें दिलीं तरी चिरंजीवाची लौकर सुटका होत नाहीं. राजश्री विसाजीपंतानीं गडी चिरंजीवाकडे पाठविला होता. त्यास भेटोन आला. मुख जबानी मशारनिल्हेस सांगोन पाठविलें माणसा बरोबर, कीं दोन्ही स्थलांस चिठ्या पाठवून सावध करणें. त्याजवरून मशारनिल्हेनीं लिहून पाठविलें[3] जे, तुम्हीं "फौज शत्रूनें आणिली आणि चिरंजीवांची चिठ्ठी दाखविली तरी स्थलें एकाएकीं न देणें. त्यांचे[4] सुटकेचा विचार होईल. मातबर जामीन (आपल्या सुटके बद्दल चिरंजीव) घेतील तेव्हां तुम्हांस चिठ्ठी येईल आणि [मग] स्थलें देणें," म्हणून लिहून पाठवून सावध केलें आहे. काय करितात पहावें! चिरंजीवानीं तो त्यांस[5] उघडून गोष्ट

---

१ पेशव्यांच्या लोकानीं धारवाड छ० २ रविलाखर, आश्विन शुद्ध चतुर्थी, तारीख १० आक्टोबर इ. स. १७६३ रोजीं हैदरअल्लीच्या स्वाधीन केलें. २ विसाजी पंत हा इचलकरंजीकर घोरपड्यांचा कारभारी. घोरपड्यांची जहागीर कर्नाटकांत होती तिच्या बंदोबस्ता करितां हा तिकडे गेला होता. हा व मेघश्यामराव बापू हैदरअल्लीशीं लढत असतां त्यांचा पराजय होऊन मेघश्यामराव हैदराचा सरदार मीरफैजुल्ला याचे हातीं सांपडला. त्याच्या ताब्यांत ठाणीं होतीं तीं आपल्या लोकांच्या हवालीं करण्या विषयीं तेथील ठाणेदारांस चिठ्या त्या पासून मीरफैजुल्लानें बळजोरीनें लिहून घेतल्या. मेघश्यामरावाची गांठ घेण्या करितां विसाजीपंतानें गडी पाठविला होता त्या बरोबर मेघश्यामरावानें विसाजीपंतांस सांगून पाठविलें कीं, ठाणीं हवालीं करण्या विषयीं माझ्या चिठ्या घेऊन कोणी शत्रूचे लोक येतील तर त्यांस ठाणीं देऊं नयेत. या विषयीं ठाणेदारांस सावध करावें. ३ ठाणेदारांस लिहून पाठविलें. ४ मेघश्यामरावाच्या. ५ मेघश्यामरावाची. ६ मीरफैजुल्लास.

सांगितली आहे कीं, ' आमचे स्वाधीन ठाणीं नाहींत. सरकारचे लोक आंत आहेत ते आमचें ऐकणार नाहींत. ' ह्मणून साफ बोलले; परंतु त्यानें बळजोरीनें चिठ्या लिहून घेतल्या आहेत! आठ पंधरा दिवस दम धरून स्थलें झुजलीं तरी कांहीं तरी बोली होऊन मातबर मध्यस्त जामीन घेऊन स्थलें स्वाधीन करून चिरंजीव सुटका करून घेतील. सर्व्वांदिवस चिंता लागली आहे. अनुष्ठानास ब्राह्मण लाविला आहे. श्रीभगवान् करील तें प्रमाण! बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० ३७६ (२३ आक्टोबर.)

श्रीगणराज.

श्रियासह चिरंजीव राजश्री गोविंदपंत यासीं प्रती त्रिंबक हरि. आशीर्वाद. उपरी येथील कुशल तागायत आश्विन वद्य द्वितीया भानुवार पर्यंत यथास्थित असे विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. लष्करचा लाखोटा चिरंजीवाचा पावला. ही गोष्ट मोठीसी झाली. वेध तुटला. श्रीमंत निघून गंगे अलीकडे आले, उत्तम गोष्ट झाली. भोसल्यास निरोप दिला. ते आपले देशास गेले. वरकड राजश्री होळकर व राजश्री नारो शंकर व विठ्ठल शिवदेव यांची रवानगी हिंदुस्थानांत होणार ती जाहलीच असेल. आजीपर्यंत पुण्यास आले असतील. अलीकडे वर्तमान आलें असेल तें लिहिलें पाहिजे. आम्हीं ही जासूद मुजरद चिरंजीवाकडे रवाना केला आहे. मिरजेकडील वृत्त तर—अगोदर चिरंजीव राजश्री महादाजीपंत विज-

१ गोपाळरावाचा. पेशव्यांच्या लष्करांतून लिहिलेला. २ पेशव्यांच्या लष्करांत गोपाळरावाकडे.

यादशमीचे मुहूर्तें मिरजेस पाठवून दिले ते दिवशीं दहा लोक व निशाण त्याणीं घेतलें. त्याजउपर आंतील गृहस्थ आनंदराव मोरेश्वर येऊन भेटले. 'जकिऱ्याची मोजदाद करून किल्ला देतों' ऐसा करार केला. दोन दिवस घालमेलीवर घालविले. मग आम्हीं चिरंजीव राजश्री कोन्हेरराव व राजश्री गोविंदपंत ऐसे पाठवून दिले. तेणेंकरून त्यासीं इभ्रत पडली. मग चिरंजीवानीं त्यासीं दोन गोष्टी साफ सांगितल्या. लोकें ही सातशें व राऊत दोनशें मिळून त्यासीं निकड फारच केली. तेव्हां त्यानीं किल्ला काली मंदवारीं स्वाधीन करून बाहेर निघून तासगांवासीं गेले. (तुम्हीं) तासगांवची सनद अगोदर पाठविली नाहीं. त्यासीं लागलीच दाखविली असती. चिरंजीवानीं त्यासीं सांगितलें कीं, तासगांव लौकर स्वाधीन करणें. ते ब्राह्मण हरामी आहेत ! सनद आली ह्मणजे तें ही देतील. अष्ट्याकडे बऱ्यानें शें दोनशें राऊत मिळऊन गांवगन्ना उपद्रव केला आहे. वसूल घेतात. त्यास मिरज तो हस्तगत झाली. याज उपरी अष्ट्याकडे जमाव घेऊन जाणें ह्मणून चिरंजीव कोनोंपास लिहिलें आहे. राजश्री अंताजीपंत ही गेले आहेत. तिकडे जाऊन बंदोबस्ती करून येतील. मिरजेहून ही तुम्हांस पत्रें आलीं असतील. लष्करास ही चिरंजीवास लिहून पाठवणें. वरकड दक्षिणेकडील वर्तमान तरी — मीरफैजुल्ला धारवाडाकडे आहे. तेथील उस्तवारी किल्ल्याची करितो, पडझड बांधावयास लाविलें आहे, ऐसें वर्तमान आलें आहे. शिरहट्टीस त्याची कांहीं फौज गेली होती. त्यानीं तीस जुमानलें नाहीं. हे समीप जाऊन उतरले होते. रात्री शिरहट्टीकरानीं बाहेर पडोन त्यांजवर चालोन गेले. मारामार फार केली. चारशें पांचशें गाडदी मारिले व घोडीं शें पन्नास जायां केलीं. शिरहट्टीकरानीं त्यांसीं

---

१ दरारा. २ निक्षून. ३ प्यादे. ४ तासगांवचें ठाणें देतील. ५ कोन्हेरराव. ६ शिरहट्टीकरानीं.

सवाल जाब केला कीं, आमचा धणी तुम्हीं नेला आहे तो आणून हवालीं करणें. मग जें काय बोलणें असेल तें बोलूं. ऐसें सांगितलें तेव्हां भैरी होऊन जवळ उतरले होते. मग याणीं या प्रमाणें केलें तेव्हां ते तेथून उठून कोसावर रहिले.

नं० ३७७

(आश्विन वद्य षष्ठी
२८ आक्टोबर.)

श्रीगणराज.

अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १० रबिलाखर मुक्काम नजीक सोनई पावेतों यथास्थित असे. विशेष. वडिलीं प्रतिपदा मंदवारचीं पत्रें पाठविलीं तीं बुधवारीं संध्याकाळीं पावोन वर्तमान कळलें तीर्थस्वरूप राजश्री आपांचीं व महादाजी बल्लाळ व चिंतामणपंताचीं पत्रें अक्षरशः वाचून पाहिलीं. विजयादशमीच्या मुहूर्तें निशाण, व दहा लोक, व माणको जिवाजी ऐसे आंत घेतले, प्रतिपदा शनिवारीं आपण खुद्द निघून बाहेर येणार या प्रमाणें करार केला. मोजदाद होती. या उपरी गुंता नाहीं, हे खातरजमाच झाली आहे. तत्रापि लबाडी केली तर, आपला जमाव भारी जथला. दुसरें, त्यांजवळ जमाव नाहीं तेव्हां लांबविणार ही नाहींत. सारांश कळेल तेणें प्रमाणें त्यास बोध करून काम करावें. भयप्रद कदापि बोलोन नासूं नये. आज पर्यंत पत्र स्थल आपले स्वाधीन झालियाचें वडिलीं रवाना केलेंच असेल. आम्हीं पत्राचा मार्ग लक्षीत व-

१ मेघश्यामराव. २ हैदराचे लोक बेफामपणानें किल्ल्याजवळ जाऊन उतरले. ३ हें पत्र इतकेंच अपुरें सांपडलें. ४ हें पत्र गोपाळरावाचें गोविंद हरीस. ५ त्रिंबक हरीचीं. ६ त्रिंबक हरीनें मिरज हातीं आल्याचें.

सलों आहों. पत्र येतांच येथील निकाल काढून येणार. चिरंजीव मेघश्याम[1]मराव यांचे हातची चिठ्ठी पाहोन संतोष झाला. सारांश जिवानिशीं स्वस्ति क्षेम आहेत परंतु दुष्टाच्या हातून निघणें कठीण! बरें! ईश्वरकृपा व वडिलांचा आशीर्वाद [आहे] तर कल्याण सत्वरच होईल. वडिलांचा साह्यकारी श्रीपंढरीनाथ आहे. तेथें आम्हीं चिंता करावी असें होणार नाहीं. वरचेवर पत्र पाठवून राजश्री विकार[3]नामकास सूचना करीत जावी जे, इकडील दुराशेस[4] न गुंततां जसें कळेल तसें राजकारण करून आपला हात काढून[2] घेणें. आमचा उजूर न धरणें. या प्रमाणें लिहून आणखी पत्र पाठवून द्यावें. आम्हांस परम चिंता. तो दरबार[6] परम हरामी! राजकारणाचा प्रकार (तेथें चालणार) नाहीं. याज करितां संकट वाटतें. श्रीनें काळजी न घालावयाची तेच घातली आहे. बरें! भयप्रद भयनाशक तोच आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं० ३७८

[आश्विन शुद्ध एकादशी
१८ आक्टोबर.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[7] उपरी. छ० ४ रबिलाखर बुधवारचीं पत्रें लाखणगांवचे मुक्कामचीं तुम्हीं पाठविलीं तीं परवां रविवारीं अस्तमानीं पांचवे रोजीं पावलीं. ‘ श्रीमंत माघारे फिरले. भोंसल्यास निरोप होऊन [ते आपल्या मुलखाकडे] गेले. श्रीमंत आज गंगादक्षिणतीरास कालगांवा जवळी उत-

---

१ ही चिठी मेघश्यामरावानें हैदराच्या लष्करांतून कैदेंत असतां लिहिलेली. २ सुटून येणें. ३ विसाजी नारायण यास. ४ श्रीमंतांकडून किंवा आह्मांकडून कुमक होईल या आशेस. ५ मेघश्यामरावाची सुटका करून घ्यावी. ६ हैदरअल्लीचा दरबार. ७ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

श्री रा. बाळासाहेब पंतअमात्य. सं० बावडा. १
रा. रा. सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. सांगली. ३
रा. सा. हरि गणेश करमरकर. " ३
" " केशव बळवंत उर्फ दादासाहेब काळे. जमाखिंडी. ३
रा. रा. विनायक सदाशिव पुसाळकर " ३
रा. रा. अनंत विनायक पटवर्धन. बी. ए. " ३
रा. रा. जगन्नाथ केशव दामले. मुंबई ३
प्रो० हरि महादेव भडकमकर. बी. ए. " ३
रा. रा. गोपाळ हणमंत जोग. वकील. तासगांव. ३
श्री. रा. रामचंद्र गोविंद इनामदार मु० कल्लोळ. ३
रा. रा. सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. गुडगेरी. ३
रा. सा. महादेव चिंतामण केळकर. बी. ए. कऱ्हाड. ३
रा. रा. सेक्रेटरी. मित्रसमाज वाचनमंदीर. चिकोडी ३
रा. रा. बाळाराम तुकाराम माने. मु० भोज ३
रा. स सेक्रेटरी. दत्तप्रसाद वाचनमंदीर. मु० अकोळ २
रा. रा. सेक्रेटरी. शंकर लिंग ने. ज. लायब्ररी. रबकवी ३
श्री. रा. नारायणराव विनायक ऊर्फ बाळासाहेब यादवाडकर
मु० आसंगी. ३
रा. रा. बाबाजी नारायण नगरसूलकर. नाशीक २
रा. रा. सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. मोडनिंब २८६
श्री. रा. गणपतराव विठ्ठलराव देशमूख पतंगराव सं० चिकुर्डे ३
रा. रा. अनंत सीताराम देसाई. बी. ए. मालवण ३
रा. रा. विष्णु गोपाळ वेलदे. मु० कावनई ३
रा. रा. हणमंत अनंत कोणूर. कलघटगी. ३
श्री. रा. दादासाहेब बुधिहाळकर. मु० बुधिहाळ. ३
रा. रा. सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. मुधोळ. ३
वे. शा. रा. रा. कृष्णशास्त्री पुराणीक वैद्य पनवेलकर. पनवेल. ३
रा. रा. सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. पळस्पे. २८६
" " गोविंद नारायण खरे. जेनापुर. इलाला बंगाल. ३
" " सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. बाळापुर. प्रांत वऱ्हाड. ३
रा. रा. रामराव कृष्णराव जांभेकर. अहमदाबाद. ३
" " सेक्रेटरी. नहिची आडरीडिंगरूम. वेंगुर्ले. ३

रावबहादूर डी. एस्. पटवर्धन. बी. ए. डि. डे. कलेक्टर. ठाणें. २
" " पुरुषोत्तम विनायक पतमुळे. रतलाम. २
रा. रा. वासुदेव कृष्ण निगुडकर. मुंगावली. सं० ग्वाल्हेर. ३
रा. रा. चिंतामण काशिनाथ जोशी. पुणें. ३
रा. रा. सेक्रेटरी. स्टूडन्ट्स् रीडिंगरूम. डेक्कनकालेज. " ३
रावबहादूर गणेश रामचंद्र फडके. " ३
रा. रा. गणेश दत्तात्रय काळे. सेक्रेटरी. वृत्तवाचनशाळा खंडाळी. ३

ऐ०ले०संग्रह—कर्ते.

ऐतिहासिक—लेख—संग्रह.

हें डेमी अष्टपत्री सांचाच्या चाळीस पृष्ठांचें मासिक पुस्तक दर महिन्यास मिरज येथें नियमानें प्रसिद्ध होत असतें. यांत पटवर्धन जहागीरदारांच्या जुन्या चिटणिशी दप्तरांतील ऐतिहासिक महत्वाचीं व प्रत्येक स्वारींतील भरपूर माहितीचीं पत्रें सालवारीच्या क्रमानें छापून प्रसिद्ध होत असतात. शिवाय अन्यत्र उपलब्ध झालेले कागदपत्र व बखरी वगैरेंचा ही यांत समावेश होत असतो. या मासिक पुस्तकाची आगाऊ किंमत सालिना ट० हा० सुद्धां तीन रुपये आहे. ग्राहकांनीं सालिना वर्गणीच्या किंमतीचें व्हा० पे० मागवावें अथवा तितक्या रकमेची मनीआर्डर पाठवावी. त्या शिवाय पुस्तक सुरू केलें जाणार नाहीं.

ऐ०ले०संग्रह कर्ते.

अगत्याची सूचना.

चालू सालची वर्गणी अद्यापि पुष्कळ आश्रयदात्यांकडून यावयाची आहे. दर महिन्यास त्यांस जागें करणें भाग पडतें! बहुतेकांकडे गेल्या महिन्यांत आम्हीं वर्गणी पाठविण्याविषयीं कार्डें पाठविलीं आहेत. ज्यांकडून वर्गणी यावयाची आहे त्यानीं आतां बिलकुल विलंब न करितां ती पाठविण्याची मेहेरबानी करावी.

ऐ०ले०संग्रह कर्ते.

ऐतिहासिक-लेख-संग्रह.

मासिक पुस्तक.

आक्टोबर. १८९८ इ०.

अंक १७

वासुदेव वामन शास्त्री खरे

मिरज हायस्कुलांतील संस्कृत शिक्षक.

यांनीं

कुरुंदवाड येथें

" भाऊनाना " छापखान्यांत छापविलें.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हांशीलसह तीन रुपये.

फुटकळ अंकास पांच आणे.

अगत्याची सूचना.

चालू सालची वर्गणी अद्यापि पुष्कळ आश्रयदात्यांकडून यावयाची आहे. दर महिन्यास त्यांस जागें करणें भाग पडतें ! बहुतेकांकडे गेल्या महिन्यांत आम्हीं वर्गणी पाठविण्याविषयीं कार्डें पाठविलीं आहेत. ज्यांकडून वर्गणी यावयाची आहे त्यानीं आतां बिलकुल विलंब न करितां ती पाठविण्याची मेहेरबानी करावी.

ऐ०ले०संग्रह कर्ते.

चुकीची दुरुस्ती—सोळाव्या अंकांत वर्गणीची पोंच दिली आहे तींत श्रीवर्धन लायब्ररीचे सेक्रेटरी व श्रीधर नारायण जोगळेकर यांच्या नांवापुढें सहा सहा रुपयांचे आंकडे पडले आहेत, तेथें अनुक्रमें पांच व चार हे आंकडे पाहिजेत.

वर्गणीची पोंच.

सन १८९८ । ९९

(तां. २२ आगस्ट पासून २२ सप्तंबर पर्यंत.)

मागील व चालू वर्षाची.

	रु०
रा. सा. गंगाधर बल्लाळ आपटे. यवतमाळ	६
रा. रा. शंकर नारायण पुरळकर. सौंदलगें	४
,, ,, रघुनाथ परशुराम केळकर. विन्हेरें. जि० रत्नागिरी	६
,, ,, प्रभाकर काशिनाथ ओक. कल्याण.	६
,, ,, गोविंद लक्ष्मण देसाई. वकील सातारा.	६
,, ,, सेक्रेटरी. सातारा हायस्कूल रीडिंगरूम. सातारा.	६
,, ,, हरि रघुनाथ फडणीस. दाभोळ.	६
श्री. रा. नानासाहेब फडणीस. मणवली.	६
	६

रून राहणार. ' ह्मणोन लिहिलें वरून समाधान जालें. ' या उपरी टोंक्यास जाऊन तेथून सरदारांस निरोप देऊन पुढें निंबदेहेरे याच्या घांटानें जाणार ' ह्मणून लिहिलें, बहुत उत्तम आहे. * तुम्हीं निकाल काढून येऊं ह्मणून लिहिलें तो प्रकार खराच. तेथें पुण्यास गेल्या नंतर सारा दौलतेचा मनसबा पडेल. क्षणभंगुर बुद्धि[1]. आपण कोणाच्या ही कजियांत नसावें ही लक्ष गोष्टींची गोष्ट. परंतु त्यांचे[2] मर्जी प्रमाणें अगर तुमचे मर्जी प्रमाणें निरोप जाला पाहिजे कीं नको ? हैदरअल्लीनें सारा देश घेतला. त्याचा उपमर्द करण्याचा मनसबा तो कांहींच नाहीं ! करणारांनीं[3] जिकडील तिकडे आपले थांगे[4] केले. यवनाकडे केला. दुसरा भोंसलियाकडे केला. तिसरे होळकर, विठ्ठल शिवदेव वगैरे त्यांचेच आहेत. नवीन प्रतिनिधीचा[5] प्रकार—त्याणीं आंगेजणी[6] केली. आपला हस्तक[7] कार्यभागास दिला यामुळें ते ही आपल्या कूटांत घेतले ! आबा पुरंदरे बरें वाटत नाहीं ह्मणून घरास आले, परंतु दसरा जालियावरी ते सालप्याचा

---

१ दादासाहेबांची बुद्धि क्षणभंगुर. २ श्रीमंतांच्या. ३ कारस्थानें करणारानीं ह्मणजे अर्थात् सखारामबापूनें. ४ आश्रयाच्या जागा. ' सखारामबापूनें संकटाकीं मोंगलाच्या दरबारीं आश्रय मिळण्याची सोय करून ठेविली व त्याची मर्जी संपादन केली ती त्यास सोयस्कर असा प्रस्तुतचा तह ठरवून. त्यानें बत्तीस लक्षांचा भोंसल्यास मुलूख देऊन त्यास प्रसन्न करून घेतलें होळकर व विंचूरकर यांजकडे त्याचें वळण पूर्वीं पासूनच आहे. तेव्हां मोंगल, भोंसले, विंचूरकर, होळकर वगैरेचें पाठबळ असल्यामुळें सखारामबापू साऱ्या राष्ट्रांत बलाढ्य झाला; ' असा अभिप्राय. ५ भवानराव प्रतिनिधीचा. ६ पराक्रम केला. दादासाहेबानीं त्यास पदच्युत केलें तेव्हां तो अपमान त्यास सहन झाला नाहीं. त्यानें मोंगलाकडे राजकारण केलें व दादासाहेबानीं त्याची जहागीर नारो शंकरास दिली असतां ही त्या पासून ती त्यानें परत हिसकून घेतली हा त्याचा पराक्रम. ७ मुतालीक. अर्थात् गमाजी यमाजी. ' पेशव्यांच्या सामर्थ्याची हानि करणें हा जो मोंगलाचा कार्यभाग तो सिद्धीस नेण्या साठीं प्रतिनिधीनें आपला मुतालीक मोंगलाच्या दिमतीस दिला ह्मणून सखारामबापूनें भिऊन त्यास आपल्या कूटांत सामील करून घेतलें; ' असा अभिप्राय.

घांट चढून (साताऱ्याकडे) येणार. प्रतिनिधीची त्यांची भेट होऊन तेथील संस्थान[1] त्याजकडील आहे त्याचा बंदोबस्त करून प्रतिनिधि निमित्यास करून किल्ले[2] तमाम हस्तगत करावे हा प्रकार दिसतो. चहूंकडे (त्यानीं) आपलें केलेंसें जालें. असो ! पुढें विस्कळीत प्रसंगीं सर्व ही अनुभवास येईल. तुम्हांस निरोप झाला तरी यावें. फौजेची वाट नाहीं, कर्जाची वाट नाहीं, राहून फल काय ? बसावयास स्थळ पाहिजे त्याचा जाबे आज सायंकाळ पावेतों येतांच लिहितों. हे आशीर्वाद.

नं० ३७९

(अजमासें आश्विन वद्य
आक्टोबरचा दु०पंधरवडा.)

गोपाळरावाचें गोविंद हरीस पत्र—

" गंगेवरून [श्रीमंतांच्या लष्करांचें कूच छ० १८ रबिलाखरीं होऊन नेवाशा अलीकडे दोन कोसांवर मुक्काम झाला. काल येथें आलों. या उपर मजल दर मजल पुण्यास येत आहेत. होळकर निरोप घेऊन गेले. गंगोबा कामकाजा निमित्त राहिले आहेत. राजश्री नारो शंकर गेले. मुरादखान ही निरोप घेऊन गेले. दहा लक्षांची जहागीर माघारी देऊन नबाबाचें समाधान रक्षावें असें श्रीमंत दादासाहेबांचें मत होतें, पण ते गोष्ट सध्या राहिली. नबाब आपले जनानखान्यांत (गर्क) आहेत. मसलत मनसबा कांहींच नाहीं. सलाबतजंगास मारून निश्चिंत बसले ! लोकांस श्रीमंतांनीं

---

१ साताऱ्याच्या महाराजांचें संस्थान प्रतिनिधीच्या धोरणानें चालत आहे तें. २ सातारा प्रांतांतील सातारा, परळी, वासोटा, वसंतगड व दुसरे सर्व किल्ले. ३ मिरज हातीं आली न आली हें वर्तमान.

तमाम निरोप दिले. महादजी शिंदे घांट[1] चढल्या नंतर निरोप घेऊन श्री गोंदास जातील.

नं० ३८०

(आश्विन वद्य षष्ठी
२८आक्टोबर)

पांडुरंग[2] नरसी अनगळ याचें गोविंद हरीस पत्र
छ० २०रबिलाखरचें—

" रा० जनकोजी शिंदे कुरकुंभास[3] आज पाऊण महिना आले. त्याजवरून श्रीमंतांकडून ही तेथें बंदोबस्ती करितां प्रथम कोणी पाठविले होते त्याची निशा[4] जाहली. त्याजवरून दिनकर[5] महादेव जोशी व भुलोजी ढमढेरे पाठविले. त्यांचें ही लिहिलें आजच आलें कीं सत्य जनकोजी खरा! खाणाखुणा सर्व उतरल्या. आतां संशय राहिला नाहीं. संतोषाचें वर्तमान स्वामीस लिहिलें आहे. "

नं० ३८१

(अजमासें कार्तिक शुद्ध
नोवेंबरचा प० पंधरवडा)

गोपाळरावाचें गोविंद हरीस पत्र—

" श्रीमंत सौभाग्यवती आनंदीबाई वाडा[6] दाखल जाहले त्या दिवशींच येऊन पोहोंचलीं. रा० आनंदराव रास्ते आले आहेत. पुढें मातु-

---

१ नगराजवळ निंबदेह्याचा घांट आहे तो चढल्यावर. २ पत्र लिहिणारा हा पटवर्धनांचा कारकून. याचें हें गोविंद हरीस पत्र. ३ कुरकुंभ हें देवीचें स्थान धोंडच्या स्टेशनाजवळ आहे. ४ खात्री झाली कीं, हा जनकोजी शिंदे खराच! ५ दिनकर महादेव हा फडणिशीकडील कारकून व ढमढेरे हा एक शिलेदार. या दोघांस गोपिकाबाईनें पाठविलें. ६ वाडा दाखल झाले. पुण्यास शनवारच्या वाड्यांत दाखल झाले.

श्रींचें व कारभारी याचें ठीक करून द्यावें याच धांवतीचा प्रकार करितात. धाकटे यजमानांचें मानस आज कालावर नजर देऊन त्यांशीं निखालसपण दाखवावें, पुढें ईश्वरी इच्छेकरून करणें तें करावें, (असें आहे.) आजपर्यंत बाबा वैद्य पुढें आला होता. परंतु थाक कांहीं लागला नाहीं. आतां काय होईल पहावें. रा० मामांचीं पत्रें वाचोन आणखी काय लिहिणें असेल तें लिहोन पत्रें तावडतोब रवाना करून द्यावीं. जनकोजी शिंद्याची पुरवणी आहे तीच त्याजकडे पाठवावी. सारांश लटका केला तथापि जनांत सर्वांस भ्रम आहे जे, ' जनकोजी शिंदा खरा असतां दाटून हे लबाडी करितात अशी सर्वतोमुखीं बोली आहे. "

नं० ३८२

(अजमासें कार्तिक शुद्ध
नोव्हेंबरचा प०पंधरवडा.)

श्रीगणराज.

अर्पत्यें साष्टांग नमस्कार. विज्ञापना. जनकोजी शिंदा ह्मणोन कुरकुंबीं प्रकट होऊन त्यानें दहा बारा हजार फौजेचे तैनात जाबते केले. दोन हजार फौज जमा जाहली. जनकोजी प्रमाणें खाणाखुणा ही त्याजला होत्या. मनुष्यांस वळखावें, अमकें तुजजवळ बोललों होतों ह्मणोन साक्ष

१ मसलतीचा. २ सखारामबापूशीं सरळपणानें वागावें. ३ ठाव. सखाराम बापू विषयीं गोपिकाबाईच्या मनांत वैमनस्य आहे तें काढून टाकावें ह्मणून बाबा वैद्य आला होता पण तिच्या मनाचा ठाव त्यास कांहीं लागला नाहीं. ४ त्रिंबकराव मामांस आह्मीं पत्रें लिहिलेलीं तुह्मांकडे पाठविलीं आहेत तीं. ५ तोतया जनकोजीची जींत हकिगत लिहिली आहे ती. ६ चौकशी करून खोटा ठरविला तरी. ७ पेशवे व त्यांचे कारभारी वगैरे. ८ हें गोपाळरावाचें गोविंद हरीस पत्र. मागच्या पत्रांत ' जनकोजी शिंद्याच्या पुरवणी ' चा उल्लेख आला आहे ती पुरवणी हीच.

पुरवावी, (असें करीत असे ह्मणून) मोठा भ्रम सर्वत्रांस पडला. तदोत्तर श्रीमंत मातोश्रीनीं[1] रा० दिनकरपंत व भुलेजी ढमढेरे यांस पाठविलें. हे त्याजवळ गेले. तेथून श्रीगोंद्यास जाऊन त्या नंतर मैातोश्रीकडे[2] गेले. तिनें अंगावरील कांहीं ग्खुण सांगितली. त्या प्रमाणें येथें[3] येऊन कांहीं उत्तम खूण मिळाली. अशा बहुत साक्षी आल्या. तदोत्तर त्यास घेऊन येथें आले. तों आम्हीं पवाराच्या कवठ्या नजीक आलों, यास्तव संगमाच्यामध्येंच उतरविला. भापकर, गराडे, सरलष्कर, गाढवे, खानाजी जाधव, आदिकरून[4] त्यास ओळखोन एक ताटीं बसोन जेवले. ' गोविंदपंत बुंदेले याचे पुत्र व गोपाळराव बर्वे वगैरे यांजवर सात लक्ष रुपये आपले येणें ' ह्मणोन त्यानें यादी ठराविली ! कोणाचा ही तर्क ' हा लटका ' असा नच चाले असें जाहलें. तों दुसरे दिवशीं छ० २९ रबिलाखरीं श्रीमंत पुण्यास आले. ते दिवशीं (वाड्यांत येण्यास) मुहूर्त नव्हता, याज करितां ते ही संगमाजवळ राहिले. खरें लटकें करून तेच दिवशीं पारिपत्य करावें, असा डौल थोरले यजमानांचा होता. परंतु ते दिवशीं सबूर करविली चौघानीं. दुसरे दिवशीं यजमान वाड्यांत दाखल जाहले. संध्याकाळीं त्यास बोलाऊन आणून नाचाच्या दिवाणखान्यांत बसविला. पांच सात भले लोक समागमें होते. धाकटे नानों[5] व गोविंद शिवराम तहकिकांत[6] करितां तो ' थोरात रघोजी ' असा ठराव जाहला. त्याची आईबाप व बायको हीं आणावयासीं माणसें गेलीं. तो कैद करून ठेविला. गोटांत भले लोक

---

१ गोपिकाबाईनें. २ जनकोजीच्या मातोश्रीकडे. ती श्रीगोंदें उर्फ चांभारगोंदें जिल्हा नगर येथें रहात असे. शिंदे हिंदुस्थानांतून दक्षिणेंत आले ह्मणजे कार्याकारण पुण्यास राहून चांभारगोंद्यासच रहावयास जात. (नं० ३७९ मधील शेवटचें वाक्य पहा.) ३ तोतया जनकोजीकडे कुरकुंभास. ४ मराठे शिलेदार. ५ धोंडोपंत नाना पुरंदरे. ६ तहकीक ह्मणजे खरें. तहकिकांत करितां = खरें काय आहे ही चौकशी करितां.

होते ते फार करून पळून गेले. कांहीं सांपडले ते अटकेंत आहेत. बाड्यांत समागमें होते पांचसात जण त्यांचीं हत्यारें घेऊन ते ही (अटकेंत) बसविले. लोकांस मोठी दुराशा लागली होती ! परंतु लटकें जाहलें. मराठे सात आठशें एक जागा जेवले. या प्रमाणें खूळ जाहलें होतें. आतां यजमानांचे चित्तीं आहे कीं, त्यास एकांतीं पुसावें जे, ' तूं कशावरून हें काम केलेंस ? तुजला कोणीं भर दिल्हा ? ' हें विचारावें असें मानस आहे. गिरगाजीपंत बोकील, कारभारी यांचे सख्खे चुलत बंधु, ते कारभार त्याजवळ करीत होते. फार जणांस ' हाच जनकोजी ' अशी दुराशा होती. परंतु तोतया जाहला. विदित व्हावें. हे विज्ञापना.

नं० ३८३

(अजमासें कार्तिक शुद्ध
नोवेंबरचा प० पंधरवडा)

श्रीगणराज.

चिरंजीव राजश्री नाना[2] यांसीं आशीर्वाद. उपरी. आपण जनकोजी शिंद्याचे मजकुराची नक्कल[3] लिहून पाठविली ती पावली. वर्तमान अवघें कळलें. परंतु अद्याप खरें खोटें होणें आहे. त्याची बायको व आईबाप आलेवर अवघें तथ्य असेल तें ठरेल. वरकड वर्तमान मीर आबेंस तेरदाळची खंडणी साहा हजार रुपये घेऊन पुढें कंकणबाडीस गेला ह्मणून वर्तमान आलें. पुढें मीर फैजुल्लाकडे त्याचें राजकारण असेल तरी उभयतां

---

१ मराठे शिलेदार तोतया बरोबर जेवले यांत कांहीं दोष दिसत नाहीं. कारण तो जरी खरा जनकोजी शिंदा नसला तरी थोरात आडनांवाचा मराठाच होता. २ हें त्रिंबक हरीचें गोविंद हरीस पत्र. इतःपर त्रिंबक हरि व गोविंद हरि यांच्या नेहमीं राहण्याच्या जागा पूर्वी प्रमाणें अनुक्रमें कुरुंदवाड व मिरज या समजाव्या. ३ नं० ३८२ ची नक्कल. ४ निजामअल्लीचा भाऊ मीर मोंगल याचा मीर आबस हा बक्षी होय, हें या पूर्वी अनेकवेळां लिहिलेंच आहे.

भेटतील ऐसें दिसतें. यांत घडेल तें खरें. करवीर प्रांतांत कागलकरानीं धामधूम मांडली. खेडीं मारितात[1]. हे आशीर्वाद.

नं० ३८४

(मार्गशीर्ष वद्य षष्ठी
२६ दिसेंबर)

श्री

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री धोंडोराम गोसावी यासीं सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार स॥ आर्बा सितैनं[3] मय्या व अलफ. शहर औरंगाबाद वगैरे महाल अंतूर सुद्धां यांची मामलत राजश्री त्रिंबकराव लक्ष्मण याजकडे आहे. त्यांस सांप्रत मोंगलांकडील उपसर्ग लागतो. कितेक महालीं कहीचा उपसर्ग व तोफा बैलांच्यीं[4] चिठ्या व जप्ती केली आहे ह्मणून त्याणीं विदित केलें. ऐशियास सरकारचे जहागिरींत नवाबाचे लोकांनीं उपसर्ग करावा, चिठ्या तोफखान्याकडील व्हाव्या, जप्ती व्हावी, ही गोष्ट कार्याची नसे. तरी तुम्हीं येविशीं नवाबास सांगून जे उपसर्ग करीत असतील त्यांस निक्षून ताकीद करणें. यांचे[5] मामलते संबंधें काम काज पडतें, त्याविषयीं हे तुम्हांस लिहितील त्या प्रमाणें करून देत जाणें. आणि बंदोबस्त यांचे मामलतीचा यथास्थित राहे तें करणें. जाणिजे. छ० २० जमादिलाखर. आज्ञा प्रमाण.

---

१ लुटितात. २ हा पेशव्यांकडून नेहमीं मोंगलाचे दरबारीं राहणारा वकील. ३ सु० स० ११६४. ४ तोफांस जोडण्या करितां बैल पुरविण्याविषयीं गांवोगांवचे अधिकाऱ्यांस चिठ्या. ५ मामलेदार त्रिंबकराव लक्ष्मण यांचें मामलती संबंधें मोंगलाच्या दरबारीं हरवक्त काम पडतें.

हैदरअल्लीवर पहिली स्वारी

प्रत्येक प्रकरणाच्या प्रारंभीं आह्मीं जो प्रस्तावनारूप लेख लिहीत असतों त्यांत त्या त्या प्रकरणा संबंधें पुढें येणाऱ्या पत्रांतील कथाभाग सुसंबद्ध पण संक्षिप्त रीतीनें देत असतों. प्रस्तुत प्रकरण " हैदरअल्लीवर पहिली स्वारी " हें आहे. ही स्वारी इ० स० १७६४ । ६९ या वर्षीं झाली. आणखी ही पुढें याच हैदरअल्लीवर मराठ्यांच्या स्वाऱ्या झालेल्या आहेत. हैदरअल्लीचें राज्य म्हैसूर देशीं होतें, व एका वेळीं तर त्यानें बहुतेक कर्नाटक व्यापिलें होतें. अर्थात् मराठ्यांचे बहुत युद्धप्रसंग त्या देशीं झालेले आहेत, व त्यांचीं अनेक कारस्थानें त्या देशाचे निरानिराळे भाग ताब्यांत आणण्याविषयीं पुढें निरनिराळ्या वेळीं झालेलीं आहेत. हा विषय आमच्या पुस्तकाच्या वाचकांस नवीनच असल्यामुळें नेहमी प्रमाणें त्रोटक रीतीनें प्रस्तुत हातीं घेतलेल्या प्रकरणांतील कथाभाग दिला तर तो त्यांस नीट समजणार नाहीं. तो नीट समजावा ह्मणून कर्नाटकां विषयीं कांहीं माहिती, त्या देशाचा पूर्वींचा थोडासा इतिहास, आणि मराठ्यांचा प्रवेश कोठपासून कसकसा होत गेला या विषयींची हकीगत थोडी थोडी सांगणें इष्ट दिसतें. तसेंच हैदरअल्लीचें ही या पूर्वींचें थोडथोडें चरित्र सांगणें जरूर आहे. या करितां प्रस्तुत प्रस्तावनेचे दोन भाग केले आहेत. पहिल्या भागांत कर्नाटका विषयीं माहिती, त्या देशाचा इतिहास, आणि १७६४ पर्यंत त्या देशांत झालेल्या मराठ्यांच्या स्वाऱ्या, हैदरअल्लीचें त्या मुदती पर्यंत घडलेलें चरित्र हीं सांगण्यांत येतील. दुसऱ्या भागांत हैदरअल्लीवर ही जी १७६४ । ६९ सालीं मराठ्यांची स्वारी झाली, तिज संबंधें पुढें आम्हीं जीं पत्रें छापणार आहों त्यांतील कथाभाग सांगण्यांत येईल.

हैदरअलीवर पहिली स्वारी

भाग १ ला.

कर्नाटकाचा इतिहास.

हैदरअलीचें पूर्व चरित्र.

ज्या देशांत कानडी भाषेचा मुख्यत्वें प्रचार आहे तो खरोखरीचा " कर्नाटक ' देश होय. ' खरोखरीचा ' असें ह्मणण्याचें कारण, मुसलमानी राज्यें दक्षिणेंत स्थापित झालीं तेव्हां त्या लोकांनीं कृष्णे पासून रामेश्वरापर्यंत सर्वच प्रदेशास ' कर्नाटक ' ही संज्ञा दिली होती. परंतु त्या संज्ञेनें कर्नाटकांत द्रविड देशाचा ही अंतर्भाव होत होता! मराठी भाषा ज्या देशांत चालत्ये त्यास जसें आपण ' महाराष्ट्र ' म्हणतों, जेथें तैलंगी भाषा चालत्ये त्याला ' तैलंगण ' म्हणतों, त्याच प्रमाणें जेथें कानडी भाषा चालते तोच खरा ' कर्नाटक ' देश होय. याची उत्तर दक्षिण लांबी अजमासें ४४० मैल व रुंदी २६० मैल आहे. याच्या पश्चिमेस सह्याद्रि असून पूर्वेस ही एक तुटक तुटक डोंगरांची ओळ आहे. ध्यानांत राहण्या सारखी याची उत्तर सीमा ह्मटली ह्मणजे कृष्णानदी ही होय. दक्षिणेस ही डोंगरांच्या ओळी असून तिकडे कोइमत्तूर व पालघांट हे प्रांत यांच्या व द्रविड देशाच्या सरहद्दीवर आहेत. कर्नाटकाच्या वायव्येस व उत्तरेस महाराष्ट्र, ईशान्येस व पूर्वेस तैलंगण; आग्नेयीस व दक्षिणेस द्रविड देश आणि पश्चिमेस मलबार. या प्रमाणें स्थूल मानानें सीमा आहेत. या देशांत प्राचीन काळा पासून पाळेगार लोकांचें प्राबल्य विषेश होतें. हे पाळेगार ह्मणजे प्राचीन काळच्या हिंदु राजानीं महाले महालीं जमाबंदीच्या कामावर नेमलेले अधिकारी होत. तीं राज्यें नष्ट झालीं तेव्हां हे अधिकारी आपणास पाळेगार ह्मणजे संस्थानिक ह्मणवूं लागले. बेळगांव, धारवाड,

विजापूर, व मोंगलाई पैकीं गुलबर्गा हे जिल्हे महाराष्ट्राच्या लगत्यास आहेत तरी ते प्रायः कर्नाटकाचेच भाग आहेत. या जिल्ह्यांत जे तालुक्यानिहाय देसाई आहेत व होते ते ही वर सांगितलेल्या पाळेगारांच्या वर्गा पैकीं होत. महाराष्ट्रांत ही मुसलमानी कारकीर्दींत देशमुखांचें प्राबल्य फार होतें. मराठी राज्याचा जसजसा अभ्युदय होत चालला तसतसे देशमुख फिक्के पडत चालले, आणि इंग्रजी झाल्यापासून तर त्यांच्या हातची सर्व सत्ता निघून गेली आहे. कर्नाटकांतील पाळेगार व देसाई यांचा क्षय हैदरअल्ली व टिपू यानीं क्रमा क्रमानें करून आपलें राज्य अगदीं निष्कंटक केलें होतें. त्या पूर्वीं पाळेगारांचे तिकडे नेहमीं दंगे धोपे सुरू असून एकमेकांत लढाया चालल्या असत. दक्षिणेंत मुसलमानी राज्यें स्थापित झाल्यावर महाराष्ट्राचा बहुतेक भाग त्या राज्यांत मोडूं लागला. परंतु कर्नाटकांत मुसलमानांचा ह्मणण्या सारखा स्थायिक अंमल फारच थोड्या भागावर होता. बाकीचा देश पाळेगारांच्या हातीं असून ते मुसलमानी राजांचे नांवाचे मात्र मांडलिक असत. मुसलमानांनीं तरवारीच्या जोरावर मिळेल तेव्हां पाळेगारां पासून खंडणी घ्यावी असेंच होत आलें, पण त्यांच्या ताब्यांतला मुलूख जिंकण्यास मुसलमानांस फुरसत किंवा सामर्थ्य कधींच झालें नाहीं. महाराष्ट्राच्या पूर्व सीमेवर बालेघांट ह्मणून डोंगरांची ओळ आहे. त्या डोंगरांच्या माथ्यावर समुद्रा पासून तीन चार हजार फुट उंचीवर जो विस्तीर्ण प्रदेश आहे त्यास ही 'बालेघांट' असें म्हणतात. बालेघांटाच्या पूर्वेस डोंगरांच्या पायथ्यास जो प्रदेश आहे त्यास 'पाईन घांट' असें नांव आहे. बालेघांट हा महाराष्ट्राचा भाग व पाईनघांट हा तैलंगणाचा भाग होय. हीच बालेघांटाची ओळ खालीं तहत दक्षिणसमुद्रा पर्यंत गेलेली असून ती कर्नाटक व द्रविड यांची पूर्वसीमा आहे. अर्थात् तिकडे ही 'बालेघांट' व 'पाईनघांट' हीं नांवें आहेतच. त्यांत बालेघांट कर्नाटकाचा व पाईन घांट द्रविड देशाचा भाग आहे. या

हैदरअल्लीवर पहिली स्वारी

कर्नाटक बालेघांटा पैकीं विजापूरच्या बादशहानीं बराच प्रदेश घेतला होता.

कर्नाटकांत मराठ्यांचा प्रवेश पहिल्यानें शिवाजी महाराजांचे वडील शहाजी राजे भोंसले यांच्या कारकीर्दीत झाला. विजापूरच्या बादशहाकडून कर्नाटक बालेघांटच्या बंदोबस्ता करितां त्यांची नेमणूक झाली होती. व फौजेच्या खर्चा करितां त्यांस जहागीर पांच परगणे मिळाली होती ती ही तिकडेच होती. त्या पांच परगण्यांचीं नांवें शिरें, होसकोटें, कोलार, बाळापूर व बेंगरूळ (बंगलोर) अशीं आहेत. शहाजी राजे कर्ते व पराक्रमी पुरुष होते त्यानीं त्या देशींच्या संस्थानिकांवर दरारा बसवून आपल्या धन्याच्या राज्याचा बंदोबस्त राखिला, आपल्या जहागिरींत कित्येक किल्ले नवीन बांधिले, व जुन्यांचा जीर्णोद्धार केला, इतकेंच नाहीं, तर घांटाखालीं उतरून पाईनघांटा पैकीं ह्मणजे द्रविड देशा पैकीं आरणी, वेलोर व जिंजी हे किल्ले व तंजावरचें संस्थान काबीज केलें. त्यानीं आपणा बरोबर तिकडे शेंकडों ब्राह्मण महाराष्ट्रांतून नेले होते. त्या ब्राम्हणांचे वंशज अद्यापि त्या देशीं बहुत स्थळीं नांदत आहेत. नंतर ही निरनिराळ्या प्रसंगीं इकडील पुष्कळ ब्राम्हण गेल्या शतकांत तिकडे जाऊन राहिले आहेत. या मराठी ब्राम्हणांची सरकारी कामकाजांत तर्बेज व हुषार असल्या विषयीं तिकडे लवकरच ख्याति झाली, आणि तद्देशीय राजे रजवाड्यांच्या दरबारांत त्यांस आश्रय मिळूं लागला व त्यांचें महत्व वाढूं लागलें. अठराव्या शतकांत मराठ्यांच्या वैभवाचा कळस होऊन गेला, त्यांचे सेनासमुद्र दर वर्षास हिंदुस्थानाच्या कोना कोपऱ्यांतील प्रांतांवर देखील जाऊन आदळूं लागले. मराठी भाषा ही सार्वभौम राजांची भाषा होऊन बसली. कर्नाटकांतला केवढा बलिष्ट पाळेगार असला तरी त्यास मराठी ब्राम्हण कारकुनानें लिहून आणलेल्या पत्राच्या शेवटीं ‘ बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना ’ हीं वेडीं वांकडींच कां होईनात, पण

मोडी लिपींत अक्षरें लिहितां येण्याची जरूर पडूं लागली व भूषण वाटूं लागलें ! मराठे सरदारांशीं खंडणी बद्दल बोलणें किंवा पत्रव्यवहार करणें, त्यांच्या भेटी घेऊन व नजराणे देऊन त्यांची मर्जी सुप्रसन्न राखणें, त्यां जवळ कुमक मागणें, इत्यादि प्रसंग तिकडील राजे रजवाड्यांस हरहमेषा पडूं लागले. या मसलती पार पाडण्या कारितां मराठी ब्राम्हण नेहमीं नौकरीस ठेविल्या वांचून त्यांस गत्यंतरच नव्हतें.

शिवाजी महाराजानीं इ० स० १६७७ या वर्षीं सत्तर हजार फौजेनिशीं कर्नाटकावर स्वारी केली. चौथ सरदेशमुखीच्या वसुला कारितां त्या देशावर आलेली ही मराठ्यांची पहिलीच टोळधाड होय. या स्वारींत महाराजानीं आपले सावत्र बंधु व्यंकोजी राजे यांज पासून बापाची सर्व जहागीर हिसकून घेतली, व तंजावर खेरीज पाईन घांटांतलीं शहाजी राजे यांच्या ताब्यांत पूर्वीं असलेलीं सर्व स्थळें घेतलीं. शिवाय बारा महाल पैकीं महाराजगड, कर्नाटकगड, जगदेवगड हे व दुसरे अनेक किल्ले घेऊन त्या प्रांतीं आपला अंमल बसविला; आणि भोंवतालच्या तमाम मुलखांत फौजा पाठवून खंडण्या वसूल केल्या. परत तुंगभद्रेकडे येतां येतां त्यानीं बल्लारीचा किल्ला घेतला, आणि त्या नदीच्या उत्तरतीरीं आल्यावर कोपळ, बहादूरबिंडा व दुसरे अनेक किल्ले घेतले, व कृष्णा आणि तुंगभद्रा यांच्या चिमट्या मधला प्रदेश बहुतेक ताब्यांत आणिला. त्या दुआबा मधील ज्या प्रबळ पाळेगारानीं मुसलमानी राजांच्या सैन्यास कधीं जुमानिलें नाहीं, त्यांस आतां शिवाजी महाराजांपुढें मान वांकवावी लागली; व खंडणी द्यावी लागली. शिवाजी महाराजांचें जितकें राज्य महाराष्ट्रांत होतें त्याच्या निम्या पेक्षां अधिक त्यानीं कर्नाटकांत संपादिलें होतें. हें नवीन मिळविलेलें राज्य नेहमी ताब्यांत ठेवितां यावें, व आणखी वाढवितां यावें, या उद्देशानें त्यानीं त्या मुलखाशीं दळणवळण ठेवण्याची सोय उत्तम केली होती. दुआब तर महाराष्ट्राच्या लगत्यासच होता. तेथन शाहाजी राजे

यांच्या जहागिरीच्या परगण्यांत जाण्याच्या रस्त्यावर बल्लारीचा किल्ला त्यांच्या ताब्यांत होताच. शिवाय तो रस्ता चित्रदुर्ग व हरपनहळ्ळी येथील संस्थानिकांच्या मुलखांतून जात असे, त्या दोन संस्थानिकांशीं महाराजांच्या घराण्याचा स्नेह शहाजी राजे यांच्या वेळे पासूनच होता. तेथून म्हणजे शिरें, होसकोटें वगैरे परगणे कर्नाटक बालेघांट प्रांतीं आहेत, तेथून पाईन घांटाकडे जाण्यास रस्ता निर्वेधच होता, व जिंजी, वेलोर वगैरे तिकडल्या स्थळांस उपद्रव झाला असतां बालेघांटावरून कुमक जाण्यास हरकत नव्हती. महाराष्ट्रांत जसे त्यांचे रायगड, सिंहगड, पुरंदर वगैरे फार बळकट डोंगरी किल्ले होते, तसेच तिकडे बालेघांटच्या मुलखांत नंदीदुर्ग, भैरवदुर्ग वगैरे अनेक प्रख्यात पहाडी किल्ले होते ते त्यांच्या राज्य स्थापनेच्या पद्धतीस निःसंशय फार उपयोगी पडते. महाराजांचे बेत काय असतील ते असोत, पण ते त्यांच्या हातें सिद्धीस जाण्याचा योग आला नाहीं! कारण कीं, कर्नाटकच्या स्वारीहून परत आल्यावर दोन वर्षांच्या आंतच ते दिवंगत जाहले.

या कर्नाटकच्या राज्याचा उपभोग शिवाजी महाराजांस घेतां आला नाहीं, तरी त्यांचे पुत्र राजाराम महाराज यांचें इकडील राज्य नष्टप्राय होण्याची वेळ आली तेव्हां त्यांस तिकडे जाऊन कांहीं वर्षें जिंजी येथें आसरा धरितां आला. सारें दक्षिण हिंदुस्थान जिंकण्याची प्रतिज्ञा करून औरंगजेब बादशहा इ० स० १६८४ मध्यें प्रचंड सेनेसह दक्षिणेंत आला. त्यानें विजापूर व गोवळकोंडें येथील मुसलमानी राज्यें बुडविलीं. त्या दोन राज्यांत महाराष्ट्र, कर्नाटक आणि तैलंगण या देशांतले जितके मुलूख मोडत होते तितके सर्व औरंगजेबाच्या ताब्यांत गेले. नंतर मराठी राज्याचा उच्छेद करण्याच्या यत्नास तो लागला, आणि त्या मुळेंच वर सांगितल्या प्रमाणें राजाराम महाराजांस कर्नाटकांत जावें लागलें. बादशाहाच्या ही फौजा त्यांस जेर करण्या करितां तिकडे गेल्या, व त्यांशीं मराठ्यांचीं पु-

ष्कळ तुमुल युद्धें तिकडे झालीं. इकडे महाराष्ट्र देशांत ही मोंगलांच्या फौजांशीं मराठ्यांचीं युद्धें सुरूच होतीं. एकंदर सुमारें पंचवीस वर्षें पर्यंत ही झोंबाझोंबी सतत चालू होती. तिचा परिणाम असा झाला कीं, मराठ्यानीं बादशहाचें कांहीं चालूं न देतां आपलें स्वातंत्र्य कायम राखिले; पण त्या अवधींत कित्येक डोंगरी किल्ल्यांशिवाय बादशहानें मराठी राज्याचा बहुतेक भाग ताब्यांत आणिला; व कर्नाटकांत मराठ्यांचें जें राज्य होतें ते तर सर्वच घेतलें. तिकडे एक तंजावरचें संस्थान मात्र शिवाजी महाराज यांचे सावत्र बंधु व्यंकोजी राजे यांच्या वंशजांकडे राहिलें.

इ० स० १७०७ या वर्षीं औरंगजेब मरण पावला. त्यानें जें येवढें अवाढव्य राज्य संपादन केलें होतें, तें रक्षण करण्याची अक्कल त्याच्या वंशजां पैकीं कोणामध्यें राहिली नाहीं. या मुळें उत्तरहिंदुस्थानांत निरनिराळ्या प्रांतांवर त्यानें जे सुभेदार नेमिले होते त्यानींच ते ते प्रांत बळकाविले, आणि दक्षिण हिंदुस्थानांत ही तीच स्थिति होऊन लहान मोठीं शेंकडों संस्थानें नवीन निर्माण झालीं.

औरंगजेब बादशहानें दक्षिण हिंदुस्थानांत जितकें राज्य काबीज केलें होतें त्याचे त्यानें सहा सुभे केले होते. त्यांचीं नांवें—१ खानदेश, २ वऱ्हाड, ३ औरंगाबाद, ४ बेदर, ५ हैदराबाद (गोवळकोंडें), ६ विजापूर. ह्या सहा सुभ्यांत शेवटचे दोन फारच मोठे होते. कारण मोंगलानीं कर्नाटकांत जितकें नवीन राज्य मिळविलें होतें, तितक्याचा समावेश या दोन सुभ्यांत झाला होता. विजापूरच्या राज्यांत जितकें कर्नाटकचें राज्य होतें त्यास विजापूर कर्नाटक असें बादशाहानें नांव देऊन तें राज्य विजापूरच्या सुभ्यास जोडिलें होतें. तसेंच गोवळकोंड्याच्या ताब्यांत पाईनघांटा पैकीं ह्मणजे द्रविड देशा पैकीं व तैलंगणा पैकीं जितकें राज्य होतें तितकें सगळें हैदराबादच्या सुभ्यास त्यानें जोडिलें व त्या राज्यास हैदराबाद कर्नाटक असें नांव दिलें. कर्नाटकांत बंदोबस्त राखण्या

करितां बादशहानें जे सुभेदार व फौजदार वगैरे अधिकारी नेमिले होते, ते बादशहा मेल्या बरोबर स्वतंत्र होऊन आपणास नबाब म्हणवून घेऊं लागले. निजाम उल्मुलूख नांवाच्या एका पराक्रमी सरदाराच्या ताब्यांत दक्षिणच्या सहा सुभ्यांची वहिवाट दिल्लीच्या बादशहाकडून होती. तो निजाम इ० स० १७२० या वर्षी बादशहाचा अंमल झुगारून देऊन या सहा सुभ्यांचें राज्य बळकावून बसला. तो बलिष्ट असल्यामुळें त्याच्या ताब्यांत कर्नाटकांतल्या सर्व संस्थानिकांस व नबाबांस वागावें लागे, व त्यास खंडणी द्यावी लागे. या नबाबांत पांच नबाब बरेच सामर्थ्यवान् होते. त्यांच्या राजधान्या अर्काट, शिरें, कडपें, कर्नळ व सावनूर या होत्या. अर्काटच्या नबाबाचें राज्य कर्नाटक पाईन घांटांत होतें व शिरें येथील नबाबाचें राज्य कर्नाटक बालेघांटावर होतें. विजापूरच्या बादशहाकडून शाहाजी राजे यांस मिळालेली जहागीर या नबाबाच्या राज्यांतच होती. कडपें व कर्नूळ येथील नबाबांचीं राज्यें त्या त्या टांपूवर होतीं. सावनूरच्या नबाबाचा अंमल मात्र बऱ्याच विस्तीर्ण प्रदेशावर पसरला असून शिवाजी महाराजांनीं कृष्णा व तुंगभद्रा यांच्या दुआबा मध्यें जो मुलूख जिंकिला होता तो सावनूरच्या राज्यांत मोडत होता.

एकतंत्रानें राज्यकारभार चालविण्याची शिस्त सुटल्यामुळें ज्या राष्ट्रांत बहुनायकी उत्पन्न होत्ये तें राष्ट्र लौकरच मोडकळीस येतें. परचक्राचे तडाखे सहन करण्याचें सामर्थ्य त्यांत राहत नाहीं. त्यांतील प्रजेची नेहमी अमर्याद पायमल्ली होत असत्ये. अठराव्या शतकांत या बहुनायकीचें कर्नाटक देशीं जणू काय भरपूर पीकच आलें होतें ! त्या देशावर सत्ता चालविणारे पांच नबाब व त्यांहून वरिष्ट असा हैदराबादचा नबाब म्हणजे निजाम यांचीं राज्यें दक्षिणेंत मोंगलांची स्वारी झाल्यामुळें अस्तित्वांत आलेलीं होतीं. पण त्यांच्या पूर्वीं कित्येक शतकें ज्यांच्या राज्याची स्थापना होऊन गेली होती व कालचक्राच्या कनुकूळ किंवा प्रतिकूळ गतीच्या

योगानें ज्यांचा अभ्युदय किंवा ऱ्हास होत आला होता अशा तद्देशीय संस्थानिकां विषयीं येथें उल्लेख करावयाचा राहिलाच आहे. या संस्थानांत म्हैसूरचें राज्य कर्नाटकाच्या दक्षिणेकडील अर्ध्या भागांत होतें. उत्तरेकडील अर्ध्या भागांत बिदनूर, चित्रदुर्ग, हरपनहळ्ळी, अनागोंदी व रायदुर्ग हीं संस्थानें बरींच मोठीं होतीं. या पांचांत मोठें बिदनूर. त्याच्या खालोखाल चित्रदुर्ग व बाकीचीं या दोहोंपेक्षां लहान होतीं. सोंदें संस्थान घांटाच्या पायथ्यास हल्लींच्या कारवार जिल्ह्यांत होतें. त्याचा ही वर घाटीं थोडा बहुत अंमल होताच. मराठ्यांचें राज्य कर्नाटक देशीं होतें, तें मोंगल बादशहानें घेतल्याचें मागें लिहिलेंच आहे. तें सर्व राज्य आतां वर सांगितलेल्या संस्थानिकानीं व नबाबानीं हाताखालीं घातलें होतें. नाहीं म्हणावयास दोन टांपू मात्र त्यांच्या ताब्यांत राहिले होते. पैकीं एक तंजावरचें संस्थान शिवाजी महाराज यांचे सावत्र बंधु व्यंकोजी राजे यांच्या वंशजांकडे चालत होतें. दुसरें संस्थान गुत्तीकर घोरपड्यानीं जिंकिलेलें होतें. पूर्वी राजाराम महाराज व संताजी घोरपडे सेनापति यांमध्यें विरोध उत्पन्न होऊन महाराजांनीं संताजीस ठार मारविलें. तेव्हां संताजीचा पुतण्या शिधोजी सैन्य जमवून कर्नाटकांत जाऊन लुटालूट करूं लागला. त्यानें तिकडे गुत्ती, गजेंद्रगड व सोंडूर हे किल्ले व त्यां भोंवतालचा प्रदेश काबीज करून तिकडे एक स्वतंत्रच संस्थान स्थापिलें. हे घोरपडे महापराक्रमी सरदार होते, यास एक उत्तम प्रमाण असें आहे कीं, जेथें दंगे, लढाया, व बंडाळी नेहमीं चालत होती अशा पर मुलुखांत केवळ तरवारीच्या जोरावर मिळविलेलें हें चिमुकलें संस्थान त्यानीं महाराष्ट्राच्या अधिपतींचें बिलकूल पाठबळ नसतां पाऊणशें वर्षें पर्यंत उत्तम रीतीनें रक्षण केलें, व कृष्णेपासून रामेश्वरापर्यंत सर्व राजे रजवाड्यांवर आपला दरारा बसविला. या घराण्यांत शिधोजीचा मुलगा मुरारराव हा फारच प्रख्यातीस आला. क्लाईव्ह साहेब एका मोठ्या संकटांत पडला असतां त्यास कुमक करण्या विषयीं तयार

झाल्या बद्दल ज्या मुराररावाचें इंग्रज इतिहासकारानीं वर्णन केलें आहे तो हाच मुरारराव होय. कर्नाटकांत कोठें ही लढाईचा प्रसंग उपस्थित होवो, मुराररावाची स्वांरी लढणाऱ्या दोन पक्षां पैकीं एकाकडे नाहीं असें व्हावयाचेंच नाहीं! आपल्या राज्यांतील ठाण्यांस शिबंदी पुरवून शिलक राहण्या जोगें व नेहमीं लढाईच्या उपयोगीं पडण्या जोगें सैन्य मुराररावा जवळ सहा सात हजारां पेक्षां अधिक नसे; पण तें अति उत्तम व निवडक असून त्याच्या विश्वासांतलें व अगदीं एक जुटीनें जीवास जीव देऊन लढणारें असे. त्याचा तोफखाना जुजबीच असे. पण गारदी कवाईत शिकलेले उत्तम लढाऊ असत. घोडेस्वारांचा भरणा तो दर वर्षास महाराष्ट्रांतून हजारों शिलेदार नेऊन करीत असे.

अठराव्या शतकांत वर सांगितल्या प्रमाणें कर्नाटकांत मुसलमानी, कानडी, व मराठी अशीं तीन प्रकारचीं निरनिराळीं राज्यें होतीं. या सर्वांचा उच्छेद करण्यासच जणुकाय निर्माण झालेला महाप्रतापी जो हैदरअल्ली त्याच्या हकीगतीकडे आतां वळावयाचें. पण तसें करण्या पूर्वीं १७२० पासून पानपतच्या लढाई पर्यंत तिकडे ज्या कित्येक उलाढाली झाल्या त्यां विषयीं व त्या देशावर मराठ्यांनीं तितक्या अवधींत ज्या स्वांऱ्या केल्या त्यां विषयीं थोडें दिग्दर्शन केलें पाहिजे.

दिल्लीच्या बादशाहाचे दोघे वजीर सय्यद नांवाचे होते, त्यांनीं बाळाजी विश्वनाथ उर्फ थोरले नानासाहेब पेशवे यांस इ० स० १७१८ मध्यें कुमकेस बोलावून नेलें, व त्यांच्या मदतीनें महमदशहा बादशहाची तक्तावर स्थापना केली. त्या नंतर त्या बादशाहानें पेशवे यांच्या हातीं चौथ, सरदेशमुखी व स्वराज्य अशा तीन हक्कांच्या तीन निरनिराळ्या सनदा दिल्या. सरदेशमुखी ह्मणजे दहावा हिस्सा व चौथ ह्मणजे चवथा हिस्सा दक्षिणचे सहा सुभे कोणचे हें पूर्वीं सांगितलेंच आहे. या सुभ्यांचा ऐन वसूल अठरा कोटी रुपये होता. त्या पैकीं दहावा हिस्सा ह्मणजे एक

कोटी ऐशीं लक्ष रुपये सरदेशमुखी बद्दल मोंगल अधिकाऱ्यां पासून घेण्याचा मराठ्यांस या सनदेवरून हक्क आला. सरदेशमुखीची रक्कम वजा जातां अठरा कोटी पैकीं जी रक्कम राहिली तिचा ही चौथ ह्मणजे चवथा हिस्सा घेण्याचा हक्क बादशहानें दिलेल्या चौथाच्या सनदेवरून त्यांस प्राप्त झाला. तिसरी सनद स्वराज्याची होती. ' स्वराज्य ' शब्दाचा अर्थ ' शिवाजी महाराजांच्या मरणसमयीं त्यांच्या ताब्यांत होतें तें सर्व राज्य ' असा होता. अलीकडे औरंगजेबानें स्वराज्या पैकीं बहुतेक भाग जिंकिला होता, तो महमदशहानें या 'स्वराज्या' च्या सनदेनें मराठ्यांस परत दिला. पण तुंगभद्रेच्या उत्तरेस शिवाजी महाराजांचें जेवढें राज्य होतें तेवढें मात्र बादशहानें ' स्वराज्य ' ह्मणून मराठ्यांस परत दिलें. कर्नाटक बालेघांटावर शिरें बेंगरूळ वगैरे पांच परगणे (शहाजी राजे यांची पूर्वीची जहागीर) व पाईनघांटांतील बारा महाल जिंजी, वेलोर इत्यादि प्रांत व स्थळें व तंजावर पैकीं शिवाजी महाराजांचा हिस्सा होता तो, या सर्वांची गणना ' स्वराज्यांत ' करण्याचें बादशहानें नाकारिलें; व ते मुलूख मराठ्यांस त्यानें परत दिले नाहींत. यामुळें आतां तंजावरच्या राजांची फक्त मोंगलांच्या जहागीरदारांत गणना होऊं लागली. अर्थात् इतर संस्थानां बरोबर तंजावरापासून ही खंडणी घेण्याचा हक्क सातारकर छत्रपतींस प्राप्त झाला! म्हैसूर, त्रिचनापल्ली व कर्नाटकांतलीं इतर शेंकडों लहान मोठीं संस्थानें दक्षिणच्या सहा सुभ्यांखालीं मोडत होतीं, त्यामुळें चौथ सरदेशमुखीचा वसूल मराठ्यानीं त्यांज पासून ही घ्यावा असें ठरलें होतें. त्या संस्थानांची व खुद्द छत्रपतींच्या कुळांतले राजे ज्या संस्थानाचे अधिपति होते त्या तंजावर संस्थानाची योग्यता आतां सारखीच होऊन बसली!

हल्लीं इंग्रज सरकारचे राज्यांत सर्वत्र शांतता असल्यामुळें प्रजेची आबादानी आहे. त्यामुळें या सरकारच्या वसुलाची रक्कम भरपूर जमा होत आहे. तरी सर्व बाबी धरून मुंबई व मद्रास या इलाख्यांचा आणि वऱ्हाड

प्रांत व निजामाचें राज्य यांचा मिळून वसूल हल्लीं जवळ जवळ तीस कोटी रुपये येतो. पण अफू व पूर्वी अस्तित्वांत नसलेल्या इतर बाबी यां बद्दल तिसरा हिस्सा या रकमेंतून वजा केला तर वीस कोटी राहतात. या वीस कोटींचा वसूल ज्या मुलखांतून येत आहे त्या मुलखांतून सारा सिंध प्रांत, सारी गुजराथ, पुणें, सातारा व नाशीक या जिल्ह्यांचे बहुतेक भाग, कोंकणचे चारी जिल्हे, उत्तर व दक्षिण कानडा आणि मलबार, व तंजावर इतके जिल्हे वजा करावे, तेव्हां मोंगलांचे त्या वेळचे सहा सुभे होणार. तेव्हां या सुभ्यांचा वसूल अठरा कोटी रुपये जो धरिलेला आहे, तो फक्त कागदपत्रीं नमूद झालेला मात्र पहाण्यास सुंदर दिसतो. खरोखर वसूल निम्मे तरी येत असेल कीं नाहीं याची वानवाच ! कारण, औरंगजेब मरण्या पूर्वी पंचवीस वर्षे पर्यंत लढाया व लुटालूट सारखी सुरू असल्यामुळें सारा देश हैराण होऊन गेला होता, आणि प्रांतचे प्रांत ओस पडले होते. वसुलाची अशी निकृष्ट स्थिति होती तरी या सहा सुभ्यांच्या उत्पन्नांतून सुमारें सहा कोटी रुपये दर साल चौथ सरदेशमुखी बद्दल मोंगलानीं मराठ्यांस द्यावयाचे होते ! यांत देणाऱ्यानीं तरी काय द्यावें व घेणार तरी काय घेतात ! या वरून हें सहज लक्ष्यांत येईल कीं, हे चौथ सरदेशमुखीचे हक्क अशा स्वरूपाचे होते कीं, ज्यांची वहिवाट मराठे व मोंगल या उभय पक्षीं सरळपणानें चालण्या जोगी नव्हती. मराठ्यानीं मनगटाच्या जोरावर साधेल तितकें दडपावें व मोंगलानीं राखवेल तितकें राखावें हाच या तंट्याचा निकाल ! चौथ सरदेशमुखीची मूळ कल्पना शिवाजी महाराजांनीं काढिली. त्यांच्या मरणा नंतर पंचवीस वर्षे हे हक्क मोंगलां कडून जबरदस्तीनें कबूल करविण्याची मराठ्यांची खटपट चालली होती, ती शाहू महाराजांचे कारकीर्दींत सिद्धीस गेली. या दोन हक्कां पासून प्राप्त होणाऱ्या मुबलक पैक्याची वांटणी ब्राह्मण मुत्सद्यांनीं सर्व मराठे सरदारांत एकी रहावी ह्मणून किती अकलेनें केली, व ‘ स्वराज्य ’ शब्दा-

चा अर्थ त्यानीं किती व्यापक केला, व या दोन गोष्टीनीं मराठी राष्ट्राचें कसें अपरिमित कल्याण झालें, हा विषय फार मनोरंजक आहे; परंतु त्याचा प्रस्तुत प्रकरणाशीं विशेष संबंध नसल्यामुळें त्या विषयीं आम्हीं लिहीत नाहीं.

राज्यें जिंकणारे लोक आज पर्यंत या भूतलावर असंख्य झाले आहेत. पण त्यांच्या कृतीमध्यें हा नियम दिसून येतो कीं, त्यानीं प्रथम एक प्रांत ताब्यांत घ्यावा; तेथें आपला अंमल निर्वेधपणें चालूं लागला ह्मणजे दुसरा प्रांत जिंकण्याच्या यत्नास लागावें; व या प्रमाणें करीत करीत शेवटीं सार्वभौम ऐश्वर्याचे मालक व्हावें. मराठ्यांची मात्र पद्धति याच्या अगदीं उलट होती. त्यांच्या चळवळीस एक प्रांत पुरतच नव्हता! साऱ्या हिंदुस्थानभर एकाच वेळीं त्यांच्या स्वाऱ्या व कारस्थानें चालू होतीं. पण निष्कंटक व निर्वेध असा अंमल थोड्याच प्रांतांवर त्यांचा चालत असे. प्रत्येक देश व प्रांत या प्रमाणें वर्षानुवर्ष बलहीन करीत गेलें, ह्मणजे येईल तेव्हां सारें हिंदुस्थानच आपल्या ताब्यांत येईल असें त्यांस वाटत असावें! दक्षिणच्या सहा सुभ्यांत चौथ सरदेशमुखी मिळाल्या बरोबर तिचा अंमल पक्का बसविण्याचें किंवा ते सारेच सुभे ताब्यांत घेण्याचें काम फावेल तसतसें करण्याचें ठरवून त्यानीं आधीं कर्नाटक, गुजराथ, माळवा, राजपुताना, बुंदेलखंड, आग्रा, दिल्ली, रोहिलखंड, बंगाला या दूरदूरच्या प्रांतांवर दरसाल स्वाऱ्या करण्याचा उपक्रम सुरू केला! यामुळें काय चमत्कार झाला आहे पहा. त्यानीं १७४१ त त्रिचनापल्ली घेतली, आणि १७५२ त त्रिंबकचा किल्ला घेतला! १७५८ त त्यांचा लाहोरांत अंमल बसला आणि १७५९ त अहमदनगर त्यांच्या हातीं आलें! 'स्वराज्या' ची सनद त्यांस बादशहाकडून मिळाली होती व तें 'स्वराज्य' दक्षिणेंत खानदेश, बागलाणा, मध्यमहाराष्ट्र व उत्तर कर्नाटक यां मध्यें पसरलेलें होतें. तें तत्काळ घेण्याचा त्यानीं यत्न केलाच नाहीं. पण

जेव्हां संधी आली तेव्हां निरनिराळ्या ठिकाणचें ' स्वराज्य ' व त्या बरो-
बर ' परराज्य ' ही त्यानीं घेतलें !

इ० स० १७२६ त थोरले बाजीराव पेशव्यांनीं श्रीरंगपट्टणावर स्वारी करून खंडणी घेतली. नंतर १७४० त रघोजी भोंसले व इतर सरदार पन्नास हजार फौजेसह कर्नाटकचे स्वारीस निघाले. या प्रसंगीं त्यांस गुत्तीहून मुरारराव घोरपडे येऊन मिळाला होता. त्यांशीं झुजण्यास अर्काटचा नबाब दोस्त अल्लीखान तयार झाला. परंतु त्यानीं त्याचा पराभव करून त्यास मारून टाकिलें व त्याची फौज लुटून घेतली. नंतर त्या प्रांतीं चोहोंकडे लुटालूट करण्यास त्यानीं सुरुवात केली, तेव्हां दोस्त अल्लीचा मुलगा सफदरअल्ली यानें खंडणी देऊन त्यांस वाटेस लाविलें. दोस्तअल्लीचा जांवई चंदासाहेब हा त्रिचनापल्ली बळकावून बसला होता, व तो सारें राज्य आपणा पासून घेईल अशी सफदरअल्लीस भीति वाटत होती; ह्मणून त्यानें मराठ्यांशीं राजकारण करून त्यांजकडून चंदासाहेबावर स्वारी करविली. त्यानीं त्रिचनापल्ली तीन महिने लुटून काबीज केली, व तो प्रांत मुरारराव घोरपड्याच्या स्वाधीन करून व चंदासाहेबास कैद करून बरोबर घेऊन ते परत आले.

या नंतर दोन वर्षांनीं निजाम उल्मुलूखानें कर्नाटकावर स्वारी केली, तेव्हां मुराररावापासून सलोख्यानें त्रिचनापल्ली काढून घेऊन ती त्यानें पुनः अर्काटच्या नबाबाकडे दिली. निजामाच्या या स्वारींत एक गमतीचा प्रकार घडून आला, तो सांगितला ह्मणजे त्यावेळची देशस्थिति कशी होती हें कळून येईल. मागें सांगितलेंच आहे कीं, औरंगजेब मेला तेव्हां मोंगल अधिकारी आपल्या ताब्यांतले प्रांत, महाल व किल्ले बळकावून स्वतंत्र होऊन आपणास ' नबाब ' ह्मणवूं लागले होते. एके दिवशीं निजामानें दरबार भरला असतां तेथें त्याच्या भेटीस एका मागून एक अठरा नबाब आल्याची चोपदारांनीं पुकारणी केली. तेव्हां तो रागानें ह्मणाला,

अरे, आजपर्यंत मी समजत होतों कीं, दक्षिणेंत सहा सुभ्यांवरचा अधिकारी व ' नबाब ' या पदवीला योग्य असा मी एकच आहें; पण आतां पहातों तों या प्रांतीं जिकडे तिकडे नवाबच नबाब बोकळले आहेत! इतउत्तर जर कोणी असला नबाब दरबारास येईल तर त्याला चाबकांचा सडकून मार देण्यांत येईल !!!

बाजीराव बल्लाळ पेशवे मरण पावल्या नंतर बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यांस पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. बाबूजी नाईक बारामतीकर यांस शाहू महाराजांकडून पेशवाई देवविण्याचें रघोजी भोंसल्याचे मनांत होतें, परंतु त्याची ती मसलत सफळ झाली नाहीं. तथापि कृष्णा व तुंगभद्रा या नद्यां मधील मुलखाच्या चौथ सरदेसमुखीची कमाविशी सात लक्ष रुपये सालिना मक्त्याच्या करारावर भोंसल्यानें महाराजांकडून बाबूजी नाइकास देवविली होती. तो मुलूख सावनूरकर नबाब अबदुलमजीदखान याच्या ताब्यांत होता. त्या प्रांतीं कित्तूर, नवलगुंद, शिरहट्टी, हावनूर व डंबळ येथील देसाई फार प्रबळ होते. ते देसाई व सावनूरकर नबाब कांहीं केल्या बाबूजी नाइकाचा अंमल बसूं देईनात. उभयपक्षीं पांच सहा वर्षें झगडाझगड चालू होती. तींत बाबूजी नाईक फौजेच्या खर्चा खालीं अगदीं जेरीस आला. ही कमाविशी सदाशिवराव भाऊ साहेबांच्या नांवें करून देऊन तूं हिजवरचा आपला हक्क सोड ह्मणजे आम्हीं सर्व यथास्थित बंदोबस्त करूं; असें पेशव्यानीं नाइकास पुष्कळ वेळां सांगून पाहिलें, पण त्या दोघां मध्यें वांकडें व स्पर्धा असल्यामुळें तें ह्मणणें तो ऐकेना. शेवटीं अधिक उपेक्षा करावी तर उत्तर कर्नाटक अगदींच हातांतून जाईल असें समजून पेशव्यांच्या आज्ञेनें भाऊ साहेब फौज घेऊन तिकडे इ.स. १७४७ त स्वारीस गेले. जरूर पडल्यास त्यांची कुमक करितां यावी ह्मणून आणखी फौजेसह नानासाहेब पंढरपुरास येऊन तेथें दळ देऊन राहिले. भाऊसाहेबांचें वय या वेळीं १७ वर्षांचें होतें. ते लहान ह्मणून त्यांस

सल्ला मसलत देण्या करितां सखारामबापूची योजना त्यांच्या दिवाणगिरीवर झाली होती, व त्या स्वारीचें सर्व जोखीम त्याच्याच शिरावर होत. भाऊ साहेबानीं तुंगभद्रे पर्यंत स्वारी करून सावनूरकर नबाब व तिकडील देसाई व इतर पुंडपाळेगार यांस पादाक्रांत केलें, व नबाबा पासून पाच्छापूर, कित्तूर, परसगड, गोकाक, यादवाड, बागलकोट, बदामी, नवलगुंद, डंबळ, अनिगिरी, तोरगल, हल्याळ, हरिहर, बसवापट्टण व दुसरे कित्येक मिळून एकंदर छत्तीस परगणे त्यानीं घेतले. सावनूरकराकडे मिश्रिकोट, हुबळी, बंकापूर, हनगल, कोड व राणेबिदनूर पैकीं बहुतेक भाग, कुंदगोळ व कांहीं इतर मिळून बेवीस परगणे मात्र राहिले. बंकापूर, तोरगल, व बेळगांव हे किल्ले ही त्याजकडेच राहिले. नबाबा पासून या स्वारींत जो मुलूख मिळाला त्या वरचा त्यानें आपला वारसा सोडिला इतकेंच. तो सर्व मुलूख तत्काळ मराठ्यांच्या ताब्यांत आला असें नाहीं. तिकडील देसायांस बलहीन करून आपला अंमल त्या प्रांतीं बसविण्याचें काम पुढें कित्येक वर्षें त्यानीं चालू ठेविलें होतें. त्या नबाबा पासून घेतलेल्या मुलखांत कांहीं भाग ' स्वराज्या ' पैकीं होता हें वाचक विसरले नसतीलच. स्वराज्याची सनद मिळून अठ्ठावीस वर्षें झालीं होतीं, तरी सनदे प्रमाणें या उत्तरकर्नाटकांतील स्वराज्य ताब्यांत घेण्यास मराठ्यांस आजपर्यंत फुरसत मिळालीच नाहीं, व आतां तें त्यानीं ताब्यांत आणिलें, तेव्हां त्या बरोबर सावनूरकराचें ही सुमारें अर्धें राज्य घेतलें! तिकडील काटक लोक दंगेखोर असल्यामुळें त्यांजवर दरारा बसविण्या करितां दर वर्षीस पुण्याहून तिकडे फौज पाठवावी लागत असे.

इ० स० १७४० त महादाजीपंत पुरंदरे यांस पेशव्यानीं कर्नाटकच्या स्वारीस पाठविलें होतें, तेव्हां त्यांज बरोबर मुझफरखान म्हणून गारद्यांचा सरदार होता. त्याचें व पुरंदरे यांचें कांहीं कारणामुळें भांडण झालें. त्यावरून तो मुझफरखान पेशव्यांचें लष्कर सोडून सावनूरकरांचे

आश्रयास गेला. त्यास हवालीं करण्या विषयीं मराठ्यानीं सावनूरकराशीं बोलणें लाविलें तें त्या नबाबानें ऐकिलें नाहीं. तेव्हां उभय पक्षीं युद्धाची पुनः तयारी झाली. कडपें व कर्नूळ येथील पठाण जातीचे नबाब व मुरारराव घोरपडे हे सावनूरकरास मिळाले. इ० स० १७५६ त नानासाहेब व भाऊसाहेब मोंठी फौज बरोबर घेऊन कृष्णा उतरून सावनुरावर चालून आले. मागच्या तहांत बागलकोटचा किल्ला नबाबानें मराठ्यांस देऊं केला होता, पण तो अद्यापि त्यांच्या हातीं आला नव्हता; तो यावेळीं काबीज करण्यांत आला. भागानगराहून सलावतजंग ही आपल्या सैन्यासह येऊन पेशव्यांस मिळाला. या प्रसंगीं सावनूरकर याच्या साथीदारानीं त्याची कांहींच कुमक केली नाहीं. त्यामुळें मोंगल व पेशवे यांशीं लढाई करण्याचा बोजा त्या एकट्या नबाबाच्याच शिरावर पडला. सावनुरावर कित्येक महिने पर्यंत ज्यारीनें लढाई सुरू होती. शेवटीं मुराररावाच्या मध्यस्थीनें तो नबाब पेशव्यांस शरण येऊन उभय पक्षीं तह झाला. त्यांत अकरा लक्ष रुपये खंडणी व मिश्रिकोट, हुबळी, आणि कुंदगोळ हे परगणे त्यानें मराठ्यांस दिले; आणि सोंधें व बिदनूर या संस्थानां पासून खंडणी घेण्याचा आपला हक्क ही त्यानें त्यांस देऊन टाकिला. इतकें झाल्यावर मराठ्यांनीं पूर्वीं घेतलेल्या परगण्यां पैकीं तीन परगणे त्यास परत दिले. आतां नबाबाचें राज्य सालिना सुमारें आठ लक्ष रुपये उत्पन्नाचें मात्र राहिलें. खंडणीच्या अकरा लक्ष रुपयांची तत्काळ फेड करण्याचें त्यास सामर्थ्य नव्हतें. त्या रक्कमेची फेड होई पर्यंत बंकापूरचा किल्ला त्यानें मराठ्यांच्या हवालीं केला. इतकें झाल्यावर पेशव्यांचा निरोप घेऊन सलावतजंग भागानगरास परत गेला. त्या नंतर श्रीमंतानीं गोपाळराव पटवर्धना बरोबर दहा हजार फौज देऊन सोंधें संस्थाना पासून खंडणी घेण्या साठीं त्यास रवाना केलें. त्यानें जाऊन सोंध्यास वेढा घालून तेथील देसायास जरब दिली, तेव्हां त्या देसायानें शरण येऊन आठ लक्ष रुपये

खंडणी देण्याचें कबूल केलें, व त्या पैकीं अडीच लक्ष रोख देऊन बाकी रकमेबद्दल मर्दनगड (फोंडा) किल्ला ओलीस दिला. या प्रमाणें ' स्व-राज्या ' पैकीं अत्युत्तम असा हा किल्ला पुनः मराठ्यांच्या हातीं आला. पेशव्यांची स्वारी सावनुरहून निघून तुंगभद्रेच्या दक्षिणतीरीं येऊन बिदनूर व इतर संस्थानां पासून खंडणी घेऊन परत पुण्यास गेली. दहा वर्षा पूर्वी स्वराज्याची सरहद्द कृष्णेवर होती ती आतां तुंगभद्रे पर्यंत जाऊन पोंचली.

इ० स० १७५७ त नानासाहेब व भाऊसाहेब पुनः साठ हजार फौजेसह कर्नाटकच्या स्वारीस निघाले. तिकडे गेल्यावर त्यांस मुरारराव घोरपडे सहा हजार फौजेनिशीं येऊन मिळाला. त्या वर्षाच्या मार्च महिन्यांत त्यांनीं म्हैसूरच्या राजधानीस ह्मणजे श्रीरंगपट्टणास शह दिला, व नंदराजाजवळ खंडणी बद्दल ते बेसुमार पैका मागूं लागले. नंदराज हा तेथील राजाचा प्रधान होता. राजा केवळ नामधारी मात्र असून सारी सत्ता याच्याच हातीं होती. नंदराजानें खंडणी माफ होण्याबद्दल किंवा निदान थोडी रक्कम घेण्याबद्दल पेशव्यांची फार विनवणी केली. परंतु त्यानीं तें कांहीं एक न ऐकतां श्रीरंगपट्टणास वेढा बसविला, आणि बातेऱ्या बांधून तीस तोफांचा मारा त्या शहरावर सुरू केला. नंदराजानें ही पुष्कळ दिवस हिमतीनें टक्कर दिली. परंतु त्याचा कांहीं उपाय चालेनासा होऊन तें शहर काबीज होण्याच्या बेतास आलें. इतक्यांत एके दिवशीं असें झालें कीं, त्या शहरांत श्रीरंगाचें देवालय प्रसिद्ध आहे, त्याच्या शिखरास बाहेरील तोफेचा गोळा लागून शिखर मोडलें, व त्याच वेळीं बाहेरच्या बातेऱ्यांत ही एक तोफ फुटून कित्येक गोलंदाज ठार झाले. तेव्हां उभय पक्षीं हा अपशकुन झाला असें समजण्यांत येऊन तहाचें बोलणें पुनः सुरु झालें. त्यांत बत्तीस लक्ष रुपये खंडणी घेऊन वेढा उठविण्याचें मराठ्यानीं कबूल केलें. नंदराजानें रोख काय ते पांच लक्ष रुपये दिले. बाकी रकमेच्या फेडी करितां त्यानें म्हैसूरच्या राज्या पैकीं उत्तम सुपीक

चौदा महाल मराठ्यांकडे लावून दिले. त्या महालांचीं नांवें—१ नागमं-गल, २ बेळूर, ३ किक्केरी, ४ चेनरायपट्टण, ५ कडूर, ६ बाणावर, ७ हरनहळ्ळी, ८ होनवळ्ळी, ९ तुरविकिरे, १० कंदिकिरें, ११ चिक ना-यकनहळ्ळी, १२ कडबा, १३ केळूर, १४ हुलियारदुर्ग. हीं नांवें येथें देण्याचें कारण, या पुढें या पुस्तकांत हीं पुनः पुनः यावयाचीं आहेत. असो, पेशव्यानीं या चौदा परगण्यांत वसुला करितां कमावीसदार नेमून व त्यांच्या रक्षणा करितां सहा हजार फौज ठेवून शिरें प्रांतावर स्वारी केली. शिरें, होसकोटें, बाळापूर, कोलार व बेंगरूळ हे परगणे एकमे-कांस लगत असून ते ‘ स्वराज्या ’ पैकीं होते; अर्थात् ते ताब्यांत घेणें श्रीमंतांस सर्वथा इष्ट होतें. दुसरें कारण आमच्या बुद्धीस असें वाटतें कीं, पेशव्यांचा प्रतिस्पर्धी बाबूजी नाईक याजकडून उत्तर कर्नाटकच्या चौथ सरदेशमुखीचा मक्ता पेशव्यानीं काढून घेतल्या नंतर त्यानें मोंगलाचा आश्रय मिळवून शिरें प्रांतीं तळ दिला होता. हें श्रीमंतांस अर्थातच न आवडल्यामुळें त्यानीं तो प्रांतच घेऊन त्याचा आसरा मोडून टाकावयाचें मनांत आणिलें असावें. श्रीमंतांनीं शिरें प्रांतीं जाऊन तिकडील कित्येक ठाणीं घेतलीं. मागें कर्नाटकचे पांच नबाब सांगितले आहेत त्यां पैकीं या शिऱ्यांच्या नबाबाचें राज्य अलीकडे कित्येक वर्षें अगदीं मोडकळीस आलें होतें, आणि त्याचा बहुतेक भाग कडप्याच्या नबाबानें बळकाविला होता. या घराण्यांतला शेवटचा नबाब दिलावरखान मरण पावल्यावर त्याचा जां-वई मीरफैजुल्लाखान तेथील गादीवर बसला होता. श्रीमंतांनीं सारें राज्य खालसा केलें, तेव्हां या मीरफैजुल्लास निर्वाहा करितां थोडीशी जहागीर लावून दिली व शिरें शहर त्याच्या हवालीं केलें. पण तेथील किल्ला मात्र आपल्या ताब्यांत ठेविला होता. त्या प्रांतींच्या स्वराज्या पैकीं बेंगरूळ म्है-सूरकरांनीं घेतलें होतें व बाकीचीं ठाणीं व परगणे कडप्याच्या नबाबाच्या ताब्यांत होते. तो नबाब अलीकडे मराठ्यांशीं उन्मत्तपणानें वागत होता.

हैदरअल्लीवर पहिली स्वांरी

इतर संस्थानिकां प्रमाणें त्यानें या स्वांरींत खंडणी दिली नव्हती. त्या नबाबाचें पारिपत्य करणें, अर्काटच्या नबाबा पासून खंडणी वसूल करणें, आणि तिकडील सर्व स्वराज्य ताब्यांत आणणें, हीं तीन कामें फार जरूरीचीं होतीं; परंतु पावसाळा समीप आल्यामुळें बरीच फौज कर्नाटकांत छावणीस ठेवून श्रीमंत परत आले. छावणीस ठेवलेल्या फौजेवर बळवंतराव मेहेंदळे हा मुख्य सरदार होता. पावसाळा सुरू झाल्यावर कडप्याच्या नबाबानें सावनूर व कर्नूळ येथील पठाण नबाब,- मुरारराव घोरपडे, व त्या देशींचे चित्रदुर्गकर वगैरे पाळेगार यांशीं राजकारण लावून त्यांस आपणाकडे मिळवून घेतलें. मद्रासकर इंग्रजांस ही त्यानें आपल्या कुमकेस बोलाविलें. या सर्वांचा बेत असा होता कीं, मराठ्यांची फौज बुडवून त्यांच्या खंडणीचें जूं मानेवरून झुगारून द्यावें. परंतु जेव्हां बळवंतरावाची व कडप्याच्या नबाबाची लढाई जुंपली तेव्हां त्याच्या सोबत्यां पैकीं कोणीच कुमकेस आलें नाहीं. बळवंतरावानें होंसकोटें, मुलबागल व कडपनाथ हीं ठाणीं भर पावसाळ्यांतच घेतलीं. शेवटीं त्या नबाबाचें व बळवंतरावाचें तारिख २४ सप्तंबर रोजीं कडपें शहराजवळ भयंकर युद्ध झालें. त्यांत बळवंतरावाचा जय होऊन कडप्याचा नबाब मारिला गेला व हजारों पठाणांची कत्तल उडाली. राजधानी कडपें शहर तत्काळ मराठ्यांच्या हातीं लागलें तें त्यानीं लुटून फस्त केलें. मराठ्यांच्या बाजूस या लढाईंत जे लोक ठार झाले त्यांत संभाजी घोरपडे देशिंगकर हा मिरज प्रांतींचा नामांकित शिलेदार होता. कडप्याचा नबाब मरण पावल्यावर त्याचा वारस अबदुलनबीखान ह्मणून होता, तो जरी हिमतीनें लढत होता, तरी त्याचें अर्धें राज्य मराठ्यानीं घेतलेंच. या पूर्वींच अर्काटच्या नबाबाजवळ बळवंतरावानें खंडणीची मागणी केली होती. त्या प्रसंगीं त्या नबाबानें पुष्कळ आढे वेढे घेतले, व त्याचे साथी मद्रासकर इंग्रज यांनीं ही खंडणी माफ होण्या विषयीं फार खटपट केली होती. परंतु तें सारें निष्फळ होऊन

हैदरअल्लीचें पूर्व चरित्र

शेवटीं अर्काटचा नबाब महमद अल्ली यास साडेचार लक्ष रुपये खंडणी द्यावी लागली. इतक्यांत म्हैसूरकरांशीं पुनः युद्ध करण्याचा मराठ्यांस प्रसंग आला. तो प्रकार असा—

नंदराजाच्या लोभांतला हैदरअल्ली ह्मणून एक सरदार म्हैसूरच्या दक्षिण सरहद्दीवर दिंदिगल येथें सुभेदार होता. त्यानें मेहंदळ्याचें व कडपेकरांचें युद्ध जुंपलें आहे, असें पाहून नंदराजास मसलत दिली कीं, 'तूं मराठ्यांस काय ह्मणून खंडणी दिलीस ? मला जर दिंदिगलाहून बोलावून आणितास, तर मी फौजेसह येऊन तुझी कुमक केली असती. मग पाहिलें असतें मराठे कशी काय खंडणी घेतात तें ! असो. झाली ती गोष्ट झाली. अजून तरी त्यांच्या ताब्यांत चौदा परगणे दिले आहेस ते हिसकून घे. पुण्याहून मराठ्यांची फौज पावसाळा संपेपर्यंत कांहीं इकडे येत नाहीं. मेहंदळे इकडे आहे तो कडपेकरांशीं लढण्यांत गुंतला आहे. या वेळीं हें कार्य साधण्या जोगें आहे.' नंदराजास ही मसलत पसंत पडली, आणि त्यानें तत्काळ त्या परगण्यांतून मराठ्यांस हुसकून लावून तेथें बळजबरीनें आपला अंमल बसविला.

मराठे लोकांचें सामर्थ्य किती प्रचंड आहे, हें रामेश्वरापासून हिमालयापर्यंत सर्व देशांतील लोकांस आतां चांगलेंच माहीत झालें होतें. त्यांत त्यांचा सैन्य-समुद्र म्हैसुरावर नुकताच लोटला होता. या वरून म्हैसूरच्या मुत्सद्यांस व शिपायांस तर तें अगदीं पक्केंच माहीत असलें पाहिजे होतें. असें असतां त्याशीं मुद्दाम कुरापत काढण्याचें अचाट धारिष्ट करणारा असा हा हैदरअल्ली होता तरी कोण ? असें काय याजमध्यें सामर्थ्य होतें, कीं ज्यानीं देशोदेशींच्या शेंकडों उत्तम फौजा रणांगणांत तुडवून धुळीस मिळविल्या, त्या मराठ्यांशीं इमानपूर्वक केलेले करार मोडले असतां आपला निभाव लागेल असें त्यास वाटलें ! अशी पृच्छा करणाऱ्यांस जबाब द्यावयाचा ह्मणजे त्यांस हैदरअल्लीचें आजपर्यंतचें चरित्रच

सांगितलें पाहिजे.

हैदरअल्लीचा पणजा महमद बेलोल नांवाचा एक फकीर पंजाबांतून फिरत फिरत दक्षिण देशीं येऊन गुलबर्गा जिल्ह्यांत अळंद येथें राहिला. त्यास दोन मुलगे महंमदअल्ली व महंमदवली नांवाचे होते. ते मोठे झाल्यावर पोट भरण्या साठीं बापास सोडून कर्नाटकांत शिरें येथें गेले. तेथील नबाबानें त्यांस जमाबंदीकडील वसूल करणाऱ्या शिपायांची नोकरी दिली. महंमदअल्लीस शिरें येथें फत्ते महंमद नांवाचा मुलगा झाला. हाच हैदरअल्लीचा बाप होय. शिरें सोडून ते दोघे भाऊ त्याच नबाबाच्या राज्यांत कोलार येथें गेले. तेथें महंमदअल्ली मरण पावला. त्या वेळीं त्याच्या भावानें पुतण्या फत्तेमहंमद व त्याची आई यांस घरांतून घालवून दिलें. त्यांची ती दुर्दशा पाहून तेथें कानडी प्याद्यांवरचा एक मुसलमान नाईक होता त्यास करुणा आली व त्यानें त्यांस आपल्या कुटुंबांत आश्रय दिला. फत्तेमहंमद वयांत आला तेव्हां त्याच नाइकानें त्यास आपल्या जमातींत शिपायाची चाकरी दिली. फत्तू शिपाई शूर होता व दैववान् ही होता. एके प्रसंगीं त्याचें शौर्य शिऱ्यांच्या नबाबाच्या नजरेस आल्यावरून त्यानें खुष होऊन त्यास वीस प्याद्यांची नाइकी दिली. तेथून तो वाढत वाढत शेवटीं पन्नास स्वार व चवदाशें प्यादे इतक्या सैन्याचा सरदार झाला! त्यानें एका कोंकणी मुसलमानाच्या मुलीशीं लग्न केलें, व तिजपासून त्यास शाहाबाज, व हैदर असे दोन मुलगे झाले. कोलार येथें इ० स० १७२२ त हैदर जन्मास आला. त्या पूर्वी तें शहर मराठ्यांच्या हातून नुकतेंच गेलें होतें. तें ठाणें त्यांच्या 'स्वराज्या' पैकीं होतें. शिवाय शिरें ही त्याच्या बापाच्या अन्नदात्याची राजधानी, ती ही मराठ्यांच्या स्वराज्या पैकींच होती, आणि त्याच्या आईचें माहेर महाराष्ट्रांत कोंकण प्रांतीं होतें. या वरून पुढें ज्यांचा तो दुर्निवार शत्रु ह्मणून ख्याति पावला, त्या मराठ्यांचें नांव अगदीं लहानपणीं सुद्धां त्याच्या कानावरून

हजारों वेळां गेलें असेल ! असो.

फत्ते महंमद एका लढाईत ठार पडला. त्या वेळीं त्याचे मुलगे शाहाबाज व हैदर हे अनुक्रमें ९ व ७ वर्षांचे होते. त्या वेळचा शिऱ्यांचा नबाब होता तो फार दुष्ट स्वभावाचा होता. त्यानें या दोन मुलांचे व त्यांच्या आईचे हाल हाल करून त्यांजवळ काय होतें नव्हतें तें वित्त बुचाडून घेऊन त्यांस हांकून लाविलें. तेव्हां ती अनाथ बाई आपल्या मुलांसह बेंगरूळ येथें गेली. तेथें तिचा भाऊ इब्राहिम साहेब ह्मणून होता तो तेथील किल्लेदाराचा नोकर होता. तेथें आपणास आश्रय मिळेल अशी त्या बाईस आशा होती. बेंगरूळचा किल्ला म्हैसूरच्या राजाच्या ताब्यांत होता. त्या राजाच्या दोन तीनशें किल्ल्यां पैकींच हा एक अम्मळ बरासा किल्ला होता. त्या किल्ल्यावरील किल्लेदाराच्या पांच पन्नास नोकरां प्रमाणेंच इब्राहिम साहेब हा ही एक साधारण नोकर होता. त्या इब्राहिमानें मिळविलेल्या भाकरी पैकीं चतकोर आपणास व आपल्या पोरांस खावयास मिळेल, या आशेनें ही बाई जंगलांतून वाटेचे खडतर कष्ट सोशीत आपल्या त्या दोन लहान मुलांस बरोबर घेऊन बेंगरूळाकडे चालली होती. दैवगति किती चमत्कारिक आहे ! त्या लकतऱ्या पांघरलेल्या दोन तीन पोरक्या पोरां पैकीं धाकटा पोर पुढें बेंगरूळ किल्ल्याचाच नव्हे, तर साऱ्या म्हैसूरच्या राज्याचा मालक होणार आहे, व आपल्या दराऱ्यानें परराष्ट्रांतील मोठमोठ्या मुत्सद्यांच्या व महाप्रतापी सेनापतींच्या मनास थरकांप उत्पन्न करणार आहे, हें त्या बिचारीच्या स्वप्नीं ही नव्हतें !

इब्राहिम साहेबानें आपल्या बहिणीचा व तिच्या मुलांचा उत्तम सांभाळ केला. त्याच्या हाताखालीं ही प्याद्यांची एक लहानशी टोळी होती. पण ह्याचा थोरला भाचा शहाबाज हा मोठा झाला तेव्हां आपल्या हाताखालीं त्यास नोकरीस घेणें हें इब्राहिम साहेबांस पसंत पडलें नाहीं. म्हैसूरच्या राजाच्या लष्करांत ह्याचा एक स्नेही चाकरीस होता त्याच्या

द्वारें त्यानें शहाबाज यास त्या लष्करांत चाकरी लावून दिली. ती ही चाकरी कानडी प्याद्यांच्या ' नाइका ' चीच होती. शहाबाज हा उत्तम शिपाई असल्यामुळें त्याचा उत्कर्ष अतित्वरेनें होऊन तो लवकरच दोनशें स्वांर व एक हजार प्यादे इतक्या सैन्याचा सरदार झाला. हैदर आपल्या भावा जवळच रहात असे. तो पराकाष्ठेचा उनाड व स्वच्छंदी असल्यामुळें त्याचें नशीब उदयास येण्याचें त्या वेळीं तरी कांहीं चिन्ह दिसलें नाहीं. म्हैसूरच्या गादीवर चिक् कृष्णराज नांवाचा राजा होता. तो पांच वर्षांचा असतांच गादीवर बसला होता. त्याच्या लहानपणा पासून देवराज व नंदराज या नांवाचे दोघे बंधु त्याचे प्रधान होते त्यांनीं सारें राज्य आटोपिलें होतें. तो राजा वयांत आला तरी त्याच्या हातीं राज्याची सत्ता देण्याचें त्यांच्या मनांत मुळींच नव्हतें. दिवसें दिवस त्यांची त्यावर अधिक अधिकच कदर बसत चालली होती. देवराज हा शहाणा व शूर होता. नंदराज ही शूर होता, पण गर्विष्ट व मूर्ख होता. देवराज जसजसा म्हातारा होत चालला तसें तसें राज्यकारभारांतून त्यानें अंग काढून घेतलें, आणि नंदराजावर राज्याचा सर्व भार टाकिला. या नंदराजानें एके समयीं देवनहळ्ळी नांवाच्या एका किल्ल्यास वेढा घातला होता. त्याच्या सैन्यांत शहाबाज आपल्या जमातीनिशीं हजर होता, व हैदर ही भावा बरोबर मौजेनें आला होता. तेथें सात महिने लढाई चालली होती. या लढाईत हैदरानें बहुत पराक्रम व कौशल्य प्रकट केल्यामुळें नंदराज त्यावर प्रसन्न झाला, व तो किल्ला हातीं येतांच त्यानें त्यास त्याच किल्ल्याच्या एका दरवाजावर सरनोबत नेमिलें; आणि पन्नास स्वांर व दोनशें पायदळाचा त्यास ' नाईक ' बनविलें. हैदराचा आजा, बाप, मामा व भाऊ हे सारे प्याद्यांचेच ' नाईक ' होते. तो ही प्रथम उदयास आला तो ' नाईक ' होऊनच ! पूर्वी पासून घोडेस्वांर पायदळाच्या शिपायांस तुच्छ मानीत आले आहेत. तेव्हां असल्या पायदळाच्या तुकडीवरचा नाईक जो

हैदरअल्लीचें पूर्व चरित्र

हैदरअल्ली तो त्या राज्यांतील सरदार व वडे लोक यांस किती तुच्छ भासत असावा! तो पुढें मोठा बलाढ्य राजा झाला तरी त्याचें 'हैदरनाईक' हें नांव लोकांच्या स्मरणांतून गेलेंच नाहीं!

इ० स० १७४० त रघोजी भोंसल्यानें कर्नाटकावर स्वारी केली होती, तेव्हां अर्काटचा नबाब सफदरअल्ली याच्या चिथावणीवरून त्यानें चंदासाहेबास कैद करून साताऱ्यास नेलें होतें, असें मागें सांगितलें आहे तें वाचकांस आठवत असेलच. चंदासाहेब सुटेल तर तो आपलें राज्य घेईल हा सफदरअल्लीस धाक होता. त्यामुळें तो वर्षाच्या वर्षास मराठ्यांची खंडणी आपण होऊन चुकती करून देत असे. मराठ्यांची मर्जी प्रसन्न न राखावी तर ते चंदासाहेबास सोडून देतील हीच त्याला मोठी काळजी होती. सफदरअल्ली कांहीं वर्षांनीं मरण पावला, व अनेक घालमेली होऊन शेवटीं अनवरुद्दिन त्याच्या गादीवर बसला. आतां सफदरअल्ली मेल्यामुळें अर्काटाकडून मराठ्यांस खंडणी येईनाशी झाली, आणि त्यामुळें चंदासाहेबास कैदेंत ठेवण्या पासून त्यांस कांहीं फायदा होईनासा झाला. फ्रेंच लोकांच्या मनांतून चंदासाहेबास बंधमुक्त करून अर्काटच्या गादीवर स्थापावें, व त्या पासून आपला फायदा करून घ्यावा, असें होतें. त्यानीं इ० स० १७४८ त मराठ्यांस खंड भरून चंदासाहेबास मुक्त केलें. नंतर तो चंदासाहेब कर्नाटकांत जाऊन अर्काटच्या गादीवर आपला वारसा सांगूं लागला. याच वर्षी निजामउल्मुलुख मरण पावला होता. त्याच्या मुलीचा मुलगा मुजफरजंग (हिदायत मोहिदीनखान) यानें जाहीर केलें कीं, निजामाच्या राज्याचा खरा वारस मी आहें. माझे मामा सहा असामी आहेत त्यां पैकीं कोणाचा ही राज्यावर हक्क नाहीं! हा मुजफरजंग व चंदासाहेब एकत्र झाले व फ्रेंचांची फौज कुमकेस घेऊन त्यांनीं अर्काटावर स्वारी केली, आणि अनवरुद्दिनाशीं लढाई करून त्यास मारून टाकून त्याचें राज्य घेतलें. अनवरुद्दिनाचा मुलगा महंमदअल्ली हा

त्रिचनापल्लीस पळून गेला. त्याच्या प्रतिपक्षाकडे फ्रेंच लोक मिळाले होते, ह्मणून मद्रासकर इंग्रज त्यास कुमक करण्यास प्रवृत्त झाले.

निजामाचा थोरला मुलगा नासीरजंग यास कर्नाटकांत मुझफरजंग, चंदासाहेब व फ्रेंच लोक यानीं केलेल्या दंग्याचें वर्तमान कळलें तेव्हां तो त्या तिघांस जरबेंत आणून त्यांचें पारिपत्य करण्याची तयारी करूं लागला. आणि लवकरच अवाढव्य सैन्य बरोबर घेऊन इ० स० १७५० त तो कर्नाटकच्या स्वारीस निघाला. त्या वेळीं मराठ्यां पैकीं जानोजी भोंसले व मुरारराव घोरपडे त्यास मिळाले होते, व सावनूर, कडपें व कर्नूळ येथील नबाब व म्हैसूरच्या राजाकडून व्यंकटराव बार्की नांवाचा एक सरदार असे सर्व आपआपल्या जमावानिशीं त्या लष्करांत हजर झाले होते. म्हैसूरच्या सैन्यांत हैदरनाईक आपल्या जमाती सुद्धां होताच. त्यानें तीनशें बेरड नुकतेच चाकरीस ठेविले होते. त्या बेरडांचें व या बेरडांच्या 'नाईका' चें चोऱ्या व लुटालूट करण्याचें काम त्या अफाट मोंगलाई लष्करांत कित्येक महिने पर्यंत जारीनें सुरू होतें. बेरडाची जात इमानी पण बिलंदर चोर ह्मणून प्रसिद्धच आहे. ते हत्यारें, पैका, वस्त्रें, घोडीं, गुरें वगैरे, लष्करांत किंवा लष्करा बाहेर, रात्री किंवा दिवसा, जें साधेल तें चोरून आणून त्यांतला वांटा हैदरनाइकास देत. दरोडे व वाटा मारणें हीं कामें ही ते करीत असतच, आणि त्यांतील प्राप्तीचा वांटा ही हैदरनाइकाकडे बिन तक्रार येत असे. तो ही आपल्या फौजेसह लहानसाहान गांवांवर नेहमी घाले घालून द्रव्य काढण्यांत मग्न असे. यामुळें हैदराजवळ लवकरच खूप पैका जमला, व आणखी नवी फौज चाकरीस ठेवण्याची त्यानें सुरवात केली.

नासीरजंग आपल्या सर्व सैन्यासह अर्काटावर चालून गेला होता तेव्हां चंदासाहेब व फ्रेंच लोक भयभीत होऊन फुलचेरीस पळून गेले. त्या प्रसंगीं मुजफरजंग निरुपायानें आपल्या मामास ह्मणजे नासीरजंगास

शरण आला. त्यानें त्यास आपल्या सैन्यांत कैद करून बंदोबस्तानें ठेविलें. नंतर सावनूर, कडपें व कर्नूळ येथील नबाबांशीं फ्रेंच लोकानीं फितूर खेळवून त्यांजकडून नासीरजंगास ठार मारविलें. तेव्हां त्या लष्कराची फुटाफूट होऊन जो तो सरदार आपापल्या ठिकाणास परत जाऊं लागला. नासीरजंगाचा खून होण्याच्या लगबगींत त्याच्या खजिन्यापर्यंत हैदराच्या बेरडानीं प्रवेश करून तेथून होनांनीं खचून लादलेले दोन उंट बघतां बघतां लांबविले! नासीरजंग मरण पावल्यावर त्याच्या फौजेंत फ्रेंच लोकांचें प्रस्थ वाढलें. त्या लोकांनीं मुजफरजंगास कैदेंतून मुक्त करून गादीवर बसविलें. पण तो ही कडप्याच्या नबाबाच्या हातें पुढें लवकरच मारला गेल्या मुळें फ्रेंच लोकांनीं नासीरजंगाचा भाऊ सलाबतजंग याची गादीवर स्थापना केली. असो. या पूर्वींच व्यंकटराव बार्की म्हैसुरास परत आला होता. या प्रमाणें १७५१ त या स्वारीचा शेवट झाला. या स्वारींत तीनशें घोडे व पांचशें बंदुका बेरडानीं हैदरास आणून दिल्या होत्या. बारगीर नोकरीस ठेवून त्यानें लवकरच त्या तीनशें घोड्यांची पागा तयार केली, आणि पायदळास कवाईत शिकविण्या साठीं फ्रेंचांच्या पलटणींतून लोक आणवून पांचशें शिपायांचें पलटण तयार केलें, व त्याच्या हातीं त्या लुटींत मिळालेल्या बंदुका दिल्या. त्या पलटणाची नंदराजास जेव्हां हैदरानें कवाईत करून दाखविली तेव्हां तो त्यावर फार खुष झाला. म्हैसूरचे राज्यांत हें पायदळाचें पहिलेंच पलटण तयार झालें असल्यामुळें त्याच्या अजब कर्तबगारीविषयीं लोकांत नाना प्रकारच्या बातम्या पसरल्या होत्या.

वर सांगितलेली हैदराची अर्काट प्रांतीं पहिली मुलुखगिरी झाल्यावर पुनः लवकरच त्यास खुद्द नंदराजा बरोबर त्याच प्रांतीं जाण्याचा प्रसंग आला. तो प्रकार असाः— चंदासाहेबास फ्रेंचानीं आश्रय दिला होता, ह्मणून त्यांचे प्रतिस्पर्धी इंग्रज लोक यानीं चंदासाहेबाचा प्रतिस्पर्धी

महंमदअल्ली यास आश्रय दिला होता. त्या महंमदअल्लीनें व इंग्रजांनीं फ्रेंचाशीं युद्ध सुरू केलें व मुराररराव घोरपडे व म्हैसूरकर व तंजावरकर यांस आपल्या कुमकेस बोलाविलें. तेव्हां नंदराज समागमें बरेंच सैन्य घेऊन तिकडे गेला. त्याज बरोबर हैदरनाईक आपल्या सैन्यासह होता. या स्वांरींत अनेक मसलती व पुष्कळ लहान मोठ्या लढाया झाल्या त्यांचा येथें उल्लेख करण्याचें कारण नाहीं. सांगावयाचें इतकेंच कीं, या व पूर्वीच्या स्वांरींत इंग्रजांचें व फ्रेंचांचें युद्ध कौशल्य, सैन्यरचना व त्यांचा कावा व एकमेका विषयींचा द्वेष या सर्व गोष्टींची हैदरास उत्तम प्रकारें माहिती झाली व तिचा त्यानें पुढें पुष्कळ उपयोग करून घेतला. मुरारराव घोरपड्याची फौज या दोन्ही स्वांऱ्यांत हजर होतीच, तिची कर्तबगारी ही त्याच्या नजरेस आल्या शिवाय राहिली नसेल. मुराररावानें ही आपल्या या भावी दुस्मानाची ओळख याच वेळा पासून धरिली असावी. या स्वांरींत हैदरा बरोबर पूर्वी पेक्षां अधिक बेरड होते, व त्या लोकांच्या नव्या नव्या टोळ्या तो चाकरीस ठेवीत होताच. शिवाय पुष्कळ पेंढारी ही त्यास येऊन मिळाले होते. यामुळें या खेपेस चोऱ्या व लुटालूट करून हैदरानें मनस्वी पैका जमा केला. एखाद्या मोठ्या सरदाराच्या लष्करा प्रमाणें या ' नाइका ' च्या स्वांरीचा थाट बनून राहिला. पंधराशें स्वांर, तीन हजार गारदी ह्मणजे कवाईत शिकलेले पायदळाचे शिपाई, दोन हजार प्यादे, व चार तोफा, इतकें सैन्य त्यानें आतां बाळगिलें होतें. डेरे, राहुट्या, हत्ती, उंटें, व निरनिराळे कारखाने वगैरे सर्व थाटमाट बाळगण्याची त्यास आतां ऐपत आली होती. त्याचा दिवाण खंडेराव ह्मणून एक मराठा ब्राह्मण पूर्वीं पासून त्याजवळ होता. तो मोठा चलाख, दक्ष व धीट मनुष्य होता. हैदरनाईक इतक्या वैभवास चढण्यास खंडेरावाचे प्रयत्न बऱ्याच अंशीं कारणीभूत झाले होते.

हैदरनाइकावर नंदराजाजी बहालमर्जी झाली होती. राज्यांत कर्ता,

हिमती, व कारस्थानी मनुष्य हाच एवढा एक आहे असें त्यास वाटे. व विश्वासाच्या व धोक्याच्या जाग्यांवर या शिवाय दुसरा कोणीच मनुष्य नेमण्यास लायख नाहीं असें त्याच्या मनानें घेतलें होतें. हैदराचें कल्याण करण्याची संधी आली असतां नंदराजानें ती फुकट जाऊंच दिली नाहीं. वर सांगितलेल्या स्वारीहून परत आल्यावर त्यानें त्यास दिंदिगल येथें सुभेदार नेमिलें. दिंदिगल प्रांत डोंगराळ असून तेथील पाळेगार पुंडावा करीत असत, व ते नंदराजास जुमानीत नसत. या सुभेदारीवर नेमणूक झाल्या बरोबर त्याणें तिकडे कूच केलें. प्रथम त्यानें त्या पाळेगारांशीं तडजोडीचें बोलणें लावून त्यांस अभयाचें आश्वासन दिलें. परंतु सुरक्षितपणें सर्व सैन्यासह दिंदिगलास तो जाऊन पोंचतांच त्याचें खरें उग्र स्वरूप त्यांच्या दृष्टीस पडलें! पाळेगारांचीं गांवें लुटावीं, जाळावीं, त्यांचे रयत लोक व गुरें ढोरें धरून आणावीं, त्यांजवर रात्रंदिवस छापे घालून कत्तल करावी, अशा उपायानीं थोडक्याच वेळांत त्यानें त्यांस अगदीं दीन करून सोडिलें. आपला दिवाण खंडेराव यास त्यानें श्रीरंगपट्टणास दरबारीं आपला वकील ह्मणून ठेविलें होतें. तो खंडेराव हैदराच्या पराक्रमा विषयीं व इमाना विषयीं नंदराजाजवळ खूप गप्पा मारी. इकडून दिंदिगलाहून हैदरनाईक पाळेगारांशीं झालेल्या संग्रामांचीं लांबलचक काल्पनिक वर्णनें लिहून पाठवी. त्यांत आपल्या सैन्याची खराबी, पैक्याची हलाखी, नंदराजाच्या पायांवर पूर्ण निष्ठा, हेच विषय असत. मीं होतों ह्मणूनच इकडील बंदोबस्त यथास्थित झाला, दुसऱ्याच्यानें इतकी करामत झाली नसती, हेंच कायतें या साऱ्या 'रिपार्टांचें' प्रमेय होतें, आणि तें हैदराच्या हेतू प्रमाणें मूर्ख नंदराजाच्या मनावर पूर्ण ठसून गेलें! नाईक ह्मणेल तें खरें, असें होऊं लागलें. जखमी झालेल्या लोकांच्या लांबच लांब यादी हैदरानें नंदराजाकडे लिहून पाठविल्या, आणि दर जखमी माणसास दरमहा चौदा रुपये प्रमाणें जखमपट्टीची आकारणी केली. राजधानीहून

तपासणी साठीं सरकारी अंमलदार आले तेव्हां त्यांची मूठ दाबून त्यानें धडधाकट परंतु पायांस हळदीचीं फडकीं गुंडाळून लंगडणाऱ्या शेंकडों ढोंगी जखमी लोकांची त्यां समोर 'परेड' करून जखमपट्टीची सर्व रकम घेतली! नवी फौज चाकरीस ठेवल्याचें सरकारांत लिहून गणतीच्या वेळीं वास्तविक दहा हजार लोकांची अठरा हजार गणती करवून त्यानें तितक्या साऱ्या फौजेच्या वेतनाचा पैसा सरकारांतून घेतला. अशीं एक ना दोन, नंदराजा पासून पैसा उपटण्याचीं त्यानें शेंकडों बस्तानें जुळविलीं होतीं!

या प्रमाणें द्रव्यसंग्रह करून आपली फौज वाढवावी व ती मध्यें उत्तम सुधारणा करावी, हा त्याचा मनोदय होता तो ही क्रमा क्रमानें सिद्धीस जात होता. या सुमारास त्यानें फुलचेरीहून फ्रेंच कारागीर आणवून दिंदिगल येथें तोफा ओतण्याचा व दारू तयार करण्याचा कारखाना घातला; व पलटणांत फ्रेंच सरदार ठेवून त्यांच्या कवाइतीची जय्यत तयारी करविली. या योगानें तो म्हैसूरच्या राज्यांत याच वेळीं बलाढ्य मनुष्य होऊन बसला होता.

येथपर्यंत हैदराची पूर्वपीठिका वर्णन केली आहे, तिजवरून तो कशा प्रकारचा मनष्य होता याची कल्पना वाचकांस होईल. अशा मनुष्यानें मराठ्यांच्या दराऱ्यास न जुमानतां १७५७ च्या पावसाळ्यांत म्हैसूरच्या राज्या पैकीं त्यांच्या ताब्यांत गेलेले परगणे हिसकावून घेण्यास नंदराजास प्रवृत्त केलें यांत आश्चर्य नाहीं! असो. त्याच्या या साहसाचे परिणाम काय झाले व त्यांच्या योगानें आपली महत्वाकांक्षा पूर्ण करून घेण्याचे प्रसंग त्यास कसकसे येत गेले या विषयीं आतां लिहूं:—

म्हैसूरकरांच्या आगळिकी बद्दल त्यांचें पारिपत्य करण्यास बळवंतराव मेहेंदळ्यास फुरसत सांपडली नाहीं. कारण, पावसाळा संपे तों कडपेंकरांशीं झुजण्यांत व त्यांचें अर्धें राज्य ताब्यांत घेण्यांत त्याचा तो काळ निघून गेला. या सुमारास बिदनूर संस्थानांत झोटिंगबादशाही सुरू झाली

होती. तें संस्थान पादाक्रांत करण्याचा नानासाहेब पेशव्यांचा फार दिव-सांचा मनोदय होता, तो सिद्धीस नेण्या करितां त्यांजकडून बळवंतरावास हुकूम आला होता तो ही अमलांत आणणें त्याजकडून झालें नाहीं. या वेळीं पेशव्यानीं महाराष्ट्रांत दोन फौजा तयार केल्या होत्या. एक दहा हजार लोकांची फौज विश्वासराव (पेशव्यांचे ज्येष्ठ पुत्र) व दत्ताजी शिंदे यांच्या हाताखालीं गोदावरीच्या तीरीं मोहिमेवर गुंतली होती. दुसरी तितकीच फौज गोपाळराव पटवर्धनांच्या हाताखालीं तयार होती. या दोहों-पैकीं एक फौज कर्नाटकांत जाऊन बळवंतरावास मिळावी व नंतर त्यानें पावसाळा संपल्यावर म्हैसुरावर स्वारी करून नंदराजाचें पारिपत्य करावें, असा श्रीमंतानीं संकेत ठरविला होता. परंतु मोंगलाईंत याच सुमारास कांहीं राजकारण उपस्थित झाल्यामुळें चोहींकडून सैन्य जमा करून त्यांस चालेघांटाकडे कूच करणें जरूर पडलें त्यामुळें नवी फौज कर्नाटकांत न येतां उलट बळवंतरावासच सर्व सैन्यासह ताबडतोब परत निघून येण्या विषयीं श्रीमंतांचीं पत्रें गेलीं व त्या प्रमाणें तिकडले सर्व मनसबे तसेच ठेवून तो परत आला. या वेळीं जर म्हैसुरावर स्वारी होती व बिदनूरची मसलत साधली असती, तर हैदराचा अभ्युदय होण्याचा मुळींच संभव नव्हता. परंतु त्याचें दैव बलवत्तर असल्यामुळें तसा योग जुळून आला नाहीं.

म्हैसूरचा राजा चिक् कृष्णराज यास देवराज व नंदराज या बंधूनीं कैदेंत ठेवून राज्याचा बंदोबस्त सारा आपल्याच ताब्यांत ठेविला होता हें मागें सांगितलेंच आहे. हा त्यांचा शिरजोरपणा राजा वयांत आला तेव्हां त्यास सहन होईनासा झाला आणि त्यानें व त्याच्या आईनें त्या दो-घांस ही अधिकारभ्रष्ट करण्याची कांहीं मसलत केली. ती कुणकुण नं-दराजास कळतांच त्यानें राजवाड्यांत जाऊन राजाच्या विश्वासांतले व या मसलतींत ज्यांचें अंग होतें, असे सर्व लोक पकडून राजासमक्ष त्यांचे

हालहाल करून त्यांस ठार मारिलें, आणि खुद्द राजाची निर्भर्त्सना व अपमान करण्याची त्यानें पराकाष्ठा केली. धाकट्या भावाची ही क्रूरता देवराजास बिलकुल पसंत पडली नाहीं. त्यामुळें दोघां बंधूंत कडाक्याचें भांडण होऊन देवराज श्रीरंगपट्टणांतून निघून गेला. भावाभावां मध्यें अशी फुटाफूट झाल्या बरोबर राज्यांत चोहोंकडे अस्वस्थता उत्पन्न झाली. फौजेंतील लोकांचे पगार तुंबले होते, त्यांनीं नंदराजाचे दारीं धरणें धरिलें, व अन्न सामुग्री व पाणी त्याच्या वाड्यांत जावयाचें बंद करून चार आठ दिवसांतच त्यास नको जीवसें करून टाकिलें. नंदराजावर राजा संतापलेला व त्यानें केलेल्या अपमानाबद्दल दुःखी झालेला, देवराज तर कारभाराविषयीं अत्यंत उदासीन, नंदराज ही फौजेच्या देण्याच्या पेंचांत सांपडल्या मुळें दगदगलेला, अशी एकंदर स्थिति झाली होती. त्या तिघांस ही सांप्रतच्या अडचणींतून मुक्त करून संतुष्ट करण्याची हैदरनाइकानें मोठ्या अक्कलेनें व्यवस्था केली. त्यानें पुढारीपण घेऊन फौजेच्या देण्याची तडजोड काढिली व नंदराजाच्या दारांतलें धरणें उठविलें. दुसरी एक मोठी गोष्ट त्यानें अशी केली कीं, देवराज व नंदराज यांची समजूत पाडून त्या दोघांचें पुनः ऐक्य करून दिलें. त्या नंतर देवराज लवकरच मरण पावला हें जरी खरें आहे, तरी ज्येष्ठ बंधूशीं सख्य करून दिल्या बद्दल नंदराजावर हैदराचे उपकार हे झालेच. तिसरी व सर्वांत फार महत्वाची गोष्ट त्यानें अशी घडवून आणिली कीं, क्रुद्ध व दुःखी झालेल्या राजाची माफी मागावयास नंदराजास प्रवृत्त करून राजाची त्यानें आपल्यावर बहाल मर्जी करून घेतली. एकंदरींत ज्याच्या त्याच्या तोंडीं हैदरनाइकाची तारीफ होऊं लागली. राजा जरी नंदराजाच्या जाचांतून अद्यापि सुटला नव्हता, तरी त्यास वाटे कीं, एका हैदरनाइकामुळेंच सांप्रत आपली गादी बचावली आहे. तो जर आज येथें नसता तर नंदराज कांहीं आपणास शरण येता ना. उलट आपणास पदच्युत करून व कदाचित् आपला

चालू वर्षाची.

रा. रा. शामराव रामराव उर्फ दादासाहेब चंदुरकर. मिरज.	२८१०
रा. सा. मामलेदार. तालुका मिरज. (कवठें पिरान व मालगांव येथील लायब्ररयांकरितां २ प्रती.) ,,	५६४
श्री. रा. बळवंतराव माणकेश्वर कुलेकर. ,,	२८१०
रा. रा. पांडूरंग सखाराम मुसरीफ. बी. ए. ,,	२८१०
मे० सय्यद शमसुद्दीन शहाअलम बोखारी. इनामदार. कनवाडकर. मिरज.	२८१०
रा. रा. विठ्ठलराव महिपत सुपनेकर. कऱ्हाड.	३
,, ,, केशव हैबतराव धायगुडे. पंढरपुर.	३
,, ,, गणेश बचाजी सप्रे. भडोच.	३
,, ,, रामकृष्ण बापूजी कुळकर्णी. मु० शेंदुरजन.	३
,, ,, सखाराम गणेश प्रभु. फ. अ. मा. शाळा वेंगुर्लें.	२
,, ,, गोविंद गोपाळ टिपणीस. महाड.	२८८
,, ,, सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. डहाणू.	३
,, ,, सेक्रेटरी. ने. ज लायब्ररी. मंगळवेढें.	३
,, ,, हवालदार रामय्या. थर्ड बांबे लाइट इन्फंट्री. मलाकंड फिल्ड फोर्स्.	३
रा.रा. पुरुषोत्तम नारायण दातार. झांशी.	३
श्री. रा. बळवंतराव गोविंद उर्फ बाबासाहेब भुसकुटे. बऱ्हाणपुर.	३
रा. रा. सेक्रेटरी. वाचनवाटिका. जमखिंडी.	२
,, ,, दत्तात्रय रघुनाथ अभ्यंकर. रावेर.	३
,, ,, आत्माराम रामकृष्ण देशपांडे. स्कूलमास्तर. अक्कलखोप.	३
,, ,, म्यानेजर. पाटणकर संगीत नाटकमंडळी. नागपुर.	३
रा. सा. विश्वेश्वर व्यंकटेश कल्याणपुरकर. सबजज्ज. सौंदत्ती.	३
रा. रा. गोपाळ बळवंत वैद्य. फौजदार. कुंदगोळ.	३
रा. रा. नागेश सखाराम साठे. हसबनीस. ,,	३
रा. रा. नारायण रामचंद्र पाळंदे. फडणीस. ,,	३
श्री. रा. बाबासाहेब बिवलकर. मुंबई.	३
डा० मोरेश्वर गोपाळ देशमुख. एम्. डी. ,,	३
रा. सा. विष्णु वासुदेव फडके. बी. ए. सबजज्ज. बागलकोट.	३
रा. रा. सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. कोल्हापुर.	३
,, ,, गोविंद महादेव खरे. ,,	२
,, ,, सदाशिव शिवराम बापट. स्कूलमास्तर. गुहागर.	३

रा.रा. भास्करराव रामचंद्र यादवाडकर. मु० आसंगी. ३
" " सेक्रेटरी. नेटिव लायब्ररी. लोणावळें. ३
" " मुकुंदराव नारायण पाटोळे. पुलाचीवाडी तर्फ भांबुर्डें. ३
" " नारायण महादेव समर्थ. बी. ए. एल्. एल्. बी. मुंबई. ३
रा.रा. वामन नारायण कुळकर्णी. मु० भांबुर्डें. ३
रा.सा. विठ्ठल नारायण पाठक एम्. ए. पुणें. ३
रा. रा. गणपतराव दिनकर उकिडवे. " ३
रा. रा. वामन विष्णु लेले. वकील. " ३
रा. रा. शंकरराव श्रीपत उर्फ बापूसाहेब देशपांडे. " ३
" " गोपाळ बाळकृष्ण ऋषि. " ३
रा सा. रामचंद्र परशुराम गोडबोले. " ३
रा. रा. नारायण विष्णु बर्वे. सुपरवायझर, मुठाक्यानाल. ३
रा. ब. हरि विनायक साठे. असि० सुपरिंटेंडंट. कोंकण सर्वेक्यांप. " ३
रा. रा. शंकर विठोबा शेट मुळवे. " ३

ऐ०ले०संग्रह–कर्ते.

आमचे पुणें व मुंबई येथील एजंट.

रा.रा. मुरलीधर मल्हार अत्रे, महाराष्ट्र बुकडेपोचे म्यानेजर, बुधवार पेठ पुणें. रा.रा. विष्णु दासो बनहट्टी. कमिशन एजन्ट आणि जनरल मर्चंट. गिरगांव ट्रामवे टरमिनस्. पेंडसे यांची नवी चाळ, मुंबई.

सदरहू दोन असामींस आह्मीं ऐ०ले०संग्रहाचे एजंट नेमिलें आहे. त्यांजकडे तेथील वर्गणीदारानीं वर्गणी द्यावी. आमचीं सर्व पुस्तकें एजंटां कडे विकत मिळतील.

ऐतिहासिक–लेख–संग्रह.

हें डेमी अष्टपत्री सांचाच्या चाळीस पृष्ठांचें मासिक पुस्तक दर महिन्यास मिरज येथें नियमानें प्रसिद्ध होत असतें. यांत पटवर्धन जहागीरदारांच्या जुन्या चिटणिशी दप्तरांतील ऐतिहासिक महत्वाचीं व प्रत्येक स्वारीतील भरपूर माहितीचीं पत्रें सालवारीच्या क्रमानें छापून प्रसिद्ध होत असतात. शिवाय अन्यत्र उपलब्ध झालेले कागदपत्र व बखरी वगैरेचा ही यांत समावेश होत असतो. या मासिक पुस्तकाची आगाऊ किंमत सालिना ट० हा० सुद्धां तीन रुपये आहे. ग्राहकांनीं सालिना वर्गणीच्या किंमतीचें व्हा० पे० मागवावें अथवा तितक्या रकमेची मनीआर्डर पाठवावी. त्या शिवाय पुस्तक सुरू केलें जाणार नाहीं.

ऐ०ले०संग्रह कर्ते.

ऐतिहासिक-लेख-संग्रह.

मासिक पुस्तक.

नोवेंबर. १८९८ इ०.

अंक १८

वासुदेव वामन शास्त्री खरे

मिरज हायस्कुलांतील संस्कृत शिक्षक.

यांनीं

कुरुंदवाड येथें

" भाऊनाना " छापखान्यांत छापविलें.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हांशीलसह तीन रुपये.

फुटकळ अंकास पांच आणे.

वर्गणीदारांस विनंती.

१ ज्यांकडे चालू सालची व मागील बाकी राहिली आहे त्यांनीं ती आतां त्वरित पाठवावी व्ही पी. नें अंक पाठविण्याविषयीं आम्हीं नेहमीं अनुत्सुक असतों. तथापि कांहीं वाट पाहून वर्गणी न येईल तर अंक व्ही. पी.नें पाठवून वसूल करून घ्यावा लागेल. मुंबईंतील वर्गणीदारानीं इकडे विशेष लक्ष द्यावें. तेथें आमचे एजंट आहेत त्यांजकडे वर्गणी भरण्याची त्यांस सोय आहे. वर्गणीच्या तगाद्याबद्दल पत्रव्यवहार करण्याच्या यातायातींत आश्रयदात्यानीं आह्मांस इतःपर पाडूं नये.

२ दर महिन्याचें टपाल आह्मीं स्वतः पाहून रवाना करितों. अंक न पोंचल्याबद्दल चूक आह्मांकडून होत नाहीं. तथापि कोणास अंक न पोंचला असल्यास त्या महिन्याच्या १५ तारखेच्या आंत कळवावें ह्मणजे पाठवूं. त्या उपर कळविल्यास फुटकळ अंकाची किंमत द्यावी लागेल.

ऐ. ल. संग्रह कर्ते.

आमचे पुणें व मुंबई येथील एजंट.

रा.रा. मुरलीधर मल्हार अत्रे, महाराष्ट्र बुकडेपोचे म्यानेजर, बुधवार पेठ पुणें. रा.रा. विष्णु दासो बनहट्टी. कमिशन एजन्ट आणि जनरल मर्चंट. गिरगांव ट्रामवे टरमिनस्. पेंडसे यांची नवी चाळ, मुंबई

सदरहू दोन असामींस आह्मीं ऐ०ले०संग्रहाचे एजंट नेमिलें आहे. त्यांजकडे तेथील वर्गणीदारानीं वर्गणी द्यावी. आमचीं सर्व पुस्तकें एजंटांकडे विकत मिळतील.

जीव देखील घेऊन तो दुसऱ्याच कोणाला तरी गादीवर बसविता. नंदराजास वाटे कीं, हैदरनाइकानें आपणास फौजेच्या जाचांतून सोडविलें. नाहीं तर आपण खचित मारिले गेलों असतों ! निदान अन्नास व सर्वस्वास तरी मुकलों असतों. फौजेची तर खात्रीच झाली कीं, राज्याचा कारभार हैदरनाइकाकडे असेल तरच आपला पगार मिळेल व चलती राहील. नाहीं तर आपल्यास उपाशीं मरण्याची पाळी येईल ! या प्रमाणें त्याची सर्वतोपरी नुसती वाहवाच होऊन राहिली असें नाहीं. राज्याची उत्तम कामगिरी बजाविल्यामुळें राजा व नंदराज प्रसन्न झाले व त्यानीं दिंदिगलची सुभेदारी त्याजकडेच कायम करून, शिवाय कोइमत्तूर प्रांत ही त्याजकडे वहिवाटीस दिला, आणि कुटुंबास राहण्या करितां ह्मणून बेंगळूरचा किल्ला त्याच्या हवालीं केला.

लवकरच आपणावर मराठ्यांची स्वारी होईल, व ते पूर्वीं आपल्या ताब्यांत होते तितके परगणे परत घेतल्या शिवाय कधीं स्वस्थ बसावयाचे नाहींत, हें म्हैसूरकरांस वाटलेंच होतें, व त्या प्रमाणेंच पुढें घडून आलें. मोंगलाच्या मसलतीसंबंधें एक वर्ष भर नानासाहेब पेशव्यांस प्रचंड सेना महाराष्ट्राच्या पूर्व सीमेवर तयार ठेवावी लागली होती. तें वर्ष संपतांच ह्मणजे १७५९ च्या प्रारंभीं त्यानीं म्हैसूरच्या स्वारी करितां कांहीं सैन्य रवाना केलें. त्या सैन्यांत गोपाळराव पटवर्धन मुख्य व आनंदराव रास्ते दुय्यम सरदार होता. ही फौज येतांच तिनें आधीं चवदा परगण्यांत पुनः अंमल बसविला. नंतर ती आग्नेयीस सावंतिदुर्ग उजवें टाकून बेंगरुळावर चालून गेली. जातांच त्या शहरास तिनें वेढा घातला. याच फौजे पैकीं पायदळाची एक निवडक टोळी कोणास न कळत दाट जंगलांतून पश्चिमेकडे येऊन तिनें चेनापट्टणचा किल्ला अकस्मात् हल्ला करून घेतला. हा किल्ला श्रीरंगपट्टणच्या पूर्वेस चाळीस मैलांवर आहे.

या परचक्राचें निवारण करण्यास समर्थ असा सरदार म्हैसूरच्या

राज्यांत त्या वेळीं हैदरनाईक मात्र होता. नंदराजानें इतर सरदारांस विचारून पाहिलें, परंतु या मसलतीचें जोखीम शिरावर घेऊन ती पार पाडण्याची धमक कोणांत ही दिसेना. तेव्हां कसें तरी करून मराठ्यांच्या स्वारीच्या अरिष्टांतून राज्याचा बचाव करण्याविषयींचा नंदराजानें सर्व भार हैदरावर सोंपविला. मराठ्यांशीं कलागत काढण्यास त्यानेंच नंदराजास चिथावून दिलें होतें, त्या अर्थीं आतां लढाईच्या वेळीं ही प्रमुखपणा त्यानें स्वीकारावयास पाहिजेच होता; व तसा त्यानें हौसेनें पतकरिला. सर्व सैन्यावरील मुख्य अधिकाऱ्यास म्हैसूरच्या राज्यांत 'दळवाई' अशी पदवी असे. हा अधिकार नंदराजाचा होता, तो त्यानें 'तूर्त' ह्मणून हैदराच्या हवालीं केला. या 'नाइका' च्या हाताखालीं आपणास चाकरी करावी लागणार, व तेणेंकरून आपली मानहानि होणार, असें पाहून त्या राज्यांतील कित्येक प्राचीन व मानी घराण्यांतले सरदार चाकरी सोडून घरीं बसले.

युद्ध सुरू करण्या पूर्वीं श्रीरंगपट्टणच्या पूर्वेस मादूर व मालवल्ली हे दोन किल्ले आहेत, त्यांचा प्रथम हैदरानें उत्तम बंदोबस्त केला. हे दोन्ही किल्ले बेंगरूळ व श्रीरंगपट्टण यांच्या वाटेवर आहेत. मादूर पासून चेनापट्टण फक्त तेरा मैल अंतरावर आहे. मादूरच्या किल्ल्यांत लतीफअल्ली बेग ह्मणून एक शूर सरदार हैदरानें ठेविला होता. त्या लतीफानें चेनापट्टणचा किल्ला मराठ्यांपासून घेण्याची मसलत योजिली. शत्रूस नाना प्रकारच्या हुलकावण्या दाखवून एके रात्रीं हळूच चेनापट्टणास फौज नेऊन उजाडतां उजाडतां शिड्या लावून तो किल्ला त्यानें घेतला! चेनापट्टण काबीज होतांच हैदरानें आपलें सारें सैन्य तेथें गोळा केलें. शत्रूचे मुलखांत मोहीम करण्याची मराठ्यांची अशी तऱ्हा होती कीं, त्यांच्या सैन्याच्या लहान लहान टोळ्या साऱ्या प्रांतभर पसरत व लुटालूट आणि जाळपोळ एकदांच चोहींकडे सुरू करून रहिवासी लोकांस व शत्रूच्या फौजेस

अगदीं भेदरून सोडीत. त्यांची लढण्याची शिस्त अशा तऱ्हेची होती कीं, तिच्या योगानें कसले ही पराक्रमी व बलाढ्य शत्रु मैदानांत त्यांच्या तावडींत एकदां सांपडले ह्मणजे बहुधा सुरक्षितपणें सुटत नसत ! पण त्यांस ही हैदरनाईक हा पक्का वस्ताद शत्रु भेटला ! पुढें त्यांशीं जे त्याचे अनेक युद्धप्रसंग झाले, त्यांत त्यानें दाखविलेल्या कावेबाजपणाचा मासला या पहिल्याच प्रसंगीं गोपाळरावाच्या दृष्टीस पडला, आणि त्यावरून त्याची तत्काळ खात्री झाली कीं, हा साधारण शत्रू नव्हे ! याशीं लढतांना जर यत्किंचित बेफामपणा केला किंवा घमेंड धरिली तर तो आपणास खचित चीत केल्या शिवाय राहणार नाहीं ! जेथें घोडेस्वारांचा कांहीं इलाज चालावयाचा नाहीं, अशी अडचणीची जागा पाहून हैदरनाईक तेथें आपल्या सैन्याचा तळ घाली, व त्या स्थळा भोंवती खंदक खणून जागोंजागीं बातेऱ्या बांधून त्यांवर जय्यत तोफखाना तयार ठेवी. नुसत्या घोडेस्वारांच्या फौजेचा त्याच्या असल्या या छावणीवर काय एलगार चालणार ! या कामास पायदळ व मुबलक तोफखाना पाहिजे तो मराठे प्रत्येक स्वारींत बरोबर बाळगीत नसत. कारण, त्यांच्या नेहमीच्या ‘ गनीमी काव्या ’ स पायदळ व तोफा यांचा कांहीं उपयोग होत नसे. आपण मैदानांत आलों तर हजारों मराठे स्वार आपणावर तुटून पडतील व नाश करितील, हें हैदरास पक्कें माहीत होतें. त्यामुळें दिवसा तो आपली फौज घेऊन मैदानांत मुळींच येत नसे. केव्हां केव्हां मात्र कवायती पायदळाच्या टोळ्या घेऊन आड रानांतून हिंडण्याची त्यानें वहिवाट ठेविली होती. अशा वेळीं शत्रूची एखादी टोळी त्याच्या आटोक्यांत आली तर अकस्मात् जंगला बाहेर पडून तिचा फडशा पाडून तो पुनः जंगलांत गुप्त होई ! बातमी ठेवण्याच्या कामांत त्याचा हातखंडा असे, आणि त्या देशच्या वाटा व जागा त्यास सर्व माहीत असल्यामुळें तो मायावी राक्षसाप्रमाणें भलत्याच ठिकाणीं अचानक प्रकट होई, व शत्रूची नासाडी करून वेगानें नाहींसा

होई! त्याची रात्रीचे छापे घालण्याची शिताफी फारच वर्णनीय होती. शत्रूस कांहीं एक सुगावा लागूं न देतां तो आपल्या छावणींतून बाहेर पडे, व दहा दहा पंधरा पंधरा हजार कवायती पायदळ व तोफा सुद्धां बरोबर घेऊन बारा बारा कोसांची मजल करून पहांटेच्या सुमारास पहारे बेफाम असतात, त्या वेळीं मराठ्यांच्या छावणीवर तो येऊन पडे! अशा वेळीं ते सावध असले तर बरें, नाहीं तर सारें लष्कर लुटलें जाऊन हजारों लोकांची कत्तल होण्याची ती भयंकर वेळ! अशा या शत्रूशीं गोपाळरावानें आपलें विशेष नुकसान न होऊं देतां तीन महिने सामना केला. आणि त्याचीं कित्येक ठाणीं काबीज केलीं. हैदरानें ही अनेक वेळां त्याच्या फौजेवर छापा घालण्याचा यत्न केला. बारीक सारीक झटापटी ही केव्हां तरी होत. पण या लढाई पासून दोहों पक्षांपैकीं एकाचा ही विशेष फायदा होत नव्हता. शेवटीं दोघांस ही लढाईचा कंटाळा येऊन त्यांमध्यें तहाचें बोलणें सुरू झालें. त्यांत असें ठरलें कीं, रोख बत्तीस लक्ष रूपये घेऊन मराठ्यानीं चौदा परगण्यांवरचा हक्क सोडावा व प्रांतांतून निघून जावें. हा ठराव होतांच हैदरानें नंदराजास निकड लाविली कीं, कसें ही करून या रकमेचा भरणा ताबडतोब करावा, ह्मणजे मराठ्यांची ब्याद राज्यांतून घालवून देतों. पण नंदराजाजवळ तरी पैसा कोठचा असणार! त्यानें रकम जमविण्याचें काम हैदराचा दिवाण खंडेराव याजवर सोंपविलें. मारून मुटकून कसे तरी सोळा लाख रुपये त्या दिवाणानें जमविले. बाकीची रक्कम तुह्मींच कसें तरी करून उभी करा असा राजाचा व नंदराजाचा हैदरास निरोप आला. मराठ्यांच्या लष्करा बरोबर जे सावकार होते, त्यानीं या सोळा लाखांची भरती हैदराच्या सांगण्यावरून गोपाळरावास जागच्या जागीं करून दिली! या वरून शत्रूच्या छावणींत सुद्धां हैदराची इभ्रत किती वाढली होती हें लक्षांत येईल. येवढी मात्र अट त्या सावकारांनीं घातली होती कीं, चवदा परगणे मराठ्यांच्या ता-

ब्यांतून सुटले ह्मणजे ते हैदरानें आपल्या ताब्यांत घेऊन त्यांच्या वसुलांतून आमच्या रकमेची फेड करावी. ते परगणे बळकाविण्यास हैदरास ही कांहीं निमित्य पाहिजेच होतें, व बहुधा त्याच्याच इषाऱ्यावरून सावकारानीं ही अट घातली असावी. त्यानें त्या परगण्यांत आपले लोक पाठवून तत्काळ अंमल बसविला आणि बत्तीस लक्ष रुपये घेऊन मराठ्यांची फौज म्हैसूर सोडून निघून गेली. कर्नल विल्क याच्या लिहिण्यांत या लढाईंत हैदराची सरशी झाली असा अभिप्राय आहे. " हैदरानें तुमचें स्वरूप नेलें " असें नानासाहेब पेशव्यानीं गोपाळरावास खिजविल्याचा उल्लेख या पुस्तकाच्या दुसऱ्या अंकांत नंबर २४ च्या पत्रांत आहे, तो विल्क याच्या लिहिण्यास बळकटी आणितो. पण आपण हारीस आलों हें गोपाळराव बिलकुल कबूल करीत नाहीं. ' आम्हांकडून हैदरास चांगली तंबी पोंचल्या शिवाय कांहीं त्यानें आम्हांस खंडणी दिली नाहीं ' हा गोपाळरावाचा त्या पत्रांतील मुद्दा अगदीं खरा आहे. आपला आतां कांहीं एक उपाय चालत नाहीं, अशी पक्की खात्री झाल्या शिवाय नुसत्या अवडंबरास भिऊन कोणास खंडणी बिंडणी देणारा मनुष्य हैदरनाईक नव्हता! कर्नाटकच्या मोहिमांसंबंधानें नानाविध प्रसंगांचीं वर्णनें पुढें या पुस्तकांत पुष्कळ वेळां येणार आहेत, तीं वाचून पाहिल्यावर आम्ही ह्मणतों हें बरोबर आहे अशी वाचकांची बालंबाल खात्री होईल.

अशा रीतीनें या मोहिमेचा शेवट लाविल्यावर हैदरनाईक श्रीरंगपट्टणास परत आला, तेव्हां त्याच्या स्वागताकरितां राजानें मोठा दरबार भरविला. त्या दरबारांत हैदरनाईक गेल्या बरोबर नंदराजानें उठून त्यास आलिंगन दिलें, व राजानें त्याची फार फार तारीफ करून त्यास ' फत्ते हैदर बहादूर ' असा किताब दिला. ' दळवाई ' हें पद नंदराजाकडे आतां नांवाचें मात्र राहिलें होतें, सारी फौज हैदरनाइकाच्याच लगामीं लागली असल्यामुळें त्या पदाचा उपभोग तोच घेत होता. दिंदिगल, को-

इमत्तर, बंगलोर आणि नुकतेच मिळालेले चौदा उत्तम सुपीक परगणे मिळून म्हैसूरच्या राज्यापैकीं हैदरानें इतकावेळपर्यंत अर्धा भाग गिळंकृत केला होता. बाकी राहिलें होतें, तें ही त्याच्या हातीं लागण्याचें निश्चित झाल्या सारखेंच दिसत होतें !

नंदराजास वाटत असे कीं, हैदरास आपण " प्याद्याचा फर्जी " बनविला आहे. ते उपकार स्मरून तो आपल्या आज्ञे बाहेर काडीभर सुद्धां जाणार नाहीं. त्याचें पाठबळ आपणास मिळाल्यामुळें आपला अधिकार पूर्वीं प्रमाणेंच पुढें ही निर्बाध चालवयास कांहीं हरकत नाहीं. पण हा त्याला निव्वळ भ्रम होता. त्यापासून जितका फायदा होण्या जोगा होता तितका हैदरानें करून घेतला असल्यामुळें आतां तो त्याला दृष्टीस सुद्धां नकोसा झाला होता ! नंदराजा विषयीं राजाच्या मनांतून पूर्वींचा दंश गेलेला नव्हताच व त्यास ही तो नकोच होता. हैदरानें आपला दिवाण खंडेराव याच्या द्वारें राजाशीं गुप्तरूपानें मिलाफ करून घेतला आणि नंदराजास घालवून देण्याच्या मसलतींत त्याची संमति मिळविली. ही मसलत लवकरच पार पाडण्याचा बेत ठरला. हैदराकडे अर्धें राज्य गेल्यामुळें राज्याची जमा थोडी, व खर्च तर पूर्वीं प्रमाणें मोठा, अशी स्थिति झाली होती. त्या योगानें फौजेचा पुनः लवकरच पगार तुंबला. तेव्हां कित्येक सरदारांस हैदरानें आपल्या घरीं बोलावून नेऊन पुढें कसकशी बतावणी करावी हें त्यांस पढविलें, आणि त्या प्रमाणेंच त्यानीं बतावणी केली ! प्रथम ते पगारासाठीं हैदराच्या दारांत धरणें देऊन बसले. तेव्हां तो त्यांस ह्मणाला कीं, माझ्या फौजेच्या खर्चा पुरती जहागीर मला सरकारांतून मिळाली आहे. तुमच्या पगाराचा मजकडे काय संबंध आहे ? राज्याचा सर्व अधिकार नंदराजाकडे आहे. त्याकडे तुम्हीं चला ह्मणजे तो या भानगडीचा निकाल लावील. तेव्हां त्यानीं आग्रह धरिला कीं, तूं आम्हांबरोबर आतांच्या आतां नंदराजाकडे येऊन मध्यस्थी करून आमचा पगार

आम्हांस देवविला पाहिजेस ! या लोकांच्या आग्रहापुढें आपलें कांहीं चालत नाहीं, असें ढोंग करून त्यानें त्या लोकांसह नंदराजाच्या दारीं धरणें दिलें. धरणें आलें ह्मणजे काय काय विपत्ति होतात याची पूर्वीच्या प्रसंगामुळें नंदराजास चांगलीच माहिती झाली होती. आतां पुनः तेंच अरिष्ट उपस्थित झालें, व आपल्या गळ्यांतील ताईत हैदरनाईक ही फितूर होऊन दंगेखोरांस मिळाला आहे, हें पहातांच त्याचा थरकांप झाला. राजाचें व हैदराचें आपणाविषयीं कांहीं तरी बोलणें झालें आहे, अशी कुणकुण या पूर्वींच त्याच्या कानावर पडली होती पण ती त्यास खरी वाटली नव्हती. परंतु आतांचा हा प्रसंग आलेला पाहून त्यानें विचार केला कीं, आतां आपली सद्दी फिरली; यास्तव कसें तरी करून अब्रूनें येथून निघून जावें; याप्रमाणें निश्चय करून तो दंगेखोरांस म्हणाला, बाबानों, माझ्यानें आतां कारभार होत नाहीं. मी राजधानी सोडून कोठें एकांत स्थळीं जाऊन हरि हरि म्हणत बसणार. निघून जाण्याची तयारी देखील मीं केली आहे. मग आतां पगाराबद्दल तुम्हीं मला कां बरें सतावतां ? तेव्हां ते ह्मणाले, बरें आहे तर, आम्हाला काय, आम्ही राजाकडे जाऊं ! आम्हांस उपाशीं मरण्याचा प्रसंग आला आहे, आमचा निरुपाय झाला आहे, काय होईल तें होवो, पण आजच्या आज आमचा सारा पगार चुकता करून घेतल्या शिवाय आम्ही राहणार नाहीं ! इतकें बोलून हैदरास पुढें घालून ते राजद्वारीं गेले आणि तेथें गलबला करूं लागले. इतकें हें सगळें करावयाचें राजाच्या संमतीनेंच हैदरानें ठरविलें होतें त्या त्या प्रमाणें घडून आलें. नंतर राजानें धरणें धरणाऱ्या व इतर हजारों लोकांसमक्ष आधीं हैदराकडून शपथ घेवविली कीं, 'स्वामींची जी जी आज्ञा होईल ती ती मी मनःपूर्वक पाळीत जाईन. नंदराजाप्रमाणें बेइमानी व अमर्यादा करणार नाहीं !' ही त्यानें शपथ घेतांच राजानें जाहीर केलें कीं, आज पासून आपण सर्व राज्याचा कारभार नंदराजाकडून काढून हैदरअल्लीच्या

हवालीं केला आहे. फौजेचें काय काय देणें असेल तें देऊन टाकण्या विषयींची तजवीज तो करील. हा हुकूम ऐकतांच धरणें उठलें व लोक घरोघर निघून गेले!

म्हैसूरच्या राजाच्या हाताखालीं प्राचीनकालापासून तीन असामींचें मंत्रिमंडळ कारभाराची व्यवस्था राखण्या करितां नेमण्याची वहिवाट होती. सर्वाधिकारी, प्रधान व दळवाई अशीं त्या तीन मंत्र्यांस नांवें असत. त्यांत 'सर्वाधिकारी' हा राजाचा मुख्य कारभारी होय. 'प्रधाना' चें काम राजाजवळ नेहमी राहून त्यास सल्ला मसलत देण्याचें असे. 'दळवाई' हा सैन्याची व्यवस्था पाही. अलीकडे हे तिन्ही अधिकार नंदराजच चालवीत होता. परंतु आतां त्यास घालवून द्यावयाचें ठरलें तेव्हां फक्त 'सर्वाधिकारी' हें पद नांवाला मात्र त्याजकडे ठेवण्यांत आलें. त्यानें राजधानी पासून दूर जाऊन रहावें, तीन लक्ष होनांचा सरंजाम त्यास तोडून द्यावा. त्यांत एक लक्ष जातखर्चाकरितां ठेवून बाकी दोन लक्षांत त्यानें फौज बाळगून सरकारच्या चाकरीस पाठवावी, असा ठराव झाला. दळवाई व प्रधान यांच्या जागेवर अनुक्रमें हैदरनाईक व त्याचा दिवाण खंडेराव यांची नेमणूक झाली. सदरहू ठरावाप्रमाणें नंदराज आपलें सारें खटलें घेऊन श्रीरंगपट्टणांतून निघाला तो पहिल्या मजलीस तेथून नऊ मैलांवर म्हैसूर शहरीं पोंचला आणि अजारीपणाचें मीष करून कित्येक महिने तेथेंच राहिला. हैदरास तें न आवडल्यामुळें त्यानें नंदराजास कूच करून जाण्याविषयीं निकड लाविली. तेव्हां तो संतापून हैदरास म्हणाला कीं, 'अरे, तूं यःकश्चित् मनुष्य होतास त्या तुला मीं एवढ्या योग्यतेस चढविलें. सर्व प्रकारें तूं माझा नाश केलास. इतकें असून मी या ठिकाणीं उगीच डोकें टेंकून आहें हें ही तुझ्यानें पाहवत नाहीं! बरें! तुला वाटेल तें तूं कर! मी कांहीं म्हैसुरांतून हालणार नाहीं!' राजा ह्मणजे केवळ बाहुलें होतें. तें आजपर्यंत नंदराजाच्या हातीं होतें, तें

हैदरअल्लीचें पूर्व चरित्र

आतां हैदराच्या हातीं सापडलें होतें. त्यास पाहिजे तसें नाचविण्यास तो समर्थ होता. नंदराजाचा म्हैसुरांतून न हालण्याचा हेतु हैदरानें राजास कळविला आणि हा बखेडेखोर मनुष्य राजधानीजवळ राहूं देणें फारच धोक्याचें आहे, असें त्याच्या मनांत भरवून दिलें! तेव्हां राजे साहेबांचा तत्काळ हुकूम झाला कीं, बऱ्या बोलानें नंदराज म्हैसूर सोडीत नसेल तर बळजबरीनें त्यास काढून लावावें! हैदरास, आधींच या कामीं उल्हास, त्यांतून ही राजाची आज्ञा! मग काय विचारावयाचें आहे! त्यानें तत्काळ फौजेचा म्हैसुरास वेढा दिला आणि तीन महिने पर्यंत लढाई करून शेवटीं नंदराजास बाहेर येणें भाग पाडिलें! या नंतर हैदराच्या चिथावणीवरून नंदराजाच्या सरंजामा पैकीं दोन लाख होनांचा मुलूख त्या पासून राजानें काढून घेतला, व खर्चा करितां एक लाख होनांचा सरंजाम मात्र त्याजकडे ठेवून एका दूरचे गांवीं त्यास रहावयास पाठविलें.

ही बडी कामगिरी बजाविल्याबद्दल हैदरनाईक राजाजवळ आणखी चार निवडक परगणे जहागीर मागूं लागला. खंडेराव हा हैदराचा पूर्वीचा दिवाण खरा, पण आतां तो राजाचा प्रधान झाला असल्यामुळें आपल्या पूर्वींच्या यजमानाची ही सारेंच राज्य बळकावण्याची बुद्धि त्यास बिलकुल आवडली नाहीं. नवीन जहागीर हैदरास न मिळावी म्हणून त्यानें पुष्कळ खटपट केली. पण जबरदस्ती पुढें दुर्बलाचें शहाणपण कसें चालणार? हैदरास शेवटीं ते चार परगणे मिळावयाचे ते मिळालेच! उत्पन्नाच्या मानानें पाहतां आतां राजाच्या खासगत अंमला खालीं एक हिस्सा व त्याचा नोकर हैदर याजकडे जहागिरीचा मुलुख दोन हिस्से राहिला! या वेळे पासून खंडेरावाच्या मनांत हैदराविषयीं वैषम्य उत्पन्न झालें. या गोष्टी इ० स० १७६० त घडून आल्या.

राजाची आई मोठी खटपटी बायको होती. ती सांगे त्या प्रमाणें राजा ऐके. स्वतःची अशी अक्कल त्यास मुळींच नव्हती. नंदराजास ही

राजमाता व तिचा पुत्र अगदीं पाण्यांत पहात असत. या करितांच त्यास अधिकारभ्रष्ट करण्याच्या कामांत हैदरानें सांगितलें त्या प्रमाणें तीं नाचत होतीं. पण लवकरच तो नंदराज पुष्कळ बरा, पण आपलें सारेंच राज्य हाताखालीं घालण्याची दुर्बुद्धि धरणारा हा हैदर नको, असें त्यांस वाटूं लागून तीं फार पस्ताव्यांत पडलीं. या दुष्टाचें निर्मूलन कसें होईल हाच विचार त्यांच्या मनांत घोळूं लागला. आपणासाठीं नुकताच खंडेराव हैदराशीं निकरानें भांडला होता, यास्तव तो आपणास या मसलतींत अनुकूल होईल असें वाटल्यामुळें त्यानीं एकांतीं आपलें सारें हृद्गत त्यास कळविलें; आणि ' राज्याचा सर्व अखत्यार तुला देतों, पण हर प्रयत्न करून हैदराचा एकदांचा पक्का नायनाट करून टाक, असें त्यास विनवून सांगितलें. खंडेरावानें ही मसलत कबूल केली, व श्रीरंगाच्या मूर्ती समोर ' तुम्हांशीं इमानानें वागेन ' अशी त्यानें त्या दोघांस शपथ दिली.

खंडेरावाची ही मसलत सिद्धीस जाण्यास ती वेळ फार अनुकूल होती. अर्काट प्रांतीं अलीकडे राहून राहून फ्रेंच व इंग्रज यांमध्यें युद्ध चालू होतें, त्यास आतां कांहीं निराळें स्वरूप आलें होतें. प्रथम प्रथम फ्रेंचांची सरशी झाली होती, पण अलीकडे इंग्रजांस वारंवार जय मिळूं लागल्यामुळें त्यानीं नेमिलेला नबाब महमदअल्ली हाच अर्काटच्या गादीचा खरा वारस ठरला होता, व तें राज्य ही त्याच्या ताब्यांत आलें होतें. फ्रेंच लोक हतप्रभ झाले होते, त्यानीं नेमिलेला अर्काटचा नबाब चंदासाहेब मरून गेला होता, तथापि त्याचा मुलगा रेजासाहेब यासच अर्काटचा नबाब ठरवून ते इंग्रज व महमदअल्ली यांशीं लढत होते. अलीकडे फ्रेंच लोकानीं हैदरापाशीं कुमक मागितली होती व या लोकांस कुमक दिली तर आपणास फार मोठा लाभ होईल असें समजून हैदरानें मखदूमअल्ली नामक शूर सरदारा बरोबर पंधरा हजार निवडक फौज घांटाखालीं पाठविली होती. बाकीची बहुतेक फौज टोळ्या टोळ्यानीं हैदराच्या जहागिरींत राहिलेली

होती. श्रीरंगपट्टण हें शहर एका बेटावर वसलेलें असून त्यास कावेरीचा चोंहोंकडून गराडा पडला आहे. पावसाळा नुकताच सुरू झाला असल्या-मुळें नदीस पूर येऊन राजधानीचें बाह्यप्रदेशाशीं दळण वळण नावांखेरीज होत नव्हतें. त्या नदीच्या उत्तरतीरीं हैदराचें थोडेसें पायदळ व तोफा अडकून राहिल्या होत्या. दक्षिणतीरीं फक्त शंभर स्वार व पंधराशें पायद-ळासह हैदरअल्ली शहरच्या तोफांच्या माऱ्यांत बिनघोरपणें छावणी देऊन राहिला होता. इतकें होतें तरी हैदरावर दग्यानें छापा घालण्याची खंडे-रावास छाती झाली नाहीं. त्यास वाटत असावें कीं, हैदर सांपडला किंवा मारिला गेला तर बरें, जर तो निसटून गेला तर या मसलतींचे काय काय परिणाम होतील कोणास ठाऊक! एतावता कोणा बलिष्ठाचें साहाय्य मि-ळाल्या शिवाय या मनसब्यांत पडूं नये असें त्यास वाटलें. तें साहाय्य ही त्यास लवकरच मिळालें. भाऊसाहेब पानपतच्या स्वारीस निघून गेल्या नंतर विसाजीपंत बिनीवाले व गोपाळराव पटवर्धन यां बरोबर वीस हजार फौज पेशव्यांनीं कर्नाटकांत पाठविली होती. गेल्या तीन वर्षांत शिऱ्यांचा सुभा व कडपेंकरांचें अर्धें राज्य त्यानीं जिंकिलें होतें. नवीन राज्य जिंकिलें ह्मणजे पक्का अंमल बसे तों कांहीं वर्षेंपर्यंत तिकडे दर वर्षास फौज पा-ठविण्याचा त्यांचा शिरस्ता होता, त्यास अनुसरूनच कर्नाटकांत ही फौज धाडण्यांत आली होती. ही फौज सांप्रत बाळापुर व देवनहळ्ळी यांच्या मधल्या मुलखांत खंडण्या घेत हिंडत होती. ही फौज आपणाकडे मिळवून घेण्याचा खंडेरावानें निश्चय केला. मराठ्यांस आपणाकडे गुंतवून न ठे-विलें तर ते हैदरास मिळतील हें त्यास ठाऊक होतें. त्यानें विसाजीपंताशीं फार गुप्तपणें राजकारण सुरू केलें व त्यास कांहीं पैका देऊन वश करून घेतलें. मग असा संकेत ठरला कीं, तारीख २२ आगस्ट (इ० स० १७६०) या दिवशीं गोपाळराव पटवर्धनानें सहा हजार फौजेसह श्रीरं-गपट्टणास जाऊन पोंचावें, आणि त्या दिवशीं त्यानें व खंडेरावानें मिळून

हैदरअल्लीवर पहिली स्वारी

हैदराच्या छावणीवर हल्ला करावा !

त्या दिवशीं उजाडतें न उजाडतें तोंच शहरच्या तटबंदींवरून हैदराच्या छावणीवर एकदम तोफांचा भडिमार सुरू झाला व त्या छावणींत चोंहोंकडे दाणादाण होऊन आसऱ्या साठीं लोक सैरावैरा धांवूं लागले. हैदर खडबडून जागा होऊन पहातो तों त्याच्या लोकांपैकीं कांहीं ठार झाले आहेत, कांहीं घायाळ रक्तबंबाळ होऊन कण्हत आहेत, चोंहोंकडे धांवाधाव, किंकाळ्या व गलबला कानीं येत आहे; त्याची गरोदर स्त्री त्या धडक्या सरशी भेदरून प्रसूत झाली आहे, आणि क्षणोक्षणीं तोफांचे विद्युत्पाताप्रमाणें भयंकर अवाज निघत असून गोळ्यांचा छावणीवर वर्षाव सुरू आहे ! ही स्थिति पहातांच तो ओरडला कीं, अरे, माझ्या खंडेरावास आधीं शहरांतून बोलावून आणा ! हा काय अनर्थ आहे हें तो आल्याशिवाय कळणार नाहीं, व याचा बंदोबस्त ही व्हावयाचा नाहीं ! इतक्यांत वर्दी आली कीं, खुद्द खंडेरावच या अनर्थास कारणीभूत असून तो याक्षणीं तटावर गोलंदाजांस नेम कोठें कोठें धरावा हें दाखवितांना नजरेस पडत आहे ! हें ऐकून मात्र त्याची कंबर बसली व या दग्याचें पूर्ण भयंकर स्वरूप त्याच्या नजरे समोर दिसूं लागले. इतक्यांत शहरांतून कांहीं फौज बाहेर येऊन नदी ओलांडून हैदराचें पायदळ पलीकडे उतरलें होतें त्यावर पडली, व त्यांचा धुव्वा उडवून त्याच्या साऱ्या तोफा तिनें हिसकून घेतल्या. कसा ही प्रसंग आला तरी न डगमगणें हा फार मोठा गुण हैदरामध्यें वसत होता. असा कठिण प्रसंग त्यावर येऊन गुदरला तरी धीर न सोडतां त्यांतल्या त्यांत आपल्या बचावाचा काय बंदोबस्त होण्या जोगा होता तो त्यानें केला. त्या दिवशीं संकेता प्रमाणें गोपाळराव येऊन पोंचला नाहीं, यामुळें हैदराच्या छावणीवर हल्ला करण्याचा बेत खंडेरावानें दुसऱ्यादिवसापर्यंत तहकूब केला. मराठ्यांस दूषणें देण्याची इतर इंग्रज इतिहासकारांप्रमाणेंच कर्नल विल्क यास खोड आहे. त्यानें ध्वनित

केलें आहे कीं, त्या दिवशीं मराठे ठरावा प्रमाणें येऊन हजर झाले नाहींत यांत त्यांची कांहीं तरी लुच्चेगिरी होती! वस्तुतः तसा प्रकार घडला असेल असें आम्हांस वाटत नाहीं. पावसाळ्याचे दिवस आणि लांबचा पल्ला, या मुळें एखादा दिवस आगें मागें झाल्यास तो सहजगत्याच झाला असला पाहिजे. कसें ही असो, मराठे त्या दिवशीं न आल्यामुळें हैदरास मात्र आपली घसरलेली बाजू सांवरतां आली हें खरें आहे.

हैदर मोठा कपटनाटकी होता. खंडेरावाविषयीं जरी त्याच्या मनांत द्वेषाग्नीनें पेट घेतला होता, तरी त्यानें अत्यंत दीन झाल्याचें सोंग आणून त्यास निरोप पाठविला कीं, " आजपर्यंत तुझ्या मदतीनें मी एवढ्या वैभवास चढलों आणि शेंकडों अनर्थांतून बचावत आलों. तूं मला सोडिलेंस ह्मणजे मी पंगु झालों. आपला पूर्वींचा प्रेमभाव मनांत आण. मी कसा लाचार झालों आहें हें पहा. माझा अंत घेऊं नकोस. माझ्या हातून जे कांहीं अपराध झाले असतील ते माफ करून यावेळीं माझें रक्षण कर. "

लहानपणापासून खंडेरावाचें सारें आयुष्य हैदराच्या नोकरींत गेलें होतें. त्या दोघांत एकमेकांविषयीं प्रेम व विश्वास अव्याहतपणें वसत होता. जें हैदराचें हित तेंच आपलें हित अशी खंडेरावाची बुद्धि होती. असें असल्यामुळें विपत्तींत पडलेल्या हैदराचा हा निरोप ऐकून खंडेरावाचें मन दयार्द्र झालें, हें साधारण व्यवहारांत जरी त्याच्या भलेपणाचें लक्षण ह्मणून समजण्यांत येत असलें तरी राजकीयदृष्ट्या तें त्याच्या अत्यंत मूर्खपणाचें लक्षण होय यांत संशय नाहीं! त्यानें हैदरास उलट निरोप धाडिला कीं, " तुझ्या जिवास किंवा अब्रूस धक्का लावावा हा माझा हेतु नाहीं. परंतु राजास मी इमानपूर्वक वागण्याविषयीं शपथ दिली असल्यामुळें माझा नाइलाज आहे. म्हैसूरच्या राज्यांत पुनः पाऊल न ठेवण्याविषयीं जर तूं अभिवचन देशील तर तुझ्या पळून जाण्यास मजकडून प्रतिबंध होणार नाहीं. ही सवलत आजच्या दिवसा पुरती आहे. उद्यां मराठे येऊन पों-

चले ह्मणजे कांहीं सबब न राहिल्यामुळें मला तुजवर हल्ला करणें भाग पडेल !

हैदरानें जितक्या मिळवतील तितक्या नावा दिवसासच मिळवून ठेविल्या होत्या. रात्र पडतांच बरोबर शंभर स्वार होते त्यांसह कावेरी पार होऊन त्यानें बेंगरूळचा रस्ता धरिला. कुटुंबाचीं माणसें, पायदळ, तोफा व सारी चीजवस्त त्यानें छावणींत तशीच टाकून दिली. शंभर स्वारांस नेववेल इतका खजिना मात्र त्यानें बरोबर घेतला होता. त्यास अडवावयाचें जर खंडेरावाच्या मनांत असतें तर तो तें सहज करूं शकता. परंतु त्यानें कानाडोळा केल्यामुळें हैदरास नदी पार होतां आलें. दुसऱ्या दिवशीं खंडेरावानें हैदराची छावणी ताब्यांत घेतली, तेव्हां त्याच्या स्त्रियेस व दोघा पुत्रांस शहरांत नेऊन ठेविलें व ममतेनें व आदरानें त्यांची बरदास्त राखिली. त्या दोन पुत्रांत थोरला टिपू सुलतान नऊ वर्षांचा होता. दुसरा करीमसाहेब आदल्याच दिवशीं जन्मास आला होता. तो पुढें अर्ध वेडा निपजला.

त्या रात्रीं हैदर श्रीरंगपट्टणाहून निघाला तो उजाडण्या पूर्वीं अनिकल येथें पोंचला. या दोन स्थळांत पाऊणशें मैल अंतर आहे. इतका प्रवास त्यानें एकाच घोड्यावर केला. बरोबरच्या स्वारांपैकीं चाळीस असामींचे घोडे वाटेंत थकून पडले. त्याच दिवशीं सायंकाळीं तो बेंगरूळास सुरक्षितपणें जाऊन पोंचला. तेथें गेल्यावर त्यानें कर्ज काढून फौज जमविण्याचा क्रम जारीनें सुरू केला. म्हैसूरच्या राज्यांत त्याच्या फौजेच्या टोळ्या होत्या त्या खंडेरावानें नाहींशा केल्याच होत्या. येऊन जाऊन घांटाखालीं मखदुमअल्ली बरोबर वीस हजार सैन्य होतें, तें मात्र उत्तम असून त्याच्या भरंवशाचें होतें. त्या सरदारास परत येण्या विषयीं हैदराचे निकडीचे निरोप गेले, तेव्हां तो लागलाच परत फिरला. इकडे हैदर ही स्वस्थ बसला नव्हता. चोंहोंकडून फौज जमविण्याचा त्याचा उद्योग सुरूच

होता. एक महिन्यांत त्याजवळ सहा हजार लोक जमले. त्यावेळीं शि-
ऱ्यांच्या नबाबाचा जांवई मीरफैजुल्लाखान हा नामांकित शूर सरदार त्यास
येऊन मिळाला. शिऱ्यांचें राज्य घेतेवेळीं पेशव्यानीं ज्यास कृपाळूपणानें
निर्वाहा करितां थोडी जहागीर तोडून दिली होती तोच हा मनुष्य होय.

हैदरअल्ली हातचा निसटून गेल्यावर त्यास सोडल्याबद्दल खंडेरावास
पश्चात्ताप झाला, पण त्याचा काय उपयोग? पुढें कित्येक महिनेपर्यंत जी
लढाई चालावयाची होती तिच्या तयारी साठीं त्यास कंबर बांधावी लाग-
ली. हैदर बेंगरूळास होता व त्याच्या कुमकेस मखदुमअल्ली घांटा खालून
येत होता. त्या दोघांची गांठ न पडावी ह्मणून गोपाळराव पटवर्धनास
त्यानें मखदुमअल्लीच्या मुकाबल्यास पाठविलें. म्हैसूरची थोडीशी निवडक
फौज खंडेरावानें गोपाळरावाबरोबर दिली होती, व विसाजीपंतानें ही चार
हजार स्वार पाठविले होते. या दोन टोळ्यांची भरती पडल्यामुळें एकंदर
चौदा पंधरा हजार सैन्य गोपाळरावाच्या हाताखालीं जमलें. तितक्यानिशीं
तो घांटाखालीं उतरून मखदुमअल्लीच्या सैन्यास जाऊन बिलगला, आणि
मखदुमअल्लीनें कडपनाथाच्या घांटानें वर येऊं नये ह्मणून स्वतः विसाजी-
पंत दहा हजार लोकांसह त्या घांटाच्या माथ्यावर तळ देऊन बसला.

मखदुमअल्लीच्या व मराठ्यांच्या दररोज निकरानें लढाया होत
असतां ही तो शूर सरदार आपलें सारें लष्कर व बाजारबुनगें सांभाळून
बेंगरूळापासून चौवीस कोसांवर येऊन पोंचला. तेथें मात्र त्याचे सर्व उ-
पाय थकले. मराठ्यानीं चोंहोंकडून गराडा घातल्यामुळें त्याच्यानें पाऊल
पुढें टाकवेनासें झालें, आणि त्यांच्या वारंवार होणाऱ्या हल्ल्यानीं त्याचें
लष्कर अगदीं हैराण होऊन गेलें. ही त्याची दुर्दशा पाहून हैदरानें बेंग-
रूळाहून मीरफैजुल्लाबरोबर चार हजार फौज व पांच तोफा त्याच्या कुमकेस
पाठविल्या, पण मराठ्यानीं वाटेंतच ही कुमकेस येणारी फौज बुडवून
लुटून फस्त केली. आतां आपली कुमक कोणी करीत नाहीं असें पाहून

हैदरअल्लीवर पहिली स्वारी

मखदुमअल्ली फारच निराश झाला, साऱ्या लष्करासह त्यानें मराठ्यांच्या स्वाधीन होण्याचा प्रसंग येऊन ठेपला. तसें झालें असतें ह्मणजे त्या बरोबर हैदराचें नष्ट झालेलें वैभव ऊर्जित दशेस येण्याची आशाच मावळली असती! पण या ही वेळीं हैदरास त्याच्या नशिबानें अकल्पित रीतीनें हात दिला. त्यानें मराठ्यांशीं बरेच दिवस तहाचें बोलणें लाविलें होतें, तिकडे आजपर्यंत त्यांनीं लक्ष दिलें नाहीं, आणि मखदुमअल्लीचें सारें लष्कर त्यांच्या हातीं लागल्या सारखेंच झालें होतें, तरी ही ते आतां हैदरापासून बारा महाल प्रांत व रोख तीन लक्ष रुपये घेऊन स्वदेशीं परत जावयास कबूल झाले! ही वार्ता ऐकतांच हैदराच्या पोटांत हर्ष माईनासा झाला. पण हें असें कां व्हावें हा मात्र त्यास कांहीं केल्या उमज पडेना. तथापि विशेष चिकित्सा न करितां त्यानें तीन लाख रुपये रोख दिले, व बारा महाल ही स्वाधीन करण्याचें कबूल करून त्यांस मार्गस्थ केलें.

विसाजीपंत बिनीवाले कडपनाथाच्या घांटावर जो तळ देऊन बसला होता तो केवळ मखदुमअल्लीचा तिकडून वर घांटीं प्रवेश होऊं नये ह्मणूनच बसला होता असें नाहीं. अर्काटप्रांतीं पाहिजे त्यावेळीं जातां यावें हा एक त्याचा हेतु तेथें राहण्यांत होता. त्या प्रांतीं महमदअल्ली व इंग्रज लोक यांनीं फ्रेंचांस फुलचेरींत कोंडून धरिलें होतें. फ्रेंचानीं विसाजीपंताजवळ कुमक मागितली होती, व सतरा हजार फौज त्यांच्या मदतीस पाठवावयाचें त्यानें कबूल केलें होतें. हें राजकारण महमदअल्लीच्या व इंग्रजांच्या कानीं येतांच त्यांस मोठी चिंता पडली. त्यांनीं विसाजीपंतास सांगितलें कीं, तूं जर आतांच्या आतां सर्व सैन्यासह परत स्वदेशीं जाशील तर हप्त्या हप्त्यानीं आम्हीं वीस लाख रुपये तुझ्या पदरांत घालूं. हें विसाजीपंतानें ज्या अर्थीं कबूल केलें त्या अर्थीं पहिल्या हप्त्याची रक्कम पदरांत पडल्या शिवाय त्यानें तळ हालविला नसेलच. जातां जातां हैदराकडून तीन लाख मिळाले तेवढ्यांतच संतोष मानून तो जलदी जलदीनें परत निघाला.

हीं त्यांचीं राजकारणें वरकरणी लोकांस दाखविण्या पुरतीं मात्र होतीं. परत जाण्याचें खरें कारण अजून बाहेर फुटलें नव्हतें. तें कारण असें कीं, पानपतच्या घोर संग्रामाची हकिगत मराठ्यांस याचवेळीं कळली होती व परत निघून येण्याविषयीं पेशव्यांचें निक्षून पत्र ही आलें होतें. अर्थात् त्यास परत जाणें भागच होतें. हा लेख आम्हीं कर्नल विल्क याच्या म्हैसूरच्या इतिहासाच्या आधारानें लिहीत आहों. बिनीवाल्याच्या या स्वारी-संबंधें डफ् याच्या इतिहासांत किंवा मराठी बखरी कागदपत्र वगैरे जे उपलब्ध झाले आहेत त्यांत कोठें उल्लेख सांपडत नाहीं. एवढें मात्र खरें कीं, गोपाळराव जर मखदुमअल्लीच्या सैन्यास, घेरणाऱ्या मराठी फौजेंत मुख्य सरदार असलाच तर तो ही कामगिरी दुसऱ्या कोणा सरदाराच्या हवालीं करून या पूर्वींच परत महाराष्ट्राकडे आला असावा. या पुस्तकाच्या दुसऱ्या अंकांत नं० २७ चें पत्र त्यास पेशव्यानीं लिहिलेलें आहे, तें छ० ११ रबिलाखरचें (२० नोवेंबर) चें आहे. त्यावरून तो पेशव्यांच्या फौजेंत निदान महाराष्ट्रांत कोठें तरी असावा हें उघड होतें. तें पत्र त्या सालचेंच (इ. स. १७६० मधलें) असल्याबद्दल आमची खात्री नाहीं, व तेथें तें आम्हीं अजमासानें घातलें आहे, ह्मणून तें बाजूस ठेवलें तरी त्याच अंकांत नं० २६ व २८ चीं पत्रें नीलकंठराव त्रिंबक पटवर्धन यानें लिहिलीं आहेत, तीं इ. स. १७६० मधलींच आहेत या विषयीं ह्यांतील मजकूर वाचून पाहिल्यावर कोणाची ही खात्री होईल. या पत्रावर तारखा अनुक्रमें १ जमादिलाखर (९ जानेवारी) व १७ जमादिलाखर (२९ जानेवारी) अशा आहेत. ह्या पत्रांवरून गोपाळराव पेशव्यांच्या लष्करांत होता हें उघड होत आहे, आणि तें लष्कर तर त्यावेळीं बऱ्हाणपुराकडे कूच करून चाललें होतें. विसाजीपंत बिनीवाल्याची फौज जानेवारीच्या शेवटीं शेवटीं कर्नाटकांतून परत फिरली असावी.

मराठे आपल्या देशाकडे निघून गेल्यावर हैदराशीं लढण्याचें काम

हैदरअल्लीवर पहिली स्वारी

खंडेरावानें निरुत्साह न होतां नेटानें चालविलें होतें. सरदारीच्या कामीं जें शौर्य व कौशल्य लागतें तें त्याच्या अंगीं हैदरा पेक्षां कमी नव्हतें. दोहींपक्षीं बारीक सारीक झटापटी पुष्कळ झाल्या. शेवटीं खंडेरावानें एके दिवशीं हैदरास सर्व सैन्यासह लढाईस उभें राहणें भाग पाडलें. दोघांचीं सैन्यें समसमानच होतीं. तथापि फुलचेरी इंग्रजांच्या हातीं लागल्यामुळें निराश्रित झालेल्या फ्रेंच लोकांच्या सैन्याची एक टोळी हैदरास याच सुमारास मिळाली होती, तिच्या बळावर तो आपणास खंडेरावा पेक्षां बलिष्ट समजत होता. पण खंडेरावानें या लढाईंत त्याचा पूर्ण पराजय केला, व त्याची घमेंड पार नाहींशीं करून टाकिली ! हा प्रतिस्पर्धी आतां आपणास आटपत नाहींसें पाहून हैदरानें एक विलक्षण कावा केला तो पाहून फार आश्चर्य वाटतें. कोणास आपला कांहीं एक बेत कळूं न देतां तो एके रात्रीं शें दोनशें स्वार बरोबर घेऊन नंदराज रहात होता त्या गांवीं गेला. तेथें एकटा व निःशस्त्र होत्साता तो नंदराजाकडे गेला व त्याच्या पायांवर डोकें ठेवून गहिंवरून दीनपणानें प्रार्थिता झाला कीं, महाराज, तुमचे मजवर अनंत उपकार झाले असून मी तुम्हांशीं अत्यंत कृतघ्नपणानें वागलों, यामुळें मी या निकृष्टस्थितीस येऊन पोंचलों आहें. ज्या अधिकाराच्या अनावर आशेनें मी तुम्हांशीं वैर केलें, तुमची अमर्यादा व विटंबना केली, तो अधिकार आतां माझ्याच दिवाणानें हिसकून घेतला आहे, माझीं बायकापोरें व कोटाकिल्ले, सारी संपत्ती त्याच्या हातीं लागली आहे, युद्धांत पराजित झालेली माझी बहुतेक फौज मला सोडून गेली आहे. जिकडे जावें तिकडे क्लेश, हानि व अपेश माझ्या पाठीस लागलीं आहेत. हें सर्व माझ्या निमकहरामीचें फळ आहे अशी माझी खात्री झाली आहे. कृतकर्माचा पश्चात्ताप होऊन मी अनन्यभावानें तुम्हांस शरण आलों आहें. मला तो अधिकार नको, दौलत नको, कांहीं नको, या पायांची पूर्वी प्रमाणें मजवर कृपा झाली ह्मणजे त्यांत सर्व कांहीं मिळालें ! सर्व अन्याय माफ

करून मला आतां पुनः पदरांत घ्या, आणि पूर्वी प्रमाणें राज्याचा सर्व अधिकार हातीं घेऊन खंडेरावाच्या बंडाचा बींमोड करून टाका ! ही बतावणी त्या लुच्चानें इतकी उत्तमरीतीनें केली कीं, नंदराजास तें सर्व खरेंच वाटून हैदराच्या म्हणण्या प्रमाणें वागण्यास तो तत्काळ कबूल झाला ! त्यानें राज्यांत जिकडे तिकडे जाहिरनामे लावविले कीं, आपण ‘ सर्वाधिकारी ’ आहों. ‘ दळवाई ’ हैदरनाईक याचें व आपलें एकमत आहे. खंडेराव लबाड मनुष्य असून राज्यांत बंडाचा झेंडा उभारून फिरत आहे. त्याचें उत्तमरीतीनें पारिपत्य करण्याचा आह्मा दोघांचा विचार आहे. या करितां सर्व इमानी सरदार व शिपाई लोकांनीं आम्हांस ताबडतोब येऊन मिळावें !

या युक्तीनें नंदराजाचे पुष्कळ जुने नोकर हैदरास मिळाले. शिवाय नंदराजाजवळ चार हजार फौज होती तिची ही त्याच्या सैन्यांत आयतीच भर पडली. परंतु नंदराजाच्या नांवाचा जो त्यानें उपयोग केला तो पाहून त्याच्या कपटपटुत्वाविषयीं फारच नवल वाटूं लागतें ! खंडेरावाच्या सैन्यांत जे मुख्य सरदार होते त्यांस उद्देशून नंदराजाचे नांवचीं पत्रें त्यानें तयार केलीं. त्यांत इतकाच मजकूर होता कीं, “ खंडेरावास धरून आमच्या हवालीं करण्या बद्दल तुम्हीं, जें बक्षीस मागत आहां तें देण्यास आम्हीं कबूल आहों. सर्व तयारी झालेली आहे. कबूल केल्या प्रमाणें करून दाखविण्याचें काम तुमचें आहे. तें करा आणि बक्षीस घेऊन जा ! ” सदरहू पत्रांवर ‘ सर्वाधिकारी ’ याचा ह्मणजे नंदराजाचा शिक्का होता ! हीं खोटीं पत्रें नेमकीं खंडेरावाच्या हातीं पडावीं अशाच युक्तीनें पाठविलेलीं असल्यामुळें तीं त्यानें वाचून पाहिलीं. किती झालें तरी नंदराज हा फार दिवसांचा जुना कारभारी होता व बहुत कालपर्यंत राज्यांत खुद्द राजा प्रमाणें त्याची आज्ञा अव्याहत चालत होती. हा नंदराज व हैदर एक झाले तेव्हां आपले सरदार व फौज त्यांस फितूर होईल, ही

खंडेरावास भीति उत्पन्न झालीच होती. त्यांत हीं पत्रें वाचून तर त्याची खात्रीच झाली कीं, आपणास पकडून शत्रूच्या हवालीं करण्याचा आपल्या सरदारानीं कट केला आहे ! इतकी कल्पना डोक्यांत शिरल्यावर मग काय विचारावें ! तो कोणास कांहीं एक न विचारतां न सांगतां घोड्यावर बसून सारें लष्कर मागें टाकून एकटाच श्रीरंगपट्टणास पळून गेला ! त्याच्या जाण्यानें चकित व भयभीत झालेलें सैन्य नाना प्रकारचे तर्क करीत फिकिरींत पडलें आहे, तों हैदरानें येऊन त्यांवर आपल्या सर्व सैन्यासह हल्ला केला. तेव्हां अर्थात् त्यास जय मिळून शत्रूचे घोडेस्वार होते तेवढे मात्र पळाले. बाकी पायदळ, तोफा, दारूगोळा आणि बुनगें त्याच्या हातीं लागलें. ‘ बस्स. मिळाला जय एवढा पुरे, पळून गेलेल्या शत्रूचा कोण पाठलाग करितो ! ’ अशी हूल दाखवून तो त्याच तळावर कांहीं दिवस विश्रांति घेत राहिला. त्या अवधींत पळून गेलेल्या खंडेरावाच्या सैन्यास धीर येऊन तें एकत्र होऊन श्रीरंगपट्टणाजवळ बेफामपणें जमून राहिलें होतें. ती बातमी राखून निवडक फौजेनिशीं त्यानें मध्यरात्रीस जाऊन अकस्मात् त्यांवर छापा घातला, व त्या अव्यवस्थित सैन्यांत कत्तल व दाणादाण करून सातशें घोडे व बरीच लूट गोळा करून तो पूर्वस्थळास गेला. या नंतर चोंहोंकडे खंडेरावाच्या हातीं असलेलीं ठाणीं काबीज करण्यांत, खंडणी गोळा करण्यांत व आपलें सर्व सैन्य एकत्र जमा करण्यांत त्याचे कांहीं दिवस गेले. ती व्यवस्था झाल्यावर तो श्रीरंगपट्टणासमीप कावेरीच्या अलीकडच्या तीरीं येऊन उतरला आणि खंडेरावाशीं तहाचें बोलणें त्यानें सुरू केलें. मागच्या छाप्या नंतर खंडेरावानें पुनः सैन्य गोळा केलें होतें तें पलीकडे शहरच्या तटबंदीखालीं राहिलेलें होतें. त्यांत मुख्यत्वें पांच सहा हजार मराठे स्वार होते. लढाई बंद होऊन दोंहीं पक्षीं तह घाटत असतां हैदर दररोज आपल्या पलटणांची कवाईत नदीतीरीं करवीत असे. अशी कवाईत चालत असतां एके दिवशीं सायंकाळीं त्या

साऱ्या पलटणांसह अकस्मात् नदी ओलांडून तो पलीकडे शत्रूच्या फौजेवर वेगानें चालून आला. त्या वेळीं त्या सैन्याची लढण्याची कांहीं तयारी नसल्यामुळें त्याचा अगदीं मोड झाला, व त्याचा सारा गोट लुटला जाऊन तें वाट फुटली तिकडे पळून गेलें. आतां खंडेरावाच्या ताब्यांत फक्त राजधानी मात्र राहिली. ती घेण्याचा उद्योग सुरू करण्या पूर्वी हैदरानें राजास सांगून पाठविलें कीं, खंडेराव हा माझा नोकर आहे तो माझ्या हवालीं तुम्हीं केला पाहिजे. फौजेच्या खर्चा बद्दल सरकाराकडे माझी क्रोडों रुपये बाकी राहिली आहे, ती आतांच्या आतां मला मिळाली पाहिजे. या दोन गोष्टी अमलांत आल्यावर सरकारच्या मनांत जर मला नोकरीस ठेवावयाचें असेल तर मी राहीन. नाहींतर वाटेल तिकडे निघून जाईन.

हैदर मागत होता त्या पैकीं दहावा हिस्सा रक्कम देखील देण्याचें राजास सामर्थ्य नव्हतें. शिवाय सर्व रक्कम देण्याची न होणारी गोष्ट घडून आली असें धरिलें, तरी तो दुष्ट हैदर आणखी द्रव्य द्या, नाहीं तर राज्य बुडवितों; अशीच किंवा असल्या तऱ्हेची दुसरी एखादी कुरापत काढून सारें राज्य घेण्याचा आपला हेतु सिद्धीस नेणार नाहीं असें कशा वरून ? बरें, त्याच्याशीं लढाई करून त्याचें पारिपत्य करण्याची मसलत योजावी तर तें ही सामर्थ्य राहिलें नाहीं, व कोणाकडून कुमक होण्याची ही आशा नाहीं. तेव्हां राज्य ही जाणार व त्या बरोबर प्राण ही जाणार; त्या पेक्षां प्राण वांचवावे हें बरें, असा विचार करून राजानें खंडेरावास हवालीं करण्याचें कबूल केलें व आणखी असें ही कबूल केलें कीं, आपणास फक्त तीन लक्ष होन उत्पन्नाचा मुलूख खर्चा करितां तोडून द्यावा. तें उत्पन्न खाऊन आपण स्वस्थ बसूं. बाकीचें सर्व राज्य हैदरानें सांभाळावें, व त्याचा बंदोबस्त राखावा ! हा ठराव होतांच खंडेराव हैदराच्या स्वाधीन झाला. त्यानें त्यास मरेपर्यंत लोखंडाच्या पिंजऱ्यांत घालून बाळगिलें होतें ! या दिवसा पासून हैदर बाह्यात्कारें जरी राजाचा मानमरातब

उत्तमरीतीनें ठेवीत असे, व त्याचा आज्ञाधारक सेवक असें आपणास ह्मणवीत असे, तरी सारें राज्य त्याचेंच झालें होतें. खंडेरावाची फौज लुटून घेतल्यावर नंदराजाच्या ' सर्वाधिकारित्वा ' चा त्यास कांहीं उपयोग राहिला नव्हता; ह्मणून त्यानें त्या सर्वाधिकाऱ्याच्या हातीं पुनः जपमाळ देऊन त्यास पूर्वीच्या स्थळास या पूर्वींच लावून दिलें होतें! या प्रमाणें राजा, नंदराज, व खंडेराव यांचा निकाल लावून व राजधानी मध्यें आपला मेहुणा मखदुमअल्ली यास कांहीं निवडक व विश्वासू सैन्यासह बंदोबस्ताकरितां नेमून इ० स० १७६१ च्या सप्तंबर महिन्यांत हैदरअल्ली बेंगरूळास आला. या वेळीं त्यास तेथें जाण्याचें कारण पडलें तें असें—

नासिरजंग व मुजफरजंग हे मारिले गेल्यावर फ्रेंच लोकांनीं सलाबतजंगास हैदराबादच्या गादीवर बसविल्याचें पूर्वीं लिहिलेंच आहे. त्या सलाबतजंगाचे भाऊ निजामअल्ली व बसालतजंग यानीं कारभारांत बखेडे उत्पन्न करूं नये, ह्मणून त्यांस अनुक्रमें वऱ्हाड प्रांत व अदवानी सरकार यांची सुभेदारी देण्यांत आली होती. निजामअल्ली कांहींसा शूर व कारस्थानी होता, पण बसालतजंगाच्या अंगांत ह्मणण्या सारखें कर्तृत्व नव्हतें. अर्काट प्रांतीं इंग्रजांची सरशी होऊं लागल्यामुळें फ्रेंच लोक फिक्के पडत जाऊन त्यांस निजामाच्या राज्यांतून पाय काढावा लागला; त्यामुळें त्यांच्या बळावर राज्य करणारा सलाबतजंग निर्बल होऊन निजामअल्लीच्याच हातीं राज्याची सर्व सत्ता गेली. बसालतजंग हा निजामअल्लीस फार भीत असे. व त्या कारणानें तो पेशव्यांचा आश्रय व मर्जी संपादून अदवानी सरकारांत स्वस्थपणें आजपर्यंत राहत असे. परंतु आतां पानपतच्या युद्धामुळें मराठ्यांची सत्ता लयास गेली असें समजून त्यांचें निरनिराळ्या प्रांतांतील राज्य बळकाविण्यासाठीं त्या त्या प्रांतींचे संस्थानिक वगैरे खटपट करीत होते, त्या संधींत या बसालतजंगास ही धीर येऊन तो आपली फौज घेऊन मराठ्यांचा कर्नाटकांतील मुलूख जिंकण्यास निघाला. प्रथम तो शिरें

घेण्याचा बेत करून त्या किल्ल्या नजीक आला. पण तेथें त्याची कांहींच डाळ न शिजल्यामुळें तो होसकोट्यास गेला व त्या किल्ल्यास वेढा घालून बसला. तो किल्ला सामान्य प्रतीचाच होता व आंत मराठ्यांची शिबंदी ही विशेष नव्हती. पण जी होती तिनें अशा हिमतीनें किल्ला झुजविला कीं, बसालतजंगास वेढा उठवून निघून जाण्याचा प्रसंग आला. अदवानी हें स्थळ कर्नाटकच्या ईशान्यभागीं आहे. तेथून तो बसालतजंग जेव्हां आपल्या लष्करासह दक्षिणेस होसकोट्याकडे येऊं लागल्याची बातमी हैदरास कळली तेव्हां त्याच्या मनांत आलें कीं, होसकोटें घेण्याची हूल दाखवून बेंगरुळास उपद्रव देण्याचें बसालतजंगाच्या मनांत कशावरून नसेल ? कारण होसकोटें व बेंगरुळ यांमध्यें काय तें अठरा मैल अंतर आहे. ही शंका मनांत आल्यामुळें हैदर बेंगरुळास आला होता. होसकोटेंकर आपणास बधत नाहींतसें पाहून बसालतजंगानें हैदरास आपल्या मदतीस बोलाविलें. हैदराचें जरी आतां वैभव व सामर्थ्य मोठें होतें तरी आपण पूर्वीं पायदळामध्यें ' नाईक ' होतों या गोष्टीचें स्मरण होऊन त्याच्या मनास खंती वाटे, व पैसे भरून सुद्धां किताब व जहागीर मिळाली तर मिळवावी अशी त्यास इच्छा झाली होती. किताब व जहागीर देण्याचा अधिकार दिल्लीच्या बादशहाचा दक्षिणेंतील सहा सुभ्यांवरचा सुभेदार निजामउल्मुलूख याचा होता. तो निजाम मरून गेल्यावर हल्लीं त्याच्या गादीवर असलेला निजामअल्ली यानें ही तो अधिकार माझा आहे, म्हटलें असतां साजण्या जोगें नव्हतें असें नाहीं. पण निजामअल्लीच्या दरबारीं वशिले बांधून पाण्या सारखा पैसा खर्चून मिळणारे किताब किंवा जहागिरी हैदरास नको होत्या ! त्यानें बसालतजंगास सांगून पाठविलें कीं, मी निजामअल्लीस जाणीत नाहीं. माझ्या कार्या पुरता तूंच हैदराबादचा नबाब झालास तरी चालेल. मी तुला ' हैदराबादेचा नबाब ' व ' दक्षिणच्या सहा सुभ्यांवरचा सरसुभेदार ' ह्मणतों इतकेंच नाहीं; तर तुला तीन लाख

रुपये नजराणा ही देतों; ही माझी सेवा मान्य करून घेऊन तूं मला ' शिऱ्यांचा नबाब ' अशी पदवी दे ! हें तूं करीत असशील तर तुझी कुमक करून होसकोटें सुद्धां घेऊन देईन. या राजकारणांत बसालतजंगाचा सर्वच बाजूनीं फायदा होता. अर्थात् या ह्मणण्यास तो कबूल झाला व ठरल्या प्रमाणें नजराणा घेऊन त्यानें शिऱ्यांची नबाबी उर्फ सुभेदारी हैदरास दिली ! शिऱ्यांचा सुभा होता मराठ्यांकडे, तो देणार बसालतजंग आणि घेणार हैदर ! असो. इतकें झाल्यावर हैदरअल्ली बेंगरूळाहून होसकोट्यास आला, थोड्याच दिवसांत त्यानें तो किल्ला घेऊन बसालतजंगाच्या हवालीं केला. नंतर ते दोघे बाळापुर घेऊन शिऱ्यांस आले. या स्वारींत हैदराजवळ सात हजार स्वार, नऊ दहा हजार गारदी, हजार बाराशें गोरे फ्रेंच शिपाई व सुमारें लहान मोठ्या दीडशें तोफा, इतका सरंजाम होता. शिवाय बसालतजंगाची स्वार व गारदी मिळून सहा हजार फौज होती. एवढ्या समुदाया पुढें शिरेंकरांचें काय चालणार ? तो किल्ला व सुभ्याची राजधानी हैदराच्या हातास थोड्याच दिवसांत लागल्यामुळें तो आतां खरोखरच ' शिऱ्यांचा नबाब ' बनला. त्यानंतर बसालतजंग अदवानीकडे इ० स० १७६२ च्या प्रारंभीं निघून आला. परंतु या नवीन मिळालेल्या सुभेदारीचा अंमल हैदरास अजून सर्व सुभ्यावर बसवावयाचा होता, तो उद्योग त्यानें आतां झपाट्यानें सुरू केला. बाळापुराजवळच चिकबाळापुर ह्मणजे धाकटें बाळापुर हें शहर आहे. तेथील संस्थानिकानें मुरारराव घोरपड्याचा स्नेह संपादिला होता. घोरपड्याचा मुलूख चिकबाळापुरकरा प्रमाणेंच शिऱ्यांच्या सुभ्यास लगत असल्यामुळें हैदराच्या शेजारा पासून त्या दोघांस उपद्रव होऊं लागला, आणि स्वसंरक्षणासाठीं त्या दोघांस एकत्र होऊन हैदराशीं झुजण्या करितां कंबर बांधावी लागली. बरेच दिवस युद्ध होऊन शेवटीं त्या दोघांचा ही हैदरानें पराजय केला, आणि चिकबाळापुर काबीज करून तेथील संस्थानिकास जवळच नंदिदुर्ग

ह्मणून पहाडी किल्ला आहे, त्याच्या आसऱ्यास जाणें भाग पाडिलें. आणि घोरपड्या पासून मडकशिरें, कोडिकोंडा, व पेनकोंडा हीं ठाणीं घेतलीं. या प्रमाणें त्या दोघांस हतप्रभ केल्यावर पूर्वी औरंगजेबाच्या सुभ्यास (विजापुर कर्नाटक या पोटसुभ्यास) ज्या संस्थानिकांच्या खंडणीचें उत्पन्न लावून दिलेलें होतें, त्या संस्थानिकां पासून ती खंडणी 'शिऱ्याचा नबाब' या नात्यानें आतां वसूल करण्याचा त्यानें बेत केला. या संस्थानिकांत रायदुर्ग, हरपनहळ्ळी, आणि चित्रदुर्ग येथील संस्थानिक प्रमुख होते. त्यां पैकीं रायदुर्गकरानें आपण होऊन हैदराकडे खंडणी पाठविली, याबद्दल त्यावर त्याची मर्जी सुप्रसन्न झाली. दरडावणीचें पत्र जातांच हरपनहळ्ळीकराकडून ही खंडणी आली. पण हैदरास चित्रदुर्गकरानें जुमानिलें नाहीं, यामुळें त्याच्या मुलखावर स्वारी करून हैदरानें त्यास जर्जर केलें आणि त्यां पासून खंडणी घ्यावयाची ती घेऊन शिवाय दोन लक्ष होन दंड घेतलो ! नंतर चित्रदुर्गकराची व हैदराची भेट झाली, व तींत एक नवीनच राजकारण निष्पन्न झालें. या राजकारणापासून हैदरास पराकाष्ठेचा फायदा व्हावयाचा होता. तें राजकारण असें—

बिदनूरचा राजा बसवाप्पा नाईक हा इ० स० १७९९ त मरण पावला. त्याच्या गादीवर त्याचा दत्तक पुत्र चनबसवय्या यास बसविण्यांत आलें होतें. त्याचें वय सतरा वर्षांचें असल्यामुळें तो प्रौढ होई तों त्याची आई ह्मणजे नुकताच मेलेला राजा बसवाप्पा नाईक याची बायको व निंबय्या नांवाचा प्रधान राज्याचा कारभार चालवीत होतीं. ती राणी त्या प्रधानाबरोबर व्यभिचार कर्म करीत असे. अगदीं उघडपणानें हा बेशरमपणाचा प्रकार चालत असे, तरी लोक त्यांची छी थू करण्यास भीत असत. कारण त्यांच्या हातीं राज्याचा सर्व अधिकार गेला होता, व राज्या-

---

१ सदर मजकूर विल्क याच्या इतिहासावरून घेतला आहे. ऐ.ले.सं.नं० ३८५ च्या पत्रांतील मजकूर थोडा निराळा आहे तो पहा.

चा खरा वारस होता तो निर्माल्यवत् झाला होता. एके दिवशीं राजा चनबसवय्या यानें या घाणेरड्या कृत्याबद्दल आईची कानउघाडणी करण्याचें साहस केलें. त्यावरून तिला संताप आला व त्याचा जीव घेण्याचा बेत करून तो पार पाडण्याचें काम तिनें एका जेठीस ह्मणजे पहिलवानास सांगितलें. त्या पहिलवानानें स्नानगृहामध्यें त्या दुर्दैवी राजाच्या अंगास 'मालिश' करितां करितां मान मुरगाळून त्याचा जीव घेतला. त्या नंतर सोमशेखर नांवाच्या एका मुलास दत्तक घेऊन गादीवर बसवून ती राणी निंबय्याच्या मदतीनें पूर्वी प्रमाणें कारभार चालवूं लागली. हल्लीं चित्रदुर्गकराची व हैदराची भेट झाली तेव्हां त्या संस्थानिकानें हैदरास कळविलें कीं, "मजकडे एक तरुण मनुष्य नुकताच आला आहे तो ह्मणतो कीं, मी बिदनूरचा राजा चनबसवय्या आहें. जेठीनें मला ठार मारल्याचें माझ्या आईजवळ सांगितलें तें सर्व खोटें आहे. त्याणें मजवर दया करून पांच वर्षें पर्यंत मला आपल्या घरांत कोंडून ठेविलें होतें. तेथून निसटून मी आतां तुमच्या आश्रयास आलों आहें. तुम्हीं बिदनुरावर फौजेसह स्वारी करून मला गादीवर बसवा!" त्या संस्थानिकाचें हें बोलणें ऐकून हैदरानें तत्काळ त्या मनुष्यास बोलावून आणून विचारपूस केली, त्यांत तो लुच्चा मनुष्य असल्याबद्दल त्याची खात्री झाली. परंतु बिदनूरचें राज्य घ्यावयास हें सोंग उपयोगीं पडेल, असा विचार करून त्यानें त्या तोतयास आश्वासन दिलें कीं, तूं खरोखरीच बिदनूरचा राजा आहेस या बद्दल माझी पक्की खात्री झाली आहे. मी लवकरच सर्व सैन्यासह बिदनुरावर स्वारी करून तुला तुझ्या बापाच्या गादीवर बसवितों.

या प्रमाणें मसलत ठरल्यावर इ० स० १७६३ च्या प्रारंभीं हैदर आपलें व चित्रदुर्गकराचें सैन्य बरोबर घेऊन बिदनूरच्या स्वारीस निघाला. त्या प्रांतांत शिरतां क्षणींच आधीं त्यानें त्या तोतयाकडून जाहीरनामे लावविले कीं, "आपण बिदनूरच्या गादीचे खरे वारस आहों. सर्व लोकानीं

आम्हांस येऊन मिळालें पाहिजे. येतील त्यांस बक्षीस मिळेल, व न येतील त्यांस शिक्षा केली जाईल." वाटेंत शिमोग्याचा किल्ला लागला तो हैदरानें घेतला, तेव्हां तेथें त्यास एक लक्ष होन सांपडले. राणीनें याच ठिकाणीं त्यास सांगून पाठविलें होतें कीं, तुम्हीं परत जाल तर मी तुह्मांस चार लक्ष होन देईन. परंतु तिचें ह्मणणें न ऐकतां तो पुढें चाल करूं लागला. बिदनूर पासून पंधरा कोसांवर कुमसी हें ठाणें आहे तें त्यानें घेतलें, तेव्हां बिदनूरचा माजी कारभारी लिंगण्णा ह्मणून तेथें कैदेंत होता तो त्याच्या हातीं लागला. त्या कारभाऱ्यानें राजधानीस जाण्याच्या चोर वाटा हैदरास माहीत करून दिल्या व कोठें किती द्रव्य मिळेल ही माहिती ही त्यास दिली. तेथून पुढें अडीच कोसांवर अनंतपुरचें ठाणें आहे तें त्यानें जातां जातां घेतलें. तेथें राणीकडून पुनः निरोप आला कीं, चवदा लक्ष होन देत्यें, तुम्हीं परत जा. शेवटीं अठरा लक्षां पर्यंत रक्कम देण्यास ती कबूल झाली. पण लिंगण्णानें त्यास सांगितलें कीं, सारें राज्य आणि या पेक्षां दशपट द्रव्य तुम्हांस मिळेल. तुम्हीं पुढें चला! वाटेंत शेंपन्नास लोकांची एक चौकी लागली तींतील सर्व लोकांस हैदरानें धरून त्यांचे नाक कान कापून त्यांस सोडून दिलें. ते लोक बिदनुरास पोंचतांच तेथें गडबड उडाली. हजारों लोक भयानें शहर सोडून रानांत पळून गेले. शत्रूचें सैन्य अगदीं समीप ठेपलेंसें पाहून राणी व तिचा जार यांस पराकाष्ठेचें भय वाटलें आणि तीं सर्व मालमत्ता टाकून पळून गेलीं. नंतर निरनिराळ्या वाटानीं हैदराचें सारें सैन्य बिदनुरास येऊन पोंचलें. हैदरानें शहरांत लुटालूट होऊं दिली नाहीं. नाक्या नाक्यावर पहारे ठेऊन शहरांतील प्रत्येक मोठ्या घरास कुलूप घालवून व्यवस्थित रीतीनें त्या प्रत्येक घरांतील मालाची मोजदाद करविली. त्यावेळीं त्यास एकंदर एक कोटी वीस लक्षांच्या किमतीचा माल मिळून अजबाब सांपडला! बिदनूरच्या राज्याची पूर्व सीमा चित्रदुर्गच्या राज्यास लागली होती. तेथपासून तें

पश्चिमेस समुद्रापर्यंत पसरलें होतें. हें सर्व राज्य कांहीं एक प्रयास न पड- तां त्याच्या स्वाधीन झालें. त्यानें ती दुष्ट राणी, तिचा जार, बाळराजा सोमशेखर व तो तोतया या सर्वांसच पकडून शिरें प्रांतीं मदगिरी नामक पहाडी किल्ल्यावर कैदेंत टाकिलें. बिदनूरचें राज्य जिंकिल्यामुळें हैदराचा अतिशय उत्कर्ष झाला. हें राज्य व शिऱ्यांचा सुभा व बेंगरूळ माझें खा- सगत ह्मणजे 'स्वराज्य' असून बाकीचें माझ्या अमलाखालीं आहे तें म्है- सूरच्या राजाचें आहे असें तो म्हणत असे. ज्या शहरांत नव्वद हजार घरें आहेत त्यासच 'नगर' ही संज्ञा देण्याची पूर्वी वहिवाट होती. पूर्वींच्या राजांच्या मनांत बिदनूर शहरास 'नगर' संज्ञा देण्याच्या योग्यतेस आ- णावें असें होतें. घरांची संख्या तितकी होण्या सारखा जरी त्या शहराचा उत्कर्ष हैदराच्या अमलाखालीं कधीं झाला नाहीं, तरी त्यानें बिदनुरास एव्हां पासूनच 'हैदरनगर' असें नांव दिलें. त्यानें तेथें टंकसाळा स्था- पन करून 'हैदरी' व 'बहादुरी' होन पाडण्याची सुरुवात केली. या नवीन राज्यांत समुद्रकांठीं होनावर बंदर होतें तेथें त्यानें गोदी बांधविली, व आरमार तयार करण्यास हुकूम दिला. बिदनूर प्रांत घांटमाथ्यावर आहे तेथें वर्षांतून नऊ महिने मनस्वी पाऊस पडतो, व तीन महिने मात्र उ- घाडी असत्ये. यामुळें तेथें नवीन गेलेल्या मनुष्यास हिंवताप पछाडल्या- शिवाय रहात नाहीं. या हिंवतापानें हैदर ही बरेच दिवस आजारी पडला होता. त्या संधींत त्यास ठार मारून त्याच्या जाचांतून आपला देश मुक्त करण्याचा बिदनूरच्या लोकानीं बेत केला. हैदराचे कित्येक कारभारी ही या फंदांत मिळाले होते; त्या बातमीचा कांहीं सुगावा त्यास कळल्या ब- रोबर त्यानें चौकशी करण्याविषयीं कारभाऱ्यांस ताकीद केली. पण तेच मुळीं त्या फितुरांत प्रमुख असल्यामुळें त्यानीं चौकशीचा फार्स केल्यासारखें करून त्यास येऊन कळविलें कीं, फितुरबितुर कांहीं एक नाहीं; उगीच कोणी लबाड मनुष्यानें ही गप्प उठविली आहे. पण ही त्यांची लुच्चेगिरी

त्या पाताळयंत्री हैदरापुढें कशी चालणार! त्या प्रसंगीं तो बिछान्यावर तापाच्या गुंगींत पडून राहिला होता, व त्यास सपाटून हिंव भरलें होतें, तरी त्यानें त्या कारभाऱ्यांचें तत्काळ कपट ओळखिलें व त्यांस घटकाभर आपणाजवळच बसवून ठेविलें. नंतर त्यानें हिंव उतरल्याबरोबर स्वतः दरबारांत बसून पुनः चौकशी करून त्या कारभाऱ्यांस आपणापुढें आणवून त्या कृष्णकारस्थानाचें माप त्यांच्या पदरांत घातलें, आणि त्याचवेळीं त्यांस आपल्या तंबू समोर फांशीं दिलें! एवढेंच करून तृप्त न होतां त्यानें संध्याकाळ झाली नाहीं तों या कटांतील प्रमुख प्रमुख तीनशें असामींस धरून शहरच्या नाक्या नाक्यावर नेऊन फांसावर चढाविलें! त्या दिवसा पासून पुढें बिदनूरच्या राज्यांत फितूर अथवा दंगा ह्मणून कधीं झालाच नाहीं.

बिदनूरच्या वायव्येस कारवार जिल्ह्यांत सोंधें संस्थान होतें तें घेण्या साठीं हैदरानें मीरफैजुल्लाखाना बरोबर कांहीं सैन्य १७६३ च्या दिसेंबरांत रवाना केलें. ती फौज येतांच सोंध्याचा संस्थानिक गोव्याच्या पोर्तुगीज लोकांकडे पळून गेला. त्याचीं ठाणीं व तालुके हैदराच्या सैन्यानें थोडक्याच दिवसांत काबीज करून त्या संस्थानांत त्याचा अंमल बसविला.

गेल्या तीन वर्षांत हैदरअल्लीनें मराठ्यांचें फारच नुकसान केलें असतां ही त्यानीं त्याचा कांहींच प्रतीकार केला नाहीं; याचें कारण या अवधींत त्यांचे आपसा मध्यें तंटे चालू होते त्यामुळें व मोंगलाशीं त्यांस दोन वेळ सारखें कित्येक महिने युद्ध करावें लागल्यामुळें हैदराचा चांगला समाचार घेण्यास त्यांस फुरसतच सांपडेना! शिऱ्यांचा सुभा नानासाहेब पेशव्यानीं घेतल्यापासून पुरता तीन वर्षें ही त्यांचा अंमल तेथें नांदला नाहीं तोंच तो मराठ्यांचा 'स्वराज्या' पैकीं प्रदेश हैदरानें घेतला. चित्रदुर्ग वगैरे संस्थानांच्या खंडण्या 'शिऱ्यांच्या सुभ्याचे मालक' या नात्यानें त्यांस दर वर्षास मिळावयाच्या त्या ही त्यानें त्यांच्या मांडलिक संस्था-

निजांपासून बळजबरीनें घेतल्या. बिदनूर व सोंधें येथील खंडणी शिवाजी महाराजांस मिळत असे. त्यानंतर ऐशीं नव्वद वर्षें ती बंद असतां ही नानासाहेब पेशव्यानीं नुकतीच पुनः घेण्याची वहिवाट पाडिली होती. परंतु तीं दोन्ही राज्यें आतां हैदरानें घेतल्यामुळें तिकडून खंडणी घेण्याचा मार्ग खुंटला. नुसती बिदनूरची खंडणीच दरसाल दहा बारा लाख रुपये येत होती[१]. हैदरानें मराठ्यांचें एकंदरींत आजपर्यंत किती नुकसान केलें होतें, हें पुणें दप्तरावरून कळण्या जोगें आहे. परंतु तें साधन आम्हांस उपलब्ध न झाल्यामुळें नक्की आंकडा सांगतां येत नाहीं. तथापि तें दरसाल पन्नास लक्षां पेक्षां कमी नसावें असा आमचा अजमास आहे. तेव्हां एवढी हानि होत असतां मराठे लोकांस त्याची कांहींच फिकीर वाटत नसेल असें कसें होईल ? परंतु हैदराचें पारिपत्य करण्या सारखा निर्वेधपणा व स्वस्थपणा पुणें दरबारास त्या तीन वर्षांत मिळालाच नाहीं. १७६२ च्या मार्च एप्रिल महिन्यांत रावसाहेब पेशवे व त्रिंबकराव मामा पंचवीस तीस हजार फौजेसह कर्नाटकच्या स्वारीस आले होते, ते धारवाड जिल्ह्यांत व हलयाळ सांबराणीकडे खंडण्या घेत घेत तुंगभद्रा उतरून हरपनहळ्ळी पर्यंत गेले होते. परंतु पावसाळा समीप आल्यामुळें कांहीं विशेष गोष्ट त्यांच्या हातून न घडतां त्यांस परत यावें लागलें. त्या नंतर चार महिन्यानीं राव साहेब व दादासाहेब यांमध्यें कलह होऊन दादासाहेब सैन्य जमा करून बंड करण्याच्या विचारांत होते, व बाबूराव फडणीस व त्रिंबकराव मामा पुण्यांत कारभार करीत होते; त्यावेळीं कर्नाटकांत फौज पाठविण्याचा पुण्याच्या दरबारीं विचार चालला होतासें दिसतें[३]. परंतु पन्नास हजार फौज व तोफखाना आणि लाख रुपयांचा खजिना इतकी सामुग्री गोविंद हरीच्या अजमासा प्रमाणें या स्वारी करितां पाहिजे होती; आणि ती तयार करण्याचें

---

१ ऐ. ले. संग्रह पत्र नंबर ५६. २ ऐ. ले. संग्रह पत्रें नं० ६३ पासून ६७ पर्यंत. ३ ऐ. ले. संग्रह पत्र नं० ६८

त्या दरबाराच्यानें होईना, तेव्हां अर्धांतच ती मसलत राहिली. ही स्वारी हैदराचें पारिपत्य करण्या कारितांच व्हावयाची होती व तीस काय काय साधनें पाहिजेत याचा अजमास त्यावेळीं जो करण्यांत आला होता, त्या वरून एव्हां पासूनच हैदराच्या अक्कलेचा, आणि सामर्थ्याचा मराठ्यांवर दरारा बसत चालला होता हें उघड होतें. त्यानंतर चुलते पुतण्यांचें युद्ध होऊन दादासाहेब व सखारामबापू यांची सरशी झाली, आणि त्यां बरोबर पेशवे व त्यांचे सरदार ह पन्नास हजार फौज पटवर्धनां पासून मिरज घेण्याकरितां निघाली. तो किल्ला घेतल्यावर हें सारें सैन्य किंवा निदान त्याचा कांहीं भाग मुकाबला घेण्या करितां कर्नाटकांत जावयाचें होतें[1], पण त्यावेळीं निजामअल्लीशीं युद्ध सुरू करण्याचा प्रसंग आला. तें युद्ध सहा महिने चालू होतें. त्या युद्धांत मोंगल व मराठे गुंतल्यामुळें त्या दोघांचें ही राज्य बळकाविण्यास हैदरास उत्तम संधी सांपडली ! आपल्या मुलखास उपद्रव न देण्या विषयीं त्यास निजामअल्लीनें ताकीद दिली, पण तिला तो कोठें जुमानीत होता ! मराठे तर त्यास अलीकडे अगदींच तुच्छ वाटूं लागले होते !

कावेरी पासून तुंगभद्रे पर्यंत सर्व मुलखांत त्याचा अंमल बसलाच होता. आतां त्यास अशी इच्छा उत्पन्न झाली कीं, सारें उत्तर कर्नाटक जिंकून आपल्या राज्याची हद्द कृष्णेपर्यंत आणून भिडवावी ! त्याचा हा मनोरथ सिद्धीस जाण्यास या वेळीं पुष्कळ गोष्टी अनुकूल होत्या. उत्तर कर्नाटकांत धारवाड, बेळगांव व विजापूर हे जिल्हे येतात. या मुलखाचे बरेच तालुके पेशव्यांनीं निरनिराळ्या सरदारांस जहागीर दिले होते. तोंडावर धारवाड जिल्हा आहे त्यांत कांहीं अंमल पेशव्यांचा, कांहीं पटवर्धनांचा व कांहीं सावनूरच्या नबाबाचा होता. अलीकडे दादासाहेबानीं प-

---

१ ऐ. ले. सं. पत्रें नं० १५२, १६९, १७४, १७६, १७७, १७८, १७९.

२ ऐ. ले. सं. पत्र नं० २२१.

टवर्धनांची जहागीर गोपाळराव बर्व्यास दिली होती, पण ती सोडण्याचें पटवर्धनांच्या मनांत नव्हतें. त्यामुळें बर्वे व पटवर्धन यांत झोंबाझोंबी बरेच दिवस चालून कांहीं ठाणीं बर्व्याकडे गेलीं व कांहीं पटवर्धनांकडे राहिलीं. हा सर्व मुलूख मराठ्यांच्या ताब्यांत नुकताच आला असल्यामुळें तेथील जमीदारांवर व इतर लोकांवर त्यांची बसावी तशी कदर बसलेली नव्हती. मुख्य गोष्ट ही कीं, मराठ्यांवर कधीं दक्षिणेकडून परचक्र आलेलें नव्हतें. त्यांवर काय स्वाऱ्या व्हावयाच्या त्या मोंगलांच्या, आणि अर्थात् त्या उत्तरेकडून व्हावयाच्या. या कारणामुळें दक्षिण सरहद्दीवर कायम राहणारी त्यांची ह्मणण्या सारखी फौज नव्हती व ठाण्यांचा बंदोबस्त ही इतर प्रांतांच्या मानानें ढिलाच होता.

सावनूरकर नबाब हा पेशव्यांचा मांडलिक होता. त्यास आपणाकडे वळवून घेण्या साठीं हैदरानें बराच प्रयत्न केला; पण त्या नबाबास हैदराची कीर्ति अलीकडे चांगलीच माहीत झाली असल्यामुळें व तुंगभद्रे पलीकडील संस्थानिकांची त्यानें काय काय दुर्दशा केली, हें ही त्यास प्रत्यक्ष दिसत असल्यामुळें त्यानें सख्य करण्याचें किंवा त्यास खंडणी देण्याचें साफ नाकारिलें. तेव्हां सन १७६३ च्या एप्रिल महिन्यांत हैदरानें पांच हजार गारदी व पांच हजार स्वार अशी फौज मीरफैजुल्ला बरोबर सावनूरच्या राज्यावर स्वारी करण्या कारितां पाठविली, आणि मागून बाकीच्या फौजेसह बिदनुराहून निघून तो स्वतः तुंगभद्रेच्या आसपास तळ देऊन राहिला. मीरफैजुल्लानें येतांच रटेहळ्ळी व मासनूर हीं ठाणीं घेतलीं. बाकीच्या हावेरी व देवगिरी वगैरे ठाण्यांस ही त्याचा शिलशिला सुरू झाला, तेव्हां तीं क्रमाक्रमानें त्याच्या हातीं लागलीं. सावनूरचा नबाब अबदुलहकीमखान यानें ही फौज जमविण्याची तजवीज केली आणि भास्करराव नरगुंदकर, दौलतराव घोरपडे गजेंद्रगडकर, व मनोळीकर शिंदे यांस कु-

ऐ. ले. सं. पत्रें नं० २८६, २९१.

मकेस बोलाविलें. नंतर तो नबाब व हे मराठे सरदार मिळून सात आठ हजार फौजेनिशीं मीरफैजुल्लाच्या मुकाबल्यास निघाले; तेव्हां त्यानें भ्याल्यासारखें दाखवून एका ठाण्यांत आपणास कोंडून घेतलें. हें पाहून ते फारच फुरारले व त्या ठाण्यास वेढा घालून बसले. तो मीर वारंवार आपले बारीक सारीक पराजय करून घेई व दिवसें दिवस अधिक अधिक जेर होत चाललों असा भाव दाखवी; परंतु त्याचा आंतला कावा अगदीं निराळा होता. वेढा घालणारे पक्के बेफाम झाले आहेत असें पाहून त्यानें गुप्तपणें हें वर्तमान हैदरास कळविलें. त्या बरोबर हैदर निवडक सैन्य व तोफांचा उत्तम सरंजाम बरोबर घेऊन निघाला, तो त्या ठाण्या जवळच एका डोंगरा आड येऊन लपून बसला. दुसरे दिवशीं मीरफैजुल्लानें ठाण्यांतून बाहेर पडून सावनूरकर व त्याचे सोबती यांवर हल्ला केला. उभयपक्षीं युद्ध होत असतां दुसऱ्या बाजूनें हैदर आला; त्यानें येतांच शत्रूंवर तोफांचा भडिमार केला व त्या बरोबर पलटणें होतीं त्यांनीं बंदुकांचा मार झपाट्यानें सुरू केला; तेव्हां नबाब व मराठे सरदार यांच्या सैन्याची दाणादाण होऊन फार लोक मारिले गेले, आणि जे जिवंत राहिले त्यांनीं आपापल्या ठिकाणाकडे पळ काढिला. अशी दुर्दशा झाल्यावर नबाब मोठ्या कष्टानें जीव बचावून सावनुरास आला, आणि शहरचे दरवाजे लावून घेऊन स्वस्थ बसला. इतक्यांत मागून सर्व सैन्यासह हैदर ही तेथें आला व थोडक्याच दिवसांत सावनूर त्यानें काबीज केलें. नंतर नबाब अबदुलहकीमखान निरुपाय होऊन हैदरास शरण आला व खंडणी देऊन हैदराचा अंकित ह्मणवून घेण्यास कबूल झाला. हैदरानें दोन लक्ष होन खंडणी घेण्याचा ठराव केला, त्या पैकीं सत्तर हजार होनांचा नबाबानें भरणा केला. फक्त नबाबाचा वाडा मात्र त्याकडे ठेऊन बाकी सर्व शहरांत हैदरानें गारद्यांच्या चौक्या ठेविल्या.

---

१ ऐ. ले. सं. पत्र नं० ३१६.

हैदरअल्लीवर पहिली स्वारी

सावनुरापासून तीन कोसांवर बंकापुर आहे. तो किल्ला पटवर्धनांच्या जहागिरींत होता व त्यांच्या तर्फे तेथें गोविंदपंत सखदेव ह्मणून किल्लेदार होता. तो किल्ला घेण्याचें हैदराच्या मनांत येऊन त्यानें त्यास वेढा घातला. देशाहून कुमक येईल या आशेवर गोविंदपंतानें हिंमत धरून सव्वा महिना पर्यंत किल्ला झुजविला. परंतु त्याची कोणीच कुमक केली नाहीं, तेव्हां निराश होऊन बंकापुर शत्रूच्या हवालीं करणें त्यास भाग पडलें. त्या किल्ल्यांत हैदराचा कांहीं दिवस मुक्काम झाला. त्या अवधींत मातबर सरदार मध्यस्थीस घालून इमान प्रमाण करून सावनूरच्या नबाबास त्यानें भेटीस बोलाविलें. नबाबास हैदराचा घातकी स्वभाव माहीत होता. त्यास शंका आली कीं, भेटीच्या निमित्तानें बोलावून नेऊन कैद करावें किंवा जीवें मारावें असा या दुष्टाचा बेत कशावरून नसेल ? तेव्हां जावें तरी कठिण, न जावें तरी कठिण, अशी त्यास पंचाईत येऊन पडली. शेवटीं होईल तें होवो, भेटीस हें जावयाचेंच, पण कसा ही बिकट प्रसंग आला तरी आपली तयारी असावी; अशा बेतानें सर्व सिद्धता करून नबाब बंकापुरास गेला; आणि आपण भेटीस बोलाविल्या प्रमाणें आलों आहों असें त्यानें हैदरास सांगून पाठविलें. पण " आतां संध्याकाळ झाली आहे, तुम्हीं आपल्या गोटास जाऊन उतरा, उद्यां भेट घेऊं, " असा त्याचा निरोप आला. दुसरे दिवशीं नबाबाचे दोघे बंधु बरोबर होते त्यांस हैदरानें भेटीस बोलाविलें. तेव्हां ते जिवास जीव देणारे पन्नास हत्यारबंद पठाण बरोबर घेऊन भेटावयास गेले. इतक्यांत कोणी हैदरास सांगितलें कीं, मागें या नबाबाच्या बापानें दक्षिणच्या सहा सुभ्यांचा सुभेदार नासीरजंग यास गोळी घालून ठार मारिलें. याच्याच घराण्यांतल्या कडप्याच्या नबाबानें त्याच योग्यतेच्या दुसऱ्या एका सुभेदाराचा ह्मणजे मुजफरजंगाचा खून केला. अशी ही पठाणांची जात खुनशी आहे. ज्या अर्थीं हें बायका पोरें

---

१ ऐ. ले. सं. पत्र नं० ३४३, ३५२.

व सारें खटलें बरोबर घेऊन आलेले आहेत त्या अर्थीं हे जिवावर उदार झालेले दिसतात. भेटीस आले ह्मणजे हे तुला मारिल्या शिवाय सोडीत नाहींत ! हें ऐकतांच त्याचें मन कचकरलें, आणि नबाबाच्या भावांस त्यानें सांगून पाठविलें कीं, फक्त तुम्हीं दोघे असामी भेटीस या, इतरानीं येण्याचें कारण नाहीं. ती गोष्ट त्यांस पसंत पडली नाहीं यामुळें ते माघारे गोटास आले. हैदराच्या मनांत दगा करावयाचा आहे असा नबाबास कांहींसा संशय होताच, पण त्यास आतां सावनुराहून जी बातमी कळली तिजवरून तो संशय पक्काच झाला. ती बातमी अशी होती कीं, नबाब शहरांतून गेल्या नंतर त्याच्या वाड्यावर हैदराच्या गारद्यानीं हल्ला केला. जनानखान्यापर्यंत ते चालून गेले होते. इतक्यांत शिरहट्टीकर देसाई व खानजादे व पठाण लोक वाड्यांत होते त्यानीं मारामार करून शें दीडशें गारदी कापून काढिले व दोनशें पर्यंत जखमी केले. तेव्हां ते गारदी वाडा सोडून गेले. ही बातमी पसरतांच नबाबाच्या गोटांत चळवळ होऊं लागली. चित्रदुर्ग व हरपनहळ्ळी येथील संस्थानिकांनीं नबाबास सांगून पाठविलें कीं, तूं घाबरूं नको. आम्हीं तुझे सोबती आहों ! या प्रकरणांत मध्यस्थ होते ते ही हैदरास ह्मणूं लागले कीं, नबाबास आमच्या मध्यस्थीनें भेटीस बोलावून मागें त्याच्या राजधानींत तूं असा दगा केलास, व हल्लीं ही त्याच्या गोटावर हल्ला करण्या साठीं तुझीं पलटणें तयार होत आहेत, तेव्हां आतां आम्हांस तर बेइमानी करितां येत नाहीं. आम्हीं नबाबाची कुमक करूं ! आपली मसलत नासत चाललीसें पाहून हैदरानें पलटणाचा हल्ला मना केला, नबाबाचें सामोपचाराच्या चार गोष्टी सांगून सांत्वन करविलें, आणि सावनुरांतून गारदी उठवून आणून ‘ आमच्या हुकमाखेरीज तुम्हीं हा दंगा केला ’ असा खोटाच आळ त्या गारद्यांवर आणून त्यां पैकीं चौघांचे हात तोडविले ! मग उभयपक्षीं स्वस्थता झाली. एक लक्ष तीस हजार होन खंडणीची बाकी होती तिजबद्दल सावकारी निशा देऊन

नवाब सावनुरास आला. निशे प्रमाणें रकम पदरीं पडतांच ठाणीं सोडून देण्याचें हैदरानें कबूल केलें.

बंकापुरचा बंदोबस्त उत्तमरीतीचा असावा असें हैदराच्या मनांत आल्यावरून त्यानें त्या किल्ल्याची चांगली दागदुजी केली, भोंवता खंदक खणविला, धान्य व दारूगोळी वगैरे जाकिरा सामानाची तरतूद केली, आणि गारदी वगैरे पांच हजार माणूस किल्ल्याच्या रक्षणार्थ ठेवून त्यांवर परशुराम घोरपडे सांवशीकर हा सरदार नेमिला. हुबळी व मिश्रिकोट हीं दोन ठाणीं या पूर्वींच त्याच्या हातीं आलीं होतीं.[२] बहिरीससाणा आला ह्मणजे जशी चिमण्यांची गाळण होत्ये तद्वत् हैदर आसपास आला ह्मणजे शत्रूच्या मुलखांतील जमीदार व संस्थानिक व किल्लेदार वगैरे लोकांची गाळण होत असे. याचें कारण त्याची दिवसेंदिवस वाढत असलेली सत्तावत हें होय. आजपर्यंत त्याचा पराजय ह्मणून कोठें झालाच नाहीं. ज्या किल्ल्यास त्यानें वेढा बसविला, तो किल्ला त्याच्या स्वाधीन झाल्याशिवाय राहिला नाहीं. तो समीप आल्यामुळें उत्तरकर्नाटकांतील किल्लेदार व देसाई वगैरे त्याच्या भीतीनेंच लटलटां कांपूं लागले होते. अशा रीतीनें अर्धवट जिंकिले गेलेल्या लोकांच्या ठाण्यां पुढें हैदराची फौज जावयाचाच काय तो अवकाश! तीं ठाणीं त्याच्या ताब्यांत यावयास या पेक्षां अधिक करावयास नको होतें. उत्तरकर्नाटक जिंकण्याचें काम मीरफैजुल्लावर सोंपवून व एकंदर दहा पंधरा हजार गारदी व स्वार व तोफा त्याच्या हवालीं करून हैदर स. १७६३ च्या आगष्ट महिन्यांत परत बिदनुरास गेला.

मीरफैजुल्लानें धारवाडास शह दिला व कांहीं फौज भोंवतालच्या प्रांतांतील ठाणीं घ्यावयास पाठविली. पटवर्धनांची जहागीर संभाळण्या करितां त्या प्रांतीं मेघश्यामराव कृष्ण पटवर्धन मंगळवेढेंकर हा राहिला होता. हा मेघश्यामरावबापू ह्मणजे गोपाळरावाचा चुलत बंधु, हें आतां वाचकांस

१ ऐ. ले. सं. पत्र नं० ३८७. २ ऐ. ले. सं. पत्र नं० ३४३.

सांगावयास नकोच. या बापूची व मीरफैजुल्लाच्या फौजेची लढाई होऊन बापूचा पराजय झाला, व तो शत्रूच्या हातीं पाडाव सांपडला. मीरफैजुल्लानें त्यास बिदनुरास हैदराकडे पाठवून दिलें. या नंतर एक ही ठाण्याचा मीरफैजुल्लाच्या फौजेपुढें टिकाव लागला नाहीं. शिरहट्टीच्या लोकानीं मात्र एक टोळी मागें हटविली. परंतु तिला कुमक येतांच त्यांस शत्रूच्या हवालीं ठाणें करावें लागलें. या प्रमाणें गदग, नवलगुंद, श्रीमंतगड, हुलीगड, कलघटगी, व आणखी दुसरीं ठाणीं भराभर पडत चाललीं. अक्टोबरच्या दहाव्या तारखेस धारवाड काबीज झालें. कोपळ येथें रामचंद्र नारायण हुपरीकर हा मामलेदार होता त्यानें व नरगुंदचा भास्करराव यानें मात्र शत्रूच्या सैन्यास दाद दिली नाहीं. तीं दोन स्थळें खेरीज आतां सारा धारवाड जिल्हा शत्रूच्या ताब्यांत गेला. त्यानें कित्तूरच्या देसायापासून खंडणी घेतली. क्रमाक्रमानें त्याच्या स्वाऱ्या वर्धा, मलप्रभा, व घटप्रभा या नद्या ओलांडून जवळ जवळ कृष्णातीरापर्यंत होऊं लागल्या ! घांटाखालीं सारा कारवार जिल्हा त्याच्या हातीं लागल्यामुळें गोवेंकर फिरंगी, वाडीचे सांवंत व विजयदुर्गचा पेशव्यांचा सुभेदार यांस आतां हें अरिष्ट आपणावर येतें कीं काय, अशी जबरदस्त धास्ती पडली !

या प्रमाणें सन १७६४ पर्यंतचें हें हैदरअल्लीचें चरित्र आहे. यावरून तो कसा मनष्य होता हें ध्यानांत येण्या[1] जोगें आहे. तो धूर्त, साहसी, कपटी व शूर होता इतकेंच नाहीं, तर सैन्याच्या रचनेची शिस्त ठरविण्यांत, जमाबंदीची व्यवस्था करण्यांत, लूट जमा करण्याच्या पद्धती ठरविण्यांत, माणसांवर कदर राखण्यांत, व मनुष्यस्वभावाची पारख करण्यांत शिवाजी महाराजांचें त्यानें अनुकरण केलें होतेंसें दिसतें. आणखी बऱ्याच गोष्टींत शिवाजी महाराजांचें व त्याचें साम्य होतें. त्याला लिहितां वाचतां बिलकुल येत नव्हतें. तो पायदळाचा उत्तम सरदार होता. किल्ले

१ ऐ. ले. सं. नं० ३७४ पासून ३७७ पर्यंत व नं० ३८८.

कोट झुजविण्याचें व काबीज करण्याचें कौशल्य त्याच्या अंगीं पूर्ण वसत होतें. या गोष्टी शिवाजी महाराजांच्या ठायीं होत्या हें प्रसिद्धच आहे. महाराजां प्रमाणेंच त्यानें सरदारांस जहागिरी देऊन आपलें राज्य दुर्बल करून घेतलें नाहीं. दोघांत फरक येतो तो हा कीं, हैदरास मुसलमानी धर्माचा अभिमान नव्हता. ज्या त्या मनुष्यानें आपल्या धर्मा प्रमाणें आचरण केलें ह्मणजे तो कोणचा ही धर्म असला तरी स्वर्गदायक होतो, असें मानणारां पैकीं तो होता. धर्माच्या बाबतींत त्याचा कोणावर ही जुलूम नसे. पुढें एका प्रसंगीं सत्तर हजार फौजेसह त्यानें मद्रासकर-इंग्रजांवर स्वारी केली होती, तेव्हां आपणास यश यावें ह्मणून त्यानें राजधानींतल्या सर्व मशिदींतून व सर्व देवळांतून देवाची प्रार्थना करविली होती ! शिवाजी महाराजांची गोष्ट तशी नव्हती. शत्रूकडून ज्याची पायमल्ली शेंकडों वर्षें होत आली होती, अशा आपल्या हिंदुधर्माचा उद्धार व्हावा ह्मणून त्यांचे सतत प्रयत्न चालले होते, आणि आपल्या धर्माचा अभिमान बाळपणापासून त्यांच्या अंगांत खिळला होता. दुसरी गोष्ट अशी कीं, स्वदेश असा हैदरास नव्हताच, त्यामुळें देशाभिमानाचें वारें त्याच्या अंगीं खेळत नव्हतें. त्यानें अवाढव्य राज्य संपादिलें खरें, पण तें ज्यांच्या अन्नावर वाढला होता त्यांच्या माना मुरगाळून संपादिलें असल्यामुळें कृतघ्नतेच्या दोषास तो सर्वथा पात्र होतो. त्याच्या उत्कर्षानें कोणाचें ही मन प्रसन्न होत नाहीं. शिवाजी महाराजानीं तर परकीयांच्या दास्यांतून महाराष्ट्रदेश सोडवून स्वराज्याची स्थापना करण्या करितां अचाट पराक्रम केले, नाना प्रकारचे कष्ट आमरण सोशिले, पण आपला मनोदय पूर्ण केला; यामुळें आम्हां मराठ्यांसच काय, पण पृथ्वीच्या पाठीवरील कोणच्या ही देशांतील लोकांस त्यांचें नांव पूज्य झालेंच पाहिजे. असे हे फरक असले तरी पुष्कळ गोष्टींत साम्य असल्यामुळें हैदरास 'म्हैसूरचा शिवाजी' म्हणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं !

हैदरअल्लीचें पूर्व चरित्र

हैदरास मुसलमानी, कानडी आणि मराठी या तिन्ही भाषा उत्तम रीतीनें बोलतां येत होत्या. किती बारीक सारीक गोष्ट असली तरी तिकडे लक्ष्य पुरविण्यांत त्यास कधीं आळस नसे. त्याची स्मरणशक्ति आश्चर्य कारक होती. त्यास दया माया ह्मणून बिलकुल नव्हती. आपल्या मसलतीस विघ्न करणारा मनुष्य मारून टाकणें आणि पायांत रुतलेला कांटा काढणें त्यास सारखेंच वाटत होतें ! बातमी ठेवण्याचें खातें त्यानें इतक्या पूर्ण दशेस आणिलें होतें कीं, त्याच्या राज्यांत गुप्त कट किंवा फंद फितूर होणें ही केवळ अशक्य गोष्ट होऊन बसली ! उद्योगास नेहमीं दैवाचें पाठबळ पाहिजे असें ह्मणणारे जे दैववादी आहेत त्यांस आपल्या पक्षाचें समर्थन करण्यास हैदराचें चरित्र हें उत्तम साधन आहे. जशा पुष्कळ गोष्टी त्यानें पराक्रमाच्या जोरावर केल्या, तशाच पुष्कळ गोष्टी केवळ त्याच्या नशिबानें घडवून आणिल्या हें ही विसरतां कामा नये. त्या गोष्टी कोणच्या हें निराळें सांगावयास नको. त्याचें वर जें चरित्र दिलें आहे त्यावरून त्या कळण्या जोग्या आहेत. एवढेंच त्यांत नवल वाटण्या सारखें आहे कीं, आजपर्यंत चार वेळ मराठ्यांच्या तावडींत सांपडलेला असून तो जो नशिबाच्या जोरावर त्यांच्या हातून निसटून गेला तो पुढें त्यांच्याच उरावर बसण्या करितां !

हैदराच्या पदरीं शेंकडों मराठी ब्राह्मण कारकून होते व कित्येक मराठे व ब्राह्मण सुद्धां त्याचे सरदार होते. त्याच्या घोडे-स्वारांत मराठ्यांचा भरणा विशेष असे. या पुस्तकांत त्या विषयीं पुढें वेळोवेळ ज्या हकिगती येतील त्यांवरून असें दिसून येईल कीं, 'गनिमी काव्या' ची लढाई करण्याची कला तो मराठ्यांपाशीं शिकला, आणि पायदळ व तोफखाना यांच्या साधनानें लढाई करण्याची कला तो इंग्रजांपाशीं शिकला. मराठे व इंग्रज हे दोन त्याचे गुरु होते. त्यांपासून वर सांगिल्या प्रमाणें युद्धाचें दुहेरी कौशल्य व साधनें त्यानें संपादिलीं होतीं. त्यांचा उपयोग

कसा कोणाशीं करावा हें शहाणपण पांच चार ठोकरा लागल्यावर हैदरास आलें! इंग्रजांशीं लढण्याचा प्रसंग आला ह्मणजे तो त्यांस गनिमी काव्यानें जेर करी, व मराठ्यांशीं लढतांना तोफा व पायदळ यांचाच विशेषतः उपयोग करून घेत असे. मराठ्यां प्रमाणेंच इंग्रजांस ही त्याचें नांव या पूर्वींच चांगलें माहीत झालें होतें. कारण त्यांच्या ही तीन चार टोळ्यांचा त्यानें फन्ना पाडिला होता.

अशा शत्रूशीं सामना करून त्यावर वर्चस्व स्थापावयाचें दुर्घट काम आतां रावसाहेब पेशव्यांस करावयाचें होतें. तें त्यांच्या हातून पार पडेल असें सकृद्दर्शनीं तरी त्या वेळच्या कोणा मनुष्यास ही वाटलें नसेल! पुढें होणाऱ्या युद्धांत हैदरासच जय येईल व पेशव्यांस हतप्रभ होऊन मागें हटावें लागेल, असें जर त्या दोघांच्या स्थितींतील महदंतर मनांत आणून कोणी भाकित केलें असलें तर त्यांत काय नवल आहे! पहिला कपटी, दगलबाज, व क्रूरकर्मा मुसलमान, तर दुसरा सत्यभाषणाचा व सचोटीनें वागण्याचा बाणा बाळगणारा आणि स्वभावतः सात्विक वृत्तीचा ब्राह्मण! अनेक कारस्थानें खेळविल्यामुळें व शेंकडों युद्धप्रसंग पाहिल्यामुळें पहिल्याची मुत्सद्दीपणाची व सरदारीची अक्कल परिपक्वदशेस आली होती, आणि दुसऱ्यास असल्या गोष्टींचा सर्वच अनुभव केवळ नवीन होता. पहिल्याजवळ भरपूर खजिना होता, जिवासजीव देणारे विश्वासू सरदार होते, आणि धन्याच्या कल्याणासाठीं अहर्निश झटणारे मुत्सद्दी होते. दुसऱ्याचा खजिना रिकामा झाला होता, सरदार बेकैदी आणि केवळ स्वार्थावर नजर ठेवणारे होते, आणि मुत्सद्दी तर शत्रूशीं उघडपणें फितूर खेळविण्या इतके बेशरम व बेपर्वा झालेले होते. पहिल्यानें आपलें राज्य इतक्यांतच बऱ्याच अंशीं निष्कंटक केलें होतें. राज्य घेण्यासाटीं टपलेलीं, नेहमीं फंदफितूर करणारीं, कुटुंबांतलीं माणसें दादासाहेब व आनंदीबाई यांस कसें तरी वागवून घ्यावें लागत असल्यामुळें दुसऱ्याची दशा

वर्गणीची पोंच.

सन १८९८ । ९९

(ता. २२ सप्तंबर पासून २२ आक्टोबर पर्यंत.)

मागील सालची

	रु०
रा. रा. दत्तात्रय तुकाराम भट पणशीकर. शिरोडें.	२

मागील व चालू वर्षाची.

रावसाहेब बळवंतराव त्रिंबक देशमुख. मिनिस्टर. सितामहू.	६

चालू वर्षाची.

श्री० रा. माधवरावसाहेब पंतप्रधान. राजघाट.	३
रा. रा. वामन विष्णु अभ्यंकर. कृष्णपुरम्. जि० नेलोर.	३
,, ,, गोविंद महादेव दीक्षित. सबरजिष्टर. शहापुर. जि० ठाणें.	३
,, ,, यशवंत वामन जोशी. खामगांव प्रांत वऱ्हाड.	३
,, ,, सेक्रेटरी. बारशी ने. ज. लायब्ररी. बारशी.	२
,, ,, विठ्ठल विष्णु राजवाडे. देवरूख.	३
,, ,, त्रिंबकराव-पुंडाजी वकील. सेक्रे० टिळक लायब्ररी. संखेडा संस्थान बडोदें.	३
,, ,, रामचंद्र गिरिधारीलाल मारवाडी. सुरजी. अंजनगांव.	३
,, ,, सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. अष्टें.	२
श्री० रा. चिंतामणराव नारायण मुजुमदार. बडोदें.	३
रा. ब. यशवंतराव नीलकंठ. पुणें.	३
रा. रा. केशवराव संतुकराव. हायकोर्ट वकील. हैदराबाद.	३
,, ,, शेट बिरदीचंद पोतदार. वर्धा.	३
,, ,, बळवंतरावजी करंदीकर. पुणें.	३
मि० ऐझाक् सालोमन. ,,	३
,, मोझेस सालोमन ,,	३

ऐ० ले० संग्रह—कर्ते.

ऐतिहासिक-लेख-संग्रह.

हें डेमी अष्टपत्री सांचाच्या चाळीस पृष्ठांचें मासिक पुस्तक दर महिन्यास मिरज येथें नियमानें प्रसिद्ध होत असतें. यांत पटवर्धन जहागीरदारांच्या जुन्या चिटणिशी दप्तरांतील ऐतिहासिक महत्वाचीं व प्रत्येक स्वारीतील भरपूर माहितीचीं पत्रें सालवारीच्या क्रमानें छापून प्रसिद्ध होत असतात. शिवाय अन्यत्र उपलब्ध झालेले कागदपत्र व बखरी वगैरेचा ही यांत समावेश होत असतो. या मासिक पुस्तकाची आगाऊ किंमत सालिना ट० हा० सुद्धां तीन रुपये आहे. ग्राहकांनीं सालिना वर्गणीच्या किंमतीचें व्हा० पे० मागवावें अथवा तितक्या रकमेची मनीआर्डर पाठवावी. त्या शिवाय पुस्तक सुरू केलें जाणार नाहीं. **ऐ०ले०संग्रह कर्ते.**

सूचना

आम्हीं केलेल्या पुस्तकां पैकीं:—

१ यशवंतराय महाकाव्य (सर्ग २४ श्लोक संख्या १७२९) किंमत १ रुपया.
२ फुटकळ चुटके. (कविता) किंमत ४.
३ समुद्र काव्य किंमत ३.
४ गुणोत्कर्ष नाटक. [तिसरी आवृत्ति] किंमत ८.

ऐ० ले० संग्रहापैकीं निराळीं प्रकरणें.*

मिरज प्रकरण—[मिरजेचा वेढा व तत्संबंधीं युद्ध] या हकिगतीचीं पत्रें ऐ०ले०संग्रहाच्या पांच, सहा व सात या अंकांत आलीं आहेत त्यांचें हें निराळें पुस्तक. किंमत १२.

मोंगलाशीं लढाई. किंमत ३.

किंमत रोख. ट०हां० माफ. व्ही. पी.नें मागविल्यास ही पाठविण्यांत येतील.

ऐ०ले०संग्रह-कर्ते.

---

* ऐ०ले०संग्रहाच्या वर्गणीदारांस हीं पुस्तकें निम्मे किंमतीस मिळतील.

ऐतिहासिक-लेख-संग्रह.

मासिक पुस्तक.

दिसेंबर. १८९८ इ०.

अंक १९

वासुदेव वामन शास्त्री खरे
मिरज हायस्कुलांतील संस्कृत शिक्षक.

यांनीं

कुरुंदवाड येथें

" भाऊनाना " छापखान्यांत छापविलें.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हाशीलसह तीन रुपये.

फुटकळ अंकास पांच आणे.

वर्गणीची पोंच.

सन १८९८ । ९९

(ता. २२ आक्टोबर पासून २२ नोवेंबर पर्यंत.)

	रु०
रा. रा. सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. शिगली.	३
” ” सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. तासगांव.	३
” ” गंगाधर वामन परांजपे. उमरावती.	३
” ” जगन्नाथ रघुनाथ घारपुरे. बी. ए. मुंबई.	३
श्री. रा. बाळकृष्ण विठ्ठल पोतनीस. पुणें.	३
रा. रा. प्रभाकर लक्ष्मण नागपुरकर. ”	३
” ” शामराव विश्राम घोले. ”	३
” ” वामन दामोदर केळकर. ”	३
डा० सुंदरलाल नानालाल मोदी. ”	३
शेट काळूराम भाऊ मनसाराम नाईक. ”	३
श्री. रा. सदाशिवराव माधव उर्फ आबासाहेब पुरंदरे. ”	३
रा. रा. नरहर विष्णु लोहगांवकर. मु० नारगोळ.	३
” ” शंकर श्रीधर आपटे. मुंबई.	३

१८९९ । १९००

आगाऊ

रा. रा. सदाशिव रामचंद्र ओझे. मु० पळस्पें.	३

आमचे पुणें व मुंबई येथील एजंट.

रा.रा. मुरलीधर मल्हार अत्रे, महाराष्ट्र बुकडेपोचे म्यानेजर, बुधवार पेठ पुणें. रा.रा. विष्णु दासो बनहट्टी. कमिशन एजन्ट आणि जनरल मर्चंट. गिरगांव ट्रामवे टरमिनस् पेंडसे यांची नवी चाळ, मुंबई

सदरहू दोन असामींस आह्मीं ऐ० ले० संग्रहाचे एजंट नेमिलें आहे. त्यांजकडे तेथील वर्गणीदारानीं वर्गणी द्यावी. आमचीं सर्व पुस्तकें एजंटां-कडे विकत मिळतील.

ऐ० ले० संग्रह-कर्ते.

अस्तनींत विस्तव बाळगणाऱ्या प्रमाणें झाली होती! अशा सर्व गोष्टी प्रतिकूळ असतां ही रावसाहेबानीं 'पेशव्याशीं कृष्णेवर येऊन झुजेन' ह्मणून वल्गना करणाऱ्या हैदराचा जागजागीं पराजय करून, कर्नाटकांत अजिंक्य झालेल्या त्याच्या सैन्याची एकाच स्वारींत दाणादाण करून दिली, आणि त्याची रग जिरवून त्यास गोगलगाय करून सोडून दिलें! हा प्रकार कसकसा होत गेला हें दुसऱ्या भागांत सांगूं.

भाग दुसरा.

हैदरअल्लीवर पहिली स्वांरी.

उत्तरकर्नाटकावर स्वांरी करण्या पूर्वीं हैदरानें निजामअल्लीच्या दरबारीं वकील पाठवून पांच चार लाख रुपये दरबार खर्च करून त्या दरबारांतून आपला अन्याय माफ करून घेतला होता. त्याचा गुन्हा काय तो एवढाच होता कीं, दक्षिणच्या सहा सुभ्यांची सुभेदारी व हैदराबादची नबाबी निजामअल्लीची असतां हैदरानें ते दोन्ही अधिकार बसालतजंगाचे आहेत असें कबूल केलें होतें, व त्यास तीन लक्ष रुपये नजराणा देऊन 'शिऱ्यांची नबाबी' त्याजकडून पटकाविली होती. हा गुन्हा कांहीं मोठासा नव्हता, आणि जरी तो तसा मोठा असता तरी त्याबद्दल हैदराचें पारिपत्य करण्याचें तरी सामर्थ्य निजामअल्लींत कोठें होतें? तेव्हां त्याची इतक्या थोडक्यांत समजूत झाली हें ठीकच झालें परंतु तीच रक्कम देऊन दुसऱ्या वकिलास जेंव्हां हैदरानें पुण्यास रवाना केलें, तेव्हां तेथें मात्र त्या वकिलाची डाळ बिलकुल शिजली नाहीं! कारण पेशव्यांचें राज्य त्यांतून स्वराज्य, जर हैदरानें घेतलें होतें, आणि त्याची खोड मोडण्याचें आपणांत सामर्थ्य आहे अशी जर त्यांची पक्की खात्री होती, तर हैदरानें किती ही

पैका भरिला तरी तो घेऊन झालेला अपमान व नुकसानी ते कां सहन करितील? तूर्त ते मोंगलाशीं लढाई करण्यांत जरी गुंतले होते, तरी त्या लढाईंतून सुटका झाल्या बरोबर हैदरावर स्वांरी करण्याचा त्यांचा निश्चय ठरला होता. तो निश्चय हैदरास माहीत नव्हता असें नाहीं, तथापि तुंगभद्रे अलीकडील मराठी राज्यावर स्वांरी करितांना त्यानें असा विचार केला कीं, मराठ्यांचा आपण द्वेष तर आतां संपादन केलाच. तो कांहीं केल्या शांत होण्याचा संभव दिसत नाहीं. त्यांचें घेतलेलें राज्य पुन: त्यांस परत द्यावयाचें आपल्या मनांत नाहीं. मग त्यांचें आणखी राज्य बळकाविण्याची ही नामी संधी आली आहे ही कां फुकट घालवावी?

मोंगलावर स्वांरी करून परत आल्यावर रावसाहेब पुण्यास विश्रांति न घेतां तसेच डेरे दाखल झाले. "हैदरअल्लीवर जी स्वांरी व्हावयाची तींत मुख्य अधिकार आपला असावा असा दादासाहेबांचा आग्रह होता, परंतु सखारामबापूनें सांगितलें कीं, मुख्य अधिकार रावसाहेबांसच असावा हें योग्य आहे. हें बोलणें दादासाहेबांस न रुचल्यामुळें ते रागावून नाशिकास निघून गेले," असें डफ्साहेब लिहितो. परंतु हें खरें नाहीं. शरीर अशक्त झाल्यामुळें व शीण आल्यामुळें मोंगलावर मोहिम चालली असतांच दादासाहेब वारंवार बोलून दाखवीत असत कीं, एवढी मोहीम झाली ह्मणजे रावसाहेबांकडे सर्व कारभार सोंपवून देऊन आपण स्नान संध्या करण्या करितां कोठें गोदावरी-तीरीं जाऊन राहणार. (पहा नंबर ३५० व ३५८) रावसाहेबानीं या स्वांरीस निघताना चुलत्यास बरोबर येण्या विषयीं फार आग्रह केला, परंतु विश्रांति घेण्याचा त्यांचा निश्चय पक्का ठरला असल्यामुळें ते रावसाहेबांचा सुखासमाधानानें निरोप घेऊन नाशिकास गेले. त्यां बरोबर गोविंद शिवराम खासगीवाले, त्रिंबकराव मामा, आबा पुरंदरे व चिंतो विठ्ठल रायरीकर गेले. गोपिकाबाई नाशिकासच होती. पुण्यांत नारायणराव साहेब, रमाबाई (ही पेशव्यांची पत्नी)

व पार्वतीबाई व कुटुंबाची इतर बायका मंडळी राहिली. त्यांचा सांभाळ करणें, सर्व कारखान्यांवर देखरेख करणें व स्वारींत दारूगोळा, तोफा व दुसरें जें कांहीं सामान लागेल तें पुरवणें हीं जबाबदारीचीं कामें रावसाहेबानीं नानाफडणिसांवर सोंपविलीं होतीं. नानांचें वय त्यावेळीं पंचविशीच्या सुमारें होतें. इतक्या लहान वयांत ही शहाणपण, उद्योग, इमान व टापटीप हे नानांचे गुण श्रीमंतांच्या दृष्टोत्पत्तीस आले ह्मणूनच त्यानीं त्यावर घरचा सर्व कारभार सोंपवून दिला असावा हें उघड आहे. पेशव्यां बरोबर मुख्य कारभारी सखारामबापू व मुत्सद्यां पैकीं कृष्णराव बल्लाळ काळे हे स्वारींत होते. आबा पुरंदरे जरी नाशिकास दादासाहेबांबरोबर गेले होते तरी त्यांचें पथक हरी गोपाळ याजबरोबर स्वारींत होतें. पौष महिन्यांत श्रीमंत स्वारीस निघाले, ते नाहावीचा घांट चढून सातारा प्रांतीं शंभुमहादेवाचें स्थान आहे त्या रोंखें चालले. विठ्ठलराव विंचूरकर व नारो शंकर यांस पूर्वीं हिंदुस्थानांत पाठविण्याचा श्रीमंतानीं बेत केला होता, तो आतां रहित करून त्यांस प्रस्तुतच्या मोहिमे करितां आपापल्या पथकांसह लवकर निघून येण्याविषयीं त्यानीं हुकूम केला. त्यावरून विंचूरकर पथका पैकीं जमले होते तेवढेच लोक घेऊन आले. मोगलाशीं लढाई नुकतीच संपली होती व शिलेदार लोक घरोघर निघून गेले होते. ते पुनः जमण्यास दोन तीन महिने निदान अवकाश होता. तों पर्यंत दक्षिण महाराष्ट्रांत हिंडून बारीक सारीक कामें आटपून घ्यावीं व फौजेच्या खर्चा करितां कांहीं पैका मिळवावा, फौज जमल्यावर धारवाडाकडे जाऊन हैदराशीं गांठ घालावी, असा श्रीमंतांचा मनसबा ठरला होता. त्या प्रमाणें ते शंभुमहादेवास जाऊन तेथून नाझऱ्यांवरून चिकोडीकडे चालले होते; तों पटवर्धनांच्या कारकुनानीं येऊन विनंती केली कीं, या मार्गें लष्कर गेलें तर आमचा मुलूख तुडविला जाईल. त्यावरून तो रस्ता टाकून श्रीमंत जत प्रांतीं गेले.

हैदरअल्लीवर पहिली स्वारी

नुकताच जो मोंगलाशीं तह झाला होता त्यांत इंडी, तांबें, आलमेलें, बागेवाडी, अबजलपुर, होर्ती, हे महाराष्ट्राच्या आग्नेय सीमेवरचे परगणे पेशव्यांस मिळाले होते. त्या परगण्यांत अंमल बसविण्या साठीं पेशव्यानीं गोपाळरावास पाठविलें होतें. विठ्ठलराव विंचूरकराची नेमणूक कागलचें ठाणें घेण्यासाठीं झाली होती, त्याचें कारण असें—कोल्हापुरची राणी जिजाबाई हिनें शेषो नारायण रुईकर ह्मणून हुकेरीचा मामलेदार होता, त्या पासून कांहीं कर्ज काढिलें होतें व त्याच्या फेडी करितां चिकोडी, मनोळी व कागल हे तीन तालुके त्याजकडे लावून दिले होते. परंतु या तीन ही ठिकाणीं राणीचा अंमल आजपर्यंत नांवाचा मात्र होता तो ही नाहींसा होऊन त्या ठिकाणच्या जमीदारानीं राणीची मालकी साफ नाकबूल केली व शेषो नारायणाचा अंमल मुळींच बसूं दिला नाहीं. चिकोडीचा देसाई बराच सामर्थ्यवान् होता कागलांत घाटगे पूर्वीं पासूनच बळावले होते. मनोळीस शिंदे होते ते ही फौजबंद असून शिवाय त्यांस पटवर्धनांचा आश्रय होता. या तिघांचें पारिपत्य करण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें राणीचे तीन तालुके हातांतून गेले व शेषोपंताचा पैका बुडाला. त्यांत घाटगे व शिंदे यांवर राणीचा फारच राग झाला होता. तिन्हीं ठाणीं घेऊन देण्याविषयीं शेषोपंताची पुण्याच्या दरबारीं बरेच दिवस खटपट चालली होती या विषयीं राणीची तर पेशव्यांजवळ इतकी सक्तीची रदबदली होती कीं, तुमचीं ठाणीं घेऊन तुमच्या हवालीं करून देईन अशी पेशव्यांनीं राणीजवळ शपथ वाहिली होती, व देवावरच्या तुळशी उचलून दिल्या होत्या! शेपथे प्रमाणें करून दाखविण्यास गेल्या तीन

---

१ सदरहु देसायाचे वंशज हल्लीं बेडाकिनहाळ ह्मणून चिकोडी तालुक्यांत खेडें आहे तेथें रहातात. २ शके १६८४ च्या भाद्रपद अखेर शेषो नारायण मिरजेस आला होता. त्याचें व गोविंद हरीचें खलबत त्या वेळीं झालें होतें त्याची साद्यंत हकिगत गोविंद हरीनें गोपाळरावास लिहून पाठविलेली आहे त्यावरून हा मजकूर लिहि-

वर्षांत त्यांस केव्हांच फुरसत झाली नाहीं. यंदा मात्र कर्नाटकांत जातां जातां राणीस ठाणीं घेऊन देण्याचें त्यानीं ठरविलें होतें व त्या बद्दल असा करार झाला होता कीं, ठाणीं हातीं आल्यावर शेषोपंतानें तीन लाख व राणीनें चार लाख रुपये फौजेच्या खर्चा करितां पेशव्यांस द्यावे. या ठरावा प्रमाणें कागल घेण्यासाठीं या शके १६८५ सालच्या माघ महिन्यांत विठ्ठलराव विंचूरकरांची रवानगी झाली होती. विंचूरकर व गोपाळराव दोहीं-कडे दोन कामांवर गुंतले होते, ते परत येतपर्यंत स्वारीच्या पुढील मसलती ठरविण्याचें रहित करून रावसाहेब जत प्रांतीं तूर्त गेले होते.

जतेकडे डफळे व पोळ यानीं गेल्या चार वर्षांत बराच बंडावा माजविला होता, त्यांवर जरब बसवून रावसाहेबानीं तो प्रांत आपले मामा रास्ते यांस जहागीर दिला. नंतर स्वारी विजापुरास गेली. उदगीरच्या तहांत किंवा त्या पूर्वीं मोंगलाकडून पेशव्यांस विजापूर मिळालेलें होतें. परंतु त्या ठिकाणीं चव्हाणांचें प्राबल्य होतें, व ते चव्हाण मोंगलाचा आश्रय करून त्याची जहागीर खाऊन त्याच्या सैन्यांत चाकरी करीत. या चव्हाणांस हुसकून लावण्यास गेल्या पांच वर्षांत पेशव्यांस फुरसत मिळाली नव्हती. या प्रसंगीं रावसाहेबानीं चव्हाणांचा बंदोबस्त करून विजापुरांत आपलें ठाणें बसविलें. याच ठिकाणीं नारो शंकर येऊन मिळाला.

नंतर लष्कर विजापुराहून परत फिरून पुनः कृष्णातीरीं येडूर मांजरी येथें आलें. चिकोडी तालुक्याचीं नागरमनोळी सुद्धां सर्व ठाणीं फौज जातांच भराभर कौलास आलीं आणि रावसाहेबानीं तीं शेषोपंताच्या हवालीं केलीं. कागल व कोगनोळी विंचूरकरानीं घेतली होती व ते लष्करास मिळण्या करितां परत निघाले होते. एक मनोळीचें ठाणें मात्र घेऊन राणीस करारा प्रमाणें द्यावयाचें राहिलें होतें तें धारवाडाकडे जा-

---

लेला आहे. तें पत्र फार लांब व निवळ स्थानिकमहत्वाचें वाटल्यामुळें या पुस्तकांत छापिलें नाहीं.

ण्याच्या वाटेवरच होतें, व फौज ही संकेता प्रमाणें जमत चालली होती. फाल्गुन महिन्यास सुरुवात झाल्यामुळें मुलुखगिरीचे आतां चैत्र व वैशाख हे दोनच महिने काय ते राहिले होते. या सर्व गोष्टींचा विचार करून व गोपाळराव व विंचूरकर यांस जलदीनें निघून येण्याविषयीं ताकीद करून रावसाहेब जलदी जलदीनें मनोळीकडे चालले. तिकडे जाण्यास वाटेंत एक मोठी बारी लागत्ये. ही बारी पाच्छापुरापासून निसरगी पर्यंत वीस बत्तीस मैल लांबीची आहे. हिला पूर्वीं पेशवाईत 'मनोळीची बारी' असें ह्मणत असत. या बारीचा रस्ता अरुंद व खडकाळ असल्यामुळें लष्कर जाण्या येण्यास फारच अडचणीचा होता व सर्व बारीभर कीर्र झाडी पसरली होती. बारीच्या अलीकडे वंटमुरीचें ठाणें आहे, तें घेऊन घोडगिरी वरून बारी पार होऊन होंगलच्या ओढ्यावर रावसाहेब एक दिवस मुक्काम करून राहिले. तो गांव मनोळीकरांचा असल्यामुळें तोफा लावून लुटून फस्त करण्यांत आला. तेथून मुरगोडास जाऊन स्वारी मनोळीस दाखल झाली. तेथें कृष्णाबाई शिंदे होती तिनें किल्ला झुजविण्याची हिंमत धरिली, त्यामुळें तत्काळ किल्लयास मोर्चे बसले, व चारच दिवसांत किल्ल्याच्या खंदकापर्यंत मोर्चे गेले. आतां हल्ला करून किल्ला घ्यावा इतक्यांत पटवर्धनांच्या मध्यस्थीनें कृष्णाबाई शरण येऊन तिनें पेशव्यांच्या हवालीं किल्ला केला, व तो त्यानीं शेषोपंताच्या ताब्यांत दिला. इतकें होई तों फाल्गुन महिना समाप्त झाला.

स्वारीस निघून रावसाहेबांस जवळ जवळ तीन महिने झाले होते. इतका त्यांचा काल सैन्य जमा करण्यांत व स्वारीच्या पुढील तरतुदी करण्यांत गेला. त्यां बरोबर सखारामबापू कारभारी होता. तेव्हां अपयश येण्याची भीति नव्हतीच. सतरा वर्षां पूर्वीं हाच सखारामबापू सदाशिवराव भाऊसाहेबांचा कारभारी होऊन सावनूरच्या स्वारीस आला होता. भाऊसाहेबांचें वय त्या वेळीं सत्रा वर्षांचें होतें तरी त्यांस उत्तमरीतीची सल्ला

मसलत देऊन व सर्व प्रकारची यथायोग्य व्यवस्था राखून बापूनें भाऊसाहेबांची स्वारी यशस्वी केली. हिंदुस्थानांत व गुजराथेंत दादासाहेबांच्या जितक्या स्वाऱ्या झाल्या त्या सर्वांत सखारामबापू कारभारी असे. या स्वाऱ्यांत पैक्याची अतोनात उधळपट्टी होई व सखारामबापू स्वतः पैका खात असे हें जरी खरें आहे, तथापि इतकें कबूल करणें भाग आहे कीं, दादासाहेबांची दर स्वारींत जी फत्ते होत असे तिचें श्रेय शिंदे होळकरांचे पराक्रम व बापूचें शहाणपण यांत सारखें वांटून देणें योग्य आहे. बापू इतका जुना, अनुभवी, केलेला संवरलेला मुत्सद्दी आतां कोणी राहिला नव्हता, व या स्वारींत सुद्धां त्याच्या अकलेचा रावसाहेबांस फार उपयोग झाला असला पाहिजे हें स्पष्ट आहे.

रावसाहेबानीं अशी मसलत योजिली होती कीं, यंदां मुलुखगिरीचे दिवस आतां थोडे राहिले, या करितां तूर्त धारवाड व भोंवतालचीं ठाणीं घ्यावीं. हैदरनाईक तीस चाळीस लक्ष रुपये खंडणी देईल तर बंकापुर, सोंधें व बिदनूर त्याजकडेच राहूं द्यावीं. तूर्त तह करून परत जावें. दसरा झाल्यावर पुनः स्वारी करून त्याचें पुरतें पारिपत्य करावें. हैदर खंडणी देण्यास मुळींच कबूल नसेल तर छावणी करून त्याची पुरती खोड मोडल्या शिवाय परत जाऊं नये. सध्या त्यांच्या सैन्यांत विंचूरकर, नारो शंकर, सखारामबापू, धोंडो दत्तात्रय, नरसिंगराव धायगुडे, आनंदराव गोपाळ, आनंदराव रास्ते, विसाजी कृष्ण बिनीवाले, रामचंद्र गणेश, घोरपडे इचलकरंजीकर, महिपतराव कवडे, शहाजी भापकर, शहाजीराजे अक्कलकोटकर, आबा पुरंदरे, इतक्यांचीं पथकें हजर असून घोरपडे व पुरंदरे यां शिवाय सर्व सरदार आपापल्या पथकां बरोबर स्वतःच आले होते. पटवर्धनां पैकीं गोपाळराव, परशुरामभाऊ, नीलकंठराव, कोन्हेरराव, वामनराव, मोरोबा आबा, नारायणराव व धोंडोपंत आणि यादवाडकर पटवर्धनां पैकीं अंताजी विठ्ठल हे स्वारींत होते व सर्वांची मिळून सहा सात

हजार फौज होती. श्रीमंतानीं या मोहिमेस पंधरा हजार हुजरात नेमिली होती, ती आणि वर सांगितलेल्या सर्व जहागिरदारांची मिळून एकंदर चाळीस हजार फौज जमली होती. शिवाय गारदी दीड हजार व तोफा वीस होत्या. गारद्यांची संचणी अजून चालू होती व पावसाळ्याच्या सुमारास त्यांचा भरणा सहा सात हजारांवर झाला असावा. या शिवाय आरब व मावळे व हेटकरी या जातींचें पायदळ ही कित्येक हजार पुढें जसजसें कारण पडलें तसतसें चाकरीस ठेवण्यांत आलें. आणखी तोफा व दारू गोळा वगैरे सामान पुण्याहून येतच होतें. श्रीमंतांची स्वारी समीप आली ह्मणजे त्यांस येऊन मिळावें असा सावनूरकर नबाबाचा मनोदय होता व त्यानें पांच सहा हजार फौज जमा केली होती. लष्कर तुंगभद्रेवर दाखल झाल्यावर तिकडून चार हजार निवडक फौजेसह मुरारराव घोरपडे येऊन मिळणार होता. सावनूरकर व मुरारराव आल्यावर मराठ्यांचें सैन्य स्वार पायदळ मिळून सत्तर हजार पर्यंत जमा झालें. शिवाय कित्येक हजार पेंढारी होते त्यांची गणना वरील संख्येंत केली नाहीं. या स्वारींतील कोणत्याच लढाईंत पेशव्यांस एवढी सारी फौज लढण्या करितां उभी करितां आली नाहीं, हें वाचकानीं ध्यानांत ठेविलें पाहिजे. दहा बारा हजार लोक पाळी पाळीनें छावणी राखण्या करितां रहात. सुमारें तितकेच लोक चोंहोंकडून कही ह्मणजे धान्य व वैरण गोळा करून सांभाळून आणण्यांत गुंतलेलें असत. कित्येक पथकें मुलूख सांभाळण्या करितां जागोजाग ठेवण्यांत आलीं होतीं. कित्येक टोळ्या ठाणीं घेण्यांत गुंतल्या होत्या. ठाणीं काबीज झाल्यावर त्यांत ठेवण्या करितां गारदी वगैरे पायदळाचे लोक नेमून द्यावे लागत. कांहीं तोफा किल्ले घेण्याच्या मात्र उपयोगीं अशा मोठमोठाल्या होत्या. कांहीं जलद बाराच्या व जलदीनें नेतां येण्या जोग्या फक्त स्वारीच्या उपयोगाच्या होत्या. पेशव्यां बरोबर लढती फौज ह्मटली तर तीस हजार स्वार, पांच चार हजार गारदी व आरब, आणि वीस पर्यंत

तोफा इतकीच असे. यां पैकीं जरूर असेल तितके लोक लढाइच्या कामावर रहात व बाकीचे ठाणीं घेण्याच्या कामास लागत. नेहमी बरोबर असणाऱ्या फौजेची संख्या वाढवावी लागली तर दुसऱ्या कामांवर असलेले स्वार व पायदळ आणून भरती करावी लागे. हैदरा सारख्या जबरदस्त शत्रूशीं लढावयाचा प्रसंग पडल्यामुळें रावसाहेबांस इतकी तरतूद करावी लागली. त्याच्या लष्करांत काय चाललें आहे याची बातमी त्यांस हरहमेशा मिळत होती व तिला अनुसरूनच त्यानीं विचार करून आपले बेत पक्के केले होते. आतां इतक्या अवधींत हैदरअल्लीच्या काय मसलती चालल्या होत्या हें पाहूं.

आपणावर मराठ्यांची स्वारी होण्याचें आतां टळत नाहीं असें पाहून हैदरानें ही आपल्या मुलखाचा बंदोबस्त केला. श्रीरंगपट्टणचा व तेथील राजाचा बंदोबस्त त्यानें मखदूमअल्लीवर सोंपविला होता. शिरें प्रांतीं दंगेधोपे होऊं लागल्यामुळें तिकडील बंदोबस्त राखण्या करितां त्यानें आपला मेहुणा मीररेझा यास पाठविलें होतें. चिक्कबाळापुरचा पाळेगार व त्याचा मित्र मुराररात्र घोरपडे यांशीं या वेळीं या मीररेझाची लढाई सुरू होती. मीरफैजुल्ला दहा पंधरा हजार फौजेसह धारवाड प्रांतीं राहिला होता व खासा हैदरअल्ली तीस हजार गारदी, बारा हजार स्वार, स्वारीच्या पन्नास तोफा, व कानडी प्यादे सुमारें वीस हजार, इतक्या सामानानिशीं बिदनुरास राहिला होता.

सोंधें संस्थानावर हैदराचें सैन्य चालून गेलें तेव्हां तेथील देसाई पळून पोर्तुगीज लोकांच्या आश्रयास गेला, तथापि त्या संस्थानावर हैदराचा एकाएकीं पुरता अंमल बसला नाहीं. तेथील ठाणीं घेण्यांत त्याची फौज गुंतली असतां पेशव्यांची स्वारी पुण्याहून निघून कर्नाटकाकडे येऊं लागली. तेणें करून सोंधेंकरांस धीर आला ह्मणा, किंवा दंगा करण्याविषयीं खुद्द पेशव्यांकडूनच त्यांस प्रोत्साहन मिळालें होतें ह्मणा, त्यानीं एकदम

चोहोंकडे बंडावा सुरू केला. तो बंडावा मोडण्या साठीं हैदरानें बिदनुराहून लालखान नामक सरदारास पाठविलें. सोंधेंकरांस बिदनुराहून पळून गेलेले पूर्वींच्या राज्यांतील कित्येक अधिकारी सामील झाले होते. गोंवेंकर पोर्तुगीज व मलबारांतील नायमार (नायर) यांचें ही त्यांस चांगलें पाठबळ होतें. लालखान बाणावशीच्या घांटानें सोंध्याकडे येत आहे ही बातमी राखून सोंधेंकर त्या घांटांत दबा धरून बसले व तो येतांच त्यांनीं त्याजवर तुटून पडून त्याच्या सैन्याचा संहार केला.

हें पराजयाचें वर्तमान हैदरास कळतांच त्यानें धारवाड प्रांतीं मीरफैजुल्ला होता त्यास ताबडतोब सोंध्यावर रवाना केलें. त्यानें जातांच देसायास पुनः हुसकून लावून प्रांतांत अंमल बसविला, आणि शिवेश्वर, सदाशिवगड व अंकोला हे किल्ले घेऊन खोलगड नांवाचा एक मजबूत किल्ला होता त्यास वेढा घातला. तेथें निकराचें झुज होत असतां पेशव्यांच्या आज्ञेवरून त्यांच्या आरमारावरील सरदार रुद्राजीराव धुळप हा दोन तीनशें मचवे व कांहीं मोठमोठीं लढाऊ जहाजें घेऊन होनावरच्या बंदरास आला. त्याजवळ आठ दहा हजार पायदळ ही होतें तें जमिनीवर उतरून त्यानें होनावरचा किल्ला व बंदर व भोंवतालचीं कित्येक ठाणीं काबीज केलीं. होनावरच्या बंदरांत हैदराचें हीं आरमार होतें, परंतु त्याचा मराठ्यांच्या आरमारा पुढें कांहीं यत्न चालला नाहीं. धुळपास बिदनूरकर व सोंधेंकर व नायमार लोक तत्काळ मिळाले व त्या प्रांतीं त्याची सलाबत बसत चालली व हैदराचा अंमल उठत चालला. अशा बिकट प्रसंगीं मीरफैजुल्लास घांटाखालीं ठेवणें अवश्य असतां ही हैदरानें त्यास टाकोटाक सर्व फौजेसह बिदनुरास बोलावून नेलें! तो जातांच सोंधेंकरानीं आपलें सर्व राज्य पुनः जिंकून घेतलें.

मराठ्यांची फौज मनोळीपर्यंत आल्याचें वर्तमान हैदरास कळलें व तिची जय्यत तयारी असल्याचें ऐकून त्याच्या मनाची चलबिचल झाली.

स्वारींची तयारी

मराठ्यांशीं कृष्णानदीवर येऊन झुजण्याची त्याची घमेंड आतां राहिली नाहीं. सर्व सरदारांस त्यानें बिदनुरास बोलावून नेऊन त्यांच्या सल्ल्यानें मसलत ठरविली कीं, मराठ्यां समोर मैदानांत उभें राहून लढण्याचें धाडस न करितां जंगलाचा व डोंगराचा आश्रय करून आपण रहावें व तेथून फौजेच्या टोळ्याटोळ्यानीं मराठ्यांवर छापे घालावे. आपण बिकट जाग्यावर छावणी करून राहणार, तेव्हां अशा छावणीवर मराठ्यांची नुसत्या घोडे स्वारांची फौज येऊन काय करणार? पायदळ व तोफखाना त्यांजवळ ह्मणण्या सारखा नाहीं. येऊन जाऊन मुलूखगिरीचे आतां दोन महिने राहिले आहेत. इतक्या अवकाशांत बंकापुर व धारवाड यां सारखीं मुख्य मुख्य ठाणीं आहेत तेवढीं हरप्रयत्नानें राखावीं. बारीक सारीक ठाणीं शत्रूकडे गेलीं तरी चिंता नाहीं. पावसाळा सुरू झाला ह्मणजे मराठ्यांस परत जाणें भागच आहे. या प्रांतीं त्यांची छावणी होणें अशक्य आहे. ते परत गेल्यावर सारा मुलूख आपलाच आहे. झालेली नुकसानी भरून काढूं. दसरा झाल्यावर ते पुनः चालून येतील तर त्या वेळचें त्या वेळेस पहातां येईल! या प्रमाणें हैदराची मसलत होती. त्याच्या सैन्याचें वर जें आम्हीं वर्णन केलें आहे तें मराठी कागदपत्र पाहून स्थूलमानानें लिहिलें आहे. या स्वारींत पेशवे व हैदर यांच्या सैन्या संबंधें कर्नल विल्क यानें मजकूर लिहिला आहे तो असा—

रटेहळ्ळी येथें हैदरानें छावणी दिली होती, तेव्हां त्याजवळ वीस हजार स्वार, वीस हजार गारदी व वीस हजार बरकंदाज प्यादे इतकें सैन्य होतें. त्याचा तोफखाना ही चांगला होता. तोफा किती व कोणच्या तऱ्हेच्या होत्या हें जरी सांगतां येत नाहीं, तरी पण मला वाटतें कीं, या वेळीं त्याजवळ स्वारीच्या तोफा पंचवीस असाव्या. मराठे, रजपूत व मुसलमान या जातींचे घोडेस्वार पेशव्यांजवळ होते, त्यांची एकंदर संख्या साठ हजार धरिलेली आहे. हैदराचे ही घोडेस्वार असलेच होते, पण वर सां-

गितल्या प्रमाणें हैदराच्या एका स्वारास पेशव्यांचे तीन स्वार, या प्रमाणें उभयपक्षांत अंतर होतें. ही संख्या उगीच कांहीं तरी फुगवून सांगितल्या प्रमाणें जरी असली तरी निदान तीस पासून चाळीस हजार पर्यंत पेशव्यां जवळ स्वार होते हें खरें आहे. घोडे स्वारां प्रमाणेंच पेशव्यांजवळ पायदळ व तोफा शत्रू पेक्षां दुपटीनें किंवा तिपटीनें अधिक होत्या. पेशव्यांचे गारदी हैदराच्या गारद्यां पेक्षां सामर्थ्यानें व शौर्यानें श्रेष्ठ होते, पण त्यांची कवाइतीची तयारी तितकी चांगली नव्हती. कवाईत न शिकलेलें उभय पक्षांचें जें पायदळ होतें, त्यांत पेशव्यांजवळ आरब बरकंदाज होते ते हैदराच्या बरकंदाज प्याद्यां पेक्षां फारच चांगले होते. परंतु बर्चीवाले मराठे प्यादे हैदराच्या लष्करांत चित्रदुर्गकराचे तसलेच प्यादे होते त्यां पेक्षां अगदीं कनिष्ट प्रतीचे होते. ”

विल्कच्या या लिहिण्या संबंधानें आम्हांस इतकेंच सांगावयाचें आहे कीं, हैदरा पेक्षां पेशव्यां जवळ तोफा आणि पायदळ अधिक होतें असें तो लिहितो तें मुळींच खरें नाहीं. हें सामान त्यां जवळ अगदीं जुजबी होतें व नुसत्या तोफखान्यानें किंवा पायदळानें जर लढाईचा निकाल लागावयाचा असता तर हैदरास जय मिळाल्या शिवाय राहताना. दुसरें असें कीं, हैदराच्या फौजेची गणना जी त्यानें केली आहे तींत त्याचे धारवाड प्रांतीं ठाण्या ठाण्यानीं पांच चार हजार उत्तम लोक होते, ते व मीरफैजुल्ला बरोबरचे आठ दहा हजार लोक धरिलेले नाहींत. असो. मराठ्यांशीं पुढें कशी कशी लढाई करावयाची ही मसलत ठरविल्यावर हैदरानें मीर फैजुल्लास पेशव्यांच्या तोंडावर धारवाडा जवळ ठेविलें व आपण ही वर सांगितल्या प्रमाणें साठ हजार फौजेसह बिदनुराहून निघून तुंगभद्रेच्या आसपास अनवडी येथें छावणी देऊन राहिला.

एप्रिल महिन्यांत मीरफैजुल्लानें गोपाळराव पटवर्धनाचा पराजय करून त्याची फार नासाडी केली असें कर्नल विल्क लिहितो, पण ही

गोष्ट खरी असण्याचा संभव दिसत नाहीं. या संबंधें त्याचें लिहिणें असें आहे;—" कृष्णेच्या उत्तरेस मिरज ह्मणून किल्ला आहे, तेथील मराठा सरदार गोपाळराव याच्या कुमकेस पेशव्यानें बरीच फौज पाठवून त्यास हुकूम केला कीं, तूं कृष्णा उतरून थोरली फौज येई पर्यंत शत्रूस अडवून धर. गोपाळरावानें मीरफैजुल्ला पेक्षां आपली फौज अधिक आहे, असें पाहून त्याशीं लढाई करण्याचा निश्चय केला. पण त्या दोघांत एप्रिल महिन्यांत जी लढाई झाली तींत गोपाळरावाचा पराजय होऊन त्याची फार नासाडी झाली. " पेशव्यांच्या बातमींत मीरफैजुल्लाची फौज पांच सहा हजार पायदळ, चार हजार स्वार व सोळा तोफा इतकी होती. (पहा नंबर ४१९) तेव्हां या पेक्षां अधिक फौज विल्कच्या लिहिण्या प्रमाणें गोपाळरावाजवळ असावयास पाहिजे; पण तशी ती या स्वारींत केव्हां ही नव्हती. दुसरें असें कीं, ही लढाई एप्रिल महिन्यांत झाली असल्याचें कर्नल विल्क लिहितो, व पुढच्याच महिन्यांत (मे मध्यें) थोरल्या लष्करासह पेशव्यांची स्वारी धारवाडाकडे आल्याचें कळवितो, हें ही खोटें आहे. कारण, एप्रिलांतच मुळीं पेशव्यानीं हुबळी घेतली, सावनुरकरांची भेट घेतली व तुंगभद्रेकडे कूच केलें. तेव्हां हें सारेंच लिहिणें असंबद्ध असून यास आधार ह्मटला तर मीरफैजुल्लाची पटवर्धनांच्या एखाद्या बारीक सारीक टोळीशीं या पूर्वी कधीं लहानशी चकमक झाली असेल, आणि तिचें वर्णन कोणी मिथ्यानें सदरहू साहेबाजवळ फुगवून सांगितलें असेल! या वर्षीच्या एप्रिलांत किंवा कोणच्या ही महिन्यांत गोपाळरावाची व मीरफैजुल्लाची लढाई झालेली नाहीं हेंच खरें; कारण, तशी लढाई होऊन पटवर्धनांची ' फार नासाडी ' झाली असती तर त्याबद्दल कांहीं दाखला त्यांच्या दप्तरांत सांपडावा कीं नाहीं ? पण या बाबतींत आम्हांस कोठेंच कांहीं उल्लेख केलेला सुद्धां दृष्टीस पडला नाहीं. विल्कची चूक झाली ती झालीच, पण डफ़साहेबानीं ही विशेष चौकशी न करितां तोच मजकूर आ-

पल्या ही पुस्तकांत उतरून घेतला !

श० १६८६ च्या चैत्रांत रावसाहेब पेशवे मनोळीहून सर्व सैन्या-सह कूच करून धारवाडाकडे येऊं लागले, तेव्हां मीरफैजुल्ला मागें हटत हटत सावनूरच्या दक्षिणेस दहा कोसांवर हनगल ह्मणून गांव आहे तेथ पर्यंत गेला. तेथें त्यानें छावणी तयार केली. तिच्या दोन बाजूंस दोन तळीं व पिछाडीस झाडी असून पुढच्या तोंडीं खंदक खणिलेला होता व बातेऱ्या बांधिलेल्या असून त्यांवर तोफा ठेविलेल्या होत्या. मराठे अगदीं जवळ आले, तेव्हां या ही छावणींत राहणें धोक्याचें वाटल्यामुळें तो अन-वडीस हैदर होता त्यास जाऊन मिळाला. रावसाहेबानीं धारवाडा समीप येऊन मुक्काम केला, तो किल्ला फार बळकट असून त्यांत हैदराचें लढाऊ सामान व शिबंदी भरपूर होती. मुख्य किल्लेदार खुद्द मीरफैजुल्लाचा भाऊ होता. हा किल्ला घेण्याच्या भरीस पडलों तर बहुत काळ येथेंच खर्च होऊन मोहिमेचे दिवस निघून जातील व पुढील मनसबे तसेच राहतील; असा विचार करून रावसाहेब हुबळीस गेले. तेथें नवी व जुनी हुबळी अशीं दोन ठाणीं होतीं. दोन्हीं ठाणीं भक्कमच होतीं, पण त्यांत जुन्या हुबळीचा बंदोबस्त विशेष चांगला होता. तेथें हसनअल्लीखान नामक शूर किल्लेदार होता व तुळजोपंत ह्मणून एक ब्राह्मण अधिकारी होता. हैदरानें तुंगभद्रे-च्या उत्तरेस मराठ्यांचें जितकें राज्य घेतलें होतें, तें सर्व तुळजोपंताच्या हवालीं केलेलें होतें. हाच त्या सर्व मुलखाचा वसूल घेऊन हैदरास देत असे. नव्या हुबळीस गोपाळरावानें वेढा घालून तें ठाणें लवकरच काबीज केलें. जुन्या हुबळीवर पेशव्यांच्या फौजेनें हल्ला केला, तेव्हां किल्लेकऱ्यानीं तो मारून काढिला. त्या प्रसंगीं पेशव्यांचे पांच पन्नास लोक ठार झाले व तीन चारशें जखमी झाले. धनसिंग ह्मणून पेशव्यांच्या लोकांतला एक शूर शिपाई होता तो याच ठिकाणीं पडला, व रामचंद्र गणेश या प्रख्यात सरदाराच्या मनगटास गोळीची जखम लागली. दुसरे दिवशीं किल्लेकरी

हुबळी स्वाधीन होत्ये
सावनूरकरांची भेट

शरण आले व नव्या हुबळींत ही पेशव्यांचें ठाणें बसलें. तेथें हसनअल्ली-खान व तुळजोपंत सांपडले त्यांस कैद करून कोपळच्या किल्ल्यावर पाठवून देण्यांत आलें. तेथून रावसाहेब निघून सांवशी व कुंदगोळ यांमध्यें ओढा आहे त्या ठिकाणीं मुक्कामास उतरले. तीं दोन्हीं ठाणीं गोपाळरावानें हस्तगत केलीं. विसाजी नारायण व नरसिंगराव धायगुडे यानीं जाऊन गदग घेतलें. नवलगुंद, बेहट्टी, मुळगुंद, जालिहाळ व इतर पुष्कळ ठाणीं थोडक्याच दिवसांत हातीं आलीं.

नंतर रावसाहेबांची स्वारी चैत्र शु० १४ स सावनुरास गेली, व त्या शहरा पासून दोन कोसांवर तळ देऊन राहिली. तेथील नबाब अबदुल हकीमखान याचें हैदरानें सर्वस्व लुटून घेतल्यामुळें त्याची इतकी हलाखी होती कीं, त्याजवळ हत्ती होता तो रोडका होता, ह्मणून आधीं एक चांगला हत्ती श्रीमंतानीं त्याजकडे पाठवून दिला, व त्यावर बसून नबाबाची स्वारी भेटीस आली ! त्यास आणावयास विंचूरकर व नारो शंकर गेले होते. श्रीमंत ही दुसऱ्या दिवशीं नबाबाच्या भेटीस सावनुरांत गेले होते. नबाबानें त्यांस मेजवानी करून त्यांचा बहुत सन्मान केला. तिसरे दिवशीं नबाब पुनः भेटीस आला, तेव्हां श्रीमंतानीं त्यास हत्ती, घोडे, शिरपेंच व त्याच्या दोन मुलांस पदकें दिलीं. त्या प्रसंगीं पुढें मसलत कशी करावी या संबंधें वाटाघाट झाली. तो नबाब हैदरास फार भीत असे. आपण मराठ्यांस मिळालों या बद्दल हैदरास फार संताप आला आहे, व तो केव्हां अकस्मात् झडप घालून दगा करील याचा नेम नाहीं, हें त्यास कळून चुकलें होतें. त्याच्या राजधानी शेजारीं बंकापुरास हैदराचें ठाणें होतें हें त्यास मोठें शल्य झालें होतें. सदरहू ठाणें आधीं काबीज करून तेथून शत्रूचा नायनाट करावा, ह्मणजे आपण काळजींतून मुक्त होऊं; असें नबाबाचें पेशव्यां जवळ बोलणें पडलें. परंतु ही मसलत ऐकून पेशव्यांचा

परिणाम लागला नसता. त्यांस शत्रूचें जलदीनें पारिपत्य करून मोहीम शेवटास नेण्या करितां दूरवर नजर फेंकून मसलत योजणें जरूर होतें. त्यानीं विचार केला कीं, जों पर्यंत शत्रू झाडी धरून बसल्यामुळें त्याचें पारिपत्य आपल्या हातून झालें नाहीं तों पर्यंत आपण किती ही ठाणीं घेतलीं तरी तीं आपलीं झालींच असें ह्मणतां येत नाहीं. कारण कीं आपण दूर गेलों ह्मणजे शत्रु पुनः येऊन तीं ठाणीं घेण्यास चुकणार नाहीं. असें झालें ह्मणजे घेतलेला मुलूख पुनः त्याच्या हातीं जाणार. नंतर पुनः आपण येऊन ठाणीं व मुलूख घ्यावा, पुनः त्यानें घ्यावा, असें हें किती दिवस चालणार! या करितां कसें ही करून तो झाडींत दडून बसला आहे त्यास मैदानांत ओढून आणिलें पाहिजे. असा विचार करून त्याणीं मसलत योजिली कीं, तूर्त सर्व गोष्टी बाजूस ठेवून आपण थेट तुंगभद्रा पार होऊन चित्रदुर्ग व हरपनहळ्ळी या मुलखांत जावें व तेथून खंडणी वसूल करून शत्रूकडे गेलेल्या त्या दोघा संस्थानिकांस साधल्यास आपणाकडे मिळवून घ्यावें, हैदराच्या पिछाडीस जाऊन तिकडील मुलूख उद्वस्त करावा, आणि गुत्तीहून मुरारराव घोरपडे चार हजार फौजेसह आपणाकडे येत आहे, त्याच्या येण्याचा मार्ग सुलभ करून द्यावा. आपण दूर गेल्याची हुलकावणी दाखविल्यामुळें हैदर मैदानांत येऊन ठाण्यांस उपद्रव देऊं लागेल तर आपण ताबडतोब दौड करून परत येऊन त्यास गांठावें व त्याच्या सैन्याचा संहार करावा. तसें तो न करील तर फौजेचें चार दिवस पोट भरून कांहीं ऐवज खंडणीचा मिळेल तर तें ही इष्टच आहे. श्रीमंतांस ऐवजाची तरतूद करण्याचें मोठेंच संकट येऊन पडलें होतें. त्यांची घोडे-स्वारांची बहुतेक फौज होती ती निरनिराळ्या **जहागीर**दारानीं आणिलेली होती. तिजबद्दल त्यांवर पैक्याचें जोखीम नव्हतें. हुजराती पैकीं कांहीं फौज मात्र त्यानीं स्वतः ठेविलेली होती। तिची ही **नालबंदी**च्या रूपानें अर्धें वेतन आगाऊ मिळाल्यामुळें समजूत झालेली होती. पैक्याबद्दल तिचा कांहीं तूर्त

तगादा नव्हता. पण गारदी व तोफखाना व इतर कारखाने व शागिर्द पेशा वगैरे जातखर्च यांचे रोजमुरे दरमहाचे ठरावून दिलेले होते. तो ऐवज आमच्या अजमासें दहा बारा लक्षांचा होत होता, तो त्यांस महिनेमहा उभा करणें प्राप्त होतें. ते पुण्यास नाना फडणिसांकडे व नाशिकास दादासाहेबांकडे वारंवार पत्रें पाठवीत कीं, कसें ही करून कांहीं द्रव्य स्वारींत पाठवून द्या. पण त्यांचा खर्चच भागवितां भागवितां त्यांस पुरे झालें होतें. तेव्हां तिकडून मदत होण्याचा मार्ग खुंटला होता. एतावता द्रव्य मिळविण्या साठीं तरी त्यांस ही मसलत करणें जरूर पडलें होतें. ही मसलत पक्की ठरलीसें पाहून सावनूरकरानें श्रीमंतांस विचारिलें कीं, तुम्हीं तर मला सोडून दूर चाललां, पण तुम्हीं गेल्यावर इकडे हैदर येऊन माझा गळा दाबील त्याची वाट काय? तो नबाब श्रीमंताच्या पदरीं पडला होता तेव्हां त्याचें संरक्षण करणें त्यांस भागच होतें. त्यानीं त्याचे पांचशें स्वार व एक पुत्र यांस समागमें स्वारी बरोबर घेऊन त्या नबाबास सावनुरास जाण्यास निरोप दिला. तूर्त त्याच्या रक्षणा करितां महिपतराव कवडे, धोंडो दत्तात्रय व महिपतराव चिटणीस या सरदारांचीं तीन पथकें मिळून दोन हजार स्वार श्रीमंतानीं सावनुरास पाठविले, व गोपाळराव पटवर्धन शिरहट्टीस वेढा घालून बसला होता, त्यास ही तें काम झाल्याबरोबर कोठें दुसऱ्या स्थळास न गुंततां थेट सावनुरास जाऊन राहण्या विषयीं ताकीद केली. शिरहट्टी हस्तगत होवो अगर न होवो, आम्हीं परत येऊं तों पर्यंत जेणें करून सावनूरकरास हैदराचा उपद्रव न होईल ती तजवीज तुम्हीं करावी, आणि हैदर मैदानांत उतरतो असें दृष्टीस पडतांच आम्हांस ताबडतोब लिहून कळवावें, अशी त्यांची गोपाळरावास ताकीद होती.

या प्रमाणें बंदोबस्त करून रावसाहेब करजगीस गेले. व पुढें तुंगभद्रा पार होऊन हावनुरावरून चित्रदुर्गाकडे चालले. ही बातमी हैदरास

कळतांच तो स्वार, पायदळ व तोफखाना वगैरे जय्यत तयारी करून अनवडीची छावणी सोडून सावनूरकराच्या राज्यांत रटेहळ्ळी येथें आला, व तेथें छावणी करून आसपास निर्धास्तपणें फौज घेऊन घिरट्या घालूं लागला. तो बंकापुरापासून पांच कोसांवर आल्याची बातमी सावनुराहून व इतर ठिकाणांहून आठ दहा दिवस लोटले नाहींत तोंच रावसाहेबांकडे आली. त्याचक्षणीं त्यानीं लष्कर त्वरेनें परत फिरविलें, शिरहट्टीचा वेढा उठवून निघून येण्याविषयीं गोपाळरावास लिहिलें, आणि लष्करच्या कांहीं टोळ्या इकडे तिकडे गुंतल्या होत्या त्या ही एकत्र जमा केल्या. चैत्र वद्य अमावास्येच्या सुमारास रावसाहेब सावनूरच्या आसपास आले, तों त्यां जवळ चाळीस हजार फौज जमली. नंतर वैशाख शुद्ध द्वितीयेस त्यानीं विठ्ठलराव विंचूरकर व गोपाळराव पटवर्धन यांस हैदर कोठें आहे, त्याच्या छावणीचा बंदोबस्त कसा काय आहे, त्याची फौज किती आहे, ही बातमी आणण्याचा हुकूम केला. त्या प्रमाणें ते आठ नऊ हजार घोडेस्वार बरोबर घेऊन हैदराचा तपास काढीत चालले.

रटेहळ्ळीस हैदरानें येऊन छावणी केल्याचें पूर्वीं लिहिलेंच आहे. ती छावणी राखण्याचें काम मीरफैजुल्लावर सोंपवून तो पंचवीस हजार निवडक गारदी व पंचवीस तोफा व कित्येक हजार स्वार बरोबर घेऊन बाहेर पडला, तो तुंगा व भद्रा या नद्यांचा हरिहर येथें संगम होतो तेथ पर्यंत आला. पेशवे तुंगभद्रा पार झालेले असतां ही एकाएकीं त्वरेनें परत फिरले व आतां ते आपल्या छावणीवर चाल करून येत आहेत, अशी त्यास तेथें बातमी कळली. त्यावरून तो ही झपाट्यानें मजल करीत रटेहळ्ळी समीप येऊन ठेपला. इतक्यांत पटवर्धन व विंचूरकर यांची फौज त्याच्या दृष्टीस पडली. ती पहातांच त्यानें विचार केला कीं, मराठ्यांची ही एवढी लहानशी फौज आयती आपण होऊन जवळ आली आहे. हिला लढाईस गुंतवून हळूहळू आपल्या छावणीकडे ओढीत आणावें, आणि ए-

कीकडून आपण व दुसरीकडून मीरफैजुल्ला असे एकदम तुटून पडून ही सबंध फौजेची फौज कापून काढावी ! पण किती झालें तरी या ' गनिमी काव्या ' मध्यें हैदर हा अजून कच्चा चेला होता. त्याला मराठे कसे दाद देतील ! तो त्यांस ओढूं पहात होता, पण ते ही त्यास मैदानांत ओढून आणण्या करितांच आले होते हें त्यास काय ठाऊक ? दोघांची झटपट सुरू झाली आणि तींत हैदर अगदीं पक्का फसला. इकडे हैदरास युद्धांत गुंतवून गोपाळरावानें मागें रावसाहेब पांच सहा कोसांवर येऊन पोंचले होते यांस निरोप पाठविला कीं, आह्मीं शत्रूस मैदानांत आणीत आहों, तुह्मीं लौकर निघून यावें. हैदरावर मराठ्यांची फौज तुटून पडण्याचा आव दाखवी स्वारां स्वारांची मिठी पडे, कांहीं गोळागोळी होई बारीक सारीक हिरिऱ्या होत, तो तोफा मारीत पुढें चालून आला, ह्मणजे हे मागें सरत. पुनः तो मागें हटूं लागला ह्मणजे हे जाऊन त्यास बिलगत तेव्हां त्यांस धुडकावून लावण्या करितां तो आणखी पुढें सरे. असें करितां करितां बुणगें मागें राहून आपण तीन कोस पुढें मैदानांत आलों हें हैदरास कळलें सुद्धां नाहीं !

गोपाळरावाचा निरोप येतांच रावसाहेब सारी फौज घेऊन दौड करीत सायंकाळच्या चार घटका दिवसास समरांगणांत येऊन दाखल झाले. आज युद्धप्रसंग होईलच अशी त्यांची खात्री नव्हती, व अर्थात् तयारी ही नव्हती. इतक्या घाईनें येतां येतां त्यानीं फक्त दोन तोफा बरोबर आणिल्या होत्या त्यांचा शत्रूवर तत्काळ मारा सुरू झाला. एका घटके पूर्वीं मराठ्यांची लहानशी फौज समोर दृष्टीस पडत होती, पण चोंहोंकडे नजरेचा पल्ला पुरे पर्यंत कोसानकोस पसरलेलें व समुद्राच्या लाटां प्रमाणें उचंबळणारें हें घोडेस्वारांचें असंख्य सैन्य आतांच कोठून निर्माण झालें ? असा हैदरास विचार पडून त्यास पराकाष्टेची भीति वाटली, व तो छावणीकडे परत निघाला. शत्रूच्या फौजेनें लगट केली ह्मणजे उभें राहून

हैदरअल्लीवर पहिली स्वारी

तोफांची मारगिरी करून त्यांस मागें सारावें व पुनः वाट चालूं लागाय, अशी त्यानें शिस्त धरिली. पण इतक्यांत रावसाहेबानीं ही त्यास जखडून धरण्याची तजवीज केली. उजव्या बाजूस पटवर्धन, डावीकडे नारो शंकर, पिछाडीस विंचूरकर व तोंडावर हुजरातेसह खासा रावसाहेब राहिले व हल्लयावर हल्ले करून शत्रूस चोंहोंकडून त्यानीं कोंडून धरिलें. हैदराचे गोलंदाज फ्रेंच लोकानीं तयार केलेले होते, त्याची दारू फार चांगली, व तोफा ही जलद बाराच्या व लांब पल्लयाच्या होत्या. पण त्याची मारगिरी चोंहोंकडे पसरलेल्या व चळवळणाऱ्या मराठी सैन्यास फारशी हानिकारक झाली नाहीं. मराठयांच्या मात्र दोनच तोफा होत्या तरी त्यांचे गोळे हैदराच्या पलटणांच्या भरगच्च रांगांत जाऊन पडूं लागल्यामुळें त्याची अतोनात नासाडी झाली. पण हैदर ही कांहीं सामान्य सेनापति नव्हता. इतकी दुर्दशा झाली, तरी त्यानें आपला बंदोबस्त विस्कळीत होऊं दिला नाहीं व छावणीकडे जाण्याचा नेट ही सोडिला नाहीं. आणखी प्रहर सहा घटका दिवस असता तर त्याचा कितपत निभाव लागता हें निराळें, पण रात्र जवळ येत चालल्यामुळें त्याच्या जिवास धीर आला होता. सूर्यास्ताच्या वेळीं शत्रूवर चोंहोंकडून एकाच वेळीं हल्ला करण्या विषयीं रावसाहेबानीं हुकूम केला. त्या बरोबर हुजरातेनें बेजरब चालून घेतलें, व तिकडून पटवर्धनानीं ही हल्ला केला, परंतु बाकीच्या फौजेनें कुचरपणा केला. हा शेवटचा हल्ला सोशिला ह्मणजे आजच्या प्रसंगांतून आपण निभावलों असें मनांत आणून हैदरानें ही सारें अवसान गोळा करून बंदुकांचा व जेजालांचा भयंकर मारा केला व असल्या निकडीच्या प्रसंगासाठीं एवढा वेळ तोफांत छरे भरून ठेविले होते, त्यांची ही याच वेळीं सरबत्ती केली. शिवाय त्याच्या सुदैवानें याच वेळीं सोंसाट्याचा वारा सुटून धुळीचे लोट उठल्यामुळें हल्ला करणाऱ्यांस पुढें कांहीं दिसेनासें झालें. यामुळें हा हल्ला व्यर्थ झाला. हैदरास असेंच रात्रभर कोंडून धरावें असा गोपाळरावाच

सल्ला होता, परंतु तसें करणें शक्य आहे, असें रावसाहेबांस वाटलें नाहीं. त्यानीं सर्व फौज गोटास परत नेली, व हैदर ही आपल्या छावणींत सुखरूप जाऊन पोंचला.

या प्रमाणें ही रटेहळ्ळीची लढाई झाली. हींत मराठ्यांचें माणूस ठार व जखमी मिळून पांच पन्नासाच्या आंतच होतें. शेवटच्या हल्ल्यांत हुजरातीचे शंभर घोडे पडले व साऱ्या युद्धांत आणखी ही कांहीं पडले असतील. एकंदरींत हें कांहीं ह्मणण्या जोगें नुकसान नाहीं. हैदराचें मात्र नुकसान फार मोठें झालें. कारण त्यानें अतिश्रमानें कवाईत शिकवून तयार केलेले शेंकडों, किंबहुना हजारों गारदी या लढाईंत पडले असावे, असा विल्कच्या लिहिण्याचा रोंख दिसतो. या लढाई पासून हैदराच्या फौजेस मराठ्यांची दहशत बसली, एवढें मात्र निर्विवाद आहे.

दुसऱ्या दिवशीं रावसाहेब सर्व सैन्यासह रटेहळ्ळी समीप आले. तेव्हां त्यांचा तोफखाना आदले दिवशीं मागें राहिला होता तो आतां येऊन पोंचला होता. त्यानीं त्या तोफखान्याचा मारा हैदराच्या छावणीवर करून त्याचें सारें लष्कर हालवून दिलें. तो ही आपल्या बातेऱ्यांवरून तोफांचा मारा करूं लागला. या प्रमाणें दोन चार दिवस झालें. वैशाख शुद्ध सप्तमीच्या दिवशीं तो छावणी सोडून झाडींत शिरण्या करितां निघाला असतां मराठ्यानीं त्यास तोफांचा असा मार दिला कीं, त्यास घाईनें पुनः छावणींत शिरणें भाग पडलें. अष्टमीच्या दिवशीं सावनूरकर नबाब व मुरारराव घोरपडे लष्करांत येऊन दाखल झाले. रावसाहेबानीं मुररावाचा बहुत सन्मान केला. आपला चुलत आजा संताजीराव घोरपडे सेनापति यानें असंख्य पराक्रम करून राज्य रक्षण केलें असतां राजाराम महाराजानीं नाहक छळ करून त्यास ठार मारविलें; त्या संताजीरावाचें सेनापतीचें पद आतां तरी मला मिळावें, असें मुररावाचें म्हणणें होतें तें मान्य करून रावसाहेबानीं त्यास तें पद दिलें. त्या पदाची जहागीर गु-

जराथ प्रांत गायकवाडाकडे होता, तो मुराररावास मिळण्याचा मार्गच न-व्हता, आणि या समयीं रावसाहेबानीं कर्नाटका पैकीं देखील कांहीं नवीन जहागीर त्यास दिल्याचा कोठें उल्लेख आढळला नाहीं. तेव्हां मुराररावास जो हा सेनापतीचा किताब मिळाला, तो सांप्रतच्या सरकारानें कैलासवासी अलिजाबहादर जयाजीराव शिंदे यांस दिलेल्या ' कमांडर-इन् चीफ् ' च्या किताबा प्रमाणें निवळ ' सन्मानार्थकच ' होता ! कदाचित् मुरारराव हा मोंगलाचा जहागीरदार असल्यामुळें आजपर्यंत पेशव्यांस खंडणी देण्यास पात्र होता, तेवढी खंडणी मात्र त्यास इतउत्तर माफ झाली असावी.

अनवडीस पूर्वी हैदराची छावणी होती तेथ पासून रटेहळ्ळीपर्यंत दाट झाडी होती, व रस्ता ही फार अडचणीचा होता. या झाडीस मासूरची बारी ह्मणत असत. या बारींतून अनवडीकडून हैदराच्या लष्करास धान्य वगैरे सर्व सामानाचा पुरवठा होत होता. सावनूरकर व मुराररावआल्या नंतर रावसाहेबानीं असें ठरविलें कीं, मासूरची बारी रोंखून तिकडून शत्रूस धान्य व वैरण मिळत असल्ये ती बंद करावी, आणि त्या-च्याच छावणींत त्यास चोंहोंकडून घेरा घालून तोफांचा मार देऊन जेरीस आणावें. हें ठरल्यावर दुसऱ्या दिवशीं विसाजी कृष्ण बिनीवाले यानें बा-रींत शिरून तिकडून हैदराची कही येत होती, तिजवर छापा घालून सा-मान लादलेलीं उंटें व तट्टें वळवून आणिलीं. तेव्हां हैदरानें विचार पाहि-ला कीं, आपल्या सैन्यास दहशत बसली असल्यामुळें त्याच्या हातून परा-क्रम तर कांहीं होत नाहीं. येथें रहावें तर फुकट मार खाऊन शिवाय उपाशीं मरण्याची पाळी येणार. या पेक्षां तूर्त पलायन करणेंच श्रेयस्कर होय ! असा विचार करून तो एका-रात्रीं हळूच उठून साऱ्या लष्करासह बारीमध्यें दाट झाडी आहे तींत शिरला, आणि मायनहळ्ळी ह्मणून मासु-रापासून तीन कोसांवर स्थळ आहे तेथें त्यानें मुक्काम केला. तो छावणी सोडून गेल्यावर दुसऱ्या दिवशीं विंचूरकर, आबा पुरंदरे, बिनीवाले व

हैदर झाडींत शिरतो
पेशवे छावणीस राहतात

सखारामबापू अशीं चार पथकें बारी ओलांडून मासुरापर्यंत गेलीं होतीं. तेथें झाडी अतिशय असल्यामुळें ते सरदार एका टेंकडीवर चढून हैदराचें लष्कर कोठें कसें राहिलें असावें याचा अजमास काढीत होते, इतक्यांत त्यानें लपत छपत भलत्याच वाटेनें अकस्मात् येऊन त्यांवर तुटून पडून त्यांस बारी पार हुसकून लाविलें! ते बेफाम नव्हते यामुळें बचावले, नाहीं तर त्यांचा नाश फारच झाला असता.

मायनहळ्ळी ही डोंगरांत दाट जंगलांतली जागा असल्यामुळें तेथें घोडे स्वारांचा कांहीं इलाज चालण्या जोगा नव्हता. आणि त्या घांटमाध्याच्या आसपासच्या भागीं आतां पर्जन्य पडूं लागल्यामुळें लष्कर फार हैराण झालें. वैरण कोठें ही मिळेना. धान्याची अतिशय महागाई झाली, यामुळें यंदां हैदराचें झालें इतकेंच पारिपत्य बस्स झालें, असें मानून तेथून लष्कर परत आणणें रावसाहेबांस प्राप्त झालें. परंतु पावसाळ्यांत या प्रांतींच छावणी करावी, कीं परत पुण्यास जावें; हा त्यांस मोठा विचार पडला. हैदरानें पंचवीस तीस लक्ष रुपये खंडणी दिली तर तूर्त पुरता तह करून पुण्यास जाण्याचा त्यांचा विचार पूर्वीच ठरला होता. परंतु हैदरास मोठी आशा ही होती कीं, मराठयांचें लष्कर छावणीस या प्रांतीं राहणार नाहीं. तें परत जाईल आणि मग पुनः सारा मुलूख आपलाच होईल. हैदर व पेशवे यांमध्यें जें हें युद्ध सुरू झालें होतें, तिकडे साऱ्या दक्षिण हिंदुस्थानाचें लक्ष वेधलें होतें. हैदराच्या पराक्रमा विषयीं व शहाणपणा विषयीं आतां कोणास संशय उरला नव्हता. मराठे लोक त्यास भारी आहेत हें ही सर्वांस कबूल होतें. परंतु त्या लोकांचें पानपतच्या स्वारी पासून दैव फिरलें व त्यांचें साम्राज्य नष्ट झालें, अशीच हिंदुस्थानांतील इतर प्रांतांच्या लोकांची समजूत झाली होती. ही समजूत चुकीची आहे व आपल्या राष्ट्राचा जोम अजून पहिल्या प्रमाणेंच कायम आहे, हें जणु काय सर्व लो-

कास जाहीर करण्या करितांच रावसाहेबानीं पक्का निश्चय केला कीं, यंदा धारवाडच्या आसपास छावणीस रहावयाचें, आणि हैदराची पुरती खोड मोडल्या शिवाय परत ह्मणून जावयाचें नाहीं.

हा निश्चय ठरल्यावर सारें लष्कर घेऊन रावसाहेब कुंदगोळापर्यंत परत आले. तेथें छावणीची व्यवस्था त्यानीं केली. सावनूरच्या नबाबास धास्ती पडली होती कीं, या पावसाळ्यांत हैदर कांहीं आपला सूड घेतल्या शिवाय राहणार नाहीं. पेशवे छावणीस राहिले असतां ही त्यांच्या देखदेखत झाडींतून हैदरानें येऊन सावनूर घ्यावें ही गोष्ट त्यांस लांछनास्पदच होती व ती न होऊं देण्याची तजवीज करणें त्यांस अवश्य होतें. या साठीं नबाबाची राजधानी राखण्या करितां त्यानीं एक हजार गारदी पाठविले व आणखी शिबंदी ठेवण्या करितां त्या नबाबास पन्नास हजार रुपये दिले. सावनूरची कुमक वेळ पडल्यास करितां यावी ह्मणून पटवर्धनांस या शहरापासून दहा कोसांवर राहण्याचा त्यानीं हुकूम दिला. इतकें झालें तरी नबाबास सावनुरास राहण्याची छाती झाली नाहीं. त्यानें आपली फौज मात्र सावनुरास पाठविली व आपण पेशव्यां बरोबर राहिला. लक्ष्मेश्वरास नारो शंकर राहिला. विंचूरकर, रास्ते व भोंसले नवलगुंदास राहिले. धारवाड प्रांतीं आतां हैदराच्या ताब्यांत मातबर अशीं तीन स्थळें राहिलीं होतीं. एक खुद्द धारवाड, दुसरें बंकापुर व तिसरें शिरहट्टी. या तिहीं शिवाय पटवर्धनांच्या जहागिरी पैकीं श्रीमंतगड, येळवंती, व आणखी ही कांहीं बारीक सारीक ठाणीं शत्रूच्या ताब्यांत होतीं. पैकीं बंकापुराला आणि सावनुराला गांठ होती. बाकीच्या ठाण्यांतील लोकानीं बाहेरपडून मुलखास उपद्रव देऊं नये व हैदराची त्यांस कुमक पोंचूं नये, ह्मणून त्या त्या रोखानें फौजेच्या टोळ्या रावसाहेबानीं उतरविल्या. पावसाळा जवळ आला ह्मणजे शिलेदार लोक, कोणाचें कांहीं एक न ऐकतां लष्कर सोडून घरीं यावयाचेच. त्या प्रमाणें याही मोहिमेंत प्रत्येक पथकांतले कांहीं लोक घरीं ग-

पुरंदरावर फितूर
पटवर्धन सावनुरास जातात

ले. वर सांगितल्या प्रमाणें मुलखाच्या बंदोबस्ता करितां फौजेची वांटणी करून काय दहा बारा हजार लोक राहिले तेवढेच बरोबर घेऊन रावसाहेब पूर्वेस मुद्गल सरकारांत (सरकार ह्मणजे जिल्हा) व गदवालाकडे खंडणी जमा करण्या करितां चालले. पावसाळ्यांत सुद्धां एका जागीं बसून विश्रांति घेण्यास त्यांस फुरसत मिळेना !

पेशवे छावणीस राहिले यामुळें हैदराची निराशा झाली, तथापि त्यांच्या मुलखास व सैन्यास हरएक यत्न करून चैन पडूं द्यावयाचें नाहीं, असा त्यानें निश्चय केला. सावनूरकरावर त्याचा किती रोष होता, हें व तो नवाब त्यास किती भीत असे, हें मागें सांगितलेंच आहे. सावनुरा पासून तीन कोसांवर बंकापुर आहे तें ठाणें हैदराचें होतें, व तेथें त्याची दोन तीन हजार मराठे घोडे स्वारांची टोळी होती व कांहीं गारदी ही होते. तेथें लालामिय्या नांवाच्या सरदारा बरोबर आणखी तीन हजार गारदी व कांहीं तोफा पाठवून त्यास त्यानें हुकूम केला कीं, तूं नेहमीं बंकापुरास राहून सावनुरास उपद्रव देत जा. त्यावरून तो मिय्या स्वार, पायदळ व तोफा घेऊन येऊन नित्य सावनुरा भोंवती घिरट्या घाली, त्या शहरावर तोफा मारी, गुरें वळवून नेई व शहरा बाहेर कोणी लोक सांपडले तर त्यास लुटन मारून टाकी. सावनूर व बंकापूर यां मध्यें त्यानें एक चौकी बसविली होती. व त्याचे टेहाळणीचे स्वार व गारदी यानीं असा पक्का बंदोबस्त केला कीं, सावनुरांत धान्य, वैरण व इतर जिन्नस जाण्याचें बंद होऊन तेथील लोकांस उपाशीं तरी मरावें किंवा शत्रूच्या स्वाधीन व्हावें, या खेरीज मार्ग राहिला नाहीं. ही त्यांची दुर्दशा श्रीमंतांस कळली, तेव्हां ते नुकतेच मुद्गल सरकारांत जाण्या करितां निघाले होते. सावनूरचा बंदोबस्त राखण्या करितां आतां कोणा सरदारास पाठवावें ही त्यांस मोठी पंचाईत पडली. स्वारीचा सर्व कारभार सखारामबापूकडे होता. तो अ-

हैदरअल्लीवर पहिली स्वारी

लीकडे श्रीमंतांवर व पूर्वी त्यांच्या पक्षाकडे पटवर्धन वगैरे सरदार होते, त्यांवर फार रुष्ट झाला होता. याचें कारण असें कीं, दीड वर्षा पूर्वी रावसाहेब दादासाहेबांची घोडनदीवर वगैरे लढाई होऊन रावसाहेब आपल्या चुलत्याच्या स्वाधीन झाले होते, व सर्व कारभार दादासाहेब व सखाराम बापू यानीं करावा, आपण ते सांगतील त्या प्रमाणें चालूं, या प्रमाणें त्यानीं कबूल केलें होतें. त्या वेळीं सखारामबापूनें आपल्या पक्षाच्या लोकांस संतुष्ट व सामर्थ्यवान करण्या करितां त्यांस जहागिरी वगैरे दिल्या होत्या, त्यांत आबा पुरंदऱ्यास पुरंदरचा किल्ला दिला होता. हा बळकट किल्ला पेशव्यांच्या खासगत बंदोबस्ता खालीं असावयाचा अशी पूर्वापार वहिवाट होती. यामुळें तो पुरंदऱ्यानें उपटलेला पाहतांच रावसाहेबांच्या पक्षाच्या लोकानीं फार गवगवा केला होता आणि ती गोष्ट त्यांस फारच असह्य झाली होती. त्यां पैकीं एका कारकुनाच्या चिथावणी वरून या वर्षाच्या वैशाखांत पुरंदरावर जुने वतनदार गडकरी कोळी लोक होते, त्यानीं पुरंदऱ्याच्या लोकांस किल्ल्याबाहेर हांकून लावून किल्ला बळकाविला व जाहीर केलें कीं, आम्ही पुरंदऱ्यांस किल्ला देत नाहीं. श्रीमंतांचा अंमल मात्र आम्हांस कबूल आहे. ही बातमी नाशिकास दादासाहेबां जवळ आबा पुरंदरे होता त्यास कळतांच तो सासवडास येऊन फौज चाकरीस ठेऊं लागला तो पुणें लुटणार आहे अशी बातमी पसरली होती! पुरंदर कोळ्यानीं घेतला यांत पेशव्यांचें किंवा पटवर्धनांचें बिलकुल अंग नव्हतें. परंतु सखारामबापूस संशय आला होता कीं, पेशव्यानीं किंवा आपल्या प्रतिस्पर्ध्यानींच हें कृत्य करविलें असावें. या करितां तो कारभाराविषयीं उदासीन होऊन पेशव्यांबरोबर छावणीस राहण्या विषयीं कुरकूरच करीत होता. हल्लीं सावनुरास कोण सरदार पाठवावा याची दरबारांत वाटाघाट होऊं लागली, तेव्हां स्वपक्षीय विंचूरकर किंवा नारो शंकर यांस न पाठवितां पटवर्धनांस या धोक्याच्या कामगिरीवर पाठवावें असा बापूनें आग्रह

पटवर्धन सावनुरास जातात

धरिला. पटवर्धनांची बहुतेक फौज देशीं आली होती व काय जवळ होती ती त्यांच्या जहागिरींत हैदराचीं ठाणीं होतीं तीं घेण्यांत गुंतली होती. लालामिय्या सारख्या शूर व खटपटी सरदारानें घेरलेलें सावनूर संभाळण्या पुरती त्यांजवळ फौज नव्हती व पैक्याच्या बाजूनें ही सांप्रत त्यांची फार हलाखी होती. हें सर्व ठाऊक असन ही सखारामबापूचा आग्रह पटवर्धनानींच सावनुरास जावें असा पडला. त्यानीं जात नाहीं झटलें तर ' तुमचे असे हे उर्मट सरदार आमचें ऐकत नाहींत, तर आम्हांस ही कारभार करावयाचा नाहीं. ' या प्रमाणें रावसाहेबांशीं कांहीं तरी निमित्तानें भांडून कारभागाचा राजीनामा देऊन व सारें अपेश पटवर्धनांवर ठेऊन पुण्यास निघून येण्याचा या स्वारीचा कावा होता. परंतु गोपाळराव पटवर्धन तरी इरईचा मनुष्य होता. त्यानें सावनुरास जाण्याचें कबूल केलें. वैरणी बद्दल प्रत्येक घोडेस्वारास दररोज चार आणे सावनूरकरानीं द्यावे, पंधरा दिवसपर्यंत कसें ही झालें तरी आपण सावनूर सांभाळितों, पंधरा दिवस झाल्या बरोबर श्रीमंतानीं मोबदला फौज सावनुरास पाठवून आपणास सोडवावें, या प्रमाणें गोपाळरावाच्या शर्ती होत्या त्या रावसाहेब व सखारामबापू यानीं कबूल केल्या. त्याच्या फौजेचा तळ त्या वेळीं नवलगुंद येथें होता. तेथें वामनराव, मोरोबा व माधवराव अण्णा यांस बुणग्यासह ठेऊन नीलकंठराव, कोन्हेरराव, परशुरामभाऊ व नारायणराव यांसह सड्या स्वारीनें तो ज्येष्ठी पौर्णिमेच्या सुमारास सावनुरास आला. त्या वेळीं त्या बरोबर फक्त बाराशें स्वार होते ! तेथें गेल्यावर तिसऱ्याच दिवशीं नीलकंठराव व नारायणराव स्वारांची एक टोळी घेऊन सावनुरांतून बाहेर पडले ते थेट लालामिय्याच्या चौकीवर चालून गेले व ती मधील दोन तीनशें स्वार व गारदी कापून काढून त्यानीं चौकीचा विध्वंस केला. पुनः एका प्रसंगीं बंकापुरच्या स्वारांची व पटवर्धनांची गांठ पडून लढाई झाली,

तींत त्यानीं शत्रूच्या स्वारांस मोडून बंकापुर पर्यंत पिटाळीत नेलें व त्यां पैकीं पुष्कळांचे घोडे हिसकून घेतले. पटवर्धनांची फौज रोज सावनुरांतून बाहेर पडे व बंकापुरपर्यंत दौड करून येई व शत्रूचे लोक जे तावडींत सांपडत त्यांस लुटून मारून टाकी. असें होऊं लागतांच लढाईचें पारडें फिरून आजपर्यंत बंकापुरकरांची सरशी होती, ती नाहींशी झाली. त्यांचा सावनुरास शह बसला होता, तो दूर होऊन उलट पटवर्धनांचाच त्यांस शह बसला. त्यांच्या कहीवर पटवर्धनांची वारंवार धाड येऊन कहींचीं घोडीं व उंटें त्यांच्या हातीं जाऊं लागलीं, व कहीं बरोबरची फौज ही लुटली व मारिली जाऊं लागली. त्या मुळें त्या ठाण्यांतील लोकांस बाहेर फिरकण्याची छाती होईना. धान्याचा व वैरणीचा दुष्काळ पडला. सर्व प्रकारें लालामियाच्या नाड्या आंखडल्यामुळें त्यानें आपल्या संकटाचें रडगाणें अनवडी येथें छावणी करून हैदर राहिला होता त्यास लिहून पाठविलें.

गोपाळरावाची व हैदराची जानपछान अलीकडे पांच सात वर्षांत चांगलीच झाली होती. एकमेकांचे डावपेंच एकमेकांस चांगले माहीत झाले होते. असें असून ही या वेळीं पुनः एकदां गोपाळरावाचा दग्यानें समूळ नाश करण्याचा हैदरानें संकल्प केला ! तो पंधरा हजार गारदी, सहा हजार स्वार, व कांहीं तोफा घेऊन अनवडीहून निघाला तो सावनुरापासून दहा कोसांवर हनगल येथें आला. तेथें तीन चार मुक्काम करून इकडे तिकडे जाण्याच्या हुलकावण्या दाखवून ही स्वारी अकस्मात् एके दिवशीं संध्याकाळीं साऱ्या फौजेसह कूच करून पहांटेच्या दीड प्रहर रात्रीस बंकापुरास आली, व तेथें चार सहा घटका विश्रांति घेऊन तेथून निघून सावनूर व बंकापुर यां मध्यें एक ओढा आहे तेथें भल्या पहांटेसच येऊन पोंचली ! या ओढ्यांत त्यानें फौजेच्या दोन टोळ्या करून त्यांस दबा धरून बसविलें, आणि फक्त शें पन्नास स्वार मात्र ओढ्या पलीकडे कांहीं

हैदर सावनुरावर चालून येतो

अंतरावर सावनूरच्या बाजूस उभे केले. पटवर्धनांची फौज दररोज सकाळीं सावनुरांतून निघून बंकापुरच्या रानांत येऊन उभी राहत असे. त्या प्रमाणें ती आज ही येईल व आपले स्वार पहातांच त्यांच्या पाठीस लागत या ओढ्यांत आपोआप येईल. तशी ती आली ह्मणजे दोहोंकडून एकदम दबा उठवून सारी फौजची फौज जिवंतच धरावी, असा हैदराचा कावा होता. पण असल्या काव्यानें गोपाळराव कसचा फसतो! त्यास ही सर्व बातमी कळली होती. त्यानें वेळवखत पडेल त्या प्रमाणें वागतां यावें ह्मणून फौज तयार करून सावनुरांत ठेविली, व फक्त दोंडशें स्वार बाहेर पाठवून दिले. त्या स्वारांस त्याची ताकीद होती कीं, तुम्हीं साधेल तर शत्रूच्या स्वारांस सावनुराकडे ओढून आणावें, पण ओढ्याकडे कांहीं झालें तरी जाऊं नये. टेहाळणी करीत दुरून दुरून फिरत असावें. त्या प्रमाणें हे स्वार ओढ्या पासून पाऊण कोसावर जाऊन उभे राहिले. यानीं त्यांस व त्यानीं यांस आपापल्या बाजूकडे ओढण्याचा पुष्कळ यत्न केला, पण जागा दोघानीं ही सोडिली नाहीं! रात्रभर जागून लांब मजल करून आलेला हैदर उपाशीं उन्हातान्हांत पंधरा हजार गारदी व सहा हजार स्वार घेऊन शत्रु आतां येतील, घटकेनें येतील, ह्मणून आशेनें वाट पहात ओढ्यांत संध्याकाळ पर्यंत बसून खजील होऊन बंकापुरास परत गेला. त्या दिवशीं त्याच्या जिवास इतका त्रास झाला कीं, रात्री तो कोणाशीं एक शब्द ही बोलला नाहीं व जेवला नाहीं!

आपण जाळें पसरलें होतें, त्यांत पटवर्धन सांपडले नाहींत ह्मणून हैदरास इतका क्रोध आला होता कीं, प्राण गेला तरी बेहत्तर, पण आतां सावनूर काबीज करून जमीनदोस्त केल्या शिवाय राहणार नाहीं, असा यानें निश्चय केला आणि तो तडीस नेण्याची तयारी ही चालविली. ती पहातांच सावनूरच्या लोकांत मोठी भीति व गडगब उत्पन्न होऊन जो तो पळून जाण्याच्या उद्योगास लागला. गोपाळराव पंधरा दिवसांच्या मुदतीनें

तेथें आला होता, परंतु ती मुदत होऊन गेली तरी मोबदला फौज त्यास सोडविण्या करितां यावयाची होती ती आली नाहीं. ठरल्या प्रमाणें सावनूरकराकडून वैरणीचा पैका ही मिळाला नाहीं. सर्व प्रकारें गोपाळरावाची हलाखी होती, तरी आपल्या नांवा लौकिकास अनुरूप असा पराक्रम करून त्यानें इतके दिवस टिकाव धरिला. प्रस्तुत प्रसंगीं हैदराचा वेढा सावनुरास बसणार, असें पाहून तेथील लोक फारच घाबरून शहर सोडून जाण्याचा विचार करूं लागले, तेव्हां गोपाळराव नबाबाच्या वाड्याच्या सदरेस जाऊन बसला, आणि तमाम लोकांस बोलावून आणून धीर देऊन शहरच्या चौक्या त्यांस वांटून दिल्या व हैदराच्या फौजेशीं सावनूर निकरानें झुजविण्याची तयारी केली. त्यानें सर्वांस सांगितलें कीं, नबाबाचीं मुलें माणसें येथें आहेत, त्यांची जी गत होईल तीच माझी ही होईल. या संकटांत मी तुम्हांस सोडून कधीं जाणार नाहीं.

हैदर जेव्हां हनगलास आला, तेव्हांच त्याच्या मनांत सावनुरावर चालून यावयाचें आहे, असें गोपाळरावास वाटलें होतें. त्या प्रमाणें टाकोटाक रावसाहेबांकडे तें वर्तमान लिहून पाठविलें होतें. त्या वेळीं ते मुद्गल सरकारांत शिदनूर येथें होते. गोपाळरावाचें पत्र जातांच तें ठाणें काबीज करण्या करितां तेथें एक दिवस राहून दुसऱ्या दिवशीं आषाढ शु॥ षष्ठीस ते परत निघाले, ते आठ कोस मजल करून आले. विंचूरकर, रास्ते, शहाजी भोंसले व नारो शंकर धारवाडच्या आसपास होते, त्यांस तावडतोब गोपाळरावाच्या कुमकेस जाण्या करितां श्रीमंतांचा हुकूम झाला. त्यावरून नारो शंकर लक्ष्मेश्वराहून सावनुरास प्रथम आला. मागून दुसरे सरदार ही येऊन पोंचले. रावसाहेब ही लांब लांब मजली करीत सावनूरच्या रोखें येत होते. मराठ्यांची फौज किती त्वरेनें वाट चालून येते व चोंहोंकडून एकत्र होऊन कशा शिताफीनें मैदानांत सांपडलेल्या शत्रूस घेरिते हें हैदरास नुकतेंच कळलें होतें. त्यामुळें सावनुरास वेढा घालण्याचें

राहू द्याच; पण आतां बंकापुरास ठरण्याचा सुद्धां त्यास दम निघेना. तो तेथून निघून पुनः जंगलांत शिरून अनवडीच्या छावणींत जाऊन दडून बसला !

रावसाहेब परत आल्यावर त्यांजकडे हैदरानें शामराव गोपाळ नांवाचा वकील पाठविला. त्या वकिलानें महादशेट वीरकर याच्या मार्फत श्रीमंतांची भेट घेऊन तहाचें बोलणें लाविलें. हें बोलणें महिना दीड महिना चाललें होतें. परंतु त्या पासून कांहीं निष्पन्न झालें नाहीं. पेशव्यांचा घेतलेला मुलूख सोडण्यास किंवा त्यांस खंडणी देऊन त्यांचें वर्चस्व कबूल करण्यास हैदर कबूल नव्हता. त्याची लढाईची खुमखुम अजून जिरली नव्हती. त्यामुळें तहाचा घाट बनून आला नाहीं तह ठरत नाहींसें पाहून भाद्रपदाच्या शुद्ध पक्षांत रावसाहेबांनीं धारवाडास वेढा घातला. या पूर्वींच सावनूरच्या संरक्षणाचें काम विंचूरकर, रास्ते व भोंसले यांजवर सोंपवून गोपाळराव धारवाडास रावसाहेबांच्या स्वारींत येऊन मिळाला होता. धारवाडास वेढा घातला असतां हैदर तेथील आपल्या लोकांस कुमक करण्या करितां धडपड करील हें रावसाहेबांस माहीत असल्यामुळें त्यानीं सुमारें पंधरा हजार घोडे स्वार गोपाळरावा बरोबर देऊन त्यास हैदराच्या तोंडावर टेहळणी करितां ठेविलें. शत्रू दगेबाज असल्यामुळें गोपाळरावास त्याची बातमी फार दक्षपणानें ठेवावी लागे, व दररोज पंधरा वीस कोस तलावा करून यावें लागे. कित्येकदां दोन दोन मुक्काम त्याचे रानांतच पडत. या प्रमाणें मेहनत करून व सावधपणानें बातमी राखून तो राहत असल्यामुळें धारवाडची कुमक करण्या विषयीं हैदराचें सामर्थ्य चालेनासें झालें. त्या किल्ल्यास मराठ्यांचा वेढा पडला, तेव्हां मीरफैजुल्लाचा भाऊ फजलअल्लीखान हा तेथें किल्लेदार होता, तो व त्याचे लोक वर सांगिल्या प्रमाणें हैदराकडून कुमक होण्याची आशा नसतां ही हिमतीनें व कौशल्यानें किल्ला झुजवूं लागले.

हैदरअल्लीवर पहिली स्वारी

मराठ्यांस चैन न पडूं देण्याचा हैदराचा जो निश्चय होता, तो अद्यापि कायमच होता, व त्या अन्वयें त्याचे प्रयत्न ही सतत सुरूच होते. पटवर्धनांच्या दक्षतेमुळें धारवाडाकडे येऊन गडबड करण्याचें जरी त्यास साधलें नाहीं, तरी मराठ्यांच्या मुलखांत शिरण्याचीं इतर द्वारें त्यास अगदींच बंद झालीं होतीं असें नाहीं. विंचूरकर वगैरे सरदार सावनुरास राहिले होते, ते शत्रूच्या लहान सान टोळ्या ठाण्या ठुण्यांवर येऊन घाले घालीत त्यांस हुसकून लावितां लावितां व त्यांचा पाठलाग करितां करितां बेजार झाले. शत्रूच्या हालचालीच्या दररोज नवीन नवीन बातम्या येत व नाना प्रकारच्या कंड्या पिकत. आज काय, हैदर अमक्या ठाण्यावर येणार, उद्यां अमुक शहर लुटणार, त्यानें अमुक दिवसां पुरेशा भाकरी करून आपल्या सैन्यांत वांटिल्या आहेत, त्या अर्थी सड्या स्वारीनें अमुक तालुका लुटण्या करितां तो येणार आहे, अशा बातम्या उठत असल्यामुळें सारा मुलूख गडबडून गेला होता.

वर्धानदीच्या काठांवर सावनूरकराचें हावेरी ह्मणून ठाणें होतें. तेथें त्याचे दोन अडीचशें प्यादे व मराठ्यांचे चारशें गारदी रखवाली करितां ठेविलेले होते. त्या लोकांस हैदराच्या हेरांनीं भाद्रपद वद्य दशमीच्या दिवशीं सायंकाळीं शिंदी आणून विकिली. ती अतिशय स्वस्त मिळाली ह्मणून हावेरीकर पखालीच्या पखाली विकत घेऊन पिऊन पहाऱ्या पहाऱ्यावर झिंगून पडले! त्याच रात्रीं हैदराकडील सरदार मीरफैजुल्ला व व्यंकटराव बाकीं यानीं पांच हजार स्वार, सात आठ हजार गारदी व सोळा तोफा घेऊन नऊ कोसांची मजल करून उजाडतां उजाडतां हावेरीवर छापा घातला. ठाण्याचे दरवाजे मोकळेच होते. पहारेकऱ्यां पैकीं कोणी सावध झाले होते. कोणाची झिंगी अर्धवट उतरली होती. शत्रूनीं येतांच पहारेकऱ्यांच्या मुसक्या आंवळून गांवांत प्रवेश केला. तेव्हां कांहीं लोक पळाले व कांहीं गढींत शिरले. शत्रूनें पेठ लुटून गढीस तत्काळ मोर्चेबंदी

केली. ही बातमी सकाळच्या प्रहर दिवसास सावनुरास आली. तेव्हां विठ्ठलराव विंचूरकर तसेच स्वार होऊन निघाले. तो पितृपक्षाचा पंधरवडा असल्यामुळें दोन्ही तिन्ही पथकांतील पुष्कळ शिलेदारांचीं ' पितरें ' यावयाचीं होतीं व त्यानीं आपल्या जातभाईस जेवणाचीं आमंत्रणें केलेलीं होतीं. यामुळें विठ्ठलराव निघाला तेव्हां त्याच्या पथकाचे सर्व लोक बरोबर आले नाहींत. तथापि जितके आले तितक्यांसच बरोबर घेऊन रास्ते व भोंसले यांस ही लवकर निघण्या विषयीं सांगून पाठवून तो अतित्वरेनें हावेरीस आला. सावनुराहून निघताना त्यास बातमी लागली होती कीं, शत्रू बरोबर सारे दोन हजार प्यादे व चारशें स्वार आहेत. परंतु आतां त्याच्या पहाण्यांत पांचपट सहापट सैन्य आलें ! शिवाय तोफा होत्या त्या निराळ्याच. प्रारंभीं थोडी गोळागोळी झाल्यावर भोंसले व रास्ते आल्या नंतर काय करणें तें करावें; असा विचार करून विठ्ठलराव सरत सरत पावकोस पर्यंत गांवाच्या उजव्या बाजूस गेला. इतक्यांत लक्ष्मणराव रास्ते व शहाजी भोंसले ही येऊन पोंचले. तरी अजून शत्रू पेक्षां या तिन्ही पथकांतील लोक निम्याहून कमी होते. रास्ते व भोंसले वर्धा नदी उतरून हावेरीजवळ येतात न येतात तों त्या नदीस पूर येऊन मराठ्यांचा परत जाण्याचा मार्ग खुंटला. पुढें तर लढाईस तयार झालेला जबरदस्त शत्रू उभाच होता. अशा समयीं पुढें काय करावें या योजनेंत हे सरदार आहेत, तोंच एक हजार प्यादे व चार तोफा गढीच्या मोर्च्यावर ठेवून बाकी सर्व फौजेसह शत्रू थेट चालून आला. तेव्हां मराठ्यानीं ही त्याजवर हल्ला केला. परंतु शत्रूनें तोफा, बाण, व जेजाला यांचा असा भयंकर मारा केला कीं, मराठ्यांचीं पुष्कळ घोडीं व माणसें घायाळ होऊन त्यांस मागें हटावें लागलें. तेव्हां शत्रूस अधिकच आवेश व उत्साह येऊन त्यानें पुनः आणखी चाल केली. ही चाल करिताना त्याचा बंदोबस्त कांहींसा विस्कळीत झालेला पाहून त्यावर मराठ्यानीं पुनः वेगानें हल्ला केला व पुनः

तुंबळ युद्ध सुरू झालें. या वेळीं मराठ्यांनीं एकंदर नऊ हल्ले केले. त्यांत शेवटच्या हल्ल्यांत मराठ्यांचें 'दाट हत्यार लागलें,' व त्यांनीं शत्रूस मोडून मारीत मारीत त्याच्या तोफांत नेऊन घातलें. त्या वेळीं शत्रूच्या पायदळावर वंगस नांवाचा शूर सरदार होता, त्यानें घोड्यावरून उडी टाकिली व गारद्यांस थोपटून धरून त्यांस उत्तेजन देऊन पुनः मराठ्यांवर चाल करण्यास प्रवृत्त केलें. त्या समयीं जें निकराचें युद्ध झालें, त्यांत तो सरदार जरी पतन पावला तरी त्याचे अनुयायी निरुत्साह न होतां शौर्यानें लढले. मराठ्यांची फौज सकाळ पासून उपाशीं व लांबून चालून आलेली होती व शिवाय दुपटीनें अधिक अशा शत्रूशीं तिला दोन प्रहर युद्ध करावें लागलें होतें. यामुळें ती थकून संध्याकाळच्या वेळीं विश्रांति घेण्यासाठीं मागें सरली. शत्रूचा ही लढाईचा दम बराच जिरला होता. त्या मुळें ते मराठ्यांच्या वाटेस न जातां परत गांवांत गेले. गढीस मोर्चे बसले होते, तींतील लोक कौलास आले. शत्रूनें हत्यारानिशीं त्यांस जाऊं दिलें व गढींत आपलें ठाणें बसविलें. रात्रभर दोन्ही फौजा जवळ जवळच उतरल्या होत्या. हैदराच्या सरदारांच्या मनांत हावेरी घेऊन पुढें धारवाड च्या कुमकेस यावयाचें होतें, परंतु या एकाच दिवसाच्या लढाईनें त्यांचा उत्साह भग्न होऊन ते गढी रिकामी टाकून सर्व फौजेसह परत गेले, आणि मराठे सरदार ही नदीचें पाणी उतरतांच सावनुरास आले. या लढाईत ध्यानांत ठेवण्या जोगी विशेष गोष्ट ही आहे कीं, तो सत्तर वर्षांचा म्हातारा सरदार विठ्ठलराव विंचूरकर दहा कोसांची दौड करून दोन प्रहर पर्यंत निकराचें युद्ध करण्यास टिकला ! त्यांत त्यास त्या दिवशीं एकादशीचें उपोषण होतें. सायंकाळ पर्यंत स्नान करण्यास ही वेळ मिळाला नाहीं, मग तोंडांत पाणी घालण्याचें नांव कशाला ! अशीं हीं पहिल्या बाजीरावाच्या तालमींत तयार झालेलीं कणखर प्रकृतीचीं सरदारांचीं जुनीं खोडें होतीं !

दादासाहेबांची हालहवाल

इकडे दादासाहेब स्नानसंध्या करण्या करितां ह्मणून नाशिकास जाऊन राहिले होते, त्यांजकडील काय हाल हवाल होती हें सांगितलें पाहिजे. पूर्वीं नानासाहेब पेशव्यांच्या वेळीं ते कांहीं दिवस कारभारी होते, तेव्हां दोन प्रहर पर्यंत नाक धरून बसत असत; व सरकारी कामा संबंधें त्यांजकडे जाण्या येण्याचा ज्यांस प्रसंग पडत असे त्यांची नेहमीं खोटी होत असे. एकंदरींत कर्मठपणा विषयीं लौकिक मिळविण्याकडे त्यांचा कल विशेष होता. रावसाहेब कर्नाटकच्या स्वारीस आग्रहानें बोलावित असतां तिकडे न जातां ज्या अर्थीं ते स्नानसंध्ये करितां ह्मणून मुद्दाम नाशिकास जाऊन बसले होते, त्या अर्थीं त्या स्वधर्मविहित पुण्यकारक आचरणांतच त्यांचा कालक्षेप होत जाईल असें लोकांस वाटलें होतें. परंतु त्यांची बुद्धि क्षणभंगुर असल्यानें कोणची ही गोष्ट नियमितपणें त्यांच्या हातून तडीस जाणें अवघडच होतें. रावसाहेबांविषयीं खोट्या नाट्या गोष्टी सांगून त्यांचें मन कलुषित करावें, व त्या चुलते पुतण्यांत पुनः वैमनस्य उत्पन्न करून त्या योगानें आपला फायदा करून घ्यावा, अशी दुष्ट इच्छा बाळगणाऱ्या शागिर्द, कारकून व कारभारी वगैरे मंडळीचा घोळका नेहमीं त्यां भोंवती असे व त्यांच्या दुरुपदेशामुळें दादासाहेबांची चित्तवृत्ति वारंवार बिथरत असे. रावसाहेबांची आई गोपिकाबाई व. त्रिंबकराव मामा पेठे व गोविंद शिवराम खासगीवाले हे जेव्हां रावसाहेबांचा कैवार घेऊन त्यांशीं बोलत तेव्हां त्यांच्या म्हणण्यास ही. मना पासून होकार देण्यांत ते कमी करीत नसत! वेळेस जो जें सांगेल तें तेवढेंच खरें धरून अद्वातद्वा बडबडत सुटावें, अशी कांहीं त्यांची चमत्कारिक लहर असे. प्रथम प्रथम स्नान संध्येचें अवडंबर माजवून त्यानीं अग्निहोत्र देखील घेण्याची तयारी केली होती. पण " कुंडें घालून संकल्प करावा येथपर्यंत आलियावर 'हे किरकीर आम्हांस पुरवणार नाहीं ' ऐसें ह्मणून कुंडें गंगेंत टाकिली! भट जमा जाहले होते, पालख्या घोडीं पाठवून आणिले होते, त्यांस निरोप

दिला ! " कर्नाटकांत हैदराशीं झगडा झगड सुरू होती, तींत आपला होतकरू पुतण्या स्वकुलास अनुरूप असे पराक्रम करून दाखवून मोडकळीस आलेलें आपलें राष्ट्र उजगारीस आणून त्याचा दरारा साऱ्या हिंदुस्थानावर पूर्वी प्रमाणें बसविण्यासाठीं अविश्रांत श्रम करीत होता, या गोष्टीबद्दल दादासाहेबांस कौतुक व आनंद वाटत असलाच पाहिजे. पण अशा या महत्वाच्या स्वारीचा पुढारीपणा न घेतां आपण निर्माल्यवत् होऊन एकीकडे बसून राहिलों असें वाटल्यामुळें शेंकडों घनघोर संग्रामांत तरवार गाजवून अटकेपर्यंत भगवा झेंडा फडकाविणाऱ्या दादासाहेबांस विषाद वाटणें ही साहजिकच होतें ! रावसाहेबांविषयीं क्रोधाचे व इर्षेचे उद्गार ही केव्हां केव्हां लहरी दादासाहेबांच्या तोंडून निघत व ते स्वारींत रावसाहेबांच्या कानावर जात. आपल्या संमतीनें सखारामबापूनें आवा पुरंदऱ्यास पुरंदर दिला असतां रावसाहेबांकडील लोकानीं तो त्याजकडून काढून घेतला, हें कळतांच दादासाहेबांचें पित्त खूबच भडकलें होतें. परंतु रावसाहेब समंजस व दूरदर्शी असल्यामुळें कोणी असल्या गोष्टी त्यांजवळ काढिल्या ह्मणजे ते इतकेंच ह्मणत कीं, स्वारीहून परत गेल्यावर वडिलांच्या पायांवर डोकें ठेवून त्यांची मर्जी प्रसन्न करून घेऊं ! पण पुढें पुढें नाशिकच्या एकावर एक खबरा त्यांच्या कानीं पडूं लागल्या व तेथील रागरंग त्यांच्या लक्षांत येऊं लागला, तेव्हां दादासाहेबांविषयीं त्यांस काळजी उत्पन्न झाली. त्यांस नाशिकास राहूं द्यावें तर लुच्चे लोकांच्या नादी लागून ते बंड उभारितील, व गृहकलहाच्या वणव्यानें पुनः पेट घेतल्यामुळें राज्याची राखरांगोळी होईल ही पहिली भीति. त्यांस स्वारींत बोलवावें तर तर ते हैदराकडे फितूर होऊन साऱ्या मोहिमेची मसलत नासून टाकितील ही दुसरी भीति ! या अडचणींत रावसाहेबांस दुसरी अडचण पतकरणें बरें वाटलें. त्यानीं दादासाहेबांस लिहून पाठविलें कीं, आपण फौजेची तरतूद करून पावसाळा संपताच या प्रांतीं यावें व ही मोहीम शेवटास

नेण्याचें यश घ्यावें ! पेशव्यांच्या घरचे बखेडे होते, हें लक्षांत न आणितां ग्रांटडफ् लिहितो कीं, दादासाहेबांस बोलावून नेऊन त्यांवर मोहिमेचा सर्व भार टाकण्यांत पेशव्यानीं राजनीतीच्या दृष्टीनें मोठी चूक केली. आम्हांस तसें वाटत नाहीं. उलट आम्हीं असें म्हणतों कीं, लहान अनर्थ पतकरून त्यानीं मोठ्या अनर्थाचा प्रसंग टाळिला, हें फार शहाणपणाचें काम केलें. दादासाहेबांच्या मर्जी प्रमाणें कर्नाटकांत निघून येण्याविषयीं रावसाहेबांचें बोलावणें येतांच ते फौज जमविण्याच्या उद्योगास लागले.

इकडे कर्नाटकांत धारवाडास पेशव्यानीं वेढा घातला होता; तेथें निकराचें युद्ध सुरूच होतें. भाद्रपद वद्य सप्तमीच्या दिवशीं तेथें एक बरीच मोठी लढाई झाली. नारो कोन्हेर एकबोटे नांवाच्या नामांकित एकांड्यानें पराक्रम केल्यामुळें रावसाहेबानीं त्यास पालखीचीं वस्त्रें दिलीं. दोन महिनेपर्यंत धारवाडकरानीं हिंमत धरून किल्ला झुजविला. परंतु शेवटीं त्यांचें प्रयत्न व्यर्थ होऊन ते जेरीस आले. रावसाहेबानीं सुरुंग खोदून आंत दारूचे बुधले भरून त्यांस बत्ती देऊन किल्ल्याचे दोन बुरूज उडविले. तिसऱ्या बुरजाची ही तीच दशा करणार, तों किल्लेदार फजलअल्लीखान भयभीत होऊन कौलास आला. त्यानें गोपाळराव पटवर्धनांच्या विश्वमानें किल्ला हवालीं करण्याचें कबूल केलें. त्यावरून गोपाळराव आपल्या लष्करांतून सड्या स्वारीनें धारवाडास आला, व त्यानें किल्ल्यावरचे लोक उतरून तो पेशव्यांच्या हवालीं करून फजलअल्लीखानास सन्मानानें मीरफैजुल्लाकडे पोंचतें करून दिलें. धारवाडांत पेशवे सरकारचें ठाणें कार्तिक शुद्ध द्वादशीच्या दिवशीं (नोवेंबर १७६४ रोजीं) बसलें.

धारवाड काबीज केल्यावर रावसाहेब उगरगोळावरून मिश्रिकोटास गेले. तेथें कांहीं मुक्काम झाले. त्या अवधींत तुंगभद्र अलीकडे हैदरानें घेतलेलीं जीं ठाणीं अजून त्याच्या ताब्यांत होतीं तीं सर्व हस्तगत करण्यांत आलीं. एक बंकापुर मात्र त्याजकडे राहिले. मिश्रिकोटच्या मुक्कामीं निर-

हैदरअल्लीवर पहिली स्वारी

निराळे मराठे सरदारां मार्फत हैंदरानें रावसाहेबाशीं पुनः तहाचा संदर्भ लाविला, परंतु याही वेळीं तो निष्फल झाला. रावसाहेब मिश्रिकोटाहून निघून बंकापुर व सावनूरच्या मध्यें ओढ्यावर तळ देऊन राहिले. बहुशः त्यांचा बेत बंकापुरास वेढा घालावयाचा असावा. तसें नसतें तर ते तिकडे जातेचना. परंतु बंकापुर घेण्याचा बेत तूर्त तहकूब करावा व अनवडीस हैदर छावणी करून राहिला होता त्याचें आधीं पारिपत्य करावें. असें सर्व सरदारांचें मत पडल्या वरून रावसाहेबानीं तिकडे कूच केलें. पावसाळा संपल्यावर केव्हां तरी आपणास त्या जंगलांत जाऊन हैदराशीं गांठ घालावी लागेल हें त्यांस ठाऊक होतें, व त्यासाठीं गारदी व तोफखाना जमविण्याची त्यानीं यथास्थित तरतूद केली होती. नानाफडणिसानें पुण्याहून शिसें व दारू व गोळे पाठविल्याचे उल्लेख गोविंद हरीच्या पत्रांत आहेत. त्यावरून पहातां आश्विन महिन्यांत एकंदर चारशें साठ बैल दारू गोळी मिरजेवरून धारवाडाकडे गेली होती. आणखी ही इतर मार्गांनीं व इतर स्थळांहून सामानाचा पुरवठा झाला असलाच पाहिजे. कर्नलविल्कच्या लिहिण्यांत गेल्या पावसाळ्यांत रावसाहेबानीं जंगली रस्ते चोखाळणारे व झाडें तोडणारे लोकांच्या जमाती ही तयार केल्या होत्या. तेव्हां इतकी तयारी करून जे ते निघाले होते, ते हैदराची चांगली खोड मोडून स्वारीचा कांहीं तरी सोक्षमोक्ष केल्या खेरीज परत येणार नव्हते हें उघड आहे. विशेषें करून दादासाहेब येऊन पोंचण्याच्या आधीं हैदराशीं मातबर लढाई व्हावी अशा इच्छेनें त्यानीं ही इतकी जलदी चालविली होती.

अनवडीस जातां जातां मार्गशीर्ष शुद्ध चतुर्थीच्या दिवशीं हनगळास मुक्काम झाला तेथें हैदराचें ठाणें होतें, तें तोफा लावून त्याच दिवशीं सायंकाळीं काबीज करण्यांत आलें. पंचमीच्या दिवशीं तेथेंच मुक्काम झाला. षष्टीस सारें लष्कर वर्धानदीच्या अलीकडे एक कोस येऊन पोंचलें. नदीच्या पलीकडे हैदराची चौकी होती. मराठी लष्कराच्या अवाडीस

विंचूरकर व पटवर्धन होते, त्यानीं नदीपार जाऊन त्या चौकीवर हल्ला करून ती उधळून लाविली व शत्रूचे पाऊणशें घोडे हिरावून घेतले. सप्तमीस प्रातःकाळीं लष्कर नदीच्या अलीकडच्या तीरीं येऊन राहिलें. तेथून हैदराची छावणी साडेतीन कोसांवर होती. तिच्या दोहीं बाजूंस बिकट रान होतें, त्याची टेहाळणी करण्या साठीं रावसाहेबानीं पटवर्धन व विंचूरकर पूर्वेस व नारो शंकर, रास्ते, भोंसले व मुरारराव यांस पश्चिमेस पाठवून दिलें. पूर्वेकडे पटवर्धनानीं एक टेंकडी पाहून ठेविली होती. त्या टेंकडी वरून हैदराची छावणी चांगली दिसत होती, व तीवर तोफांचा मार केल्यास लागू पडण्या जोगा होता. ती जागा सखारामबापूनें ही जाऊन पसंत केली. सायंकाळच्या मुक्कामा करितां लष्कर आणखी एक कोस पश्चिमेकडे येऊन नदीतीरींच राहिलें. त्या रात्री हैदराकडील लोकानीं जवळ येऊन लष्करावर बाण सोडिले व हजार दोन हजार बार ही केले. परंतु लष्कर सावध असल्यामुळें कांहीं गलबल किंवा अव्यवस्था झाली नाहीं. तितक्या रात्री विंचूरकर, पटवर्धन व रास्ते आपापल्या पथकासह गोटांतून बाहेर पडून नदीपार गेले, तेव्हां शत्रूचे लोक आले होते ते पळून गेले. दुसऱ्या दिवशीं ह्मणजे मार्गशीर्ष शुद्ध अष्टमीस स्वतः रावसाहेबच तोफखाना घेऊन आदल्या दिवशींच्या संकेता प्रमाणें त्या टेंकडीच्या पायथ्याशीं येऊन त्यानीं टेंकडीवर तोफा चढविल्या. टेंकडी पासून हैदराच्या छावणी पर्यंत दाट जंगल लागलें होतें. तिकडून शत्रु येईल ह्मणून विंचूरकर, पटवर्धन व मुरारराव घोरपडे यांस त्यानीं जंगलाच्या तोंडावर ठेविलें, आणि कांहीं हुजरात होती ती घेऊन आपण टेंकडीच्या पायथ्याशीं उभे राहिले. इतकें झाल्यावर टेंकडीवरून हैदराच्या छावणीवर चार घटकापर्यंत तोफांचा भडिमार केला. तोफा लांब पल्ल्याच्या होत्या व जागा ही माऱ्याची फार उत्तम होती. या मुळें शत्रूच्या छावणींत गोळ्यांचा वर्षाव होऊन त्याची अतोनात नासाडी झाली व त्याचें सारें लष्कर गलबलून गेलें. तोफाचा

मार अगदीं सोसवेनासा भयंकर होऊं लागला. तेव्हां अशा आणीबाणीच्या वेळीं कांहीं अचाट पराक्रम करून दाखवून आपल्या लोकांची हिंमत वाढवावी, शत्रूवर छाप पाडावी, व आपला संहार करणाऱ्या त्या मराठ्यांच्या तोफा टेंकडीवर हल्ला करून हिसकून घ्याव्या, अशी हैदरास बद्धि झाली! त्याचीं पलटणें अव्वल व दुय्यम अशीं दोन प्रकारचीं होतीं. त्या पैकीं अव्वल पलटणांतलें शेलकें माणूस पांच सात गारदी, हजार पंधराशें निवडक स्वार व पांच तोफा इतकें सामान घेऊन व छावणीच्या बातेऱ्यांजवळ मीरफैजुल्लास ठेऊन तो झाडींतून आला. झाडीच्या तोंडाशीं येई पर्यंत तो कोणासच दिसला नाहीं, आणि तो जो अकस्मात् प्रकट झाला तो तोफांची सरबत्ती करूं लागला. गारद्यांचीं पलटणें ही त्वरेनें जथून उभीं राहिलीं व त्यानीं बंदुकांचा मारा पराकाष्टेचा भयंकर केला. हा सर्व मारा झाडीच्या तोंडावर मुरारराव घोरपडे उभा होता त्याजवर पडला. त्याच्या कुमकेस विंचूरकर व पटवर्धन होते, त्यानीं शत्रूवर हल्ल्यावर हल्ले केले. परंतु त्याच्या आगीच्या मारा पुढें त्यांचें कांहीं चालेनासें झालें. त्यांची फौज पळून गेली, तरी मुरारराव 'सेनापति' त्याच जाग्यावर ठांसून उभा राहिला. हैदराच्या गारद्यां प्रमाणें त्याचे गारदी उत्तम होते, पण ते थोडे होते. त्या गारद्या गारद्यांचें निकराचें झुज लागलें. शत्रूच्या तोफांचा व गारद्यांचा वगैरे सर्व मार आतां एकट्या मुराररावावर पडला तरी तितका ही मार सोसून हैदरानें त्यास बहुतेक ग्रासिलें असतां ही तो तिलप्राय न डगमगतां झुजतच होता. लढाईचें हें सर्व वर्तमान रावसाहेब टेंकडीच्या पायथ्याशीं होते, त्यांस कळतांच ते त्या क्षणीं घोड्यावर स्वार होऊन हुजरातेसह धांवून आले. क्षणार्धांत तेथील स्थिति त्यांच्या लक्षांत येऊन चुकली. त्या बरोबर पुढें **निशाणाचा हत्ती** व खुले हत्ती घालून हुजरातेसह त्यानीं शत्रूवर बेजरब चालून घेतलें! गारद्यांत घोड्यांचीं तोंडें शिरकतांच रावसाहेब मारामार करीत शत्रूच्या व्युहांत शिरले व तेथ पासून

पोंच व अभिप्राय.

आमचे मित्र रा. रा. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे बी. ए. यांनीं नकतेंच " मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें " हें पुस्तक छापून प्रसिद्ध केलेलें आहे. या पुस्तकाची एक प्रत त्यांजकडून आम्हांकडे अभिप्रायार्थ आली आहे तिचा आभारपूर्वक स्वीकार करून सदरहू पुस्तकाविषयीं आम्हांस काय वाटतें तें थोडक्यांत कळवितों.

मराठ्यांचा इतिहास लिहिण्याची वेळ अजून आलेली नाहीं, तसा ग्रंथ उत्तम रीतीचा निर्माण होण्यास आधारभूत जीं साधनें पाहिजेत तीं शतांशानें ही अद्यापि उपलब्ध झालेलीं नाहींत. हीं साधनें ह्मणजे अस्सल लेख मिळवून ते व्यवस्थेनें लावून विशदीकरणार्थ टिपा देऊन प्रकाशित करण्याचें काम फार त्रासाचें व खर्चाचें असून तें पार पाडण्यास एक दोघांचे श्रम पुरेसे नाहींत, अनेक ठिकाणीं अनेक शोधक व विद्वान् लोकानीं अनेक वर्षें पर्यंत जेव्हां हें लेख-प्रकाशनाचें काम सुरू ठेवावें तेव्हां तें सिद्धीस जाईल, या कामीं राजे रजवाडे व संस्थानिक यांजकडून मदत मिळावयाची नाहीं, पदरास खार लावून व मध्यमस्थितीच्या सुशिक्षित लोकांकडून काय थोडी बहुत मदत मिळेल तिजवर हें काम उत्साहानें व नेटानें चालविलें पाहिजे, हीं आमचीं ठाम ठरलेलीं मतें आहेत; व त्यांसच अनुसरून ऐ. ले. संग्रहाचें काम आम्हीं सुरू ठेविलें आहे. तेव्हां आमच्या मतां प्रमाणेंच ज्यांचीं मतें आहेत अशा रा. रा. राजवाड्यां सारख्या गृहस्थांच्या प्रयत्नास नेहमीं यश यावें ही आमची इच्छा असणें साहजिकच आहे. मराठी इतिहासाच्या उपयोगाचे जुने लेख मिळविण्याचा त्यांस बहुत दिवसां पासून हव्यास आहे व या कामीं ज्या अवाढव्य प्रमाणावर खटपट करण्यांचा त्यांचा इरादा आहे त्या रीतीची खटपट करण्यास ते सर्वथा योग्य आहेत, असें त्यांचें प्रस्तुत टीकाविषयक पुस्तक वाचून आम्हांस वाटतें. प्रस्तुत पुस्तकाचीं एकंदर ५३६ पृष्ठें असून त्यांत ३०४ लेख प्रसिद्ध झालेले आहेत. या लेखांस ग्रंथकारानीं एक विस्तीर्ण व फार मार्मिक रीतीनें लिहिलेली प्रस्तावना जोडिली आहे. नानासाहेब पेशव्यांच्या कारकिर्दीचा उत्तरार्ध फार महत्वाचा असून त्याची सुरुवात १७५० पासून होऊन १७६१ मध्यें शेवट होतो. याच अवधींत लिहिलेले अस्सल लेख या पुस्तकांत छापिले आहेत, तेव्हां ते किती उपयोगाचे आहेत हें सांगणेंच नको. या अवधींतील मराठ्यांच्या चळवळी व मोहिमा या संबंधें डफच्या ग्रंथांत माहिती त्रोटक व एकदेशीय लिहिलेली आहे, व कांहींचा तर

मुळींच उल्लेख नाहीं ! ही माहिती या ग्रंथांत बऱ्याच अंशानें मिळण्या जोगी आहे, व त्यामुळें मराठी इतिहासाचें आस्थापूर्वक अध्ययन करणारां- ची मोठी सोय झालेली आहे. कालनिर्णय ठरविण्यांत व उपलब्ध बखरी वगैरे ग्रंथांतील असत्य खोडून काढण्यांत ग्रंथकारानीं फार परिश्रम घेतले आहेत. हें पुस्तक या आधीं दोन महिने जर आमच्या हातीं पडतें तर फार चांगलें होतें. कारण, " हैदरअल्लीवर पहिली स्वारी " या प्रकरणा- ची प्रस्तावना लिहितांना तारखा व सन या संबधें वगैरे क्वचित् बारीक सारीक चुक्या आमच्या हातून झाल्या आहेत, त्या प्रस्तुत पुस्तकाच्या यो- गानें आम्हांस दुरुस्त करितां येत्या. आमचे हे प्रत्येक प्रकरणाच्या प्रारंभीं- चे घाईघाईनें लिहिलेले लेख पुढें कधीं स्वतंत्र पुस्तक रूपानें प्रसिद्ध हो- ण्याचा सुयोग आला तर ही सुधारणा करण्यांत येईल.

ऐ. ले. संग्रहांत येणाऱ्या लेखांस मुख्यत्वें १७६१ पासून प्रारंभ होतो, व रा. रा. राजवाडे यांच्या पुस्तकांतील लेखांस १७५० पासून प्रारंभ होऊन शेवट १७६१ त होतो. यावरून ऐ. ले. संग्रहाच्या वर्गणी- दारानीं हें पुस्तक संग्रहीं ठेविलें असतां अकरा वर्षांची आधींची कारकीर्द समजण्यास फार सोईवार होईल. या करितां आमच्या आश्रयदात्यां पैकीं प्रत्येकानें हें पुस्तक घ्यावें अशी आम्हीं अगत्यानें शिफारस करितों. या पुस्तकाची किंमत तीन रुपये आहे तरी तें ऐ. ले. संग्रहाच्या वर्गणीदारांस अडीच रुपयांस मिळण्याची आम्हीं सोय केली आहे. पोष्टेज व व्ही. पी. चा खर्च पांच आणे शिवाय पडेल. पुस्तकें आम्हांकडे व आमच्या एजंटां- कडे मागवावीं.

ऐ. ले. संग्रह कर्ते.

ऐतिहासिक-लेख-संग्रह.

ऐतिहासिक-लेख-संग्रह.

मासिक पुस्तक.

जानेवारी. १८१९ इ०.

अंक २०

वासुदेव वामन शास्त्री खरे

मिरज हायस्कुलांतील संस्कृत शिक्षक.

यांनीं

कुरुंदवाड येथें

" भाऊनाना " छापखान्यांत छापविलें.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हांशीलसह तीन रुपये.

फुटकळ अंकास पांच आणे.

ऐतिहासिक-लेख-संग्रह.

अंक विसावा

विषयांचा अनुक्रम. पृष्ठ

गारद्यांची कत्तल होण्यास सुरुवात झाली. तितक्यांत घोरपडे व विंचूरकर व पटवर्धन यानीं ही एकदम हल्ला केला. त्यामुळें हैदर हतवीर्य होऊन फौजेसह पळूं लागला. त्या वेळीं त्याचे हजार बाराशें गारदी व पांच सातशें स्वार जागच्या जागींच ठार झाले. दोन हजार पर्यंत गारदी जखमी झाले व पांच सातशें पाडाव सांपडले. कांहीं थोडे लोक मोठ्या कष्टानें जीव बचावून पळून गेले त्यांत हैदर होता! मराठ्यानीं झाडींत शिरून शत्रूचा पाठलाग केला, आणि त्याच्या पांच ही तोफा व तीन हजार बंदुका व सातशें घोडे अशी लुट मिळवून आणिली.

या पुढें हैदरावर आणखी कांहीं स्वाऱ्या झाल्या पण रावसाहेबांच्या कर्तृत्वाचा व पराक्रमाचा या दिवसा पासून त्यावर इतका कांहीं दरारा बसला कीं, किती ही सैन्य समागमें असलें तरी त्यानें ह्मणून ते स्वतः ज्या फौजेंत असतील त्या फौजेशीं झुजण्याचें धाडस केलें नाहीं, व त्यांच्या लष्करा पासून वीस पंचवीस कोसांच्या टापूंत या पुढें कधीं तो फिरकला नाहीं!

ही लढाई झाल्यावर दुसरे दिवशीं रावसाहेबानीं सारें लष्कर अनवडीस आणिलें. तेथें हैदराची छावणी एका टेंकडीच्या पायथ्यास होती. टेंकडीवर बातेऱ्या बांधून त्यांवर त्यानें तोफा ठेविलेल्या होत्या व छावणी भोंवती भिंताड बांधून खंदक ही तयार केला होता. तिहीं बाजूंस गर्द झाडी कित्येक कोस पर्यंत लागली होती, व उत्तरेचें तोंड मोकळें होतें तिकडे एक ओढा होता. अशी ही फार बिकट जागा होती व हैदरास वाटत होतें, त्या प्रमाणें मराठ्यानीं जर तिजवर हल्ला केला असता तर त्यांचा फार नाश झाला असता. परंतु त्यांचा बेत हैदरास छावणींतून बाहेर काढण्याचा नसून त्यास तेथेंच कोंडून उपाशीं मारण्याचा होता. त्या बेतास अनुसरून त्यानीं त्या छावणी भोंवती गराडा घालून दररोज तोफांचा व बाणांचा मार देण्याचा क्रम सुरू केला. तेणें करून आधींच हत-

चौर्य झालेलें शत्रूचें लष्कर फारच हैराण झालें. बिदनुराकडून धान्याचा पुरवठा त्या लष्करास होत होता, तो ही मराठ्यानीं बंद केला. व त्यानें पळून जाऊं नये ह्मणून झाडी तोडून रस्त्यांत आडवीं तिडवीं झाडें पाडून वाटा बंद करून टाकण्याची सुरुवात केली. हें पाहून हैदर फारच घाबरला व आतां छावणींत राहिलों तर आपली धडगत नाहीं असें ओळखून तो तोफा, पायदळ, स्वार, बाजार, बुनगें व डेरे राहुट्या वगैरे सर्व सामान घेऊन छावणी सोडून बिदनुराकडे निघाला. मराठ्यांची फौज जरी त्याच्या पाठीस निकरानें लागली होती, तरी त्या प्रदेशांत झाडी दाट असल्यामुळें पहिले दोन दिवस त्यांचा विशेष उपाय चालला नाहीं. पिछाडीवर त्यांचे वारंवार हल्ले होत असतां ही हैदरानें आपलें लष्कर बऱ्याच व्यवस्थित रीतीनें चालविलें होतें. परंतु तिसऱ्या दिवशीं अमळ मोकळा प्रदेश लागतांच रावसाहेबानीं आपल्या सैन्याचा एक भाग बिदनूरच्या वाटेवर हैदराच्या अघाडीस आणून उभा केला. तेव्हां त्यास लढाईस उभें राहणें भागच पडलें. त्यानें आपणाकडून होईल तितका यत्न करून लढाई साठीं सैन्य शिस्तवार उभें केलें. परंतु मराठ्यानीं चोंहोंकडून एकदम हल्ला केला. तेव्हां तें सारें सैन्य आसपासच्या झाडीचा आसरा धरण्या साठीं धूम पळत सुटलें ! त्या वेळीं एकसारखी कत्तल सुरू होऊन हैदराचे कित्येक हजार गारदी ठार झाले. पंचवीसशें स्वार व दहा हजार पायदळ इतक्यानिशीं तो बिदनुरास पळून गेला. बाकीची फौज बहुतेक मारिली गेली व कांहीं झाडींत शिरली. हजारों घोडे, उंटें, बाजार, बुणगें, तोफा, व बंदुका वगैरे हत्यारें—सारांश सबंध लष्करचें लष्कर—मराठ्यांच्या हातीं सांपडलें.

दसरा होतांच दादासाहेब ही कर्नाटकांत येण्या करितां नाशिकाहून निघाले. त्यानीं तोफा व जेजाला यांचा सरंजाम पावसाळ्यांत बहुत प्रयत्न करून जमा केला होता. कांहीं करोल ह्मणजे बंदुकवाले स्वार ही

चाकरीस ठेविले होते. सुमारें पांच सात हजार फौज त्यांजवळ जमली होती, ती घेऊन ते नाशिकाहून टोंक्यास व तेथून पैठणास गेले. बरोबर पेशव्यांचे कनिष्ठ बंधु नारायणराव (ज्यांचा पुढें सुमेरसिंगानें खून केला ते) ही होते. बाबूजीनाईक बारामतीकर व आबा पुरंदरे ही समागमें होते, पैकीं कृष्णेवर पोंचल्या नंतर बाबूजी नाईक परत आला. गायकवाड व भोंसले नागपूरकर यांस दादासाहेबानीं बोलाविलें होतें, परंतु भोंसल्याचें येणें झालें नाहीं व दमाजी गायकवाडानें स्वतः न येतां आपला पुत्र सयाजी गायकवाड यास फौज बरोबर देऊन पाठविलें होतें. दादासाहेब पैठणाहून निघाले ते सीना नदीच्या तीरास येऊन त्याच नदीच्याकांठानें कांहीं मजली आले. नंतर त्यानीं बारशी पानगांवाकडे जाऊन निंबाळकराच्या जहागिरींतून घांसदाणा ह्मणून पावणे तीन लक्ष रुपये खंडणी घेतली व पिराजी नाईक निंबाळकर यास स्वांरी बरोबर घेतलें. या पूर्वीं त्यानीं मोंगलाशीं बोलणें लाविलें होतें कीं, महंमद मुरादखान, निंबाळकर, खंडागळे यां बरोबर पंचवीस तोफा व कांहीं फौज आमच्या कुमके करितां तुम्हीं पाठवावी. मोंगल आपली कुमक करील अशी दादासाहेबांस आशा होती व या करितांच ते मोंगलाईच्या सरहद्दी सरहद्दीनें चाल करीत होते. परंतु या राजकारणा पासून कांहीं निष्पन्न होत नाहीं असें पक्कें कळल्यावर ते बारशी पानगांवाहून थेट पश्चिमेचा रोंख धरून नरसिंगपुर, पंढरपुर, सांगोलें व नाझरें या गांवांवरून मिरज प्रांतीं आले. दादासाहेबांच्या येण्या पासून काय काय अनर्थ होतात हें मागील दोन सालीं मिरज प्रांतींच्या लोकांस चांगलेंच कळलें होतें. यामुळें पुनः तेंच अरिष्ट उद्भवलेलें पाहून ते लोक फारच गडबडले. परंतु यंदां त्यांस उपद्रव देण्याचा त्यांचा हेतु मुळींच नसल्यानें व पटवर्धनांवर त्यांची यंदा मर्जी चांगली असल्यानें ते मिरजेकडे न येतां दक्षिणेकडे रामतीर्थास गेले, व तेथून त्यानीं थेट तुंगभद्रेचाच रस्ता धरिला. तथापि लष्करच्या उपद्रवा पासून अजीबात मुक्त

होण्याचें मिरज प्रांतींच्या लोकांचें यंदा ही सुदैव नव्हतें. दादासाहेबांचा तोफखाना घेऊन महिपतराव पानशे फलटण, विटें, भालवणी या वाटेनें मिरजे वरूनच गेला, त्यानें जातां जातां मनस्वी आवाडाव केली व लोकांस उपद्रव दिला. मागून सयाजी गायकवाडाची स्वारी लष्करास जाण्या करितां याच वाटेनें गेली तिनें ही कांहीं आगळीक केल्या शिवाय सोडिलें नाहीं.

दादासाहेबानीं पंढरपुरच्या मुक्कामाहून गोविंद शिवराम खासगीवाले यास रावसाहेबांकडे पाठविलें होतें. खासगीवाल्या बरोबर दादासाहेबानीं ज्या शर्ती सांगून पाठविल्या होत्या त्या रावसाहेबानीं कबूल करून मोहिमेचा सर्व कारभार ते येतांच त्यांच्या हवालीं करण्याचें कबूल केलें होतें. हैदर बिदनुरास पळून गेल्यावर लढाईतून वांचलेली व चोंहोंकडे पांगलेली त्याची कांहीं फौज पुनः त्याजवळ जमा झाली. त्यानें मराठ्यांशीं पुनः तहाचें बोलणें सुरू केलें. परंतु या ही खेपेस रावसाहेबांच्या मर्जी प्रमाणें तहाचीं कलमें ठरलीं नाहींत, सबब हैदरास आणखी जेरीस आणण्याचें काम पुनः चालू झालें. या वेळीं जीं ठाणीं काबीज करण्यांत आलीं, त्यांत होनहळ्ळीचें ठाणें फार मजबूत होतें. त्यांत हैदराचें रोहिले, पठाण, हबशी व गारदी मिळून साडेतीन हजार माणूस होतें. रावसाहेबांचे मोर्चे त्या ठाण्यास बसले तेव्हां कुमक करण्याच्या इराद्यानें बिदनुराहून निघून हैदर सहा कोसांवर आला होता. परंतु पुढें येण्याची त्यास हिंमत न झाल्यामुळें त्याच्या देखदेखत किल्लेकऱ्यांवर जरब बसवून रावसाहेबानीं तें ठाणें घेतलें. गेल्या चैत्र वैशाखांत चित्रदुर्ग वगैरे संस्थानां पासून खंडणी घेण्या करितां रावसाहेबानीं स्वारी केली होती, तेव्हां हैदरानें सावनुरावर चालून येण्याचा रोंख दाखविल्यामुळें त्यांस परत यावें लागलें होतें. सध्या दादासाहेब येत पर्यंत हैदराशीं चालू असलेलें युद्ध तहकूब करून ते या संस्थानिकांच्या मुलखांत खंडणी घेण्या करितां कूच करून गेले. ते हरप-

इंग्रज मालवण काबीज करितात

नहळ्ळी पासून एक मजलीवर पोंचले असतां माघ शुद्ध षष्ठीच्या दिवशीं दादासाहेब व नारायणराव साहेब थोरल्या लष्करास येऊन मिळाले. दुसऱ्या दिवशीं हरपनहळ्ळीस लष्कर पोंचलें, तेव्हां सर्व संस्थानिकांचे वकील हजर होऊन खंडण्या ठरल्या. त्यांत हरपनहळ्ळी व चित्रदुर्ग येथील संस्थानिकांनीं अनुक्रमें साडेतीन व साडेनऊ लक्ष रुपये देण्याचें गोपाळराव पटवर्धनाच्या विद्यमानें कबूल केलें. या रकमेच्या वसुलाची व्यवस्था शिरस्त्या प्रमाणें महादशेट वीरकर याजकडे सोंपाविण्यांत आली. रायदुर्ग व बल्लारी येथील संस्थानिकांच्या ही खंडणीचा ठराव याच प्रसंगीं झाला. नंतर हैदराचें पूर्ण पारिपत्य करण्या साठीं बिदनुरावर चालून जाण्याची मसलत ठरून लष्कर परत फिरलें. ही मसलत पार पाडण्या पूर्वी महाराष्ट्रांत कांहीं उलाढाली चालल्या होत्या त्यांचा बंदोबस्त करणें जरूर पडलें. पेशव्यांच्या फौजा दूर गेल्या आहेतसें पाहून मोंगलाकडील मराठे सरदार जगन्नाथ धोंडाजी व खंडागळे यानीं नाशिक प्रांतीं येऊन कांहीं धामधूम केली, त्या बद्दलचा बंदोबस्त पेशव्यानीं आपल्या वकिलाकडून मोंगलाची कानउघाडणी केल्यावरून परस्परच झाला. कोळ्यांच्या दंग्यामुळें पुणें प्रांतीं बरीच अस्वस्थता झाली होती, सबब सालपेंकर शिंदे, नरसिंगराव घायगुडे व आबा पुरंदरे यांचीं पथकें पुण्याच्या रक्षणार्थ परत पाठविण्यांत आलीं. मालवणच्या बंदरांत कोल्हापुरकरांचें आरमार होतें, त्यानें आज अनेक वर्षें इंग्रज व्यापाऱ्यांचीं गलबतें लुटण्याचा रोजगार आरंभिला होता. वाडीकर सावंत ही संधी सांपडेल त्या प्रमाणें इंग्रजांचीं गलबतें लुटीत असत. या दोघांच्या उपद्रवामुळें इंग्रजांस आजपर्यंत फार नुकसान सोसावें लागलें होतें, सबब त्यांची खोड मोडण्या साठीं त्यानीं आरमार तयार करून व त्यावर फौज चढवून मालवणावर स्वारी केली. माघ शुद्ध सप्तमीच्या दिवशीं इंग्रजानीं त्या किल्ल्यास वेढा घातला, व तोफांचा मारा सुरू केला. किल्लेकरी ही तोफांची मारागिरी करीत होते. इतक्यांत किल्ल्यांतील

दारुखान्यास अकस्मात् आग लागून तो उडाल्यामुळें आंतील लोकांनीं निरुत्साह होऊन इंग्रजांस किल्ला दिला. त्या नंतर वाडीकर सावंतांचा किल्ला रेडी ह्मणून होता त्यास वेढा घालून इंग्रजानीं तो ही किल्ला घेतला.

किल्ला किती ही मजबूत बांधिलेला असला तरी तो सांभाळणारे लोक जर नादान असतील तर त्या किल्ल्याची मजबुदी काय कामाची ? उलटपक्षीं शूर लोकानीं सांभाळिलेलें पडक्या भिंताडाचें गांवढें सुद्धां एखाद्या वेळीं शत्रूस अजिंक्य होऊन बसतें. शिवाजी महाराजानीं शेंकडों मजबूत किल्ले बांधिले होते, पण त्या त्या किल्ल्यांत ठेविलेल्या मावळे व हेटकरी लोकांच्या अद्भुत पराक्रमावर आणि किल्ले दुरुस्त व नेहमीं लढाईच्या तयारींत राखण्याच्या महाराजानीं ज्या शिस्ती घालून दिल्या होत्या त्यांवर त्या किल्ल्यांची मजबुदी अवलंबून होती, आणि त्या किल्ल्यांचें नांव ऐकून शत्रूस दरारा वाटत असे हें ही योग्य होतें. महाराजां मागें मराठी राज्याचा मुख्य अधिकार ज्यांच्या हातीं आला त्यानीं मावळे व हेटकरी लोकांस उत्तेजन देण्याचें सोडून दिलें, व महाराजानीं घालून दिलेल्या शिस्ती ही टाकून दिल्या. अर्थात् शिवाजी महाराजानीं बांधिलेल्या मालवणा सारख्या विख्यात जलदुर्गाचा लौकिक ही प्रस्तुत काळीं केवळ पोकळपणाचा होता. या लौकिकाच्या भ्रमाचा भोंपळा जेव्हां एकाएकीं इंग्रजानीं फोडिला तेव्हां मराठे लोकांस पराकाष्टेचें आश्चर्य वाटलें व क्रोध ही आला. गोविंद हरि या किल्ल्यास ' शिवलंका ' असें नांव देतो त्यावरून शिवाजी महाराजांच्या कृती विषयीं अद्यापि ही महाराष्ट्रांत किती अभिमान जागृत होता हें दिसून येतें. ' शिवलंका ' ह्मणजे शिवाजी महाराजानीं निर्मिलेलें लंके सारखें समुद्रवेष्टित अर्थात् दुर्धर्ष, राक्षसां प्रमाणें बलाढ्य वीरानीं सांभाळिलेलें व अतोनात संपत्तीनें भरलेलें असें हें लंकेच्या तोडीचें स्थळ होतें; असा त्याच्या लिहिण्याचा अभिप्राय आहे.

मागच्या ' मोंगलाशीं लढाई ' या प्रकरणांत गोविंद हरीचीं पत्रें

जितकीं विपुळ आहेत तितकीं या प्रकरणांत नाहींत. तथापि जीं आहेत तीं त्याच्या नेहमींच्या पद्धती प्रमाणें मनोवेधक रीतीनें लिहिलेलीं व तत्कालीन स्थिति दाखविण्यास फार उपयोगी आहेत. त्यांत ऐतिहासिक महत्वाचे उल्लेख ह्मटले तर भवानराव व भगवंतराव या दोन प्रतिनिधींत चालू असलेली झोंबाझोंबी, मोंगलाई सरहद्दीवर निंबाळकरांचीं आपआपसांत भांडणें, दादासाहेबांचें मिरज प्रांतीं आगमन, तोफखानेवाले पानशे यांचा उपद्रव, या संबंधाचे आहेत. कोल्हापुरास पंचगंगेच्या कांठीं श्रीशंकराचार्यांचा मठ आहे. त्या मठाच्या पटांगणांत त्या वेळच्या स्वामीनीं एक वृंदावन बांधिलें होतें व नदीकांठीं सन्यासी लोकांस राहण्या करितां ओऱ्या बांधिल्या होत्या. त्या शेजारीं कोल्हापुरच्या जिजाबाई राणीनें आपल्या नवऱ्याची छत्री बांधविण्याची सुरुवात केली. त्या छत्री भोंवती जें आवार बांधविलें होतें, त्यांत स्वामीचें वृंदावन व नदीकांठच्या ओऱ्या राणीनें बलात्कारानें घेतल्या. स्वामीनीं पुष्कळ अट्टहास केला, तरी तिनें त्यांचें ह्मणणें ऐकिलें नाहीं. तुमच्या मठाच्या पटांगणांत वार्षिक ब्राह्मण भोजनें होतात तीं छत्रीच्या आवारांत व्हावीं, व सन्याशानीं ही पाहिजे तर तेथें रहावें हें जिजाबाईचें ह्मणणें होतें, पण शूद्राच्या स्मशानभूमींत या दोन्ही गोष्टी होऊं देणें स्वामीस किंवा त्या वेळच्या कोणा ही ब्राह्मणास पसंत होण्या जोगें नव्हतें. राणीकडून आपणावर हा जुलूम होत असल्या विषयीं स्वामीनीं गोविंद हरीस पुनः पुनः पत्रें व निरोप पाठवून व एकदां मिरजेस स्वतः येऊन कळविलें. त्यावरून गोविंद हरीनें ही गोपाळरावास वारंवार आग्रह पूर्वक लिहिलें आहे कीं, तुम्हीं रदबदल करून पेशव्यांकडून चांगलें खरमरीत विनंती पत्र (ताकीद पत्र ?) राणीस पाठवून आवार बांधण्याचें काम बंद पाडावें ! रामराव देशपांडे चंदुरकर व नरसाप्पा गोंसावी बिरनाळकर यांच्या खटल्यां विषयीं गोविंद हरीच्या पत्रांत वारंवार मजकूर आला आहे, तो वाचिला ह्मणजे त्या वेळच्या पेशवाई दरबाराच्या स्थितीची

बरीच कल्पना करितां येईल. तात्या घोरपडे इचलकरंजीकर यास दुर्व्यसन लागलें होतें, व त्याची वागणूक बद फैलीची होती त्या विषयीं ही कांहीं मजकूर त्याच्या पत्रांत आहे. पावसाळ्यांत तो फार आजारी होता. आजार दूर व्हावा ह्मणून कृष्णा वारणा संगमावर (त्या वेळीं तेथें हरिपुर गांव वसलेलें नव्हतें) त्यानें तुला केली व पुढें शतरुद्र ही करविला. त्या विषयीं व इतर घरगुती मजकुरांचीं पत्रें या प्रकरणांत दिलीं आहेत तीं वाचण्या जोगीं आहेत. एका पत्रांत तो भूकंप झाल्या विषयीं लिहितो. हा भूकंप शके १६८६ श्रावण शुद्ध प्रतिपदा- रविवार या दिवशीं तिसऱ्या प्रहरीं झाला, व त्याचे धक्के नाशिक, पुणें, पैठण, राहुरी, पिंपळगांव, धोम, वांई, कऱ्हाड, पंढरपुर, वारणातीरचा प्रदेश, या ठिकाणीं ह्मणजे बहुतेक महाराष्ट्र भर बसले.

सदाशिवराव भाऊसाहेब पानपतच्या गर्दीत नाहींसे झाले ते त्या प्रसिद्ध युद्धांत मरण पावले, या विषयीं त्या वेळच्या समंजस लोकांस शंका नव्हती. परंतु साधारण समजुतीच्या लाखों लोकांस वाटत असे कीं, भाऊसाहेब अद्यापि जिवंत आहेत. पानपतच्या स्वारी नंतर लवकरच भाऊ साहेब अमुक ठिकाणीं आले, अमक्याच्या दृष्टीस पडले, असल्या बातम्या दक्षिणेंत वारंवार उठूं लागल्यामुळें लोकांत मोठी चळवळ उडून राहिली होती. असल्या गप्पांवर लोकांचा विश्वास किती जलद व पक्का बसत जातो हें जाणून श० १६८९ च्या आश्विनांत कांहीं लुच्चे लोकांनीं बुंदेल खंडांत भाऊसाहेबांच्या नांवाचा एक तोतया उभा केला. त्याच्या खरेपणा बद्दल दक्षिणेंत तत्काळ गांवोगांव चर्चा सुरू होऊन मोठमोठ्या लोकांच्या मनाची ही कशी चलबिचल झाली होती, हें या प्रकरणांत कांहीं पत्रें दिलीं आहेत त्यांजवरून दिसून येईल. सदरहू तोतया विषयीं पुढें आह्मांस वारंवार ल्याहावयाचें आहे, सबब या संबंधें तूर्त इतकाच उल्लेख पुरे आतां ' हैदरअल्लीवरची पहिली स्वारी ' जी आजपर्यंत जारीनें सुरू होती,

तिचा निकाल कसा काय झाला या विषयीं लिहूं.

रावसाहेब व दादासाहेब एकत्र झाल्यावर मोहिमेचीं सर्व सूत्रें दादासाहेबांच्या हातीं गेलीं. प्रथम त्यांचा बेत असा होता कीं, विंचूरकर, नारो शंकर व कांहीं हुजरात मिळून दहा बारा हजार फौज श्रीरंगपट्टणाकडे रवाना करावी, ह्मणजे आपली राजधानी राखण्या करितां हैदरास बिदनूरची झाडी सोडून बाहेर पडावें लागेल. तसें झालें ह्मणजे मैदानांत त्यास गांठून पारिपत्य करण्यास सोइवार पडेल. परंतु असें केलें असतां मोहिमेचें काम पुष्कळ दिवस पर्यंत चालून कदाचित् या वर्षीं ही पुनः या प्रांतीं छावणी करावी लागेल, असा विचार होऊन शेवटीं सर्व फौजेसह बिदनुरावरच चालून जाण्याची मसलत ठरली. नंतर सर्व लष्कर त्या रोखें चालू झालें, तेव्हां वाटेंत हरिहर व कुमसी हीं ठाणीं लागलीं तीं काबीज करण्यांत आलीं. आबा पुरंदरे व नारो शंकर यानीं जाऊन मासूरचें ठाणें घेतलें. नंतर अनंतपुरास सैन्याचा गराडा पडून पाऊण महिना युद्ध झालें. शेवटीं तेथील किल्लेकरी शरण येऊन त्यानीं किल्ला मराठ्यांच्या हवालीं करून दिला. नंतर दादासाहेबानीं सैन्याच्या तीन टोळ्या करून तीन वाटानीं बिदनुरावर एकदम चालून जाण्याची मसलत केली. त्या प्रमाणें व्यवस्था होऊन फौज झाडींत शिरून बिदनुरा पासून दहा कोसांवर जाऊन पोंचली. इतकें झाल्यावर आपले सर्व उपाय आतां थकलेसें पाहून हैदरअल्ली मराठ्यांस शरण आला. त्याची या मोहिमेंत इतकी दुर्दशा झाली होती कीं, मराठे ह्मणतील ती खंडणी व मागतील तो मुलूख देणें त्यास प्राप्तच होतें. परंतु दादासाहेबांच्या हातीं मोहिमेचीं सूत्रें आल्या पासून त्याच्या आशाबीजास थोडा अंकूर फुटला होता. त्यांचें या पूर्वींच्या तीन चार वर्षांचें चरित्र ध्यानांत घेऊन त्यानें असा अजमास बांधिला होता कीं, कांहीं लालूच दाखविल्यास दादासाहेब, त्यांचे अनुयायी व सखाराम बापू व विंचूरकर व नारो शंकर आपणास अंतस्थरीतीनें अनुकूळ होण्या

जोगे आहेत. हा अजमास त्याचा खरा होता. पेशवाईचे जितके शत्रु तितक्या सर्वांशीं दादासाहेबांची गुप्तपणें मैत्री असावयाची ! कां तर, पुतण्याशीं भांडणाचा प्रसंग आला तर या शत्रूनीं आपणास कुमक करावी ! याच हेतूनें त्यानीं इ. स. १७६२ त निजामअल्लीस सत्तावीस लक्षांचा मुलूख दिला होता. राक्षसभुवनच्या लढाई नंतर ह्मणजे इ. स. १७६३ च्या अखेरीस मोगलाशीं दादासाहेबांस फूस देणाऱ्या मुत्सद्यानीं जो तह करून घेतला त्यांत त्यावर जबर ओझें न बसवितां त्यास सांभाळून घेण्यांत आलें, यांतलें तरी बीज हेंच होय. आतां हैदराशीं होणाऱ्या तहाचा मासला असल्याच तऱ्हेचा व्हावयाचा होता. पण आतां रावसाहेब प्रौढदशेंत येऊन राज्याचा कारभार स्वतः पहाण्या जोगे झाले होते. दादासाहेब वगैरे मंडळीचे सर्वच फंद आतां पूर्वी प्रमाणें त्यानीं चालूं दिले नसते. तथापि या घरबुडव्या मंडळीनें हैदराचा आपल्या हातून होईल तितका फायदा या तहांत साधून दिला ! या वेळे पासून हैदर व दादासाहेब यांचें जें एकदां सख्य जमलें तें पुढें कधीं बिघडलें नाहीं. तहाचें बोलणें पक्कें ठरविण्या करितां दादासाहेबानीं नारो शंकरास हैदराकडे पाठविलें होतें. त्यानें शर्ती ठरवून आणिल्या त्या ह्या—

१ उत्तरकर्नाटक पैकीं हैदरानें मराठ्यांचा जितका मुलूख घेतला होता तितका सर्व परत द्यावा, आणि पुनः त्यांच्या राज्यास कधीं उपसर्ग देऊं नये.

२ म्हैसूरच्या खंडणीबद्दल त्यानें मराठ्यांस बत्तीस लक्ष रुपये द्यावे.

३ या पुढें त्यानें सावनूरकर नबाब व मुरारराव घोरपडे यांस कधीं उपद्रव देऊं नये, आणि त्या दोघांचा मुलूख अद्यापि त्याच्या ताब्यांत कांहीं असेल तर तो त्यानें सोडून द्यावा.

या तीन कलमांची वाटाघाट होत असतां आढेवेढे घेण्याचें काम

हैदरानें चालूं ठेविलेंच होतें. शेवटीं तो इतक्यावर आला कीं, माझा मुलगा टिपूसुलतान यास श्रीमंतानीं चाकरीस ठेवून बंकापुर व बसवापट्टण हीं दोन ठाणीं त्यास जहागीर द्यावीं. हें त्याचें मागणें मान्य कराव्याचें दादासाहेबांच्या मनांत होतें, परंतु रावसाहेबानीं साफ जबाब केला कीं, तुंगभद्रेच्या उत्तरेस बंकापुरा सारखा बळकट किल्ला जर हैदराच्या हातीं ठेविला तर तो पुनः उत्पात करून या स्वारींत इतक्या श्रमानें आम्हीं सोडविलेलें राज्य पुनः हिसकून घेण्यास कमी करणार नाहीं. बसवापट्टण तर बिदनूरच्या राज्याची किल्ली आहे. तें राज्य आमच्या मांडलिकाचें असतां हैदरानें बळजबरीनें घेतलें आहे. तें प्रस्तुतच्या तहांत जरी तो परत देत नाहीं, तरी पुढें कधीं तें आम्हांस ध्यावयाचें असल्यास बसवापट्टण त्याच्या हातीं लागूं देणें चांगलें नाहीं. चुलते पुतण्यांचे या प्रमाणें भिन्न अभिप्राय पडले असतां सखारामबापूनें तडजोड काढिली कीं, हैदरा पासून बंकापुर घ्यावें व बसवापट्टण त्याजकडे ठेवावें. शेवटीं याच प्रमाणें निश्चय ठरून हैदराशीं तह झाला व त्यानें खंडणीची रक्कम रोख दिली, आणि मेघश्यामराव पटवर्धन यास कैदेंतून सोडून दिलें. बंकापुर ताब्यांत घेण्यासाठीं विसाजी नारायण गेला होता, त्यानें तें ठाणें वैशाखाच्या पहिल्या पंधरवड्यांत हस्तगत करून घेतलें. बसवापट्टण पूर्वीं पटवर्धनांच्या जहागिरींत होतें तें आतां हैदराकडे राहिलें. तें नुकसान भरून काढण्यासाठीं एक लक्ष त्रेसष्ट हजारांच्या भरतीचा तालुका त्यांस नवीन देण्याचें श्रीमंतानीं कबूल केलें.

दादासाहेबांकडे जर मोहिमेची सर्व अखत्यारी दिलेली नसती तर मराठ्यांस अधिक फायदेशीर असा तह खचित झाला असता. बिदनूरचें राज्य घेण्याचा नानासाहेब पेशव्यांचा फार हेतु होता व त्याच धोरणानें त्या राज्या नजीकचे हरिहर व बसवापट्टण हे दोन तालुके त्यानीं हाताखालीं घालून ठेविले होते. शिऱ्यांचा सुभा ‘ स्वराज्या ’ पैकीं असल्यामुळें तो सोडवून पुनः मराठी राज्यास जोडिल्याबद्दल त्यांस अभिमान वाटत

असे. बापाचा बिदनूरचें राज्य घेण्याचा हेतु तडीस नेण्यांत किंवा त्यानें संपादिलेला शिऱ्यांचा सुभा सांभाळण्यांत रावसाहेबांस केवढें भूषण वाटलें असतें! परंतु तें राज्य व तो सुभा हीं दोन्ही हैदरानें जीं बळकाविलीं होतीं तीं किंवा त्या पैकीं कांहीं भाग तरी त्यानें परत दिल्या शिवाय त्याशीं दादासाहेबानीं तह करणें वाजवी नव्हतें. हा तह रावसाहेबांस किंवा त्यांच्या विश्वासांतल्या पटवर्धन वगैरे सरदारांस बिलकुल आवडला नाहीं. तथापि दादासाहेब मोहिमेवर आल्यास ते राज्याचें नुकसान करून देखील हैदराशीं मैत्री करितील, हें माहीत असून ही ज्या अर्थी रावसाहेबानीं त्यांस मुद्दाम बोलावून आणून त्यांच्या हातीं सर्व अखत्यार सोंपविला होता; त्या अर्थी त्यानीं ठरविलेला तह मान्य करणें त्यांस भाग पडलें.

तह झाल्यावर सावनूरकर व घोरपडे यांस आपापल्या स्थळास जाण्यास निरोप मिळाला. नंतर पूर्वी चित्रदुर्ग वगैरे संस्थानांपासून जी खंडणी घ्यावयाचें ठरलें होतें, तिच्या वसुलाचें काम पार पाडण्या करितां व हैदरापासून जिंकिलेल्या मुलखांत स्वस्थता राखण्या करितां गोपाळराव पटवर्धनास दहा बारा हजार फौजेसह त्या प्रांतीं ठेवून त्रिवर्ग श्रीमंत सोंडूर येथें जाऊन कार्तिकस्वामीचें दर्शन घेऊन पुढें अनागोंदी हंपी विरूपाक्ष या रोंखे कूच करून गेले व तेथून पंचमहालांत जाऊन तेथील खंडणी गोळा करून ज्येष्ठ महिन्याच्या अखेरीस पुण्यास दाखल झाले.

याच सुमारास निजामअल्लीनें बसालतजंगावर स्वारी करून त्यास कर्नूळ शहरांत कोंडून धरिलें. १७६१ त बसालतजंगानें हैदराकडून नजराणा घेऊन त्यास शिऱ्यांचा सुभा दिला व त्याजकडून आपणास दक्षिणच्या सहा सुभ्यांचा सुभेदार ह्मणवून घेतलें, हा काय तो निजामअल्लीचा त्यावर राग या प्रसंगीं बसालतजंग शरण आल्यावरून त्याजकडे त्यानें अदवानीचें संस्थान पूर्वी प्रमाणें ठेविलें. या स्वारी करितां रावसाहेबांजवळ कुमक मागितल्यावरून त्यानीं कांहीं फौज बाबूराव हरी बरोबर परस्पर कर्नाटकांतूनच निजामअल्लीकडे पाठविली होती.

नं० ३८५

(अजमासें पौष वद्य
जानेवारीचा प०पंधरवडा)

लक्ष्मण हरी लांगु याचें गोपाळरावास पत्र:—

" हैदरअल्ली व मीरफैजुल्ला यानीं चित्रदुर्ग प्रांत ओस करून लाख दीड लाख खंडणी जमा केली. प्रांतांतील बहुतेक ठाणीं घेतलीं. दुर्गवाले यांस आसरा कोणाचा नाहीं. सारे पाळेगार हैदरनाईकाकडे मिळाले आहेत. हैदरनाईक चित्रदुर्गवाल्या पासीं ९ लक्ष रुपये मागतो. या खेरीज मुलूख घेतला तो सोडीत नाहीं. मुलखांत वसूल घेतला आहे तो मजुरा देत नाहीं. आपली फौज व प्यादे घेऊन बिनीस चालावें हें शिवायें. चित्रदुर्गवाले यांस आम्हांकडून कुमक होत नाहीं. "

नं० ३८६

[श्रावण वद्य ९
१ सप्तंबर.]

नरसापाकडून गोपाळरावास पत्र—बागेवाडी
प्रांत चिकोडी येथून—

" बिदनूर यवनानें घेतलें, या करितां सर्वस्वी घात जाला तो पत्रीं काय लिहावा! एकीकडे सावनूर प्रांत व (दुसरीकडे) बंकापूर व हुबळी व नवलगुंद वगैरे जागां यवनाचा अंमल जाहल्यामुळें आम्ही खराबींत आहों. "

---

१ सदरहू गृहस्थ हरिहर येथें मामलेदार होता. २ हैदराचें म्हणणें आहे कीं, चित्रदुर्गकरानें खंडणी देऊन शिवाय आम्हांस सामील व्हावें व फौज घेऊन स्वारींत नेहमीं बिनीस चालावें. ३ हा नरसापा कोण हें ठाऊक नाहीं.

नं० ३८७

[अजमासें वैशाख वद्य
मेचा प० पंधरवडा]

विसाजी नारायण[1] याचें गोविंद हरीस पत्रः—

" धारवाडास शत्रूच्या फौजेनें वेढा दिला आहे. त्याचा[2] उपराळा[3] करण्या साठीं पांचशें पायदळ पाठविलें आहे. हैदरनाईक याजकडील बातमी तर, सावनूरकर नबाब यास अतिशय[4] करून भेटीस नेला. समागमें बायका व मुलें (घेऊन) व बंधूसह निश्चय करून नबाब गेला. जाऊन गोटासमीप[5] उभा राहून सांगून पाठविलें. तो भेटीस न आला. संध्याकाळ जाहला. शेवट सांगोन पाठविलें कीं, ' गोटांत जाऊन उतरणें ' त्यावरून गोटास जाऊन उतरले. त्या उपरी दुसरे दिवशीं दोवे बंधू नबाबाचे होते त्यांस भेटीस बोलावूं पाठविलें, तेव्हां पन्नास माणूस पठाण सामान बांधून समागमें घेऊन गेले. तों हैदरनाईक किल्ल्यांत[6] जाऊन बसोन 'दोघेच जण येणें ' ह्मणोन सांगून पाठविलें. हे न गेले.माघारे फिरोन आले. याचें कारण कीं . 'पठाणाची जात खुनी. दोन तीन सुभे मागें यानीं ठिकाणीं लाविले. तुला ही जिवें मारितील. ते जिवावर उदार होऊन कबिलेसुद्धां आले तेव्हां सोडीत नाहींत. ' ऐसें सांगणारांनीं सांगितलें. त्या वरून एक दुसरा मध्यस्थ होता त्यानें सांगून[7] पाठविलें कीं, 'तुमच सोबती आह्मीं आहों. ' ऐसेंच चित्रदुर्गकर व हरपनहळ्ळीकर याणीं सांगून पाठविलें. त्यावरून [सावनूरकर] अवसान धरून स्वस्थ राहिले. सावनूर शहरांत हैदरनाइकाकडील लोक गेलेच होते. ह्म-

---

१ हा इचलकरंजीकरांचा कारभारी यावेळीं धारवाड जिल्हयांत मुळगुंद येथें होता. २ धारवाडच्या किल्ल्यांचा. ३ कुमक. ४ निकडलावून. ५ हैदराच्या गोटासमीप. ६ बंकापुरच्या किल्ल्यांत. ७ सावनुरच्या नबावास सांगून पाठविलें.

णावयास नबाबाचा वाडा मात्र राहिला होता. त्यास हैदरनाईक याजकडील लोकानीं शहरांत दंगा करून वाड्यांत जनानखान्यापर्यंत चालोन गेले. आंत शिरहट्टीकर देसाई व खानजादे व पठाण होते त्यानीं दम धरून मारामार करून शें दीडशें गाडदी ठार व दोनशें पर्यंत जखमी होऊन बाहेर काढिले. नबाबाकडील ही कांहीं जायां जखमी जाहले. हें वर्तमान हैदरास कळल्यावर दरम्यान[1] होते त्यांस ही कळलें. त्याणीं हैदर नाईक यास सांगोन पाठविलें जे, " मध्यस्थ (आम्हीं) असतां यांस[3] बाहेर घेऊन आलों. त्यांच्या शहरांत या प्रमाणें जालें. तुम्हीं त्यावर हल्ला करणार, तेव्हां आम्हीं त्याचे सोबती. " ह्मणोन तयार जाहले. सावनूरकर ही तयार होऊन राहिले. तेव्हां हैदरानें [आपल्या] गोटांत तयार जाले होते ते माघारे नेले व सावनुरीं गाडदी होते ते ही माघारे आणविले. व नबाबास ही समाधान पूर्वक सांगोन पाठविलें. या प्रमाणें होऊन हैदर खान याणीं मायावी प्रकार करून (सावनुरांत) चौकीस गाडदी होते, त्यांतील चौघांचे हात कापिले. कीं, ' बगर हुकूम दंगा कां केला ' ह्मणोन ! कैरितां अंतरंगीं हैदरनाईक याणेंच केलें होतें. या उपरांत मध्यस्थानीं उभयपक्षींच्या करार मदार करून एक लक्ष तीस हजार होन बाकी नबाबाकडे राहिले होते, ते नबाबानीं देवापानाईक याची निशा केली. हैदरनाईक याणें होनांची पावती जाल्यावर हावेरी व देवगिरी वगैर ठाणीं सोडून द्यावीं, [असें ठरलें.] या प्रमाणें विवेक घडून नबाब सावनुरीं आला. मीरफैजुल्ला या बरोबर तीन हजार फौज व पांच हजार गाडदी व बारा तोफा देऊन धारवाडाकडे रवाना करून आपण खासा बिदनुरास जावयास बंकापुराहून माघारा एक मजल गेला, ह्मणून वर्तमान तहकीद आहे. "

---

१ करून. २ मध्यस्थ. ३ सावनुरकर नबाबास. ४ दगा केला त्यावेळीं. ५ खरें.

नं० ३८८

(अजमासें भाद्रपद शुद्ध
सप्टेंबरचा प० पंधरवडा)

भास्[1]करराव दादाजीचें गोपाळरावास पत्रः—

"मीरफैजुल्ला धारवाडाहून कूच करून मोरब नवलगुंदावरून नरगुंद चार कोस डावें टाकून शिरहट्टीचे रोखें जाऊन गदगास ठाणें घालून शिरहट्टीस येऊन तें ही ठाणें घेतलें. श्रीमंतगडची बोली लागली. तें ही ठाणें जाईल. डंबळावर प्रस्तुत त्यानें शह दिला आहे. कोपळाकडे जाण्याची व नरगुंदावर येणेची दाट आवई आहे. श्रीमंतांच्या आगमनाकडे सर्वांचें लक्ष लागलें आहे. आपली फौज तरी कृ[2]ष्णा पार होती ह्मणजे शत्रु आवरता. मोगलअल्लीचा सुभा[3] मुलूख मारीत फिरतो त्यास ही कोणी पुसणारा नाहीं!"

नं० ३८९

(१६ नोवेंबर.)

श्री.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोपाळरावजी स्वामीचे सेवेशीं पोष्य नारोशंकर साष्टांग नमस्कार विनंति उपरी येथील कुशल कार्तिक शु॥ एकादशी मु॥ जनस्थान. यथास्थित जाणोन स्वकीय लेखन करून संतोषवीत असावें. यानंतर — आपला आमचा वियोग जाहलिया दौरभ्य[4] पत्र येऊन स्वकीय कार्य भाग दरबारी वगैरेचें वर्तमान न कळलें. चित्त सापेक्षित असे. तर साकल्य लेहून संतोषवावें. आमचें वर्तमान कोणता ही प्रकार स्वामिशीलोपम नाहीं. केल्या सेवेचें फल खावंदानीं बूज करून निमे[5] सरंजाम सरकारांत घेतला आहे. आमचा भारी ऐवज पहावा तर

१ हा नरगुंदचा देसाई याचें आडनांव भावे. २ कृष्णेच्या दक्षिण तीरास येती. ३ मोंगल अल्लीनें नेमिलेला सुभेदार मीर आवस. ४ पासून. ५ सरकारांत नारोशंकराचा चौथाई सरंजाम घ्यावयाचें ठरलें होतें, मग तो निम्मे सरंजाम घेतल्याचें लिहि

निमेस ही ठिकाण नाहीं याजकरितां चिंतावर्ती असों. पुढें आयास करावे असा प्रकार राहिला नाहीं. जो सरंजाम आहे त्यापैकीं प्राप्त्यंश होईल तदनुसार फौज वगैरे खर्च बाळगून चाकरीस हर कोणास फौज सुद्धां पाठवून आपण स्नानसंध्या करून असावें, इतका निश्चय केला आहे. आपण चित्ता पासोन अप्रतिम ममता आमचे ठाई राखितां, ऐसें जाणोन हें पत्र लिहिलें असे. तर उत्तम सल्ला असेल ते आम्हांस लिहून पाठवावी त्या प्रमाणें निश्चय करूं. आपणाकडील ही साविस्तर ठराव कोणें प्रकारचा जाहला, खावंदानीं बूज कैसी केली, कोणते मोहिमेस आज्ञा पिलें, हें विस्तारयुक्त लेखन करावें कीं जेणें समाधान होय. सदोदित पत्रप्रेषणीं अविस्मर असावें. लोभ करीत जावा. बहुत काय लिहिणें. हे विनंती. राजश्री नारायण रावजी व राजश्री आबा व राजश्री पांडुरंग रावजींस साष्टांग नमस्कार. विनंती लिहिलीपारिसोन लोभकीजे. हे विनंती. राजश्री नीलकंठ रावजी व राजश्री भोंऊ स्वामीस साष्टांग नमस्कार विनंती. लोभाची वृद्धि करावी हे विनंती.

नं० ३९०

(अजमासें श्रावण वद्य
आगष्टचा दु० पंधरवडा)

श्री

त्रिंबक हरीचें गोपाळरावास पत्रः—

" हैदर नाईक याजकडील वर्तमान तर आजपर्यंत बंकापुरींच होता. शिरहट्टीस त्याची फौज आली होती ती माघारी गेली. धारवाडास दोन तीन हजार फौज व दोन चार तोफा आल्या होत्या. त्याजवरी आणखी सात

तो हें काय ? (पहा नं० ३७४ वगैरे.)

१ परशुराम भाऊ

आट हजार फौज व दहा पंधरा तोफा ऐशा मीर फैजुल्ला याजबरोबर देऊन धारवाडास पाठविलें. आपण खासा बंकापुरीं बंदोबस्ती करून बिदनुराकडे पांच हजार फौजे निशीं गेला. श्रीमंतगड व शिरहट्टींत ठाणें आमचेंच आहे. धारवाड अद्यापि झुजत आहे. "

नं० ३९१

(अजमासें मार्गशीर्ष शुद्ध
दिसेंबरचा प० पंधरवडा)

अंताजी सखदेव याचें गोपाळरावास पत्रः—

"मीर फैजुल्ला सोंधेंकर याचे प्रांतें आहे. त्यानें खोलगडास वेढा घातला आहे. खोलगड झुजतो. हस्तगत जाहला नाहीं. फिरंगी यांची मदत[3] केली म्हणोन वर्तमान आहे. "

नं० ३९२

(अजमासें कार्तिक वद्य
नोवेंबरचा दु० पंधरवडा)

रामोजी वीरेश्वर याचें वेंकाजीपंतास पत्रः—

"मीर फैजुल्ला आज फौज घेऊन कलघटगीस आला. तेथून थोडी बहुत फौज सोंधाकडे पाठविणार होता. व थोडीशी फौज बेळगांव प्रांतांत पाठविणार होता. परंतु ईश्वर इच्छेनें बिदनुराकडे राजश्री जानोजी धुळप व नाइमार याणीं जाऊन दोन चार ठाणीं घातलीं. त्याजवरून हैदर अल्लीनें मीर फैजुल्लास बोलावूं पाठविलें. त्यावरून टाको टाक फौज सुद्धां बिदनुराकडे गेला.

---

१ हा बंकापुरचा किल्लेदार गोविंद सखदेव याचा भाऊ. २ हा किल्ला कारवार जिल्ह्यांत आहे. ३ हैदराच्या फौजेशीं लढण्याकरितां फिरंग्यानीं सोंधेकरांस मदत केली. ४ पत्र ज्यास लिहिलें व ज्यानें लिहिलें त्यादोघांविषयीं ही कांहीं माहिती नाहीं. ५बिदनूरच्या राज्यांतील होनावर बंदरास.

नं० ३९३

(९ फेब्रुवारी)

श्री

राजश्री याविराजित राजमान्य राजश्री गोपाळ रावजी स्वामीचे सेवेशीं. पोष्य रामचंद्र नारायण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत माघ शु॥ ७ पर्यंत मुक्काम कोपळ वर्तमान यथास्थित असे. विशेष अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी निरंतर पत्रीं परामर्ष करीत असलें पाहिजे. यानंतर हैदर खानाचे पारिपत्यास फौज आज सहा महिने पासून येते, परंतु आजपर्यंत कोठें ठिकाण नाहीं! त्याणें तो तमाम कर्नाटक घेऊन गोंवेस मोर्चे लाविले. समुद्रांतील देखील स्थळें घेतलीं. सोंधें,बिदनूर,श्रीरंगपट्टण, खास जहागीर केली. बारीपर्यंत मनोळीचे आपला मुलूख स्वराज्य केला. राहतां कोपळ व नरगुंद दोन डोंगर मात्र राहिले. किल्लेचे दरवाजे पर्यंत टाणीं त्याचीं. दरवाजे आंत अंमल आमचा. कोठपर्यंत मार्ग पहावा! दोनवर्षें श्रीमंतांचा मुलूख तो घेतो, परंतु कोणी नको म्हणत नाहीं! कृष्णे पर्यंत छाया त्याची पडली. लोकांस दुसरें दैवत त्या वांचून आबालवृद्धांस दिसत नाहींसें जाहलें, त्यामुळें त्यावर कोणाच्यानें गोळी टाकवत नाहीं. ज्या स्थळास त्यानें गांठ घातली तें स्थळ आज पर्यंत राहिलें नाहीं. आमचे किल्ले पासून सहा कोसांवर त्याचें लष्कर आलें. तालुकेंत अगदीं ठाणीं घातलीं. मुख्य[2] स्थळास येतो असेंच होतें. परंतु आपले दयेनें येथें सामान बरेंच होतें. श्रीमंत महिने दोन महिनेंत येतील या उमेदीवर जकिरांचें[3] व लोकांचें साहित्य बरेंच होतें. असाध्य पाहून कूच करून गेले. त्यावर घांटाखालीं जाऊन सोंधें प्रांत वर घांट व तळ

---

१ हा कोपळ तालुक्याचा मामलेदार. याचें आडनांव हुपरीकर. तासगांवास हुपरीकर आहेत ते याचेच वंशज होत. २ कोपळ किल्ल्यास. ३ धान्य व दारूगोळी वगैरे सामानाचें

घांट अगदीं घेऊन गोवेंची खंडणीं घेऊन फिरोन आम्हांकडे येणार हें निदान वर्तमान आलें. राजश्री बापू[1] त्यास सांपडले त्यांची आस्ता आपण सर्वांनीं सोडिली ! आम्हीं पेंचात सांपडलों आहों. फौज येऊन बंदोबस्त होईल म्हणोन आजपर्यंत मार्ग पाहिला तरी प्रथम दिवसच आहें. पुढें आम्हांस आपण काय सांगतां तें लिहावें. तमाम प्रांत त्याजकडे. त्याची जबरदस्ती. सर्वांचीं चित्तें त्याजकडे. श्रीमंतांची फौज नये तेव्हां आम्ही निभावणी कशी करावी? कानडे लोकांचा भरंवसा नाहीं. आज उद्यां म्हणोन दिवस घालवितों. याउपर तरी त्वरेनें येऊन बंदोबस्त करावा. दिवस थोडके राहिले. यावयाचा अनमानच असला तरी त्या सारखा बुद्धिवाद आम्हास लिहावा. बाहेरील पैसा यावयाचा नाहीं. कर्ज कोठपर्यंत घालावें ? धण्यानींच आस्था आपले प्रांताची सोडिली, तेव्हां आम्ही तरी कोठपर्यंत दम धरावा ? वडील नरगुंदाहून म्हापणास देवास गेले. तेथून हुपरीस येऊन 'आपणाकडे जाऊन फौज घेऊन येतों' म्हणोन हुपरीहून लिहिलें. फिरोन पत्र आलें नाहीं! आपणाजवळ आहेत किंवा हुपरींत आहेत कांहीं कळत नाहीं. अनागुंदीकरानीं तिगस्त ऐवजांत गहाण खेडीं दिल्हीं. निमे ऐवजीं बाकीस असतां फौज येण्याची दिवसगत पाहून हैदर अल्लीचा आसरा[2] करून खेडीं जोरावारीनें घेतलीं. शत्रूची फौज (आमच्या) किल्लेस यावयास आली तेव्हां अनागुंदी प्रांतांत गुळ्यांस कोपळचे लोक गेले, त्यांस नागावा[3] वस्तभावेस केला आहे. फौज आलेवरी सर्वांचें पारिपत्य होईल. हरपनहळ्ळीकरांकडे हवाले पैकीं बाकी ऐवज तसाच आहे. त्वरेनें येऊन सर्वांचें पारिपत्य करून बंदोबस्त करावा. कनकगिरीकर आपले आगमनाचा मार्ग लक्षितात. हल्लीं त्यानीं पत्रें पाठविलीं आहेत. त्यांचे समाधानाचीं पत्रें पाठविलीं पाहिजेत. बहुत काय

---

१ मेघश्यामरावबापू [गोपाळरावाचा चुलत भाऊ] २ आश्रयास. ३ नागवणें.

लिहिणें. कृपा असों दीजे हे विनंती.

हेच पत्रीं राजश्री नारायणराव व राजश्री नीलकंठराव व राजश्री आबा व राजश्री परशुरामपंत भाऊ व समस्त मंडळीस साष्टांग नमस्कार विनंती. चातकन्यायें मार्ग पाहतों. यांत सर्व समजावें. हे विनंती.

नं० ३९४

(अजमासें कार्तिक वद्य
नोव्हेंबरचा दु०पंधरवडा)

गोपाळरावास कर्नाटकांतील एका कारकुनाचें पत्रः—

" हैदरअल्ली व मीरफैजुल्ला यानीं कित्तूरची खंडणी करून सोंधें प्रांतीं स्वारी केली. वसई विजयदुर्गाहून रुद्राजी धुळप मातबर सरदार दहा पंधरा हजार पायदळ व शिबाडें व गुराबें अशीं दोन तीनशें पर्यंत (गलबतें घेऊन) समुद्रांत जलमार्गें जाऊन ब्रिदनुरा नजीक होनावर शहर मातबर मारून ठाणीं घेतलीं. तैसेंच दुसरें शहर त्या नजीक तें ही मारून ठाणीं घातलीं. आणिक ही फौज जलमार्गें येणार. श्रीमंतांची आज्ञा जाहली आहे. खासा हैदर बिदनुरीं आहे. "

नं० ३९५

कोणा एका मनुष्याचें कर्नाटकांतून गोपाळरावास पत्रः—

" सोंध्याहून पत्रें आलीं. सोंध्यावरी हैदरअल्लीनें चार हजार गाडदी व चार तोफा व कांहीं स्वार ऐसा सरंजाम समागमें देऊन लालखानास रवाना केलें होतें. सोंध्याचा राजा घांटा खालीं गेला होता तेथें फिरंगी व नायमारांचा[1] जमाव व बिदनूर प्रांतचे नामी नामी लोक ऐसा भारी जथ करून सोंध्यास २९ हजार जमावानिशीं आला. लालखान

[1] मलबारांतील ' नायर ' लोक.

गुंतीदुर्गाकडून बनोसीचे बारीनें आंत जात असतां सोंधेकरानीं गांठ घालून अगदीं लालखानास बुडविला. तीन हजार गाडदी ठार मारिले. तोफा व घोडीं घेतलीं. लालखान जखमा लागोन पळोन गेला. ”

नं० ३९६L

(पौष शुद्ध त्रयोदशी
९ जानेवारी.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे शेवेसीं

आपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब याणीं कर्नाटकांत यावें या विषयीं [मी] बहुत आग्रह केला. परंतु वडिलांचे चित्तास नये, यास्तव निंबकासच जावें असें ठरलें. त्यावरून कूच करून आलों. नाहावीवर येऊन राहिलों. वडिलांचा नावयांचा करार जाहला. कळावें. त्र्यंबकास जाऊन हरयेक गोष्ट करावी ऐसा प्रकार नाहीं. स्वस्थ जाऊन बसावें, या अर्थे जाणार. बरोबर गोविंद शिवरामै व मामा हे ही जाणार. आबांचे मतें घरींच रहावें असें आहे. परंतु कृष्णरायास आबानें बोलावून नेलें आहे, त्यास आबा ही येतील. नारो शंकर ही सत्वरच बराबर येणार. आम्ही ही सत्वरच महादेवा नजीक जाणार. वडिलांस कळावें. हैदरनाईक प्रस्तुत बिदनुरानजीकच आहे. त्या प्रांतीं गोपाळरावाची फौज चार पांच हजार जमा जाहली आहे.

---

१ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस. २ नाहावीचा घांट हा पुणें सातान्याचा जुना रस्ता ३ नाशिकास जावयाचा. ४ फंदफितूर वगैरे वाईट गोष्ट. ५ खासगीवाले. ६ त्र्यंबकराव विश्वनाथ पेंठे. ७ नीलकंठ महादेव उर्फ आबा पुरंदरे. ८ कृष्णराव बल्लाळ काळे. ९ शंभुमहादेवाचें स्थान सातारा प्रांतीं.

गोपाळरायाचें हीं पत्र आलें आहे. वडिलांस कळावें. रवाना छ० १२ रजब. बहुत काय लिहूं. हे विज्ञापना.

नं० ३९७

[आश्विन वद्य प्रतिपदा
२२ आक्टोबर.]

श्री.

राजश्री नारोपंत भाऊ स्वामीस. पोष्य विश्वासराव लक्ष्मण साष्टांग नमस्कार. विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ० १४ रबिलाखर जाणोन स्वकीय लेखन केलें पाहिजे. विशेष. शहाडौरीयाहून देशास यावया निमित्य स्वार होऊन गेला, परंतु अद्यापि शिरोंजेत मामलती करितां गणेश संभाजी याणीं राहविलें, शिरोंजेत आहां, ह्मणोन कळलें; त्यास इकडील वर्तमान तरी श्रीमंत राजश्री भाऊसाहेब गोसावी याचे वेषें करून संभुपुरी गोसावी नरवरीं महंत आहे तेथें प्रगट जाहले. आम्हांस कळलियावरी येथून आम्हीं त्यांचे दाट परिचयी ओळखणार यादो हरी व आणखी गृहस्थ वगैरे स्वार पाठविले. त्याणीं ओळखिलें. आम्हांस लिहून पाठविलें. त्या नंतर राजश्री चिमणाजीपंत आपाची रवानगी दोन चारशें राउतानिशीं केली. तेथें गेलियावरी सर्वांनीं वोळखिलें. श्रीमंतांची आम्हांस आज्ञा जाहली कीं, आम्ही येथून निघाल्यावरी तुम्हीं दोन तीन कोस सामोरे येणें. त्यास आश्विन वद्य द्वितीया रविवारीं सायंकाळीं नरवरींहून निघोन आम्हीं आज्ञे प्रमाणें तीन कोस सामोरे जाऊन भेट घेऊन किल्ले मजकुरास आलों. नऊ दहा दिवस जाले. श्रीमंत साहेब खरे संशय नाहीं. त्यास आपण पुढें सहसा न जावें. एक वेळ फेऱ्यापावेतों येऊन श्रीमंतांचें दर्शन घेऊन जाणें. ग्वालेरीहून शिवाजीपंत मुजुमदार व आबा-

१ हा नारो शंकराचा पुतण्या. २ तोतयाची.

जीपंत फडणीस व आणखी गृहस्थ शें पन्नास राऊत घेऊन दर्शनास आले आहेत. मागाहून गोविंदपंत सुभेदार ही दर्शनास येतील. त्यांस ही पत्रें गेलीं आहेत. तरी आपण अवश्यमेव करेरियास आलें पाहिजे. कोणे गोष्टीचा संशय न धरावा. बहुत काय लिहिणें.

नं० ३९८

(अजमासें मार्गशीर्ष व॥
दिसेंबरचा दु० पंधरवडा)

श्री.

पुरवणी. सेवेशीं विनंती. पेशजी हिंदुस्थानचें वर्तमान तें पत्र व. जिन्नस नारायणरायास व आबास दाखविलें. त्यावर राजश्री गणेश संभाजीचें पत्र आलें कीं, " करेरियाहून राजश्री विश्वासराव लक्ष्मण यांस श्रीमंत आलेसें कळलें. सबब शोधास यादो हरी पाठविले. त्याणीं ओळखोन लिहिलें. त्यावरून विश्वासरायानीं चिमणाजी वामन यास पाठविलें. त्याणीं ही ओळखिलें. हें आपली जोडी पाहून आली. त्यावर करेरियास आले. तेथें जोडी पाठविली आहे. ते पाहून आलियावर आम्हीं जाऊन भेट घेऊन सविस्तर लिहून पाठवूं. " ह्मणोन छ० २२ रविलाखरचें पत्र आलें. त्याजवर विश्वासरायानीं नारो रघुनाथ वैद्य शाहाडौरियास[1] आहेत त्यास पत्र पाठविलें कीं, ' तुम्हीं देशीं जावयास निघोन शिरोंजेंत गेलेत. तेथें गणेश संभाजी जवळ मामलत करावयास राहिलेत आहां. ते पुढें जाल तर न जाणें. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब करेरियास येऊन दाखल जाहले. तुम्हीं सत्वर येऊन पोंचणें. संशय न धरितां जलदीनें येणें. ' त्या अलीकडे दुसरें पत्र धोंडो पद्माजी जोधवटीस[2] (?) जाधवाकडील

१ हें पत्र नं० ३९७ चें होय. २ हें हिंदुस्थानांतील कोणच्या तरी गांवाचें नांव असावें. तेथें जाधवाची पागा छावणीस होती. धोंडो पद्माजी तिजवरील कारकून होता.

पागा आहे त्याणीं श्रीमंत आले हें वर्तमान आइकिलें ह्मणोन विश्वासरायास पत्र पाठविलें कीं, श्रीमंत आल्याचें वर्तमान कसें असेल तसें लिहिणें. त्यावर विश्वासरायानीं छ० २२ रबिलाखरचें पत्र धोंडो पद्माजीस पाठविलें कीं, श्रीमंत आले. तुम्हीं संशय धराल तरी न धरणें. मुहूर्त करून डेरे बाहेर दिल्हे आहेत. थोडकेच दिवसांत डेरे दाखल होतील. उपरांत जो मनसबा करणें तो केल्यांत येईल. तुम्हीं आपलें सामान घेऊन जलदीनें आल्यास बहुत उपयोगीं पडेल. सरकारचीं पत्रें जाणें ते आमचे नांवचीं जातात. आज्ञा अशीच आहे.' तेंच बजिन्नस पत्र धोंडो पद्माजी यानीं जाधवांकडे फुलमामडीस पाठविलें. जाधवरायानीं पुण्यास पाठविलें. त्यावर दुसरें वर्तमान, नारो शंकर यांस विश्वासरायाचें पत्र आलें कीं, 'श्रीमंत करेरियास दाखल जाहले.' वर्तमान घेऊन जासूद आले त्यांस सोन्याचीं कडीं दिलीं. तें पांडबा शेणवी याचे राऊत पाहून आले. त्यावर नारायणगांवचा कुलकर्णी करेरियास आले त्यांजबरोबर दोन रोज होता. तो पाहून आला. आणखी दोन चार पाहून आले. विंचुरास ही पत्रें आलीं. चांदवडास होळकराचे पागेचें लिहिलें आलें आहे. कासी नरसी बुंदेले व समस्त कमावीसदार हिंदुस्थानचे येऊन भेटले. ऐसें आहे. आणि पत्रें ही येत असतील. परंतु कोणी कोणास दाखवीत नाहींत. तिकडील वृत्त या प्रकारचें आहे. श्रीमंत मार्गशीर्ष शुद्ध ५स निघणार होते. परंतु समागमें समुदाय नाहीं, यास्तव राहिले. नारो शंकर याजकडील वर्तमान तरी—लोकांस नालबंदी न देत, जाहली चाकरी बुडवून बदमामलीस आले, सबब लोकानीं चढाई केली. युद्ध जालें. दुतर्फा पंधरा वीस माणूस

१ चाकरी करितां पागा बोलाविली तर सरकारचें पत्र पाहिजे, आणि येथें तर तोतया महाराजांस मराठी लिहितां ही येत नव्हतें. यामुळें ही विश्वासराव शकल योजितो. २ होळकराची पागा हिंदुस्थानांत होती तिजवरील सरदारानें चांदवडास मल्हारराव होळकराकडे लिहून पाठविलें. ३ असें लिहून आलें आहे. ४ रावसाहेब पेशवे कर्नाटकचे स्वारीस.

ठार जालें. अद्याप लोक अडून बसले आहेतच. नारो शंकर हवेलीबाहेर[1] निघत नाहींत. विठ्ठल शिवदेव यांस पत्र गेलें होतें कीं, सामान सुद्धां तयार होऊन येणें. त्यांचें पत्र आलें कीं, 'आम्हांस हिंदुस्थानांत जाणें. तिकडे यावयाची सोय नाहीं.' राजश्री मल्हारजी होळकर चांदवडास आहेत. गाइकवाड ही आपले घरीं गेले. श्रीमंत निघालियास फौज नाहीं. परंतु पौष अव्वल अखेर कर्नाटकचे रोखें[2] येतीलसें दिसतें. राजश्री लक्ष्मण[3] कोन्हेर यांसीं दौलताबाद वगैरे मामलत सांगावी, तीन लक्ष रुपये रसद यावी, (असें ठरलें होतें परंतु त्या) पैकीं पन्नास हजार पोत्यास आले. त्यावर आड पडिली कीं, किल्लेदार व लोक सरकारचे आहेत तेच कैरार[4] आहेत. तें ही मशारनिल्हेनीं कबूल केलें. उपर लक्ष्मण कोन्हेरी याणीं विनंती केली कीं, साठ बिघे जमीन नेवऱ्यास इनाम द्यावी. जातीची पंधरा हजार रुपये तैनात करून वांई देशांत सरंजाम द्यावा. तीं दोनी कलमें कबूल केलीं नाहींत. सबब (त्यानीं) शिक्के कट्यार बापूकडे पाठविली कीं, आम्हांस मामलतीचें अगत्य नाहीं. कोणास देणें ते द्यावी. त्याजवरुन शिक्के कट्यार बापूनीं घेतली आणि सांगितलें कीं, चार सालां(चे) कच्चे कागद घेऊन येणें. पाहून मखलाशी करूं. ऐसें उत्तर देऊन मामलत नारो बाबाजी यांस सांगितली. आम्हीं निघाल्यावर एक दोन रोजानीं वस्त्रें व्हावींशीं होतीं. नारोपंत याणीं रसद कबूल केली. राजश्री मेघश्यामरायाची सुटका जाली न जाली हें कळत नाहीं. येथें मनस्वी लोक बोलतात. तो प्रकार सविस्तर पत्रीं लिहावा. आम्हीं पुणियाहून नि-

१ मालेगांव येथें ज्या हवेलींत नारो शंकर रहात होता तींतून. २ कर्नाटकच्या स्वारीस निघाल्यास. ३ पटवर्धनांस मिरजेंतून काढिल्यावर पेशव्यानीं तो किल्ला लक्ष्मण कोन्हेरीस दिला होता हें वाचकांस आठवत असेलच. त्यास आतां दौलतावादेची मामलत सांगण्याचें सखारामबापूच्या मनांत होतें. ४ कायम ठेवावयाचे. त्यांच्या कामांत या नवीन मामलेदारानें ढवळाढवळ करावयाची नाहीं.

घालों ते चार रोज बनेश्वरा पावेतों आहों तों वर्तमान आइकतों कीं, बुंदेल्यापासून तीन लक्ष रुपये घेऊन रजा दिल्ही. आणखी ही दुसरे कमावीसदार आहेत त्यांज पासून थोडें थोडें घेऊन रजा देऊन खासा उज्जनीस आले. ऐसें वर्तमान आइकिल्यांत आहे. पत्र नाहीं. नेबाबाचीं ही पत्रें आलीं कीं, भाऊसाहेब आले. अशीं पत्रें आलीं. वकील नबाबाचे श्रीमंतांकडे गेले असें वर्तमान ऐकल्यांत आहे. परंतु लिहिल्यांत नाहीं. सावकारींत पत्रें येतात कीं, 'मोतीं हरपलें होतें तें सांपडलें! अशीं पत्रें येतात. सरकारचा भोई पाहून येऊन श्रीमंतांस भाऊसाहेबांचें वर्तमान सांगितलें. बहुत मतें आहे कीं भाऊसाहेब खरे. या गोष्टीस संशय नाहीं. या पुढें प्राक्तन जनांचें आहे. आलेलें वर्तमान आपणास लिहिलें आहे. सारांश, लटकेपणाचा संशयें, नारो शंकराचे पुतणे विश्वासराव यांचे अगर हर कोणाचें येथील यजमानांस पत्र नाहीं. नाना पुरंदरे व नाना फडणीस या उभयतांनीं इनाम देऊं करून जलद बोड्या रवाना केल्या आहेत. विसा दिवसांत येतील तेव्हां तथ्य काय तें कळेल. श्रुत होय हे विनंती.

नं० ३९९

(अजमासें कार्तिक शुद्ध
नोवेंबरचा प० पंधरवडा)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. माणकू कटारी यास रवाना केला होता, तो चिरंजीव सौभाग्यवती ठकूबाईस घेऊस पुणियास आला. त्या समागमें

---

१ तोतयानें रजा दिली. २ हिंदुस्थानांतून निजामअलीस पत्रें आलीं. ३ संशय धरण्याचें कारण. ४ पेशव्यांस अगर दादासाहेबांस. ५ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. पत्रांत आलेली ठकूबाई ही माहेरवासीण पुण्यापलीकडे कोणा गांवीं दिलेली होती. ६ हें कोणा विश्वासू गड्याचें किंवा हुजऱ्याचें नांव दिसतें.

जाताना श्रीमंत बाईस[1] आसना करितां घोंगडीं दोन येथून[2] पाठविलीं होतीं तीं त्यानीं[3] रवाना केलीं. त्याचें उत्तर राजश्री रामचंद्र नारायण गोरे याणी (आम्हांस) पाठविलें, त्यांत श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांकडील वर्तमा लिहिलें आहे. यास्तव पत्राची नक्कल करून तुम्हाकडे पाठविली आहे त्यावरून वर्तमान कळेल. राजश्री रामाजी रघुनाथ रानड्ये याणीं पत्र हेंच वर्तमान लिहिलें आहे. दुसरा मजकूर—समशेर[4] बहादर यांचा मेहुण रवा प्रांतीं आहे. त्याणें श्रीमंत राजश्री नारायणराऊ यांस फारशी लिपीचे पत्र पाठविलें. त्यांतील अर्थ ' श्रीमंत राजश्री भाऊ खरे. नरवराहून देशा यावयास दोन मजला आले, तों वाटेस गढी होती. त्यांतील लोकानीं गोळ वाजविली. त्या गढीस मोर्चे लावून बसले आहेत. ' या प्रमाणें फारसनी सानीं सांगितलें. त्या पत्राची नक्कल करून श्रीमंत राजश्री पंतप्रधा यांजकडे पाठविली आहे, ह्मणोन रामाजी रघुनाथ रानड्ये याणीं लिहिले तो मजकूर तुम्हांस कळावा ह्मणोन लिहिलें आहे. उत्तरेकडील वर्तमा आणखी येऊं लागलें. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. लोभ असे दीजे. हे आशीर्वाद.

नं० ४००.

(अजमासें पौष वद्य
जानेवारीचा प० पंधरवडा

श्री

विनंती[5] उपरी. इकडील वर्तमान तरी राजकी नवल विशेष लि

---

१ पेशव्यांची आई गोपिकाबाई नाशिकास होती तीस. २ मिरजेहू ३ पुण्यांत पटवर्धनांचे कोणी कारकून नेहमीं राहणारे होते त्यानीं. ४ पहिल्या बाज रावास मस्तानी पासून झालेला मुलगा शमशेरबहादर. हा पानपतच्या स्वांरींत मर पावला. ५ पत्र कोणी कोणास कोठून लिहिलें हें कळत नाहीं.

हिणेंसें नाहीं. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांजकडील वर्तमान तरी येतात येतात म्हणतात. परंतु निश्चयांत येत नाहीं. परंतु ' भाऊंकडून एक माणूस सौभाग्यवती पार्वतीबाईकडे येऊन खूण घेऊन माघारा गेला. ' म्हणोन वर्तमान आहे. येथील प्रकार तरी फारच नाजुक झाला आहे. येण्याचा भरंवसा नाहीं, याज करितां लिहिलें आहे. तुम्हीं बहुत सावधपणानें रहावें. तुमच्या उशाकडे शत्रु नजीक आहे. आम्हांस श्रीमंतानीं तुमच्या बंदोबस्ताचा प्रकार पुशिला. त्यास आम्हीं सांगावयाचे रीतीनें सांगितलें. परंतु बातम्या आहेत. काल कठीण आहे. तरी बहुत सावधपणें रहावें. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हें विनंती.

नं० ४०१

[अजमासें पौष वद्य
जानेवारीचा प० पंधरवडा]

श्रीगणपतिर्जयति.

अपत्यें साष्टांग नमस्कार विनंती. उपरी. आजी भृगुवारीं प्रातःकाळीं पुण्याचीं पत्रें रवानगी रविवारीं दोन प्रहरां जाहलेलीं आलीं. त्यांत ' श्रीमंत भाऊसाहेब खरे ' ह्मणोन दोघा चौघांचीं लिहिलीं आलीं. धोंडो केशव फडके यांचें लिहिलें आलें कीं, आपण नेहमीं वीस रोज त्यां पाशींच आहों. तसेंच पांडबा शेणवी यांजकडील कारकून गेला होता त्याचें पत्र आलें. आणखी बहुतांचीं पत्रें आलीं. तोंडावर जखम आहे. श्रीत्रिंबकेश्वरास येऊन डोईचे केश काढावे (असा त्यांचा बेत आहे.) समागमें गोसावी दोन हजार व धोंडाजी पवार दोन हजार व भिल्ल कोळी दोन हजार (आहेत.) देशेची[2] बोली बोलत नव्हते ते ही बोलूं लागले. सौभाग्यवती पार्वतीबाईस वेदमूर्ती भास्करभट्ट वोझे व शिवराम दीक्षित लेले

१ हें गोविंद हरीचें त्रिंबक हरीस पत्र. २ मराठी.

यांचीं पत्रें आलीं कीं, ' श्रीमंत भाऊसाहेब खरे. आम्हीं समागमें आहों. सत्वरच येतों. ' ह्मणोन लिहिलें आहे. श्रीमंत दादासाहेब याणीं शिंदे यांची फौज व महादाजी गोविंद काकडे यास रवाना केलें. ' तीन हजार फौज घेऊन [जावें आणि] श्रीमंत भाऊसाहेब खरे असिले तर घेऊन यावें, लटके असिले तर पारपत्य करावें, ' ह्मणोन लिहिलें आहे. गेले न गेले सत्यमिथ्या न कळे. नरसिंगपुराहून श्रीमंत दादासाहेबांचें कूच जाहलियाचें वर्तमान आलें नाहीं. श्रीमंत भाऊ खरेसें वाटत नाहीं. तैहकीक आपला वोळख्या कोणी येईल तेव्हां खरें ! चिरंजीव दाजीची तिडीक राहिली कीं नाहीं तें लिहिणें. बहुत काय लिहिणें हे विनंती. रवाना तीन तास दिवस आल्यावर पत्र केलें आहे. हे विनंती.

नं० ४०२

(२६ जानेवारी)

श्री.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोविंदपंत नाना

स्वामीचे सेवेशीं—

पौष्य लिंगो आबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम पौष वद्य अष्टमी गुरुवार. मुक्काम शिंगणापूर नजीक श्री[3] जाणून

---

१ खरें. २ पत्र गोविंद हरीस लिहिलेलें आहे. लिहिणारा कोण हें ठाऊक नाहीं. ३ श्रीशंभु महादेव. हें देवस्थान जिल्हा सातारा तालुका माण येथें दहिवडीच्या ईशान्येस तेरा मैलांवर एका उंच डोंगरावर आहे. महादेवाच्या डोंगरांची ओळ प्रसिद्ध आहे तीस याच देवाचें नांव पडलेलें आहे. शंभुमहादेव हा शिवाजी महाराजांचा कुलस्वामी असून त्यानींच हें त्याचें देवालय बांधिलेलें आहे. त्यांचे वडील शहाजी राजे, पुत्र संभाजी महाराज व कोल्हापुरकर शिवाजी महाराज यांच्या समाधि या ठिकाणीं बांधिलेल्या आहेत. पैकीं दुसरी ह्मणजे संभाजी महाराजांची त्यांचे पुत्र शाहुमहाराज यानीं बांधिली आहे. अहिल्याबाई होळकरणीनें येथें एक फार उत्तम विहिर

स्वकीय लेखनीं आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपणाकडून पत्राभावीं वर्तमान कळत नाहीं. तरी निरंतर पत्रीं सांभाळीत असावें. या नंतर राजकी वर्तमान—श्रीमंत राजश्री दादासाहेब शिंन्नरावरी[1] गेले. समागमें तत्संबंधी[2] गेले. त्यां पैकीं राजश्री कृष्णराव बल्लाळ[3] व राजश्री बापू[4] मात्र इकडे आले. राजश्री आबा पुरंधरे होळमरूमच्या मुक्कामीं श्रीमंत राजश्री राव प्रधानांची आज्ञा घेऊन त्रिंबकाकडे जावें या अर्थें गेले. तेथें सरदारांपैकीं राजश्री विठ्ठलराव[5] आले. मागाहून त्यांचे चिरंजीव[6] फौज घेऊन एका दो दिवसांत येतील. राजश्री नारो शंकर ही समीप आले आहेत. राजश्री मल्हारबा चांदवडीं आहेत. शिंदे[7] चांभारगोंदीं आहेत. राजश्री विसाजीपंत बिनी समजावीस न होतां लग्नास निरोप घेऊन गेले. रास्ते यांची समजावीस नाहीं. समागमें राजश्री अंतोबा[8], लक्ष्मणराव, व गणेशपंत आहेत. उत्तरेकडील वर्तमान हा कालवर तथ्यांत नाहीं. परस्परें लोकांचीं

यात्रेकरूंच्या सोई साठीं बांधविली आहे. येथें चैत्री पौर्णिमेच्या जत्रेस आसपासच्या प्रांतांतून सुमारें पन्नास हजार लोक जमतात. शंभुमहादेवा पासून ईशान्येस दहा मैलांवर शिंगणापुर आहे. हें खेडें घाटग्यांचे कुळांतील कोणी पुरुषानें शहाजी राजे भोंसले यांस इनाम दिलें होतें.

१ नाशिकाकडे जाण्याच्या बेतानें रावसाहेबांचें लष्कर सोडून दादासाहेब गेले ते तूर्त शिन्नरास राहिले होते. २ तत्पक्षीय मुत्सद्दी रायरीकर वगैरे. ३ कृष्णराव बल्लाळ काळे बारामतीकर. ४ सखारामबापू. ५ विंचूरकर. ६ मल्हारराव विंचूरकर. ७ महादजी व केदारजी. ८ हे तिघे ही रास्ते बंधु पेशव्यांचे मामा होत. अंतोबा व आनंदराव एकच. पूर्वींच्या वाक्यांत बिनीवाल्यांची समजावीस झाली नसल्याचें लिहिलें आहे, पण या स्वारींत बिनीवाले फौजेसुद्धां शेवट पर्यंत हजर होते. बिनीवाल्यांची व रास्त्यांची समजावीस न झाल्याचें या पत्रांत लिहिलें आहे त्याचा अर्थ ते सरदार रुसले असून पेशव्यांस त्यांची समजूत करावयाची होती असा नव्हे! त्यांची समजावीस ह्मणजे त्यांनीं आपापल्या फौजेस नालबंदी देऊन स्वारी करितां ती जमविणें असा होय. रास्त्यांची समजावीस ह्मणजे त्यांच्या फौजेची समजावीस.
९ तोतया भाऊसाहेबाचें.

लिहिणें येतात. परंतु शोध कारितां जीव नाहीं. लष्कर मजल दर मजल कृष्णातीरास मिरजेवरून अगर गलगलेचे रोखें येणार. आणि माणेच्या तीरीं दहा पंधरा मुक्काम होणार. यांत काय घडतें पहावें. मध्येंच पत्रें कारकून आपणाकडून आलिया मार्गीं परभारें [गांठ] पडेल. आणि राजश्री रावच आले तरी गुंता उरकला. प्रसंगास आलिया आमचे संस्थानाचा बचाव होतो. सध्यां बोलणेंची निकड लाविली आहे. ये विशीं राजश्री रायास लिहून कळविणार वडील असा. बहुत काय लिहिणें. कृपा करावी हे विनंती.

नं० ४०३[1]

(माघ वद्य अष्टमी ९ फेब्रुवारी
श० १६८४ इ.स. १७६३)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे शेवेसीं

आपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० २१ रज्जब मु॥ येडूरमांजरी कृष्णातीर येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों विशेष. वडिलांकडून पत्र आलें तें पावलें, समाधान झालें. असें सदैव पत्र पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर कर्नाटक प्रांतीं जावयाचा विचार तर निश्चयांत आला नाहीं. एका दो रोजीं निश्चय झाल्या नंतर शेवेसीं लिहून पाठवीन. हैदरनाईक येऊन बिदनूर घेतलें. खणत्याही लाविल्या आहेत असें वर्तमान आलें आहे. मोंगल ही गदवालास जाणार असें बातमींत

---

१ गोपाळराव. २ हें पेशव्यांचें गोपिकाबाइस पत्र. हें ५ फेब्रवारी १७६३ या दिवशीं लिहिलेलें ह्मणजे प्रस्तुत प्रकरणांतील हकिगत घडून येण्या पूर्वीं एक वर्ष लिहिलेलें असून या ठिकाणीं हें चुकून लागलें आहे.

लिहिलें आहे. पुढें कोणीकडे जाईल तें पहावें. मागाहून सविस्तर लिहून पाठवूं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० २६ रज्जब.

नं० ४०४L

(माघ वद्य अष्टमी, १६ फेब्रुवारी
श० १६८३ इ. स. १७६२)

श्री

वडिलांचे शेवेसीं. विज्ञापना तागायत छ० २१ रज्जब मुक्काम वडगांव येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों विशेष. इकडील वर्तमान तरी चार लाख रुपये जिजाबाईकडून व अवांतर चिकोडी वगैरे तीन लाख या प्रमाणें घेतले. उदइक कूच आहे. बाईची भेट उद्यां घ्यावी असें आहे. त्या नंतर मनोळी पावेतों दर कूच जावें असें आहे. मनोळी बाईच्या हवालीं करावी असें आहे. राजा[2] खोटा हें त्यांच्याच मुखें जहालें व त्याचीं आईबापें धरून आणिलीं आहेत. गोपाळराव यास पाठविणार होतों[3]. त्यास आतां असें ठरलें कीं, किल्ला त्याचे हवालीं करूं नये. शिहेब पाहून रुपये द्यावे. असें झाल्यावर गोपाळराव ह्मणाले कीं, माझ्या हवालीं किल्ला न केला तर माझे रुपये[4] जे आहेत ते भरून द्यावे, असें बोलून डेऱ्यास गेले. परवांच्या दिवशीं त्यास चिट्टी पाठविली कीं, तीन दिवस मुक्काम करितों, मग मातुश्री बाईची भेटी घेऊं. मग जिकडे

---

१ हें ही पत्र प्रस्तुत प्रकरणांतील गोष्टी घडून येण्यापूर्वी दोन वर्षें लिहिलेलें असून या ठिकाणीं चुकून लागलें आहे. चालू प्रकरणाशीं त्याचा कांहीं एक संबंध नाहीं. पत्र गोपिकाबाईस पेशव्यानीं लिहिलेलें आहे. २ कोणचा राजा ? कोल्हापुरकर जिजाबाईनें दत्तक मुलगा नुकताच घेतला होता तो ? तो खोटा झाला ह्मणजे त्याचें दत्तविधान खोटें असा अर्थ कीं काय ? ३ मनोळी ताब्यांत घेण्या करितां. ४ मनोळीकर शिंद्यानीं पटवर्धनांचें कर्ज देणें होतें.

जाणें तिकडे जाऊं. यास गंगाधरपंत याचा[1] आहे त्याला बलावलें आहे त्यास हें वर्तमान गोपाळरायासीं[2] पुसून मग तीर्थरूप राजश्री दादासाहेबां-च्या कानावर घालीन ह्मणून सांगितलें आहे, शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० २४ रजब.

नं० ४०५

[पौष वद्य सप्तमी
२५ जानेवारी.]

श्री.

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री धोंडोराम
गोसावी यांसी.

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सु॥ आर्बासितैन मया व अल्लफ. खासा स्वारी दर मजल कर्नाटकास चालली. नवाब निजामअ-ल्लीखान यांजकडील बातमी तीर्थरूपांकडे[3] लिहीतच असाल. इकडे ही बातमी कळली पाहिजे, याज करितां बारीक मोठें वर्तमान सविस्तर वरच्या-वर लिहीत जाणें. जाणिजे. छ० २१ रजब आज्ञा प्रमाण. [लेखनसीमा]

नं० ४०६

[पौष वद्य दशमी
२८ जानेवारी.

श्री.

सेवेशीं बैचाजी[4] विश्वनाथ मुक्काम जंजिरे विजयदुर्ग. साष्टांग नम-

१ त्याचा कारकून. २ हा मोंगलाच्या दरबारीं नित्य राहणारा पेशव्यांचा वकील. ३ नाशिकास दादासाहेबांकडे. ४ हा विजयदुर्गचा सुभेदार. यानें हें पत्र कोणास लिहिलें आहे कळत नाहीं.

स्कार विनंती. येथील कुशल तागायत छ० २४ रजब पावेतों जाणोन स्वकीय कुशल लिहीत असावें. विशेष. हैदरअल्ली यानें सर्व प्रकारें आगळीक करून बिदनूर, सोंधें आदी करून आक्रमून पुढें सावंताचे सरदेस[1] आल्याची दाट बातमी येते. हा तालुका सावंताचे सरदेस लागला आहे. हैदरअल्लीचा नेट केवळ सावंताच्यानें साहवेलसा दिसत नाहीं. सोंधेकर तीनशें लोकांनिशीं फिरंगी याचे पदरीं पडले. फिरंगी याचा मनसबा काय आहे हें कळत नाहीं. यास्तव सावंत, फिरंगी, सोंधेकर, आदी करून सर्वांस येथून पत्रें लिहिलीं आहेत. जाब आल्यावर त्यांचा भावगर्भ कळेल. सारांश सावंताचें सरदेस येथून तीस चाळीस कोसांवर हैदरनाइकाच्या फौजा आल्या. तेव्हां याचा बंदोबस्त तरतूद अगोदर तूर्तच जाहली पाहिजे. खावंदांस[2] लिहिलें आहे. तेथून तरतूद लवकर होणार नाहीं. आपण या समयीं फौज सुद्धां समीप आहेत. या रानांत थोड्याच साहित्यानें काम होईल असा मजकूर आहे. आपण खासा फौज सुद्धां वाडीचे रोखें यावयाचें करून सावंत [व] फिरंगी यांस जें लिहिणें तें लिहून खामखा[3] गनीमास नतिजा[4] पोहोंचवावयाचा समय हाच दिसतो. अनायासें अशा बिकट रानांत आला. या समयीं सावंत (व) फिरंगी मना पासोन कळोन जें करूं ह्मणतील तें करितील. आम्हांस मात्र विश्वास पुरत नाहीं. कालानुरूप काय बुद्धि धरितील तें न कळे ! यास्तव हें पत्र आपणास लिहिलें आहे. सेवेशीं श्रीमंत यजमान स्वामीस आपण जें लिहावयाचें तें लिहावें. सैलावत[5] यश सर्वोत्कर्ष भगवंतें आपले ठायीं ठेविलें आहे. हें यश विनां[6] दुसरी फौज आपल्याच हातें ईश्वरें निर्मिलेंसें दिसतें. तदनुसार सर्व योग घडोन आले आहेत. याचा विचार करून आम्हीं काय तरतूद करावी, आपण कोणे रोखें येणार, काय प्रकार तो साकल्य लिहून पाठ-

१ सरहद्दीस. २ पेशव्यांस. ३ हटकून. ४ पराभव. ५ दरारा. ६ दुसरी फौज कुमकेस घेतल्या शिवाय.

वावें. बहुत काय लिहावें. कृपा वर्धमान कीजे. हे विनंति.

नं० ४०७

(अजमासें पौष वद्य
जानेवारीचा दु० पंधरवडा)

शिवाजी बाबाजीचें[1] गोविंद हरीस पत्रः—

" आम्हीं काल रामतीर्थावरून या लष्करास[2] आलों. हें लष्कर काल कूच करून नाझर्‍यांपासून[3] बारा कोसांची मजल करून आलें. पुढें मनसबा चिकोडीवरून ऐनापुरास जावेंसा सिद्धांत (झाला आहे.) आह्मीं येतांच भेटी घेतली. ऐनापुराकडे गेल्यानें आमचा तालुका अगदीं लुटला जातो, ह्मणोन बहुता प्रकारें सांगितलें, व रामतीर्थाकडे जावें म्हणजे विजापुराकडे शह बसेल व चिकोडीकडे फौज पाठवावयास येईल, ह्मणोन सांगितले वरून " रावसाहेबांस बोलावूं पाठवावें, ते आले ह्मणजे मनसबा करूं. " ह्मणोन बोलोन[4] पत्र सांडणी स्वांरा समागमें सरकारचें [पत्र पाठविलें व] आमचें मागितलें. पत्रें पाठविलीं आहेत. उत्तरें येईत पर्यंत येथेंच मुक्काम करावासा सिद्धांत केला आहे. [श्रीमंतांबरोबर] फौज पांच हजार आहे. चिकोडी, हुकेरी, कागल, व मनोळी घेऊन रा० शेषो नारायण यांस द्यावी, आणि पांच लक्ष रुपये सरकारांत त्यानीं द्यावेसा करार ठरला आहे. रास्ते यांस जत वगैरे विजापूर प्रांतीं परगणे व जालनापूर व खानदेशांत लक्ष रुपयेची जहागीर दिली. अबजुलपूर, होर्ती वगैरे शहाजी भापकर याजकडे परगणे दिले. रा० बाबूजी नाईक घरपा-

१ हा पटवर्धनांचा कारकून पुढें त्यांच्याच तर्फे पेशव्यांच्या दरबारीं वकील होता. २ पेशव्यांच्या लष्करास. ३ नाझरें हा गांव सोलापुर जिल्ह्यांत सांगोल्या पासून नैऋत्येस दहा मैलांवर आहे. ४ गोपाळरावास. ५ हें बोलणें खुद्द पेशव्यांचें किंवा कदाचित् सखारामबापूचें.

गानिशीं येणार. रा० नारो शंकर चांभारगोंद्यास[1] आले आहेत. ते ही येणार. नीलकंठ महादेवें[2] याची फौज हरी गोपाळ घेऊन येणार. रा० महादजी शिंदे येणार. विठ्ठल शिवदेव येथें आहेत. ”

नं० ४०८L

[माघ शुद्ध सप्तमी
९ फेब्रुवारी]

श्री

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें[3] चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० ६ साबान. मुक्काम नजीक जत येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलीं आशीर्वादपत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. इकडील वर्तमान तर हैदरनाईक बिदनुरीं आहे. मीरफैजुल्ला सोंधें घेऊन गोवें प्रांतीं गेला आहे. प्रस्तुत त्याची बातमी आली नाहीं. यास्तव बातमीस माणसें पाठविलीं आहेत. सत्वरच बातमी येईल. आपले फौजेचें वर्तमान तर, प्रस्तुत विठ्ठलपंत व सखारामपंत व धोंडो दत्तात्रय यांच्या फौजा निम्मे निम्मे जमा झाल्या आहेत. सत्वरच वरकड ही जमा होतील. मुरारराव व सावनूरकर सत्वरच येऊन सामील होणार. वरकड राजकारणें ही पुढें गेल्या नंतर सर्व अनुकूल व्हावींशीं वाटतात. वरकड सर्व प्रकार पूर्वी लिहून सेवेशीं पाठविला आहे, त्यावरून विदित होईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ दक्षिणेंत शिंद्यांचें राहण्याचें ठिकाण श्रीगोंदें उर्फ चांभार गोंदें. नारो शंकर याजकडे तूर्त शिंद्यांच्या सरदारीचा कारभार होता सबब तो चांभारगोंद्यांस आला होता. केदारजी व महादजी शिंदे हल्लीं तेथेंच होते. २ आबा पुरंदरे. ३ पत्र पेशव्यांचें गोपिकाबाईस.

वडिलीं तीर्थस्वरूपांस[1] पत्र लिहावयास आज्ञा केली, त्यास आज्ञे प्रमाणें लिहीत जाईन. हे विज्ञापना.

पै॥ छ० ११ साबान.

नं० ४०९L

(माघ वद्य चतुर्थी
२१ फेब्रुवारी

श्री

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचें सेवेशीं

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० १८ साबान. मुक्काम कृष्णातीर नजीक ऐनापूर येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलांकडून बहुत दिवस आशीर्वादपत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सदैव आशीर्वादपत्र पाठविण्यास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर विजापूर घेऊन कृष्णातीरास चिकोडीच्या सुमारें आलों. चिकोडी घेऊन राणीस द्यावयाची आहे. तें ही ठाणें सत्वर घेऊन देऊं. वरकड पुढील कर्तव्याचा प्रकार निश्चयांत येईल तें सेवेशीं लिहीन. वरकड वर्तमान सविस्तर पूर्वी सेवेशीं लिहिलें आहे. त्यावरून कळलें असेल. ती० रा० दादासाहेबांकडील वर्तमान लिहावयास आज्ञा करावी. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

पै॥ छ० ३ रमजान.

नं० ४१०

[अजमासें माघ शुद्ध
फेब्रुवारीचा प० पंधरवडा]

नारो शंकर याचें गोपाळरावास पत्र[2]:—

---

१ नाशिकास दादासाहेबांकडे. २ पत्र पेशव्यांचें गोपिकाबाईस.

" आम्हीं जुन्नरचे मुक्कामाहून श्रीमंत राजश्री दादासाहेबांची आज्ञा घेऊन दर मजल फौज सुद्धां श्रीमंत राजश्री रावसाहेबांपाशीं चाकरीस येऊन हजर झालों. विजापूरचे मुक्कामीं भेट जाहली. बहुत कृपा करतात. फौजेचें सामान सरंजाम पाहून खुषी झाले. "

नं० ४११[1]

(माघ वद्य चतुर्दशी
१ मार्च.)

श्री.

तीर्थरूप मातोश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० २७ साबान मुक्काम येडूर[2] मांजरी येथें वडिलांचे आशीर्वादें सुखरूप असों. विशेष. वडिलांकडून आशीर्वाद पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सदैव आशीर्वादपत्र पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर हैदरनाईक बसवापट्टणास होता तो कूच करून सावनूरचे सुमारें कूच करून अलीकडे येणार ह्मणून बातमी आली आहे. तहकीक वर्तमान आल्यावर सेवेशीं लिहीन. मीरफैजुल्ला सोंधेकरांचा किल्ला घांटा खालीं आहे त्यास मोर्चे लावून बसला आहे खोलगडास. किल्ल्याचे कुमकेस गोवेंकर येऊन सामील किल्लेकऱ्यांस झाले. त्यांशीं व मीरफैजुल्लाशीं झूज झालें. मीरफैजुल्लास त्यांणीं शिकस्त[3] दिल्ही. किल्ल्यास मोर्चे देऊन बसला आहे. परंतु किल्ल्यास जरब पोंचत

---

१ पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. २ येडूर हा गांव चिकोडीच्या ईशान्येस १२ मैलांवर कृष्णातीरीं आहे. हें वीरभद्राचें प्रसिद्ध देवस्थान आहे व त्या देवास गांव इनाम दिलेला आहे. शिवरात्रीस येथें फार मोठी जत्रा भरते. कृष्णातीर, देवस्थान व भोंवतालच्या रम्य आंबराया या तीन कारणांमुळें पूर्वीं पासून ही लष्करें उतरण्याची जागा आहे. ३ पराभव केला.

नाहीं. हैदरनाइकाकडे भेद करून किल्ल्यांत गोवेकर गेले. यास्तव मीर फैजुल्ला नरम होऊन आहे. पहावें पुढें काय विचार करितो! मिरेखान गुत्ती प्रांतें आहे. त्याशीं व मुराररायाशीं लढाई होत आहे. कळावें. हैदर नाईक याची फौज व पायींचे लोक, देखील सरदारांचे, तीस हजार प्यादा व गाडदी मिळोन फौजें अट्ठावन हजार. तोफा लढाईचे कामाच्या तीस चाळीस पर्यंत आहेत. आपली फौज सतरा पर्यंत आहे. आबांचें ही पथक आलें. कळावें. वरचेवर लोक येतच आहेत. पुढें मनोळीस सत्वरच जात आहों. मनोळीचें काम झाल्यावर हैदरनाइकाकडे जावें असें आहे. परंतु पुढें गेल्या नंतर त्याचा मनसब्याचा डौल पाहून त्या सारखें निश्चय ठरे त्या प्रमाणें करून सेवेशीं लिहीन. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० ४१२

(२७ फेब्रुवारी)

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोविंदपंत नाना स्वामीचे सेवेशीं: पोष्य नारो शंकर साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागायत माघ व॥ एकादशी. मुक्काम कृष्णातीर. जाणोन स्वकीय लेखन करीत असलें पाहिजे. या नंतरी (आपण) कृपाकरून पत्र पाठविलें तें पावलें. दर्शनातुल्य लाभ जाहला. नाना! तुम्हीं जे ममता आमचे ठाईं केली त्याचें विस्मरण होत नाहीं. थोरांची रीत अशीच आहे. या उपरी आम्हीं लष्करांत आलियावरी राजश्री रावसाहेब विजापूरचे कार्यामुळें (?) स्वारीस

---

१ हैदराच्या फौजेंत फितूर करून. २ हैदराचा मेहुणा मीररेझा. ३ घोरपडे मुरारराव. ४ म्हणजे तीस हजार पायदळ व अठ्ठावीस हजार स्वार. ५ अर्थात् सत्रा हजार. ६ आबा पुरंदऱ्याचें. ७ गोविंद हरीस नारो शंकराचें पत्र. ८ गोपाळराव पटवर्धन.

वर्गणीची पोंच.

सन १८९८।९९

(ता. २२ नोवेंबर पासून २२ दिसेंबर पर्यंत.)

मागील व चालू वर्षाची.

	रु०
रा. रा. केशव बळवंत बिदवाई. देवास	६
रा. सा. वासुदेव गणेश कडुसकर. सबजज्ज सटाणें.	६
रा. रा. महादेव राजाराम बोडस. एम्. ए. एल्. एल्. बी. मुंबई.	६
" " सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. शहापुर जि० बेळगांव.	४८१२

चालू वर्षाची.

न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे. मुंबई.	३
रा. सा. नानासाहेब शिंदे. बडोदें.	३
रा. रा. शंकरराव वकील. सौंदत्ती.	३
" " मल्हार खंडेराव चिटणीस. बी. ए. एल्. एल्. बी. उमरावती.	३
" " गोविंद बळवंत. भावनगर.	३
" " रामचंद्रराव देसाई. कुंदगोळ.	३
रा. सा. नारायण गणेश नाडगीर. संपगांव.	३
" " व्यंकटराव गणेश कौलगुडकर. खानापुर.	३
रा. ब. नारायण चिंतामण सोमण. बेळगांव.	३
रा. रा. लक्ष्मण विनायक. कलकत्ता.	३
" " गणेश दौलत गडकरी सुरजी अंजनगांव.	३
" " सेक्रेटरी. व्हिक्टोरिया लायब्ररी. जामखेड.	३
रा. सा. नीलकंठ विनायक छत्रे. बी. ए. एल्. सी. ई. अलिबाग.	३
रा. रा. नारायण रामचंद्र वरदे. पुणें.	३
" " नाना नारायण भोर. वकील. "	३

ऐ. ले. संग्रह कर्ते.

ऐतिहासिक-लेख-संग्रह.

हें डेमी अष्टपत्री सांचाच्या चाळीस पृष्ठांचें मासिक पुस्तक दर म-हिन्यास मिरज येथें नियमानें प्रसिद्ध होत असतें. यांत पटवर्धन जहागीरदा-रांच्या जुन्या चिटणिशी दप्तरांतील ऐतिहासिक महत्वाचीं व प्रत्येक स्वारीतील भरपूर माहितीचीं पत्रें सालवारीच्या क्रमानें छापून प्रसिद्ध होत असतात. शिवाय अन्यत्र उपलब्ध झालेले कागदपत्र व बखरी वगैरेंचा ही यांत स-मावेश होत असतो. या मासिक पुस्तकाची आगाऊ किंमत सालिना ट० हा० सुद्धां तीन रुपये आहे. ग्राहकांनीं सालिना वर्गणीच्या किंमतीचें व्हा० पे० मागवावें अथवा तितक्या रकमेची मनीआर्डर पाठवावी. त्या शिवाय पुस्तक सुरू केलें जाणार नाहीं.

ऐ०ले०संग्रह कर्ते.

आमचे पुणें व मुंबई येथील एजंट.

रा.रा. मुरलीधर मल्हार अत्रे, महाराष्ट्र बुकडेपोचे म्यानेजर, बुधवार पेठ पुणें. रा.रा. विष्णु दासो बनहट्टी. कमिशन एजन्ट आणि जनरल मर्चंट. गिरगांव ट्रामवे टरमिनस् पेंडसे यांची नवी चाळ, मुंबई.

सदरहू दोन असामींस आम्हीं ऐ०ले०संग्रहाचे एजंट नेमिलें आहे. त्यांजकडे तेथील वर्गणीदारानीं वर्गणी द्यावी. आमचीं सर्व पुस्तकें एजंटां-कडे विकत मिळतील.

ऐ०ले० संग्रह-कर्ते.

ऐतिहासिक-लेख-संग्रह.

मासिक पुस्तक.

फेब्रुवारी. १८९९ इ०.

अंक २१

वासुदेव वामन शास्त्री खरे
मिरज हायस्कुलांतील संस्कृत शिक्षक.

यांनीं

कुरुंदवाड येथें

" भाऊनाना " छापखान्यांत छापविलें.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हांशीलसह तीन रुपये.

फुटकळ अंकास पांच आणे.

ऐतिहासिक-लेख-संग्रह.

अंक एकविसावा

सूचना

गेले. त्याजकारितां भेट न जाहली. भेटीचा हेत फार असे. प्रस्तुत त्यांज-कडे श्रीमंतांचीं पत्रें गेलीं आहेत. लौकरीच येतील. भेटी जाहालियावरी आलेविशीं लिहूं. आम्हीं आंवदा कुटुंब समागमें आणिलें आहे. येथूनच वाटेस लावावें किंवा समागमें ठेवावें ये विषयीं सल्ला जरूर लिहावी. आम्हास वडील आपण आहेत. वरकड राजकी वर्तमान परस्परें कळतच असेल. हैदरनाइकावरी जावें ऐसा विचार आहे. परंतु फौजा माघाऱ्या[1] फारच राहिल्या, आणि दिवस थोडे, याजकारितां जलद जाणार. आपणांस कळावें. आपल्या कडील कुशलार्थ सदैव लिहीत असावा. बहुत काय लिहिणें लोभ करीत असावा. हे विनंती.

सौभाग्यादि संपन्न वज्रचूडेमंडित मातोश्री ताईस नमस्कार. लोभ करीत जाणें. तुमची[2] जोड केली आहे. विस्मृति न करावी. बहुत काय लिहिणें. हे विनंती.

नं० ४१३L

(फाल्गुन शुद्ध त्रयोदशी)

श्री.

राजश्री रामचंद्र नारायण गोरे गोसावी यांसीं.

सुहुसन[3] आर्बासितैन मय्या व अल्लफ. तुम्हांकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तर वर्तमान लिहून पाठविणें. ती०रा०दादासाहेब प्रस्तुत कोठें आहेत, कशी मर्जी आहे, बोलण्यांत काय भाव आहे, इकडील वर्तमानें तिकडे काय येतात, हें लिहिणें. मामा[4] व गोविंद शिवराम (व) आबा[5] प्रस्तुत वडिलांजवळ[6] आहेत, त्यास काय

---

१ मागें. २ तुमच्या ममतेचा लाभ संपादिला आहे. ३ पत्र पेशव्यांचें रामचंद्र नारायण यास. सदरहू मनुष्य गोपिकाबाईच्या विश्वासांतील कारकून होता. ४ त्रिंबकराव मामा. ५ आबा पुरंदरे. ६ दादासाहेबांजवळ.

काय घाटीत आहेत हें सविस्तर वर्तमान हमेषा लिहून पाठवीत जाणें. तीर्थरूप मातोश्री बाईसीं य वडिलांशीं बोलण्याचा प्रकार काय जाहला हें लिहिणें. इकडील वर्तमान मातोश्रींच्या पत्रीं पूर्वीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. जाणिजे. छ० १२ रमजान.

पै॥ छ० १ सवाल.

नं० ४१६

(अजमासें फाल्गुन वद्य
मार्चाचा दु०पंधरवडा)

शिवाजी बाबाजी व गंगाधर आपाजी यांचें गोविंद हरीस पत्रः—

" वंटमुरी घेतली. तेथून घोडगिरीस आले. घोडगिरीहून कूच करून इंदुवारीं पाच्छापुरचे बारीनें होंगल ह्मणून गांव पाच्छापुरचा होता तेथें ओढ्यावरी राहिले. भौमवारीं तेथेंच मुक्काम केला. मनोळीकरांचा गांव होता, त्यास तोफा लाविल्या. गांव लुटला. बुधवारीं कूच करून सुरगोड येथें आले. मनोळीस जावें हा आग्रह फार. आज कूच करून मनोळीस जाणार. मनोळी घेऊन दिली म्हणजे शेषो नारायण याणीं दोन लाख रुपये द्यावेसा करार आहे. मनोळी घेतल्यावर दोन लाखांची वरात करणार. मनोळी घेतली म्हणजे धारवाडाकडे जाणार. त्यास ' मनसबा करणें तो गोपाळराव व विठ्ठल शिवदेव आले म्हणजे त्यांचें[१] विचारें करूं. ' असें म्हणतात. विठ्ठलराव याणीं कागल व कोगनोळी वगैरे तिकडील ठाणीं घेतलीं. ते ही दोन दिवसांत येणार. रावसाहेबांचें पत्र आलमेल्यावरून भीमा दक्षिणतीराहून छ० ४ रमजानचीं आलीं. " या उपरी इकडे न गुंततां गलगल्यावरून येतों. विजापूर उजवें घालून येतों. आलमेलें व बा-

१ गोपाळरावास.

गेवाडी शहनें आलीं तर घेतों. जेव्हांमेस पंधरा दिवस पाणी घ्यावयास लागतील." म्हणोन पत्रें पाठविलीं तीं परवां येथें आलीं. ते ही आज उद्यां गलगल्यास आले असतील. यांचा मनसबा आहे जे, 'धारवाड घ्यावें. वरकड तालुका घ्यावा. बंकापूर, व श्रीमंतगड राहील तर राहो. त्याशीं सलोखा करून आमचा तालुका घेतला आहे, तो बंकापुर वगैरे सुद्धां द्यावा. बिदनूर व सोंधें साल मजकुरीं त्याजकडेच राखावें. पंचवीस तीस, चाळीस लाख रुपये दिले तरी घ्यावे. पक्का तह करावा. पुढें दसरा झाल्यावरी फिरोन यावें. त्यास जरब बसोन येणें प्रमाणें न झालें तरी छावणी करावी लागेल. छावणी न केली तरी आम्हीं जातांच मागाहून ठाणीं घेत येईल.' असें तोंडानें म्हणतात. फौजेचा तपशील सांगतात कीं, तमाम सरंजामी आहेत. पैसा द्यावा लागत नाहीं. हुजरात पंधरा हजार. त्या पैकीं सरंजामी चार हजार. अकरा हजार नालबंदीचे. त्या पैकीं सहा हजारांची नालबंदी दिली आहे. पांच हजारांची द्यावी. त्यास मनोळीच्या ऐवजीं व चिकोडीच्या ऐवजीं शेषो नारायण याजकडे (वराता) देणार. कांहीं पुण्यास देणार. रोजमऱ्याचा (व) हुजरातीचा खर्च व उचापतीचा वगैरे आहे त्यास छावणीस राहिल्यास मिळेल असें म्हणतात. शेवटास जाईल तें खरें! परंतु पाहतां विचार हरएक तऱ्हेनें सल्ला झाल्या शिवाय देशास जाणार नाहींतसें वाटतें. तह जाहला तरी फौज दहा पंधरा हजार तुंगभद्रे अलीकडे ठेवावीसें आहे. मनसबे करितात. घडेल तें खरें. मीर फैजुल्ला घांटा खालून खोलैगडचे मोर्चे उठवून आला. कांहीं तोफा फिरंग्यानीं व सोंधेंकरानीं घेतल्या ह्मणून वर्तमान लिहिलें आलें आहे. मीरफै-

---

१ नुसता शह देऊन. [वेढ्याचे भरीस न पडतां.] २ गोपाळरावास या वेळीं जी मुलुखगिरी सांगितलेली होती तींत विजापुर प्रांतीं हलसंगीच्या ठाण्यावर हल्ला करीत असतां त्यास गोळीची जबर जखम लागली होती. ३ श्रीमंतांचा. ४ पेशवे व सखारामबापू यांचा असा हेतु आहे. ५ खोलगड कारवार जिल्ह्यांत आहे.

जुल्ला सोंध्यास आला. धारवाडास येणार. खासा बिदनुरीं आहे. तो ही बंकापुरास येणार. परंतु फौज डावाडोल[1] झाली आहे. ह्मणोन वर्तमान आहे. बातमी सरकारांत एक दोन दिवसां आड येत असत्ये. कितूरचा जाबसाल रावसाहेब[2] आल्याशिवाय विल्हेस लावूं देत नाहींत. सोगल[3] एकोडी खालील देसक याणें ठाणें बळकाविलें होतें. त्याजवर फौज बापू सखाजी व राजश्री विसाजीपंत मामा गेले होते. तोफा गेल्या होत्या. त्यांणीं[4] ना मोहरम केलें. तोफा सांभाळून आणितां पुरेसें जाहलें. तेथें पाणी नाहीं यास्तव काल माघारे आले. आज फार फौज व तोफखाना तिकडे पुनः गेला आहे. ठाणें घेऊन आले म्हणजे उदईक मनोळीस जाणार. मिरजेच्या खेड्यापाड्यांचे खराबीविशीं लिहिलें, त्यास आम्हीं श्रीमंतांजवळ नित्य बोभाटा करितों. श्रीमंतांचे फौजेंत ताकीद होती. मागाहून येणार त्यांस ही पत्रें पाठविलींच होतीं. येणार त्यानीं धामधुम केली तरी श्रीमंत रागें भरत. वाटच परगण्यांतून पडली त्यास उपाय नाहींसा झाला. फौज सारी पंधरा हजार येथें आहे. आमचें पथक व विठ्ठल शिवदेव आले ह्मणजे व रास्ते, विसाजी कृष्ण व कवडे येणार, ते आले म्हणजे पंचवीस हजारांस जाजती होईल. कांहीं हुजरात यावयाची आहे. तीस हजार जमा होईल. सावनूरकर जमाव सुद्धां तयार आहे, तो ही येणार. राजश्री मुरारराव[5] घोरपडे चार हजार आहेत. ते ही (लष्कर) तुंगभद्रेवर गेल्यावर येणार. ”

१ घाबरलेली. २ गोपाळराव पटवर्धन. ३ एकोडी परगण्या पैकीं खेडें सोगल हें तेथील देसायानें बळकाविलें होतें. ४ सोगलकरानीं त्या दोघा सरदारांस पराजित केलें. ५ येथें व अन्यत्र पुष्कळ ठिकाणीं सैन्याचा निर्देश सरदाराच्या नावें केलेला आहे. ‘ घोरपडे चार हजार आहेत ’ ह्मणजे घोरपड्याची फौज चार हजार आहे.

नं० ४१९L

(फाल्गुन वद्य प्रतिपदा
१८ मार्च.)

श्री

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० १४ रमजान मुक्काम मैनोळी येथें वडिलांचें आशीर्वादें करून सुखरूप असो. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. इकडील वर्तमान — मनोळीस मोर्चे लाविले आहेत. सत्वरच वडिलांचे आशीर्वादें करून हस्तगत होऊन पुढें जाऊं. सर्व सरदार ही बहुत करून आले आहेत. हें कार्य झाल्यावर सत्वरच जात असों. हैदरनाईक बिदनुराहून निघाले. सत्वरच बंकापुरास येणार ह्मणून त्याचे लष्कराची बातमी आली आहे. मीरफैजुल्ला याणें खोलगडास मोर्चे देऊन बसला होता. त्यास हैदरनाइकानें (परत) बोलावून घेतला. (हैदराचे) सर्व सरदार एके ठिकाणीं जाहले आहेत. सर्व जमियत तीस हजार पायचें माणूस व दहा बारा हजार पर्यंत फौजें आहे. तोफा ही चाळीस स्वांरीच्या आहेत. मैदानांत येऊन लढाई द्यावी, हें

१ पत्र पेशव्यांचें गोपिकाबाईस. २ मनोळी हा प्राचीन वस्तीचा गांव बेळगांव जिल्ह्यांत सौंदत्तीच्या उत्तरेस सहा मैलांवर मलप्रभेच्या तीरीं आहे. दुसरा एक गांव याच नांवाचा आहे तो चिकोडी पासून दक्षिणेस बारा मैलांवर आहे. यालाच नागरमनोळी असें ही नांव आहे. ज्या चिकोडी व मनोळी या दोन तालुक्यां बद्दल पेशवे, कोल्हापुरकर, पटवर्धन, निपाणकर इत्यादी मध्यें पेशवाईंत भानगडी उपस्थित झाल्या होत्या ते शेजार शेजारचे हेच दोन गांव होत. प्रस्तुत पत्रांत आलेल्या या सौंदत्ती जवळच्या मनोळीचा त्यांशीं कांहीं संबंध नाहीं. ३ घोडेस्वार. पूर्वीच्या काळच्या लेखांत ‘ फौज ’ शब्द आला ह्मणजे नेहमी घोडेस्वारांची फौज असें समजावें. त्यावेळीं पायदळाचें इतकें प्रस्थ वाढलें नव्हतें व फौजेंत त्याची गणना होत नव्हती !

मानस त्याचे बोलण्यांत आहे. कर्तव्यांत येईल तें सेवेशीं लिहीन! आपली फौज ही सर्व सरदार देखील तीस पावेतों होईल. रास्ते आज उद्यां येतील. वरकड सरदार आले. जाधवरायास बोलाविलें आहे. ते ही सत्वर येणार. कळावें. वरकड वर्तमान मागाहून सेवेशीं लिहीन. तीर्थरूप राजश्री दादासाहेबांचे मर्जीचा प्रकार लिहावयास आज्ञा करावी. हे विज्ञापना.

पै॥ छ० ४ सवाल.

नं० ४१६L

[फाल्गुन वद्य पंचमी
२२ मार्च.]

श्री

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें[१] चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० १८ रमजान मुक्काम मनोळी येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. अलीकडे वडिलांकडून आशीर्वाद पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सदैव आशीर्वाद पत्र पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर मनोळीस मोर्चे लाविले आहेत. खंदकावर मोर्चे गेले. पुढें सत्वरच वडिलांचे आशीर्वादें काम होऊन येईल. हैदरनाईक प्रस्तुत बिदनुरीं आहे. मीरफैजुला यासही (त्यानें घांटाखालून) बोलावून आणिलें. सर्व सरदार एके जागीं जाहले. पुढें बंकापुरावर यावें असें त्याचे लष्करांत बोलणें आहे. फौज दहा बारा हजार व गाडदी व प्यादे मिळून तीस हजार. तोफा स्वारीच्या पन्नास पर्यंत [त्याजवळ] आहेत. कळावें. आपली फौज तीस पर्यंत देखील सरदारांची[२] आहे. वीस पर्यंत तोफा व गाडदी दीड हजार पर्यंत आहेत. हें काम[३]

१ पत्र पेशव्यांचें गोपिकाबाईस. २ सरदारांची फौज धरून. ३ मनोळी घेण्याचें.

झाल्यावर सत्वरच पुढें जाऊं. गोपाळराव (व) विठ्ठल शिवदेव ही ठाणीं ध्यावयाचीं होतीं तीं घेऊन आले. मुरारराव यांचीं पत्रें येतात कीं, सत्वर येतों. म्हणून लिहिलें आहे. ' मखदुमखान यास हैदरनाइकानें श्रीरंगपट्टणांत ठेवला होता. त्यास नंदराज दळवाई पहिला त्याणें मखदुमास मारून पट्टणचा बंदोबस्त केला,[1] ' म्हणून मुराररायानें लिहिलें आहे. कळावें. वरकड तिकडील वर्तमान सदैव लिहावयाशीं आज्ञा करावी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० ९ सवाल.

नं० ४१७

(फाल्गुन वद्य त्रयोदशीं
३० मार्च.)

श्री

राजश्री गोपाळराव गोविंद गोसावी यांसी.[2]

विनंति उपरी. नवी हुबळी[3] येथें हैदर नाइकाचें ठाणें आहे. त्यास

---

१ मुराररावानें पेशव्यांस कळविलेली ही बातमी पुढें खोटी ठरली. २ पत्र पेशव्यांचें गोपाळराव पटवर्धनास. ३ हुबळीचे भाग दोन आहेत. जुनी उर्फ रायर हुबळी व नवी हुबळी. हें शहर फार प्राचीन कालचें असून उत्तरकर्नाटकांत व्यापाराचें मुख्य स्थान ह्मणून आज कित्येक शतकें प्रसिद्ध आहे. औरंगजेब बादशहानें फत्तेमहंमद तारीन नांवाच्या सरदारास हुबळी व धारवाडाजवळचा थोडासा मुलूख इ० स० १६७७ त जहागीर दिला होता. इ० स० १७२७ त सावनूरचा नवाब अबदुल मजीदखान याच्या आश्रयानें व मदतीनें बसाप्पा कल्याण शेटी नांवाच्या सावकारानें नवी हुबळी वसविली. इ० स० १७५५ त सावनूरकरा पासून नानासाहेब पेशव्यानीं हुबळी घेतली. तेव्हां तेथील तारीन घराण्याची जहागीर ही अर्थात् खालसा झाली. तथापि तें ' बादशाही देणें ' पुढें तसेंच चालावें, ह्मणून पेशव्यानीं हुबळी शहर व किल्ला त्या जहागीरदाराकडेच ठेवून शिवाय त्याच्या निर्वाहा करितां सोळा गांव व दोन लहान

तुम्हीं ' ठाणें खालींकरून देणें ' म्हणोन सांगोन पाठविलें, त्या वरून त कौलास येऊन कौल मागतात म्हणोन लिहिलें; ऐशियास उत्तम आहे. त्यांस बाहेर काढून ठाणें तुम्हीं आपलें बसविणें. प्रातःकाळीं अलीकडील गढीवर हल्ला करून आंतील ठाणें मारून काढावें. आंत तुळजोपंते वगैरे आहेत ते रात्रीस पळोन जातील, या करितां जागां जागां चौक्या बसविल्या आहेत. तुम्हीं ही बंदोबस्त करून [ते] जाऊं न पावत तें करणें. चार घटका रात्रीस लोक तयार होऊन हत्ती शिड्या नेऊन निकडीनें हल्ला करून लौकर पारपत्य करावें. रवाना छ० २६ रमजान. हे विनंती.

नं० ४१८L

(चैत्र शुद्ध षष्ठी
७ एप्रिल.)

श्री

तीर्थरूप मातोश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

आपत्यें माधवरायानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० ९ सवाल मुक्काम नजिक धारवाड येथें

खेडीं तोडून दिलीं. ही जहागीर त्या घराण्याकडे १७७८ पर्यंत निर्बाधपणें चालली. त्या सालीं हैदरानें सारा धारवाड जिल्हा मराठ्यांपासून घेतला, तेव्हां ही छोटी जहागीर त्यानें खालसा केली. परंतु १७८७ त तुकोजी होळकरानें तेथून हैदराचा मुलगा टिपू याचा अंमल उठविला, तेव्हां तारीन घराण्याची जहागीर पुनः त्या घराण्यास प्राप्त झाली. पुढें पुढल्याच वर्षी टिपूनें पुनः अंमल बसवून त्यांचें उच्चाटन केलें. नंतर १७९० त परशुराम भाऊनें तुंगभद्रे अलीकडे टिपूचा जितका अंमल बसला होता. तितका सर्व उठवून हुबळींत त्या जहागिरदारांची पुनः स्थापना केली. ' हुबळी ' नांवाचे दुसरे दोन गांव आहेत त्यां पैकीं ' देवरहुबळी ' धारवाडा पासून सहा मैलांवर आहे व ' मुगुटखान हुबळी ' बेळगांवच्या आग्नेयीस अठरा मैलांवर आहे.

१ जुन्या हुबळीच्या. २ हैदराचा हा कमाविसदार. ३ पत्र पेशव्यांचें गोपिकाबाईस.

वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलांकडून आशीर्वादपत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सदैव आशीर्वादपत्र पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर मनोळी व चिकोडीचा गुंता उरकून मुक्काम मजकुरास आलों. कित्तूरचा गुंता खंडणीचा थोडासा राहिला आहे. हा सत्वरच उरकून तुंगभद्रातीरास जाऊं. सावनूरकर हीं भेटीस येणार. मुरारराव मुहूर्त करून निघाले आहेत. ते ही येणार. त्यांचीं ही पत्रें 'सत्वर येतों' ह्मणून येतात. प्रस्तुत हैदरनाईक बिदनुरीं आहे. मीरफैजुल्ला ही तेथेंच आहे. त्याचा जमाव सर्व मिळून दहा हजार फौज व पंचवीस हजार पायदळ आहे. तोफा ही पन्नास पावेतों आहेत. बाहेर निघावें हें मानस त्याच्या बोलण्यांत आहे. आम्हीं सत्वरच पुढें जात असों. श्रीरंगपट्टण नंदराज दळवाई यांणीं घेतलें. आपला बंदोबस्त केला. वडिलांस कळावें. वरकड वर्तमान होईल तें सेवेशीं लिहीन. आपले फौजेची याद अलाहिदा पाठविली आहे त्यावरून विदित होईल. सेवेशीं श्रुत होय हे. विज्ञापना.

पै॥ छ० २४ सवाल.

नं० ४१९L

(चैत्र शुद्ध त्रयोदशी
१४ एप्रिल.)

श्री.

तीर्थरूप मातोश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार. विज्ञापना. येथील क्षेम तारीख छ० १२ सवाल मुक्काम हुबळी येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें

१ झाडी सोडून मैदान मुलखांत. २ पत्र पेशव्यांचें गोपिकाबाईस.

पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. इकडील वर्तमान हुबळी व मिश्रिकोट वगैरे ठाणीं घेतलीं. इतक्या उपरी कूच करून सावनुरास जाऊं. सावनूरकर पठाणाची भेट २ । ३ दिवशीं होईल. वरकड राजकारणें ही बहुत येतात. परंतु निश्चयांत येईल तें सेवेशीं लिहीन. मुरारराव ही सत्वरच निघणार होते, व त्यांचीं ही पत्रें आलीं कीं निघून येतों, त्यास बहुत करून निघाले असतील. हैदरनाइकाचा मजकूर तर—[तो] बिदनुराहून निघाला. त्यास निघून सहा दिवस झाले. तो ही बंकापुरास येणार. मीर फैजुल्ला हनगलास[1] आला आहे. दोघे ही मिळून पुढें येणार अशी बातमी आहे. त्याची आमची तफावत २० । २५ कोसांची आहे. अद्याप झाडीचा आसरा धरूनच आहे. वडिलांस कळावें. हुबळीमध्यें लालखानाचा भाऊ हसनअल्लीखान सांपडला आहे. कळावें. लालखान हैदरअल्लीपाशीं कारभारांत[2] आहे. वरकड वर्तमान होईल तें सेवेशीं लिहीन. तिकडील वर्तमान बारीक मोठें लिहावयास आज्ञा करावी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० ४ जिलकाद.

नं० ४२०L

(चैत्र वद्य षष्ठी
२१ एप्रिल)

श्री.

तीर्थरूप मातोश्री बाईसाहेब वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें[3] चरणावर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार

१ बंकापुरच्या नैर्ऋत्येस सुमारें पंधरा मैलांवर हनगल आहे. याचें जुनें नांव विराटनगरी असें असून पांडवांचा अज्ञातवास याच ठिकाणीं घडला अशी त्या प्रांतीं सार्वत्रिक समजूत आहे. २ हैदराच्या मंत्रीमंडळांत लालखानाची गणना आहे. ३ पत्र पेशव्यांचें गोपिकाबाईस.

विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० १९ सवाल मुक्काम हावनूर, तुंगभद्रा दक्षिणतीर, येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलांकडून अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सदैव आशीर्वाद पत्र पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर हुबळीहून कूच करून सावनुरास आलों. तेथें नबाब भेटीस आले. नबाबाची भेट झाल्या नंतर दुसरे दिवशीं नबाबाचे घरीं गेलों होतों. नबाबानीं मेजवानी केली. [आम्हांस] एक हत्ती, दोन घोडे, [व] वस्त्रें दिलीं. दुसरे दिवशीं आम्हीं नबाबास डेऱ्यास बोलाविलें. त्यास ही मेजवानी केली. दोन हत्ती, दोन घोडे दिले. नबाबास एक शिरपेंच व दोघा पुत्रांस दोन पदकें दिलीं. दोन हत्ती द्यावयाचें कारण हेंच कीं, प्रथम त्यास (आमच्या) भेटीस यावें लागतें. हत्ती त्याचा हून खराब होता. यास्तव पूर्वीं एक बसावयास पाठविला, व दुसरा डेऱ्यास आले तेव्हां दिला. दुसरा मजकूर—मीरफैजुल्ला हनगलास होता. सावनुराहून दहा कोस होता. परंतु तो झाडी धरून बसला आहे. जमाव ही थोडाच आहे. परंतु (त्यानें) बातेऱ्या बांधिल्या आहेत, व खंदक ही चालीस लागला आहे. बहुत अडचणींत आहे. दोहीं बाजूस दोन तळीं व पिछाडीस झाडी व पुढें एक तोंडीं खंदकाच्या आंत तोफा ठेऊन बसला आहे. जमाव म्हटलातर पांच हजार सहा हजार पायींचे माणूस व चार हजार फौज व सोळा तोफा आहेत. त्यामध्यें दारूचें बळ विशेष आहे व अडचणी ही आहेत; यास्तव त्यास बाहेर काढावें व चार रुपये मिळवावे. यास्तव कूच करून मुकाम मजकुरास आलों. हरपनहळ्ळी, चित्रदुर्ग व आणखी लहान मोठ्या संस्थानच्या खंडण्या आसपास घेऊन मुरारराव ही येतात. त्यांस सामील करून हरपनहळ्ळीकर हे ही सामील करून पुढें मनसबा ठरेल तसें करूं. हा प्रकार नबाबाचे ही विचारें करावासा जाहला. परंतु नबाबाचे बचावास्तव फौज पांच सहा हजार ठेवावी असें ठरलें आहे. त्यास गोपाळराव

यास ठेवावें असें आहे. त्यास गोपाळराव शिरहट्टी घ्यावयास गेले आहेत. त्यांचे नारायणराव[1] बोलाविले आहेत. त्यासीं बोलून ठेऊं. मग आम्हीं कूच करून संस्थानाकडे जाऊं. वडिलांस कळावें. गोपाळराव:--

नं० ४२१L

(चैत्र वद्य षष्ठी
२१ एप्रिल)

श्री.

राजमान्य राजश्री रावो शंकर दिमत राजश्री धोंडोराम
गोसावी यासीं.

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान. नमस्कार सुरूसन आर्बासितैन मय्या व अल्लुफ. तुम्हीं पत्र छ० १९ सवाल सेडबचे[3] मुक्कामीचें पाठविलें तें छ० ५ जिलकाद रटेहळ्ळी प्रांत सावनूर येथील मुक्कामीं प्रविष्ट झालें. न बाबाचे बातमीचा व कौडलूर[4] संगम आदवानीप्रांतें यावयाचा व वरकड मजकूर विस्तारें लिहिला तो कळला. या उपरी ही तेथील वर्तमान वरच्यावर लिहीत जाणें. मुरादखान कडप्यावैर[5] दोन हजरांनिशीं रवाना केले म्हणोन लिहिलें तें कळलें. इकडील वर्तमान हैदर खानाशीं युद्ध छ० २९ सवालीं[6] बुधवारीं जहालियाचा मजकूर तपशीलवार तुम्हास लिहिला आहे. त्या अलीकडे वर्तमान तर नित्य सरकारच्या फौजा त्याचे लष्करा समीप जाऊन नमूद होतात. ते ही बाहेर येऊन झुंजतात. छ० ४ जिलकादीं त्यानीं कूच केलें. सरकारच्या फौजा समीप गेल्या. तोफा लागू केल्या. गोळे चालतांच त्याणीं मुक्काम करून राहिले. राजश्री मुरारराव घो-

---

१ गोपाळरावाचा कारभारी व चुलतबंधु नारायणराव. २ हें पत्र इतकेंच अपूर्ण सांपडलें. ३ हें शहर मोंगलाईत गुलबर्गा जिल्ह्यांत आहे. ४ कृष्णा व भीमा यांचा संगम रायचुरापासून आठ कोसांवर होतो त्यास काडलूरसंगम हें नांव आहे. ५ कडपें या शहरावर. ६ चैत्र शुद्ध अमावास्येस.

रपडे व सावनूरकर छ० ९ जिलकादीं आले. अतःपर बाऱ्या बंद करून गेट करून पारिपत्य करितों. हैदरखान झाडी धरावयास जातो. हैदराचा वकील गप्पा मारीत असेल. त्याजवरी तुम्ही न जाणें. सविस्तर अर्थ युद्धाचा वगैरे मीर मुस्साखान व नबाब यांस सांगणें. ईश्वराची कृपा आहे तरी या दोहों चहूं रोजा त्याचें उत्तम प्रकारें पारिपत्य होईल. सविस्तर मागाहून लिहून पाठवून देऊं. हैदरखान झाडीचा आश्रा करणार. त्यानें जमीन धरिली तरी उखळावयाचें करूं. किंबहुना पळून गेला तरी मग जसा विचार पाहूं तसें करूं. सारांश नबाबाचा आमचा स्नेह. स्नेहास उचित तेंच त्याणीं करावें. तुम्हीं मीर मुस्साखानाशीं बोलावें. जाणिजे. छ० ६ जिलकाद. आज्ञा प्रमाण. [लेखन सीमा]

नं० ४२२

(चैत्र वद्य सप्तमी
२२ एप्रिल.)

श्री.

पुरवणी. राजश्री गोपाळराव गोविंद स्वामी गोसावी यांसीं.

विनंति उपरी. सावनूरवाले पठाणाच्या [व आमच्या] भेटी होऊन तुम्ही गेलां, त्या नंतर तिसरे दिवशीं सावनूरवाले डेऱ्यास आले. दोन चार घटिका बोलणें जाहलें. त्यांत पठाणांचा खुलासा कीं, (आह्मीं) बंकापुरास तूर्त चलावें. त्यास आमचें मानस—हरपनहळ्ळी व चित्रदुर्ग इकडे जावें. हैदरनाईक कोठें येतो, काय करितो, हें पाहून पुढें जें कर्तव्य तें करावें. त्यापक्षीं सावनूरकराचें संरक्षण करावें अथवा बरोबर घ्यावें. ज्या

१ सैन्य जथवून. २ निजामअलीच्या दरबारीं हैदराचा वकील होता तो. ३ हैदराचें. ४ पत्र पेशव्यांचें गोपाळराव पटवर्धनास. ५ सावनूरकर नबाबाचा. ६ बंकापूर हैदरा पासून घेण्या करितां.

पक्षीं बरोबर घ्यावें त्यापक्षीं सावनूर खालीं[1] पडतें. यास्तव सावनूरकारानीं चार पांचशें राऊत व लेंकास बरोबर देऊन आपण सावनुरांत रहावें. [असें ठरलें] खासा स्वारी लांबते. तेव्हां खालीं[2] मैदान पाहून हैदरनाईकाचा उपद्रव होईल. यास्तव कांहीं फौज ठेवावी.[3] त्यास तुम्हीं शिरहट्टी प्रांतांत आहां. जों पावेतों शिरहट्टीचा प्रकार निर्गमांतें[4] येई तों पावेतों हजार दीड हजार फौज तुम्हीं सावनुरास पाठवावी, तुमचें कार्य जाहल्या नंतर तुम्हींच सावनुरानजीक रहावें, म्हणजे सावनूरचें रक्षण होईल. इतकियांत हैदरनाईक काय करितो हें ही कळेल. तों आम्ही इकडून येतों. यास्तव राजश्री नारायणराव[5] यांस बलाविलें होतें. ऐशियास तुम्हीं मशारनिल्हेचा न्यावयाचा प्रकार लिहिला तो कळला. त्यास आम्हीं तूर्त बाळा[6] नदीहून कूच करून हावनूरास आलों. राजश्री महिपतराव कवडे व धोंडो दत्तात्रय व महिपतराव चिटणीस यांचें पथक मिळोन दोन हजार फौज सावनुरास पठाणाचे व सावनूरचे रक्षणास पाठविली आहे. त्यास शिरहट्टीचें काम जाहल्यावर दुसरे जागां न गुंततां तुम्हीं फौज सुद्धां सावनुरानजीक राहोन असावें. ज्यांत सावनूरकरांचें रक्षण तें करावें. इतकियांत हैदरनाईक काय करितो हें ही कळेल. आम्हीं हरपनहळ्ळी, चित्रदुर्गचा कारभार उरकून येतों. तुम्ही वरच्यावर लिहीत असावें. तुम्हीं इकडेच

---

१ रिकामें पडतें. हैदर तें घेण्यास येईल तर त्याचें रक्षण करण्यास कोणी रहात नाहीं. २ रिकामा मुलूख. ३ या प्रांतीं कांहीं फौज ठेवावी असें आह्मीं ठरविलें आहे. ४ शिरहट्टी घेण्याचें काम; निकालास लागे तों पर्यंत. ५ गोपाळरावाचा चुलत बंधु नारायणराव कृष्ण मंगळवेढेकर. ६ वर्धानदीचें जुनें नांव ' बाळा. ' ही नदी म्हैसूरच्या राज्याच्या वायव्य भागीं इकेरी नांवाच्या गांवाजवळ एक डोंगर आहे तेथून निघून उत्तरेस व ईशान्येस चाळीस मैल पर्यंत वहात गोंदी येथें धारवाड जिल्ह्यांत शिरल्ये. नंतर ईशान्येस व पूर्वेस वळणें घेत घेत पन्नास मैल पर्यंत जाऊन हरिहरच्या उत्तरेस तीस मैलांवर तुंगभद्रेस मिळल्ये. हिच्या कांठीं कलकेरी, हावेरी, मुळगुंद, देवगिरी व करजगी हे प्रसिद्ध गांव आहेत.

असावें. इकडील बातमी वरचेवर आणून पाठवीत जाणें. रवाना छ० २० सवाल. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं० ४२३

[अजमासें वैशाख शुद्ध
एप्रिलचा दु० पंधरवडा]

पटवर्धनांच्या लष्करांतून कोणी कारकुनानें गोविंद हरीस लिहिलेलें पत्रः—

" श्रीमंत रायरहुबळीच्या मुक्कामाहून कूच करून सांवशी कुंदगोळच्यामध्यें ओढ्यावर मुक्काम केला. तेच दिवशीं सांवशी कुंदगोळांत रायानीं ठाणीं घातलीं. (श्रीमंतानीं) चैत्र शु॥ १४ स सावनूर नजिक डेरे दिले. श्रीमंत आपले मातबर मंडळीसह स्वार होऊन डेऱ्या नजिक गेले. नबाब यासीं आणावयास नारोशंकर व विठ्ठल शिवदेव यांस पाठविलें. ते सावनूरकरांस घेऊन आले. डेऱ्यांत उभयतांच्या भेटी झाल्या. दुसरे दिवशीं पौर्णिमेस श्रीमंत सावनुरांत नबाबाचे घरास गेले. नबाब व॥ १ स श्रीमंतांचे डेऱ्यास आले. उभयपक्षीं वस्त्रें बहुमान झाले. या प्रमाणें भेटीचा समारंभ होऊन श्रीमंत करजगीवर गेले. राजश्री गोपाळराव फौज सुद्धां शिरहट्टी, श्रीमंतगड वगैरे ठाणीं घालावयास गेले. किरकोळ ठाणीं जातां जातां पडलीं. शिरहट्टीस मोर्चे लाविले आहेत. हस्तगत झाली असेल. ' नबाबानीं सावनुरीं फौज असेल ती घेऊन राहावें. लेंकास दोनशें स्वारांनिशीं श्रीमंतांबरोबर पाठवावें ' या प्रमाणें करार झाला. हैदरअल्ली जमावानिशीं मासुरा नजिक आहे. बंकापुरा भोंवती तलावे करून हैदरअल्लीकडील लोकांची फोडाफोड करावी असें गोपाळरावजींस श्रीमंतांनीं सांगून त्यांस सावनुरींच ठेविलें. "

---

१ गोपाळरावानें.

नं० ४२४

[चैत्र वद्य सप्तमी
२२ एप्रिल]

श्री.

राजश्री विसाजी[1] नारायण गोसावी यांसीं

सुरूसन आर्बा सितैन मय्या व अलुफ. गदगचें ठाणें तुम्हीं घेतलिया उपरी सत्वर हुजूर येणें. जर शिरहट्टीचे कामास राजश्री गोपाळराव गोविंद याणीं तुम्हास नेलें असेल आणि तेथें मोर्चे दिले असले तरी तें काम सत्वर करून येणें. जाणिजे. येते समयीं नरसिंगराव धायगुडे यांस घेऊन येणें. छ० २० सवाल.

मोर्तब

नं० ४२६

(२२ एप्रिल.)

नारो आपाजीचें[2] विसाजी नारायण यास चैत्र व॥ ७ चें पत्रः—

" तुम्ही गदग घेऊन शिरहट्टीस आलां, मोर्चे लाविले म्हणोन वर्तमान कळलें. ऐशास श्रीमंतीं येविशीं प्रातःकाळीं सांडणीस्वारां बरोबर पत्र[3] पाठविलें आहे. हल्लीं सावनूरची[4] बातमी आली त्यावरून बुधवारीं[5] युद्धाचा मजकूर घडावा ऐसा करार झाला आहे. हैदरनाईक बंकापूर पासोन पांच कोसांवर आला, याजकरितां हे[6] माघारे त्याजवरी जातात. तरी तुम्हीं जलद यावयाविशींची आज्ञा, शिरहट्टी हस्तगत झाली नसली तरी सोडोन यावें ऐशी निकड[7] लिहिली आहे. "

---

१ हा इचलकरंजीकरांचा कारभारी. यास हें पत्र पेशव्यानीं लिहिलेलें आहे. २ नारो आपाजी तुळसीबागवाले. ३ हें पत्र नं० ४२५ चें वर आलेंच आहे. ४ सावनुरासमीप हैदर आल्याची. ५ चैत्र वद्य दशमीस. ६ पेशवे. ७ निकडीची.

नं० ४२६L

(अजमासें चैत्र शुद्ध
एप्रिलचा प० पंधरवडा.)

श्री

पुरवणी. तीर्थरूप मातोश्री बाई वडिलांचे सेवेशीं

विज्ञापना. हुबळीवर हल्ला गफलतीनें जाहला. तेथें धनसिंगास र-रांत गोळी लागून मृत्यु पावला. शिपाईगिरींत बहुत सरस होता. ईश्वरी इच्छेस उपाय नाहीं. रामचंद्र गणेश यास हातावर मनगटावर गोळी लागली. परंतु शिरा हाड वांचलें. आठा चहूं दिवशीं बरे होतील. आणखी ही माणसें तीन चारशें जखमीं जहालीं. ठार ही पांच पन्नास पावेतों जाहले असतील. दुसरे दिवशीं कौलास येऊन ठाणें हवालीं केलें. हसनअल्लीखान मातबर मनुष्य व तुळजोपंत नामक ब्राम्हण हस्तगत झाले. त्या मध्यें हसनअल्लीखानाचा भाऊ लालखान हे हैदरनाइकापाशीं बरे कारभारी आहेत. त्याचे हे बंधु. तुळजोपंतानें हैदरनाइकाकडून इकडील महाल कमावीस केले होते. त्यांस दोघांस कैद करून आणिलें. आणखी ही सवदागर हस्तगत जाहले आहेत. त्यांस प्रस्तुत कोपळास पाठविलें. कळावें. दुसरा मजकूर हैदरनाईक मासुरास आला आहे. त्याचा ही मजकूर झाडी सोडावयाचा दिसत नाहीं. मीरफैजुल्लास त्यास सहा साता कोसांचें अंतर आहे. पुढें वर्तमान होईल तें सेवेशीं लिहीन. तिकडील वर्तमान बारीक मोठें लिहावयास आज्ञा करावी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० १० जिलकाद

---

१ पत्र पेशव्यांचें गोपिकाबाईस.

नं० १२७

(४ मे)

श्री.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी प्रती अंताजी विठ्ठल आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत वैशाख शुद्ध ३ तृतीया पावेतों मुक्काम लष्कर नजिक ठाणें बिदनूर [!] यथास्थित असे. विशेष. अलीकडे तुम्हाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी ऐसें न करावें. सदैव पत्र पाठवीत जावें. या नंतर आम्हांकडील वर्तमान तरी काल शुद्ध द्वितीया बुधवारीं श्रीमंतांनीं तमाम फौजा तयार करून पुढें राजश्री विठ्ठल शिवदेव व चिरंजीव राजश्री गोपाळराव यांस श्रीमंतानीं सांगितलें कीं, हैदरनाईक कोठें आहे त्याचा मुकाबला मात्र घेणें, ऐसें सांगितलें. त्याजवरून श्रीमंत मागें राहून पुढें हे दोन सरदार पाठविले. त्यास हैदरनाईक याणें हारिहरावरून श्रीमंत आल्याचें वर्तमान ऐकोन कूच करोन बारीच्या तोंडें जाऊन राहिला. मग आम्ही जाऊन मोकाबला घेतला. ढालौं, डेरे पाहिले. पुढें झाडींत जाणार होता. इतकियांत आमच्या फौजा जवळ आल्याचें पाहून मुक्काम करून आपण खुद्द व तोफखाना व पायदळ व फौजा ऐसें सामान घेऊन बाहेर निघाला. तों आमच्या फौजा जवळ होत्या त्या माघाऱ्या निघाल्या आणि चिरंजीव राजश्री रावसाहेब याणीं श्रीमंतांस चिट्टी पाठविली सांडणी स्वारांसमागमें कीं, मोगैल आमच्या फौजा पहातांच बाहेर निघाला आहे, तुम्हीं खासा स्वारी तयार होऊन सत्वर यावें. त्यावरून श्रीमंत पांच सहा कोसांवर होते तेथून दोन तीन तोफा घेऊन तडैका आले, तों आमची

१ ज्यानें ज्यास पत्र लिहिलें ते दोघे बंधु यादवाडकर पटवर्धन. २ मासूरच्या वारीच्या. ३ पत्र लिहिणारा इतर भाऊबंद सुद्धां गोपाळरावाबरोबर होता. ४ ढाला डेरे अर्थात् हैदराच्या लष्कराचे. ५ पत्र लिहिणारा हैदरास मोंगल ह्मणतो ! ६ तातडीनें.

व त्यांचीं झटापट गोळा गोळी होत होत मैदानांत पाठीवरी घेऊन बाहेर काढिलें. त्याची फौज पंचवीस तीस हजार पायदळ, देखील पंचवीस तीस तोफा ऐसे आले. सामान भारी पाहून चिरंजीवानीं अडचण रान याजकरितां माघारे सरले. तो ही तोफांची मारगीर करीत नीटच आला. बुणगें मागें टाकून दोन तीन कोस पुढें चालोन आला. त्याचे चित्तीं ' पुढें फौजा आल्या आहेत या थोडक्या आहेत, श्रीमंत लांब आहेत, यास्तव यांस धुडाऊन द्यावें; ' या मतलबें लांब आला. तों रावसाहेबांकडील लोकांनीं उतेफती काटेगारीस उठले. राउता राउतांची मिठी जाहली. तिकडील एक घोडी पाडाव करून आणिली. व पेंढारी याणीं दोन घोडीं आणिलीं. बाण ही दोन चार आणिले. मग तो तोफांचा मार करूं लागला तैसे लोक निघाले. इतकियांत श्रीमंत तमाम फौजा घेऊन जलदीनें आले. तोफा श्रीमंतानीं दोन आणिल्या होत्या त्या लागू केल्या. या फौजा तमाम हैदरअल्लीच्या दृष्टीस पडतांच त्याची चक भूल झाली कीं हें काय. कीं फौजा येऊन पोहोंचल्या ! तेव्हां गोटास जावयाचें कठीण पडेलसें पाहून तेथेंच गाडून उभा राहिला. पुढें जाण्याची कस्त होईना. पंचवीस तीस हजार फौज उभी राहिली. आणि श्रीमंतानीं [त्या फौजेवर] तोफा लाविल्या. त्याणें ही तोफा लाविल्या. युद्ध मांडलें. यांची अगोध युद्धाची तजवीज नव्हती. परंतु तो चालोनच आला, तेव्हां सहजच करणें लागलें. तोफांची मारगीर त्याणें उभा राहून फारच केली. आम्ही तोंडशीं होतों ते त्याचे उजवे बाजूस गेलों. पिछाडीस विठ्ठल शिवदेव. डावे बाजूस नारो शंकर, या प्रमाणें भोंवताले फौजा उभ्या केल्या. मोंगलास पायबंद केला.

१ ' उतफती काटेगारी ' हे त्या वेळचे पारिभाषिक शब्द काय अर्थाचे आहेत हें कळत नाहीं. रावसाहेबांकडील लोकानीं ह्मणजे गोपाळरावाकडील लोकानीं अर्थात् आम्हीं. २ तोफांचा मार करूं लागल्या बरोबर. ३ मागें सरले. ४ मराठ्यांच्या सर्व फौजा एकदम येऊन पोंचल्या हें काय ! ५ छावणींत परत जाण्याची. ६ नेट. ७ तुंबळ. ८ युद्ध करणें भाग पडलें.

श्रीमंतांचे तोफांची मारगीर फारच चांगली जाहली. त्याचे गंच्यांत[1] गोळे जाऊन पडूं लागले तेणें करून तो फारच घाबरलासा जाहला. त्याचा नाश फारच जाहला. मोठ्या गुर्मीनें आला होता. परंतु ईश्वरकृपेनें यांचे तोफांची मारगीर फार सरस जाहली तेणें करून त्याचा ही दम जिरला. आणि त्याची तोफा मारावयाची जलदी फार, दारू चांगली, यामुळें गोळा लांब पल्ला येतो. इतकें होई पावेतों संध्याकाळ जाहला. मोगलास जखडून उभा केला होता, परंतु वावधंण[2] फार उठलें. पर्जन्य ही आला. दिवस अस्तमान जाहला. त्या संधींत श्रीमंतानीं हुजरातचे लोकांस ताकीद करून हल्ला करविली व भोंवताल्या फौजांस सांगून पाठविलें कीं हल्ला करणें. हुजुरातचे फौजेनें चालून घेतलेंसें पाहून चिरंजीव रावसाहेब याणीं घोडे चालविले. परंतु वारा फार. कांहीं दिसेना. त्याणीं मारागिरी विशेष केली. बुरूजबंदी[3] चौंहीकडे केली आणि रेंजगण[4] भरून तोफा ठेविल्या होत्या त्या त्यासमयीं सोडिल्या. जेजाला व बाण यांची मारागिरी केली. तेव्हां कोट पुरेनासें पाहून (आमच्या) फौजा तमाम माघाऱ्या निघाल्या संध्याकाळ ही जाहला. ईश्वरें सर्व मंडळीस खैर केली. त्या समयीं हुजरात घोडे फार पडले शंभर पावेतों. माणूस दहा पावेतों (पडलें.) या प्रमाणें जाहलें. वरकड कोणा सरदाराकडील कांहीं जायां[5] झालें नाहीं. चिरंजीव भाऊकडील[6] दोन घोडीं मात्र गोळा लागोन पडलीं. वरकड खैर आहेत. मग श्रीमंत माघारे सरकोन येऊन राहिले. तमाम फौजा निघोन गेल्या. हैदरअल्ली अंधार पाहोन माघारा निघोन गोटास गेला. मोगल इकडे आला तेव्हां दोन चार हजार फौज त्याच्या बुणग्यावरी जाती तरी लुटून टाकिते. आज युद्धं[7]——

---

१ दाट समुदायांत. २ वादळ. ३ बंदुकांचा मारा उत्तम करितां यावा ह्मणून तुकड्या तुकड्यानीं उभे केलेले गारद्यांचे समुदाय. ४ छरे. ५ यत्न. ६ परशुराम भाऊकडील. ७ मूळ पत्राची नकल इतकीच अपूर्ण मिळाली.

नं० ४२८

[वैशाख शुद्ध तृतीया
४ मे.]

श्रीशंकर

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री गोपाळराव स्वामीचे सेवेशीं—

पोष्य त्रिंबकराव[1] विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ० २ जिलकाद पर्यंय समस्त सुखरूप नाशिकीं असों व कांहीं मुलें माणसें किवळयास ही आहेत. श्रीमंतीं[2] किल्ले त्रिंबकची पेठ पसंत करून नवें घर बांधलें. दुसरें घर मौजे चावडस लहानसा गांव नाशिकावरता दोन कोस (आहे) त्या गांवीं घर बांधिलें. आमचा इनाम गांव जलालपुर ह्मणून तेथें जवळच कोसावर आहे. त्या गांवीं मातोश्री गोपिकाबाई येऊन राहिलीं. श्रीमंतांचा संतोष राखण्या करितां गंगा तीरास तीं ही आलीं. आठा पंधरा दिवशीं श्रीमंत ही तेथें जातात. आह्मी ही कधीं कधीं जातों आम्ही नाशकासच आहों. श्रीमंतांचे दर्शनास दोहों चोहों दिवशीं जातों. कुल खासगी कारभाराचा अखत्यार चिंतो विठ्ठलावर आहे. सारें कूट एकच आहे. मातवर कारभारी राजश्री आबा पुरंदरे सर्व कलें रक्षावया करितां येऊन राहिले. होळकर मंडळी! हे सर्व मायेंत शिरोन परस्परें (एक) आहेत. दौलत बुडेल तर बुडो. परंतु आपले स्वार्थाचा मजकूर असेल तोच करितात! श्रीमंतांचा प्रकार क्षणभंगुर.

---

१ हें त्रिंबकराव मामा पेठे यांचें गोपाळरावास पत्र. २ दादासाहेबांनीं. ३ क्रियांस बहुमानार्थी अनेकवचनानें उल्लेखावयाचें तो नपुंसकलिंगी प्रयोग घालण्याची वहिवाट पूर्वी सार्वत्रिक होती. अद्यापि ही ती क्वचित् आढळत्ये. ४ चिंतो विठ्ठल रायरीकर हा दादासाहेबांच्या फारच मर्जींतला मनुष्य होता. ५ पुरंदरे वगैरे मंडळी जी येथें आली आहे ती दादासाहेबांच्या लहरी प्रमाणें वागण्याकरितां आली आहे, ते वावगें करीत असतील तर त्यांचा निषेध करण्या करितां नाहीं! ६ हे इंदुरचे होळकर नव्हत, होळीचे होळकर!

कोणे गोष्टीचा धरसावर नाहीं. जवळ उशेपायगतीं विरुद्ध भासविणार बसलेच आहेत. आह्मीं एक लक्ष श्रीमंत रावसाहेबांकडे लाऊन कालहरण करून आहों. आमची दर्द येणें तर त्यांस येईल. आम्हास संसारनिर्वाहाचें संकट प्राप्त जाहलें ! बरें ! ईश्वर या गोष्टीचा साक्षी आहे. आम्ही सर्व प्रकारें खावंदाचें हित करीत असतां त्याचें फळ आम्हास ईश्वरें या प्रकारें दिल्हें ! त्या गोष्टीची दर्द श्रीमंत रावसाहेबीं मनांत आणून ये गोष्टीचा विचार न केला तर ज्या गोष्टी मातबरीच्या आजपर्यंत चालल्या त्या तर सुटत नाहींत. आम्हावर र्‍यांत तर खावंद कोणी करीत नाहीं. तेव्हां देशांतर पहावेंसें होईल ! चार महिने तर पर्जन्यकाळीं येथें आहों. राजश्री गोविंद शिवराम [व] आम्हीं जितकें बोलणें सांगणें तितकें रावसाहेबांचे उपयोगीं पडे असें बोलत असतों. परंतु उशेपायगतीं मंडळी सारी तीच विपरीत भासविणार बसले आहेत ! तें सर्व तुम्हांस कळावें ह्मणून लिहिलें असे. पट्टाकिल्ल्याचे लुटीचे चौकशीस आम्हास पाठविलें ह्मणून तूर्त किल्लेपट्ट्यास आलों होतों. लौकरच नाशकास जाऊं. फार दिवस झाले. सर्व लांबविलें. विशेष ठिकाणीं पडत नाहीं. कांहीं पडेल. लोभ असों द्यावा हे विनंती. आबा व मोरोबाचे साष्टांग नमस्कार.

नं० ४२९

(वैशाख शुद्ध तृतीया
४ मे.)

श्रीशंकर

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोविंदपंत नाना स्वामींचे सेवेशीं.

---

१ कृपा. २ पट्टा किल्ल्याच्या आसपास कोणी लुटालूट केली त्या विषयीं चौकशी करण्या करितां त्रिंबकराव मामास दादासाहेबानीं पाठविलें होतें. परंतु लूट होऊन गेल्यावर पुष्कळ दिवसानीं ही चौकशी झाली त्यामुळें लुटीचा माल चोरट्यानीं लांबविला. ' विशेष ठिकाणीं पडत नाहीं ' ह्मणजे मालाचा फारसा पत्ता लागत नाहीं.

पोष्य त्रिंबकरावें विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरी. येथील तागायत छ० २ जिलकाद पर्यंत मुक्काम नजिक किल्ले पट्टा सुखरूप असों विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान सर्व कळलें. राजश्री गोपाळरावजींस जखम लागली होती परंतु ईश्वरें खैर केली म्हणून लिहिलें तेणें करून संतोष जाहला. आम्ही ही परस्परें आयकिलें होतें. " श्रीमंत सावनुरा पुढें तुंगभद्रा तीरास गेले. धारवाड व बंकापूर सोडून फौज भारी जमा झाली आहे. हैदर नाइकाशींच गांठ घालावी ऐसें आहे. ईश्वर श्रीमंतांस यश देईल " म्हणोन लिहिलें, त्यास श्रीमंत पुण्यवान् आहेत. परंतु दिवस मुलुखगिरीचे उरले नाहींत. बिदनूरचे झाडींत हैदर नाईक. तो बाहेर कशास निघेल ! फौज झाडींत शिरणार नाहीं. तेव्हां जें त्याणें घेतलें तें घेतलें . फौजा माघाऱ्या आल्यावर तो बाहेर निघोन अंमल पुढें आणखी बसवील असें दिसतें. बरें वाईट जें ज्या कालीं होणें ती सत्ता ईश्वराची खरी ! उत्तरेकडील वर्तमान प्रमाण वाटत नाहीं. संशय मात्र उरला आहे. आणखी एक दोघे शाहणे शोधास गेलेच आहेत. संदेह ही लौकरच वारलसें दिसतें. बहुता प्रकारें प्रमाण दिसत नाहीं. श्रीमंत दादासाहेब श्रीत्रिंबकेश्वरीं राहणार. नवें घर ही त्रिंबकीं पेठेस बांधिलें. नाशकाजवळ दो कोसांवर गंगातीरीं चावडस म्हणून लहान खेडें आहे तोच गांव पसंत करून त्या गांवीं ही घरवाडा लहानसा बांधतात. अग्निहोत्र घेणार होते. कुंडें घालून संकल्प करावा येथपर्यंत आल्यावर ' हे किरकिर आम्हांस पुरवणार नाहीं. ' ऐसें म्हणोन कुंडें गंगेंत

पट्टा किल्ला नाशिक व नगर या जिल्ह्यांच्या सरहद्दीवर आहे.

१ त्रिंबकराव मामानें हें पत्र गोविंद हरीस लिहिलेलें आहे. मागचें नंबर ४२८ चें गोपाळरावास लिहिलेलें व हें हीं दोन्हीं एकाच तारखेस लिहिलेलीं असून एकावर मुक्काम नाशिक व दुसऱ्यावर किल्ला पट्टा लिहिला आहे! हल्लीं मामाचें कायमचें राहणें नाशिकास होतें व तो तुर्त पुरता पट्टयास गेला होता. २ तोतया भाऊसाहेबाचें.

टाकिलीं! भट जमा झाले होते, पालख्या घोडीं पाठवून आणिले होते, त्यांस निरोप दिला! कारभार मनस्वी[1]. कारभारी खातरेचा[2] चिंतो विठ्ठल ह्मणून तत्पक्षीय आहे. सारी मदार त्याजवर. मातबर ह्मणावयास राजश्री आबा पुरंदरे नेहमी येथील कल राखावा ह्मणून येऊन राहिले आहेत. आपले मनसब्याचे उपयोगी प्रकार असतो तोच तसा करतात. दौलत[3] बुडविल्यांतच जमा आहे! ईश्वर या उपरी रक्षील तर नकळे! आम्हीं गंगातीरीं नाशिकीं घरीं येऊन स्वस्थ आहों. श्रीमंतांचे दर्शनास जावें यावें या प्रकारें आहों. कालहरण सुस्थळीं करावें. म्हणून येथें राहिलों आहों. प्रस्तुत श्रीमंतींच पट्ट्यास लूट झाली त्याचे चौकशीस किल्ल्यास पाठविलें. पंधरा वीस दिवस हा गुंता आहे. नाशकास लौकरच जाऊं. मातोश्री गोपिकाबाई श्रीमंत दादांस संतोष वाटावा म्हणून येथें गंगातीरीं आमचा गांव जवळच जलालपुर म्हणून आहे त्या गांवीं राहिलीं आहेत. आम्हीं ही सर्व साहित्य[4] केलें आहे. संतोषें करून आहेत. विशेष उद्योग भाव कांहीं नाहीं. हे विनंती. आबा व मोरोबाचे साष्टांग नमस्कार.

नं० ४३०L

(वैशाख शुद्ध पौर्णिमा
१९ मे.)

श्री

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं[5]

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० १३ जिलकाद मुक्काम कुदेलूर येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलांकडून अली-

१ स्वछंदी. २ भरंवसा. ३ पेशवाईची दौलत. ४ मदत. ५ पत्र पेशव्यांचें गोपिकाबाईस.

कडे. पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सदैव आशीर्वादपत्र पाठवाव. यासीं आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर हैदरनाईक रटेहळ्ळीस होता तेथें बातेऱ्या बांधून लढत होता. त्यास आपल्या तोफा समीप लावून मार दिला, यास्तव [त्याचें] लष्कर बहुत घाबरें जाहलें व त्याच दिवशीं विसाजी कृष्ण[1] यांस[2] फहीवर मासुरापलीकडे पाठविलें होते. त्यांनीं कांहीं कही वळून आणिली. ही दहशत. दुसरी तोफांची दहशत. यास्तव तो कूच करून मासूरचे बारीपलीकडे गेला. कुचाचे दिवशीं गांठ घालावयाचा दिवस होता. परंतु न कळत रात्रीं कूच करून बारीपलीकडे गेला. वडिलांस कळावें. आपली जरब त्याजवर बरीच होत चालली आहे. त्याची उमेद कृष्णेवर लढाईस यावें अशी होती. प्रस्तुत बाहेर निघावयाचा प्रकार राहिला! बारीपलीकडे गेला यास्तव विठ्ठल शिवदेव, आबांचें पथक, विसाजी कृष्ण व सखारामपंतांचें पथक ऐसे बारीपलीकडे गेले होते. हे सर्व मिळून टेंकडीवर चढून लष्कर पहात होते. इतक्यांत दगा करून दुसरे वाटेनें तो येऊन यांशीं गांठ घातली. यांचें त्याचें झुंज जाहलें. ते फार, हे थोडे, यास्तव नीट लढाई झाली नाहीं. त्यांणींच यांस सारून आणिलें. दहा पंधरा घोडीं त्यांनीं नेलीं. याणीं ही आठ नऊ आणिलीं. संभाळून आले यास्तव मात्र बचाव जाहला. नाहीं तरी बहुत नाश होता. वडिलांस कळावें. वरकड वर्तमान होईल तें सेवेशीं लिहीन. हे विज्ञापना.

पै॥ छ० ४ जिल्हेज.

नं० ४३१

(वैशाख वद्य द्वितीया
१७ मे.)

त्रिंबकराव मामाचें १९ जिल्कादचें नाशिकाहून गोपाळरावास पत्रः—

---

१ बिनीवाले. २ आबा पुरंदरे.

" सर्व सोडून कालहरण करीत गंगातीरीं आहों. श्रीमंत मात्र आयुष्याचा तंतु कधीं वळावून फलोन्मुख होईल पहावें ! यंदाचा प्रसंग फार कठीण दिसतो. मुख्य वस्तु[1] जतन होऊन आबानें[2] घरीं येणें जाहल्यास फार उत्तम ! येथें सर्व मनस्वी क्रिया श्रीमंतांची[3] आहे तैशीच आहे. कारभारी ही सर्व तत्पक्षीच आहेत. "

नं० ४३२

(१९ मे.)

सदाशिव बल्लाळ वैद्य याचें गोविंद हरीस वैशाख वद्य ४ चें पत्रः—

" इकडील वर्तमान तर किल्ले पुरंदर सरकारांत श्रीमंतांनीं घेतला. त्याजमुळें राजश्री नीलकंठ[4] महादेव नाशिकाहून श्रीमंत दादासाहेबांपासून रुसवा करून आले. त्याजमुळें आज दोन दिवस लोकांनीं[5] फार आवई खादली. तृतीयेच्या दिवशीं तो फारच गडबड झाली. "

नं० ४३३

(अजमासें वैशाख वद्य मेचा दु० पंधरवडा)

त्रिंबकराव मामाचें नाशिकाहून गोविंद हरीस पत्रः—

" इकडील मजकूर तर श्रीमंत[6] स्नानसंध्ये करितां येथें येऊन बसले; परंतु स्वस्थचित्त राखणार राखों देत नाहींत. नाना प्रकारचे संकल्प विकल्प घालीतच आहेत. पुरंदरामुळें तर फारच विकल्प विपरीत दर्शविणार दर्शवितात. आणि चित्तांत ही येऊन मनस्वी भाषण येथें श्रीमंत करितात. कोणे रंगास जाईल पहावें ! सर्व दौलतेचा कारभार येथील का-

---

१ पेशव्यांचें प्राणरक्षण होऊन. २ आब राहून. ३ दादासाहेबांची. ४ आबा पुरंदरे. ५ पुण्यांतील लोकांनीं. पत्र पुण्याहून लिहिलेलें आहे. ६ दादासाहेब.

रभारी ढवळीतच आहेत! ईश्वरें परिणाम कसा नेमिला आहे तो कळत नाहीं. "

नं० ४३४L

[वैशाख वद्य नवमी
२४ मे.]

श्री

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनिज्ञापना. येथील क्षेम तारीख छ० २२ जिल्काद मुक्काम नजिक केरूर प्रांत सावनूर येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों विशेष. इकडील वर्तमान तर हैदर नाईक मायनहळ्ळीस गेला. प्रस्तुत बाहेर निघोन लढाई करावयाचें मानस त्याचें नाहीं. व तो ही ओपले छावणीची वाट पहात आहे. त्याचे मतें 'चार दिवस झाडीचे आश्रयानें रहावें. पुढें हे सहजच जातील.' हें त्याचें मानस आहे. परंतु ज्यापक्षीं मनोदयानुरूप कोणी एक गोष्ट न होय तेव्हां छावणी करणें प्राप्तच जाहलें. यास्तव कूच करून माघारे आलों. पुढें छावणीचा प्रकार तर धारवाडा नजीक होईल. परंतु पैक्याचा पेंच मोठा व महागाई ही आहे. याजमुळें लष्कर बहुत खराब जाहलें. घोड्यांत तर जीव नाहीं. परंतु छावणी करणें प्राप्तच झालें. ऐवजाविशीं तीर्थरूपांस लिहून पाठविलें आहे. वडिलांस कळावें. पुरंदर किल्ला कोळ्यानीं घेतला ह्मणून कळलें. त्यास त्याचा प्रकार आम्हांकडून नाहीं. तीर्थरूपांस किल्ल्याविषयीं आमचा संशय येईल, यास्तव वडिलांस शपथपूर्वक पत्र लिहून पाठविलें आहे. कळावें. वरकड तिकडील वृत्त

१ पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. २ आमच्या.

लिहावयास आज्ञा करावी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० १३ जिल्हेज.

नं० ४३५

[अजमासें वैशाख वद्य
मेचा दु०पंधरवडा]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. तुमचीं पत्रें मासूरच्या बारीपासोन माघारे फिरोन वाळा नदीवर आल्यानंतर लढाईचा वगैरे मजकूर लिहून पुरवणी पत्रें तुम्हीं पाठविलीं, त्यांत दस्तऐवेजी मजकूर नाहीं, अशा पुरवण्या पाहून—लढाई-चाच मजकूर व कार्याकारण—ऐशी पुरवणी तीन बंदांची जासुदा बरोबर उभयतां चित्रगुप्तांकडे व मामाकडे पाठविली होती ती त्याणीं पाहोन संतोष पावले. (त्यांनीं) प्रत्योत्तरें लिहून आम्हांस पाठविलीं तींच बजिन्नस उभयतांचीं पत्रें व मामाचें पत्र आमचे नांवचें, व तुम्हास त्याणीं प्रतेक लिहिलें तें, व राजश्री गोविंद शिवराम याणीं आम्हास पत्र पाठविलें तेंच बजिन्नस पत्र, ऐशीं तुम्हांकडे पाठविलीं आहेत. त्यावरून सविस्तर वर्तमान कळेल. ज्या ज्यांचीं पत्रें आहेत, त्यांस लिहिणें त्या रीतीनें लिहून उत्तर पाठवून द्यावें. नारोजी जासूद हीं पत्रें घेऊन काल सायंकाळीं येथें आला.

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ ज्या पत्रांतील मजकूर परक्याच्या दृष्टीस पडला असतां ही आपलें नुकसान होणार नाहीं किंवा पुढें आपणास नड येईल असा मजकूर ज्यांत लिहिला गेला नाहीं अशीं पत्रें. ३ नाना व मोरोबा दादा फडणीस. मामा ह्मणजे अर्थात् त्रिंबकराव मामा. उभयतां फडणीस व त्रिंबकराव मामा व गोपाळराव पटवर्धन हीं सारीं एकाच ह्मणजे रावसाहेब पेशव्यांच्या कूटांतलीं आणि दादासाहेब व तत्पक्षीय लोक यांच्या काय मसलती चालल्या आहेत इकडे अगदीं डोळ्यांत तेल घालून पहात बसणारीं माणसें. ४ त्या तिघां पैकीं प्रत्येकानें तुह्मांस पत्र पाठविलें तें. ५ खासगीवाले.

आज गुरुवारीं तुम्हांकडे रवाना करून पाठविलीं आहेत. सारांश. श्रीमंत[1] तर चावंडसेस[2] वाडा बांधन तेथें राहिले आहेत. मनसबा तो तूर्त कांहीं नाहीं. परतु उत्तेजन देणार नाना प्रकारें देऊन विपर्यास दाखवितात तें त्यांच्या ध्यानांत भरून मनस्वी भाषण करितात. त्यांस कांहीं स्वस्थ राहूं देत नाहींत! पुरंदरेमुळें कार्यभागीं यांस व त्यांचे पक्षींच्या सर्वांस फारच मनसबा[3] प्राप्त. जाहला. आहे. नाना प्रकारचे तर्क कुतर्क करून अपाय योजितात. त्यांत स्वारी समागमें कार्यभागी यांचा खातरा[4] श्रीमंतांनीं पुरविला, त्यामुळें ते प्रस्तुत स्वस्थ चित्तें आहेत. 'हैदरअल्लीचा मनसबा करून माघारे गेल्या नंतर पायांवरी डोई ठेऊं ह्मणोन बोलिले[6].' ऐसें तुम्हांकडूनच लिहिल्यांत आलें होतें. ते स्वस्थ असतील; परंतु श्रीमंतांजवळ नाना अर्थ कल्पून (सांगणारे) सांगतात. मागती ढोणा करावा हाच त्यांचा मनसबा! तूर्त पुरंदराकडील कांहीं वर्तमान कळत नाहीं. राजश्री नीलकंठराव आ[7] श्रीमंता पासोन आले ते सासवडीं होते. सध्या त्यांचें राजकारण काय, कोळी[8] यांचा विचार काय, हें कळलें नाहीं. तुमच्या मंडळींत कोणास पुरंदरची संभूतवार्ता ही तुम्हांसहित कोणास कांहीं दखल नाहीं हें फारच श्रीनें उत्तम केलें! पुण्याकडील अधिकोत्तर कांहीं लिहिणेंसें नाहीं. पुरंदरचें व नीलकंठ महादेव यांचें कांहीं लिहिलें आलें नाहीं.

---

१ दादासाहेब. २ चावडस हें खेडें नाशिकापासून मैल दीड मैलावर आहे. चावडस व आनंदवल्ली एकच. दादासाहेबांची बायको आनंदीबाई हिच्या नांवावरून या खेड्यास आनंदवल्ली हें नांव पडलें. आनंदीबाईची या स्थळावर फार प्रीति होती व तिच्या मनांत येथील वस्ती वाढवीत वाढवीत नाशिकापर्यंत न्यावी असें होतें. ३ कार्यभागी ह्मणजे कारभारी सखारामबापू व त्याच्या पक्षाची मंडळी पुरंदरे वगैरे यांच्या हातीं आजपर्यंत पुरंदरचा किल्ला होता तो त्यां पासून पेशव्यांकडच्या लोकांनीं घेतल्यामुळें. ४ काळजी. ५ हा स्त्रीलिंगी शब्द प्रचारांत आहेच. पुल्लिंगीरूप हें प्रथमच येथें पहाण्यांत आलें! ६ रावसाहेब पेशवे बोलले. ७ ज्यांच्या ताब्यांत या पूर्वी पुरंदर होता ते आद्य पुरंदरे दादासाहेबांकडून नाशिकाहून निघून सासवडास आले. ८ पुरंदरावरचे जुने गडकरी ज्यानीं पुरंदऱ्यांस हुसकून लाविलें ते.

आलिया उपरी लिहूं. नीलकंठ महादेव किरकोळ जमाव ठेवितात. चोंहों-कडून बंदोबस्ती करावी (असा त्यांचा हेतु आहे,) असा मजकूर ऐकितों. श्रीमंत दादासाहेबांकडे जखमेचें[1] वर्तमान लिहिलेंच असेल. अलीकडे महिना दोन महिना[2] पत्र पाठवीत जावें. आपलें काय गेलें ! मर्जी रक्षावी ! एवंच हे[3] गृहस्थ निर्माल्यवत् भासले. आम्हास दिवसेंदिवस उतार श्रीकृपेनें होईल. चिंता न करणें. अन्नावरी वासना नाहीं. वैद्याचें औषध घेतों. पथ्याखालीं बुडालों ! घर्म दिवसांत पांच सात वेळ व रात्री पांच सात वेळ येतो त्यानें तिळमात्र शक्ति नाहीं. अक्षर वाईट लिहिलें तरी तुमचें समाधान राहणार नाहीं यास्तव जपून लिहिलें. चिरंजीव आबांचें[4] मूल प्रस्तुत बरें आहे. आबा गेलिया उपरी दोन चार दिवस फारच गळबटलें होतें. वरकड आमची चिंता न करणें. तुमची खर्चाची चिंता करावी तो हे अवस्था आमची ! आम्ही बाहेर बसों लागलों म्हणजे कोठें तरतूद करून दहा पांच पाठवूं.[5] तूर्त परगणे यांची जमाबंदी नाहीं. वसूल नाहीं. पाऊस झाला. पेरणीचा हंगाम आहे. आम्ही स्वस्थ नाहीं तो कांहीं नाहीं. वरकड दरबारी (कामा) विशीं व सर्वांविशीं चिरंजीव पंढरीनाथ[6] आहेत. बहुत काय लिहिणें. तुम्हीं सावधपणें राहणें. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

---

१ गोपाळरावास ही नवी कोठें जखम झाली होती कीं काय ? हलसंगीच्या ठाण्यावर हल्ला करिताना त्यास जखम लागली होती तिला तर चार महिने झाले होते. इतकी शिळी बातमी दादासाहेबांस लिहून पाठविण्या विषयीं गोविंद हरि गोपाळरावास सांगेलसें वाटत नाहीं. २ महिन्या दोन महिन्यांत एखादें. ३ हे कोण ? ४ मोरो बल्लाळ उर्फ मोरोबा आबाचें. ५ ‘ आजारांतून उठून आम्हीं कचेरींत येऊन बसूं लागलों म्हणजे दहा पांच हजार रुपये कर्ज मिळवून पाठवून देऊं ’ असा अभिप्राय. ज्याच्या ताब्यांत चोवीस लक्ष रुपये सालिना उत्पन्नाचा मुलूख त्यास दहा पांच हजार रुपये कर्ज मिळण्यास इतकी यातायात ! ६ गोविंद हरीचा तिसरा मुलगा पांडुरंगराव गोविंद.

नं० ४३६.

(ज्येष्ठ शुद्ध तृतीया
२ जून.)

श्रीगणराज.

अपत्यें नीलकंठानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तुंगभद्रातीरीं छावणीस जावयाचा मनसबा होता तो राहिला. धारवाडचे आसपास छावणी करावी असें म्हणतात. परंतु इतबार दिसत नाहीं. पुरंदर, रुद्रमाळ गेली यामुळें [3]ते आपले जागां श्रमी. आपणावर निमित्त न घेतां कोणावर तरी निमित्त घालून परत पुण्यास जावें या मनसब्यांत आहेत. कोणीच निमित्त घेत नाहींत, ते म्हणतात तें सर्व मान्य करितात, यामुळें त्यांस संधि सांपडत नाहीं. हैदरनाईक मासुरावर आहे. मीर फैजुल्ला व कांहीं सामान आज हनगलास आला आहे. सावनूर टाकून धारवाडास श्रीमंत जाणार आहेत. येथें[4] काल आले. आज येथें मुक्काम झाला. उदईक काय मनसबा होतो पहावें. हे जसे जसे पुढें जातील तशीं तशीं आलीं तीं ठाणीं त्याचे हातास लागतील. छावणीस राहणें व्हावयाचें दिसत नाहीं. छावणीस राहते तरी तो सहजांत हैदर हतप्रभ होतो. सोंधेकरांनीं सोंधें घेतलेंच होतें. सावनूरचा मुलुख सुटला होता. राहतां बिदनूर प्रांत राहिला होता. बाकी उरकलेंच होतें. धारवाड छावणींतच विल्हेस लागलें असतें. पुरंदर, रुद्रमाळ गेली याजमुळें मोठाच कलह उत्पन्न झाला. श्रीमंतांची दौलत लयास जावयाचा प्रकार करिते करितात! परंतु मातबर घरांवर आग आ-

१ पत्र नीलकंठराव त्रिंबक याचें त्रिंबक हरीस. २ मनसबा पेशव्यांचा. ३ सखारामबापू. पुण्यास परत जाण्याचा कावा त्याचाच होता. ४ कुंदगोळ जिल्हा धारवाड येथें. ५ श्रीमंत जसजसे धारवाडाकडे जातील तसतशीं त्यांच्या हातास आलेलीं ठाणीं मागून हैदर येऊन घेईल. ६ शत्रूच्या हातून निघून आपल्या हातीं आला होता. ७ दादासाहेब व रावसाहेब यांत कलह. ८ कारस्थानें करणारे. ९ ह्मणजे खुद्द पेशव्यांच्या घरावर!

णून घातली आहे ! किलाफ तुटून सरळ प्रकार चालत होता त्यांत हा प्रकार झाला. ईश्वरी इच्छेस उपाय नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० ४३७

(२ जून.)

श्रीगणपति.

अपत्यें परशुरामानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. ज्येष्ठ शु॥ २ मंदवासरे मुक्काम लष्कर नजिक कुंदगोळ. वडिलांचे आशीर्वादें यथास्थित असे. विशेष. इकडील वृत्तांत तर श्रीमंतांची व हैदरनाइकाची गांठ पडलियाचें सविस्तर पेशजी वडिलांस लिहिलेवरून विदित जालें असेल. या अलीकडील मजकूर तरी यवन झाडींत मायनहळ्ळीकडे तीन कोसांवर गेला. तेथें राउतांचा उपाय नाहीं. दुसरें पर्जन्यकाळ आला. पर्जन्यानें ही (लष्कर) हैराण केलें व घोड्यांस वैरण न मिळे. अशा दोन तीन कारणानीं प्रती (?) मुक्कामाहून कूच दर कूच या प्रांतीं येथें आलों. आणखी दोन चार मुक्काम दोन चार कोशीं आहेत. मग छावणीचे जागे नेमून राहतील. एवंच छावणीची मसलत सिद्ध जाली. सावनूरकरास पन्नास हजार रुपये द्यावे, त्याणें सावनूर जागा राखावी, (असें ठरलें) सावनुरापासून आमचीं पथकें दाहा कोसांवर (श्रीमंत) ठेवणार. आम्हांपासून दहा कोसांवर श्रीमंतानीं रहावें असा करार जाला. आठ चार रोज या प्रांतीं आहेत. मग आपले आपले जागे पाहून सोईनुसार आठ दहा कोसांवर ज्यांस जेथें ठेवतील त्या प्रमाणें तेथें राहतील. सविस्तर मागाहून सेवेशीं लिहून पाठवूं. वरकड सविस्तर तीर्थस्वरूप याणीं लिहिलें आहे त्याजवरून विदित होईल. सर्व मंडळी सुखरूप असों. हे विज्ञापना.

---

१ संशय, धास्ती. २ पत्र परशुरामभाऊचें लिं॰ हरीस. ३ रटेहळ्ळीच्या लढाईतली गांठ. ४ थोरला चुलत भाऊ नीलकंठराव याणें.

नं० ४३८

(ज्येष्ठ शुद्ध पंचमी
४ जून.)

गोविंद शिवराम खासगीवाले यांचें गोविंद हरीस पत्र
३ जिल्हेजचें नाशिकाहून—

" इकडील वर्तमान तर श्रीमंत प्रस्तुत चावडसेंत वाडा बांधून राहिले आहेत. आठ पंधरा दिवसांत त्रिंबकास जाऊं म्हणतात. कारभार तो कांहींच नाहीं. स्नान संध्या करून आहेत. तूर्त या प्रांतांतून कोठें जातां दिसत नाहींत. श्रीमंत रायांची स्वारी कर्नाटक प्रांताहून आलियावरी जो विचार होणें तो होईल. "

नं० ४३९

[१२ जून.]

श्रीगणपतिर्जयति.

श्रियेसह चिरंजीव राजश्री रावसाहेब यांप्रती गोविंद हरी. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी भौमवार प्रातःकाळ जाणोन स्वकीय लेखन करणें. विशेष. तुम्हीं चतुर्थीचीं पत्रें सांवशीचे मुक्कामाहून पाठविलीं तीं येथें पांचवे दिवशीं प्रविष्ट होऊन लिहिलें वर्तमान सविस्तरें कळलें. ' श्रीमंत तर निश्चय पूर्वक छावणीस राहिले. या उपरि संशय नाहीं; ' ह्मणोन पत्रीं लिहिलें, त्यास छावणीस राहिले, ही मसलत पक्की जाहली येणें करून सरकारचा तालुका सुटेल[3]. सावनूरकर व राजश्री मुरारराऊ घोरपडे हे उभयतां [श्रीमंतांच्या] पदरीं पडले त्यांचा बचाव जाहला. पुढें चार महिने नंतर शत्रूचा ही उपमर्द होईल.

---

१ पेशव्यांची. २ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ३ शत्रूच्या वेधांतून मोकळा होईल.

संस्थानीक खंडण्या देतील. छावणीस राहिल्यामुळें बहुतेक कामें जाहलीं. सध्या लक्ष्मेश्वर तालुका दाणा वैरणी करितां मोडला. राहिलीं तीं ही खेडीं मोडतात. उपाय नाहीं. सरंजामाच्या ह्या गती ! फौज तो अगर्दी बाळगावी. सरकारांतून ऐवज कांहीं येणें नाहीं. कर्जाशीं गांठी. मागील कर्जदारांचें (कर्ज) वारणें नाहीं. तेव्हां पुढें तरी कर्ज कोण देतो ? ही कांक्षा चित्तांत आणोन तुम्हीं कांहीं तेथें बोलावें, तरी तितकेंच निमित्य करून निघोनं येणार ! यास्तव तुम्ही कांहीं न बोलतां दम धरून सर्वा बराबर राहिलां, उत्तम केलें. वैरकडांचा सरंजाम निखालस, त्यांस सुंदामत वसूल येतो, हें श्रीमंतांच्या ध्यानांत असावें. तुम्ही तो एकनिष्ठपणें फौजेसह वर्तमान सेवा करीतच आहां. चिरंजीव राजश्री आबा येथून पंचमी इंदुवारीं म्हैसाळचे मुक्कामास गेले. ते आजला तुम्हांजवळ पोंहचले असतील. इकडील सविस्तर वर्तमान त्यांनीं तुम्हांस सांगितलेंच असेल. त्यां समागमेंच पत्रें लिहून जासूद जोडी तुम्हांकडे रवाना केली तीं पत्रें हीं पावलीं असतील. प्रस्तुत अधिकोत्तर कांहीं लिहिणेंसें नाहीं. वरकड इकडील पुरवणीपत्रें लिहिलें वरून कळेल. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे. हे आशीर्वाद.

अपत्यें पांडुरंगानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. वाडिलांचे शरीरीं अद्याप सावकाश नाहीं, याजकरितां काल द्वादशी इंदुवारीं तुलापुरुषदान

---

१ ' पेशवे छावणीस राहिल्यामुळें आमचा फायदा व्हावा तो न होतां त्यांच्या लष्करानें दाणा वैरणीचा उपद्रव दिल्यामुळें आमच्या जहागिरी पैकीं लक्ष्मेश्वर तालुका ओसाड पडला. कांहीं खेडीं अलग राहिलीं असतील त्यांची ही धूळधाण होईल. ' असा अभिप्राय. २ फौजेच्या खर्चास सरकारांतून सरंजामी मुलूख मिळाला त्याची ही दुर्दशा, आणि ठरावा प्रमाणें आठ हजार फौज तर आम्हांस चाकरीस ठेवणें भाग पडतें, जितका वसूल येईल तितक्या पुरती फौज बाळगून चालत नाहीं, ' असा अभिप्राय. अगर्दी ह्मणजे सर्व. ३ निघोन परत पुण्यास येणार सखारामबापू. ४ इतर सरदारांचा. ५ निर्वेध. ६ सरळपणानें. ७ हीं नं० ४४१ व नं० ४४२ चीं.

सांग कुंडमंडप घालून यथाविधीनें केलें. ब्राम्हण चांगलेच होते. वडिलांस अतःपर उतार पडेल. वडिलांविशीं किमपि चिंता न करावी. इकडे पाऊस चांगलाच जाहला. खरीपाच्या पेरण्या जाहल्या. सेवेशीं विदित होय. इकडील इमारतीचें व खंदकाचें काम तीर्थरूप आबा सांगतीलच. कळावें. बहुत काय लिहिणें. हे विज्ञापना.

नं० ४४०

(ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी
१२ जून)

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीवांस आशीर्वाद[1]. उपरी. आमचे शरिरीं स्वस्थ नाहीं. त्यास सर्वांच्या विचारें जो जो उपाय करण तो तो केला त्यावरून किंचित् उपशम जाहला. तेव्हां चिरंजीव राजश्री आबास पचमी इदुवारीं उत्तम मुहूर्तें निरोप देऊन तुम्हांकडे रवाना केले. त्याणीं जातानां सांगितलें कीं, निःशेष आरोग्यार्थ तुळा करावी. त्याजवर कृतसंकल्प करून काल इंदुवारीं द्वादशीस तुळा केली. करवीर व सौदलगे (व) कुरुक्षेत्रे व समस्त या देशींचे ब्राम्हण आले होते. ब्राम्हणभोजन आदिकरून यथासांग जाहलें. या उपरी आरोग्यकर्ता श्रीभगवान् आहे. तीर्थरूप राजश्री आपा[3] कुरुंदवा-डाहून[2] आले होते. तुम्हांस कळावें ह्मणोन लिहिलें आहे. आम्हाविशीं चिंता न करावी. चिरंजीव दौघी[4] जाणार होते ते तुळ करितां राहिले. या उपरी जातील. [श्रीमंतांची त्या प्रांतीं] छावणी जाहली, बरें जाहलें. तुमचा प्रांत बुडाला, उपाय नाहीं. श्रीकृपेनें उतार पडलिया उपरी मागती पत्रें पाठवितों. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. वरकड पुरवण्या लिहि-

---

१ पत्र गोविंद हरीचें सर्व चिरंजीव मंडळीस. मुख्यत्वें गोपाळरावास. २ कुरुंदवाड. ३ वडिल बंधु त्रिंबक हरि. ४ पुतण्या पुरुषोत्तमराव कृष्ण.

त्या आहेत त्यांतील मजकूर तुमच्या ध्यानास आला [तरी] मुख्यांस श्रुत करावा. न आला तरी आग्रह नाहीं. हे आशीर्वाद.

अपत्यें पुरुषोत्तमानें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ईश्वर कृपेनें तुळादान उत्तम प्रकारें जाहलें. सहस्त्रपात्र जाहलें. ब्राम्हण उत्तम मिळाले होते. कुंडमंडप विधान पूर्वक अनुष्ठान जाहलें. तीर्थरूप आपा आले होते. आज गेले. वडील मजला आज्ञा देतील त्या दिवशीं जाईन. आज्ञे शिवाय जात नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० ४४१

(ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी
१२ जून)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. तुळा करिते समयीं प्रथम भाताची, दुसरी गुळाची, तिसरी मिठाची, चवथी लोखंडाची या प्रमाणें चार तुळा करून पांचवी तुळा मुख्य केली. ब्राह्मण वैदिक सातशें पावेतों आगंतुक (सुद्धां) मिळाले होते. शिवाय ऋत्विज, आचार्य व ईत्यादि मिळोन संतर्पण सहस्र ब्राम्हणांचें जाहलें. दक्षणा पात्रापात्र पाहून दोन, तीन, चार, पांच रुपये पावेतों तुळेपैकींच दिल्हे. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें लोभ कीजे. हे आशीर्वाद.

नं० ४४२

[१४ जून]

श्री.

सेवेशीं विष्णु कृष्ण साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल

१ पेशव्यांस. २ गोविंद हरि. ३ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ४ या 'इत्यादि' मध्यें वशिलेवाल्यांचीच गर्दी असावयाची! ५ पत्र लिहिणारा कारकुनां

तागायत ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमापर्यंत यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन आज्ञा करीत असावें. विशेष. तीर्थस्वरूप राजश्री नानांची शरीर भावना तर—ज्वर नाहीं. किंचित् उष्ण मात्र शरीर असतें. परंतु घर्म फार. त्या मुळें अन्नावर वासना नाहीं. अन्न नाहीं यामुळें शरीरांत शक्ति नाहीं. (ते) धीरवंत पुरुष, यास्तव व्यंग तिळमात्र दाखवीत नाहीं. वरकड यत्नांस कोणी अंतर करीत नाहीं. वैद्य उपाय होत आहे. अंगांत शक्ति नाहीं यास्तव भारी कटु काढे घ्यावयास ताकत नाहीं ह्मणोन अनमान करितात. यास्तव इसलामपुरकर शिवराम भट्ट वैद्य आणिले होते. राजश्री आबा [येथें] असतां वैद्यानीं एक मास राहण्याचा करार केला होता. आबा गेल्या नंतर दुसरे दिवशीं इसलामपुराहून त्यांचे यजमानाचे कागद आले कीं, ' पत्रदर्शनीं येणें. ' हें निमित्य वैद्यास सांपडतांच पंरिच्छिन्न त्याणीं निरोप मागितला कीं, ' मी जशीं ओखदें देईन तशीं घेतलीं तर राहतों, नाहीं तर जातों ! ' आम्हीं सांगितलें कीं, त्यांचे शरीरांत ताकत उठावयास नाहीं. आणि तुम्हीं कठीण काढे दिलियानें जीव कसा वांचेल? मात्रा देणें. त्यावरून त्याणीं निमित्य करून आग्रहें करून निरोप घेऊन फलत्यागपण करून घरास गेले. तदोत्तर तुळा महादान उत्तम प्रकारें झालें. आठें पावेतों लागले. कांहीं किरकोळ साहित्य मिळोन हजार अधिक लागतील. यथासांग दान झालें. या उपर उतार पडावासा दिसतो. आजपर्यंत गुण नाहीं, परंतु महादानाचा गुण आहे. करवीरकर विद्याधर जोशी वैद्य येथें आले होते. वैद्य चांगले आहेत. परंतु तिरस्कारी पंधरावें

पैकीं विश्वासू गृहस्थ असून गोविंद हरीचा आप्त होता. त्यानें हें गोपाळरावास पत्र लिहिलें आहे.

१ गोविंद हरीची. २ सातारकर महाराजांच्या अष्टप्रधानां पैकीं मंत्री यांची पूर्वी पासून राहण्याची जागा इसलामपुर जिल्हा सातारा ही आहे. गोविंद हरीस औषध देणारा वैद्य मंत्र्यांच्या पदरचा होता. ३ निग्रहपूर्वक. ४ आठ हजार. ५ तुसडा ६ पंधरावें रत्न !

आहे ! त्याची प्रार्थना करून पंधरा दिवस ठेऊन घेतले आहेत. वैद्य चमत्कारिक आहेत असें म्हणतात. फल देता ईश्वर आहे. दैवी मानवी उपायांस तिलमात्र ही अंतर करीत नाहीं. वडिलांचा ही भाराभार श्रीपंढरिनाथावर आहे. तो कृपा करील. आपण चिंता सहसा न करावी. आम्हांस; घराहून येथें येऊन एक महिना झाला. वोखद पथ्यास कांहींशी भीड[1] मानितात, यास्तव आम्हास राहणें जरूर लागलें. आपणास तो इकडील अहोरात्र चिंता. पुढें फौजेच्या नालबंदीची व पोटाची काळजी एव व राजश्री मेघश्यामराव[2] याच्या सुटकेची चिंता. ऐशा फारच वेदना प्राप्त झाल्या आहेत, त्यास वडिलांचे पुण्यप्रतापें करून सर्व क्षेम होईल. शरीर उत्तम प्रकारें रक्षावें. बहुत काय लिहिणें लोभ असों द्यावा हे विज्ञापना.

नं० ४४३

(ज्येष्ठ वद्य द्वितीया
१५ जून)

गोविंद शिवराम खासगीवाले यांचें नाशिकाहून १४ जिल्हेजचें पत्र गोपाळरावास—

" तुमची छावणी तिकडेच[3] झाली तरी येथें श्रीमंतांसें[4] मनसबा सांगून यांजला तयार करून कांहीं तोफखाना, कांहीं गाडदी व फौज जमा करून श्रावण मासीं निघोन भाद्रपद मासीं श्रीमंत दादासाहेबांस घेऊन आपणाकडे येतों. "

---

१ आम्ही आग्रह पथ्य व औषध घेण्या संबंधें केला तर गोविंद हरि ऐकितात. २ गोपाळरावाचा चुलत बंधु मेघश्यामराव कृष्ण हा हैदराकडे पाडाव सांपडलेला होता हें वाचक विसरले नसतीलच. ३ धारवाड प्रांतीं. ४ दादासाहेबांस.

नं० ४४४

(ज्येष्ठ वद्य अष्टमी
२१ जून)

शहाजीराजे भोंसले अक्कलकोटकर यांचें गोविंद हरीस
२० जिल्हेजचें पत्रः—

" राजश्री गोपाळराव फौज सहित सावनुरीं रहावयास गेले. नील-कंठराव ही तिकडेच गेले. आम्हीं व रास्ते व विठ्ठल शिवदेव त्रिवर्ग फौज सुद्धां नवलगुंद प्रांतांत आहों. "

नं० ४४५

(१४ जून)

श्रीगणपतिर्जयति.

श्रियासह चिरंजीव राजश्री रावसाहेब यां प्रती गोविंद हरि. आशी-र्वाद उपरी. येथील कुशल तागायत ज्येष्ठ वद्य प्रतिपदा गुरुवार जाणोन स्वकीय लेखन करणें. विशेष. तुम्हांकडून तृतीयेचीं पत्रें सांवशीचे मुक्का-माहून येऊन वर्तमान कळलें. त्या अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. प्रस्तुत कोणत्या मुक्कामीं आहां, श्रीमंत कमडोळीच्या मुक्कामीं होते ते सध्यां कोठें आहेत, काय वर्तमान, हैदरअल्ली कोठें आहे, मीरफैजुल्ला बारी उतरून हनगळच्या रोखें आला होता तो सांप्रत कोठें आहे, हें सविस्तर लिहून पाठवावें. इकडील वर्तमान आद्यंत लिहून मुद्दाम खंडोजी जासूद व येसाजी जासूद काल प्रातःकाळींच तुम्हांकडे रवाना केले आहेत. तीं पत्रें प्रविष्ठ झाल्या नंतर सर्व वृत्त कळेल. आमचे शरीरभावनेचा मजकूर तरी द्वादशी इंदुवारीं तुला जाहली. त्यानंतर अलीकडे दोन दिवस शरीरीं सावकाश आहे. दीड महिना पावेतों ज्वर व कफ इत्यादि फारच दुखणें

१ गोपाळराव. २ मासूरची बारी. ३ स्वस्थपणा.

आलें होतें त्यामुळें अद्याप शक्ति नाहीं. अतःपर येईल. तुम्हीं चिंता न करणें. छावणीस श्रीमंत राहिले हा एक पक्ष उत्तम. सध्या तुमचा सरंजाम बुडाला, उपाय नाहीं. चितापुराकडील वर्तमान शिबारडी देसाई याणीं तमाम खेडींपाडीं घेतलीं होतीं. त्यावरी राजश्री विठोजी चव्हाण आपल्या जमावानिशीं नबाबाकडे जात होते त्यांस शिबारडी जाऊन भेटला. उभयतां एकरूप होऊन खुद्द चितापुरावरी गेले. अडीच तीन हजार पावेतों प्यादे व स्वार दीड हजार पावेतों जमाव होता. नबाब काडलूर संगमाकडे आला तेव्हां आधींच शहर ओस जाहलें होतें. गढींत प्यादे मात्र होते. याणीं जातांच शहर घेतलें. वाडियास मोर्चे लाविले होते. घेतला असेल. या प्रमाणें राजश्री हरी नारायण मैंदर्गीस आहेत त्यांचीं पत्रें तीर्थरूप राजश्री आपास आलीं होतीं. तुम्हास कळावें ह्मणोन लिहिलें आहे. हैबतराव बंडगर जाधवरायास जाऊन भेटला. त्याणीं आश्वासन दिलें. सध्यां केसरनवलग्यास राहुन अक्कलकोट प्रांतचीं खेडीं दुसरदेचीं यांजवरीं स्वाऱ्या शिकाऱ्या करितात. त्याच प्रमाणें मैंदर्गीवरी. सारांश तो सरंजाम ही बुडाला. कोठें पैशास जागा नाहीं. या प्रमाणें वर्तमान आहे. तुम्हीं

१ श्रीमंतांच्या लष्कराच्या उपद्रवामुळें. २ चितापुर मोंगलाईत मुद्गल शहराच्या वायव्येस तेरा मैलांवर आहे. तिकडील वर्तमान गोपाळरावास लिहिण्याचें कारण मोंगलाईच्या हद्दीस लागूनच पटवर्धनांची जहागीर आहे. शिवाय चितापुर वगैरे 'पंचमहालां' तील तालुक्यांची मामलेदारी नीलकंठराव पटवर्धन कुरुंदवाडकर यानीं केलेली असतां रसदेचा पैका बुडाला होता तो त्यास अद्यापि वसूल करावयाचा होता. ३ त्यानंतर. ४ रायचुराजवळ भीमा व कृष्णा यांचा संगम होतो त्याचें हें नांव. निजामअल्ली आपला बंधु अदवानीकर बसालतजंग याजवर स्वारी करण्या करितां निघाला होता व त्याचें लष्कर कृष्णा उतरण्या करितां या वेळीं काडलूरसंगमावर आलें होतें. ५ मैंदर्गी जिल्हा सोलापुर हा पटवर्धनी जहागिरी पैकीं गांव कुरुंदवाडकरांच्या वांटणींत आहे. ६ हा अक्कलकोटकरांचा सरदार असून याचा सरंजाम कुरुंदवाडकरांकडे देवघेवी संबंधें जप्तींत होता. ७ दोन्ही सरहद्दीचीं. मोंगलाईंतलीं व अक्कलकोटकरांचीं.

वर्गणीची पोंच.

सन १८९८ । ९९

(ता. २१ दिसेंबर पासून २१ जानेवारी पर्यंत.)

	रु०
पुढील सालची आगाऊ	
न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे. मुंबई	३
मागील व चालू वर्षाची.	
रा. रा. सेक्रेटरी ने. ज. लायब्ररी. कवठें महाकाळ.	४
चालू वर्षाची.	
श्रीमंत रावराजे रघुनाथराव दिनकर राजवाडे. ग्वाल्हेर.	३
रा. रा. सेक्रेटरी. ने. ज लायब्ररी. इचलकरंजी	३
” ” दत्तात्रय तुकारामभट पणशीकर. शिरोडें.	२
मि० अर्देसर पालनजी तारापुरवाला. बिस्वापुर. जि०कर्नूळ.	२
रा. सा. रामचंद्र बल्लाळ फणसळकर. पुणें.	३
रा. रा. कृष्णाजी हरि गोखले. ”	३
रा. ब. रावजी त्र्यंबक नगरकर. ”	३
रा. सा. माधवराव केशव कुमठेकर ”	३
मेसर्स विष्णु सदाशिव आणि कंपनी. सीडसमेन. ”	३
रा. रा. रामचंद्र दाजी मोघे. ”	३
” ” गंगाधर केशव देशपांडे. ”	३
” ” विठ्ठल रघुनाथ तुळपुळे वकील. ”	३
मि० भास्कर नानजी कोटक. ”	३

ऐ. ले. संग्रह कर्ते.

ऐतिहासिक-लेख-संग्रह.

हें डेमी अष्टपत्री सांचाच्या चाळीस पृष्ठांचें मासिक पुस्तक दर महिन्यास मिरज येथें नियमानें प्रसिद्ध होत असतें. यांत पटवर्धन जहागीरदारांच्या जुन्या चिटणिशी दप्तरांतील ऐतिहासिक महत्वाचीं व प्रत्येक स्वारीतील भरपूर माहितीचीं पत्रें सालवारीच्या क्रमानें छापून प्रसिद्ध होत असतात. शिवाय अन्यत्र उपलब्ध झालेले कागदपत्र व बखरी वगैरेचा ही यांत समावेश होत असतो. या मासिक पुस्तकाची आगाऊ किंमत सालिना टं० हा० सुद्धां तीन रुपये आहे. ग्राहकांनीं सालिना वर्गणीच्या किंमतीचें व्हा० पे० मागवावें अथवा तितक्या रकमेची मनीआर्डर पाठवावी. त्या शिवाय पुस्तक सुरू केलें जाणार नाहीं.

ऐ० ले० संग्रह कर्ते.

आमचे पुणें व मुंबई येथील एजंट.

रा.रा. मुरलीधर मल्हार अत्रे, महाराष्ट्र बुकडेपोचे म्यानेजर, बुधवार पेठ पुणें. रा.रा. विष्णु दासो बनहट्टी. कमिशन एजन्ट आणि जनरल मर्चंट. गिरगांव ट्रामवे टरमिनस् पेंडसे यांची नवी चाळ, मुंबई

सदरहू दोन असामींस आह्मीं ऐ ले० संग्रहाचे एजंट नेमिलें आहे. त्यांजकडे तेथील वर्गणीदारानीं वर्गणी द्यावी. आमचीं सर्व पुस्तकें एजंटांकडे विकत मिळतील.

ऐ० ले० संग्रह-कर्ते.

ऐतिहासिक-लेख-संग्रह.

मासिक पुस्तक.

मार्च. १८९९ इ०.

अंक २२

वासुदेव वामन शास्त्री खरे
मिरज हायस्कुलांतील संस्कृत शिक्षक.
यांनी

कुरुंदवाड येथें
" भाऊनाना " छापखान्यांत छापविलें.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हांशीलसह तीन रुपये.

फुटकळ अंकास पांच आणे.

ऐतिहासिक-लेख-संग्रह.
अंक बाविसावा

विषयांचा अनुक्रम. पृष्ठ

सूचना

बहुत सावधपणें वर्तणूक करीत जाणें. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे हे आशीर्वाद.

आपत्यें पांडुरंगानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. वडिलांचे शरीरीं अद्याप निक्षुन उतार पडला नाहीं. ईश्वरदयेकरून लौकरच उतार पडेल. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं० ४४६

(ज्येष्ठ वद्य दशमी
२३ जून.)

श्रीगणपतिर्जयति

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ० २२ जिल्हेज जाणोन स्वकीय कुशल लिहिणें विशेष. राजश्री बाळाजी नरसिंव्ह याज. बरोबर लोखंडीच्या मुक्कामचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. तेथें लिहिलें कीं, " श्रीमंतांनी आज्ञा केली होती कीं आम्ही लांबत आलों. धारवाडकर व बंकापूरकर उपद्रव करून ठाणीं उठवितील. त्यांचा उपराळा असावा यास्तव तुम्ही व रास्ते व शहाजी भोंसले व नरसिंगराव घायगुडे ऐसे नवलगुंद, बेहट्टी, हुबळी, मुलगुंद यांत असावें. त्याजवरून तुम्ही विनंती केली कीं, आपण मुद्गल सरकारांत जाणार, तेव्हां आम्हांस या रानीं ठेवितां तर पोटास मिळत नाहीं. आमचा सरंजाम काय आणि फौज काय किती ठेविली, हा अर्थ चित्तांत आणून काय आज्ञा करणें ती करावी; म्हणोन विनंती केली. उपर श्रीमंत बोलिले जे, 'आम्हांजवळ काय आहे हें तुम्ही जाणतच आहां. मग लटकें कशास बोलावें! तुम्ही कसेंही करावें, ' म्हणाले. उपर तुम्ही तोंड काढिली जे, 'आम्हीं आज्ञेवरून पुढें जातों. तुम्हीं

१ पत्र गोविंदहरीचें गोपाळरावास. २ आम्हीं घेतलेलीं ठाणीं बंकापुर व धारवाड या किल्ल्यांतले हैदराचे लोक पुनः घेतील. ३ या तालुक्यांत.

ही यावें. नवलगुंद नरगुंद जालिहाळ या प्रांतें दाणावैरण विपुल महिन्या दो महिन्यांची बेगमी आहे. तुम्ही नजीक असल्यास मग आठ दहा कोस पुढें मागें राहूं. दूर गेल्यानें आज मसलतीस उपयोग नाहीं. व स्वामी त्या वळणीं गेल्यानें पैका ही मिळत नाहीं. आणि हा प्रांत घेतला हा अगदीं (हातचा) जातो. मागती घ्यावयास संकट आहे.' ह्मणोन मागती विनंती केली. तदोत्तर हाच ठराव जाहला;" ह्मणोन लिहिलें. हाच ठराव जाहला ह्मणोन बहुत उपयोगीं पडलें. घेतला मुलूख राहिला आणि त्यास ही दबा कीं श्रीमंत याच प्रांतें जवळ आहेत, तेव्हां तो ही कोणे गोष्टीचा उपद्रव करणार नाहीं. तुम्हीं पुढें नवलगुंदच्या रोखें गेलां. बरोबर दोन तीन तोफा ही आहेत. व श्रीमंत ही अलंवेडी कोटूर घेऊन तुमचेच रोखें येणार ह्मणोन लिहिलें तें कळलें. तुह्मी मसलत दिली आणि हा ठराव जाहला येणें करून तुमचे उपयोगी पडलें. नाहींतर तुह्मांवर आरोप इतकाच ठेविते! तूर्त हैदरनाईक कोणे स्थळीं आहे हें वर्तमान लिहिणें. चिरंजीव मेघश्यामरायाकडे माणसें पाठविलीं त्याचें उत्तर काय आलें तें लिहिणें. दामोदर कृष्ण आल्याचें वर्तमान लिहिलें तें कळलें. त्याणें आपले मातबरांस मसलत पुसिली तें कळलें. मुख्य गोष्ट, छावणी झाली येणेंकरून लौकिक राहिला. चिरंजीव बापूकडील वर्तमान येईल तें लिहिणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० ४४७

(ज्येष्ठ वद्य दशमी
२३ जून.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. हैदरनाईक अनवडीजड्यानजीक होता तेथून कूच

---

१ पुनः २ हीं दोन स्थळें कोठें आहेत समजत नाहीं. ३ हा पटवर्धनांचा एक कारकून. ४ मातबर सरदारांस. ५ ही मसलत कोणची हें पुढच्याच पत्रांत आहे. ६ जडे व अनवडी हीं गांवें शेजारशेजारींच आहेत.

करून खासा माघारा मूरआगडीस[1] गेला ह्मणोन लिहिलें तें कळलें. श्रीमंतानीं छावणी केली याजवरून त्यानें मातबर बोलावून सर्वांस मसलत पुसिली जे, 'पुढें काय मनसबा करावा?' तेव्हां मिर्झा कादल बेग बोलिला जे, 'तुमच्यां[2] पुढें कोणी रहात नाहीं.' ऐसें बोलतांच त्यासे[3] राग आला आणि त्यांसे[4] दरबार मना करून चौकीवर बसविला. मग सर्व सरदारांस बोलावून पुसलें तेव्हां सर्वांनीं मसलत सांगितली जे, 'श्रीमंत थोर. यार्णी जो दिल्लीस पादशहा करावा तोच करार[5] व्हावा ऐसें ज्यांचें प्राक्तन! व दक्षिणेंत निजामनमुलूखातागायत त्यांचा[6] यांचा बिघाड (चालत आहे.) परंतु दर सालीं हेच वीस पंचवीस लक्षांचा मुलूख घेत गेले. गुदस्तां मोंगलाचा इतका पराक्रम जाहला असतां अखेरीस (मोगल यार्णीच) बुडविला.' ऐसें सर्व सरदारांनीं सांगितलेवर हीं[8] गोष्ट त्याचे मनास आली. आणि 'बरें' ह्मणून निरोप दिला. तेव्हां त्यानीं सर्वांनीं अर्ज करून मिर्झास कैदेंतून मुक्त केला. परंतु दरबार मना आहे. लहान माणसाच्यानें कांहीं थोर मसलत देववत नाहीं! लहानच देईल. परंतु सर्वांनीं मसलत चांगली दिली, येणें करून त्यांस[10] ही धास्त पडली. अतःपर महिन्या दोन महिनेनें पारिपत्य होईल किंवा सल्ला तरी निदानीं करील. मुख्य गोष्ट श्रीमंतांचें प्राक्तन विचित्र आहे. वरकड तरतूद ह्मणावी तर तीन हिस्से

---

१ हें स्थळ कोठें आहे कळत नाहीं. २ तुह्मां पुढें लढण्यास कोणी टिकणार नाहीं. तुह्मीं पेशव्याशीं लढाईच करा. तह करूं नका. ३ हैदरास मिर्झानें जर खरेपणानें मसलत दिली असेल तर त्याबद्दल त्यास दरबार मना होऊन शिवाय कैदेंत बसावें लागलें हें खासेंच बक्षीस मिळालें ह्मणावयाचें! हैदर असा अविचारी व लहरी स्वभावाचा होतासें वाटत नाहीं! ४ मिर्झास. ५ कायम. ६ मोंगलांचा. ७ लढाई. ८ श्रीमंत बलिष्ट, त्यांशीं तह करणें उत्तम, लढून निभाव लागणार नाहीं, अशीं सरदारानीं मसलत दिली ती हैदरास मानवली. ९ हैदराच्या छावणीतील बातमी गोपाळरावास कळली ती त्यानें गोविंद हरीस लिहून पाठविली होती. तिचा येथपर्यंत गोविंद हरीनें अनुवाद केला. १० हैदरास.

फौज सरदारांजवळ आणि वरकड देशास आली ! छावणी जाहली तर निदानीं फौज (श्रीमंतांजवळ) किती राहील तें लिहिणें. हे आशीर्वाद.

अपत्यें पांडुरंगानें दोन्ही कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. वडिलीं लिहिलें होतें कीं, दिवाणखान्या[1] पुढें कपाऱ्या खाबानें करणें. आणि मध्यें कट्टा करून हर जिनशी फुलझाडें लावणें ह्मणोन आज्ञा होती. त्यास आज्ञे प्रमाणें जितकें चांगलें झाड मिळेल तितकें लावीन. वहुत काय लिहिणें हे विनंती.

नं० ४४८L.

[ज्येष्ठ वद्य दशमी
२४ जून]

श्री

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें[2] चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० २२ जिल्हेज मुक्काम नजीक कोपेंळ[3] येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. पुरंदर किल्ला कोळ्यानीं दंगा करून घेतला हें वर्तमान आल्यावर सखारामपंतास सांगितलें. त्यास संशय आमचा वाटला. त्यास शफथपूर्वक त्याची खातरजमा केली. ज्याचा

---

१ हा गोपाळरावानें बहुत खर्च करून हौसेनें बांधविलेला दिवाणखाना अद्यापि उत्तम स्थितींत आहे. फुलझाडांचा ही त्यास नाद होतासें वरील मजकुरावरून दिसतें. घरीं राहून ऐषआराम भोगण्याची फुरसत मात्र त्यास यावज्जीव मिळाली नाहीं ! २ पत्र पेशव्यांचें गोपिकाबाईस. ३ मोंगलाईंत लिंगसुगुर जिल्ह्यांत सर सालरजंगाच्या घराण्याकडे जी जहागीर आहे तींत हा कोपळचा प्रख्यात डोंगरी किल्ला आहे. या पासून दीड मैलावर दुसरा एक डोंगरी किल्ला आहे त्याचें नांव बहादुरबिंडा. कर्नाटकच्या स्वारीहून शिवाजी महाराजानीं परत येतां येतां हे दोनी किल्ले घेतले होते.

निस्संदेह जाहला. परंतु धोंडोबा आपा आमचे जवळ बसतो, व धोंडो बाचा कारकून किल्यावर गेला, यास्तव मात्र लोकांस संदेह वाटतो. परंतु सखारामपंताची खातरजमा केली. त्यावरून त्यास संदेह नाहीं परंतु त्यास ही लोक चैन पडूं देत नाहींत! मनास येईल तें त्याजवळ सांगतात. परंतु किल्ल्याविषयीं संदेह दूर केला आहे. वडिलांस कळावें. पुरंदरचें वर्तमान कळल्यावर तीर्थरूपांस शफथपूर्वक पत्रें लिहून पाठविलीं होतीं. त्याचें उत्तर आलें तें वडिलांस दाखवूनच इकडे तीर्थरूपानीं पत्रें रवाना केलीं. परंतु तिसरी पुरवणी वडिलांस कळून आली किंवा नाहीं (हें कळत नाहीं.) यास्तव त्याची नक्कल सेवेशीं पाठविली आहे. व त्या पत्रांचें[3] उत्तर आम्ही व सखारामपंतानीं लिहून पाठविलें आहे. त्यावरून सर्व अर्थ ध्यानांत येईल. किल्ल्याविषयीं आम्हांकडे गुंता किमपि नाहीं. इकडील वर्तमान तर प्रस्तुत (हैदरनाईक[4] जडें अन) वडीवर आहे. पर्जन्य बहुत लागला आहे. त्याच्या लष्करांत महागाई बहुत आहे. या प्रकारचें वर्तमान आहे. आम्ही छावणी करीत नाहीं, हा भ्रम त्यास बहुत होता. परंतु त्यास प्रस्तुत कळलें कीं हे छावणी करितात. यास्तव कांहीं सलुखाचा प्रकार बोलावा असें त्याचें मतें आहे ह्मणून वर्तमानें येतात. दों चहों दिवशीं पुरतें वर्तमान कळल्यावर सेवेशीं लिहून पाठवीन. आठ चार दिवसां त्याची गांठ नीट मैदानांत पडती तरी भलता एक प्रकार शेवटास जाता. परंतु ती गोष्ट न बनली. पहिले दिवशीं[5] मात्र गांठ पडली

---

१ पेशव्यांजवळ नेहमी बसणें उठणें करणारा धोंडोपंत आपा कोण! धोंडोपंत पुरंदरे तर नव्हे. कारण तो धोंडोपंत नाना, आपा नव्हे. या आपाचा कारकून पुरंदरच्या कोळ्यांत फितूर उत्पन्न करण्यासाठीं किल्ल्यावर गेला, तेव्हां या प्रकरणांत पेशव्यांचें अंग आहे असा दादासाहेब व सखारामबापू यांस संशय येणें साहजिकच होतें. २ दादासाहेबांस. ३ दादासाहेबानीं पाठविलेल्या पत्राचें उत्तर. ४ मूळपत्रांत या ठिकाणचीं अक्षरें फाटलेलीं आहेत. येथें कंसांत लिहिलेलीं आह्मीं तर्कानें घातलीं आहेत. ५ हें लिहिणें रटेहळ्ळीच्या लढाईस उद्देशून.

होती. लढाई—गोळ्या गोळ्यांचा मार—मात्र जाहली. आपल्या गोळ्यानीं त्याचीं माणसें बहुत मारिलीं. त्याची याद पर्वीं तपशिलवार लिहून पाठविली होती त्यावरून कळलेंच असेल. पाहिले दिवशीं त्याणें वांचून न जावें असें सर्वांचें मत होतें. परंतु कोणी फौज उठली, कोणी न उठली असा प्रकार झाला. मार ही त्याचा फार व संध्याकाळ ही जाहली. परंतु त्या दिवशीं त्याची खराबी बहुत जाहली. [त्यानें] दहशत ही खाल्ली. त्या दिवसा पासून त्यास आमच्या फौजेचा अजमास कळला. त्या नंतर तो अरण्या खेरीज राहिला नाहीं. रटेहळ्ळीवर होता, तेव्हां पुढें ओढा ठेवून बातेऱ्या तयार करून बसला होता. तेथें ही जाऊन तोफा समीप लाविल्या, नंतर तो कूच करून रात्री बारी चढून गेला. प्रस्तुत झाडींतच आहे. वडिलांस कळावें. हे विज्ञापना.

नं० ४४९

(२३ जून.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादं[१] उपरी. येथील कुशल तागायत ज्येष्ठ वद्य दशमी मंदवार पावेतों वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. तुम्हीं राजश्री बाळाजी नरसिंह याजबरोबर छ० ६ जिल्हेज गुरुवारचीं पत्रें पाठविलीं तीं व छ० ११ जिल्हेजचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. तेथें लिहिलें कीं, नारोपंत[२] नानांची स्त्री देशास[३] जातात. हीं आठ चार रोज मिरजेस राहतील, तर साहित्य करणें, व जाऊं लागतील तेव्हां वाटेचे हवी [?] पांचजण देणें. ह्मणोन लिहिलें; परंतु तीं कांहीं मिरजेस आलीं नाहीं. परस्परें खंडेराजुरीवरून गेलीं. आम्ही येथून कारकून व शाखभाजी मुक्कामास पाठविली. एक कारकून आमचा तालुका

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ नारोशंकर राजे बहादर. ३ मालेगांवास

पार होईत तंव पावेतों बरोबर दिला. व राजश्री बाळाजी नरसिंव्ह व दहा प्यादे रहिमतपूर पावेतों दिले. रहिमतपुरास पत्र लिहिलें आहे. तेथून बरोबर माणसें पुढें ते देतील. तीं रहिमतपूर डावें टाकून नीट फलटणावरी पुलावरी उतरावेया गेलीं. बरोबर बाळाजीपंत ही गेले. व येथून कारकून प्यादे पाठविले ते ही गेले. पाऊन आलियावरी सवेंच बाळाजीपंताची (तुम्हांकडे) रवानगी करितों. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नागजेसें मुकुंद श्रीपति याची पागा आहे. त्याणीं तमाम मिरज प्रांतीं उपद्रव मांडला. चोर ठेविले. नाना प्रकारचे उपसर्ग करतात. ढालगांव कर्यातीचीं खेडीं [मिरजेच्या] गिर्दनवाईस (आहेत) त्यांची पाठी घेतली. गुरें वळवून नेतात. बाजारकरी लुटतात. दावेकरी तितके ठेविले

---

१ रहिमतपूर त्यावेळीं पटवर्धनांकडे होतें व तेथें त्यांचे कमाविसदार होते त्यांस. २ निरानदी पार जाण्याकरितां. पेशवाईत निरेस पूल बांधिलेला होता असें वरच्या सारख्या आढळलेल्या अनेक उल्लेखांवरून वाटतें. ३ पोंचवून. ४ नागज मिरजेपासून बारा कोसांवर आहे. कर्यात म्हणजे पेटा. ढालगांव पेटा मिरज जहागिरींत असून तेथून नागज एक कोसावर आहे. ५ किल्ल्यावरील शिबंदी वगैरे खर्च चालावे म्हणून गांव निराळे तोडून दिलेले असतात ते त्या किल्ल्याचे गिर्दनवाईचे गांव होत. मिरजकिल्ल्याच्या गिर्दनवाईस पांसष्ट हजार रुपये सालिना उत्पन्नाचीं खेडीं तोडून दिलेलीं होतीं तीं अद्यापि मिरज संस्थानाकडे चालत आहेत. ज्याकडे किल्ला त्याकडे हा गिर्दनवाईचा सरंजाम चालवयाचा. हें एक निराळें संस्थानच समजावयाचें. अमक्यानें अमुक किल्ला घेतला असें जेथें जेथें येईल तेथें तेथें त्या किल्ल्याच्या गिर्दनवाईचा मुलूख ही त्यानें घेतला असें समजावें. प्रसिद्ध भुईकोट व सर्व डोंगरी किल्ले यांचे खर्च चालावे ह्मणून ही व्यवस्था केलेली होती. लहानसान ठाणीं राखण्याचा खर्च सरकारांतून नक्तच मिळे. ६ एखाद्याचें कोणाशीं भांडण झालें ह्मणजे त्यानें गांवकरांकडे दाद मागावयाची. ती त्याच्या मना प्रमाणें मिळाली नाहीं ह्मणजे त्यानें जवळच कोठें परहद्द असेल तेथें जावें व तेथील आश्रयानें आपल्या गांवावर दरोडे घालावे, शेतांची नासधूस करावी, चोऱ्या कराव्या, गुरें वळवावीं, असा एक ना दोन. दाद लागेपर्यंत किंवा त्याची हौस पुरेपर्यंत त्यानें आपल्या गांवास अनेक प्रकारें उपद्रव देत असावें! मराठींत 'दावा उगवणें ' ह्मणतात तें हेंच!

आहेत. त्यांचे पारिपत्याचे अगाध नाहीं. परंतु दरबारचा शब्द लागेल त्याचें उत्तर पाठविणें. प्रतिनिधीनें खेडियांस उपसर्ग दिल्हा. त्याचा मोबदला करूं. लष्करच्यांचा जाते समयीं उपसर्ग लागला. काय वरी त्याहावें! हे आशीर्वाद.

नं० ४५०

(२५ जून.)

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीव राजश्री आबो यासीं आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत ज्येष्ठ वहुल एकादशी इंदुवार जाणोन स्वकीय लेखन करणें विशेष. तुम्हीं[२] मंदवारचें पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लिहिलें वर्तमान कळलें. चिरंजीव राजश्री रावसाहेब सडी फौज घेऊन सावनुरास गेले. तुम्हीं व चिरंजीव राजश्री वामनराऊ व माधवराऊ बुणग्यांत राहिला, उत्तम केलें. त्याणीं[३] निमित्यास्तव मसलत कबूल केली. न करावी तरी तेवढेंच निमित्य करून उठोन येतात! तस्मात् त्यांस दौलतीचें अगत्य नाहीं. दुसऱ्यावरी पेंच करावा, दौलत लयास न्यावी, हाच मनसबा! बरें! लज्जारक्षक श्री भगवान् आहे. वरातेचा मजकूर तुम्ही पत्रीं लिहिला, बरें. येतील त्या घेऊन त्यांची याद तुम्हाकडे लिहून पाठवूं. त्यां पैकीं करार याद तुम्हाकडून येईल त्यांचें मनास आणावयास येईल. परंतु वराता करणें त्या विचार पाहून कराव्या. छावणीस राहिल्यामुळें तिकडील राजकारणें तुम्हांकडे येतात त्यांचें तुम्ही कोणाशीं बोलणार? कोणास अगत्य! बरें. कसें ही करून श्रीमंतांस सोबत द्यावी. हे दिवस निघोन जातील. चिंता नाहीं. अलीकडील वर्तमान लिहून पाठवणें. जुन्या फडणिसाचा मजकूर परत्रांचे

१ सूड २ पत्र गोविंद हरीचें पुतण्या मोरो बल्लाळ यास. ३ गोपाळरावानें सखारामबापूस नाखूष करण्याचें आपणावर निमित्त न यावें ह्मणून सावनुरास जाण्याचें कबूल केलें. ४ सखारामबापू स्वारींतून निघुन घरीं येतात.

पत्रीं तुम्हास लिहिलें आहे. दसरा होतांच त्याची रवानगी करूं. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. आमचे शरीरीं स्वस्थ नाहीं. खोलींतून बाहेर जावयाची शक्ति नाहीं. आलियावरी सर्व होईल. हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री वामनराव यांसीं आशीर्वाद. लिहिलें परिसिजे. तुम्ही बहुत शहाणपणें रहावें. वर्तमान लिहीत जाणें. हे आशीर्वाद.

अपत्यें पांडुरंगानें साष्टांग नमस्कार विनंती. जुन्या फडणिसाचा मजकूर लिहिला, त्यास तूर्त आज्ञा केली कीं, ' पाठवीत नाहीं. ' पुढें दसरा जाहला ह्मणजे पाठवून देऊं. अगर मी आज्ञा जाहली तर घेऊन येईन. बहुत काय लिहिणें. हे विज्ञापना.

नं० ४५१

(२५ जून)

श्रीगणपतिर्जयति.

श्रियासह चिरंजीव राजश्री रावसाहेब यां प्रती गोविंद हरि. आशीर्वाद. उपरी. येथील कुशल तागायत ज्येष्ठ बहुल एकादशी इंदुवार जाणोन स्वकीय लेखन करणें. विशेष. तुम्ही राजश्री बाळाजी नरसिंह या समागमें व जासुदा समागमें छ० ११ जिल्हेजचीं पत्रें पाठविलीं तीं येथें पंचमीस प्रविष्ट होऊन लिहिलें वर्तमान कळलें. त्या पत्रांचीं उत्तरें जासुदा समागमें लिहून पाठविलीं आहेत. प्रविष्ट जाहलींच असतील. राजश्री नारो शंकर व राजश्री विठ्ठलराव शिवदेव यांचे कैबिले समागमें तुम्ही भैशारनिल्हेस देऊन पाठविले. त्याणीं माहितगारीनें नीट मार्गें सोमवारीं मदभाव परगणे अथणी येथील मुक्कामास आणिलें. मंगळवारीं तेथून त्याणीं कूच करून

१ तुम्हीं वराता कराल त्यांच्या पैक्याचीं वगैरे सर्व कामें. २ हें गोपाळरावास गोविंद हरीचें पत्र. ३ बायका. ४ कारकून बाळाजी नरसिंह यास.

यास मिरजेस आम्हांकडे पाठविलें. आणि आपण मळणगांवचे मुक्कामास गेलीं. हे येथें आलिया नंतर त्यांस इकडे आणावयाची तरतूद करून कारकून येथील व सामान कांहीं पाठविलें. समागमें राजश्री बाळाजीपंत ही दिले. परंतु पर्जन्य फार लागला. त्यांस घरास लौकर जावयाची आढ. (मिरजेस) जातां येतां चार दिवस गुंता पडेल, मार्गी नदी नाल्यास पाणी येऊन उताराची कटकट, ऐसा कित्येक अर्थ ध्यानांत आणोन इकडे यावयाचें (त्यानीं). मानसिक केलें. आमचे चित्तीं त्यांस येथें आणवून भेट घ्यावी. त्यांत यांचा संतोष तेंच करावें लागलें. दोहींकडे वस्त्रें पाठविलीं. त्याणीं ही अंगीकार केला. विटें भाळवणी पावेतों समागमें बाळाजी नरसिंह यास दिले होते. त्याणीं समाधानें निरोप विस्थापासोन मशारनिल्हेस दिला. तदोत्तर तो येथें आला. अलीकडे पर्जन्य ही उघडला. नदीस पाणी थोडें. अद्याप उतार आहेत. तथापि साल्प्याचा घांट उतरोन पुलावरून जेजुरीच्या मार्गानें जावें ह्मणोन सांगितलें. ते ही त्याच मार्गें गेले. हत्ती, घोडीं, माणसें आदिकरून सारा आटाळा विस्थापावेतों सुखरूप गेला. तेथून पुढें ही स्वस्थ जातील. चिंता नाहीं. श्रीमंत राजश्री प्रतिनिधी घेडींकडे गेले. त्याणीं चार दिवस इकडे गडबड करून पाहिलें. असाध्य जाणोन उगेच निघोन गेले. तुम्हांस कळावें ह्मणोन लिहिलें आहे. सविस्तर मशारनिल्हे जबानीं सांगतील त्यावरून कळेल. बहुत काय लिहिणें. राजश्री नारो शंकर यांचें कुटुंब व राजश्री विठ्ठलराऊ शिवदेऊ यांचें [कुटुंब] सुखरूप देशास गेलें. समागमी अनिवार. खेडियांची स्थित राहूं दिल्हीं नाहीं. हे आशीर्वाद.

---

१ अनमान केला. २ नारो शंकर व विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांच्या स्त्रिया या वाटेनें परत गेल्या त्यां बरोबरचे लोक बेकैदी होते. त्यानीं खेड्यांची नासधूस फार केली.

नं० ४५२

(२९ जून)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद. ज्येष्ठ वद्य एकादशी. तृतीय प्रहर. सोमवार. यथास्थित असे. विशेष. तुम्हीं पत्रें पाठविलीं त्यांचीं उत्तरें आलाहिदा आहेत त्यांवरून कळेल चिरंजीव धोंडोबा व केशव काल आठवे दिवशीं मंदवारीं तुम्हां पासोन निघाले ते सुखरूप पावले. त्याणीं वर्तमान सांगितलें त्या वरून व तुमच्या पत्रावरून विस्तारें कळलें. तुम्हांसच सावनुरास पाठविलें; बरें; (तुम्हीं) लौकिकाचे मोहरे (शत्रूवर) आवाईपाडावी. शत्रूस ही भारी विचार पडेल म्हणोन पाठविलें. पंधरा दिवस कीं बारा दिवसांची मुदत आहे ते जाहलीच असेल. तुम्हीं (सावनुराहून) निघोन लष्करांत आलियाचें वर्तमान लिहावें. लिहिलें असिलें तरी उत्तमच जाहलें. चित्तवृत्ति तुम्हीं लष्करांत आलिया पत्राचे ठाईं लागली आहे. बहुत काय लिहिणें. आमची शरीरभावना बरीच आहे. श्रीकृपेनें व्यथा उताराखालीं पडली. चार दिवस अलीकडे पलीकडे बरी होईल. लोकांच्यो वराता करितों [म्हणून] तुम्हीं लिहिलेंत, त्या वराता आकारून यादी पाठवूं. तेथून करार होऊन येईल त्या प्रमाणें देत जाऊं. तुम्हीं परदेशी. पैसा हाताखालें नाहीं. लोकांचा गवगवा. धण्याचे मर्जी प्रमाणें सेवा केलीच पाहिजे. इतकीं संकटें, यास्तव चिंतार्णवीं आहों. श्री पंढरीचा नाथ सर्व ही परिहार करील. लोभ असों दीजे. हे आशीर्वाद.

चिरंजीव मंडळीस समस्तांस आशीर्वाद. बहुत सावधपणें राहणें.

---

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ धोंडोबा म्हणजे धोंडो भास्कर हा पत्र लिहिणाराचा पुतण्या. केशव कोण हें ध्यानांत येत नाहीं. ३ धास्ती. ४ मुदत सावनुरास राहण्याची. ५ फौजेंतील स्वारांच्या पगारांच्या.

सावनुराहून निघतांच पत्र पाठवणें. आमची काळजी न करणें. हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री आबा यासीं आशीर्वाद. तुमचें पत्र पावलें. तुम्ही व चिरंजीव वामनराऊ व माधवराऊ त्रिवर्ग 'लष्करांत राहिलों'[1] म्हणोन लिहिलें तें कळलें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० ४५३[2]

(अजमासें ज्येष्ठ वद्य
जूनचा दु० पंधरवडा)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादे उपरी. छावणीस श्रीमंत राहिले त्यास दाणा वैरणी कारितां (त्यांच्या लष्करानें) लक्ष्मेश्वर तालुकियाचे गांव मोडले. उपाय नाहीं. त्या प्रांतास भोगच आला आहे! सरंजाम आमचा म्हणोन नांव मात्र ध्यावें. तेथील वसूल येऊन त्यावरी फौज बाळगावयाचा प्रकार उरला नाहीं. तत्रापि हे[3] इकडे निघोन येते तरी हैदरअल्ली येऊन तुडविता. एकूण दोन्ही मजकूर सारखेच. त्यांत हे छावणीस राहिले हेच तुडवितात, यांत त्यांचें[4] पारिपत्य होऊन सरंजाम काईम राहिला म्हणजे पुढें कौल देऊन खेडीं भरवावयास येतील. परंतु थोर थोर गांव व ठाण्याचे हे तुम्ही श्रीमंतांस विनंती करून रक्षावे. व अडचणीचे रानांत छावणी न करितां धारवाडचे रोखें छावणीस आले हें उत्तम आहे. वैरण मिळेल. दाणा ही चौंकडून येईल. प्रांत आपला. मध्य देश. छावणीस फारसे श्रम होणार नाहींत. 'सावनूर रक्षावयाची मसलत होऊन त्याची मोडाभाज घाटघटाव

---

१ पेशव्यांच्या लष्करा बरोबर राहिलों, गोपाळरावाबरोबर सावनुरास गेलों नाहीं. २ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. हें व पुढलें नं० ४५४ चें पत्र या नंबर ४४६ च्या पुरवण्या आहेतसें वाटतें. ३ पेशवे. ४ हैदराचें.

करून निदानीं नवाबास पन्नास हजार रुपये द्यावयाचे करून सावनुरास रवाना केले. हजार गाडदी शहरचे रखवालीस दिले' म्हणोन लिहिलें तें कळलें. कटकट वारली. तुम्ही तेथें[1] राहतां तरी तेथें वैरण नाहीं. महागाई फार. कामकाजाचे दिवस. घोड्यांत ताकद राहिली पाहिजे. सांवशी, कुंदगोळ हा प्रांत आपला आहे स्थळें घेतलीं. त्यांस बळ पडलें. शिरहट्टी, येळवंती व गेड यांस ही शह बसला. इकडे आलां हें उत्तम जाहलें. परंतु फार सावध राहत जाणें. लोकांचा[3] भरंवसा कळलाच आहे. तुम्ही श्रीमंतांपासोन निराळे राहिलां. हे[4] ऐलेकडे येणार. सावनूर एकीकडे. तुम्हीच त्या रानांत. तेथें शिरहट्टी व गड वगैरे अद्याप त्याजकडे. त्या आश्रयानें न कळत येऊन (शत्रु) रात्री दिवसा आवाई करितील. यास्तव बहुत सावधपणें रहावें. छावणीस राहिले ही मोठी मसलत श्रीमंतांनीं केली. या मनसब्रियानें दौलतीस पाया आहे. निघोन येते तरी सरदार व लोक आपलाले घरास जाते. फिरोन जमा व्हावयास कठीण पडतें. तो[7] पर्जन्यकाळींच चालोन घेता. त्यास आडवें व्हावयास दुसरा कोण ही नव्हता. सावनूरकर व मुराररात हे सहजांतच बुडाले होते. लौकिक न राहता. छावणी केल्यामुळें फार अवसान बसलें. या उपरी हैदरअल्ली राजकारण लावील. हे जातात किंवा राहतात हाच तालामाला पहात होता. तह जाहला म्हणजे चिरंजीव राजश्री मेघश्यामराऊ सुटोन येतील. वरकड फारशी काळजी नाहीं. हनगळानजीक त्याचा[10] जमाव कांहीं आला आहे. म्हणोन पत्रीं लिहिलें, त्यास जमाव किती ? त्यांत सरदार कोण ? खासा कोठें

---

१ सावनुरास. २ श्रीमंतगड. हीं तिन्हीं ठाणीं पटवर्धनांचीं खरीं, परंतु पूर्वे हैदरानें घेतलेलीं होतीं. ३ तुम्हांवर घोर प्रसंग कांहीं आला तर तुमच्या फौजेंतील लोक कितपत जिवास जीव देतील हें कळलेंच आहे. ४ पेशवे. ५ हैदराकडे. ६ घाबरे करितील. छापा घालितील. ७ हैदर. ८ पेशवे छावणीस राहिल्यानें काय फायदे झाले व न राहते तर काय नुकसान झालें असतें हा विषय या पत्रांत गोविंद हरीनें उत्तम प्रतिपादिला आहे ९ सुमार. १० हैदराचा.

आहे ? हें तपशील (वार) लिहून पाठवणें. श्रीमंत धारवाडच्या लगत्यास आल्यानंतर धारवाड सुटेल किंवा दम धरील हें कळत नाहीं. बंकापुर विना तहशिवाय अथवा पारिपत्याखेरीज नये. त्यांत श्रीमंतांचें प्राक्तन विचित्र आहे. तुम्ही खबरदारीनें राहत जाणें. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

नं० ४६४

(अजमासें ज्येष्ठ वद्य
जूनचा दु०पंधरवडा)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वादें उपरी. हैदरअल्ली यास श्रीमंतांनीं छावणी केली यामुळें मसलत भारी पडली. परंतु तूर्त तो काव्या दाव्यानें धोकभाव दाखवून यांस (आपण) भारी ऐसा विचार त्याणें दाखविला आहे. आपण फौज सुद्धां जडें अनवडीवरी. मीरफैजुल्ला सोंध्याच्या रोखें. मीरै बिदनूरच्या लगत्यास. लालामियां मिश्रिकोट, बंकापूरच्या सरदेस चांगलेंच सामान घेऊन आहे. धारवाडास ही हजार स्वार आहेत. एकूण त्याणीं आपला बंदोबस्त चांगला केला आहे. कोठें जुर्मैस खावयाचें नाहीं. सोंध्याची, बिदनुरची रखवाली (हैदरानें) करविली. खासा श्रीमंतांचे तोंडावरी [राहिला आहे.] इकडे बंकापूर, मिश्रिकोट, धारवाड यांत एखादें स्थळास लाग होऊन हस्तगत व्हावयाचें नाहीं. श्रीमंत छावणीस मात्र राहिले. परंतु तरतूद काडीमात्र नाहीं. राहिल्या सारखे श्रम करून त्याच्या स्थळां पैकीं एखादें स्थळ घ्यावें, इभ्रत पाडावी, [परंतु] पर्जन्यकाळीं श्रम कोण करितो ? फुकाचे सावनुरास कोणी जाईनात ! तेथें महागाई व झुजासीं

१ हातीं येईल. २ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ३ मीररेजा हा हैदराचा मेहुणा. ४ दहशत. ५ हा टोमणा सखारामबापूस दिलेला आहे.

गांठ ! आपले पक्षी (य) कोणी पाठवावे तरी त्यांची खराबी होईल. अथवा एखादा दगादुगा जाहला तरी आपलें बळ उणें पडेल. या स्तव आपले पक्षी [य] अवघे रक्षून तुम्हांस पाठविलें ! तुमची काळजी त्यांस किमपि नाहीं. न जावें तरी तितकीच बदलामी करून उठोन यावें (असा कारभारी यांचा बेत होता.) जाऊन तुमची फसगैबत जाहली तरी त्यांस संतोष ! ऐसें मानून तुमची रवानगी केली. तुम्ही ही प्रसंग जाणोन मसलत कबूल करून गेलां. तेणें करून ते ही लज्जित जाहले. तेथें गेल्यासारखे चिरंजीव राजश्री नारायणराऊ व चिरंजीव राजश्री नीलकंठराऊ कांहीं जमाव घेऊन त्याच्यां चौकीवरी चालोन गेले. तेथें युद्ध होऊन त्यास मोडून किल्ल्यांत घातलें. हें मोठें यश प्राप्त जाहलें. त्यास (सावनुरास) समीप बंकापुरासारिखा किल्ला आणि (तेथें शत्रूचें) सामान भारी. (असें असून त्याचा वचक किमपि न मानितां बेशकपणें किल्ल्या पावेतों (तुम्ही) घोडीं चालविलीं. त्याचा हिरमोड जाहला. ही भारी इभ्रत बसली. वर्तमान श्रीमंतांपावेतों कळलें. त्याच्या धास्तीनें शहरें अगदीं गडबडलें होतें. तुमचें आगमन तेथें होऊन हें कर्तृत्व जाहल्या नंतर सहजच अवसान बसलें. आधींच तुमचा जंग त्या रानीं. धास्तीमुळेंच त्यास जरब. त्यांत त्याचा मोड जाहला. ही आगळीक जाहली. हैदरअल्लीस तुम्ही आलां हें कळून भारीच सलाबत पडली असेल. त्यास तुमचें भय फार. तेथें गेल्यासारखें ईश्वरें तुम्हांस यश दिलें. या उपरी हावभरी होऊन प्रतिक्षणीं झुजावयास जावयाचें न करणें. इभ्रतीखालींच अवसान बसविणें. चारी वेळा सारख्या राहत नाहींत. कोण समय कसा हें कळत नाहीं. त्यांत तुमचें कल्याण व्हावें हें कोणाचे चित्तीं आहे ? घोड्यांत जीव नाहीं. सामान तुम्हांजवळ

---

१ सखारामबापूचे. २ हैदराचा सरदार लालमिय्या याच्या. ३ त्या संबंधें विचार करितो. ४ सावनूर. ५ कीर्ति. ६ प्रदेशांत. ७ शत्रूस. ८ हुरळलेले,फुरारलेले.

थोडें. लोक सारे उठोनें आले. या करितां दमाखालेंच पंधरा दिवस गुदरोन मौबदला फौज येतांच निघोन श्रीमंतांकडे यावें ह्मणजे लक्ष जोड पावली! तूर्त तुम्हांकडील काळजी आहे. लालामिया बंकापुरास आला आहे. त्याजवळ सामान भारी. तोफा देखील त्या समागमें आहेत. त्याचा हिरमोड जाहला. परंतु काळवेळ समजत नाहीं. या करितां आवेर्जून युद्धाचा प्रसंग न करावा. सावनूरकरानीं (तुम्हांस) वैरण द्यावयाची केली, तेथें गेल्यावर वैरण नाहीं! तेव्हां दर घोड्यास पावला करार केला तो ही प्राप्त नाहीं! शहरची फारच हलाखी. तेव्हां कर्ज वाम करून तुम्ही लोकांची बेजमी केली. न करितां गत्यंतर नाहीं. लोक सोबतीस राहिले पाहिजेत. ही काळजी कार्यभागियांस रतिमात्र नाहीं! सरदारानें सरदारी करावी. कर्ज करून लोक बाळगावे. झुजावें. भांडावें. कर्ज मागों नये. त्याणीं पोटास अथवा नालबंदी आदिकरून कांहीं न ध्यावें. कांहीं न बोलतां सांगितलेप्रमाणें चाकरी करावी. कार्यभागीं याणीं कार्यभाग मात्र करावा. (त्यांस) काळजीच नाहीं हें कोणाचे ध्यानांत आहे? पहिले श्रीमंत सर्वजाण होते त्यामुळें निभावण्या पडल्या. प्रस्तुत श्री निभावील तें प्रमाण! नहून तुम्हांस सावनुरास पाठविलें हा दबाव शत्रूवरी चांगला पडला. घेतल्या ठाणियांची ही रखवाली जाहली. [श्रीमंतांनीं] प्रस्तुत तुमचे पोटाची बेजमी उत्तम प्रकारें करून आणखी एखादा सरदार तुम्हांजवळ पाठवून तेथेंच अवसान बसविल्या बंकापुरास सहजेंच शल्य होईल. हा मजकूर तुम्ही ही श्रीमंतांस लिहून पाठविलाच आहे. श्रीमंत नवलगुंदचे रोखें येणार, तेव्हां तुम्ही सावनुरीं असतां उत्तम होतें. तुम्ही निघोन

१ घरोघर निघून आले. २ मुद्दाम. ३ कार्य भागी ह्मणजे कारभारी सखारामबापू यांस. ४ सरकारचाकरी करितां काढिलेला पैसा सरकारांत मागूं नये. पदरचा भरावा. ५ बाळाजी विश्वनाथापासून माधवरावापर्यंत. कारण या सर्व कारकिर्दी गोविंदहरीनें पाहिलेल्या होत्या. ६ जर तुह्मीं सावनुरांतून निघून आलांत तर शहरवासी लोक ही पळून जातील.

जातांच शहरांतील तमाम लोक तुम्हांसमागमें जातात, तेव्हां आबच गेली ! निवळ गाडदी राहून शहरची रखवाली होणें कळतच आहे. त्याणीं येऊन शहर घेतल्यावरी छावणी करून राहिल्याचें बरेंच सार्थक जाहलें !!! हो दीर्घ योजना करून मसलत होती तरी प्रथमतः झुजांत गांठ घालोन शत्रू सभोंवता सैन्याचा आवर्त पडोन मध्यें कोंडला असतां त्यास सोडून निघाले. तुम्ही बहुता प्रकारें सांगितलें कीं, रात्री ऐसेंच रहावें ह्मणजे शत्रू बुडविला. परंतु त्या समयीं न ऐकतां निघोन गोटास गेले आणि त्यास घालविला ! त्यामुळें ही मसलत भारी पडली. परंतु तेवढ्या झुजानें त्याचा हिरमोड जाहला. धास्त बसली. त्याजवरी इतके सरदार आणि श्रीमंत समागमें परंतु कोठें त्याची गांठ पडोन जरब बसविली नाहीं. त्याजवरी मागती तुम्ही सावनुरास जाऊन सलाबत बसविली. आतां (तुम्हासच) पोटास देऊन तेथें ठेवावें, कुमक पाठवून बळ पाडावें, हा मनसबा कोण करितो ? तुम्हांस मात्र एकनिष्ठ सेवेमुळें काळजी. कार्यभागीं यांस दौलतेची उमेद नाहीं, त्यामुळें तरतूद करीत नाहींत. तुम्हीं करारा प्रमाणें पंधरा दिवस जाहले ह्मणजे श्रीमंतांकडे निघोन येणें म्हणजे आमची काळजी वारली. पंधरा रोज रविवारास जाहले. निघोन आलांच असाल. वर्तमान लिहून पाठवावें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० ४५६

[अजमासें ज्येष्ठ वद्य
जूनचा दु० पंधरवडा]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. तुम्हीं ज्येष्ठ वद्य ३ मंदवारचीं पत्रें कोळीरचे

---

१ हैदरानें. २ हें सर्व वर्णन रटेहळ्ळीच्या लढाईचें. ३ तावडींत सांपडलेला जाऊं दिला. ४ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

मुक्कामींहून पाठविलीं तीं रविवारीं येथें प्रविष्ट होऊन लिहिलें वर्तमान सवि· स्तरें कळलें. चिरंजीव राजश्री धोंडोबा मंदवारीं सायंकाळीं घरास सुखरूप पावले. त्याणीं येतांच अगोदर तुमची रवानगी सावनुरास जाहलियाचें वर्तमान सांगितलें व पत्रावरून साद्यंत कळलें. सारांश कठीण चाकरी तेथें कार्यभागी याणीं तुह्मांस सांगावें! कबूल न करावें तरी ' हेका करि तात ' ऐसें श्रीमंतांचे निदर्शनास आणून द्यावें, निमित्यास पात्र करावें, कोणत्याही प्रकारें तुह्मांसीं घांसणी करावी, हाच त्यांचा मनोदय! वरकड दुसरा मनसबा नाहीं. कोण्याही प्रकारें दौलत लयास न्यावी (हेंच त्या· च्या मनांत!) बरें! श्रीभगवान समर्थ आहे. श्रीमंतांचे पुण्यें घडेल तें प्रमाण. जितके सरदार समागमें आहेत त्या सर्वांस सरंजाम आहेत. त्या· णीं सावनूरची मसलत कबूल न केली तेव्हां तुह्मांस सांगों लागले. न ऐकावें तरी तेंच निमित्य करून देशास उठोन यावें (असें करिते,) त्या मुळें (तुह्मीं मसलतीचा) अंगीकार केला. परंतु वरकडांचा सरंजाम खुलासा. याचा सरंजाम सुटलाच नाहीं. मागील कर्ज तसेंच राहिलें. कोणत्या आधारें फौज ठेऊन चाकरी करितील? वरकडानीं कबूल केलें नाहीं, तर यांस काय ह्मणून सांगावें? हें कांहीं त्याच्या ध्यानांत आलेंच नाहीं. मागती निमित्यास पात्र करावें हा मनोदय! बरें! श्रीकृपेनें एक· वेळां शत्रूचें पारिपत्य जाहलें म्हणजे तुमचाच जंग होईल. सावनुरास गेलां आहां. त्याणीं वैरण रोजिना द्यावयाची कबुली केली. पंधरा दिवसानीं मुबदला फौज पाठवावयाचा करार करून (तुम्ही श्रीमंतांपासोन) घेतला. पंधरा दिवसानीं फौज आली [तर] उत्तम. न आली तरी तुम्ही निघोन यावें हें फार पक्कें काम! कालै तुम्ही [सावनुरास] जातां हजार पावेतों गेलां. परंतु नांवलौकिकाचे सरदार. शत्रूस दहा हजार फौजेनिशीं आले

---

१ सखारामबापूचा. २ मोकळा. ज्यांतून बिनतकरार वसूल येई असा. ३ शुक्रेच. थोड्या दिवसांपूर्वी.

ऐशी धास्त पडली असेल. तत्रापि तुम्ही फार सावधपणें राहणें. खासा नबाब तुम्हासमागमें सावनुरास आला नाहीं. सामान दिलें आहे. सरकार-चे गाडदी पहिलेच तेथें आहेत. ते चौं घरचे चार. त्यांत नांवाचा सर-दार कोण ही नाहीं. यामुळें तुम्ही सावधतेस कमी न करितां पंधरा दिवस क्रमोन करारप्रमाणें निघोन श्रीमंतांकडे जावें. आज पावेतों आम्हांस का-ळजी नव्हती. सर्वा बरोबर असल्या उत्तम. इश्वतीनें पंधरा दिवस गुदरोन मागती तिकडे गेल्याचें वर्तमान येईल त्या दिवशीं चित्त स्वस्थ होईल. तों पावेतों फिकीर आहे. सडे होऊन गेलां, बुणगें लष्करांत ठेविलें, हें उत्तम केलें. 'लोकांचा धर सुटला. तमाम देशास जातात. या खबरीनें लोक फारच गडबडले' ह्मणोन पत्रीं लिहिलें. त्यास यंदां लोकांचे भरंव-शियाचा मजकूर आम्ही येथून जातांनाच सांगितला आहे. त्यांत पैसा नाहीं. छावणी समीप यामुळें निघोन येतील. गुंता नाहीं. इरेस टेंकोन तुम्हापाशीं जे राहतील त्यांची याद आकारून पाठविणें. आषाढ श्रावण दोन महिने कठीण आहे. भाद्रपद मासीं मागती तुम्हांजवळ लोक जमा होतात. गुंता नाहीं. श्रीमंत क्षेपनिक्षेप राहिलेच तरी तुम्ही दोन महिने अवसान धरून सोबत द्यावी. सरंजामाचा वगैरे कांहींच पेंच चित्तांत न आणावा. वरचेवरी वर्तमान लिहीत जावें बुणग्यांत चिरंजीव राजश्री आ-बा व चिरंजीव वामनराऊ ठेविले, उत्तम केलें. चिरंजीव राजश्री नीलकंठ-राऊ अथवा चिरंजीव कोन्हेरराऊ या दोघां पैकीं एकानें रहावयाचें होतें. असो. थोड्या दिवसांची मसलत आहे. परंतु फार सावधपणें रहावें. नि-खालस[2] तुम्हीच मसलतशीर[3], सोबतीस दुसरे कोण ही नाहीं, या करितां

---

१ सावनुरचा नबाब अबदुलहकीमखान तुह्मांबरोबर आपल्या राजधानीस आला नाहीं. फक्त स्वार गारदी वगैरे आपलें सामान मात्र बरोबर दिलें आहे. २ नि-स्संशय. ३ तेथें स्वसंरक्षणार्थ मसलत करणें ती तुम्हीं एकट्यानेंच केली पाहिजे. को-णी दुसरा जाणता सरदार सल्ला देणारा नाहीं.

लिहिलें आहे. " हैदरअली जडें अनवडीवरी आहे, बंकापुरास फौज व गाडदी मिळून दोन तीन हजार आले आहेत. ते सावनूरचे गुरा ढोरांवरी गडबड करितात. आम्ही गेल्यावरी येणार नाहींत " म्हणोन लिहिलें तें कळलें. परंतु सांप्रत हैदरनाइकाजवळ स्वार व गाडदी व देशचे प्यादे मिळोन सारा जमाव किती होईल हें लिहिलें नाहीं. श्रीमंत ठरोन राहिल्या नंतर त्यां समागमें निदान पंचवीस हजार फौज राहील तर उत्तम आहे. तुमचे पत्रावरून दहा हज़ार फौज राहतां कठीण ऐसें दिसोन आलें ! तत्रापि श्रीमंत राहिल्यांतच उत्तम आहे. ' राजश्री विठ्ठल शिवदेव व रास्ते नवलगुंदाकडे रवाना जाहले. धारवाडास मीर गेला आहे त्या करितां त्यांची रवानगी (तिकडे) जाहली ' म्हणोन लिहिलें तें कळलें. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

अपत्यें पांडुरंगानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. इकडील वर्तमान तीर्थरूपांनीं स्वहस्ताक्षरें लिहिलेवरून कळेल. आज्ञे प्रमाणें फुलझाडें हरजिनशी मिळवून लावितों. आज्ञेस अंतर करणार नाहीं. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं० ४९६

(अजमासें आषाढ शुद्ध
जुलईचा प०पंधरवडा)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. ' हैदरअली येऊन माघारा गेला तो हनगळावरी छावणी करून राहिला हें वर्तमान श्रीमंतांस दिनप्रती[3] लिहीत गेलों त्या वरून श्रीमंत मोंघारे फिरले' म्हणोन तपशीलवार लिहिलें तें कळलें. साव-

---

१ कर्नाटकी. २ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ३ प्रति दिवशीं. ४ मोंगलाई इहीकडे स्वारीस गेले होते ते सावनुराकडे येण्या करितां परत निघाले.

नुरास जावयाची मसलत कोणी कबूल न करीत त्या समयीं तुम्ही मसलत कबूल करून गेलां. सावनूरकरानीं वैरण द्यावयाचा करार केला, तेथे गे[1]ल्यावरी प्राप्त नाहीं. रोजिना खर्च कर्जवाम करून चालविला. पंधरा दि- दिवसांचा करार असतां त्या संधींत हैदरअल्ली काबू करून आला. त्यास नतिजा[2] दिला. बंकापुरकरांशीं लढाई दोन वेळां देऊन त्यांचा रेचें[3] मोडला. इतकी कस्तै[4] करून निघोन न जातां मागती (श्रीमंतांस) मनसबे लिहून पाठविले. आवाई तवाई सोसून राहिलां. हें श्रीमंतांच्या व कार्यभागी यांच्या ध्यानांत आलें, तेव्हां सहजेंच संतोषी जाहले. तिकडे रवाना कारितां अदावतीनेंच केलें. परंतु श्रीभगवान् [आमचा] सारथी, त्या मुळें नांवा प्रमाणें कर्तृत्व जाहलें. आतां श्रीमंत माघारे आले. या उपरी कोणी सावनुरास येतील. सर्वांवरी तुमची शेरेबाजू[5] जाहली. ' राजश्री विठ्ठलराव शिवदेव व रास्ते मुबदला येणार ते आलियावरी श्रीमंतांजवळ निघोन येतों ' म्हणोन पत्रीं लिहिलें. तो[6] सविस्तर अलीकडील [वर्तमान] लिहून पाठवणें. हैदरअल्लीकडील लोकांचें राजकारण[7] तुम्हांकडे आल्यावरून तुम्हीं श्रीमंतांस लिहिलें त्याचें उत्तर ' दस्तऐवजीं न गुंततां पाठवितात ' म्हणोन लिहिलें, त्यास लोकांचें[8] राजकारण तुम्हांकडे लागोन लोक निघतांच हैदरअल्लीचें ही राजकारण तुम्हांकडे लागेल. तेव्हां तह रह तुमच्या मतें करावें लागेल. यशास पात्र तुम्हीं जाहलां. हें कार्यभागी चित्तांत आणून राजकारणांस संमत देत नाहींत. येरवीं तें काम बरेंच होतें. याचा[9] तह रह जाहलियानंतर पुढें मुलुखगिरी करून पैका मिळता. लोक हैराण न होते. प्रथतां झुंजीं त्यास तंग केला तेव्हांच त्यास आंच बसली. त्या तागायत

---

१ दगा. २ पराभव. ३ खुमखूम. ४ मेहनत. ५ प्रबळ. ६ तो हें उभयान्वयी अव्यय. तो ह्मणजे ' तर. ' ७ फितुराचें राजकारण. गोपाळरावानें जे हे हैदराचे लोक फितविले होते ते सारे बंकापुरच्या फौजेपैकीं मराठे स्वार होते. ८ शत्रूच्या लोकांचें. ९ हैदराशीं.

त्याजकडील लोक पळून जातात. आतां तो श्रीमंत छावणीस राहिले आहेत. बरें. तह होणार समयीं होईल. नागजकर लबाडी करितात म्हणोन तुम्हांस पूर्वीं लिहून पाठविलें होतें. त्यास चोंकडून धाबे करितांच गांवकर व पागेंत कारकून होता तो येथें येऊन भेटले. सरदेशमुखीचा लढा उरकोन दिला. पुढें साळसूद वर्तावें, लबाडी करूं नये, ऐसा करार मदार करून घेऊन निरोप दिला. फिरोन करितील तरी आमचा मंत्र आह्मांजवळी आहे ! मिरजेचे माजी फडणीस हिशोबा सुद्धां पाठवून द्यावे, मोठे मोठे जावसाल तटले आहेत, ' ह्मणोन स्वदस्तुरें एकबंद पुरवणी लिहिली, त्यावरून फडणिसाचे पुत्र महादबा येथें आहेत, त्यांस सांगून पाठवावयाचा निश्चय जाहला. अमावास्या होतांच त्यांस पाठवून देतों. परंतु मोघम ' हिशोब देऊन पाठविणें ' ह्मणोन लिहिलें, त्यास कोण कोणते हिशोब देऊन पाठवावें ऐसें उजगून लिहिलें नाहीं. सन इहिदेचा हिशोब सालझाडा पावेतों राजश्री शिवाजीपंताचे कारकीर्दीचा देऊन पाठवितों. चिरंजीव राजश्री मेघश्यामरायाकडील वर्तमान लिहिलें तें कळलें. श्रीपंढरीनाथ कृपाकरील त्या दिवशीं सुटोन येतील. तंव पावेतों त्यांजकडील काळजी आहे. जाधवरायाकडील वर्तमान लिहिलें तें कळलें. विनाशकाल आला तेव्हांच त्यास विपरीत बुद्धि निर्माण जाहली. शेवटीं दुर्मरणानेंच वारला.

---

१ नं० ४४९ पैकीं शेवटचा मजकूर पहा. २ माजी फडणीस पाठविण्याचें कारण तूर्तचे फडणिसानीं दादासाहेबांच्या वशिल्यानें मिरजेची फडणिशी मिळविली होती. त्यांस तेथील हिशोबाची माहिती अद्यापि झाली नव्हती. पहा नं० ३६९ च्या प्रारंभींचा मजकूर. ३ उघडून, उलगडून. ४ सुरुसनइहिदे सितैन मय्या व अल्लफ (११६१) या सालच्या अखेरपर्यंत ह्मणजे श० १६८२।८३ इ. स. १७६०।६१ ५ पटवर्धनांच्या हातीं मिरज येण्यापूर्वी ती शिवाजी बल्लाळाकडे होती. ६ जाधवराव ह्मणजे मोगलाचा सरदार रामचंद्रराव जाधव हा मेल्याची वार्ता येथें लिहिली आहे ती खरी नाहीं. इ. स. १७६७।६८ त हैदर व निजामअल्ली यांची इंग्रजांशीं लढाई चालली होती तींत तो पुढारी सरदारां पैकीं एक होता.

दुष्टकर्माचें फळ असेंच आहे. उत्तरेकडील श्रीमंतांनीं[1] तुम्हांस व इत्यादिकांस[2] पत्रें पाठविलीं, मनसबा लिहितां पक्का लिहिला, हें त्यास फार सुचले! क्षण भंगुर प्रकार! घडेल तें प्रमाण. खंडोजी फराडे यांच्या घरा पावेतों माणूस पाठवून [त्याच्या घरचें] वर्तमान आणवावें ह्मणोन तुम्ही पत्रीं लिहिलेवरून त्याच्या पुत्राचे नावें पत्र लिहून मुद्दाम पिराजी जासूद त्याच्या गांवास पाठविला. जाब आल्या उपरी तुम्हांकडे पाठवून देऊं. इकडे पहिला तो पर्जन्य लागतच गेला. त्यांत पुष्यनक्षत्रानें आगळीक केली. समग्र एक चरण सारखा लागला. साऱ्या नद्यांस पाणी विपुल आलें. आतां उघड पडली आहे. इमारतीचें काम अशांत ही बंद न करितां चालत आहे. तुम्ही अद्यापि सावनुरीं आहां किंवा श्रीमंतांसन्निध आलां हें वर्तमान लिहून पाठवणें. वरकड इकडील अधिकोत्तर कांहीं लिहिणेंसें नाहीं. रेवणीचें काम चालत होतें. पर्जन्यामुळें बंद पांच सात दिवस झालें होतें. आतां चाली लाविलें आहे. माजी फडणीस व हिशोब पाठवा ह्मणोन कितेक प्रकारें (तुम्हीं) लिहिलें, बहुत उत्तम. त्याची ही रवानगी लौकरच पौर्णिमे अलीकडे करितों. तो मुहूर्त पाहतो. लागेल तसा हिशोब देऊन पाठवितों. तुह्मी बहुत सावधपणें राहत जाणें. हरएकविशीं उतावळी न करणें. वरातदारांचा ऐवज क्षेपनिक्षेप[3] द्यावा ऐसा जाब आलिया उपर कोणाचा गुंता पडों देणार नाहीं. माने यांचे गांव चालवितों[4]. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे. हे आशीर्वाद.

---

१ दादासाहेबांनीं. २ बाकीच्या सरदारांस. ३ निस्संशय. ४ ठरावा प्रमाणें स्वार घेऊन स्वारींत चाकरीस हजर न झाल्या कारणानें माने यांचे गांव जप्त केले होते, ते आतां तुमचें पत्र आल्यावरून त्यांचे त्यांच्या स्वाधीन करितों.

नं० ४९७

(अजमासें आषाढ शुद्ध
जुलईचा प० पंधरवडा)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[1] उपरी. तुम्ही सावनुरास गेल्यावरी तीन दिवस पर्जन्य आरद्रांचा लागला तें काम बरेंच जाहलें. खुरपण मिळों लागलें. 'कसें ही करोन श्रीमंतांसमागमें छावणी गुदरावी असा काल प्राप्त जाहला! उपाय नाहीं' ह्मणोन लिहिलें तें प्रमाणच आहे. जर करून पर्जन्य बरा लागों लागला ह्मणजे वैरण पुष्कळ होईल. तेणेंकरून घोड्यांची काळजी वारेल. आणि दाणे ही मिळों लागतील. आषाढ येवढा कठीण आहे. श्रावणमासीं हरकशीं घोडीं जगतील. भाद्रपदांत तो नवा दाणा होईल. मग फिकीर नाहीं. इकडे गुदस्तांच दंग्यामुळें खेडीं खराब होतीं. त्याजवरी यंदां नापीक. तशांत लष्करची रहदारी. यामुळें कांहीं ताल राहिला नव्हता. कडबा रुपयास पावणा[2] कट साडेतीन हातांचे दोरीनें जाहला होता. दाणे (रुपयास) साडेचार चार[3] पायल्या या प्रमाणें महागाई होती. परंतु अश्विनी महा नक्षत्रा पासून आरद्रांपावेतों दर नक्षत्रीं दोन चार पर्जन्य पडतच गेले. आरद्रांचा पर्जन्य येथें ही बराच जाहला. त्याणें रानांत खुरपण जाहली. खरीपाच्या पेरण्या जाहल्या. आरद्रांचे वाफेनें जोंधळे ही पेरिले. हे दिवस पावेतों पावसानें फार बाजू राखिली. याच प्रमाणें पुढें ही दर नक्षत्रीं एक दोन पर्जन्य लागले ह्मणजे खरीपाचें पीक हातास येऊन जोंधळा पिकेल. पुढें कडधान्य ही येईल. पर्जन्याची ओढ

---

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ साडेतीन हात लांबीच्या दोरींत कडब्याच्या जितक्या पेंढ्या राहतील त्यांच्या पाउणपट दर रुपयास. ३ ही त्या वेळची महागाईची धारण. परंतु या प्रांतीं गेल्या सुमारें पन्नास वर्षांत धारण अतिशय स्वस्त होती तेव्हां ही इतकी झालेली कोणास स्मरत नाहीं!

बसती तरी हा मुलूख उठला होता. श्रीनें कृपा केली. दाणे अद्याप कांहीं सवंग नाहींत. परंतु वैरण पुष्कळ जाहली. गुरांची व घोडियांची काळजी वारली. खरीप पिकल्यावरी दाणा ही सवंग होईल. आमचे शरीरीं समाधान नव्हतें. त्याजमुळें गुदस्तांची मेखलाशीं प्रांतांतील जाहली नाहीं. आतां लावणीचा व पेरणीचा हंगाम. आषाढमास पावेतों कांहीं बोलत नये. श्रावणमासीं गुदस्तांची मखलाशी जाहली तरी होईल. परंतु मखलाशीमुळें कांहीं यावयाचें नाहीं. तकदैमा[3] वसूल घेतला. आबादानी जाहलिया नंतर सालमजकुरचें कांहीं चालूं लागेल. तुम्हांस कळावें याकरितां लिहिलें आहे इमारतीचें काम चिरंजीव[4] अद्याप करीत आहेत. तुम्ही राजश्री बाळाजी नरसिंव्ह सफरे येथें पाठविले होते. त्यांनीं खंदक व किल्लयाचें काम वगैरे पाहिलें आहे. ते तुह्मांस सांगतील त्यावरून कळेल. पूर्वेकडील बुरजा तागायत नैऋत्य कोनच्या उपरीच्या बुरजा पावेतों खंदकांत पोंहणाऊ पाणी जाहलें आहे. आतां पश्चिमेकडील खंदकांतील माती काढावयास मण वड्ड लाविले आहेत. वरकड कांहीं कामें अद्याप चालत आहेत. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० ४९८

(अजमासें आषाढ शुद्ध
जुलईचा प० पंधरवडा)

श्री.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोपाळरावजी स्वामीचे सेवेशीं.

पोष्य नारो शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील

---

१ ओसाड पडला असता. २ गांवोगावच्या चालू सालाबद्दलचे जमाबंदीचे व खर्चाचे आकार [बजेट] दरसालच्या प्रारंभीं करीत असत ते. ३ या शब्दाचा अर्थ ' कार्याकारण ' ' जितक्यास तितका ' असा असावा. ४ पांडुरंगराव गोविंद.

कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. या नंतर श्री गणेशपुराणाची पोथी पूर्वार्ध ब्रह्मगिरीसमागमें पाठविली आहे. येऊन पावलियाचें उत्तर पाठवावें. आणि उत्तरार्ध गणेशपुराण पाठवून द्यावें. श्रवण करून पाठवून देऊं. आणि रविशिवपर पुराणाची पोथी तुम्हांजवळ असेल तरी जरूर पाठवून द्यावी. श्रवण करून पाठवून देऊं. कळलें पाहिजे. कृष्णाबाई शितोळी यांजकडे मनोळीच्या मुक्कामीं कर्ज रुपये ५०० पांचशें दिले आहेत. ते अद्यापि त्याणीं पाठविले नाहींत. तरी त्यांस आम्ही पत्र पाठविलें आहे. तरी आपण ही त्यांस ताकीद करून सदर रुपये आम्हांस पावते केले पाहिजे. त्यांस पत्र पाठविलें आहे. हें त्यांस प्रविष्ट करावें. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं० ४५९

(२७ जून)

श्री.

सेवेशीं विष्णु[1] कृष्ण साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत ज्येष्ठ वद्य त्रयोदशी पर्यंत यथास्थित जाणोन स्वकीय कुशल ल्याहावया आज्ञा केली पाहिजे. विशेष. सांप्रत स्वामीकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तर लिहून सांभाळ करावा. तीर्थस्वरूप राजश्री नानांचे शरीरीं फारच कठीण दुखणें आलें होतें. भरंवसा नव्हता. परंतु तुलादान केलें आणि विद्याधर जोशी करवीरकर वैद्य उत्तम मिळाले. त्याणीं ही उपाय चांगलाच करीत आहेत. श्रीकृपेकरून आतां दिवसेंदिवस उतार आहे. या उपरी कांहीं चिंता नाहीं. उत्तम आरोग्य यावयास आणखी एक मास लागेल. आपण छावणीस राहिलां. खर्चावेचाची ओढ.

---

१ विष्णु कृष्ण हा पटवर्धनांचा आप्त व कारकून. यानें हें गोपाळरावास पत्र लिहिलें आहे. २ गोविंद हरीच्या.

कारभारी डांशिक*. महागाई फार. यास्तव अहोरात्र वडिलें चिंता करितात. ईश्वरकृपेनें एकवेळ सख्य हरएक प्रकारें होतें म्हणजे लक्ष जोड पावती! बरें! श्रीमंतांचें प्राक्तन विचित्र आहे. सर्व उत्तमच घडोन येईल. आम्ही आज पावेतों वडिलांजवळच मिरजेस होतों. प्रस्तुत निरोप घेऊन चार दिवस घरास आलों. मागती बोलावणें आलें आहे. चार रोजानीं मिरजेस जाणार. श्रावणमासीं (तिकडे तुमच्या) छावणीचा निश्चय झाला तर श्रावणमासीं येतों. सांभाळ करणार धणी समर्थ आहे. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विज्ञापना.

नं० ४६०

[१ जुलई]

श्री.

अपत्यें गंगाधरानें कर जोडून साष्टांग नमस्कार विनंती. येतील कुशल तागायत आषाढ शुद्ध २ पावेतों मुक्काम पुणें येथें वडिलांचे आशीर्वादें क्षेम असो. विशेष. राजकी वर्तमान — लोहगडावरील गृहस्तांची फारच घालमेल पडली. राजश्री त्रिंबक विनायक यांस दिवाणगिरी जामिनीदाखल [?] कबूल केली. पंधरा हजार फौज पदरची ठेवावी [असा ठराव झाल्याची] बाजारी वदंता आहे. कांहीं दरबारी बोलतात. सत्यमिथ्या भगवान् जाणे. इकडे दुष्ट चिन्हें या प्रमाणें जाहलीं खरीं.

पुरंदर घेतला आणि नीलकंठ महादेव तेथें गेले. तेव्हां येथून बाळोबा मांडवगणे सासवडास गेले

मौजे निंबगांव टाकळी, घोडनदीतीर, येथें ज्येष्ठ वद्य एकादशीचे दिवशीं सायंकाळीं दिवस दोन

* कारभारी सखारामबापू द्वेष करणारा.

१ गोविंद हरि. २ गंगाधर बापूजी ओक हा पटवर्धनांचा फडणीस. याचें हें गोविंद हरीस पत्र. ३ हा गृहस्थ तोतया जनकोजी शिंदे. हा लोहगडावर कैदेंत होता. ४ पुरंदर कोळ्यानीं घेतला. ५ नीलकंठ महादेव उर्फ आबा पुरंदरे हे तेथें म्हणजे सासवडास गेले.

होते. तेव्हां गांवाजवळ संगमेश्वरदेव आहे तेथील नदीमध्यें विहिरा होता त्यांतील झऱ्यास रक्त येऊं लागलें. ते समयीं हे स्वतः गेले आणि त्यांत अंगवस्त्र टाकिलें. तें भिजलें तों रक्ता प्रमाणें पाणी, आणि पिळिलें तों रक्त पडलें. ऐसें तीन दिवस होत होतें. त्यास एक महिना जाहला.

घटका ते समयीं गांवचे दहा पांच माणूस गांवकरी तीरास गेले होते. तेथील कौतुक—मेघडंबर आलेंसें जाहलें. आणि अकस्मात् एक मोठा घागरी एवढा वाटोळा दगड एक पडला आकाशावरून. तो भूमिगत होता तों तेथून धूर निघाला तो आभाळास लागला. तेव्हां वर गर्जना जाहली. वृष्टि एक बिघा पावेतों दगडांची जाहली. हें कौतुक जवळील पाहत आहेत तों तो दगड घोड्या एवढा जाहला. घटकाशी जाहली तों हत्तीहून ही मोठा जाहला. गडबडत नदींत गेला. हे भयभीत तोंपर्यंत होते. मग सावध होऊन जागा बघितला तों हातभर खोल मात्र आहे. आणि बिघाभर दगड पडले आहेत. त्याणीं गांवांत जाऊन सांगितलें. मग सर्व भोंवर गांवामधील (लोक) पाहण्यासीं आले. येथून ही फडणिसानीं कारकून पाठविला तो देखील पाहून आला.

हें पत्र राजश्री गंगाधर बापूजी ओक फडणीस याणीं पुण्याहून आम्हांस पाठविलें त्याची नक्कल करून वडिलांस पहावयास पाठविली आहे.

---

१ पुण्याहून नाना व मोरोबा फडणीस यानीं. २ हें नं० ४६० चें पत्र पुण्याहून गोविंद हरीस आलें त्याची नक्कल त्यानें त्रिंबक हरीकडे पहावयास पाठविली.

नं० ४६१

(आषाढ शुद्ध तृतीया
२ जुलई)

विठ्ठलराव शिवदेव विंचूरकर यांचें २ मोहरमचें मुक्काम पडेसूर प्रांत नवलगुंद येथून गोपाळरावास पत्र—

" हैदरनाईक हनगळास आला त्याचे दुसरे दिवशींच (आमची तुम्हांकडे) फौज यावी तों तीन रोज पर्जन्य लागला. मग शनिवारीं कूच करून मुक्काम मजकुरास आलों. आज रविवारीं सांवशीस यावें तों कोकांनीं व बारगिरानीं[१] गवगवो[२] केला सबब मुक्काम जाहला. उदईक सांवशीवर मुक्काम होईल. चिरंजीव मल्हारराव यास (तुम्हांकडे) पाठविलें आहे. राजश्री आनंदराव[३] खासाच येतील. राजश्री नारो शंकर लक्ष्मेश्वरास आले ते ही येतील. हैदरनाईक बंकापुरास आल्याचें वर्तमान येथें ही आलें. त्यावरून जलद लोकांची रदबदली ऐकून रवाना केलें. एक दुसरी पागा (मागें) राहिली तिची समजावीस करून येतों. "

नं० ४६२

[आषाढ शुद्ध चतुर्थी
३ जुलई]

विठ्ठलराव शिवदेव विंचूरकर यांचें ३ मोहरमचें गोपाळरावास पत्र—

हैदरनाईक बंकापुरास आला. त्याचा निश्चय कीं, आपला मृत्यु झाला तरी बेहत्तर. परंतु सावनूर घ्यावें. त्यावरून शहरचे लोक फार गडबडले. निरोप मागूं लागले. मग आपण सदरेस जाऊन सर्वांची खातर-

---

१ शिलेदारानीं. २ गवगवा पैक्या करितो. ३ अंतोबा उर्फ आनंदराव भिकाजी रास्ते.

जमाकरून विडे देऊन मोर्चे सांगितले. आपला पंधरा दिवसांचा करार होता. नारोपंताची[1] फौज आली (तेव्हां आतां) आपण जावें, परंतु हा समय नाहीं. नबाबाच्या कबिल्याची वाट ते आमची. [2]" ऐसा कृत निश्चय लिहिला. त्यास प्रसंगच तैसा प्राप्त झाला त्यास इलाज काय ? श्रीमंतांस पत्रें तुम्हांकडील गेलींच-असतील. आम्ही उभयतां[3] ही लिहितों.

नं० ४६३

(३ जुलई)

श्रीगणपतिर्जयति.

श्रियांसह चिरंजीव राजश्री रावसाहेब यांप्रति गोविंद हरी आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत आषाढ शुद्ध चतुर्थी सह पंचमी भौमवासर जाणोन स्वकीय लेखन करणें. विशेष. तुह्मीं छ० २३ जिल्हेजेचीं पत्रें सावनुराहून पाठविलीं तीं प्रतिपदेस येथें प्रविष्ट होउन लिहिलें वर्तमान सविस्तारें कळलें. तुमची रवानगी श्रीमंतानीं सावनुरास केल्याचें व तेथें गेल्यानंतर शहरचे स्थितीचा प्रकार व हैदरअल्लीकडील चौकीच्या लोकांत व तुमचे फौजेंत युद्धप्रसंग होऊन त्यांचा मोड जाहल्याचें वृत्त विस्तारें लिहिलें तें सर्व कळलें. त्याचें उत्तर पुरवणी पत्रावरून कळेल. वरकड ही इकडील मजकूर पत्रीं लिहिला आहे. पुरवण्या अक्षरशः वाचोन

---

१ नारो शंकराची. २ येथपर्यंत गोपाळरावानें पाठविलेल्या पत्रांतील मजकुराचा अनुवाद. ३ रास्ते व आह्मीं. ४ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ५ ह्मणजे ज्येष्ठ शुद्ध चतुर्थीचीं. या वाक्यांत प्रतिपदा जी आली आहे ती कोणची समजावी ? प्रथमदर्शनीं तर आषाढ शुद्धांतली समजावीसें वाटतें. परंतु शंका अशी येत्ये कीं, ज्येष्ठ शुद्ध चतुर्थी व आषाढ शुद्ध प्रतिपदा यांत २६ दिवसांचें अंतर, तेव्हां सावनुराहून मिरजेस पत्रें यावयास कांहीं इतकें दिवस लागणार नाहींत. ज्येष्ठ वद्य प्रतिपदा समजावी तर त्या दिवशीं पोंचल्या पत्राचें हें उत्तर गोविंद हरि अठरा दिवसानीं लिहील हें संभवत नाहीं.

पहाव्या. तिकडील वर्तमान वरचेवर लिहून पाठवीत जावें. आह्मा करितां तुम्ही फारच घाबरे झालां (असें) याचवरून कळलें. ऐशास व्यथा तो निदानची[1], समग्र दोन मास दिवसें दिवस अधिकच, परंतु आयुष्य मर्यादा! समये[2] आला नव्हता यामुळें सर्व अरिष्टें परिहार झालीं. प्रस्तुत काळीं दिवसेंदिवस उतार आहे. या उपरी तिळमात्र चिंता नाहीं. तुम्हीं आह्मा-विशीं काळजी न करणें. साऱ्या लष्कराखेरीज[3] तुम्हांसच सावनुरास रवाना केलें यामुळें फारच चिंता लागली. (तुम्हांजवळ) खर्चास नाहीं, वैरण नाहीं, धान्य नाहीं, कोणतें संकट सोसावें ? तथापि निदान कबूल करून गेलां. तुम्हीं गेलां परंतु लौकिक भारी [तुमच्या] नांवाचा. यामुळें तुम्ही बाराशें गेलां तरी तिकडे पांच हजारांची आवाई पडली (असेल.) दुसरा सरदार दोन हजार गेला तरी तितकीच आवाई. भारी पडणार नाहीं. सर्व गोष्टी एकीकडे आणि पोटाचें संकट एकीकडे याची काळजी. चिरंजीव नीलकंठराऊ व नारायणराऊ बाहेर तलाव्यास[4] गेले, बंकापूरच्या स्वारांची गांठी पडली, युद्ध झालें, [यानीं त्या स्वारांस] मोडून घातलें, नक्ष बसला, हे गोष्ट मोठी झाली. ऐसे[5] चाकरीस धणी सुज्ञ असावे तो विचार कळतच आहे ! ज्यास त्यास पक्षपात झाला आहे. बरें. आपली निष्ठा कारण. ईश्वर उपेक्षीत नाहीं. श्रीमंत कोपळ प्रांतींच मास पक्ष कर्मणा करितीलसें दिसतें. तुम्हांस [परत लष्करांत] आणावें, मुबदला दुसरी फौज पाठवावी, हें अगत्य कोणास ! तरतूद तिळमात्र नाहीं. एक धण्याच्या प्रारब्धावरी (आमची मदार) आहे. बहुतांच्या आशीर्वादें धण्याचें कल्याण व्हावें. त्याच्या योगें बहुतांचें कल्याण आहे. तुम्ही बहुत सावधपणें राहत जाणें. चिरंजीव बापूचें[6] पत्र पाठविलें, तें पावलें. लागलेंच मंग-

---

१ शेवटची. ज्याच्या योगें मृत्यु यावा अशी. २ मरणाचा समय ! ३ लष्करांत इतके सरदार होते त्यास वगळून. ४ टेहाळणीस. ५ असल्या. ६ मेघश्यामराव बापू हैदराच्या कैदेंत होता त्याचें.

ळवेढ्यास[1] रवाना केलें. इकडे हा काल पावेतों पर्जन्य बराच आहे. पेरण्या होतात. कळावें. विष्णुपंतास त्वरेनें यावयाची आज्ञा; त्यास (ते) आम्हाजवळी नेहमी आहेत. एव्हां पर्जन्य काळ. लष्करचे श्रम कळलेच आहेत. श्रावणमासीं निघोन येतील. वरकड सविस्तर पुरवणीपत्रावरून कळेल. करवीरवासी[2] प्रस्तुत पन्हाळेस गेली आहे. मतलब कळत नाहीं. (त्यानीं) श्रीस्वामीचा मठ चौगिर्दा वेढिला, भिताडें स्मशानाचीं[3] घातलीं, यामुळें (स्वामी) फारच श्रमी. बाहेर[4] जाऊं देईना. त्यास ती गडावरी गेलियामुळें तेथून निघोन (स्वामी) आळत्यास आले. येथें येतों ह्मणोन आजी (त्यांचें) पत्र आलें आहे. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. वरचेवर पत्र पाठवीत जाणें. हैदरअल्लीकडील वर्तमान लिहिणें.

नं० ४६४

[आषाढ शुद्ध पंचमी
४ जुलई]

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोपाळराव गोविंद
स्वामी गोसावी यांसीं—

पोष्य माधवराव बल्लाळ प्रधान, नमस्कार. विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. हैदरनाईक हनगळास आल्याचें वर्तमान तुम्ही लिहिलें त्याजवरून राजश्री विठ्ठलराव शिवदेव[5] (व) आनंदराव भिकाजी यांस तिकडे जावयाची आज्ञा केली. ते कूच

---

१ मंगळवेढ्यास बापूचा बाप व पत्र लिहिणाराचा वडील बंधु कृष्णंभट याजकडे. २ श्रीमन्महाराणी जिजाबाई साहेब. ३ कोल्हापुरकर संभाजी महाराज यांच्या समाधीची. ४ राणी जिजाबाई स्वामीस कोल्हापुरच्या हद्दी बाहेर जाऊं देईना. ५ हे अनुक्रमें विंचूरकर व रास्ते.

करून गेलेच असतील. आम्हीं परगणे शिदनूर सरकार मुद्गल येथें आलों. येथील गुंता उरके तों एक दोन मुक्काम होतील. या ठाण्याचें कार्य उरकलें ह्मणजे कूच करून माघारे फिरोन त्या रोखें येतों. विठ्ठलराव व आनंदराव धारवाडचे सुमारें येतील. तुमचें लिहिलें त्यांस ज्यांस जाईल त्या प्रमाणें ते करितील. तुम्ही वर्तमान वरचेवर लिहीत जाणें. जाणिजे. छ० ४ मोहरम. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं० ४६५

[आषाढ शुद्ध षष्ठी
५ जुलई]

श्री.

राजश्री गोपाळराव गोविंद स्वामी गोसावी यांस.

विनंती उपरी. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. " हैदरनाईक बंकापुरास आला, सावनुरावर हालचाल करणार, तरी जलदीनें खासा स्वांरी यावें; " ह्मणोन कितेक प्रकारें लिहिलेंत, ऐशियासीं आम्ही येत येत पुढें आलों. त्याजमुळें लांब पडलें, यास्तव तो आला. तुम्ही मुदत झाली असतां (सावनुरासच) राहिलां, उत्तम केलेंत. आम्ही कांहीं अतःपर गुंतत नाहीं. आजी कूच करून आठ कोस माघारे फिरलों. मजल दर मजल येतों. काल तुम्हास पत्रें लिहिलें आहे, त्यांत दोन रोज लागतील असें लिहिलें होतें. परंतु गौंव कालच घेतला, यास्तव आजी कूच केलें. तुम्ही तेथें आहां तोंव्हां तुमच्या राहण्यानें तो ही गडबड करणार नाहींसें वाटतें. तत्रापि न कळे. कसा समय येतो न कळे. यास्तव लांब लांब मजली करून येतों. तुम्ही ही बातमी वरचेवर पाठवीत जाणें. राजश्री विठ्ठल शिवदेव व आनंदराव रास्ते यांस ही चार पत्रें सर-

१ पत्र पेशव्यांनीं लिहिलेलें. २ हें नं० ४६४ चें पत्र. ३ शिदनूर.

कारांतून गेलीं आहेत. ते ही येतील. गुंता नाहीं. गांवचा गुंता उरकला-च आहे. सत्वर येत असों. कळावें. मोरोबाचे[1] पत्रीं कितेक प्रकारें लिहि-लेंत तरी तसा भाव नाहीं. तुम्हांस कळावें. रवाना छ० ९ मोहरम. बहुत काय लिहिणें. हे विनंती.

नं० ४६६

(९ जुलई)

श्रीगणराज.

अपत्यें नीळकंठानें[2] साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत आषाढ शुद्ध षष्ठी गुरुवार मुक्काम सावनूर वडिलांचे आशीर्वादें यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्रें द्वादशी बुधवारचीं पाठविलीं तीं चतुर्थी भौमवारीं पावलीं. सविस्तर कळलें. " सावनुरास गेलां आहां याजमुळें चिंता प्राप्त जाहली. वरचेवर सविस्तर लिहावें. सावधपणें असावें. " ह्मणोन आज्ञा, त्यास येथें आलेउपरी तिसरे दिवशीं झूज झालें त्याचें वर्तमान मिरजेचे जासुदा-बरोबर सविस्तर लिहिलें आहे. त्याजवर आणखी दो चौं दिवशीं गेलों. ते दिवशीं झूज झालें. त्यांस[3] सारून पेठे जवळ घातलें. त्याजकडील पांच सात घोडे ठार झाले. तीन चार माणूस ठार जालें. घोडे माणूस वीस पंचवीस पर्यंत; जखमी जालें. आह्मां कडील सात आठ घोडे जखमी जाले. चिरंजीव भाऊंकडील एक घोडा ठार[4] पडला. दहा पांच माणसानीं कराचलीनीं हटलें. (?) त्या उपर त्यांचा दम निघाला. बाहेर येईनासे जाले. आमचे राऊत नित्य भोंवताले फिरूं लागले. तेव्हां त्याणीं हैदरनाइकास रड लिहिली. मग तो जडें अनवडीहून कूच करून हनगळास आला. ती बातमी आह्मांस आली. तेथें दोन चार मुक्काम

---

१ गोपाळरावानें चुलत बंधु मोरोबा आबा यास पेशव्यांच्या लष्करांत ठेविलें होतें. २ पत्र नीलकंठराव.चें त्रिंबक हरीस. ३ बंकापुरकरांस. ४ परशुरामभाऊकडील

करून दीड प्रहर रात्रीस बंकापुरास आला. पहांटेचे प्रहर रात्रीस उठोन तोफा व गाडदी घेउन बंकापुरच्या व सावनुरच्या दरम्यान ओढा आहे तेथें दोन टोळ्या करून अगदीं ओढ्यांत दबून बसला. शेंपन्नास स्वांर ओढा उतरून अलीकडे पाठविले. आह्मांस ही बातमी आली. मग आह्मीं शें दीडशें मात्र स्वांर तयार करून बाहेर पाठविले. त्यांस ताकीद केली कीं 'तुह्मीं त्यांचे गळीं न पडणें. नाला उतरून न जाणें.' या प्रमाणें ताकीद केली, आणि आह्मीं सारी मंडळी प्रातःकाळींच भोजन करून तयार होऊन लोकांस जागां जागां चौक्या नेमून देऊन फत्ते हैदर तोफ बुरुजावर आहे तेथें जाऊन बसलों. स्वांर आमचे गेले. पाऊण कोसावर जाऊन उभे राहिले. त्याणीं ओढून न्यावयास बहुत यत्न केला, परंतु यानीं जागा न सोडिली. इतक्यांत तेच दिवशीं राजश्री नारो शंकर यांची फौज श्रीमंतानीं आमचे मोकाबल्यास रवाना केली ती ही दोन प्रहरां आली. गांवांत येऊन उतरली. मग संध्याकाळचे तास दिवसपर्यंत बसून मग उठोन माघारे आलों. आम्हीं नित्य जाऊन बंकापुरचे रानांत उभे राहतों त्या प्रमाणें ते दिवसा ही राउतांचे पाठीस लागून जाऊं, ओढा उतरावयास लागलों ह्मणजे दबा उठवून सर्वांस जिवें धरावें, अशी मसलत त्याणें केली होती ती साधली नाहीं. यामुळें (त्याचा आम्हांवर) परम राग! ते दिवशीं (हैदर) कोणाशीं बोलला नाहीं. रात्रौ भोजन ही केलें नाहीं. मग दुसरे दिवशीं तिसरा प्रहर पावेतों बंकापुरींच होता. परंतु सावनुरावर यावें हल्ला करावा, या प्रंय—[1]

नं० ४६७

(६ जुलई)

श्रीगणराज

श्रियासह चिरंजीव राजश्री गोपाळराव यांसीं प्रती त्रिंबक हरि आ-

---

१ हे पत्र इतकेंच अपुरें सांपडलें.

शीर्वाद उपरी. येथील वर्तमान तागायत आषाढ शुद्ध अष्टमी[1] भृगुवार पर्यंत यथास्थित असे. विशेष. तुम्हीं सावनुरास गेलेवर पत्रें मिरजेस पाठविलीं त्यावरून अवघें वर्तमान कळोन आलें. (तुमची) बंकापुरावर स्वारी जाहली होती. युद्ध प्रसंग जाहला. त्यांसीं माघोरे सारून गांवांत घातलें. घोडें माणूस ही ठार पडलीं, व तुह्मांकडील ही जायां जाहलीं, ह्मणून कळलें. बरें. ईश्वरें यश दिलें. इभ्रत बसली. अलीकडे वर्तमान आलें नाहीं याज करितां चिंता लागली आहे. हरएकविशीं उतावळी न करावी. प्रस्तुत सावनुरींच आहां किंवा लष्करास आलां हें कळविलें पाहिजे. चिरंजीव राजश्री नाना[2]चे शरीरीं प्रस्तुत उतार आहे. घर्म येत होता तो ही शम जाहला आहे. आम्हीं वरचेवर समाचारांत आहों. चिंता न करावी. विठ्ठल विश्राम लष्करांत आले ह्मणोन [तुम्हीं] लिहिलें होतें, परंतु दोही गडचा[3] वेध तुटत नाहीं. रोज उठोन झूज भांडण होत आहे. लोक जायां होतात. पुढें त्याचा विचार कसा काय जाहला तो लिहून पाठविणें. तुम्हीं बहुत सावधपणें राहत जाणें. अद्याप मासपावेतों मंगळ वृश्चिकीं आहे. शनी तुम्हांस वाईट आहे. या करितां सावध राहणें. कर्ज तो महापुरा प्रमाणें चढतें. पुढें श्री काय करील तें करो. बहुत सावधपणें राहणें. सर्वांविशीं सावध राहणें. सर्वांचे दावे. पदरीं कर्ज करींवें[4], सरंजामाचा रुपया येणें नाहीं, ऐसें जाहलें आहे. जुना[5] सरंजाम आमचा होता तो ही बुडाला, व नवा आहे तो कळतच आहे. वरकड तुम्हांकडील तसेंच आहे. श्री करील तें होईल. तुम्हीं सारे हूडपण न करितां जीव राखोन एक वेळ कर्जा पासोन पारीख[6]

---

१ प्रोफेसर मोडक यांच्या जंत्रींत अष्टमी ही क्षय तिथी धरिली असोन शुक्रवार सप्तमीस दिला आहे. त्याच ह्मणजे शुक्रवारीं पडलेली इंग्रजी तारीख आम्हीं पत्रावर मांडिली आहे. २ गोविंद हरीच्या. ३ हे दोन डोंगरी किल्ले सावंतवाडी व कोल्हापुर या संस्थानांच्या हद्दीवर असले पाहिजेत. कारण विठ्ठल विश्राम याचा संबंध सावंतवाडीशीं होता. ४ आपल्या जबाबदारीवर कर्ज काढावें. ५ कुरुंदवाडकरांचा जुना सरंजाम मैदर्गी वगैरे. ६ मोकळे.

जाहलां तर लक्षजोडी मिळाली ! चिकोडीकर, आबाजीपंत व राजश्री शेषोपंत एक जाहले. दुही मात्र लटकी लोकांत. अशांचे वारेस उभें राहों नये ! वरकड इकडे तर सर्व बुडालें. सेनापतीचें संस्थान ही बुडालें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० ४६८

(आषाढ शुद्ध नवमी
७ जुलई)

श्रीगणराज.

आशीर्वाद उपरी. तुम्हीं आषाढ शुद्ध ३ इंदुवारचें पत्र पाठविलें तें शुक्रवारीं मुक्काम सावनूर येथें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. सारांश शत्रु सन्निध छावणी करून राहिला ह्मणोन चार पांच पत्रें पाठविलीं असतां त्यांचें प्रतिउत्तर येतों अथवा नाहीं ह्मणोन ही पाठवीतें नाहीं, यांजवरून तुम्हांस तरी काय ह्मणावें ! आम्ही पंधरा दिवस राहोन निघोन यावें [असा करार असतां] ' शत्रु सन्निध जाहल्यास न निघावें, चार दिवस रहावें. तों यजमानें ही अण्णिगिरी नजीक येतात. ह्मणजे शत्रू झाडींत निघोन जातात. तों पर्यंत केवळ मजूरदारा प्रमाणें करूं नये, ' ह्मणोन

---

१ चिकोडीकर देसाई, आबाजीपंत प्रतिनिधि विशाळगडकर व हुकेरीचा मामलेदार शेषोपंत रुईकर या त्रिकूटांत दुही असल्यापासून त्रिंबक हरीचा काय फायदा होता हें कळत नाहीं. २ सेनापति कापशीकर घोरपडे. यांच्या संस्थानाचें त्रिंबक हरीनें शुभचिंतक असणें साहजिकच आहे. कारण यां पासूनच कुरुंदवाड गांव त्यांस मिळाला होता. ३ पत्र गोपाळरावानें सावनुराहून चुलत बंधु मोरो बल्लाळ उर्फ मोरोबा आबा यास लिहिलें आहे. मोरोबा त्या वेळीं पेशव्यांच्या लष्करांत होता. ४ पेशवे पाठवीत नाहींत. ५ पेशवे. ६ ' श्रीमंतांनीं पंधरा दिवसांच्या मुदतीनें सावनुरास रहावयास पाठविलें ती मुदत संपली. आतां आपण परत जावें. हैदरानें आतां सावनूर घेतलें तर घेतलें. आपण ठरलेल्या मुदती पर्यंत राहिलों. आतां आपणाकडे दोष नाहीं.'

राहिलों. तत्रापि येणें होत नाहीं ! तस्मात् इकडील आस्थाच यजमानानीं सोडिली असल्यास आम्ही तरी काळजी करून काय होणें ? पूर्णिमेपर्यंत राहोन निघोन येतों; ह्मणजे पंधरा दिवसांचे जागीं महिनाभर राहिलों, (असें होईल.) परंतु फळ शेवटीं कांहीं दोष सरकारांतून ठेवितील हें कळोन चुकलेंच आहे ! आपण मात्र एकनिष्ठपणें सेवा करावी. कोणी कसा ही भावना करू ! यजमानाचे नांवास शब्द लागतो, याजकरितां पंधरा दिवसांचे जागां महिनाभर राहिलों. या उपरी (श्रीमंतांचें) सत्वर आगमन जाहलें तर एक दोन दिवसांसाठीं उतावळी करणार नाहीं. नाहीं तर मग कांहीं रहात नाहीं. नबाबीचा अभिमान धरिल्या प्रमाणें शेवट लावणें असेल तर किल्ले कामें सोडून यावें. या प्रांतीं वैरण ही जाहली आहे. (श्रीमंत आल्यानें) शत्रु निघोन झाडींत जातो. कितेक कामें ही होतात. ज्यास पाठवितील या स्थळास तो ही येईल. नाहीं तर कोणी येऊन येथें हिंम्यानें राहत नाहींत. श्रीमंतांस पत्रें लिहिलीं तीं सर्व वाचोन पाहोन प्रविष्ट करणें. आम्ही तुमच्या पत्राची प्रतीक्षा करितों. कृपाकरून वरचेवर पत्र पाठवीत जाणें. आम्हांबराबर लोक आले आहेत त्यांचे स्वार वगैरे असतील त्यांचा कळेल तेणें प्रमाणें परामर्ष करीत जाणें. रवाना छ० ७ मोहरम. मंदवार. बहुत काय लिहिणें, आमची आस्ता सोडून श्रीमंत दूर गेले. [करारा प्रमाणें] आमचे मुबदला फौज तो आली. त्यावरून आह्मीं निघोन यावें (तर नवीन आलेली) हे फौज ही रहात नाहीं आणि सावनूर ही रहात नाहीं ! सावनूर गेल्यानें श्रीमंताचा नक्ष जातो. यास्तव

हा विचार मजूरदाराचा झाला, कळकळीनें सरकारी कामगिरी बजावणाऱ्या सरदाराचा नव्हे, असा भावार्थ.

१ सावनूरच्या नबाबाचा. २ जीं पार पडण्यास विलंब लागेल अशीं किल्ले ठाणीं वगैरे घेण्याचीं कामें. ३ श्रीमंतांचा सक्तीचा हुकुम झाल्या शिवाय केवळ आपल्या हिंम्यावर विंचूरकर, रास्ते, भोंसले वगैरे सरदार येथें येऊन राहणार नाहींत.

आम्ही राहिलों. या उपर आह्मांवर शब्द नाहीं. दो चौं दिवसांत अलीकडे अगर याच सुमारें [श्रीमंत] आले ह्मणून वर्तमान आलें तरी उत्तम. वर्तमान आलें नाहीं तरी आम्ही निघोन येतों. मग सावनूरचें कांहीं हो ! या उपर आह्मांवर शब्द नाहीं. आम्ही आपले तर्फे जे करावयाची (मर्दुमी) ते केली. आम्हावर बोल नाहीं. हे आशीर्वाद. तुम्ही आमची आस्ता सोडिलीशी दिसते. ते[1] इकडे येतात न येतात तें साफ लिहिलें. ह्मणजे आम्ही निघोन येतों. मळमळीत न लिहिणें. हे आशीर्वाद.

नं० ४६८

[आषाढ शुद्ध द्वादशी
१० जुलई]

लक्ष्मणराव भिकाजी रास्ते यांजकडून १० मोहरमचें
गोपाळरावास पत्र:—

" हैदरनाईक हनगळापलीकडे कोसावर मुक्काम करून राहिला आहे. त्याची धमक सावनुरावर यावें हें फार आहे. यास्तव आमचे विचारें तुम्हीं यावें, ह्मणोन लिहिलें तें कळलें. ऐशियास हैदरनाईक सावनुरास येतो ही बातमी आपण आणवून तावडतोब आम्हांकडे पत्रें पाठवावीं. ह्मणजे आम्ही व राजश्री विठ्ठलराव तात्या[2] फौजसुद्धां येतों. येविशीं तात्यांस ही परभारें लिहावें. "

नं० ४६९

[१० जुलई]

श्रीगणपतिर्जयति.

श्रियासह चिरंजीव राजश्री गोपाळराव यां प्रती गोविंद हरि. आ-

---

१ पेशवे. २ विंचूरकर.

शीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत आषाढ शुद्ध द्वादशी सोमवासर पावेतों यथास्थित जाणोन स्वकीय लेखन करणें. विशेष. तुम्हांकडील पत्रें सावनूरचे मुक्कामींहून आलीं तीं प्रविष्ट होऊन लिहिलें वर्तमान सविस्तारें कळलें. त्या अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. सांप्रत तुम्ही कोठें आहां ? श्रीमंत कोपळ प्रांतीं होते ते तेथेंच आहेत किंवा नरगुंद, नवलगुंदाकडे आले ? तुमचे मुबदला सावनुरास फौज आली किंवा तुम्हींच तेथें आहां हें कांहींच साकल्य कळत नाहीं. तरी सविस्तर वर्तमान लिहून पाठविणें. चिरंजीव राजश्री भाऊचें[१] पत्र प्रतिपदा भृगुवारचें यादवाडाहून येथें आलें. त्यांतील वर्तमान जे दोन वेळां बंकापुरांतील लोकांत व आपल्यांत झूज जाहलें. त्यांत पहिलें झूज सावनुरास जातांच तिसरे दिवशीं उभयतां चिरंजीवांनीं[२] जाऊन केलें तें वृत्त [भाऊच्या] पत्रावरून कळलें. दुसरें झूज कोणे दिवशीं कसें जाहलें हें कळलें नाहीं. तें वृत्त व 'हैदरअल्ली जडें अनवडीवरी होता तो सहा हजार स्वांर व पंधरा हजार पायदळ एकूण वीस[३] हजार फौजेनिशीं हनगळास आला' ह्मणोन त्याणीं लिहिलें होतें, त्याचें साकल्य लिहून पाठविणें. आम्हांस प्रस्तुत उत्तम प्रकारें उतार आहे. तुम्हीं किमपि चिंता न करणें. चिरंजीव राजश्री दाजी षष्ठी गुरुवारीं निरोप घेऊन तासगांवास गेले. तेथून मंगळवेढ्यास जातील. इकडे पर्जन्य हे दिवस पावेतों विपुल जाहला. कृष्णा, पंचगंगा वगैरे नदियांस महापूर येऊन गेले. धारण सवंग होत नाहीं. खरीप पिकल्यानंतर सवंग होईल. तरी न कळे. श्री स्वामी जगद्गुरु करवीराहून येथें आले होते. त्यास त्यांच्या स्वरूपानुरूप सन्मान करून निरोप दिला. काल एकादशीस प्रातःकाळींच मागती करवीरास निघोन गेले. (राणी जिजाबाईकडून

---

१ परशुरामभाऊचें. तो सावनूर सोडून यादवाडाकडे कां आलां होता हें ठाऊक नाहीं. २ नारायणराव व नीलकंठराव यानीं. ३ येथें हैदराच्या फौजेची बेरीज वीस हजार हस्तदोषानें मूळपत्रांत पडली आहे.

वर्गणीची पोंच.

सन १८९८।९९

(ता. २२ जानेवारी पासून २२ फेब्रुवारी पर्यंत.)

		रु०
रा. रा.	विष्णु नारायण देवकुळे. वांई.	३
” ”	गोविंद रामचंद्र दशपुत्र. नागपुर.	३
” ”	दिनकर शिवराम भांडारकर. मुंबई.	३
” ”	बाळकृष्ण नारायण भाजेकर. बीए. एल्. एल्. बी. मुंबई.	३
” ”	काशिनाथ मल्हार कर्णिक. पुणें.	३
” ”	आपाजी काशिनाथ खरे. ”	३
रा. सा.	बळवंत रामचंद्र सहस्रबुद्धे. धारवाड	३

ऐ. ले. संग्रह-कर्ते.

ऐतिहासिक–लेख–संग्रह.

हें डेमी अष्टपत्री सांचाच्या चाळीस पृष्ठांचें मासिक पुस्तक दर महिन्यास मिरज येथें नियमानें प्रसिद्ध होत असतें. यांत पटवर्धन जहागीरदारांच्या जुन्या चिटणिशी दप्तरांतील ऐतिहासिक महत्वाचीं व प्रत्येक स्वारीतील भरपूर माहितीचीं पत्रें सालवारीच्या क्रमानें छापून प्रसिद्ध होत असतात. शिवाय अन्यत्र उपलब्ध झालेले कागदपत्र व बखरी वगैरेचा ही यांत समावेश होत असतो. या मासिक पुस्तकाची आगाऊ किंमत सालिना टं० हा० सुद्धां तीन रुपये आहे. ग्राहकांनीं सालिना वर्गणीच्या किंमतीचें व्हा० पे० मागवावें अथवा तितक्या रकमेची मनीआर्डर पाठवावी. त्या शिवाय पुस्तक सुरू केलें जाणार नाहीं.

ऐ०ले०संग्रह कर्ते.

आमचे पुणें व मुंबई येथील एजंट.

रा.रा. मुरलीधर मल्हार अत्रे, महाराष्ट्र बुकडेपोचे म्यानेजर, बुधवार पेठ पुणें. रा.रा. विष्णु दासो बनहट्टी. कमिशन एजन्ट आणि जनरल मर्चंट. गिरगांव ट्रामवे टरमिनस्. पेंडसे यांची नवी चाळ, मुंबई.

सदरहू दोन असामींस आह्मीं ऐ०ले०संग्रहाचे एजंट नेमिलें आहे. त्यांजकडे तेथील वर्गणीदारानीं वर्गणी द्यावी. आमचीं सर्व पुस्तकें एजंटांकडे विकत मिळतील.

ऐ०ले०संग्रह–कर्ते.

ऐतिहासिक-लेख-संग्रह.

मासिक पुस्तक.

एप्रिल १८९९ इ.

अंक २३

वासुदेव वामन शास्त्री खरे
मिरज हायस्कुलांतील संस्कृत शिक्षक.

यांनीं

कुरुंदवाड येथें
" भाऊनाना " छापखान्यांत छापविलें.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हांशीलसह तीन रुपये.
फुटकळ अंकास पांच आणे.

वर्गणीदारांस विनंती.

आमच्या मासिक पुस्तकास जून पासून तिसरें वर्ष लागतें. मासिकपुस्तकाची वर्गणी आगाऊ असून ती पुष्कळांकडून तशी येत नाहीं यामुळें खोळंबा व त्रास होतो. वर्गणी आज येईल, उद्यां येईल, या भरंवशावर महिनेमहां आम्हीं पुस्तक पाठवीत असावें, व तें निमूटपणें घेऊन वर्गणीची मागणी आली ह्मणजे कानावर हात ठेवावे, असा ही प्रकार कित्येक गृहस्थानीं केला आहे ! आधीं मुळीं आमच्या पुस्तकास वर्गणीदार थोडे. तशांत या प्रमाणें जर वर्षानुवर्ष बूड लागूं लागली तर पुस्तक चालावें कसें ? या करितां सर्व आश्रयदात्यांस आम्हीं विनंती करितों कीं, जूनचा अंक आम्हीं तिसऱ्या वर्षाच्या वर्गणीचें व्ही. पी. आकारून त्यांजकडे पाठवूं त्याचा त्यानीं स्वीकार करावा. तशी कोणास सवड नसेल तर तिसऱ्या वर्षाच्या पहिल्या तीन अंकां पैकीं कोणचा अंक आम्हीं व्ही. पी. नें पाठवावा तें त्यानीं आगाऊ कळवावें. पुस्तक बंदच करावयाचें असेल तर तसें तरी कृपाकरून कळवावें ह्मणजे विनाकारण व्ही. पी. चा खर्च आमच्या अंगावर पडणार नाहीं.

ऐ०ले०संग्रह कर्ते.

त्यांच्या मठाच्या) वृंदावनास उपद्रव जाहला यामुळें फारच श्रमी आहेत. (आम्ही) पूर्वी तुम्हांस लिहिलें आहे, श्रीमंतांस बोध करून तेवढा उपाय करावा. अधर्म घडों लागले त्यामुळें पृथ्वीवरी दुश्चिन्हें होऊं लागलीं. चिरंजीव राजश्री गंगाधरपंत ओक याणीं पुण्याहून आम्हांस पत्रें पाठविलें तेंच बजिन्नस पत्र तुम्हांकडे बाचोन पहावया करितां पाठविलें आहे. त्या वरून दुश्चिन्हांचें वगैरे (व) उत्तरेकडील वृत्त कळेल. येथील किल्ल्याचे वगैरे इमारतींचें व खंदकाचें काम अद्याप चालत आहे. वरकड अधिकोत्तर कांहीं लिहिणेंसें नाहीं. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं० ४७१

[१० जुलई]

श्रीगणराज

चिरंजीवें राजश्री रावसाहेब यांप्रती सकल सौभाग्यादि संपन्न वज्रचूडे मंडित सत्यभामाबाई. आशीर्वाद उपरी. येथील क्षेम तागायत आषाढ शुद्ध १२ भौमवासर जाणोन आम्ही सुखरूप असों. विशेष. तुम्हांकडून सावनूरचे मुक्कामींहून पत्रें येऊन वर्तमान कळलें. त्या अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तर वर्तमान लिहून पाठविणें. तिकडे सांप्रत शरीरीं उत्तम प्रकारें, उतार आहे. तुम्ही चिंता न करणें. वरकड अधिकोत्तर कांहीं लिहिजेसें नाहीं. चिरंजीव सौभाग्यवती ठकूबाई व जामात पंढरीस यात्रेच्या उद्देशें गेले आहेत. आठा रोजीं यावयास सांगितलें

---

१ हें नं० ४६० चें पत्र. २ तोतयाचें, वर्तमान. सदरहू ह्मणजे नं० ४६० च्या पत्रांत तोतयाचें वर्तमान नाहीं. तेव्हां कदाचित् त्या पत्राच्या आह्मांस उपलब्ध न झालेल्या पुरवणीबद्दल हें लिहिणें असेल. ३ हें गोपाळरावाच्या आईचें त्यास पत्र. ४ नवऱ्याच्या ह्मणजे गोविंद हरीच्या.

आहे. येतील. सारांश तिकडील प्रांतचा मजकूर ही सुजारोन[1] आलाच आहे. जामात तिकडून रोजगारास्तव येथें आले. येऊन चार पांच महिने राहिले. आतां रोजगार नसतां काय ह्मणून तिकडे जाणार? यास्तव रोजगार तुम्हीं योजून लिहून पाठवावें. याजविशीं आम्हीं वारंवार तुम्हांस लिहीत असतों. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० ४७२

(आषाढ शुद्ध चतुर्दशी
१२ जुलई)

श्रीगणपतिर्जयति.

श्रियासह चिरंजीव राजश्री आबा यांप्रती अंताजी विठ्ठल.[2] आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ० १२ मोहरम जाणोन स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. वर्तमान कळलें. मुळगुंद [चा] व चिरंजीव राजश्री नीलकंठराव यांजकडील चहूं गांवचा मजकूर लिहिला तो कळला. ऐशास एक दोन दिवसांत तो मजकूर त्या[3] गृहस्थाशीं बोलून मागाहून आपणास लिहून पाठवितों. लष्करचें

१ सुजारोन = सुधारोन. सत्यभामाबाईच्या मनांत असें होतें कीं, तूर्त चालू असलेल्या स्वारींत जो नवीन मुलूख जिंकिला गेला आहे त्यांत आपल्या जांवयास गोपाळरावानें एखादा मामलेदारी सारखा रोजगार मिळवून द्यावा! त्याच अर्थानें ती लिहित्ये कीं, आजपर्यंत तिकडे हैदरअल्लीचा दंगा होता हें जांवईबोवांस रोजगार न मिळण्याचें कारण तुम्हीं सांगत होतां; परंतु आतां तशी स्थिति नसल्यामुळें ती सबब तुह्मांस राहिली नाहीं. २ हें अंताजी विठ्ठल पटवर्धन यादवाडकर यांचें मोरो बल्लाळ यास पत्र. ३ या गृहस्थाचें नांव काय हें माहीत नाहीं. चाळीस हजार रुपये सरकारांत रसद भरून मुळगुंद महालाची मामलेदारी पतकरण्या विषयीं व गलगलें महालाची मामलेदारी पतकरण्याविषयीं यास मोरो बल्लाळाचा पत्र लिहिणाऱ्याच्या मार्फत आग्रह चालला होता. परंतु हैदरनाईक झाडी सोडून बंकापुरा पावेतों आल्याचें वर्तमान ऐकून हा भावी मामलेदार कचकरूं लागला त्या संबंधें या पत्रांतील मजकूर आहे. मुळगुंद

वर्तमान लिहिलें तें कळलें. मुळगुंदचा मजकूर चाळीस पावेतों लिहिला त्यास हैदरनाईक बंकापुरास आल्याचें वर्तमान ऐकोन अनमान करीत आहे. परंतु आम्ही धीर भरंवसा देऊन मार्गावर गोष्ट आणिली आहे. दोन चार दिवसांत रायापाकडील गृहस्थ पाठवून देतों. त्याला आपण निभावून न्यावें. चिरंजीव नीलकंठराव याचे खर्च्यांचा ही प्रकार करार करून देववावा. लौकरच गृहस्थास पाठवितों. आपणास गलगलेचा प्रकार जाते समयीं सांगितला होता. आपण ही मान्य केलें होतें कीं तेथील आकार पाहू. त्यास वीस पंचवीस हजार पावेतों कुलबाब, कुलकानू (त्या परगण्याची जमाबंदी) आहे. मनास आणावें. होत असल्यास लिहून पाठवावें. अनमान न करावा. आपल्यासीं बोलल्यास किमपि अंतर पडणार नाहीं. 'कृष्णाबाई शिंदे याणीं कडकोळ घेतलें, आम्हांकडील प्यादे गेले होते' म्हणून लिहिलें, तरी त्याचीं उत्तरें पेशजीच पाठविलीं आहेत. पावलींच असतील. कडकोळ देशाई याणें घेतलें. प्रस्तुत त्याचेच प्यादे आहेत. आम्हांकडील एक प्यादा गेला असला तरी पत्ता लावावा म्हणजे सर्व खरें. नाहक बदनाम केल्यास इलाज नाहीं ! कृष्णाबाई म्हणावी तर

हा गांव धारवाड जिल्ह्यांत गदगच्या नैऋत्येस बारा मैलांवर आहे. गलगलें हें कलादगीच्या उत्तरेस चौदा मैलांवर कृष्णातीरीं आहे. औरंगजेबानें मराठ्यांशीं जें वीस वर्षे युद्ध चालविलें होतें त्यांत त्यानें कांहीं वर्षे या ठिकाणी छावणी केली होती.

१ पत्र लिहिणाराकडील. २ कटकोळ कोल्हापुर संस्थाना पैकीं. कोल्हापुरकरांचें कृष्णाबाई शिंदे मनोळीकर हिशीं वैर. कृष्णाबाईचा व पटवर्धनांचा परम स्नेह. तो इतका कीं गोविंद हरि तिला 'चिरंजीव' असें लिहितो. कोल्हापुरकरानीं पेशव्यांकडे बोभाटा केला कीं कृष्णाबाईनें जबरदस्तीनें आमचा कटकोळ गांव घेतला व तिला पटवर्धनानीं व विशेषें करून अंताजी विठ्ठल पटवर्धन यानें फूस दिली. पेशव्यांजवळ मोरोबा आबास गोपाळरावानें ठेविलें होतें. मोरोबानें कोल्हापुरकरांचा बोभाटा कानीं येतांच तो मजकूर अंताजी विठ्ठलास लिहिला. त्याचें त्यानें काय उत्तर पाठविलें तें वरील पत्रांत आहे.

तिचा एक प्यादा व एक स्वार (आम्ही) जवळ बाळगिला नाहीं. त्यांणीं आपले सेवक दूर केले ते कोठें ही जाऊन पोटें भरितात. त्यास [दरबारीं गवगवा करणारे आमची] अशी बदलामी करितात त्यास काय इलाज आहे ? तस्मात् भोग सरला नाहीं म्हणावें ! होसेकोटेंत आहेत तरी आमचेच प्यादे आहेत. असें असतां दरबारीं बोभाट करितात त्यांस काय म्हणावें ? मुद्दा अंगीं लाऊन बोलणें तें बोलावें असा मजकूर आहे. हैदरनाईक बंकापुरास आल्याचें वर्तमान ऐकून श्रीमंत माघारे अणिगिरीचे सुमारें येणार ह्मणून लिहिलें तें कळलें. त्यास चिरंजीव[3] सावनुरीं आहेत. तो[4] बंकापुरास. तेव्हां जवळ गांठ आहे. श्रीमंत माघारे आले तेव्हां उत्तम झालें. त्याजवर दहशत पडेल. तो माघारा जाईल. कदाचित् तोंडें[5] लागलें तरी श्रीमंतानीं फार तजविजीनें काम करावें. पर्जन्यकाळ दिवस दाणा वैरण मिळणार नाहीं. सर्व आपणांस दखल आहे. अब्रू राहून काम करणें तें करावें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

पै॥ छ० १९ मोहरम

नं० ४७३

[२४ जुलई]

श्रीगणराज

श्रियासह चिरंजीव राव यां प्रती सौभाग्यादि संपन्न सत्यभामाबाई आशीर्वाद. उपरी. येथील क्षेम तागायत आषाढ वद्य एकादशी भौमवार पावेतों सुखरूप असों. विशेष. तुम्हीं सावनुराहून जासुदा समागमें छ०

१ कृष्णाबाईनें. २ हें होसकोटें कर्णाटक वालेघांटा पैकीं शहाजीराजे यांच्या जहागिरींतलें नव्हें. तें आतां हैदराकडे गेलें होतें. हें दुसरेंच होसकोटें दिसतें. ३ गोपाळराव. ४ हैदरअल्ली. ५ लढाई सुरू झाली तर. ६ हें गोपाळरावाच्या आईचें त्यास पत्र.

१४ मोहरमचें पत्र पाठविलें तें भृगुवारीं छ० २० रोजीं प्रविष्ट होऊन लिहिलें वर्तमान कळोन संतोष पावलों. याच अन्वयें सदोदित पत्र पाठवीत जावें. चिरंजीव सौभाग्यवती लक्ष्मीबाई[1] सून सगर्भ आहे. ओटी भरून माहेरास पुण्यास रवाना करून दिली. भिडे याणीं पालखी कारकून माणसें मूळ पाठविलें होतें. रवाना करून आज पांच दिवस जाहले. तुम्हांस कळावया कारितां लिहिलें आहे. वरकड अधिकोत्तर लिहिजेसें नाहीं. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे. हे आशीर्वाद.

हेच पत्रीं चिरंजीव नारायणराऊ व नीलकंठराऊ व भाऊ[2] यासीं आशीर्वाद. लिहिलें परिसिजे. हे आशीर्वाद.

नं० ४७४ L

(श्रावण शुद्ध चतुर्थी
१ आगष्ट)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

---

१ तिसरा मुलगा पांडुरंगराव गोविंद याची बायको. ही पुण्यास भिडे म्हणून सावकार होते त्यांची मुलगी होती. तिजविषयीं हा मजकूर लिहिण्याचें कारण असें कीं, पत्र लिहिणारणीचा थोरला मुलगा गोपाळराव यास पहिल्या बायको पासून फक्त एक मुलगी झाली होती. त्याचें दुसरें लग्न होऊन नुकतें एक वर्ष झालें होतें. दुसरा मुलगा वामनराव हा नेहमींचा कफक्षयी. त्यास एक मुलगी झाली तिच्या पाठीवर मूल झालेंच नाहीं. तिसरा पांडुरंगराव याची बायको नुकतीच वयांत आली होती. चवथा गंगाधरराव हा तर बारा वर्षांचा होता. तेव्हां आतां आपला वंश विस्तार डोळ्यां देखत व्हावा, नातू पणतू मांडीवर खेळवावे, ही गोविंद हरि व त्याची बायको यांची इच्छा तिसरी सून लक्ष्मीबाई हिला पुत्र झाल्यानेंच पूर्ण व्हावयाची होती! ही त्यांची इच्छा लक्ष्मीबाईस तीन पुत्र होऊन पूर्ण झाली. पहिला हरिहरराव, दुसरा चिंतामणराव, तिसरा विठ्ठलराव. असले घरगुती मजकूर गोविंद हरीच्या ही लिहिण्यांत येतात. परंतु बायकांच्या लिहिण्यांत ते येणें अधिक समर्पक होय! २ परशरामभाऊ.

अपत्यें माधवरायानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० २ सफर नजीक नरगुंद येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. वडिलीं आनंदराव रास्त्यांविषयीं लिहिलें तें त्यांस सांगितलें. त्यावरून मशारनिल्हेनीं सेवेशीं पत्र लिहिलें आहे त्यावरून विदित होईल. इकडील वर्तमान तर हैदर प्रस्तुत हनगलास आहे. दुर्गकरे[2] (त्याजकडून) निरोप घेऊन गेला[3]. मिरावर[4] त्याची इतराजी आहे व मीरफैजुल्ला ही नाखुषच आहे. त्यांचे[5] लोक बहुत पळतात. (त्याच्या) लष्करचा धर सुटला आहे. प्रस्तुत त्याचा विचार सलुख[6] झाला तर करावा हा भाव दिसतो. महादशेटीचा कागद गेला आहे त्याचें उत्तर आज उद्यां येईल. त्या नंतर सर्व अर्थ कळेल तशा सारिखें सेवेशीं लिहीन. वडिलांस विदित व्हावें. हे विज्ञापना.

पै॥ छ० १९ सफर

नं० ४७९

(श्रावण शुद्ध सप्तमी
४ आगस्ट)

श्रीगणराज

सेवेशीं गोपाळ गोविंद. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० सफर मुक्काम लक्ष्मेश्वर येथें स्वामीचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. आम्हीं काल सावनुराहून येथें आलों. येथून

---

१ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. २ चित्रदुर्गचा संस्थानिक. ३ चित्रदुर्गास परत गेला. ४ मेहुणा मीररेजा यावर हैदराजी इतराजी. ५ हैदराच्या सैन्यांतील लोक आमच्या दहशतीनें त्याचें लष्कर सोडून पळून घरोघर जात आहेत. ६ तह. ७ हें गोपाळरावाचें पेशव्यांस पत्र.

उदईक कूच करून येत असों. राजश्री विठ्ठलराव तात्या आल्यानंतर पंचमीपर्यंत लोकांचे राजकारणानिमित्य राहिलों. पुढें रहावें तर खच भारी. याजकरितां जितके लोक आले तितके आणऊन घेतले. बाकीच्या लोकांस कौल दिले येणार त्यांस, ते माहितगारी सर्व मशारनिल्हेस करून दिली. मातबर राजकारणाचा प्रकार बोलण्यांत आला होता, परंतु ' हुजूर शामराव गोपाळ महादेव शेट चीरकर यांचे विद्यमानें तहाचें बोलणें बोलत आहेत, फार करून ठरावांत [तहाची] गोष्ट आली, ' अशीं वर्तमानें येतात; याजकरितां त्यांचा यावयाचा अनमान. चार दिवस लांबणी असती तर ठराव बनता. जनवार्ता ' परिछिन्न सलुख झाला ' असें बोलतात. तथापि आम्हीं राजकारणाचें अन्न रक्षुनच आलों आहों. शिलेदार आम्हांकडे तेथून निघोन आले त्यांची नांवनिशीची याद आकारून पाठविली आहे. सेवेशीं विदित होईल. परवां बंकापुरापलीकडे (आमच्या फौजेस) स्वांरीस पाठविलें होतें. तिकडून लहान मोठे दहा बारा घोडे व पांच सहाशें गुरें आणिलीं. त्यांचें धावणें येऊन (त्यानीं आह्माशीं) गांठ घातली. तेथें झुंज झालें. दोन घोडीं व यशवंतराव वालेकर खासा ठार झाले, परंतु त्यांस मोडून माघारें घातलें. बंकापुरांतील स्वांर त्यांचे कुमकेस आले नाहींत. बाहेर निघाले स्वार तसेच निघून जातील याजकरितां निघोंच दिलें नाहीं. (शत्रूस त्याच्या) लोकांचा भरंवसा काडीमात्र नाहीं. पुढें आपला परिणाम उत्तम नाहीं, हा अर्थ ध्यानांत आणोन तहच करावा या धांवतींत (शत्रू) आहे. त्याच्या सैन्यांत ' तह झाला, मेघश्यामराव यांसीं

१ बंकापुरास शत्रूचे लोक आहेत त्यांजकडे फितूर केला होता त्यास्तव. २ हें हैदराच्या वकीलाचें नांव. ३ हे सर्व मराठेच होते. ४ कुमकेच्या निमित्तानें हे मराठे स्वांर किल्ल्या बाहेर जाऊन पटवर्धनांकडे पळून जातील ह्मणून हैदराच्या सरदारानें त्यांस बंकापुरच्या किल्ल्याबाहेर सोडिलें नाहीं! ५ प्रयत्नांत. ६ मेघश्यामराव कैदेंत बिदनुरास होता. मराठ्यांशीं तह झाला ह्मणजे त्यास सोडावें लागणार, या करितां त्यास आपल्या लष्करांत आणण्यासाठीं हैदरानें पालखी पाठविली.

आणावयासीं पालखी पाठविली, ह्मणून वर्तमान ! हर प्रकारें वरचेवर (त्याच्या) लष्करांत जासुदजोड्या (लोक) येतात व तिकडील सवाल जबाब घेऊन (आम्हांकडे) येतात ते ही ' फार दिवस लागत नाहीं ' आठ दिवसांत (तहाचा) गुंता उरकेल ' असें बोलतात. सत्य मिथ्या न कळे. जनवार्ता ऐकिली ती सेवेशीं विनंती लिहिली आहे. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं० ४७६ L

(श्रावण शुद्ध सप्तमी
४ आगस्ट)

श्री.

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री धोंडोराम[1]
गोसावी यांसी.

सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार सुरुसन खमस सीतैन मय्या व अल्लुफ. चिरंजीव राजश्री राव[2] यांची छावणी सावनूर प्रांतें झाली. यथायोग्य पारिपत्य हैदराचें न झाल्यास्तव खासा स्वारी बादबरसात भारी फौज व जलद तोफखाना ऐसी तयारी करून जाण्याची तरतूद होत आहे. त-

---

१ मोंगलाच्या दरबारीं पेशव्यांचा वकील नेहमीं राहत असे त्याचें हें नांव दादासाहेबांनीं हें नं० ४७६ चें व पुढलें नं० ४७७ चें त्यास पत्र लिहून कर्नाटकच्या स्वारी करितां नबाबाजवळ कुमक मागण्याविषयीं सुचविलें आहे. पेशवे सर्व सैन्यासह कर्नाटकच्या स्वारीस गुंतले आहेत. आपण ही तिकडेच जाणार. तेव्हां महाराष्ट्रांत फौज नाहींशी पाहून निजामअल्लीनें पुण्याकडे येऊन दंगा केला तर पंचाईत पडेल. या करितां कसें ही करून त्यास कर्नाटकच्या स्वारीच्या मसलतींत गोंवून घ्यावें अशा उद्देशानें ही दादासाहेबांची निजामअल्लीजवळ कुमक मागण्याची शक्कल होती. पण यांत ' देणें नास्ति घेणें नास्ति ' असा प्रकार असल्यामुळें निजामअल्लीनें कुमक देण्याचें नाकारिलें ! २ रावसाहेब पेशवे.

माम सरदार ही बोलाविले आहेत. ऐशियास सरकारची मर्जी नबाबाशीं आम्हांशीं दोस्ती बहुत वाढावी. त्यांचे कामास आम्हीं जावें, आमचे कार्यास त्याणीं यावें, असें आहे. येणेंकरून दोस्ती विशेष वाढेल. किलाफ[1] तिलमात्र राहणार नाहीं. परस्परें नफे बहुत होतील. करोडोंची जमा परस्परें येखलासानें[2] होईल. यास्तव मोंगली दोन हजार फौज सुलतान महमद मुरादखान बहादर व दोघे निंबाळकर व खंडागळे अथवा खंदारकर असे पांच सात हजार फौज व वीस पंचवीस तोफांनीं तऱ्हातऱ्ही[3] येणें प्रमाणें नबाबानीं पाठवावें. येणेंकरून नबाबास नफे बहुत होतील. येखलासानें पंचवीस लक्षांची जहागीर त्याणीं आम्हांस मागितली, आम्ही त्यासीं मागितली तरी परस्परें देण्या घेण्यास काय मजकूर? मुख्य येखलास वाढावा. नबाब आम्हीं एकी पूर्ण झालियानंतर घरचे दारचे सर्व पेंच आमचे वारतात. तसेच नबाबाचे. परंतु नबाब म्हणतील कीं, "'आम्हींच कुमकेस येतों;' तरी परिछिन्न[4] कार्यास येणार नाहीं. कारण दोन मस्त हत्ती एक जागां राहून संकट! काम नासेल. किलाफ मात्र कारण होईल. दुतर्फा नाचकी होऊन दुतर्फा नुकसानी होईल. यास्तव परिछिन्न नबाबानीं नच यावें. आम्हांस हैदर मारणें संकट ईश्वरी दयेचे भरंवशानें मानीत नाहीं. [त्यास] सहज मारितों! त्यांत सालमजकुरीं तोफा, बाण, जेजाला यांचा रिसाला बहुत तयार करविला. दसऱ्यापर्यंत कुल तयारी करून जल्द जाऊन शत्रूचें पारिपत्य करितों. परंतु पुढें नबाबाचें आमचें बहुत दिवस चालावें सबब हें पत्र सादर केलें असे. तरी एतद्विषयीं नबाबाशीं बोलणें आणि उत्तर सत्वर पाठविणें. सारांश येकलासानें जें नबाब चाहतील तें होईल. आम्हीं चाहूं तें करूं. तोफा फौज हुजूर पैठणच्या सुमारें याव्या. नबाबानीं यंदा सिकालेकाकडे जावें अथवा हैदराबादेस नाच रंग पाहून चार महिने असावें. हें काम फैसल एका दिवसांत (?) करून फिरून

१ संशय. २ विश्वासानें. ३ जितक्यास तितके. ४ बिलकुल.

नवाबाशीं समजूत स्नेह करून आम्हीं आपले कामास जाऊं. नवाबानीं अर्काट अथवा आणीक जिकडे चहातील तिकडे जावें असें योजिलें आहे. या कामास बहुत दिवस न लागत. महिना निदानीं दोन महिने लागतील. मग जिकडे स्वारी पाहिजे तिकडे जाण्यास मोकळीक. कांहीं विलंब लागत नाहीं. हें काम करून येखलास ही पक्का होऊन आणीक दहा कामें काजें सहजांत होतील. तुम्हीं नवाबाशीं बोलून उत्तर जलद पाठविणें. इतकें लिहिलें असतां नवाबाचे मनास न आलें तरी आम्हीं मातबर सामानानें जातच आहों. ईश्वर कृपेकरून हैदराचें पारिपत्य करीतच आहों. परंतु तसा रंग परस्परें राहणें संकट पडेल. जाणिजे. छ० ५ सफर.

नं० ४७७L

(श्रावण वद्य तृतीया
१४ आगस्ट.)

श्री.

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री धोंडोराम
गोसावी यांसी.

सेवक रघुनाथ बाजीराव. नमस्कार. सुहूसन खमस सीतैन मय्या व अल्लफ. नबाबाची थैली आली त्या बरोबर तुमचें पत्र असावें तें नव्हतें. असो. सांप्रत नबाबाचे थैलीचें उत्तर पाठविलें आहे त्यांत तुमचे जबानीवर सारा मजकूर घालून लिहिलें आहे. ऐशियास तुमचे पत्रीं मजकूर लिहिला आहे हा समजून नबाबाचे कानावर घालणें. आम्हांस हैदराचें पारिपत्य करणें जरूर. यास्तव नबाबानीं पन्नास तोफा व पंचवीस हजार फौज आमचे मदतीस पाठवावी. तेणेंकरून पुढें येखलास पक्का वाढेल. आम्हीं नबाबाशीं बहुत स्नेह करावा. नबाबास एखादें काम पडलें तरी आपण करावें. फौज कुमकेस पाठवावी. (तैसेंच नबाबानीं ही करावें.) परंतु

नबाबानीं [स्वतः] येऊं नये. कारण कीं दोन मस्त हत्ती एके जागीं राहत नाहींत. यास्तव नबाबानीं निंबाळकर वगैरे फौजच आमचे कुमकेस पाठवावी. तुम्ही म्हणाल कीं, ' यांचेच कुमकेनें स्वामी लढाई करणार कीं काय ? ' तर असा भाव नाहीं. जो मनसबा करणें तो ईश्वरी दयेनें आपलेच बळावर करितों. त्यांत सालमजकुरीं तोफांची तयारी व जंगी सामान व फौज जास्ती ठेविली आहे. श्रीकृपेनें नबाबाचे कुमकेची आशा बाळगीत नाहीं. (हैदराशीं या पुढें) लढाई होईल त्याची खबर लौकरच तुमचे ऐकण्यांत येईल. सांप्रत हैदराचा वकील चिरंजीव राजश्री रांव यांजपाशीं आला आहे. मीनत करीत आहे. परंतु आमचे मनांत पुरतेंच पारिपत्य करावें असें आहे सबब जलदी करितों. आमचा भाव इतकाच कीं, नबाबानीं आम्हीं एक असल्यास परस्परें नफे बहुत होतील. पेंच वाढणार नाहीं. त्यांचे मुलखाचा बंदोबस्त ते करितील. आमचा आम्हीं करूं. यास्तव नबाब जेणेंकरून स्नेह करीत तें करणें. तोफा पंचवीस व दहा हजार फौज आमचे मर्जी प्रमाणें आमचेजवळ दसऱ्यास पोचेसें त्याणीं करावें. येणेंकरून नबाबाचे वजनाची ही सचोटी वाढेल व स्नेह ही कायम होईल. जैशी शिकंदराची दिवाळ. जाणिजे. छ० १९ सफर.

पै॥ छ० २ रबिलावल. संध्याकाळ मुक्काम भागानगर.

नं० ४७८ [७ आगस्ट]

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीव राजश्री रांऊसाहेब यां प्रती गोविंद हरि. आशीर्वाद.

---

१ पेशवे माधवराव. २ एकाच पत्रांत दादासाहेब मोंगलाजवळ पन्नास तोफा व पंचवीस हजार फौज आणि पंचवीस तोफा व दहा हजार फौज कुमकेस मागतात हें कसें ? ३ शिकंदराची दिवाळ ह्मणजे काय ? ४ हें पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

उपरी येथील कुशल तागायत श्रावण शुद्ध एकादशी भौमवासर अडीच प्रहर दिवस जाणून स्वकीय लेखन करणें. विशेष. तुम्हांकडून छ० १४ मोहरमचीं पत्रें सावनूरचे मुक्कामाहून आलीं त्या अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तरपूर्वक वर्तमान लिहून पाठविणें. प्रस्तुत तुम्हीं सावनुरींच आहां कीं काय, राजश्री विठ्ठलराव शिवदेव व रास्ते तुमचे मुबदला सावनुरास येणार होते ते आले कीं काय, फार करून आलेच असतील, तुम्हीं श्रीमंतांकडे आलां कीं नाहीं, श्रीमंत कोठें आहेत, हैदरअल्ली हनगलास होता तो तेथेंच आहे कीं चलबिचल झाला, त्याजकडील कारकून राजश्री महादशेट वीरकर याच्या[१] कारकुना समागमें आला होता त्याचें काय झालें, हें विस्तारें लिहून पाठविणें. मिरजेचे जुने फडणीस राजश्री महादबा यांस उदयीक रवाना करितों. लौकरच तुम्हांजवळ येऊन दाखल होतील. आपाजी जासूद तुम्हांकडे पत्रें देऊन रवाना केला होता तो बुणग्यांत चिरंजीवाजवळ पत्रें घेऊन गेला. त्याणीं चवडीचे मुक्कामाहून तुम्हांकडे जासूद न पाठवितां आपलेच जाब देऊन इकडे पाठविलें. त्याणीं तुमचीं पत्रें प्रविष्ट केलीं असतील. वरकड इकडील अधिकोत्तर कांहीं लिहिजेसें नाहीं. श्रीमंत धारवाडीं आहेत ह्मणोन ऐकितों. तुम्हीं सावनुरींच आहां ह्मणोन ऐकितों याचा अर्थ काय? आजपर्यंत आलांचे[२] असाल. हैदरनाईक कोठें आहे कांहींच कळत नाहीं. तरी पंधरा दिवसां पत्र पाठवीत जावें. अलीकडे टकले याची वरात आली त्यास दोन महिन्यांची मुदत केली त्यास महिना जाला. वराता कोणाच्या आल्या, कोणाच्या आल्याच नाहींत. तरी तुम्हीं तेथील रवानगी प्रमाणें कोणास द्यावें न द्यावें हें लिहिणें. येथील हिशेब समजावया माजी फडणीस यांचा उदयीक मुहूर्त निघावयाचा आहे [त्यांची] रवानगी करितों. कळलें पाहिजे. बहुत काय

१ पेशव्यांच्या लष्करांत पटवर्धनांचें बुनगें राहिलें होतें त्यांत वामनराव व मोरोबा वगैरे होते त्यानीं. २ सावनुराहून परत श्रीमंतांच्या लष्करांत.

लिहिणें. हे आशीर्वाद.

नं० ४७९

(१४ आगस्ट)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत श्रावण वद्य तृतीया सोमवार. यथास्थित असे. विशेष. तुम्हीं छ० ५ गुरुवारचीं पत्रें सावनूरचे मुक्कामींचीं कुरुंदवाडीस पाठविलीं तीं छ० १२ मोहरमीं गुरुवारीं आठवे रोजीं पावलीं. संतोष झाला. पत्रार्थावरून सविस्तर अवगत जालें. गुलाभानें दगाच केला होता परंतु तुम्हांस खबर अगोदर कळली. श्रीनें कृपा केली. खजील होऊन माघारा गेला! तुम्ही श्रीमंतांस ही उत्तम प्रकारेंच लिहिलें आहे. [श्रीमंत] आले अशी आवई पडतांच माघारा जाईल. तो समीप आला असतां सावनुराहून (तुम्हीं) निघावें तरी धास्तीनें गेले ह्मणोन लौकिक फटकळ. राहिला तर भक्षावयास (कांहीं नाहीं) हें मुख्य. दुसरा उपराळा नाहीं. तिसरें तुम्हीं तेथून निघाला तरी स्थळ राहत नाहीं. त्याच्या हातास गेल्यावरी त्याची जडी भारी. सावनूर, बंकापूर दोन्ही स्थळें हातीं लागलींशीं होतात. आपणास भारी हें प्रमाण, परंतु सर्व गोष्टी श्रीमंतांस उमजल्या पाहिजेत. त्यास त्या प्रांतीं तूर्त काल हरण होतें. हणमंतग्रामचे मुक्कामचे स्वार लष्करचे काली आठवे दिवशीं येथें आले होते मार्गस्त. त्याणीं सांगितलें कीं गदवालाकडे श्रीमंत जाणार होते. परंतु तुमचीं पत्रें आलीं यास्तव माघारे फिरणार. सत्य मिथ्या श्री जाणे. वरकड तापत्रय. स्वकीय लोकांचा गवगवा. पैशास संबंध नाहीं.

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ कुरुंदवाडास त्रिंबक हरीकडे. ३ बंकापुर व सावनूर यांमधील ओढ्यांत पटवर्धनांची फौज आणून तिचा नाश करण्याची हैदरानें जी नुकतीच खटपट केली होती तिला उद्देशून हें लिहिणें ४ कुमक. ५ सावनूर. ६ चिकाटी. ७ हणगंतग्राम हें कोठें आहे कळत नाहीं.

महर्गता फार. लोकांचा अपराध काय! पोटास तो द्यावें हें ही प्रमाण. हिशेब पाहतां उरस्फोट होतो! तुम्ही कशी वर्तणूक करितां श्री जाणे. लोकांच्या नांवनिशीवार यादी पाठविल्या त्या पावल्या. कर्जाचा मजकूर लिहिला त्यास गुदस्तां सन सलासांत नालबंदी साठीं कर्जें घेतलीं होतीं त्या पैकीं सन इसनेचे बाकी पैकीं थोडें बहुत दिल्हें. राहिलें त्यासाठीं व व्याजाचा पैका आजी देणें. नाहीं तर पुढें व्याज देणें, ह्मणोन [सावकार] खटखट करूं लागले. त्यावरून त्यांची आमची नाचाखी[1] जाहली. असा या प्रांतीं मातबर कोणी नाहीं, जे कर्ज एकच कालीं चाळीस पन्नास हजार (रुपये) देईल असा दिसत नाहीं! तुमचें संकट कानीं ऐकतां श्रम होतात. मिरजेचा अभाव ह्मणाल तरी आबांत[2]. हा काल पावेतों चतुर्थांश वसूल नाहीं. साल मजकुरीं श्रीनें कृपा केली आहे. हा काल पावेतों रयता पर्जन्या करितां सुखी आहेत. पुढें श्रीसत्ता प्रमाण. राजश्री नाना फडणीस यांसीं पुण्याहून श्रीमंत राजश्री दादासाहेबानीं आपणा सन्निध (नाशिकास) बोलावून नेलें. रसदा घेणें अगर पुण्यांत कारभार करणें तो एक जागांच करावा या अर्थें केलें. पुढें फौज ठेऊन श्रीमंतांच्या मतें दक्षिण प्रांतें यावें असें ही लोक बोलतात. सत्य मिथ्या श्री जाणें! आमचे शरीरीं दिवसेंदिवस उतार, चिंता न करावी. तुम्ही कोणे स्थळीं आहां, श्रीमंत आले कीं नाहींत, हे काळजी लागली आहे. दुसरीं पत्रें (तुम्हांकडून) आलियावरी कळेल. बहुत सावधपणें मंडळी समवेत राहणें. मोठी जोडी[3] येवढीच. तुमच्या पत्राची नकल मंगळवेढ्यास पाठविली. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे. हे आशीर्वाद.

हेच पत्रीं समस्त चिरंजीव मंडळीस आशीर्वाद. बहुत सावधपणें राहणें. हे आशीर्वाद.

---

१ नाचाखी ह्मणजे बोलाबोली. २ आब राहिला आहे एवढेंच. ३ लाभ.

नं० ४८०

(अजमासें श्रावण शुद्ध
आगस्टचा प० पंधरवडा)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. इकडे तहद नाशीक, पैठण, राहुरी, पिंपळगांव, धोम, वांई, कऱ्हाड, श्रीक्षेत्र पंढरी, श्रीकृष्णा उभयतीर आदिकरून हुकेरी प्रांत पावेतों धरणीकंप जाहला. अगोदर कवठें पिरान, वारणा ऐल तीर येथील वर्तमान आलें. त्याची इदं भवति इदं न भवति म्हणतां तमाम रहिमतपूरकरांचें व पुण्याहून व क्षेत्राहून लिहिलें आलें. श्रावण शुद्ध १ रविवारीं तृतीय प्रहरीं कंप जाहला. या प्रमाणें सर्वत्र स्थळचें लिहून आलें. हें वर्तमान पेशजीच ल्याहावें. परंतु संशयात्मक जाणोन लिहिलें नाहीं. प्रस्तुत विश्वतो मुखीं दाखला पडला त्यावरून तुम्हांस वर्तमान कळावया करितां लिहिलें आहे. याचा फलादेश श्री जाणे. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

नं० ४८१ L

(भाद्रपद वद्य षष्ठी
१६ सप्तंबर)

श्री.

राजमान्य राजश्री रामचंद्र नारायण[1] गोसावी यांसी.

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सुरुसन खमस सितैन मय्या व अलुफ. वेदशास्त्री राजश्री कृष्णंभट जोशी याणीं हुजूर येऊन विदित केलें कीं, आपल्यास सरकारांतून रूपये दीडशें व कापड आंख

---

१ हा गोपिकाबाईचा विश्वासू कारकून.

दीडशें सालाबाद पावतात. त्यास तीन सालांत दीडशें रुपये व दीडशें आंख पावले. बाकी पावलें नाहीं ह्मणोन. त्यावरून तीर्थरूप मातोश्री बाईस विनंतीपत्र लिहिलें असे. तरी तुम्ही दर्याप्ती मनास आणून यांस सालाबद्दल पावावयाची नेमणूक असेल व यांची बाकी राहिली असेल ते दर्याप्ती मनास आणून मातोश्री बाईस विनंती करून रुपये व कापड यांस पावतें करणें. जाणिजे. छ० १९ रबिलावल. आज्ञा प्रमाण.

नं० ४८२

(२० सप्तंबर)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[1] उपरी. येथील कुशल तागायत भाद्रपद वद्य १० गुरुवार. यथास्थित असे. विशेष. बिरनाळकर (गोसावी) यांचा इनसाफ होऊन राजश्री रामशास्त्री[2] यार्णी निवाड्याचा मसुदा श्रीमंतांकडे पाठविला. त्या प्रमाणें पत्रें लिहून शिक्के करून [श्रीमंतांनीं] पाठवावे; त्यास नरसाप्पा गोसावी यार्णी ' मनसुबी (योग्य) जाली नाहीं. लांच दरम्यान शास्त्री यार्णी खाऊन कागद लेहून दिल्हे आहेत. ' असें नाना प्रकारें लांडें लटकें आपले पक्षी जे आहेत त्यांस व; श्रीमंतांस लेहून कारकून रामाजी शिवराम पाठविला आहे. तो पत्रास इसकीलें[3] करील. तरी तुह्मी प्रसंगीं श्रीमंतांस विचारून विनंती करून यांचें कार्य होय तें केलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. मायाजी म्हसके यास मौजे वायफळचे रुपये १००० एक हजार सन आर्बात पावले. हल्लीं तुम्हीं वरात दिली ही त्या शिवाय किंवा वरातेंत हजार रुपये धरावे हें लिहिणें. हरकोणाबरोबर उत्तर पाठवावें. हे आशीर्वाद. तेथें राजश्री गोपाळ गोसावी आहेत.

---

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ प्रसिद्ध न्यायाधीश रामशास्त्री ३ खो घालील.

आपणापाशीं सांगतील. त्यांस [मदत करण्यांत] आपणाकडून होईल त्यास अंतर न करावें. हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री नारायणराऊ व राजश्री आबा यांसीं आशीर्वाद. प्रसंगीं बिरनाळकरांचे साहित्यास अंतर न करावें. राजश्री गोसावी आपणास वर्तमान विदित करितील. राजश्री नरसाप्पा गोसावी याणीं पुण्यांत प्रयत्न केला तो शास्त्री बावानीं चालूं दिल्हा नाहीं. वाजवी न्याय केला. आतां पर्वे न होत ह्मणून (नरसाप्पा याणीं) लष्करांत [श्रीमंतांकडे] लिहिलें आहे. हे आशीर्वाद.

नं० ९८३L

(अश्विन शुद्ध द्वितीया
२७ सप्तंबर)

श्री.

राजश्री रामचंद्र नारायण गोरे गोसावी यासी

सुरूसन खमस सीतैन मय्या व अल्लफ. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. इकडील वर्तमान तीर्थरूप मातोश्री बाईच्या पत्रीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. वडिलांची प्रकृती प्रस्तुत क्षीण जाहली आहे. त्यामध्यें थोरले पंगतीस होईल तें अन्न जेवावें, याज खेरीज अडीच प्रहरपर्यंत पोथी वाचणें, त्या नंतर भोजन, असें नित्य वृत्त. तेव्हां शरीरसंरक्षण कसें होईल ? तरी तुम्हीं वडिलांस विनंती माझ्या तर्फेनें करीत जाणें. हें वर्तमान तुम्हीं कांहींच लिहीत नाहीं हें अपूर्व वाटतें. या उपरी तरी लिहून पाठवीत जाणें. वडिलांचें मानस कीं सदैव रात्रंदिवस ईश्वराचें भजन करावें हे तरी वडिलांची मर्जी आहेच. परंतु तुम्ही जवळ असून आमचे तर्फेनें कांहीं शरीररक्षणार्थ विज्ञापना करीत जाणें. या गो-

१ हें पेशव्यांनीं लिहिलेलें पत्र.

ष्टी विषयीं अनमान कराल तर माझ्या गळ्याची शपथ असे. प्रस्तुत कसें चालत आहे तें लिहिणें. हें पत्र वडिलांस न दाखविणें. पत्र पाहिल्यास मर्जी न बिघडेशी असल्यास पत्र दाखविणें. सर्व कामें ठेवून हें माझे तर्फेचें काम जरूर करीत जाणें. जाणिजे. छ० ३० रबिलावल बहुत काय लिहिणें.

पै॥ छ० १७ रबिलावल.

नं० ४८४

(३१ आगस्ट)

श्रीगणपतिर्जयति.

श्रियासह चिरंजीव राजश्री रावसाहेब यां प्रती गोविंद हरि. आशीर्वाद. उपरी येथील कुशल तागायत भाद्रपद शुद्ध ९ भृगुवासर जाणोन स्वकीय लेखन करणें. विशेष. तुम्हीं श्रावण वद्य त्रयोदशी मंदवारचीं पत्रें आपाजी जासुदा समागमें नजिक नेरेंद्रचें[2] मुक्कामचीं पाठविलीं तीं परवां तृतीय प्रहरीं प्रविष्ट होऊन लिहिलें वर्तमान कळलें. मिरजेचे माजी फडणीस तेथें दाखल जाहल्याचें च हैदरअल्लीचा सल्ला राहून तो जडें अनवडीस गेल्याचें व विठ्ठल विश्राम याचा वगैरे विस्तार चार बंद पत्रीं तपशील लिहिला तो सर्व कळला. मागील कर्ज तसेंच राहिलें. त्याचा कांहींच निकाल नसतां मागती[3] कर्ज करून सर्वांअगोदर फौज ठेऊन छावणींत ही सावनूरची मसलत करून आल्याचें फल ' शहापूर विठ्ठल विश्राम यास द्यावें (असा श्रीमंतांनीं ठराव केला) हें ही उत्तमच आहे ! हिशेबामुळें सरकारांतून फडशा करून घ्यावयाचा मजकूर लिहिला तो कळला. राजश्री शेषो नारायण याणीं दरबारीं कृष्णाबाई शिंदी यांजविषयींचा बोभाटा

---

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ हें ठिकाण धारवाडाजवळ आहे. ३ पुनः ४ नं० ४७२ चें पत्र पहा.

घातल्याचा मजकूर लिहिला त्यास त्याणीं कांहीं बदमामली केली नाहीं. मनोळीचे मुक्कामीं श्रीमंतांचे समक्ष त्यांस[1] सुखवस्तीनें रहावयास स्थळ दिलें तेथें काल हरण करून आहेत. त्यांजविशीं काय ह्मणोन बोभाट्य कारितात? असो. आज त्यांचे नांवें पाण्यांत दिवा जळतो. कालाची गति विपरीत आहे. ' मनोळीबद्दल ऐवज मिरजेचा हिशोब आणविणें ह्मणजे निकाल करून देतों म्हणतात, ' ऐशीं पत्रें (तुमचीं) आज पावेतों येत होतीं. प्रस्तुतचे पत्रीं विजापुराकडे स्वारीचे समयीं (तुम्हीं) घासदाणा घेतल्याची अप्रसिका निघाली आहे ह्मणोन लिहिलें ! एवंच पैसा देऊं नये हा सारा (सरकारचा) मनसबा ! त्यास हरएक बाब लांबणी लावावी इतका मात्र प्रकार. वरातेचा तपशील लिहिला कीं, ' क्षेपं[2]निक्षेप ऐवज द्यावा. बोभाटे येऊं न द्यावे. राजश्री विष्णुपंतास ठेवून घ्यावें ' ह्मणोन, त्यास तुम्ही वराता केल्या पैकीं आम्ही येथून माघारी लाविली नाहीं. प्रथमतः दोन चार वेळां तुम्हीच संदिग्ध लिहिलें त्यावरून वराता आल्या त्या ठेऊन पैर[3]निष्ट[3]-लिहून पाठविणें ह्मणोन तुम्हांस पत्रें[4] पाठविलीं. तेव्हां तुमचें उत्तर आलें कीं वराते पैकीं रुपये द्यावे. त्यावरून तडका[5] ज्याची वरात त्यास रुपये कर्ज काढून दिले. सुभानजी पवार मनेराजुरीकर व गोविंदराऊ भोसला सुपेकर व बाळशेट वीरकर यांच्या अलीकडे वराता आल्या त्यांस येतांच आधीं रुपये पदरीं घातले. पेशजीचा तपशील पत्रीं लिहून पाठविलाच आहे. आणखी वराता घेऊन येतील त्यांस ऐवज पावता करूं. गुंता नाहीं. चिरंजीव राजश्री नीलकंठरायाचा मजकूर लिहिला त्यास त्याचा प्रकार पेशजीच पत्रीं लिहून पाठविला आहे. ऐनापूरबद्दल ऐवज जमा जाहला असल्या राजश्री लक्ष्मण हरीचे (रुपये) द्यावयास येतील. तेथील धंदा चिरंजीव राजश्री त्रिंबकराऊ जांवई यांस सांगावा ह्मणोन पत्रीं लिहिलें. त्यास चिरंजीव नीलकंठरायाची समजावीस ऐनापूर

---

१ कृष्णाबाईस. २ तोर्गल. ३ निस्संशय. ४ पक्के. ५ तावडतोब.

देऊन होत असलिया करावी. वरकड खेडीं म्हणावयास तीस चाळीस. आजनी कर्यात पांचसा. विसापूर कर्यात दोन चार. नांदरें कर्यात चार. येणें प्रमाणें आहेत. सन आर्बात निमे तह करून जमाबंदी केली. छावणीच्या ही कमी करावी तरी छावणीस खटखट पडेल. यास्तव तूर्त होत आली (तशी कबूल केली.) फार करून झाली. सन आर्बाचा ऐवज ऐनापूर कर्यातीचा दहा बारा हजार कुलबाब आला तो शिबंदी खर्च जाला. श्रीकृपेनें सन खमसांत आकार होईल, त्या ऐवजी लक्ष्मण हरी याचा ऐवज देवाल तरी परभारांच जमा करवूं. चिरंजीवाकडे दिले तरी सहजीच वारेल. ऐनापूरचें निमित्य मात्र गृहस्थानीं आम्हावरी आणिलें! काल महिमा! तुमचे खानगीस नालबंदीस ऐवज काय पावला, येथील खर्च काय, हा हिशेब पाहिल्यावरी सर्व कळेल. प्रस्तुत कालीं तुम्ही लोकांच्या गवगव्यांत. आम्ही घरीं सुखरूप सुग्रास भोजन करून आहों! तुम्ही श्रमांत. श्रवणें करून आम्ही असंतोषी! पैसा नाहीं. उपाय काय करावा? दरबारचा प्रकार सर्व कळोन गेला आहे. शहापूर देऊत, वरकड सरंजामांत घालमील करूत, यंदांची मुलुखगिरी करून धण्याची व कार्यभागी यांची मर्जी रक्षून येणें. पुढें चित्तास आलें तरी कबूल करावें. नाहीं तरी घरीं स्नान संध्या करून धण्याचें कल्याण इच्छून रहावें. त्यांचे मर्जी माफक शेंपन्नासांनिशींच चाकरी करावया येईल. परंतु प्रस्तुत कालीं विपरीत भाव न दाखवावा यांत लौकिक राहतो. शेषोपंत नित्य उठोन बोभाट दरबारीं [आम्हीं] निरपराधी असतां सांगतात यास उपाय नाहीं. एक समयीं तरी धण्याच्या मनांत विकल्प येईल. त्यास आपण सर्व प्रकारें क्षमा धरावी. सबुरीनें होणें तें कल्याणदायकच होईल. चिरंजीव बापूची सुटका होईल ह्मणून मार्ग पहात होतों तों बिघाडच झाला! बरें! श्रीसत्ता

१ श्रीमंत तुम्हाकडून शहापूर काढून विठ्ठल विश्राम यास देवोत. २ हैदराशीं तह होण्याचा लाग आला होता त्या प्रमाणें तह होता तर त्याच्या कैदेंत गोविंद हरी-

प्रमाण. टकले याचें ऐवज न्यावया आजी चंदनवाडीहून सुलतानजी टकला आला त्याचे पदरीं ऐवज घालून रवाना करितों. वरकड वरातदारांस ही देतों. शेटी यास निमे ऐवज दिला. निमे ही दो चौं रोजानीं देतों. जंबपर्यंत मिळेल कर्ज तंवपर्यंत अनमान करीत नाहीं. 'बारगीर आम्हाकडे वरात न घेत, यास्तव रोखच ऐवज पदरीं घातला' ह्मणोन लिहिलें, ऐशास आम्हाकडे बेदमामली आली. (आम्ही) लोकांच्या वराता फिरविल्या. (तेव्हां) बारगीर यांच्या ही फिरवूं ह्मणोन त्याणीं तेथें न ऐवज घेतला यास आमचा उपाय काय ! सामान खोगरें तयार होतात. जीन ही कांहीं घेतले आहेत. हा जिन्नस दसरा जालियावरी पाठवून देऊं. वरचेवर पत्रें पाठवीत जाणें. बहुत सावधपणें रहाणें. क्षमा जितकी धराल तितकी कार्याची आहे. चिरंजीव नीलकंठरायाचा संतोष रक्षावा. आमचा आग्रह किमपि नाहीं. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

नं० ४८९L

(अश्विन शुद्ध द्वितीया
२७ सप्तंबर)

श्री.

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री धोंडोराम
गोसावी यांस.

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सुरुसन खमस सितैन मय्या व अलफ. तुम्ही विनंती पत्रें छ० १४ रबिलावलचीं पाठविलीं तीं

चा पुतण्या मेघश्यामराव होता तो मुक्त झाला असता. पण पुनः उभयपक्षीं युद्ध सुरू झाल्यामुळें ती आशा खुंटली.

१ गोपाळरावाबरोबर स्वारींत बारगीर होते त्यानीं घरीं परत येताना मिरजेस गोविंद हरीकडे आपल्या पगाराची वरात घेतली नाहीं. लष्करांतच गोपाळरावापासून रोख पैका घेतला ! २ विश्वासघाताचा आरोप. ३ शिलेदारांच्या.

छ० २९ मिनहूस पावलीं. विस्तारें मजकूर-बारीक मोठा लिहिला तो सविस्तर कळला. ऐशास या दिवसांत तेथील वर्तमान मनसुबा कर्तव्यतेचा वगैरे सर्व ही वरचेवर कळावा, अशा कारितां तुम्ही चों दिवशीं सविस्तर लिहून पाठवीत जाणें. वरकड अलाहिदा लिहिलें असे त्याजवरून कळेल. त्रिंबकराव दाभाडे व जीवनराव केशवराव बेहेरचा (?) किल्ला घेऊन धामधूम करितात, असें वर्तमान आलें आहे ह्मणून लिहिलें तें कळलें. तुम्ही खर्चा विषयीं लिहिलें त्याजवरून एक हजार रुपये राजश्री कृष्णराव बल्लाळ यांजवळ दिले आहेत. ते तुम्हांस पावते करितील. जाणिजे. छ० १ रबिलाखर. आज्ञा प्रमाण. [लेखन सीमा]

नं० ४८६

(आश्विन शुद्ध द्वितीया
२७ सप्टेंबर)

श्री.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोपाळरावजी
स्वामीचे सेवेशीं.

पोष्य विठ्ठलराव शिवदेवें. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ० १ रबिलाखर मुक्काम सावनूर जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. " अलीकडे वर्तमान येत नाहीं तें ल्याहावें, शत्रु हावेरीस आला, तेथें आपण जाऊन उपराळा केला, शत्रु माघारा गेला, हें वर्तमान ऐकून संतोष जाहला. दुसरें—श्रीमंतानीं धारवाडास मोर्चे दिले आहेत. इकडील गडबड ऐकून श्रीमंतानीं आमचे मोर्चे काढून आम्हास रिकामे मोर्च्यांच्या उपराळ्यास ठेविलें. आपण तिकडील वर्तमान लिहीत जाणें. " ह्मणून

१ निजामअल्लीच्या दरबारचें. २ विंचूरकर.

लिहिलें. " राजश्री लक्ष्मण[1] हरीचें पत्र येतांच आपण त्याचें साहित्य क-रितां येणेंकरून फार समाधान जालें; " ह्मणून लिहिलें, त्यास इतकें उ-परोधिक ल्याहावें ऐसें नाहीं. आमच्या चित्तीं दुसरा अर्थ किमपि नाहीं. तुमचीं कामें आमचीं कामें दोन, ऐशीं जाणत नाहीं. शिरहट्टी (लक्ष्मण हरीनीं) घेतली तेव्हां दोनशें स्वार (त्यांच्या कुमकेस आम्ही) रवाना केले. मार्गीं गेले तों स्थळ हस्तगत झालें. येळवंतीस त्यानीं चौक्या बस-विल्या त्यांचे भरतीस दोनशें गारदी मागितले ते पाठविले. त्यांस जाऊन चार रोज जाले. तों शत्रूनें सर्व फौजेची निवड करून मीरफैजुल्ला बरोबर व वेंकटराऊ बारकी बरोबर सोळा तोफा, चार हजार स्वार, सात आठ हजार बार[2] देऊन आठ नव कोस तिळवली आहे, तेथून रातोरात येऊन हावेरीवर छापा घातला. आम्हांकडील अलादादखान[3] चारशें लोक (व) जुने गारदी अडीचशें ऐसे (तेथें आह्मीं पूर्वींच) पाठविले होते [ते] बे-फाम राहिले. त्यानें शिंदीच्या पखाला तीस पाठवून शिंदी सवंग जशी ज्याणें मागितली तैशी देऊन (टाकिली ती) लोकानीं पिऊन बेसूद[4] नि-जले. सावनूरकरांचे दोनशें राऊत (घेऊन तेथें) रामण्णापंत होता त्यानें खबरदारी करावी ते न केली. गढींत दारू नायका (?) दिवसाचे भ-क्षावयाचे ऐसे बेवकूफ ! ते[5] प्रातःकाळीं येऊन पडले. चारी दरवाजे मो-कळेच होते. चिणून टाकणें हें सांगितलें होतें[6] तें ऐकिलें नाहीं. बाहेर पहारेकरी होते ते धरून [शत्रूनें] मुसके बांधिले. ऐसें करून दंगा के-ला. कांहीं लोक पठाणांचे[7] मारिले. घोडीं नेलीं. आमचे कांहीं जखमी

१ हल्लीं लक्ष्मण हरि लागू हा पटवर्धनांच्या लक्ष्मेश्वर महालावर मामलेदार असून त्या महालांतली हैदराकडे ठाणीं गेलीं होतीं तीं सोडविण्यांत गुंतला होता. २ गारदी. ३ हें विंचूरकरांकडील गारद्यांच्या सरदाराचें नांव. ४ बेशुद्ध. ५ शत्रूचे लोक. ६ ' हावेरीगांवचे दरवाजे तुमच्यानें राखवावयाचे नाहींत. फटकर दगा होईल. तुह्मी ते चिणून टाका ' असें आम्हीं गारद्यांस सांगितलें असून त्यानीं तसें केलें नव्हतें. ७ सावनूरच्या नबाबाचे.

थोडेसे जाले. अलादादखान पळून करजगीस गेला. आमचे गारदी बाजी खलेल वगैरे गढींत शिरले. तेव्हां त्याणीं पेठ घेऊन लुटून गढीस मोर्चे लाविले. (आम्हांकडील) दादाजी दसगुंडे देवगिरीस[1] त्यांचे पाठीवर बाहेर उपराळ्यास होते. त्यांस वर्तमान सूर्योदयीं कळतांच त्यांनीं राऊत इकडे पाठविला तों प्रहर दिवस आला. एकादशी. स्नान नाहीं. तसेंच बाहेर निघोन गेलों. जों जीन ठेवितों तों मागें हे पित्रांचे दिवस. दोन्ही तिन्ही पतकें परस्परें पित्रांचे आमंत्रणामुळें लोक फार राहिले. जे आले ते आले. जे राहिले ते राहिले. ऐसें होऊन हावेरीजवळ (जाऊन शत्रूचा) मुकाबला घेतला. पहिलें वर्तमान दोन हजार बार चारशें राऊतांचें आलें (होतें.) मग सामान [शत्रूचें लढाई करितां बाहेर] निघतां फार नजरेस पडलें. तेव्हां दिसोन आलें कीं, खासें सामान खासाच जावें. एक दोन हिरिऱ्या झाल्या तेव्हां (आमच्या) चाळीस पन्नास माणसानीं कांहीं करोलानीं मार दिल्हा. नदीस[2] पाणी फार येऊं लागलें. शत्रूनें आधींच तजवीज करून वीस तळीं फोडिलीं. आम्हांस आंतच कोंडावें ऐसें केलें होतें. मागील नदीचा वसवसं.[3] पुढें (शत्रूचें) सामान भारी (असें) पाहून हळूच सरत देवगिरीकडे पावकोस सरलों. ' रास्ते, भोंसले यांचा मार्ग पहावा, (शत्रूच्या) सामानाचा अजमास केल्यावर उठावें,[4] ' या करितां चार घटका टाळा दिल्हा. मागून लक्ष्मणराव रास्ते आले. भोंसले सत्वर न येत. तो पुढेंच येऊं लागला. गढीस चार तोफा व हजार बार ठेऊन सर्व तोफा बाण ऐसें नीट [शत्रूनें आम्हांवर] चालून घेतलें. तेव्हां नदीचा दाटा, कांहीं केल्या खेरीज गत नाहीं, तेव्हां उठोन (आम्ही हीं) नीट चालून घेतलें. (त्यानें) तोफांचा मार जलद दिल्हा त्यानें

---

१ आमचा सरदार दादाजी यास हावेरीकरांच्या कुमकेसाठीं आह्मीं देवगिरीस नेहमींच ठेविलें होतें. २ वर्धानदीस. ३ वर्धानदीस पूर येईल, परत जाण्याचा रस्ता खुंटेल, ही वसवस ह्मणजे काळजी. ४ हल्ला करावा.

[आमची] फौज विसकटली. बारा घोडे पडले. दोघे भले लोक ठार पडले. बाजी विस्कळीत झाली. मग दक्षिणेकडे होऊन घालमेल लाविली. तेव्हां फुटलेसें पाहून (आमच्या) फौजेनें चालून घेतलें. तेव्हां सर मिसळ जाली. नव हिरिऱ्या झाल्या. शेवटील हिरिरेस हत्यार दाट लागून बेजरब मोडले. प्यादे देखील पळूं लागले. फौज मोडून तोफांत नेली. तेव्हां हबीबेखान बंगसानें उड्या टाकून त्याचें माणूस दाट पडलें. तलवार दाट चालली. बंगस उडी न टाकिता व मागून एक पायबंद बसता तर फौज मोडावयास बाकी राहिली नव्हती. उड्यांमुळें प्यादे आव धरून चालून आले. तेव्हां [आमचे] घोडे माणूस जायां जाले. दोन प्रहर लढाई. (आमचे स्वार) पाणी पाणी करूं लागले. मग माघारे सरून उभे राहिलों. ते ही निघोन गेले. आम्ही माघारे आलों. त्याणीं मुडदे डोल्या करून रवाना केल्या. रात्रीं हावेरीस राहिले. गढींत [आतां] सामान नाहीं. तोंफानीं [आमचीं माणसें गढींतलीं] फार पडलीं. तेव्हां दुसरे दिवशीं नदीच्या पाण्यामुळें आम्ही राहिलों. तेव्हां गढीवाल्यानीं कौल घेऊन निघोन आले. ठाणें त्यांचें नाहीं, आमचें नाहीं. खालीं पडलें आहे तों तेच क्षणीं (शत्रू) आवाई खाऊन कूच करून गेले. त्यांच्या मतें यांचौ रेंच मोडून राहिलीं ठाणीं घेऊन धारवाडासच जावें ऐसें होते. परंतु ईश्वरी कृपेनें श्रीमंतांच्या पुण्यें याप्रमाणें जालें. नाहीं तर आमची शक्ति नव्हती कीं इतकें व्हावें. परंतु तीनशें साडेतीनशें माणूस (हावेरींत होतें त्यांत) एक रिकामा बाटल्याखेरीज राहिला नाहीं ! [शत्रू] थंडा होऊन माघारा गेला. धारवाडावर यावें या विचारांत आहे. परंतु हा पायबंद भारी. लढाईमुळें खट्टा ही जाला आहे. नदीस पाणी आलें आहे.

---

१ बाजू. २ या हैदराच्या सरदारानें आपले लोक पळतातसें पाहून घोड्यावरून उडी टाकिली. ३ रिकामें. ४ दहशत. ५ ह्मणजे अर्थात् आमचा रेंच ह्मणजे खुमखूम. ६ शत्रू धारवाडच्या कुमकेस येता परंतु आमचा पायबंद त्यास भारी आहे. ७ तुंगभद्रेस.

[या करितां] टोकरे जमा करितो. सावनुरावर याचें हे आवाई घालितो. आम्ही ही बंदोबस्त करून आहों. जें प्राप्त होईल तें केलेंच पाहिजे. लढाईचे दुसरे दिवशीं [शत्रूचे] तीनशें राऊत पांचशें प्यादे रात्रीं निघोन सावनुराखालते हुलिकोप्प गांव आहे तेथें येऊन उभे राहिले. मनसबा येळवंतीवर जावें (असा त्यांचा होता.) ते बातमी येतांच (आमची) फौज रात्रीं नगारे वाजवीत गेली तों ते कोणीकडे गेले हें न कळे. आह्मास संशय झाला (कीं,) श्रीमंतगडास जाऊन येळवंतीवर पडतील. तेव्हां रातोरात लक्ष्मणपंताकडे पत्र राऊत पाठवून मोर्चे उठविले. गारदी येथें आणविले. येथें ही सामान पाहिजे. तूर्त थोरलें काम धारवाडचें झाल्यावर तोफा सामान पाठवून येळवंती घेतों. चिंता नाहीं. आपण ही मिश्रीकोटें, तडस, कलघटगी इकडे बातम्या राखून सावध असावें. [शत्रू] दोन हजार स्वार मुरगुडावरून धारवाडच्या किल्ल्यांत पाठविणार ऐसी आवाई आहे. होतां होईल तें पहावें. वरकड मजकूर तुम्ही आमचे ठाईं दुसरा विचार न धरावा. आम्ही धरीत नाहीं. परंतु सांगीवागीनें विपर्यास येतो तो नसावा. जन्मांत नफा स्नेहाचा मात्र आहे. विशेष काय लिहिणें. लोभ असों दीजे. हे विनंती.

नं० ४८७

(आश्विन शुद्ध षष्ठी
१ आक्टोबर)

श्रीरामचंद्र प्रसन्न.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोपाळरावजी स्वामीचे सेवेशीं पोष्य आपाजीराम[1] साष्टांग नमस्कार. विनंती उपरी. येथील कुशल

---

१ आपाजी राम गाडगीळ हा शहाजीराजे अक्कलकोटकर यांचा दिवाण. हा आपल्या धन्या बरोबर हावेरीच्या लढाईंत होता.

तागायत छ० ९ रबिलाखर इंदुवासरे दोन प्रहर पर्यंत मुक्काम-सावनूर व-र्तमान यथास्थित जाणोन स्वकीय लेखन करीत जावें. विशेष. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लिहिला मजकूर कळों आला. बातमी स-विस्तर लिहीत जावी ह्मणोन लिहिलें, ऐशियास हमेशा आमचे राऊत हन-गळापर्यंत जाऊन येतात. हैदर जडें अनवटीवर आहे. परवां त्याची[1] फौज मीरफैजुल्ला वगैरे देखील स्वांर प्यादे तीनेक हजार भाद्रपद वद्य एकादशीचे दिवशीं हावेरीवर आली. सात आठ तोफा ही होत्या. वर्तमान येथें येतांच त्रिवर्ग फौजा सिद्ध होऊन गेल्यें. झूज उत्तम रीतीनें झालें. शत्रूकडील चाळीस पन्नास माणूस चांगलें पडलें. वंगस एक सरदार पडला. इकडील ही दहा बारा भले लोक जायां झाले. पांच सात घोडीं ही जायां जालीं. आमच्या फौजेंतील अंकुशराव व सुलतानजी तरंगे जखमी जाले. पागेचे लिंगोजी जाधव यांस गोळी काकरती दंडावर लागली. किरकोळ ही एक दोन जखमी जाले. त्यास सारून गांवापर्यंत घालविलें. संध्याकाळ होत आला. बाळ्दा[2] नदीस पाणी ही चढत चालिलें. मग माघारे निघून आलों. त्यानीं हावेरी घेऊन ते ही निघून गेले. हावेरींत ठाणें तो ठेविलें नाहीं. सावनूरवाल्यांचीं कांहीं मनुष्यें सांपडलीं तीं व त्यांचा चिंधी चोळा घेऊन गेले. एकूण त्या झुझांत त्याची खराबी बरीच झाली. या उपरी आणीक एक दोनदां उत्पात करावासा त्याच्या मनांत आहे. परवांचे दिवशीं बातमी आली कीं आठा दिसांच्या भाकरी करून [शत्रूनें आपल्या लष्करांत] वांटिल्या. स्वांरीस निघणार त्यास काली आजी कांहीं उमट तो पडला नाहीं. आम्ही सावधपणें आहों. एकदां धारवाडाकडे जावेंशी (शत्रूची) गुर्मी आहे. त्यास मैदानच्या वाटेनें इकडून आल्यास आम्ही चुकत नाहींच कळेल तसा परामर्ष करूं. परंतु या वाटेनें जाण्याचा उगीच आगाजा[3] घा-

---

१ विंचूरकर, रास्ते व आम्ही भोंसले. २ वर्धा नदीस. ३ या शब्दाचा अर्थ ' हुलकावणी ' असा असावा.

लून झाडींतून दग्यानें येणार ह्मणून बोलणारे बोलतात. यांत पाहवें! झाडीकडील तोंडाची खबरदारी आपण करविणें ती करवावी. बातमी चहूंकडील राखावी. युक्तच आहे. आपली फौज श्रीमंतानीं तलाव्या साठीं ठेविली. उत्तमच आहे. येथें होईल वर्तमान तें आपणास वरचेवर लेहून पाठवूं. आपण ही वरचेवरी आढळेल तें लिहीत जावें. धारवाडचे मोर्चे कोठपर्यंत गेले, आंतील काय वर्तमान, हें ही ल्याहावें. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों दिल्हा पाहिजे. हे विनंती.

नं० ४८८

(अजमासें आश्विन शुद्ध
आक्टोबरचा प० पंधरवडा)

श्रीशंकर प्रसन्न.

पुरवणी. राजश्री गोपाळराव दादा स्वामीचे सेवेशीं.

कृतानेक नमस्कार. इकडील वर्तमान तरी हैदरनाइकाकडील मीर फैजुल्ला दोन तीन हजार फौज व तीन चार हजार गारदी चार पांच तोफा घेऊन हावेरीस आला होता. आमच्या ही त्रिवर्गांच्या फौजा त्याजवर गेल्या होत्या. त्याची यांची लढाई जाली. संध्याकाळ जाहला याजकरितां फौजा माघाऱ्या आल्या. त्याणें तेथें पलीकडे कोसावर मुक्काम केला होता. पहांटेस येऊन हावेरीस ठाणें घातलें. उपरांतिक माघारा गेला. हैदरनाईक जडें अनवटीवर आहे. त्यास प्रस्तुत त्याच्या मनामध्यें धमक फार आहे. बंकापुरास येऊन भोंवती धामधूम करावी. धारवाडास मोर्चे दिल्हे आहेत, याजकरितां सव्य अपसव्य पाहून सावनुरावर ही रात्री पहांटेस संधी पाहून दंगा करावा ऐसी त्याणें मसलत केली आहे. धारवाडाकडे ही उपसर्ग करावा ऐसें वर्तमान आहे. त्यानें नदी उतरावया करितां टोकरा नावा

१ हें बहुधा लक्ष्मणराव किंवा आनंदराव रास्ते यानीं लिहिलेलें पत्र असावें.

सामान जमा केलें आहे. कळावें. आपण सदैव पत्र पाठवून संतोषवीत असलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. लोभाची वृद्धि केली पाहिजे. हे विनंती.

नं० ४८९

(१ आक्टोबर)

श्री.

श्रियासहें चिरंजीव राजश्री गोपाळराव यासी प्रती. सौभाग्यवती सत्यभामाबाई आशीर्वाद उपरी. येथील कुशल अश्वीन शुद्ध षष्ठी गुरुवासर पावेतों यथास्थित असे. विशेष. तुमचे आमचे भेटीस एक वर्ष जहालें. भेट जहाली नाहीं. किती एक गोष्टी बोलावयाच्या होत्या त्या राहिल्या. बरें ! जे समयीं श्रीसत्तेनें भेट होईल तेव्हां होऊ ! प्रस्तुत तो आमच्या येण्याचा प्रकार कांहीं दिसत नाहीं. बरें ! श्रीसत्ता प्रमाण. चिरंजीव राजश्री बाबूमामा याच्या चित्तीं एक मामलत करावयाची होती, परंतु तें ही घडलें नाहीं. एक रोजगार चांगला नांवाचा हजार पांचशें रुपयांचा ऐसा त्यास पाहिजे. चिरंजीव लक्ष्मण ही येथें जाताना ठेविला आहे. सदाशिव नातू ही येथेंच आहे. तुम्ही येथें आलां तेव्हां दोघेजण बोलोन काय करार केला आहे तो ही आम्हास ठाऊक नाहीं. येथें तो आतां रोजगार चांगला कोठें दिसत नाहीं. बरें. याविशीं वारंवार ल्याहावें असा प्रकार नाहीं. याचें स्मरण तुम्हास नसेल या कारितां हें पत्र शंकराजीपंत गद्रे याजबरोबर

---

१ हें गोपाळरावाच्या आईनें त्यास पत्र. नं० ४७१ च्या पत्रांत जांवईबुवांचा वशिला लागला. या पत्रांत भावाचा व आणखी दोन आप्तांचा लागला आहे ! रोजगार मिळवावयाचा तर सत्यभामाबाईकडून गोपाळरावाकडे व त्याजकडून पेशव्यांच्या दरबारीं ! २ सालिना हजार पांचशें वेतनाचा रोजगार ही त्या काळचा उत्तम रोजगार. ३ दोघेजण ह्मणजे नवरा आणि मुलगा.

पाठविलें आहे. तर या पत्राचें उत्तर निराळेंच काय तें आह्मास लिहून पाठविणें. त्यांस कोंकणांतून आणावयास तद्रू माणसें पाठविलीं होतीं. त्यास त्याचें उत्तर आलें जे, 'उगेच कशास यावें? कांहीं तरी नेमणूक कोठें असामीची जाली तरी मग येऊं.' त्यांस नांवांचा मात्र रोजगार पाहिजे. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० ४९०L

(आश्विन शुद्ध अष्टमी
३ आक्टोबर)

श्री.

तीर्थरूप मातोश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० ७ रबिलाखर मुक्काम धारवाड येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष. वडिलांकडून आशीर्वाद पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तर लिहावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर सविस्तर पूर्वी सेवेशीं लिहिलें आहे. त्यावरून कळलेंच असेल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० २३ रबिलाखर.

नं० ४९१

(अश्विन शुद्ध द्वितीया
२७ सप्तंबर)

श्री.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोपाळरावजी

१ आईस पत्र पाठवावयाचें तें गोपाळराव बापाच्या पत्रांतूनच पाठवीत असे आतां ती निराळें पाठविण्यास सांगत्ये. २ लौकिकाचा. अब्रूचा. ३ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र.

स्वामीचे सेवेशीं.

पोष्य विठ्ठलरावशिवदेव कृतानेक नमस्कार विनंती. उपरी येथील कुशल तागायत छ० १३ रबिलाखर पावेतों यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लिहीत गेलें पाहिजे. विशेष. आपण छ० ११ रबिलाखरचें पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर अवगत जाहला. ऐसेंच पत्रीं सदैव तोषवीत जावें. इकडील आमचें वर्तमान ल्याहावें ह्मणून लिहिलें, ऐशास सावनुरांत तळ्याजवळ कुसूं गाढें आहे. येथील बातमी नेऊन सावनुरावर दगा करावा, घोळवावें, हें त्यांच्या ध्यानांत येऊन येणार ह्मणून वर्तमान त्याजकडील बातमींत आलें आहे. आह्मीही येथील बंदोबस्त करून खबरदारींत आहों. चिंता काय आहे ! आपल्याकडे आणीक दुसरें वर्तमान येईल तसें वरचेवर लिहून पाठवूं. आपणही तलाव्यास श्रीमंतानीं सांगितल्यावरून खबरदारींत आहां. उत्तम आहे. शत्रू दगेखोर आहे. आह्मी मेहनतीस चुकत नाहीं. जातीनिशीं करीत आहों. सोबती[1] आहेत, (पण कोणी) कुमकेस येत नाहीं[2] आमचे सरंजाम फार असते तर[3] बाहेर निघून रहावयाचें करितों. शहरची बंदोबस्ती करून आहों. खुद्द[4] अनवडीवर आहे. तेथून गुप्त राहिला आहे. फौज तिळवकीस आहे. दगा करणार ही दाट बातमी आहे. तुह्मी सावधगिरी करीतच आहां तशी करावी. आह्मी आपले खबरदारींत आहों. तडसावर[5] आपले कांहीं लोक असावे. (शत्रु) रात्री कुमकेस धारवाडास जाईल या करितां सावधगिरी असावी. आमची खबरबखर घेत जावी. होईल वर्तमान तें लिहून पाठवूं. (तुमच्या आमच्या) स्नेहाचा मजकूर नूतन आहे ऐसें नाहीं. चाळीस वर्षे एका जागां वाढलों.

---

१ विंचूरकर. २ हैदराच्या. ३ रास्ते व भोंसले अक्कलकोटकर. ४ जर आह्मांस मोठी जहागीर असती व मोठी फौज बाळगिण्याचें सामर्थ्य असतें तर आह्मी नुसतें सावनूर संभाळूनच तृप्त झालों नसतों. बाहेर राहून शत्रूशीं टक्कर दिली असती. ५ हैदर. ६ हें धारवाड प्रांतांतील एका ठाण्याचें नांव.

पुढें ऋणानुबंध आहे! सर्वांनीं स्नेह राखून असावें. स्वामिसेवा करावी. लेंकराचें लेंकरीं इष्टत्व चालवावें हें आमचें मानस. राजश्री नाना हेत[3] राखितात त्या प्रमाणें आपणही मनांत निष्कालस चालावें. विस्तारें ल्याहावें ऐसें नाहीं. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं० ४९२L

(आश्विन शुद्ध पौर्णिमा
९ आक्टोबर)

श्री

राजश्री रामचंद्र-नारायण गोरे गोसावी यांसी.

सु॥ खमस सितैन मय्या व अल्लफ. तुह्माकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तर वृत्त लिहिणें. तीर्थरूप मातो. श्री बाईची शरीरप्रकृति प्रस्तुत कशी आहे हें लिहिणें. वरकड पूर्वीं पत्र लिहिलें आहे त्या प्रमाणें वडिलांस-विनंति तुह्मी करीतच असाल. अलीकडे वडिलांचें पत्र विस्तारें येत नाहीं तेणेंकरून चित्त उद्विग्न आहे. पूर्वीं वडिलांचे पत्र येत होतें त्यांत हमेषा वडीलपणाची आज्ञा होत असे. अलीकडे कांहींच विस्तारयुक्त येत नाहीं तेणेंकरून असेंही वाटतें कीं मजपासून कांहीं आज्ञेशिवाय वर्तणूक झाली असेल! ह्मणून वडिलांचे पत्र येत नाहीं असा ही संदेह वाटतो. तर तुह्मी वडिलांची मर्जी पाहून या गोष्टीचा शोध घेऊन लिहून पाठविणें. हें पत्र दुसऱ्यास न कळावें. वडिलांची मर्जी पाहून तुमचे विचारें जाल्यास दाखविणें. इकडील वर्तमान

---

१ गोविंद हरि. २ प्रेम. ३ पत्र पेशव्यानीं लिहिलेलें आहे. या पत्रांत ' वडील ' हा शद्ब जेथें जेथें आला आहे तेथें तेथें तो गोपिकाबाई (पेशव्यांची आई) हिला लागू आहे असें समजावें.

तर वडिलांचे पत्रावरून कळेल. जाणिजे छ० १३ रबिलाखर. बहुत काय लिहिणें.

नं० ४९३

(१९ आक्टोबर)

श्री

चिरंजीव[1] राजश्री राऊ यांप्रती सौभाग्यवती सत्यभामाबाई आशीर्वाद उपरी. येथील क्षेम तागायत आश्विन वद्य पंचमी रविवासर पावेतों समस्त सुखरूप जाणोन स्वकीय लेखन करीत जावें. विशेष. तुह्मी धारवाडास आल्यानंतर दोनवेळां पत्रें पाठविलीं तीं प्रविष्ट होऊन लिहिलें वर्तमान सविस्तारें कळोन संतोष जाहला. आणखी वरचेवरी सविस्तर वर्तमान लिहीत जावें. तुह्मी तलाव्यांस[2] जात असतां. शत्रु दगाबाज आहे. फार सावधपणें असावें. चिरंजीव सौभाग्यवती यमुनाबाई व चिरंजीव सगुणाबाई व चिरंजीव सौभाग्यवती गिरिजाबाई हीं समस्त दसऱ्याचे पहिले दिवशीं येथें आलीं. भेटी जाहल्या. वर्तमान तुह्मास कळावें या करितां लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे. हे आशीर्वाद.

अपत्यें साळुबाईनें व सौभाग्यवती यमुनाबाईनें व सगुणाबाईनें व सौभाग्यवती ठकूबाईनें व सौभाग्यवती सखूबाईनें व सौभाग्यवती योगाबाईनें व सौभाग्यवती ठमाबाईनें व सौभाग्यवती कुसाबाईनें व सौभाग्यवती चिटकाबाईनें नमस्कार. सदैव पत्रीं आशीर्वाद लिहीत जावें. आह्मी समस्त सुखरूप आहों. हे विनंती.

---

१ हें गोपाळरावाच्या आईचें त्यास पत्र. २ शत्रूच्या टेहाळणीस.

नं० ४९४

(२९ आक्टोबर)

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीव राजश्री रावसाहेब यांसी प्रति गोविंद हरि. आशीर्वाद. उपरी. येथील कुशल तागायत आश्विन वद्य पंचमी भृगुवासर यथास्थित जाणोन स्वकीय लिहीत जाणें. विशेष. तुह्मी माणकोजी बरोबर शुद्ध त्रयोदशीचीं पत्रें पाठविलीं तीं पावोन विस्तारें वर्तमान कळलें. तमाम लोकांस ताकीदपत्रें पाठविलीं आहेत. येतील तेव्हां खरें! तुह्मी आपणाकडील पत्रें आठ दिवसां एक या प्रमाणें आह्माकडे पाठवीत जाणें. आमची चित्तवृत्ति तुह्माकडे लागली. प्रस्तुत खोकल्याचा मात्र शरीरीं अतिशय (उपद्रव) आहे. वरकड चिंता नाहीं. लक्ष गोष्टींची गोष्ट — प्रार्थना हेच कीं, 'यंदाची स्वारी सावध. सारें कपट आहे. खानदेशचें आमचें झूर्जें तद्वत आहे. तुमच्या पक्षीं कितेक आहेत त्यांस तिकडे जावया अनकूल नचपडे तरी युद्धप्रसंगीं तुह्मांस पुढें उठवून आपण एकीकडे होतील. सर्वांस तुमचें असह्य. धणियाची व कार्यभागी यांची ममता तुमचे ठाईं हें सर्वांस असह्य. इकडील लोकांचा मजकूर तिकडील जितके आहेत तितके शत्रुस्थानींच

१ गोपाळराव. २ पावसाळा सुरू झाल्याबरोबर शिलेदार घरीं आले होते त्यांस आतां दसरा झाल्यावर फौजेंत जाऊन हजर होण्याविषयींचीं हीं ताकीदपत्रें. ३ जींत सावधपणा राखणें जरूर अशी. ४ पूर्वीं कधीं पहिल्या बाजीरावाच्या कारकीर्दींत अशी गोष्ट घडली होती कीं, खानदेशांत कोठें युद्धाचा प्रसंग प्राप्त झाला असतां इतर सरदारानीं गोविंदहरीस भर देऊन शत्रूशीं लढाई करावयास लावून आपण पोबारा केला! त्या प्रसंगास उद्देशून हें गोविंद हरीचें लिहिणें. ५ गोविंदहरि याच पत्रांत वर ' सारें कपट आहे ' असें ह्मणतो व आतां तर मुख्य कपटनाटकी सखारामबापू याची ममता असल्याचें दर्शवितो याचा मेळ कसा घालावयाचा?

आहेत. ते जपतात. आह्मास सुचतें ह्मणोन वारंवार लिहितों. 'हरघडी हाच प्रकार कां लिहितात? हेच खबरदार! आह्मी वेडे आहों कीं काय?' असें ह्मणाल तर न ह्मणावें. यंदाचें वर्ष कठीण दिसतें. श्री पंढरीनाथ लज्जारक्षक आहे. बहुतच सावधपणें असावें. सर्वांशीं स्नेह (असावा.), सर्व लोकांवरी पहिल्यापेक्षां माया लोभ करावा. सदैव समीपवर्ती मायेचे, विश्वासू रात्रीं दिवस लोक असावे. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री नारायणराऊ व राजश्री नीलकंठराऊ व राजश्री आबा व राजश्री वामन राऊ व राजश्री भाऊ यांसी आशीर्वाद. लिखितार्थ परिसोन बहुत सावधपणें असत जावें. लिहिला अर्थ ध्यानांत आणावा. लोभ कीजे हे आशीर्वाद.

वै॥ छ० २३ रबिलाखर.

नं० ४९५

(१९ आक्टोबर)

श्रीगणपतिर्जयति.

श्रियासह चिरंजीव राजश्री रावसाहेब यांप्रती गोविंद हरि आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत आश्विन वद्य ९ रविवार सायंकाळ जाणोन स्वकीय लेखन करणें. विशेष. धारवाडचे मुक्कामींहून छ० ११ रबिलाखरचीं पत्रें रहिमतपुरच्या शिपायाबरोबर पाठविलीं तीं गुरुवारीं चवथे दिवशीं येथें प्रविष्ट होऊन लिहिलें वर्तमान कळलें. राजश्री विष्णुपंत घराहून गुरुवारींच येथें आले. त्यांस विवेकेंकरून[1] समाधानाच्या गोष्टी बोलावयाच्या रीतीनें बोलिलों. पुढील कर्तव्य ब्रह्मसूत्रेंकरून घडेल तें प्रमाण. चिरंजीव

---

[1] गोपाळराव.

राजश्री बापूकडे तुमची पत्रें गेलीं होतीं. तिकडील उत्तर आलें असेल तें वर्तमान लिहून पाठविणें. तुह्मी लालखानाचा भाऊ हसनखान यासही आणविला. कोणत्याही यत्नें एक वेळां चिरंजीव सुटोन येतील तो सुदिन आहे. ' लोक घरास गेले त्यांस ताकीद करून पाठवावें ' ह्मणोन पत्रीं लिहिलें, त्यास तुह्मी नालबंदीच्या वगैरे वराता लोकांस दिल्या त्या घेऊन (तुमच्या सैन्यांतील लोक) येथें आले. तुह्मी श्रीमंतांसमागमें रानांत, आणि कामा काजाचा समय. धारवाडास मोर्चे. या समयीं चार लोक [तुह्मां] जवळ असावे, म्हणोन ऐवजाची वोढ न करितां कर्जवाम करून वरातां पैकीं आज पावेतों साठहजार रुपये लोकांस दिल्हे. रुपये पदरीं घालून लागलेच ताकिदी करून सांगितलें कीं जलदीनें तयारीनिशीं निघोन जाणें. आणखीही ताकीद करवितों. बुधाजी चव्हाण यास तयारीनिशीं पाठविलें आहे. तुम्ही देवजी चोपड्याचा मजकूर लिहिला तो कळला. चिरंजीव राजश्री वामनराऊ व चिरंजीव राजश्री कोन्हेरराऊ या उभयतांस श्रीमंतानीं पालख्यांचीं वस्त्रें विजया दशमीच्या दिवशीं दिल्हीं म्हणोन लिहिलेवरून संतोष जाहला. धारवाडच्या झुजाचा मजकूर लिहिला तो कळला. अलीकडील वर्तमान लिहून पाठविणें. तुम्ही तलाव्यास जातां. शत्रु दगाबाज. त्याचा विश्वास नाहीं. फार सावधपणें असावें. नदीस उतारही जाहले असतील. किल्ला[3] अद्याप जेर नाहीं यामुळें तिकडील चिंता लागली आहे. सारांश. सावधतेस अंतर न करावें हस्तनक्षत्राचा पर्जन्य चवथीं चरण इकडेही विपुल लागला. खोगरें व नमदे वगैरे फुरसाण्याचें सामान पाठविलें आहे. यादीप्रमाणें रुजू करून घ्यावें. मायाजी म्हसके, याजकडील गांवाचा मजकूर तरी सन आर्बात आकार चवदाशें रुपये जाहले.

---

१ बापू ह्मणजे मेघश्यामराव कृष्ण जो हैदराकडे कैदेंत होता त्याकडे.
२ लालखान हा हैदराच्या कारभाऱ्यांपैकीं एक होता. त्याचा भाऊ हसनखान पेशव्यानीं हुबळी घेतली तेव्हां तेथें पाडाव सांपडला. ३ किल्ला धारवाडचा.

त्यापैकीं हजार रुपये त्यास गांवापैकींच देविले. वरकड देशमुख देशपांडे सरदेशमुखी वरकड बाबकरी यांस जाहले. या प्रमाणें मजकूर आहे. दारूचे बैलांचे भाड्याबद्दल रुपयेचा मजकूर लिहिला त्यास कोठें दिल्हे तरी येतील. चिंता नाहीं. त्याणीं तेथें दिल्हे तर घेऊं. नाहीं तर तेथें दिल्हे तर तुम्ही घेणें. राजश्री बुधाजी चव्हाण येथें असेल तर रोजमुरा द्यावा लागत नाहीं. सरंजामी आहेत. त्याणीं चाकरी करावी. गुदस्तां मात्र वळसरेयामुळें[1] शहापुरीं चाकरीस होते. रोजमुरा पावला. येथें दुसरे राऊत ठेविले तरी अगर लष्करांतून पाठविले तरी रोजमुरा देणें पडेल. या स्तव तुमचे लोक जमा जालियावरी मशारनिल्हेस निरोप देणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. तुमचे वराते खेरीज बापूजोशी यांस पांच हजार कापडाचे खरेदीबद्दल आजीच रुपये दिल्हे. हे आशीर्वाद.

नं० ४९६

(१८ आक्टोबर)

श्रीगणपतिर्जयति.[2]

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत आश्विन वद्य अष्टमी गुरुवार दोन प्रहर अतिक्रमले यथास्थित जाणोन स्वकीय लिहिणें विशेष. तुम्हीं जासुदा बराबरी पत्रें व वस्त्रें सासवडास राजश्री नाना पुरंदरे याकडील पाठविलीं होतीं तीं प्रविष्ट करून प्रत्योत्तरें घेऊन आले आहेत त्यावरून कळेल. तुम्ही आम्हांस लिहिलें कीं, याउपरी वराता करीत नाहीं. असें असतां आजी राजश्री फिरंगोजी काळे व मानाजी काळे वगैरे यांची वरात आली त्यावरून अपूर्व वाटलें. दोन हजार रुपये रांजणी पैकीं वेळेकरांस[3] देणें म्हणोन सनद दिल्ही खेडींही परभारी गेलीं असोन! तुम्हांस

१ वळसरा = पर्जन्याचा अभाव. २ पत्र गोविंदहरीचें गोपाळरावास.
३ वेळेकर शिंदे हे पटवर्धनांचे पोट सरंजामी हल्लीं सांगलीकरांचे मानकरी आहेत.

अगत्य तेंच सर्वांस अगत्य. काळे यांची वरात कबूल केली. निमित्य कीं तुम्हाजवळ फौजेचा भरणा थोडा. यास्तव तुम्ही तेथील तेथें ठेविले. प्रत्यह चाकरीस तयार. यास्तव (त्यांची वरात) फिरविती नये. यारपरी दुसरी चिट्ठी आली तरी फिरवूं. कळावें म्हणोन लिहिलें असे. फारकरून वरातदार यांचे पदरीं ऐवज पडला. आजी दाईगेंडे, वेळेकर, व माणकोजी बल्लाळ यांचे पागेचा ऐवज व किरकोळी लोकांच्या चिठ्या त्या यादी प्रमाणें ऐवज पावता केला. राहतां येणें प्रमाणें राहिले त्यापैकीं येतील त्यांस देतच आहों. परंतु कळावें म्हणून लिहिलें आहे. म्हसके यांस गांवचा ऐवज पावला आहे. सावंत, कदम ९९४।, रघोजी पांढरे ७७४, जगदळे २००, बागुल, भोंसले १११३।, १००० पैकीं १०० कृष्णाजी जगथाप यांची चिठी निकम जगथाप याणीं पैशाचीं आणिली त्यांस दिले. खासा त्यांची वरात हजाराची आहे त्यापैकीं चारशें वजा करावे कीं काय तें लिहिणें. त्यांचा कोणी आला तरी चारशें वजा करून देतों. दारू गोळियाविशीं पेशजी तुमचें पत्र आलें जे सरकारचा कंझ्यां[1] न ठेवणें. त्या वरून गोळे, शिसें, दारू आदिकरून झाडाकरून येडुरास पावतें केलें. तेथून सरकारचे कारकून याणीं पलिकेडे[2] तरतूद करून जिन्नस नेला. येथून रवाना करून आजी बारा चौदा दिवस जाले. तुम्हांस कळावें. आजीच हें पत्र तुम्हांस लिहिलें ते समयीं पुणें याहून एकशें सोळा बैल भरून दारू राजश्री नाना फडणीस याणीं पाठविली. पोतीं भरलेलीं आहेत. किल्ल्यांत ठेवितों. भांडकरी आले म्हणजे घेऊन जातील. श्रीमंतांच्या नांवाचा लखोटा होता तो पाठविला आहे. वर्तमान सरकारांत श्रुत करणें. उमापतीस द्यावया ऐवज आम्हास तूर्त मिळत नाहीं. त्याच्या मुबदला बापू जोशी यास पांच हजार एकशें रुपये कापड खरीदी बद्दल दिल्हे. कळलें पाहिजे. तुम्ही तलाव्यास जातां ते एक दोन रोज रानांतच राहतां म्हणोन ऐकिलें. तो[3] दगाबाज

---

१ कज्या. २ कृष्णेपलीकडे. ३ हैदर.

आहे. वास्तव वस्तीस न रहावें. बहुत सावधपणें असत जावें. कोणे समयीं (शत्रु) काय करील न कळे. त्याचा विश्वास न धरावा. येविशीं प्रार्थना मान्य करावी. येथून उंटें, कापड, स्वार, कारकून रवाना केले ते येऊन पावलेच असतील. बैल वेठीचे भाडेकरी आहेत. त्यांस लाऊन देणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० ४९७

[कार्तिक शुद्ध द्वादशी
९ नोवेंबर.]

लक्ष्मेश्वर परगण्यांतील एका कारकुनाचें गोविंद हरीस पत्र—

" धारवाडचे किल्लेचे बुरूज जमिनीस सुरंग लावून दोनी बुरूज दारू भरून श्रीमंतानीं उडविले. तिसरा बुरूज उडविणार होते. तितक्यांत आंतले लोकानीं सल्ल्याचें पैगाम लाविलें कीं, ' गोपाळरावजींचे विद्यमानें किल्ला देतों. अबरूनें पार करून देणें. ' त्यावरून थोरल्या लष्करांतून गोपाळराव टाकोटाक पांच पन्नास घोडेस्वारानिशीं आले. करारमदार ठरले. लोक उतरविले. आज निशाण चढणार. "

नं० ४९८

[अजमासें कार्तिक शुद्ध.
नोवेंबरचा प० पंधरवडा.]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. राजश्री भिकाजी नरहर इचलकर्जीहून काली येथें आले त्याणीं वर्तमान सांगितलें कीं राजश्री तात्या घोरपडे आजरेस आले आहेत. तेथून टाकळीस येणार. येते समयीं राणोजी घोरपडे यांची भेट

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ हे कापशीकर घोरपडे सेनापति.

घेऊन त्यास आपले कइयपीं लाऊन घेऊन त्यांचा जमाव आपणाकडे आणावा [असा त्यांचा बेत आहे.] विठ्ठल विश्राम याचा जमाव व कांहीं पाईंचे व स्वार (त्याणीं जमविले आहेत.) या खेरीज आजऱ्यांत पांच सात शें माणूस नवें ठेविलें असें केलें आहे. टाकळीस येऊन रहावें, पुढें फौज बंदी करावी, [असा बेत आहे.] सदाशिवराऊ घोरपडे याच्या विद्यमानें दादा साहेबांकडे बोली लाविली आहे. प्रस्तुत दो[१] देश तेथें आहेत. मिरज प्रांतें धामधूम करावी असा प्रकार योजिला आहे. मातोश्रीचे निसबतीचे पारिपत्य करावें. विसाजीपंत. हरीपंत यांचें पारिपत्य करावें. मातोश्रीचे निसबत भिकाजीपंत इचलकर्जींत होते. किल्या अगोदर त्यांजपासून घेतल्या. प्यादे याशीं आण भाष घेऊन आपले अगोदर केलेच आहेत. भिकाजीपंत यासीं कांहीं खर्चा वेंचास म्हणोन तूर्त मागावें असा प्रकार. हा मशार निल्हेस कळतांच ' कामकाज आहे ' ह्मणोन सांगोन येथें आले. विस्तारें वर्तमान सांगितलें. प्राशन जालियावरी कांहीं शुद्धी नाहीं असा

---

१ दुटप्पी वागणूक. २ अनूबाईच्या. ३ ताल्या घोरपडे हा अनूबाईचा पुत्र. अनूबाई ही पहिल्या बाजीराव पेशव्यांची मुलगी इचलकर्जीस नारायणराव घोरपडे यास दिलेली होती. अनुबाई ही नवरा मेल्यानंतर संस्थानचा कारभार स्वतःच पहात होती. तिचा विश्वास हरीपंत दातार पोंभुर्लेकर व विसाजी नारायण या दोन कारभाऱ्यांवर होता. पैकीं पहिल्याचें नांव या पुस्तकांत पूर्वी अनेक वेळां आलेलें आहे व दुसरा घोरपड्यांची [आपल्या धन्याची] पागा घेऊन प्रत्येक स्वारींत चाकरीस हजर असे. हैदरअल्लीवरच्या पहिल्या स्वारींतही तो होताच. ताल्या घोरपडे हा दुर्वृत्त निघाला. त्यास मद्यपानाचें व्यसन लागलें. शिवाय वेश्या ही त्याणें ठेविल्या होत्या. दिवसें दिवस तो विघडत चालल्यामुळें अनुबाईनें त्याच्या हातीं कारभार दिला नाहीं. त्यामुळें मायलेकरांत सहजच वैमनस्य आलें. पण अनूबाईस पेशवे व पटवर्धन यांचें सहाय्य असल्यामुळें ताल्याचें तिजपुढें कांहीं चालेना. प्रस्तुत अनूबाई पुण्यास गेली आहे, तिची फौज कर्नाटकच्या स्वारींत गुंतली आहे, पटवर्धन व पेशवे हेही तिकडेच गुंतले आहेत, अशी संधि साधून त्यानें धामधूम करण्यास सुरवात केली होती व नाशिकास दादासाहेबांकडे सूत्र लाविलें होतें. दादासाहेबांसही असले फंद पाहिजेतच होते. त्यानीं ताल्यास उत्तेजन दिलें असावें असें गोविंद हरीच्या वरील पत्रावरून वाटतें.

वर्गणीची पोंच.

सन १८९८।९९

(ता. २२ फेब्रुवारी पासून २२ मार्च पर्यंत.)

	रु०
रा. रा. मोरो बळवंत मराठे. अनगोळ	३
,, ,, दामोदर गणेश पाध्ये. एम्. ए. मुंबई	३
,, ,, दत्तात्रय दिवाकर भट. ,,	३
रा. सा. सदाशिव गणेश दिघे. येसागड	३

ऐ०ले०संग्रह कर्ते.

सूचना

आम्हीं केलेल्या पुस्तकां पैकीं:—

१ यशवंतराय महाकाव्य (सर्ग२४श्लोक संख्या १७२५) किंमत १रुपया

२ फुटकळ चुटके (कविता)किंमत ८४

३ समुद्र काव्य किंमत ८३

४ गुणोत्कर्ष नाटक [तिसरी आवृति] किंमत ८८

ऐ० ले० संग्रहापैकीं निराळीं प्रकरणें *

मिरज प्रकरण—(मिरजेचा वेढा व तत्संबंधीं युद्ध) या हकिगतीचीं पत्रें ऐ०ले०संग्रहाच्या पांच, सहा व सात या अंकांत आलीं आहेत त्यांचें हें निराळें पुस्तक. किंमत ८१२.

मोंगलाशीं लढाई. किंमत ८३.

किंमत रोख. ट०हां० माफ. व्ही. पी.नें मागविल्यास ही पाठविण्यांत येतील.

---

* ऐ०ले०संग्रहाच्या वर्गणीदारांस हीं पुस्तकें निम्मे किंमतीस मिळतील.

ऐतिहासिक-लेख-संग्रह.

हें डेमी अष्टपत्री सांचाच्या चाळीस पृष्ठांचें मासिक पुस्तक दर महिन्यास मिरज येथें नियमानें प्रसिद्ध होत असतें. यांत पटवर्धन जहागीरदारांच्या जुन्या चिटणिशी दप्तरांतील ऐतिहासिक महत्वाचीं व प्रत्येक स्वारींतील भरपूर माहितीचीं पत्रें सालवारीच्या क्रमानें छापून प्रसिद्ध होत असतात. शिवाय अन्यत्र उपलब्ध झालेले कागदपत्र व बखरी वगैरेंचा ही यांत समावेश होत असतो. या मासिक पुस्तकाची आगाऊ किंमत सालिना ट० हा० सुद्धां तीन रुपये आहे. ग्राहकांनीं सालिना वर्गणीच्या किंमतीचें व्हा० पे० मागवावें अथवा तितक्या रकमेची मनीआर्डर पाठवावी. त्या शिवाय पुस्तक सुरू केलें जाणार नाहीं.

ऐ०ले०संग्रह कर्ते.

आमचे पुणें व मुंबई येथील एजंट.

रा.रा मुरलीधर मल्हार अत्रे, महाराष्ट्र बुकडेपोचे म्यानेजर, बुधवार पेठ पुणें. रा.रा. विष्णु दासो बनहट्टी. कमिशन एजन्ट आणि जनरल मर्चंट. गिरगांव ट्रामवे टरमिनस्. पेंडसे यांची नवी चाळ, मुंबई.

सदरहू दोन असामींस आम्हीं ऐ०ले०संग्रहाचे एजंट नेमिलें आहे. त्यांजकडे तेथील वर्गणीदारानीं वर्गणी द्यावी. आमचीं सर्व पुस्तकें एजंटाकडे विकत मिळतील.

ऐ०ले०संग्रह कर्ते.

ऐतिहासिक-लेख-संग्रह.

मासिक पुस्तक.

मे १८९९ इ.

अंक २४

वासुदेव वामन शास्त्री खरे

मिरज हायस्कुलांतील संस्कृत शिक्षक.

यांनीं

कुरुंदवाड येथें

"भाऊनाना" छापखान्यांत छापविलें.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हांशीलसह तीन रुपये.

फुटकळ अंकास पांच आणे.

वर्गणीदारांस विनंती.

आमच्या मासिक पुस्तकास पुढील महिन्या पासून तिसरें वर्ष लागतें. मासिकपुस्तकाची वर्गणी आगाऊ असून ती पुष्कळांकडून तशी येत नाहीं यामुळें खोळंबा व त्रास होतो. वर्गणी आज येईल, उद्यां येईल, या भरंवशावर महिनेमहा आम्हीं पुस्तक पाठवीत असावें, व तें निमूटपणें घेऊन वर्गणीची मागणी आली ह्मणजे कानावर हात ठेवावे, असा हा प्रकार कित्येक गृहस्थांनीं केला आहे ! आधीं मुळीं आमच्या पुस्तकास वर्गणीदार थोडे. तशांत या प्रमाणें जर वर्षानुवर्ष बूड लागूं लागली तर पुस्तक चालावें कसें ? या करितां सर्व आश्रयदात्यांस आम्हीं विनंती करितों कीं, जूनचा अंक आम्हीं तिसऱ्या वर्षाच्या वर्गणीचें व्ही. पी. आकारून त्यांजकडे पाठवूं त्याचा त्यानीं स्वीकार करावा. तशी कोणास सवड नसेल तर तिसऱ्या वर्षाच्या पहिल्या तीन अंकां पैकीं कोणचा अंक आम्हीं व्ही. पी. नें पाठवावा तें त्यानीं आगाऊ कळवावें. पुस्तक बंदच करावयाचें असेल तर तसें तरी कृपाकरून कळवावें ह्मणजे विनाकारण व्ही. पी. चा खर्च आमच्या अंगावर पडणार नाहीं.

ऐ०ले०संग्रह.कर्ते.

विचार आहे. कुरुंदवाडाशीं एकाएकीं कजिया न करावा असें मनांत. मिरज प्रांतें करावा असें आहे. हा मनसबा त्यांचा आहे. तुम्हांस कळावें ह्मणोन लिहिलें आहे. करणारांनीं असें केलें आहे कीं बलकुबलीस त्यांस आह्मीं किंवा आम्हांस ते. फूट करावी. द्वेष पाडावा. आम्हांशीं अगोदर स्पर्धा आहे. आम्हांस बुडविल्या उपरी त्यांस बुडवावें. असे कित्येक खेळ आहेत. जितके त्यापक्षीं आहेत त्यांसही पाताळीं घालावें. आधीं इकडील, मग तिकडील, असा (असा त्यांच्या मसलतीचा) प्रकार आहे. श्री भगवान् समर्थ तों कांहीं चिंता नाहीं. परंतु जागो जागां बंडें करून राज्यांत कलह लावून एकाएकीं सोर क्षयास न्यावे, प्रतिष्ठान[2] क्षेत्रास उपसर्ग जाहला. नाशिकास[3] जाहला. श्री पंढरीसें[4] जाहला. देवब्राह्मणद्रोह, स्वामिद्रोह, ज्ञातिद्रोह, इष्ट मैत्रांचा द्रोह, असे नाना प्रकारचे करावे इतकें आरंभिलें आहे. एक दोन वेळां क्षमा करावी. मग त्यांचें पारिपत्य करावें लागेल. बरें. कोणें प्रकारें मनसबा उभा करितात; डौल कसा धरितात, पहावें! आजज्यांत राणोजी घोरपडे यांस धरून बेडी घातली[5]. फट सावंत पळाला त्याच्या भावास घातली. आणखीही कितेकांचीं पारिपत्यें करणार आहे. कळलें वर्तमान लिहिलें. सत्यमिथ्या श्री जाणे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० १२ जमादिलावल.

नं ४९९[6]

(कार्तिक शुद्ध द्वादशी.
९ नोवेंबर)

श्रीगणराज

अपत्यें नीलकंठानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १०

---

१ सखारामबापूच्या कारस्थानाचें हें व यापुढील वर्णन आहे. २ पैठणास दादासाहेबानीं उपद्रव दिला. ३ नाशिकची लुटालूट मोंगलाचा सरदार विनायकदास यानें केली. ४ पंढरपूर रामचंद्रराव जाधव यानें लुटिलें. ५ बेडी घालणार तात्या घोरपडे. ६ हें नीलकंठरावाचें त्र्यंबकहरीस पत्र.

जमादिलावल प्रावेतों यथास्थित असों. विशेष. इकडील राजकी वर्तमान राजश्री नारो शंकर [व] हरी गोपाळ त्याचे भेटीस गेले ह्मणोन पेशजी लिहिलेंच आहे. ते तथ्य गेले. भेटी जाल्या. तदनंतर त्याणें बंकापुरची आट घातली कीं, आपला लेंक[1] तुमचा चाकर आहे त्यास एवढें स्थळ द्यावें. हें न होय तरी आपणास तह करणें अनुकूळ पडत नाहीं. तेव्हां त्याणीं श्रीमंतांस लिहिलें. मग थोरले श्रीमंतानीं मसलत केली कीं, स्थळही द्यावें, परंतु विवेक करावा. त्या समयीं कनिष्ठानीं नेटाची गोष्ट सांगितली कीं, बंकापूर देणें हें युक्त नव्हे. बंकापूर दिल्यानें बारीपलीकडील मुलूख आपला नव्हे. आणि स्थळ दिल्यानें (आपल्या) स्वरूपासही अयोग्य. असे बहुत रैवेसीचे[2] पर्याय समजाविले, ' निदान छापणी करावी, परंतु बंकापूर याजकडे ठेऊं नये. ' (असें सांगितलें तेव्हां थोरल्या श्रीमंतानीं) तेव्हां साफ जबाब दिला कीं, बंकापूर व बसवापट्टण हीं दोन्ही घेतले वांचून तह होणेंच नाहीं. असें उत्तर गेलें. उपर बंकापूर द्यावयाचा करार जाला. बसवापट्टणची त्याची रदबदली आहे. ज्येष्ठ यजमानांचा प्रकार कळलाच आहे. परंतु कनिष्ठांचे मतें न द्यावें असें आहे. बसवापट्टण देत नाहीं असा जाब दिला आहे, परंतु कारभारी यांचे मतें बसवापट्टण देऊन तह जाला तर करावा असें आहे. यांत काय ठरतें तें पहावें. चिरंजीव राजश्री बापूस दशमीचे दिवशीं राजश्री नारो शंकर व हरी गोपाळ यांचे भेटीस हैदरानें पाठविलें होतें. भेट घेऊन फिरोन त्याजवळ गेले. हा सारा कारभार उरकला ह्मणजे चिरंजीवांस यांचे स्वाधीन करणार. मुख्य गोष्ट तह रडका आहे. आह्मीं चिरंजीव सुटून येतात इतकाच लाभ मानितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना[3].

१ हैदराचा लेंक टिपू हा पेशव्यांचा चाकर कधीं झाला? २ रीतीचे. ३ हें पत्र प्रारंभीं १० जमादिलावल तारीख घातली आहे त्यावरून जरी आह्मीं येथें घातलें आहे तरी ती तारीख चुकीची आहे हें आंतील मजकुरावरून उघड आहे. हें पत्र इ० स० १७६५ च्या मार्च एप्रिल महिन्यांत लिहिलेलें असलें पाहिजे.

नं. ९००.

(कार्तिक वद्य चतुर्थी.
१२ नोवेंबर)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. पुण्याहून श्रीमंत राजश्री नारायणराव याणीं दारू गोळे तोफेचे बैल भरून येथें पाठविले. आह्मांस पत्र लिहिलें होतें कीं, सामान पाठविलें आहे हें मिरजेस ठेवावें, आणि श्रीमंतांस त्याणीं लखोटा पाठविला तो लष्करास पोंहचवावा ऐसें लिहिलें. त्यावरून दारू व सामान येथें ठेऊन घेतलें. श्रीमंतांचा लाखोटा पाठविला आहे. त्यांस प्रविष्ट करावा. पुण्याचा लाखोटा आहे. श्रीमंतांस प्रविष्ट करावा. दारू व गोळे तोफेचे येथें ठेविले आहेत. कळलें पाहिजे. जेव्हां आज्ञा येईल [तेव्हां] कोणी येईल त्याचे स्वाधीन करूं. हे आशीर्वाद.

नं. ९०१.

(कार्तिक वद्य चतुर्थी
१२ नोवेंबर)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. तुह्मी राजश्री बाळाजीपंत सफरे यासमागमें तिथी लिहिल्या नसतां पत्र पाठविलें तें काल तृतीया दोन प्रहरीं प्रविष्ट होऊन लिहिलें वर्तमान कळलें. ' दारू गोळा पुण्याहून आला तो चिकोडीस पाठवून द्यावा, तेथून शेषो नारायण पोंहचवितील, ' ह्मणोन पत्रीं लिहिलें; त्यास पहिलें सरकारचें व तुमचें पत्र आलें त्या वरून आह्मी भाड्याचे बैलांची

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ सामान पाठविण्यास नारायणरावाचें नांव मात्र होतें. पाठविणारा नाना फडणीस. ३ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

तरतूद करून शंभर गोण्या भरविल्या. रवाना करून द्यावें तों सरकारचें दुसरें पत्र घेऊन जासूद आला जे, 'करीम भाडेकरी याचे बैल पाठविले आहेत त्यांजवरी दारू गोळा पाठवून द्यावा' ह्मणोन जासूद पुढें पत्र घेऊन आला. बैल मागेंच होते. त्यावरून येथील भाडेकरी राहिले. फिरोन गोण्या उलगडून करीम याचे बैल अवघे ७९ पावणाशें आले त्यास त्याची भरती करून दिल्ही. तेही आज निघोन येणार. सरकारच्या बैलांमुळें दिवसगत जाहली. दरबारीं विविक्षा होईल ह्मणोन तुह्मास कळावें याकरितां लिहिलें आहे. दुसरी भरती पुण्याहून येथें शें सवाशें बैलांची आली आहे. तुह्मी लिहिले प्रमाणें तरतूद करून चिकोडीस दारू गोळा पोंहचावितों. तेथून तिकडे न्यावयाची तरतूद त्यांजकरवीं करवावी. इकडे पर्जन्य वीस पंचवीस रोज नव्हता. अलीकडे दोन चार चांगले पडले. पिकांस आधार जाहला. सरदेशमुखीचा मजकूर तुह्मी लिहिला त्याचा विचार मनास आणोन मागाहून उत्तर लिहून पाठवितों. चिकोडीस दारू गोळा पाठवीत नाहीं. बगर सनद अगर त्यांचे खावंदाचें पत्र असलें तर ते जिमेस आपले करून घेतील. नाहीं तर घेणार नाहींत. रानांत सरकारचा माल टाकितां नये. पहिले एकशें तीस बैल गोळे व दारू आली होती. दुसरी खेप दारू ऐशीं बैल व गोळे शंभर बैल व शिसें पंचवीस बैल भरून आलें तें बाहेर उतरविलें त्या पैकीं दारू साठ बैल व शिसें पंधरा बैल भरून रवाना केलें. काली मागती दारू शिसें याची खेप शंभर सवाशें बैलाची आली त्याची याद दास्त मागाहून पाठवितों. पहिले खेपेस गोळे बारीक मोठे १७३४. दुसरी खेप २९५० लहान मोठे येणें प्रमाणें आहेत. वरचेवर बैल भाड्याचे रवाना केले ह्मणजे जिन्नस रवाना करूं. पहिल्यानें बैल मिळत नाहीं ह्मणोन लिहिलें. मग यत्न करून पदरीं भाडें घालून ऐशीं शंभर बैल तयार केले. तों सरकारचा जासूद आला कीं भाडेकरी पाठविले, तेव्हां वाणियाकडील रवानगी राहविली. बैल थोडे आले. वाणी दाणा हर जिन्नस घेऊन लष्करास गेले. भाडेकरी यांजवळी सामान नाहीं. तेव्हां उसने रुपये १२० एकशें वीस दिल्हे आहेत. ते तेथें राजश्री भिवराऊ

यशवंत तोफखानेकडील याणीं द्यावे. फडाणिसानीं उसने घेऊन दिल्हे ह्मणोन लिहिलें आहे. रुपये मागोन घ्यावे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं ५०२

[कार्तिक वद्य चतुर्थी
१२ नोवेंबर]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. तोफेचे गोळे व दारू भाडें करून पाठविणें ह्मणोन तुमचें पत्र व श्रीमंतांचे आलें. त्यास येथें वाणी मातबर दहा बैलांचा कोणी नाहीं! दोन तीन बैल दर (असामीचे) याप्रमाणें वीस पंचवीस असामी पन्नास बैल जबरदस्तीनें काढिले तर होतील. दोनशें बैल पाहिजेत. तितक्यांस ताटकाचे गोणते पाहिजेत. हेंही एक कचाटच आलें! जितके बैल मिळतील तितक्यांवरी निमे दारू निमेवरी गोळे रवाना करितों. आह्मांवर शद्ब नाहीं. शेषोपंतास सांगावें. चिकोडीचे वाणी घेऊन जातील. विदित होय हे आशीर्वाद. चिरंजीव भाऊ कडील मंडळी, राजश्री भिकाजीपंत व रामाजीपंत करमरकर आले आहेत हे आशीर्वाद.

समस्त चिरंजीव मंडळीस आशीर्वाद. लिहिला मजकूर परिसिजे.. लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं ५०३

(१९ नोवेंबर)

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीव राजश्री रावसाहेब यांसी आशीर्वाद. उपरी. येथील कुशल

१ पटवर्धनांचे फडणीस ज्यानीं मिरजेहून दारू गोळा श्रीमंतांचे लष्करास रवाना केला ते. २ नं. ५०२ व ५०३ चीं पत्रें गोविंद हरीचीं गोपाळरावास.

तागायत कार्तिक वद्य एकादशी इंदुवार जाणोन स्वकीय लेखन करणें. विशेष. तुह्मी प्रतिपदा गुरुवारचीं पत्रें पाठविलीं तीं येथें मंगळवारीं प्रविष्ट होऊन लिहिलें वर्तमान कळलें. धारवाडचा किल्लेदार फजल अल्लीखान यास मुदुमेडास[1] पोंहचविला. मीर फैजुल्ला याणें नंदीकट्टें लुटून नागनुरास गेला. तेथें (हा त्याचा) भाऊही जाऊन पोंहचला. तेथून उभयतां जडें अनवडीस जाणार. हैदरनाईक तेथेंच आहे ह्मणोन वर्तमान लिहिलें तें कळलें. 'श्रीमंत कूच करून तुंगभद्रेच्या रोखें जाणार आहेत. राजश्री शामराव गोपाळ हैदरअल्लीकडील येणार ते अद्याप आले नाहींत. आलियानंतर लिहितों' ह्मणोन लिहिलें तेंही कळलें. 'निजामनअल्ली डेरा दाखल जाहले. रोख अदवानीचा आहे. श्रीमंतांस त्याचीं सलोख्याचींच पत्रें येतात' म्हणोन लिहिलें तें कळलें. चिरंजीव राजश्री मेघश्यामरायाचे चिट्ठीची नक्कल पाठविली ती पावली. धारवाडांत सावंत व माने वगैरे होते त्यांचा भोग सरला. यांचा अद्याप सरत नाहीं. श्रम होतात. काय करावें! श्री पंढरीनाथ कृपा करील त्या दिवशीं सुटतील. तुह्मी उपाय करणें तो करीतच आहां. धारवाडच्या[3] प्रसंगास चार दिवस ओढून धरितें तरी त्यांची सुटका होती तें न जाहलें. बरें. श्री इच्छा प्रमाण. हरी परशराम याचा मजकूर लिहिला तो कळला. शुद्ध त्रयोदशीचीं पत्रें ही पावलीं. सर्व अर्थ कळला. चिरंजीव साळू बाईचें जाणें तूर्त राहिलेंसें जाहलें. राजश्री नारो आप्पाजी प्रस्तुत पंढरीस आले आहेत. ते महायात्रेस जावयाचें राहिले.

---

१ मुदुमेड, नंदीकट्टें व नागनूर हीं स्थळें कोठें आहेत हें माहीत नाहीं. २ मेघश्यामराव युद्धांत हैदराकडे पाडाव सांपडला त्यावेळीं त्याबरोबर हे सावंत व माने सांपडले. मेघश्यामरावास कैद करून त्यानें बिदनुरास पाठविलें व सावंत व माने यांस धारवाडच्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें. तो किल्ला पेशव्यांच्या हातीं जातांच ते दोघे मुक्त झाले, पण मेघश्यामराव अजून सुटत नाहीं असा लिहिण्याचा भाव ३ शत्रूचे धारवाडच्या किल्ल्यांत लोक होते ते शरण येऊन कौल मागूं लागले त्यावेळीं.

त्यांचा उजूंर दाखवून साळू आकास राहविलें. तुम्हांस कळावें म्हणोन लिहिलें आहे. सरंजामी लोकांचा तपशील लिहून पाठविला त्याचें उत्तर अलाहिदा पत्रावरून कळेल. (मी) थंडीवाऱ्यांत बाहेर मळ्यास जात नाहीं. एखादे दिवशीं दोन प्रहरां उष्णकाळीं गेलों तरी जातों. फार करून तो जाणेंच नाहीं. तुमचे शरीरीं श्रमामुळें दोन दिवस वायु होऊन शमन जाहल्याचें वृत्त लिहिलें, त्यास रानांतील प्रकार. शरीर संरक्षण करीत जावें 'जीवन्नरो भद्र शतानि पश्य' [ति] असें आहे. वरकड इकडील अर्थ अधिकोत्तर लिहिजेसें नाहीं. (तुम्हांस) ज्वर आल्याचें ऐकिलें होतें. उतार पडालियाचें ऐकोन समाधान जालें. उंटें दोन माणको बल्लाळ याणीं विकत घेऊन पाठविलीं त्यांस पलोण झुली सर्व साहित्य केलें. मशार निल्हेनीं आपण लष्करास जावया त्वरेनें येतों म्हणोन लिहिलें त्यास दहा बारा रोज जाले. आले नाहींत. आलियावरी त्यांबरोबर उंटें पाठवितों. थोरातांच्या[3] अष्ट्याचा मजकूर कळला. तुमचा उपाय नाहीं. दरबारचा प्रसंग एक प्रकार. यास कोणें काय करावें. मुख्य आपला ऋणानुबंध. धण्यानें दुसऱ्याचें प्रमाण मानावें. आमचें अप्रमाण सुखरूप मानूत! आम्हांस धन्याशिवाय दुसरें दैवत नाहीं. एकनिष्ट सेवा करावी हें उत्तम आहे. हे आशीर्वाद. राजश्री नाना पुरंदऱ्याच्या डेऱ्यास लाखोटा (पाठविला आहे हा) प्रविष्ट करणें.

छ० १ जमादिलाखर

---

१ सवब. गोविंद हरीची मुलगी बालविधवा साळूबाई हिच्या मनांत काशीस जावयाचें होतें. नारो आपाजी तुळसीबागवाले हे खठल्यासुद्धां पुण्याची आणखीं याला बरोबर घेऊन काशीस जाणार होते त्यांबरोबर ही ही जाणार होती. २ उंटावरचें खोगीर. ३ थोरातांचें अष्टें किंवा वाळवें अष्टें हा गांव सातारा जिल्ह्यांत.

नं ९०४

(अजमासें कार्तिक वद्य
नोवेंबरचा द० पंधरवडा)

श्रीगणपतिर्जयति

आशीर्वाद उपरी. तुम्ही श्रीमंतांकारणें कांचे दोन पाठविणें म्हणोन लिहिलें त्यावरून मुजरत शाहणा माणूस ऐनापुरास पाठवून तेथें कारागर कांच्ये करावयाचे आहेत त्यांपासून तयार करवून आणून पाठविले आहेत. दर सहा प्रमाणें पहिला पाँड होता. हल्लीं ज्याजती दर १ येणेप्रमाणें दर ७ प्रमाणें चौदा रुपये देऊन कांच्ये आणून पाठविले आहेत. यापेक्षां बारीक होत नाहीं. हेही केवळ गैर नाहींत. श्रीमंत पसंद करितीलसे आहेत. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं० ९०५

(कार्तिक वद्य एकादशी
१९ नोवेंबर)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. तुम्ही छ० १९ जमादिलावलचीं पत्रें व पुरवण्या बंद ६ दिलावर भालदारासमागमें धारवाडचे मुक्कामींहून पाठविलीं तीं काल छ० २३ जमादिलावल रविवार दशमी सायंकाळचे समयीं प्रविष्ट होऊन लिहिलें वर्तमान कळलें. ' धारवाड फत्ते जाहालिया नंतर श्रीमंत रविवारीं कूच करून हंगरगोळावरी मुक्कामास गेले. तेथून कूच करून मिश्रीकोट येथें मुक्काम करून राहिले आहेत. आम्हीही आज निघोन त्यां-

---

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ पेशवे माधवराव. ३ दर. ४ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

जकडे गेलों ' म्हणोन लिहिलें तें कळलें. पुढें तुंगभद्रापार होऊन मुलुकगिरीस जाणार किंवा बंकापुरास शह देणार, मनसाबियाचा डौल कसा पडतो हें वर्तमान लिहून पाठवावें. मीर फैजुल्ला याणीं व त्याच्या भावानीं तुह्मांस सलुकाविशींचा प्रकार सांगोन पाठविला त्या प्रमाणें घडोन आल्यास उत्तमच आहे. यांच्या जरबेचा प्रकार पाहून तोही राजकारण करील. चौघा सरदारांकडे अंतर्यामीं राजकारण लाविलेंच आहे. त्यांत घडेल तें प्रमाण. तुम्ही येळवंतीकारितां धास्त घालून पत्र लिहितांच त्याणीं राजश्री लक्ष्मण हरी याचे विद्यमानें स्थळ दिलें हें मोठें काम झालें. गडासही मेढे देऊन चौक्या दिल्या, तेव्हां आठ पंधरा दिवशीं तेंही हस्तगत होईल. गड घेतल्या नंतर लक्ष्मेश्वर तालुका निखालस सुटला. पुढें श्रीइच्छा प्रमाण. उंटाविशीं पत्रीं लिहिलें, त्यास दोन उंट राजश्री माणको बल्लाळ याचे विद्यमानें खरीदी करून आणविले आहेत त्यांचें सारें सामान येथें नवें करविलें. मशारनिल्हे तुम्हांकडे येणार त्यांसमागमेंच दोनी उंट पाठवितों. ' भाडेकरी यांबद्दल रूपये ४०९ चारचें पांच राजश्री भिंवराव याजकडून मागून घेतों ' म्हणोन लिहिलें तें कळलें. गाई दोन तुम्ही पाठविल्या त्या अद्याप येऊन पोहोंचल्या नाहींत. मागाहून येतात म्हणून भालदारानें सांगितलें. येतील. थोराताकडील अष्टयाचा मजकूर लिहिला तो कळला. रदबदली न चाले तेथें तुमचा उपाय काय आहे? चिरंजीवाचे पालखीच्या सामानाविशीं लिहिलें त्यास येथें तो सामान मिळत नाहीं. पुण्यास लिहून सामान आणवितों आणि पाठवून देऊं. कितूरची खंडणी सालमजकूरची जाहली कीं नाहीं नकळे. चिरंजीव बापूचे सुटकेचा प्रकार जरी तह जा-

---

१ हैदर व पेशवे यांमध्यें तह होण्यासंबंधें. २ श्रीमंत आपलें पारिपत्य करणार असें पाहून. ३ हें पटवर्धनांच्या जहागिरींतील एक ठाणें. ४ श्रीमंत गड हें ही पटवर्धनांच्या जहागिरी पैकीं आणखी एक ठाणें. ५ मोर्चे. ६ भिवराव पानशे तोफखानेवाले.

हला तरी होईल. या गृहस्थावरी तुम्ही येहेसान करून निरोप दिल्हा यामुळें तो उपकारी आहे. (त्यानें) बरोबर जासूद गोविंद नेला त्या पैकीं जासुदाची रवानगी भावाचे भेटी नंतर केली, पत्रीं बहुतच लिहिलें, ऐशास भले जे आहेत त्यांची रीत काडीमात्र जरी उपकार केला तरी ते स्मरतात. दुष्टास गाडाभर केला तरी त्यांस स्मरण नाहीं. आपण दुष्टत्व करावयास घात करावयास चुकणार नाहींत. मल्याबुऱ्याची स्थीतरीत या प्रकारची आहे. गोविंदाची व चिरंजीवाची भेट होऊन तोही लौकरच येईल. कार्तिक शुद्ध प्रतिपदेची चिरंजीवाची चिठ्ठी आली त्या अलीकडील वर्तमान ल्याहावें. जिवाजी माने याची सुटका जाली, मोठी गोष्ट जाहली. [त्यास] आळतें गांव दीड हजार पावणे दोन हजार पर्यंत वसुलाचा दिल्हा आहे, त्यास सन खमसांत तेथील ऐवज त्यास किती पावावा? आबांत कांहीं पावलें नाहीं. सालमजकुरीं सनद मात्र दिल्ही आहे. स्मरण पूर्वक येविशींचे उत्तर पाठवावें. चिंतामणराव याच्या सरंजामापैकीं दहा हजार रुपये सातारियास पाठविणें म्हणोन सनद वेंकाजीपंत पोतनीस[3] याणीं सातारियाहून पाठविली. त्यास त्यांच्या मतें तुम्हीं आपल्या सरंजामांत आपला सरंजाम घ्यावा. आपण स्वार तुम्हांकडे चाकरीस देऊं. साल दर साल असा उपद्रव जाला तरी सरंजाम राहणार नाहीं या मुळें त्याणीं सांगोन पाठविलें. आम्ही साफ उत्तर दिल्हें कीं, श्रीमंत अम्हांकडे देतील हा भरंवसा नाहीं. तुम्ही जिकडून आपला उपाय होईल तिकडून करणें म्हणोन साफ सांगितलें. तुम्हास कळावें म्हणोन लिहिलें. रहिमतपुरचे कुलकर्णी व पाटिलाचे गुमस्ते व अंताजी कृष्ण देवघर आले होते. हिशेब पाहून झडती वि-

१ मीरफैजुल्लाचा भाऊ धारवाडचा किल्लेदार फजलअल्लीखान याजवर. धारवाडच्या वेढ्यांतून त्यास गोपाळरावानें सोडविलें होतें ह्मणून गोपाळरावाचा चुलत भाऊ मेघश्यामराव हैदराच्या कैदेंत होता त्यास ही मुक्त करून आपण गोपाळरावावर प्रत्युपकार करावा असें त्याच्या मनांत होतें. २ उपकार. ३ हे महाराज सरकारचे पोतनीस.

ल्हेस लाविली. त्यांस निरोप देऊन पाठविले. सालमजकुरीं नारोपंताचें कर्ज देणें असेल तरी नेमून द्यावें. पावतें होईल. वरातदारांसही देतील. त्याकडे कमाविस गुदस्तां होती त्याप्रमाणें दिल्ही तरी व्याज खेरीज हजार, बाराशें, पंधराशें खर्च त्याचा निराळा पडेल. यांत हित असेल तें समजोन उत्तर लौकर पाठवेणें. त्यांची कोरणी (?)सुटत नाहीं. अंताजीपंताकडे शद्ब येतो यास्तव त्याणें सुचविलें. या उपरी धण्याची मर्जी असेल तसें वर्तावें असा प्रकार आहे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. हर एक विशीं सावध असत जाणें. श्रीभगवान समर्थ तारक आहे. तथापि फारच खबरदार असत जावें. हे आशीर्वाद. (तुम्हीं) ओझें भारी, चालेना, तें धारवाडीं ठेविलें, उत्तम केलें. लष्कर समीप आहे. वरचेवर यावया कार्यास येईल.

चिरंजीव समस्त मंडळीस आशीर्वाद. बहुत सावधपणें वर्तत जाणें. वरचेवर पत्र पाठवीत जाणें. लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं० ५०६ (२२ नोवेंबर)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत कार्तिक वद्य १४ चतुर्दशी गुरुवार. यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुम्हीं गाई पाठविल्या त्या काली आठवे दिवशीं पावल्या. तुम्हीं धारवाडाहून कूच करून पुढें गेलां. प्रस्तुत लष्कर कोठें आहे (हें) लिहिणें. उंटें माणकोपंताबरोबर पाठवावीं म्हणोन ठेऊन घेतलीं. परंतु त्याचें आगमन दिसत नाहीं. परभारें गेले कीं काय न कळे. उंटांचे रुपयेही दिल्हे नाहींत. ते

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

येथें येतील तेव्हां द्यावेसा करार आहे. वरकड नवल विशेष लिहिणेंसें नाहीं. पुण्यास चिरंजीव सौभाग्यवती यशोदाबाई व गिरिजाबाई यांस पावून पालखी कालीच आली. चिरंजीव सौभाग्यवती लक्ष्मीबाई पुत्रसह सुखें आहेत म्हणोन लिहिलें आहे. चिरंजीव सौभाग्यवती यमुआका श्रीयात्रेस जाणार म्हणोन आमचा ऐवज तीन हजार व आणखी लोकांचा तीन हजार हुंडी करून पुण्यास पाठविला होता. त्यांचें जाणें राहिलें यास्तव राजश्री विसाजीपंत आठवले यांस रुपये ५००० पांच हजार व वाडदेकर याचे देणें अडीच त्यापैकीं एक हजार येणें प्रमाणें सा हजार दिल्हे. कालीच रामाजीपंत रानडे याचें पत्र आलें. तुम्हांस कळावें म्हणोन लिहिलें आहे. बहुत सावधपणें राहत जाणें. श्रीमंत राजश्री दादासाहेब यांचा मुक्काम टोकें यानजीक आहे. बरोबर तोफा साठ सत्तर ऐशीं पावेतों आहेत. फौज (फारशी) नाहीं. गायकवाड भोंसले यांस पत्रें गेलीं आहेत. येणार म्हणोन बोली आहे. या खेरीज किरकोळ याणीं ठेविले असिले तर जमा होतील. फौज जमा जालियावरी दक्षणप्रांतीं यावेंशी बोली आहे. राजश्री आनंदराऊ रास्ते दोनशें स्वारांनिशीं त्यांस आणावया म्हणोन गेले असें ऐकिलें. सत्य मिथ्या न कळे. राजश्री नरसप्पा गोसावी यांस आम्ही अटक केली नाहीं. त्याणीं लटका बोभाट सांगितला. प्रस्तुत ते लष्करास आहेत. याज करितां राजश्री रामाजी गोसावीही आहेत. तुमच्यानें साहित्य (रामाजी गोसावी यांचें) होईल तें करावें. नाहीं तर उपाय नाहीं. बडवे यांविशीं पत्र जालें तर ध्यावें. नाहींतर पत्र होत नाहीं असें तरी ल्याहावें. (तुम्हांकडे) चिरंजीव पंढरिनाथानें हाजिराहंजीर जीन रवाना केले त्यास आजी चार पांच दिवस जाले. पावलियाचें वर्तमान लिहिणें. हे आशीर्वाद.

पै॥ छ० ५ जमादिलाखर, गुरुवार.

---

१ जितक्यास तितके

नं० ५०७

[मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी.
२९ नोवेंबर.]

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीव[1] राजश्री रावसाहेब यांसीं आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० ५ जमादिलाखर गुरुवार यथास्थित असे. विशेष. करवीरवासी श्रीमंत मातोश्री याणीं श्री स्वामीचा पुरातन मठ आहे त्या शेजारीं राजश्री कैलासवासी यांची स्मशान भूमि श्री स्वामी नका म्हणत असतां जबरदस्तीनें दहन केलें तेथें देवालय बांधिलें. त्याचा प्रकार स्वामींच्या ब्राह्मण भोजनाची जागा आहे तें आंत सांपडवून बांधितात. गुदस्ता प्रारंभ केला तेव्हा श्री स्वामीनीं अतिशय[3] केला. लंघनें सात आठ केलीं. पुण्यतिथीचा महोत्सव जाला आणि श्री स्वामी समाधिस्थळीं वृंदावनास नमस्कार करून ' ऋणानुबंध तुटला ' ह्मणोन उठोन आले. तों मागें वृंदावनाचा डोलें अद्भुत जाला. स. रें करवीर क्षेत्र पहावया आलें. श्रीमंत मातुश्रीही आली. कितेकानीं चमत्कार पहावयासाठीं वृंदावनावरी नारळ ठेविले ते डोलाच्या योगें पडले. तेव्हां भयभीत होऊन आपण भिंती घालीत नाहीं ह्मणोन मध्यस्त घालोन (राणीनें) रदबदली केली. स्वामी एकंदर ऐकेनात तेव्हां राजश्री भगवंतपंत आले. त्याणीं कबूल केलें, शपथ केली, तेव्हां स्वामी राहिले. पांच सा दिवस वृंदावनाचा डोल होत होता. सर्वांनीं पाहिलें. त्यावरी दोन चार महिने काम बंद होतें. श्रीमंत मातुश्री पनाळे यास गेलियावरी मागें काम चालीस लागलें. स्वामीचा उपाय न चाले (तेव्हां त्या-

१ पत्र गोविंद हरींचें गोपाळरावास. २ संभाजी महाराज कोल्हापूरकर. ३ तकरार. ४ शंकराचार्यांच्या मठांतील वृंदावनाचा डोल झाल्याचें सारें थोतांड दिसतें. तसा प्रकार खरोखर घडला असता तर पुनः भिंताड घालण्याची जिजाबाईची छाती झाली नसती !

नीं) आम्हास लिहिलें. आम्हीही पत्र पाठविलें. परंतु [राणीनें आमचें म्हणणें] अमान्य केलें. त्याउपरी ती गडावरी असतांच श्री स्वामी ज्येष्ठ वद्य पक्षीं अकस्मात् जरारे निघोन येथें मिरजेस येऊन आम्हांजवळ फारच श्रमी जाले. डोळेयांस पाणी आणिलें. महा तपस्वी श्री स्वामी. या मन्वंतरी याप्रतीचा एकनिष्ठ भक्तिमान कोणी दिसत नाहीं. बोलिले कीं, 'तुम्हीं ब्राम्हण. आजी जें श्रीमंत करितील तें होईल. असें असतां आम्हावरी जुलूम होतो याचें कोणी मनास आणीना तेव्हां पुढें विचार काय?' तेव्हां आम्ही करार केला कीं, 'श्रीमंतांस लिहितों. मधील मधीं आम्हास कांहीं करितां नये. श्रीमंतांचें पत्र त्यांस आणून लावूं त्याणीं मान्य केलें तरी उत्तम. न केलें तरी आम्ही श्रीमंतांची आज्ञा घेऊन भिंताड पाडून टाकूं. स्वामींचा (ज्यांत) संतोष तेंच करूं. प्रस्तुत श्रमी न व्हावें' म्हणोन समाधानें बोलिलों. श्री स्वामी [मिरजेस] आले हें वर्तमान गडास कळतांच हुजरे व कारकून पत्रें आम्हास व श्री स्वामीस पाठविलीं. रोज बे रोज पत्रें येऊं लागलीं कीं 'आपल्यापासून अन्याय जाहला. याउपरी अमर्यादा करीत नाहीं.' आण शपथ वाहिली. स्वामींसही प्रमाण भासोन गेले. मास पक्ष काम बंद होतें. मागुती चालिलें! गडावरून मातुश्री आलियावरी फारच त्वरेनें काम चालिलें. पुर्ता ब्राम्हणद्वेष करावा हें [राणीचें] मानस! स्वामी वरचेवर पत्र पाठवितात. काय तजवीज करावी? आम्ही उपद्व्याप करावा तरी बिघाडांत गोष्ट येईल. अगर [राणी साहेब] श्रीमंतांस लिहितील तें प्रमाण वाटेल. आम्हीं सेवक लोक. बदनामी (आम्हावर) येईल. या करितां उतावळी न केली. प्रस्तुत पौष मासीं (करवीरास स्वामीच्या मठांत) पुण्यतीथ. ब्राम्हण भोजनास स्थळ नाहीं. यद्यपि करणें तेव्हां स्मशानभूमिकेच्या प्राकारांत करावें, तें स्वामींच्या ध्यानास येत नाहीं. आम्हास परि-

१ सडे. कांहीं लवाजमा बरोबर न घेतां. २ पन्हाळ्यास. तेथें जिजाबाई रहावयास गेली होती. ३ पुनः

छिन्न दोन तीन पत्रें आलीं कीं, तुम्ही आपल्या यजमानांस लिहून तेथून पत्रें श्रीमंत मातुश्रीस आणून केलें कार्य भिंताड पाडून टाकणें. नाहींतर काय तें उत्तर पाठविणें. निदान संकट जाणून हें पत्र तुह्मास लिहिलें आहे. मागें शृंगेरीस कानडे लिंगाइतानीं उपद्रव केला होता तो श्रीमंत थोरले कैलासवासी याणीं आपल्या तेजप्रतापें वारिला. हल्लीं या स्थळास उपद्रव मांडिला आहे. परिछिन्न (श्रीमंतानीं राणीस) पत्र ल्याहावें कीं, " हें अनुचित. घातली परिघ पाडून टाकणें. येविशीं गोविंद हरी यास जे आज्ञा करणें ते केली आहे. ते सेवेशीं विनंती लिहितील. " म्हणोन पत्र पाठवावें. जरी कारितां मान्य केलें तरी उत्तमच जालें. नाइकत तेव्हां तेथें कांहीं उपाय करून भिंताडाचा नाश करावा लागेल. श्री स्वामीचा क्षोभ कार्याचा नाहीं. श्रेयस्कर नव्हे. निदान जाणून पत्र लिहिलें आहे. तुम्ही हें पत्र श्रीमंतांस व कार्यभागी यांस दाखवून एक पत्र हुजूरचें घेऊन पाठविणें. श्री स्वामी संतोष पावतील. येविशीं तुम्हा विनंती करावयास गेलां, श्रीमंतांनीं अमान्य केलें, तरी तुह्मांवर अगर आम्हावर दोष नाहीं. निमित्य वारलें! तुम्ही विनंती करावयास जावया अनमान कराल तर शपथ आहे. आजी तागायत हरएक कामकाज लागलें तरी इतकें निकडीचें शपथ घालून पत्र लिहिलें नाहीं. जरूर जरूर जाणून लिहिलें आहे. खुद्द तुम्ही जाऊन येवढी विनंती करून पाहणें. आणि उत्तर सत्वर मुजरद जासुदाबराबर पाठवणें. श्री स्वामीचा ब्राह्मण प्रत्योत्तर येईजे पर्यंत येथून जात नाहीं. राजश्री भगवंतपंतीं (राणीस) सांगावें तरी ते अन्यत्र स्थळीं आहेत. आणि त्याचें सांगितलें (राणी) ऐकत नाहीं. यवना पेक्षां ब्राम्हण ज्ञातीचा द्वेष अतिशय! मातुश्रीस विपरीत कालासारखी बुद्धि निर्माण जाली आहे!

१ शृंगेरीच्या शंकराचार्यांस कानडे लिंगाईत (ह्मणजे प्रायः बिदनूरचे संस्थानिक) यांजकडून उपद्रव झाला असतां थोरल्या बाजीराव साहेबानीं त्याचें निवारण केल्याचें गोविंद हरि लिहितो. ही गोष्ट त्यावेळीं सुप्रसिद्ध असेल, परंतु हल्लीं तिचा उल्लेख जुन्या कागदपत्रांतून कोठें आढळलेला नाहीं.

तमाम देवळें मोडून हें काम चालीस लाविलें आहे! बहुत काय लिहिणें. चिरंजीव केशव काळा याजबळी हें पत्र दिल्हें आहे आणि जाब मागून घेणें म्हणून सांगितलें आहे. तुम्ही श्रीमंतांसन्निध नसलां तरी हर कोणाबराबर पत्रें पाठवून उत्तर आणून रवाना करणें. हे आशीर्वाद.

नं० ५०८

(मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी.
२९ नोवेंबर)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. श्री स्वामींनीं पत्र आम्हास लिहिलें हें श्रीमंत मातुश्रीच्या समाधानास्तव लिहिलें. त्यांणीं वाचून पाहून मगच रवाना केलें. परंतु ब्राम्हण आला होता त्याणें मुख जबानीं सांगितलें कीं " वृंदावनासभोंवता परीघ (व) नदीतीरीं ओवऱ्या स्वामींनीं बांधिल्या होत्या त्या पाडून [राणीनें] भिंत बांधिली. दरवाजा लाविला. माकण देखील न ये असें केलें. श्री स्वामी परम श्रमी आहेत. परस्पर कारकून पाठवावा. नव्हे तरी जालें हेंच फार[3] आहे. बहुत काय लिहिणें. पत्रें वाचावयासाठीं पाठविलें आहे. श्रीमंतांस दाखविलें तरी कार्याचेंच आहे. हे आशीर्वाद.

नं० ५०९

(मार्गशीर्ष शुद्ध दशमी.
३ दिसेंबर)

श्री

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री धोंडोराम गोसावी यांसी.

---

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ राणीनें. ३ येथें ' थोडें ' या शद्बाऐवजीं चुकून ' फार ' हा शद्ब पडला आहे कीं काय? ४ या पत्राच्या प्रारंभीं ज्याविषयीं उल्लेख आला आहे तें स्वामींनीं लिहिलेलें पत्र. ५ हा पेशव्यांचा बकील मोंग-

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सुरुसन खमस सीतैन मया व अलफ. धारवाडचा किल्ला घेतल्याचें वर्तमान पेशजी लिहिलें त्यावरून कळलेंच असेल. तेथून कूच करून दरमजल हनगळास येऊन हनगळची गढी घेऊन तेथून हैदर नाइकाचे रोंखें आलों. हैदरनाईक बाळा नदीपलीकडे जडें अनवडीजवळ[1] टेंकडीवर बातेरी धारे बांधून टेंकडीखालीं दक्षिणेकडे लष्करसुद्धां मुक्काम करून छावणीस राहिला. लष्करासभोंवतें भिताड घातलें. पाठीमागें व डावेकडे उजवेकडे झाडी फार आहे. उत्तरेकडे लहानसा ओढा आहे. जागा अडचणीची व त्यामध्यें बातेरी व खंदक-भिताडाची मजबुती करून राहिला. खासा स्वारी येऊन बाळा नदी अलीकडे कोसावर मुक्काम केला. पलीकडे तो कोसावर आहे. खासा स्वारी सडे स्वारीनें दोन दिवस जाऊन तोफांची मारगिरी त्याचे लष्करावर केली. त्याजवर छ० ७ जमादिलोखरीं[2] जाऊन तोफा त्याचे लष्करावरी लागू करून मार दिला. तेव्हां तो फौज व गाडदी व प्यादे, चट्टेकरी व तोफा घेऊन पुढें येऊन झाडीच्या आश्रयानें गाड्यांचे बुरूज बांधून उभा राहिला. तेव्हां त्याजवर नीट चालून घेतलें. सरदारांनीं[3] व लोकांनीं बेजरब घोडीं चालवून झाडींत शिरून झुजाचें तोंड लावून गाड्यांचे बुरूज फोडून गाडदी हजार बाराशें कापून काढले. पांच सातशें धरून आणिले. (हैदराचे) नामी नामी माणूस व सरदार व लोक होते ते मारिले व धरिले. तोफा पांच सात घेऊन आला होता त्याही आणिल्या. निशाणें बंदुका गाड्यांच्या तीन चार हजार, भाले[4] कटाचे व पांच सातशें घोडीं आणिलीं. मोठी

लाच्या दरबारीं असणारा.

१ जडें व अनवडी हे गांव म्हैसुरच्या उत्तरसरहद्दीवर जवळ जवळच आहेत. २ मार्गशीर्ष शुद्ध नवमी १ दिसेंबर रोजीं. ३ या लढाईंत आपण स्वतः काय पराक्रम केला याविषयीं या पत्रांत उल्लेख नसणें हें रावसाहेब पेशव्यांच्या विनयास अनुरूप आहे. ४ हैदराच्या अघाडीस चालणारे जिलिबीचे लोक असत त्यांच्या हातांत चांदीचे कट घातलेले भाले असत.

फत्ते श्रीकृपेनें जाली. सारांश त्याजवळ सरदार व लोक चांगले होते ते अवघे विल्हेस लागले. याउपरी हैदरनाइकानीं झुंजावें ही कांहीं बाकी राहिली नाहीं. श्रीकृपेनें मोठी फत्ते जाहली. हें मोठें संतोषाचें वर्तमान तुम्हांस कळावें या करितां लिहिलें असे. हैदरनाइकास गोळीची जखम लागली असें म्हणतात. तहकीक कळल्यावर लिहिलें जाईल. थोडकेच दिवसांत श्रीकृपेनें त्याचें पारिपत्य होईल. जाणिजे. छ० जमादिलाखर. आज्ञा प्रमाण. [लेखनसीमा.]

पै॥ छ० २९ रजब मुक्कामनजिक येतगिरी.

नं० ९१०

(२ दिसेंबर)

श्रीगणराज

अपत्यें नीलकंठानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत मार्गशीर्ष शुद्ध दशमी रविवार पावेतों मुक्काम नजीक जडें अनवटी येथें वडिलांचे आशीवादें करून यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान तर बंकापुर व सावनुरचे मध्यें श्रीमंतांचा मुक्काम जाला, तेथून वडीलांस पत्र पाठविलेंच आहे. त्याच तळावर मसलत जाहली कीं, तुंगभद्रापार गेलेनें इकडे[३] तिकडे उपद्रव होईल. यास्तव झाडीचे तोंडीं तो आहे तेथून माघारा झाडींत गेला तर आपण तुंगभद्रा तीरास जाऊन शिवमोघ्याकडे जावें. तिकडून (त्याच्या) मुलखांत शिरावें. म्हणजे तो बळ धरून राहिला तर तेथेंच श्रम करून पारिपत्य करावें. असा करार होऊन तेथून कूच करून हनगळास आले. तेथें त्याचें ठाणें होतें तें तोफा लावून घेतलें संध्याकाळीं.

---

१ खरें. २ पत्र नीलकंठराव त्रिंबक यानें तिंबक हरीस लिहिलेलें. ३ आपल्या मुलखांत चोहींकडे.

नंतर दुसरे दिवशीं तेथें मुक्काम जाला. तेथून षष्ठी बुधवारीं कूच जालें तों
श्रीमंत त्याचे लष्करापासून चहूं कोसावर आले. आम्हीं व विठ्ठल शिवदेव
त्याचे लष्करापर्यंत गेलों. त्याची चौकी नदीवर होती. आमचे अघाडीचे
लोक जातांच त्यांची यांची गांठ पडली. ते मोडले. पेंढारी बहुत लोक
होते. आह्मांकडील थोडेच होते. परंतु त्यास मोडिला. पाउणशें पर्यंत
घोडे घेतले. फौजेंत दहा वीस. बाकी अगदीं पेंढाऱ्यानीं घेतले. संध्या-
काळीं माघारे गोटास आलों. दुसरे दिवशीं श्रीमंत फौजसुद्धां नदीवर आले.
तदनंतर त्याचे लष्करचे दोनी बाजूंचें रान सोडचावें ह्मणोन पूर्वेस आम्हीं
व विठ्ठल शिवदेव पाठविले. पश्चिमेस नारो शंकर व रास्ते व भोंसले व
मुराराव यांस पाठविलें. तदनंतर आम्हीं गेलों. पूर्वेस एक टेंकडी तोफेचे
मारांत होती तेथें गेलों. जागा पाहिली. (तेथून हैदराचें) लष्कर सारें
दिसूं लागलें. तेथून तोफा लावाव्या असा करार करून आलों. दुसरे दि-
वशीं शुक्रवारीं सखारामपंतास नेऊन जागा दाखविली. शुक्रवारीं कूच क-
रून कोसभर पुढें येऊन राहिलों. त्याचे लष्करास व आह्मांस अडीच
कोसांची तफावत राहिली. रात्रीं त्याणीं येऊन आमचे गोटाकडे बाण दु-
रून टाकिले. हजार दोन हजार बार केले. परंतु लष्कर सावध होतें. गड-
बड न जाली. फौजा तयार जाहल्या. विठ्ठल शिवदेव, आह्मीं व रास्ते न-
दीपार गेलों. ते सरून माघारे गेले. दुसरे दिवशीं शनिवारीं तोफा घेऊन
श्रीमंतच त्या टेंकडीस आले. परंतु टेंकडीचे बाजूस झाडी फार होती त्या-
चे गोटापासून टेंकडीपर्यंत लगती होती. झाडीकडे मुरारराव व गाडदी

---

१ मराठी लष्करांत प्रत्येक सरदाराबरोबर कांहीं पेंढारी असत. ते लुटीपैकीं
कांहीं नजराणा ह्मणून त्या त्या सरदारास देऊन त्याच्या आश्रयाने रहात. लुटीपैकीं
जो माल फौजेंतील लोकांच्या हातीं लागेल तो फौजेवरच्या सरदाराचा. पण पेंढाऱ्या-
नीं मिळविलेला माल पेंढाऱ्यांचा. या मुळें शत्रूचें पाउणशें घोडे हिरावून घेऊन ही
नीलकंठरावास फारसा संतोष झाला नाहीं! २ कारभारी सखाराम बापू.

उभे होतेच. चार घटका पावेतों तोफांचा मार दिला. त्यानें[1] चार पांच हजार गाडदी व पांच सातशें स्वांर व पांच तोफा निवड सारी घेऊन झाडींचे तोंडास आला तों पावेतों दिसलें नाहीं. एकाएकींच मार देऊं लागला तो निस्सीम! परंतु मुराररायानें जागा सोडिली नाहीं. आम्हीं व विठ्ठल शिवदेव हिरिऱ्या[2] होऊं लागल्या. परंतु हत्यार न लागे. आग भारी. (आमची) फौज फारकरून पलायनासक्त जाली. परंतु सरकारची हुजरात अंतऱ्यानें होती. गलबल होतांच (ती) धांवून आली. श्रीमंत खासा स्वांरी मुराररायाचे पाठीवर उभे राहिले. फौज पळूं लागली, परंतु नेट धरून उभे राहिले. आम्हीं व विठ्ठल शिवदेव हिरिऱ्या करीतच होतों. हुजरातीनें नीट चालोन येऊन त्याजवरच घालोन घेतलें. चहूंकडून सारे उठलों. हत्यार लागलें. गाड्यांत घोड्यांचीं तोंडें शिरकतांच गाडदी मारिले. फौज मोडिली. दोन अडीच हजार बंदूख घेतली. दोंन तीनशें घोडीं घेतलीं. पांच तोफा घेतल्या. परंतु झाडींत उपाय नाहीं. गोळी चालेना. लोक झाडींत शिरले परंतु इलाज न चाले. माघारे फिरले. थोडेंसें मैदान असतें तर खासा (हैदर) देखील धरिला होता! परंतु झाडीनें त्यास वांचविलें. श्रीमंतांचें प्रारब्ध विचित्र. त्याजमुळें येवढें यश आलें. नाहीं तर त्या जागेस तो मोडावा असें नव्हतें. परंतु ईश्वरें यश दिलें. बाण व गाडदी व जेजाला व तोफांचा मार अतिवृष्टि त्यानें दिला. परंतु ईश्वरानें खैर केली. चिरंजीव आबास व धोंडोबास गोळ्यांचे धबके लागले आहेत. खैर झाली. आठ दिवस बरे होण्यास लागतील. आमच्या तिनी पथकांतील दहा बारा घोडे पडले. जखमी घोडीं माणसें ७९ । १०० पर्यंत होतील. मार त्याचा फार जाला परंतु श्रीमंतांचें प्रारब्ध! अखेर ही झाली. आणि महद्यशही

---

१ हैदरानें. ही प्रथमार्थी तृतीया. २ आमच्या व विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांच्या फौजेचे हैदरावर हल्ले होऊं लागले.

आलें. सारे फौजेंत पाउणशें घोडें पडलें असेल. २९ । ४८ माणूस पडलें. तोफा पांच चांगल्या सांपडल्या. आज आणखी तयार होऊन गेलों. फार अडचणींत राहिला आहे. चहूंकडे बातेऱ्या बांधल्या आहेत. तीन तोंडें झाडी आहे. एक तोंड मोकळें आहे. पुढें काय होतें पहावें. आह्मांकडील नारायणराव हुकेरीकराचा घोडा ठार झाला. कृष्णाजी जाधवाचे घोड्यास तीन जखमा आहेत. तोही भारीच आहे. बाकी खैर आहेत. पागेची शहागडी घोडी जखमी आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं ९११

(मार्गशीर्ष शुद्ध दशमी
३ दिसेंबर)

श्रीगणराज

अपत्यें गोपाळानें[1] साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान तागायत छ० ९ जमादिलाखर इंदुवासर मुक्काम नजिक अनवडी वर्तमान यथास्थित असे. विशेष. पत्रें लिहिल्यावर दोन दिवस माणसें ठेऊन घेतलीं. तोफा लाविल्यावर वर्तमान काय होईल तें ल्याहावें ह्मणोन ठेविलीं. त्यास नवीन वर्तमान छ० ७ रोजीं रविवारीं सरकारच्या तोफा डावे बाजूकडे टेंकडी पाहिली होती तेथें तोफा पांच सात लाविल्या. लंबछड्या तोफांचे गोळे (त्याच्या) गोटांत लागू जाहले. मारा चांगला होऊं लागला तेव्हां गोटांत (त्यास) मार सोसवेना. तेव्हां बातेऱ्यांजवळ मीरफैजुल्लाखानास ठेवून खासा हुजरात निवड सामान पांच सात तोफा, पांच सात हजार गाडदी व पठाण व दोन हजार फौज[2], येणें प्रमाणें सामान झाडींतून निघालें. कावा करून झाडींतून येऊन एकाएकीं टेंकडीजवळ येऊन तोफा

१ पत्र गोपाळरावाचें गोविंदहरीस. २ घोडेस्वार.

सोडवाव्यां हा मनसबा करून आला. झाडीकडील अंगें मुरारराव घोरपडे यांची फौज व आमची फौज व विठ्ठल शिवदेव यांची येणें प्रमाणें तीन पथकें होतीं. इतकियांत झाडींतून निघोन पुढें येतांच पेळों लागले. जवळ आले तेव्हां राजश्री मुरारराव याचे फौजेची व गाडद्यांची गांठ पडली. झूज जाहलें. खासा मुरारराव याणीं जागा सोडिली नाहीं. चांगली आंगेजणी केली. मार फार खाल्ला. आमच्या व विठ्ठल शिवदेव यांच्या फौजेच्या हिरीऱ्या जाहल्या. तों हैदरनाइकाकडील तोफा पुढें आल्या. गाडदी यांचे बुरूज बांधिले. सामान जथलें. आग भारी. तेव्हां पुढील तोंडचीं पथकें जरा करवडलीं. ते समयीं श्रीमंतांनीं हुजरात बलावून अंगेजणी करून घोड्यावर बसून हत्ती निशाणाचा खुले हत्तीपुढें घालून फौजेसुद्धा नीटच चालोन घेतलें. हत्ती पुढें तोफांनवळ जातांच त्याजकडील सामानाचे बुरूज विस्कळीत जाहले. तीच तोड लागली. हत्यार लागतांच भारामारी करीत आंत शिरले. चोंहोंकडील फौजांचीं हत्यारें लागलीं. तोफा पाडाव जाहल्या. चार पांचशें घोडे पाडाव सांपडले. बंदुका गाडद्यांच्या दोन हजार पावेतों लोकांनीं घेतल्या. हजार बाराशें माणूस त्याजकडील (त्या) जागांच ठार पडलें. हजार दीड हजार जखमी जाहलें. खासा हैदरनाइकास गोळीची जखम लागली ह्मणोन वर्तमान आहे. हुप्याच्या कटाचे भाले वगैरे खास जिलबीचे सर्व लुटून घेतलें. फत्ते जाहली. श्रीमंतांकडील व सारे फौजेचें मिळून ठार माणूस फारसें नाहीं. जखमी दोनशें पावेतों होईल. मातबर झूज जाहलें, परंतु ईश्वरें खैर केली. एरवीं (हैदरानें) दगा करावा, तोफा सोडवाव्या, असें जाहलें होतें. परंतु ईश्वर यश देणार! त्यासारखे योग चांगले घडोन आले. तिकडील पाडाव एक कुमेंदान

१ हिसकून घ्याव्या. २ शत्रूचे धांवत अंगावर चालून येऊं लागले. ३ पराक्रम. ४ पलटणचा मुख्य सरदार.

च कामाठ्यांचा कारभारी ब्राह्मण व रामराव वकील त्यांसमागमें होता तो येणें प्रमाणें जखमा लागोन सांपडले. या शिवाय एक दुसरा चुकोन वाकोन सांपडला असेल. सारांश ईश्वरें चांगलें यश दिलें. चिरंजीव राजश्री आबाच्या डाव्या हाताच्या मनगटास गोळीचा धवका मात्र बसला. तसाच चिरंजीव राजश्री धोंडोबास डाव्या हाताच्या दंडास गोळीचा धवका मात्र बसला. निवाल्या गोळ्या जळल्याच. परंतु गाड्यांच्या यास्तव कारीगार जाहल्या नाहीं. ईश्वरें खैर केली. वरकड जखमी यांची यादी लिहिली आहे त्याजवरून कळेल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० ५१२

(मार्गशीर्ष शुद्ध एकादशी
४ दिसेंबर)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. राजश्री रामराव देशपांडे प्रांत मिरज हे रामना-

१ डेरे राहुट्या व लष्करचें इतर सामान व तोफखाना व्यवस्थेनें नेणें व ठेवणें व लष्करचीं लढाई शिवाय इतर कामें असतात तीं करण्याकारितां लावलेले कामाठी. २ लागू. एकंदरवाक्याचा अर्थ सुसंगत लागत नाहीं. ३ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. या पत्रांत चंदूरकर देशपांड्याविषयींची हकीगत आहे ती अशी. चंदूर हा गांव चिकोडी तालुक्यांत आहे. तेथील देशपांड्यांचें घराणें पुरातन असोन त्यांजकडे मिरज, पन्हाळा, हुकेरी, कागल व रायबाग अशा पांच प्रांतांचें देशपांडेपणाचें वतन होतें. या देशपांड्यांतील त्यावेळेचा मुख्य पुरुष रामराव देशपांडे याचा व रामनामे आडनावाच्या दुसऱ्या एका घराण्याचा वतनासंबधें तंटा लागला. वादिप्रतिवादि पुण्यास पेशव्यांकडे फिर्याद घेऊन गेले. त्यावेळीं पेशवे नानासाहेब होते. त्यांनीं फिर्यादीचा निकाल होई तों त्या काळच्या वहिवाटी प्रमाणें वतन जप्त केलें. मिरजेचा मामलेदार शिवाजी बल्लाळ ह्मणून होता त्याच्या ताब्यांत वतनाची जप्ती होती. त्यानें वतनाचा जो वसूल आला तो गिळंकृत केला. पुढें वादीची चौकशी होऊन रामनामे खोटे ठरले व रामरावाच्या तर्फे फैसला झाला. पण वतन हवालीं करिते वेळीं पेशव्या-

म्याच्या कजिया तागायत कसाल्यांतच आहेत. जेव्हां पुण्यांत त्यांचा यांचा इनसाफाचा मजकूर जाहला तेव्हां देशपांडेपण अमानत जालें. रामराव तीन वर्षें पुण्यांत बसले. अमानतीचा ऐवज वतन संबंधें आकार जाला तो राजश्री शिवाजी बल्लाळ याजकडे वसूल पडला. पुढें रामनामे खोटे जाले. तेव्हां सरकारांतून नजर रामरायाकडे ठराविली रुपये दहा हजार. त्यास (ही रक्कम देण्यास) कोठें उपाय नाहीं. तेव्हां राजश्री बाळंभट काळे याचे घरीं वतन अमानत ठेऊन दहा हजार रुपये सरकारांत दिल्हे. त्या

नीं त्याजवळ दहा हजार रुपये नजराणा मागितला. तो पैसा त्याजवळ द्यावयास न व्हता ह्मणून मिरजेंत बाळंभट काळे ह्मणून ब्राह्मण होता त्याजकडून रुपये काढून त्यानें सरकारांत भरले व काळे याजकडे रकमेची फेड होई पर्यंत वतन गहाण ठेविलें. काळे याच्या ताब्यांत वतन यावयाचें तें सरकारची जप्ती उठल्यावर. ती जप्ती मामलेदार शिवाजी बल्लाळ यानें सरकारांतून परवानगी आणून उठविली. इतक्यांत नानासाहेब पेशवे वारले. ही गोष्ट १७६१ त झाली. त्याच वर्षी माधवराव पेशवे व दादासाहेब फौजेसह कर्नाटकचे स्वारीस मिरजे पर्यंत आले. त्या वेळीं दादासाहेबानीं वडगांव ह्मणून पन्हाळा प्रांतापैकीं गांव आहे तो लुटून मुलखांत धामधूम केली. पुढच्या वर्षी दादासाहेबांचा मिरजेस वेढा आल्यामुळें प्रांतांत धामधूमच होती. त्या वर्षी पाऊस पडला नाहीं व शेतें पिकलीं नाहींत. मिळून वतनापैकीं वसूल काळे भटजी यांस मिळाला नाहीं या मुळें ते रुष्टच होते. पटवर्धनांच्या जहागिरीचे हिशोब समजावून देण्याविषयीं पेशव्यांच्या दरबाराकडून गोपाळरावास तगादा लागला होता व त्यानें त्याबद्दल गोविंद हरीस लिहिल्यावरून गोविंद हरीनें आपल्या फडणिसाचा मुलगा महादाजी कृष्ण यास हिशोब देऊन लष्करास रवाना केलें होतें. त्या महादाजी कृष्णानें पेशव्यांच्या दरबारांत कृष्णराव काळे याच्या मार्फत वशिला लाऊन नजराण्यापैकीं हजार रुपये द्यावयाचे राहिले होते या निमित्तावर देशपांडेगिरीच्या वतनावर पुनः जप्ती आणिली' आणि वतनाची वहिवाट आपल्या तर्फेच्या कोणा मनुष्यास मिळवून दिली. पहिली जप्ती उठली तेव्हा देशपांड्यानें मिरजेच्या फडणिसास ' दरबार खर्चीबद्दल कांहीं द्रव्य देऊं केलें होतें तें त्याकडून पावलें नाहीं हा काय तो फडणिसाचा देशपांड्यावर राग! पटवर्धनांच्या जहागिरीपैकीं हें देशपांडेपणाचें वतन होतें तरी दरबारीं ही उलाढाल झाल्याचें गोपाळरावास कळलें नाहीं व पेशव्यांचे कारभारी सखाराम बापू यांस ही कळलें नाहीं?

उपरी राजश्री शिवाजीपंतीं हुजूर श्रीमंतांसंनिध रदबदली करून जप्तीची मोकळचिठ्ठी आणून दिल्ही. वतन सुटलें तें बाळंभट काळे यांचे स्वाधीन केलें. व उमळीचा * गांव मौजे चंदूर ही त्यांचेच स्वाधीन केला. सत्रेंच श्रीमंत कैलासवासी जाले. श्रीमंत राजश्री दादासाहेबांची स्वारी येऊन वडगांव मारिलें. पलीकडील चार तर्फांचा अंमल दुसाला बुडाला. अलीकडे नवा कारभार कोणी कांहीं दिल्हें नाहीं. त्या उपरी राजश्री विसाजीपंताची घालमेली जाहली. सन सलासांत श्रीमंतांची स्वारी होऊन मिरजेस वेढा आला. गुदस्तां सन आर्बांत वळसरा पडला. परगण्यापैकीं एक रुपया काळे यांस पावला नाहीं. चंदूरपैकीं दोन तीन सालें मिळोन हजार दीड हजार व किरकोळ पांचशें एकूण दोन हजार रुपये पावले. व्याजाचा हिशेब करितां बेमोबलग पैका होतो. नजर पैकीं हजार रुपये सरकारचे राहिले आहेत. कृष्णाजी रुद्र यास दोन चारशें रुपये कागदपत्रां मुळें (रामराव याणीं) कबूल केले होते ते पावले नाहींत हा दंश मनांत धरून त्याचा पुत्र महादाजी कृष्ण तुम्ही हुजूर कागदपत्रां साठीं नेला होता त्याणें कोणी कडून राजकारण करून जप्तीचा ऐवज रामरायाकडे येणें सबब वतन व इनाम गांव जप्त करून हुजूरचें पत्र आह्मांस आणिलें. गरीबावरी अग्नीचा पाऊस पडला! (रामराव) वीस पंचवीस हजारांचा कर्जदार. अन्न भक्षावया नाहीं. बाळंभट काळे याणीं येऊन अडविला. पांच उपोषणें उभयतांस जाहलीं. तेव्हां तिऱ्हाइताचे स्वाधीन देशपांडेपणाचें वतन करून साल दरसाल दोन हजार रुपये बाळंभट यांस द्यावे असा करारमदार होऊन एक मास जाला. महादाजी कृष्ण याणें पहिला फडणिशीकडे गांव निंबळक मोकासा होता तोही करार करून आणिला. हें वर्तमान

* उमळीचा ह्मणजे स्वतंत्र, निर्वेध. १ हा गांव तासगांव तालुक्यांत आहे.

तुह्मांस तिळमात्र ठाऊक नाहीं. तुमचा जिल्हा जिमा. तुह्मांस कांहीं तरी पुसावें तें न जालें. या उपरी श्रीमंतांपाशीं व कार्यभागी यां पाशीं रदबदल करून जप्तीची मोकळचिट्टी पाठवावी. नाहीं तर कर्जदारांचे तगादे. दरबारीं यांचा[1] वग वशिला कोणी नाहीं. ब्राह्मण नाहक मरतो! राजश्री सखारामपंतास देखील हें वर्तमान श्रुत नाहीं. कृष्णराऊ काळे याच्या मार्फतीनें केलें ह्मणोन ऐकितों. आम्ही खर्चास दोन चारशें देऊन पाठविला. त्याणें इतकें कार्य करून आलो[2]! अद्याप येथें आला नाहीं. मात्रागमनीपण केलें! त्याचें पारिपत्य सकृत् करावें. परंतुजमौजा एक प्रकार, दरबारीं पुर्ता शोध नाहीं. तुह्मांवरी एखादा शद्ब येईल. पेस्तर सालीं फडणिशी करार करावी असा करार त्याणें करून दिल्हा. रामाजी शिवराम म्हणोन छोटेखानी मिरजेंत राहतो त्याचेच मायेचा. पहिला नरसापा गोसावी याकडून तो दरबारास एक दोन वेळ जाऊन आला होता. त्याचे नांवें असामी करून आणिली म्हणोन ऐकितों. तुह्मांस कळावें. रागावर न घ्यावें. ज्या द्वारें रदबदल होईल त्या द्वारें करावें. दोन चारशें (रुपये द्यावयास) पडले तर मध्यस्तास देऊं करून मोकळचिट्टी घ्यावी. महद्यश[3] घ्यावें. बहुत काय लिहिणें. (रवाना) मार्गशीर्ष शुद्ध ११ सोमवार चतुर्थ प्रहर. हें कार्य जरूर जाणून स्मरण धरून करावें. हे आशीर्वाद.

नं० ५१३[4]

(३ दिसेंबर)

श्रीगणपतिर्जयति.

ॐआशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत मार्गशीर्ष शुद्ध ११

१ रामरावाचा. २ हें लिहिणें मिरजेच्या फडणिसास उद्देशून. ३ या शद्बाचा अर्थ कळत नाहीं. ४ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

भोमवासर. यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. राजश्री माणकोपंत मागें राहिले होते. प्रस्तुत तयार होऊन आले आहेत. सविस्तर इकडील वर्तमान सांगतील. चिरंजीव सौभाग्यवती यमुनाबाई श्री तुळजापुरचे यात्रेस गेली होती ती काली परभारी उदगांवाजवळी नदी उतरोन श्रीकरवीरचे यात्रेस गेली. तिकडून येथें येऊन मग गांवास जाणार. रवानगी करून देऊं तेव्हां लिहून पाठवूं. चिरंजीव दाजी मंगळवेढ्याहून निघोन आचऱ्यां जावयाबद्दल कालीच डिग्रजेनाजिक श्रीकृष्णा उतरोन गेले. वडगांवावरून बावडेंयाच्या घांटें जातों ह्मणोन लिहिलें होतें. शुद्ध पंचमीचीं पत्रें पुण्याचीं आलीं. चिरंजीव सौभाग्यवती यशोदाबाई सहकन्या माहेरीं सुखें आहेत. चिरंजीव सौभाग्यवती लक्ष्मीबाई सहपुत्र सुखें आहेत, ह्मणोन लिहिलें आलें. श्रीमंत राजश्री दादासाहेब पैठणानजिक आहेत. तेथून राजश्री गोविंद शिवराम चौथे दिवशीं पुण्यास आले ह्मणोन लिहिलें होतें. श्रीमंत[1] दक्षिणप्रांतें श्रीमंत राजश्री राऊ प्रधान स्वामीयांजकडे जातात. बराबर तोफा पुष्कळ आहेत. फौज भारी नाहीं. भोंसले येणार. गायकवाड येणार. किरकोळ दहा पांच हजार फौज जमा होईल. तूर्त पांच हजार पावेतों आहेत ह्मणोन बोली आहे. श्रीमंतानीं करोलेही कांहीं नवे ठेविले ह्मणोन बोली आहे. कळावें. गंगाराम कदम व्यथायुक्त कालीच येथें आले. 'राऊसाहेबांची आज्ञा कीं नानापाशीं राहणें.' ह्मणोन आलों म्हणतात. पुत्र बराबरी आहे. पाठवावे तरी कोठें तरी दुखणेकरी मरतील. ठेऊन घेतों. रोजमुरा कार्याकारण देऊं. बुधाजी चव्हाण यास पाठवून देणें. पाठवीत नसिलां तरी तसेंच लिहिणें. आह्मी आणखी स्वांर[2] मुबदला ठेऊं. सविस्तर राजश्री माणकोपंत सांगतां कळेल. हे आशीर्वाद.

---

१ दादासाहेब. २ बंदुकवाले घोडेस्वांर.

नं० ५१४

(१० दिसेंबर)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत मार्गशीर्ष वद्य २ सोमवार पर्यंत यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुह्मी शुद्ध दशमी सोमवारचें पत्र पाठविलें तें काली रविवारीं तिसरे प्रहरीं पावलें. लिहिलें वर्तमान विस्तरें कळलें. श्रीमंतानीं जातीनिशी हिंमत चांगली धरून तोंडीं हत्ती देऊन चालोन घेऊन (शत्रूस) पराभवातें पाविलेंयाचें वर्तमान[२] विस्तारें कळलें. श्रीनें मोठें यश दिल्हें. पुढें (हैदर) हतप्रभ होऊन तह करील किंवा पळोन जाईल. किंवा तेथेंच त्याचा नाश होईल. [श्रीमंतानीं] अवघड जागां टेंकडीवरी तोफा नेऊन त्याच्या गोटावरी मारगिरी केली हे गोष्ट बरी केली नाहीं. परंतु श्रीमंतांस काळ अनुकूळ! त्यामुळें त्यानीं शत्रुच पराभवातें पाविला. तीन बंद वर्तमान युद्धाचें साविस्तर कळलें. तुमचे मंडळीची सारे खैर जाली [ही] श्रीकृपा जाणावी. वरकड प्रथमता रात्रीचा दगा करावया आला होता. छबिंना सावध होता. खबरदारी जाली. माघारा मुरडोन गेला. मुख्य त्याचा भविष्यकाळ म्हणोन त्याच जागां दम धरून राहिला. पुढें लयास जातच आहे. चिरंजीव मेघश्यामरायाची काळजी लागली आहे. सुटका होईल तो सुदिवस! गोविंदा त्याच्या[३] लष्करांत असतां युद्ध जालें. त्याउपरी कधीं आला, काय वर्तमानतें लिहिलें पाहिजे. त्याचे गृहस्थ सांपडले त्यांच्या जखमा बांधावया निगा-

१ हें गोविंद हरीचें गोपाळरावास पत्र. २ हें सर्व वर्तमान अनवडीच्या लढाईचें गोपाळरावानें लिहून पाठविलेलें. ३ गोविंदा हा पटवर्धनांचा जासूद त्यानीं हैदराच्या लष्करांत मेघश्यामरावाच्या समाचाराकारितां पाठविला होता तो अनवडीची लढाई झाली तेव्हां तेथेंच होता.

दास्त करावी. त्या द्वारें कांहीं राजकारण जालें तरी करावें. जगतापाचे रुपये दिल्हे. सर्वांचे पावले. जिवाजी माने याचा मजकूर कळला. त्याजकडे पत्रही पाठवितों. गांवचा मजकूर कळला. कळेल तसें उलगडावया येईल. रहिमतपुरचा बंदोबस्त जाला. साल मजकुरीं घोडियांस दाणा व माणसांस रोजमरा वगैरे म्हणोन त्याजकडे तीनशें पावेतों पावले आहेत. पुढें त्याचे कर्ज देणें किती, द्यावें काय, हें स्मरणपुरस्कर लिहिणें. एकशें वीस भाडेकरी यांबद्दल (रुपये) घेतले. दोनशें पंचायशीं साडे तीन प्रमाणें ध्यावे होते. तूर्त तुम्हांस खर्चास येतील. पंचवीस रुपये तोटा, वीस रुपये, जो बसेल तो बसो; परंतु उगवून ध्यावे. पुढें ते[1] कधीं देणार, आपण कधीं ध्यावे ! वीस अगर बावीस (रुपये) तोटा येईल, तेवढाच आला म्हणावा. वरकड मेळविले असें समजावें ! पालख्यांचें सामान आणवून तीन पालख्यांचें पाठविणें म्हणोन लिहिलें त्यावरून पुण्याहून सामान दोरण्या मुलामे कोरदाल (?) पिंजरांचे[2] गोप व राजगोंडे[3] इर्लोखे व सांग (?) चें सारें सामान तीन पालख्यांचें आलें ते बजिन्नस पाठविले आहेत. तेव्हां तबकडीचा [तुम्हीं] मजकूर लिहिला नाहीं. आतां तबकडिया येतात कशा? लष्करास कधीं पाठवाव्या? त्यांस खर्च काय बसेल? यास्तव ये समयीं ते गोष्ट राहिली. पुढें श्रीकृपेनें स्वारीहून आलियावरी करावया कामास येईल. जुन्या तबकड्या हरकोठें सावनुरीं पाहिजे त्या मिळतील. दांड्या मिळतील. चार दिवस गुदराण करावी. रामाजी मंगेशाकडील उलगडा करून घेतला, मोठी गोष्ट केली. तितकाच ऐवज नवा मिळविला असें जाणावें. फार सरस गोष्ट केली. नरसाप्पा नाईक कलकेरी वगैरे क-

१ तोफखानेवाले पानशे. मिरजेहून लष्करास गोविंद हरीनें दारू गोळा भाडेकरी लावून पोंचता केला त्या भाड्याचे रुपये. २ पिंजरी = लहान पिंजरा. पालखीचें आच्छादन. ३ पालखीच्या मध्यभागीं हातानें धरण्याचा जो गोंडा असतो तो राजगोंडा. ४ गोंड्याचे गट्टू.

र्ज देणें आहे. त्याचे हवाले होऊन परभारें उगवे तें करावें. केलेंच असेल. बुधाजी चव्हाण यास पाठवावयाचा मजकूर लिहिला होता, त्यास तुम्हीं दुसरे ' नवे राऊत ठेवावे ' म्हणोन लिहिलें होते. त्यास तुम्हीं असें लिहिलें. बरें! जसें होईल (तसें होवो.) मिळाले तर ठेऊं. नाहींतर फारसा गुं ता नाहीं. अन्यत्र ठाणियानीं नेहमी स्वांर असावे, मिरजेंत नसावे, असा प्रकार नाहीं. परंतु जें [तुमच्या] मर्जीस आलें तें च [आम्हांस] मान्य पडलें! प्रसंगीं ठेऊन हरकशीं गुदराणी करूं. चिंता नाहीं. त्यांस नालबंदी पुरता ऐवज पांच साडे पांच (हजार) ठेवून बाकी ऐवज[1] सरकारांत घ्यावा म्हणोन लिहिलें, त्यास हें येथें सांगितलें असतें तरी बरें होतें. त्याणें कर्ज करून लोक ठेवून गेला. माघें करावेंसें जालें. तीन हजार रुपये तो आम्हीं घेतले. पुढील सालीं देऊं केले तेही यंदां घेऊं. अगर कसें बनेल तसें करूं. विश्वास आमचा फिरोन कोणी धरणार नाहीं? घोरपडे यांचा सरंजाम जप्त करावा म्हणोन लिहिलें त्यावरून सनद पाठविली जप्तीची. परंतु संभाजी घोरपडे या सारखा मोहरा बळवंतरायाचे स्वारीस पठाणांच्या[2]

---

१ बुधाजी चव्हाणाचे स्वांर यंदां चाकरीस स्वारींत हजर नाहींत· या करितां त्याच्या सरंजामाचीं खेडीं जप्त करून त्यास पुढच्या वर्षाच्यां नालबंदी पुरता ऐवज देऊन बाकी जहागिरी कडे जमा करावा ह्मणून गोपाळरावानें लिहिलें होतें. असेच पटवर्धनांच्या जहागीर मुलखांत इतर पोट सरंजामदार होते त्यांचे ही सरंजाम जप्त करावे ह्मणून त्यानें लिहिलें होतें. तसें न करावें क्षसें गोविंद हरीचें मत होतें व तें कां हें त्यानें या पत्रांत पुढें प्रतिपादन केलें आहे. हे पोट सरंजामदार पूर्वी सातारकरराजे व पेशवे यांच्या हुजरातींत चाकरी करीत असत. हल्लीं मात्र पटवर्धनांस मिरज प्रांत जहागीर मिळाल्यापासून पेशव्यानीं या पुरातन पोट सरंजामदारांस पटवर्धनांच्या निसबतीस राहून त्यांच्या फौजेंत चाकरी करण्याविषयीं हुकूम केला होता. २ बळवंतराव मेहेंदळे व कडपेंकर पठाण नबाब यांचें युद्ध कडपें शहरापाशीं इ० स० १७५७ त झालें त्यांत तो पठाण नबाब मारला गेला व त्याच्या फौजेची कत्तल झाली. त्या युद्धांत पटवर्धनांची फौज होती हें वरील उल्लेखावरून उघड होतें.

झुजांत पडला, त्याच्या लेंकास श्रीमंत कांहींच देणार नाहींत कीं काय? परभारी [श्रीमंतांकडे] रदबदल होईल तेव्हां (तुम्हांस) भारी पडेल. तुम्हांकडे रदबदल आहे तोंच राउतांची बोली बनली तरी ठेवावे. नाहींतर कसबे देशिंग त्याच्या नानपरवेशीस द्यावें. वरकड खेडीं जप्त करावीं. रांघोजी भोंसले यास चार हजार रूपये द्यावे (असें श्रीमंतानीं ठरविलें त्या अर्थी) संभाजी घोरपडे याच्या मुलास कांहीं न द्यावें असें होईल कीं काय? हुजरातीस त्याची चाकरी आहे. मुरारैरायाकडेही (त्यानें) बोली केली आहे. तुम्हांस कळावें म्हणोन लिहिलें. आम्ही सहाही खेडियांस जप्ती केली. तसेंच शिवाजी भोंसले मातबर मनुष्य. सावनुरावरी पडले. त्याच्या लेंकास सरंजाम दिल्हा होता (तो श्रीमंतानीं) तुमचे निसबतीस दिल्हा. गुदस्तां आम्ही त्यांस सांगितलें कीं ' मूल लहान. राऊत ठेऊन तुम्हीं कर्जदार कां होतां? खेडियानीं पैका येणार नाहीं. तुम्हीं श्रम पावाल. तुह्मांस धुळगांव देतों. सळगरें यांतील शेत मळा देतों. सुखरूप खाऊन असावें. पुढें थोर जालियावरी तुमचा सरंजाम तुमचे स्वाधीन करूं. तुम्हीं सेवा करणें. ' त्याची रदबदली परभारी श्रीमंतांकडे लागली तरी त्यास (ते) कांहीं न देवीत असा अर्थ नाहीं. सखो काशीकडील अन्न त्याचें आम्हीं तोडविलें. त्यास धुळगांव पांचशें रूपयांचें खेडें आहे. चालविलेंच पाहिजे.

---

१ तहाहयात निर्वाहा कारितां उत्पन्न देतात तें जानपरवेशी. सरकार चाकरीवर मनुष्य प्राणास मुकला असतां त्याच्या बायका मुलांच्या निर्वाहा कारितां उत्पन्न देतात तें नानपरवेशी. ' जान ' व ' नान ' हीं अक्षरें मोडींत सारखींच दिसतात त्यामुळें गैर माहीत वाचकांची वारंवार चूक होते. २ हे भोंसले नागपुरचे नव्हत हें सांगावयास नकोच ! ३ ते घोरपडे घोरपडे भाऊबंद असल्यामुळें मुराररराव त्याच्या वतीनें पेशव्यांशीं रदबदल करीलच. ४ इ० स० १७५६ त पेशव्यांचा सावनुरास वेढा पडला होता तेव्हां.

डुबळ अप्पोजी शिवाजीपंतीं नाहक मारिला. त्यास गांव आहे राजाचे देणें म्हणोन. श्रीमंतांजवळी फडणिसाची रदबदल क्षुल्लकानीं केली त्यास गांव मोकासा करून सनद दिल्ही. डुबळास नेदीत असा प्रकार नाहीं! बोभाटच गेला तर खर्च वेंच त्यास हजार पांचशें पडेल. परंतु गांव दरोबस्त त्याकडे देवितील हें तुमच्या ध्यानास येत नाहीं. पुढें स्वारीहून आलियावरी त्याची अढ करणें तशी करावी. तूर्त निजेलीं गांधलें उठवूं नयेत. यांत तुमची मर्जी असेल तशीच वर्तणूक करूं. आमचा आग्रह नाहीं. ' वरचेवर पत्रें वडिलांकडे पाठवावीं, परंतु सेवेस जाणें पडलें या मुळें फावलें नाहीं ' म्हणोन लिहिलें तें प्रमाणच. झूज जालियाचें वर्तमान येथें पांचवे रोजीं आलें, परंतु तुमचें पत्र नाहीं यास्तव चिंता होती. पत्र आलियावर संतोष जाला. चिरंजीव दाजी वाडियांत आणिले म्हणोन लिहिलें होतें, परंतु त्यांच्या मतें बाहेरच रहावें असें जालें. औषध उपाय होत आहेत. प्रस्तुत कांहींसा उतार आहे. श्रीकृपेनें दोन चार दिवसांत आरोग्य होईल. चिंता न करावी. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री नारायणरायास आशीर्वाद. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. ज्वराचा मजकूर कळला. काढा घेत जावा. श्रीकृपेनें उतार पडला असेल. चार दिवस श्रम न करावे. पुण्याहून जासूद तुम्हीं लिहिल्या प्रमाणें उत्तर घेऊन आले आहेत. सांगतां कळेल. हे आशीर्वाद.

---

१ हा माधवराव बल्लाळ पेशव्यांचा सासरा व मिरजेचा पूर्वींचा मामलेदार. २ शिवाजी पासून शाहूपर्यंत कोणच्या तरी राजानें दिलेलें. बहुधा शाहूराजानें. ३ मिरजेच्या फडणिसानें दरबारांत कसा वशिला लाविला हें मागें नं० ५१२ च्या पत्रांत आलेंच आहे. ४ निजलेल्या गांधिलमाशा.

नं ९१९

(१८ दिसेंबर)

श्री

श्रियासह चिरंजीव राजश्री गोपाळराव दादा यांसीं प्रती सौभाग्यवती सत्यभामाबाई. आशीर्वाद उपरी. येथील वर्तमान तागायत मार्गशीर्ष वद्य द्वितीया इंदुवार पर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. तुह्मीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. ऐसेंच सदैव पत्र पाठवून संतोषवीत जाणें. यानंतर तुह्मी झुजा भांडणांत बहुत शहाणपणें रहाणें. उतावीळपण फार न करणें. युद्धाचा मजकूर सर्व पत्रावरून कळला. श्रीमंतांस यश आलें, उत्तम जाहलें. इकडील मजकूर सर्व पत्रांवरून कळेल. चिरंजीव सौभाग्यवती यमुनाबाई श्री तुळजापुरच्या यात्रेस गेली होती ती व मुलें बाळें सर्व सुखरूप आलीं. पुण्यास लौकर जाणार आहेत. तुह्मीं लिहिलें होतें कीं ' कुणबिणी दोन पाठविल्या ' त्यास अजून (त्या) आल्या नाहीं. चिरंजीव सौभाग्यवती भागूबाईस एक कुळबीण देणार होतों परंतु आल्या नाहीं. चिरंजीव सदाशिव नातु घरीं गेला. येथें कुळबीण आली असती तरी (त्याबरोबर कोकणांत) पाठवून देतों. अद्याप तरी कोठें आहेत त्याचा शोध करून लिहिणें. यानंतर चिरंजीव राजश्री त्रिंबकराव जांवई यांस तूर्त ऐनापुरीं पाठविले आहेत परंतु शाश्वत नाहीं. याजकारितां तिकडे कुंदगोळ वगैरे ठाणीं आहेत तेथें कोणी कमावीदार ठेविले नसिले तरी त्रिंबकरायास सांगावें. दोन चार हजार पर्यंत रसदही देतील असें आहे. तरी याचा शोध करून मनास आणून ठेवणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

---

१ हें गोपाळरावाच्या आईचें त्यास पत्र. २ गोविंद हरीच्या पत्रावरून.

नं० ९१६

(१६ दिसेंबर)

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीव राजश्री रावसाहेब यांस आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत मार्गशीर्ष वद्य ८ रविवासर पावेतों यथास्थित जाणोन स्वकीय लेखन करणें. विशेष. तुह्मांकडून पत्रें मंदवार नवमीचें युद्ध जाहल्यानंतर इंदुवार एकादशीचीं पत्रें युद्धाचे वर्तमानाचीं वगैरे आलीं. त्या अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं या करितां चित्त स्वस्थ नाहीं. तरी वरचेवरी पत्रीं साकल्य वृत्त लिहीत जाणें. इकडील वर्तमान अधिकोत्तर लिहिणेंसें नाहीं. पत्राचें उत्तर जासुदा समागमें पाठविलें आहे तें पावलेंच असेल. श्रीमंत राजश्री दादासाहेब सीनेच्या पाण्यानें खडकतचे मुक्कामास आले. पुढें भीवरेच्या[2] पाण्यानें येणार यास बुद्धिवाद[3] काय, ह्मणोन राजश्री बहिरोपंतीं व चिरंजीव राजश्री बळवंत राऊ यांणीं मंगळवेढ्याहून पत्रें लिहून पाठविलीं. त्यास आम्हीं लिहिलें कीं सीनेच्या पाण्यानें गेले तरी मग गुंताच नाहीं. भिवरेकडे आले ह्मणजे प्रसंग पडल्यासारखी वर्तणूक करणें. यापरतें त्यांस काय ल्याहावें! तिकडे प्रसंगीं चिरंजीव राजश्री दाजी असतो[4] तरी उत्तम होतें. त्यास आताशें शरीरीं समाधान जाहलें आहे. अद्याप [चि० दाजी] चिरंजीव राजश्री भास्करपंत आपाचे घरीं आहेत. कळावें ह्मणोन लिहिलें आहे. आरोग्य उत्तम प्रकारें जालें. परंतु मन मानें तसे बिबे घातले या मुळें चिडले. त्यामुळें तिडकतात. चिरंजीवाविशीं चिंता न करावी. चिरंजीव मेघश्यामरायाची अवस्था काय, मुर्ख्यांजवळी होते किंवा

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ भिमानदीच्या. ३ दादासाहेब इकडून आलेतर मुलखाचा नाश होईल यास काय करावें याविषयीं बुद्धिवाद. ४ अनवडीच्या लढाईच्या वेळीं हैदराजवळ.

बिदनुरीं होते न कळे. युद्ध जालियाउपरी त्याकडील कोणी आला कीं नाहीं लिहिणें. वरकड श्री स्वामीच्या वृंदावनासभोंवती भिंत घालून राजपत्नीनें स्मशानभूमिकेंत घेतली. ओवरिया स्वामीनीं नदीतीरीं बांधिल्या होत्या त्या पाडून भिंतीचा पाया घातला. सर्व प्रकारें श्रीस्वामी फार श्रमी. प्रस्तुत (त्यांच्या शरीरीं) व्यथाही विशेष. वांचावयाचें संकट. परंतु वासना त्यांची राहते. आह्मांकडे आठ दिवसां येविशीं एक पत्र येतें. यास्तव श्रीमंत मातुश्रीस एक पत्र श्रीमंतांचें कीं, ' वृंदावनासभोतें भिंताड घातलें तें पाडून टाकणें, ' म्हणोन पत्र पाठवावें. तसेंच रामभाऊ देशपांडे याचें वतन अमानत जालें निरन्याई, यास्तव श्रीमंतांस विनंती करून जप्तीची मोकळ चिट्टी घेऊन पाठविणें. ' हिशेबीं त्याजकडे रुपये निघतील ते आपण वसूल करून देतों ' ह्मणोन तुह्मीं धणी होऊन जप्ती मोकळी करणें. लक्ष गोष्टीची गोष्टी. ब्राह्मणावरी कृतोपकार होतील. कज्याखालें बुडाला. महद्यश येवढें घेणें. येविशीं राजश्री नारोपंत सांगतां कळों येईल. बहुत काय लिहिणें. वर्तमान वरचेवर लिहीत जाणें. हे आशीर्वाद.

नं० ५१७

[१९ दिसेंबर]

श्रीगणपतिर्जयति

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत मार्गशीर्ष वद्य एकादशी बुधवार अस्तमान पावेतों यथास्थित असे. विशेष. सांप्रत तुम्हांकडील पत्र येत नाहीं तरी वरचेवर पत्र पाठवीत जाणें. श्रीमंत राजश्री दादा साहेब बारशी पानगांव प्रांतें भोज पिंपरी नजिक आले. तेथें मुक्काम होता. बिडाकडील निंबाळकर यांजकडील घास दाणा पावणे तीन लाख, व

१ हैदराकडून तह करण्याकारितां वकील. २ निरपराधी. ३ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

जानोजी निंबाळकर व महादाजी निंबाळकर यांचा तालुका पावणे दोन लक्षास करार जाहला. मकरंदनाईक याचीं ठाणीं घ्यावयाचा मनसबा आहे. गोपाळपंत मोहळकर राजश्री बाबूजी नायकास भेटला. त्याणीं त्याचा अंगिकार केला. मोहळ धारराया पासून घेऊन गोपाळपंतास द्यावी असा मनसबा आहे. बाबूजीनाईक (श्रीमंतदादासाहेबां) समागमें आहेत. पिराजी नाईक कासेगांवीं त्यांकडे गेले. राजश्री आबा पुरंदरे ही श्रीमंतांकडे गेले. मोहळ घेऊन श्रीक्षेत्रास यावें अशी बोली आहे, म्हणोन छ० २३तेरखेचें पत्र श्रीक्षेत्राहून आजी छ० २५जमादिलाखरीं आलें त्यांत लिहिलें आहे. कोणीकडे होतील पहावें. चिरंजीव सौभाग्यवती यमुनाबाई व चिरंजिव सौभाग्यवती योगमाया यांची रवानगी अमावास्या जालियावरी करितों तुह्मांस कळावें. बहुत सावधपणें रहात जाणें. रामराऊ देशपांडे याचें वतन मुक्त होय तें केल्यास परम यश आहे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

समस्त चिरंजिव मंडळीस आशीर्वाद.

नं० ५१८

(अजमासें मार्गशीर्ष वद्य
दिसेंबरचा दु० पंधरवडा.)

श्रीगणपतिर्जयति

आशीर्वाद उपरी. स्वारांचा व गणपतीचा मजकूर लिहिला तो कळला. ऐशियाशीं " एवढी तवाई पडली. दोन वर्षें पैशास दर्शन नाहीं. लष्करांत महर्गता. सरंजाम गैर कब्जी. कांहीं सुटला त्यांत वस्ती नाहीं.

१ इतकी रकम घांस दाणा ह्मणून दादासाहेबांस देण्याचें निंबाळकरानीं कबूल केलें. २ हा मकरंदनाईक, पुढें आलेले धारराव व पिराजी नाईक हे सर्व निंबाळकरच होत. ३ पंढरपुरास. ४ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. यांत रिकामी जागा सोडिली आहे तेथें मूळ पत्रांतलीं अक्षरें फाटलीं आहेत. ५ हलाखी. ६ ताब्यांत नसलेला.

कांहींमध्यें लष्करची पायमल्ली. देशीं मात्र दोन चार परगजे खुलासा [राहिले होते] त्यांत श्रीमंत राजश्री दादासाहेबांच्या स्वारीचा उपद्रव. करकंब प्रांतीं दोन चार खेडीं तो ओस पडलीं. मंगळवेढ्यांत तोफखानाच येऊन उतरला त्यानीं दोन चार खेडियांस मनस्वी उपद्रव दिला. मिरज प्रांतीं ही जवळी आहेत. पुढें कृष्णातीरीं अगर जातील. जमाखिंडी प्रांत पडला असें जाणावें. तथापि करारापेक्षां स्वार अधिकोत्तर असावे. गुदस्तां सात हजार ते यंदां हजार पांचशें करारांत कमी ठेविले. पुढें जास्ती ठेऊं. इतकें कर्ज बाळगून केवळ राऊत न. ठेवावे हे वासना नाहीं. लबाड बोलावयाची गोष्ट नाहीं. पुढील वर्षी ज्याजती राऊत ठेऊं. " ह्मणोन एक वेळच [श्रीमंतांस] विनंति करावी. काली तुमचें पत्र आल्यापासून राउतांचा तलास मांडला. त्यास —–—–— पन्नास रुपये दर रावतीं रोख पद्रीं घालावे. पंधरा दिसां चाकेर मिळवून जाऊं ह्मणतात. परंतु महिना लावितील. बोलीप्रमाणें राऊत नेणार नाहींत. दहांची बोली करून आठजण सातजण जातील. आर्धी पैका द्यावा ऐसें (त्यांचें तोंड ! लष्करास जावयाकरितां पाय घेत नाहींत. दोन तीनशें स्वार येकाएकीं जथोन जाणार नाहींत, नाहक कर्जदार व्हावें,. लष्कर पुढें चालिलें, निभावें मार्गाचा नव्हे, जाणून हें पत्र लिहिलें आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेबां यांत कांहीं चोरी छपी नाहीं. सांगावयास येईल. मसलत चा सुमार हे आणखी इकडे राहणार. श्रीमंत पुढें चालिले. शत्रु पराभव झाला पाहिजे. इतकें साहस श्रम करून पुढें सार्थक किंवा असार्थक हें हीं कळेना ! यवन काडलूरसंगमाकडे आला ह्मणून बोली आहे. दिवस डोईवर आले. यंदा (पुन:) छावणी तो होणार नाहीं. श्रीनें काय योजिलें आहे न कळे ! बहुत; काय लिहिणें

१ मोकळे, निर्वेध. २ बारगीर चाकरीस, ठेवून. ३ निजामअली. ४ कृष्णा व भीमा यांच्या संगमाकडे.

हे आशीर्वाद.

नं० ५१९

[२१ दिसेंबर.]

श्रीगणपति.

तीर्थस्वरूप राजश्री आपा वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें परशुरामानें साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत मार्गशीर्ष वद्य १३ भृगुवार मुक्काम लष्कर नजीक गोंदी परगणें अनवडी. वडिलांचे आशीर्वादें यथास्थित असे. विशेष. वडिलीं एक दोन पत्रें पाठविलीं तीं पावोन विस्तारार्थ विदित जाला. असेंच सदैव येणारासमागमें आशीर्वादपत्रीं सांभाळ करावा. आह्मांकडील राजकी वर्तमान तरी पहिलें नवमी मंदवारी युद्ध जाहलें. त्या अलीकडे तो खंदकाबाहेर निघत नाहीं. जमीन धरोन लढाई तोफा तोफी मारामारी करितात. श्रीमंत राजश्री दादा साहेब ही क्षेत्रीं अलीकडे आले. ते आल्यावर तहरह अथवा हल्ला दोहींतून काय मतलब कर्तव्य तदनुरूप करून मित्रत्वें अथवा शत्रुत्वें यवनाचा पराभव करितील. आणखी किमानपक्ष पौष मास अगदीं याचे पारिपत्यास लागेलसें दिसतें. त्यांत श्रीसत्ता प्रमाण आहे. वरकड सविस्तर, तीर्थस्वरूप राजश्री नीलकंठराव लिहितील त्याजवरून सकलार्थ सपशीलवार विदित होईल. सदैव पत्रीं सांभाळ करावा. विदित होय हे विज्ञापना. चिरंजीव राजश्री रावोबांस आशीर्वाद. पत्रीं स्मरणपूर्वक नमस्कार लिहिला तो पावोन संतोष जाहला. सदैव पत्र पाठवीत जाणें. लोभ कीजे. हे आशीर्वाद.

---

१ पत्र परशुरामभाऊचें चुलता त्रिंबक हरी यास. २ अनवडीची लढाई. २ पंढरपुराअलीकडे. ३ रघुनाथराव दादा हा नीलकंठरावाचा मुलगा व ज्यास हें पत्र लिहिलें आहे त्या त्रिंबक हरीचा नातू.

नं० ९२०

(अजमासें मार्गशीर्ष वद्य.
दिसेंबरचा दु० पंधरवडा.)

श्रीगणपतिर्जयति

आशीर्वाद[1] उपरी. राजश्री[2] सदाशिवभट[3] भिडे नवे व्याही साळशी प्रांतें असतात. तेथील कमावीस जंजिरे विजयदुर्गाकडोन कमावीसदार करितात. पांचशें रुपये वेतन पावतें. मामलतीच्या कार्या निमित्य, खिजमतगार दिवटे व हशमी लोक ताबीन असतात. यांचे मतें " हुजुरून ते कमावीस सदाशिवभट भिडे यांस सांगितली. यांचे हातें कामकाज घ्यावें " ह्मणोन जंजिरे याच्या मामलेदारास पत्र व तालुका मजकुरास पत्र श्रीमंतांचें घ्यावें. व वेतन पैकीं भिडेनें कांहीं जास्त जालें तरी बरें. निदान आहे त्याप्रमाणें, कदाचित त्यांतही शें पन्नास कमी जाले तरी कबूल करावयाची सोय आहे. सदाशिवभट कसें ह्मणावें, म्हणून संदेह पडेल तरी त्यांच्या बापाचें नांव बापूजीपंत. यास्तव सदाशिव बापूजी म्हणावें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० ९२१

(कार्तिक वद्य तृतीया.
११ नोवेंबर)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[4] उपरी. पुण्याहून पत्रें आलीं त्यासमागमें राजश्री गंगा-

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ गोपाळरावाच्या दुसऱ्या बायकोचा हा बाप. ३ भटजी आपले सासरे झाले ह्मणून काय झालें? त्यांचा धंदा भिक्षुकीचा. त्यांस कमावसिदारी कशी सांगावी? ४ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

धर बडवे भाऊ याणीं पत्र पाठविलें तेच बजिन्नस तुह्मांकडे पाठविलें आहे. वाचोन पाहोन राजश्री शास्त्रीबावांस व राजश्री मोरो[2] हरी यास श्रीमंतांचें पत्र व कार्यभागी[3] यांचें ऐशीं दोन पत्रें घेऊन पाठऊन द्यावीं. " स्वांरीहून आलियानंतर करीने[4] तकरीरा[5] वगैरे सर्व मनास आणून काजिया विल्हे लाविला जाईल तों पावेतों उभयतां वादे[6] यांस क्षेत्रांस[7] निरोप देऊन पाठविणें. " या प्रमाणें पत्रीं मजकूर लिहिवणें. पत्राविशीं यत्न करावा. तुमचा यत्न! बडवे यांचे प्राक्तनें करून पत्रें आलीं तरी घेऊन पाठवावीं. इलाज न चाले तरी उत्तर तरी लिहून पाठवावें. तैसेंच भोकुमचें कुरण गंगाधरपंत ढेरे यांजकडे देविलें आहे. त्यास श्रीमंत[8] राजश्री नानाफडणीस याणीं मुदत पंधरा दिवसांची केली कीं श्रीमंतांची सनद ' कुरण राजश्री गोपाळ राऊ याकडे देणें, दिकत न करणें, ' म्हणोन, आणावी म्हणजे कुरण मोकळें करून देतों ऐसा करार केला आहे. तरी सरकारचें पत्र सदरहू प्रमाणें गंगाधरपंत ढेरे यांस व राजश्री नाना फडणीस यांस सत्वर घेऊन पाठवावें. कुरणाचा हंगाम गवत कापणीचा हाच आहे. पेशजी सनद तुह्मी पाठविली ती पुण्यांत कारकुनाचे हातें गैर विल्हेस पडली. यास्तव

१ न्यायाधीश रामशास्त्री यांजपुढें पंढरपुरच्या बडव्यांचा यावेळीं तंटा सुरू होता. मोरो हरी हा शास्त्री बावांच्या मदतीस सरकारांतून पंच होता. या वादांत गंगाधर बडवे हा पटवर्धनांच्या कृपेंतला होता पण न्यायाधीश व पंच यांचा त्यास प्रतिकूळ निकाल देण्याचा रोंख होता. पेशवे स्वांरीहून परत येत पर्यंत तरी शेवटचा निकाल देण्याचें तहकूब व्हावें या साठीं ही गोविंद हरीची खटपट. २ मोरो हरी हा माधवराव पेशव्यांच्या दरबारांतला एक वजनदार मुतसदी होता. ३ सखारामबापू कारभारी याचें. ४ करीना ह्मणजे लेखी हाकिगत. ५ तकरारी. ६ वाद करणारे. ७ पंढरपुरास. ८ नानाफडणिसास गोविंद हरी ' श्रीमंत ' लिहितो याचें कारण काय? मोरोबादादा फडणीस यास ही त्यानें मागें एक दोनदां ' श्रीमंत ' हें उपपद दिलेलें या पुस्तकांत आढळेल.

वर्गणीची पोंच.

सन १८९८ । ९९

(ता. २२ मार्च पासून २२ एप्रिल पर्यंत.)
तिसऱ्या वर्षाची आगाऊ.

	रु०
रा. रा. सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी मुधोळ.	३
,, ,, जनार्दन सखाराम करंदीकर. बी. ए. हेडमास्तर. हायस्कूल मुधोळ.	३
,, ,, सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. बारशी.	३

ऐ०ले०संग्रह कर्ते.

सूचना

आम्हीं केलेल्या पुस्तकां पैकीं:—

१ यशवंतराय महाकाव्य (सर्ग२४श्लोक संख्या १७२९) किंमत १रुपया

२ फुटकळ चुटके (कविता)किंमत ८४

३ समुद्र काव्य किंमत ८३

४ गुणोत्कर्ष नाटक [तिसरी आवृति] किंमत ८८

ऐ० ले० संग्रहापैकीं निराळीं प्रकरणें *

मिरज प्रकरण–(मिरजेचा वेढा व तत्संबंधीं युद्ध) या हकिगतीचीं पत्रें ऐ०ले०संग्रहाच्या पांच, सहा व सात या अंकांत आलीं आहेत त्यांचें हें निराळें पुस्तक. किंमत ८१२.

मोंगलाशीं लढाई. किंमत ८३.

किंमत रोख. ट०हां० माफ. व्ही. पी.नें मागविल्यास ही पाठविण्यांत येतील.

---

* ऐ०ले०संग्रहाच्या वर्गणीदारांस हीं पुस्तकें निम्मे किंमतीस मिळतील.

ऐतिहासिक-लेख-संग्रह.

हें डेमी अष्टपत्री सांचाच्या चाळीस पृष्ठांचें मासिक पुस्तक दर म॰ हिन्यास मिरज येथें नियमानें प्रसिद्ध होत असतें. यांत पटवर्धन जहागीरदारांच्या जुन्या चिटणिशी दप्तरांतील ऐतिहासिक महत्वाचीं व प्रत्येक स्वारीतील भरपूर माहितीचीं पत्रें सालवारीच्या क्रमानें छापून प्रसिद्ध होत असतात. शिवाय अन्यत्र उपलब्ध झालेले कागदपत्र व बखरी वगैरेंचा ही यांत समावेश होत असतो. या मासिक पुस्तकाची आगाऊ किंमत सालिना ट॰ हा॰ सुद्धां तीन रुपये आहे. ग्राहकांनीं सालिना वर्गणीच्या किंमतीचें व्हा॰ पे॰ मागवावें अथवा तितक्या रकमेची मनीआर्डर पाठवावी. या शिवाय पुस्तक सुरू केलें जाणार नाहीं.

ऐ॰ ले॰ संग्रह कर्ते.

आमचे पुणें व मुंबई येथील एजंट.

रा.रा मुरलीधर मल्हार अबे, महाराष्ट्र बुकडेपोचे म्यानेजर, बुधवार पेठ पुणें. रा.रा. विष्णु दासो वनहट्टी. कमिशन एजन्ट आणि जनरल मर्चंट. गिरगांव ट्रामवे टरमिनस्. पेंडसे यांची नवी चाळ, मुंबई.

सदरहू दोन असामींस आह्मीं ऐ॰ले॰संग्रहाचे एजंट नेमिलें आहे. त्यांजकडे तेथील वर्गणीदारानीं वर्गणी द्यावी. आमचीं सर्व पुस्तकें एजंटांकडे विकत मिळतील.

ऐ॰ ले॰ संग्रह कर्ते.